लोकप्रिय

# भाऊसाहेब सोमण

लेखक : पु. पां. गोखले, बी. ए., कराड.

★

माघ वद्य ३० }
शके १८७७ }

प्रकाशन-दिन

{ दिनांक ११
{ फेब्रुवारी १९५६

प्रकाशक:–

कै. भाऊसाहेब सोमण स्मारक समिति,
सातारा करिता
**द. रा. परांजपे**, चिटणीस,
६, शनिवार, सातारा.

सर्व हक्क
कै. भाऊसाहेब सोमण स्मारक समिति, सातारा यांचे स्वाधीन

मुद्रक:–

**अनंत कृष्ण कुलकर्णी**,
आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा लि.
१८२, सोमवार, सातारा शहर.

# समितीचे निवेदन

गेल्या पन्नास वर्षात सातारा जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व संघटनात्मक घडामोडीवर, अनेक संस्थांच्या विकासावर, अनेक व्यक्तींच्या कौटुंबिक स्थिर–स्थितीवर ज्यांच्या जीवनाचा, चारित्र्याचा, परिणामकारक ठसा उमटला त्या कै. लोकप्रिय भाऊसाहेबांचा उज्ज्वल जीवनवृत्तान्त नवभारतास खरा मार्गदर्शक होईल असे लोकसेवा–संघाच्या विश्वस्तास, अनेक गृहस्थाप्रमाणे वाटले. त्यानी चरित्राच्या लिखाणाची उभारणी करण्यास लागणारी साधनसामुग्री जमविण्यास सुरवात करून जीवन–वृत्तान्तास दृश्य स्वरूप आणण्याची जबाबदारी स्मारक–समितीवर टाकली. स्वातंत्र्याच्या झगडयाच्या काळात भाऊसाहेबानी लोकमान्य टिळकांच्या जहाल पक्षाचे व असहकाराचे प्रणेते महात्मा गांधी यांचे अनुयायित्व पत्करल्यामुळे त्यांच्या घरावर तत्कालिन परकीय सत्तेचे अनेक घाले आले; त्याचा परिणाम हा झाला की, भाऊसाहेबानी आपल्या घरी अगर आप्तेष्ट–स्नेहीसोबती यांच्याजवळ चरित्र–लेखनास उपयुक्त असा पत्रव्यवहार, लेख, टाचणे, वगैरे काहीही ठेवली नाहीत. यामुळे त्यांच्या जीवनावर अधिकृतरीत्या प्रकाश पाडणारी साधने मिळविण्यापासून अनेक अडचणी समितीपुढे उभ्या राहिल्या. भाऊसाहेब हे जिल्ह्याचे पुढारी असल्यामुळे देशाचे पुढारी, सरकार, खेडुत–नागरिक यांचा सांधा सांधणाऱ्या दुव्याचे काम त्याना करावे लागे. पुढाऱ्यांचे संदेश, आदेश खेडुत जनतेस पटवून त्यास कार्यास उद्युक्त करणे व खेडुत जनतेच्या आकांक्षा, अपेक्षा पुढाऱ्यास, सरकारास यथार्थतेने पटवून देऊन तिच्या विचार–प्रणालीची व कार्याची बैठक निश्चित करणे अशी जबाबदारीची कामगिरी ते मोठ्या कुशलतेने तहहयात करीत आले. परकीय सरकारच्या इतराजीची तमा न बाळगता लोकमताला पुढाऱ्यानी आखलेल्या कार्याला उद्युक्तकरून त्यांची निष्ठा व कार्यशीलता कोणत्याही जुलमाला न जुमानता सातत्याने टिकवणे अत्यंत अवघड काम होते. परंतु आपली ध्येयच्युति होऊ न देता, त्यांनी अढळ निष्ठेने काँग्रेससारख्या संस्थेशी एकनिष्ठ राहून स्वदेश–स्वातंत्र्य–प्राप्तीचे कार्य चालविले. ब्रिटिश पारतंत्र्याची शृंखला तुटून भारताला स्वातंत्र्य लाभले यामुळे अनेक राष्ट्रभक्ताप्रमाणे भाऊसाहेबाना कृतार्थतेचे समाधान लाभले. पण स्वराज्य सुराज्य होऊन आमजनतेला सुख लाभून त्यांचे कल्याण व्हावे, स्वकीय सरकारकडून कोणाचाही नाहक छळ होऊ नये, अशा अपेक्षेने तहहयात त्यांचे प्रयत्न चालू होते. गाजावाजा न करिता राष्ट्रसेवेच्या निष्ठेने संघटनात्मक कार्य सातत्याने चालावे असा त्यांचा अहर्निश प्रयत्न असे. सर्वतऱ्हेच्या मतभेदाना मिटवून समन्वयवृत्तीने त्यानी साताऱ्याचा ऐक्यभूमी म्हणून लौकिक प्रस्थापित केला. कौटुंबिक जीवनातही तोच अनुभव. अशा या जीवनाचे यथार्थ चित्र–साधनांची अनुकूलता नसताना ती कष्टाने मिळवून, कळकळीने अभ्यासून, अंतर्मुख

वृत्तीने चरित्रनायकाच्या मनोवृत्तीशी समरस होऊन, विवेक–वृत्तीने लिहिणे अत्यंत अवघड काम. आमचे कराडचे मित्र समाजभूषण बाबूराव गोखल्याशिवाय दुसरा कोणीही ते करू शकणार नाही असे स्मारक समितीच्या कार्यकर्त्यास दिसून आले. गेल्या पस्तीस वर्षात जिल्ह्यातील घडामोडीकडे राष्ट्रीयवृत्तीने बघणारे, निष्ठावंत, संघटनात्मक कार्याशी समरस झालेले बाबूराव याना विनंती करताच कर्तव्यबुद्धीने ही जबाबदारी स्वीकारण्यास ते कबूल झाले. गेल्या दीड महिन्यात त्यानी हरतऱ्हेची साधने जमविली, अनेक मुलाखती घेतल्या, अनेकाशी विचारविनिमय केले. मिळालेली आणि संकलित केलेली माहिती मोठ्या कुशलतेने, चिकित्सक वृत्तीने, हाताळून या चरित्राची उभारणी त्यानी केली. या दीर्घोद्योगी, निष्ठावंत, आत्मियतेच्या कामगिरीबद्दल कोणत्या योग्य शब्दानी त्यांच्याबद्दल आभार व्यक्त करणे शक्य आहे? "ठीक, मन–पसंत" एवढेच आम्ही म्हणतो.

बाबूराव यांच्या मार्गदर्शनत्वाखाली सुसंगत रीतीने छापखान्यास द्यावयाची हस्तलिखित प्रत तयार करण्याचे, व प्रुफे तपासण्याचे किचकट काम मल्हारपंत कुलकर्णी यानी केले; आनंद छापखान्याचे अनंतराव कुलकर्णी यानी अल्प मुदतीत छापण्याचे काम केले; गणपतराव परांजपे यानी हस्तलिखिते व छपाईची प्रुफे आम्ही स्वीकारलेल्या अनुच्चारित अनुस्वारास फाटा देण्याच्या पद्धतीला अनुसरून तपासण्याचे काम वेळ अवेळ लक्षात न घेता केले; पुण्याचे ब्लॉकमेकर के. जोशी यानी सर्व ब्लॉक्स वेळेवर तयार करून दिले; भुर्के–कलाभुवनाचे बाळासाहेब भुर्के यानी मुखपृष्ट तयार करून दिले; शिवाय पुस्तक प्रसिद्ध होईपर्यंतची ज्या ज्ञात व अज्ञात प्रसिद्धि–पराङ्मुख व्यक्तींची व संस्थांची मदत या प्रकाशनास झाली त्यासर्वांचे आम्ही हार्दिक आभार मानतो.

या पुस्तकात ऱ्हस्व दीर्घाची अनेक दोषस्थळे आहेत. परंतु सध्याच्या शुद्धलेखनाच्या अस्थिर परिस्थितीकडे लक्ष देऊन ती वाचकानी क्षम्य मानावीत. छापाईच्या घाईत अनवधानामुळे झालेल्या अशुद्धि, पृ. २०३–४ वर शुद्ध केल्या आहेत; त्याप्रमाणे शुद्धि करूनच पुस्तक वाचावे, अशी विनंति आहे. सोमणांच्या हयातीत झालेल्या सातारा जिल्ह्यातील घडामोडींची सनावली व महत्त्वाची सूचि बाबूरावानी तयार करून दिल्याने पुस्तकाच्या उपयुक्ततेत भर पडली आहे.

या चरित्रास प्रस्तावना लिहिण्याची विनंती बुवासाहेब गोसावी व बाबूराव गोखले यानी भाऊसाहेबांचे जिव्हाळ्याचे मित्र नगरचे श्री. भाऊसाहेब फिरोदिया याना केली व केवळ भाऊसाहेबांच्या निःसीम–प्रेमाने ती विनंती मान्य करून त्यानी प्रस्तावना लिहिली याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून ही कृतज्ञता संपवितो.

सातारा<br>ता. ११–२–५६

**द. रा. परांजपे,**<br>**रा. ना. गोडबोले**

# कृतज्ञतेचा नमस्कार

सातारा जिल्ह्याचे सर्व-समन्वयी पुढारी लोकप्रिय भाऊसाहेब सोमण. त्यांची आज पहिली पुण्यतिथी. आज त्यांची वाङ्मयी पूजा माझ्या हातून होत आहे. ही सोमण–स्मारक–समितीची कृपा आहे. एरवी माझी योग्यता काय ? चरित्र–नायकाशी चरित्र लेखक तन्मय, निदान समरस तरी असावा लागतो. तसे होण्याचा मी प्रयत्न केला आहे. साधला आहे कितपत, वाचकच ठरवितील. " स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधी जन्मती ? " असेच प्रत्येक भक्ताला त्याच्या देवासंबंधी होऊन जाते. पण विविध लिखाणात जन्म घालविणाऱ्या चरित्रकाराला तसे कसे होईल ? त्यातून, अवतारी पुरुषाचे चरित्र अगर जागतिक इतिहासाला वळण देणाऱ्या महात्म्याचे चरित्र लिहणाराला भक्ताची अवस्था येईलही. नाही असे नाही. भाऊसाहेब सोमण एका जिल्ह्याचे पुढारी आणि त्यांचा प्रस्तुत चरित्र लेखक कोण्या झाडाचा पाला ! पण, जिल्हा पुढाऱ्याचे चरित्र हे जागतिक विभुतीच्या मानाने आदर्श नसले तरी किती तरी अनुकरणक्षम. लोक–मान्य टिळक, महात्मा गांधी याना वंदन करणे सोपे. पण, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक होण्याची महत्वाकांक्षा आचरणात आणणे बहुधा " येरा गबा–ळाचे काम " ठरावयाचे. तसे जिल्हा पुढाऱ्याचे नसते. मनात आणीन तर खास मी भाऊसाहेब सोमण होईन असा आत्मविश्वास तरुण मनाला येईल. कारण जिल्हापुढारी हे माणसाचे महादेव झालेले असतात. भाऊसाहेब सोमण तसेच होते. उमेदवारीच्या पाऊलवाटेनेच ते पुढारीपणाच्या पीठापर्यंत चढले. आपल्या मर्यादा ते सर्व क्षेत्रात जाणून होते व दुसऱ्यांच्याही मर्यादा ते सांभाळित. असा मर्यादा–पुरुषोत्तम होणे हे आता प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. हे सोपे नाही; प्रयत्नसाध्य आहे. सोमण–चरित्राचा हा उद्‌बोध आहे. हा प्रसाद भाऊसाहेब सोम–णांच्या प्रत्यक्ष सहवास प्रसंगी जसा मला मिळे, तसाच आज दीड महिना त्यांच्या चरित्राशी समरस होतानाही मिळाला. ही संधि मला दिल्याबद्दल सोमणस्मारक समितीला धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

माझ्या हातून घडलेल्या या वाङ्मयी पूजेत जे दोष असतील ते सर्वस्वी माझे आहेत. गुण असतील ते या चरित्र लेखनाला साहित्य पुरविणाऱ्या सज्जनांचे आहेत. माहितीची माधुकरी मी किती ठिकाणी मागावी ? केसरी, शुभसूचक, समर्थ, श्रीशाहु, ऐक्य यांच्या फाइली मी चाळल्या; अण्णासाहेब चिरमुले ( श्री. सोनोपंत खाडीलकर कृत ), रा. ब. काळे (श्री. च. ह. पळणिटकर कृत), गत–गोष्टी (श्री. न. चिं. केळकरकृत) अशा चरित्रांची मदत घेतली; माझाच जागृत

सातारा या इतिहासाची उजळणी केली; ती. मातोश्री सीताबाई सोमण, श्री. नाना अष्टेकर, श्री. तात्यासाहेब साठे, डॉ. आठल्ये, भाऊसाहेबाचे वर्गबंधू अबदुलकादर शेख, श्रौताचार्य बापट, श्री. दुर्गाताई पटवर्धन, भाऊसाहेबांचे तिन्ही जिरंजीव, श्री. नारायणराव जोशी ( वडूथकर ) प्रभृतींच्या मुलाखती घेतल्या; अनेकांच्या आठवणी उभारल्या, लोकसेवासंघाचे चिटणीस श्री. बुवासाहेब गोसावी, सातारा-नगरपालिकेतील श्री. बंडोपंत तळवलकर, वेस्टर्न इंडियाचे डायरेक्टर बाबूराव वैद्य, आर्यांग्ल वैद्यक विद्यालयाचे डॉ. भाऊराव आगाशे, कन्याशाळेचे श्री. पु. वि. गोळे यांच्याकडून त्या त्या संस्थातील सोमणासंबंधी माहिती घेतली; सोमणस्मारक-समितीचे चिटणीस श्री. दत्तोपंत परांजपे याना माहिती मिळविण्याबाबत हरएकप्रकारे त्रास दिला; आणि माझे एक शिक्षक व भाऊसाहेब सोमणांचे एक सांगाती श्री. शंभुराव आठल्ये यांच्याकडून आठवणीच आठवणी मला लिहिलेल्या मिळाल्या. ( हर हर ! आज गु. आठल्ये हे चरित्रही प्हावयास इहलोकी नाहीत ! ) अशा माधुकरीने जमविलेल्या माहितीची गुंफण माझे तरुण व होतकरू मित्र श्री. व्यंकटेश कृष्ण ऊर्फ मल्हारराव कुलकर्णी यांच्या लेखणीचे सहाय्याने करून, हे चरित्र तयार झाले आहे. सदर चरित्राला दे. भ. भाऊसाहेब फिरोदिया यानी प्रस्तावना लिहून त्याचे मूल्यमापनही केले आहे. तेव्हा माझे काय आहे ? मी निमित्तमात्र आहे. म्हणून भाऊसाहेब सोमणांची ही वाङमयी पूजा वर निर्दिष्ट केलेल्या आणि ग्रंथातही ठिकठिकाणी उल्लेखलेल्या उदारधींच्या सहाय्याचे फळ असल्याकारणाने, पूजेची समाप्ति करताना मी त्या सर्वांना कृतज्ञतेचा नमस्कार करतो, व विनवितो की,- ग्रंथात काही चूकवाक आढळल्यास ती मला स्पष्टपणे कळवावी म्हणजे मी दुसऱ्या आवृत्तीत जरूर कृतज्ञतापूर्तक दुरुस्त करीन कारण-

म्या पूर्वार्जिन साधिलें न, अथवा शास्त्रार्थ ना पाहिले ।<br>
श्रीसारस्वत-काव्य-नाटक-रसालंकार नाभ्यासिले ॥<br>
छंदोग्रंथ निरीक्षले न; यमकें चित्रें न वा घोकिलीं ।<br>
आल्या ऊर्मि तशी पदें जुळविली-माफी करा मंडळी ॥

सातारा ता. ३१ जाने. १९५६<br>
माघ व॥ ५ शके १८७७<br>
(टिळक पंचांग)

—**पु. पां. गोखले.**

# पुस्तक-परिचय

समितीचे निवेदन (पृ. ३,४).
कृतज्ञतेचा नमस्कार (पृ. ५,६).
पुस्तक-परिचय (पृ. ७ ते १०).
दे. भ. फिरोदिया यांची प्रस्तावना (पृ. ११ ते १४).

## लोकप्रिय सोमण

**१ इतिहासाचा दुवा** (पृ. १,२)

देशविभागाचे व कालखंडोचित इतिहास १; इतिहास म्हणजे काय २.

**२ सोमण साताऱ्यात आले** (पृ. ३ ते ६)

सोमण कुळ ३; बक्षिसपत्र ४; सोमणांची वंशावळ ६.

**३ पाळण्यातील पाय** (पृ. ७ ते १०)

भाऊसाहेबासंबंधी भविष्य वा तोंडचा हिशोब ७; पहाटेपूर्वीचा काळोख ८; सातारा जिल्हयाच्या राजकीय आयुष्याचा प्रारंभ ९; आप्पा मास्तर १०.

**४ शाळेचे व जीवनाचे वळण** (पृ. ११ ते २२)

राजवाडयाचे न्यायमंदिर व भाऊसाहेब ११; काँग्रेस पूर्व जागृति ११; राष्ट्रीय सभेचा दृष्टिकोन १२; राष्ट्रीय सभेचा प्रचार १२; जिल्हा सभेचा प्रयोग, १३; अन्य चळवळी १३; द्वाराचा खटला १४; विचारातून आचारात १४; स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीचा नारळ फोडला १५; भाऊसाहेबांच्या शाळा व शिक्षक १५; रामभाऊ शिक्षक झाले १७; स्थित्यंतराचे वर्ष १८; लोकसेवेची उमेदवारी १९; बंडाचे पांचट खूळ २१.

**५ अधिकारी झाला परमार्थासी** (पृ. २३ ते ३६)

इसलामपूरची उमेदवारी २३; दादासाहेबांच्या हाताखाली २४; गुरु-शिष्यांची गुणवती भेट २५; जिल्हासभांचा उठाव २६; 'प्रकाश' पत्राचा सरंजाम २७; प्रकाशपूर्वीची साताराची पत्रसृष्टी २८; सरकारी वक्र दृष्टीची झळ २९; श्रोत्रींचा पाय बाहेरच थबकला; सोमणांची झडती ३३; नाटक-कंपनीचा पडदाच जप्त केला ३४; लोक प्रतिनिधित्व खेडयाकडे ३६; वकिलीच्या प्राप्तीचा विनियोग ३६.

**६ चढती-वाढती पदवी** (पृ. ३७ ते ४५)

साताऱ्याची खबरदारी ३७; होमरुल-लोकमान्य-षष्ठ्यब्दि-निधि ३८; वाघिणिच्या दुधाचा गुण लागलेले लोक ४०; जर का त्या शक्ति-युक्ति एक होतील ४२; याचसाठी केला होता अट्टाहास ४३; जीवनालाच निराळे वळण लागले ४४.

**७ लोकसंग्रही सेवेची विविधता** ( पृ. ४६ ते ५६ )

दारूबंदीची चळवळ ४६; तीन वर्षांचा अनुभव ४८; कौन्सिलाची पहिली निवडणूक व सोमणांचे काम ४९; प्रांतिक परिषद ५१; जिल्हासभेला वळण ५२; कोयनाधरण ५३; स्थायी जीवनातील प्रवाह ५४; शेतकरी बोलता झाला ५५; सेवादल ५५; सायमन सप्तक बहिष्कार ५६.

**८ अग्निदिव्य** (पृ. ५७ ते ७०)

शान्तिसंग्रामार्थ सातारा जिल्ह्याचा हात हालू लागला ५७; सरकारचा हिशोब शून्यप्राय ठरला ५८; साधी प्रकरणेसुद्धा हातझोंबीवर ६२; साष्टांग नमस्काराचे अनुष्ठान ६२; टिळकाइट म्हणून चळवळ करा ६३; लोक उठावाची सूत्रे राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या नावावर ६४; विवेकशुद्ध राष्ट्रसेवेचा अंगिकार ६६; काँग्रेसची पहिली निवडणूक ६७; कौन्सिलातील कामे ६८; राजेंद्रांचा दौरा ६९; सोमणांचा साक्षात्कार ७०.

**९ आयुष्यातील सुवर्णक्षण** (पृ. ७१ ते ७९)

लोकसेवासंघाची आणि महाराष्ट्रातील एकीची आवश्यकता ७१; सोमणांचा साठीसमारंभ ७३.

**१० विधान-परिषदेत** (पृ. ८० ते ८३)

सोमणांचा मतदार संघ ८०; त्यांचा तिहेरी आनंद ८१; अधिकार स्वीकाराचा नानू ८२; मतदारांची वकिली ८३.

**११ लोकसेवासंघ** (पृ. ८४ ते ९१)

ग्रामसेवासंघ ८४; लोकसेवा संघाचा जन्म ८५; चिमणगावची सेवा ८६; राज्य इंग्रजाचे, कारभार काँग्रेसचा, अंमल गावगुंडांचा ८७; दुःखग्रस्ताना सहाय्य ८८.

**१२ नगरदेवतेच्या द्वारातून** (पृ. ९२ ते ९७)

भाऊसाहेबांची नवी रीत ९२; नगर-सेवेचे दाखले ९३; राष्ट्रीय झेंडा व वन्देमातरम् ९६.

**१३ व्यायाम परिषदेचा दरबार** (पृ.९८ ते १०२)

मैदानी खेळांची आवड ९८; जिल्हा-सामने ९९; अ. म. शा. शि. परिषदेची वैशिष्ठ्ये १००.

**१४ वागावे कर्मि हे रुचे** (पृ. १०३ ते १०७)

कार्यप्रणालींचा रोख १०३; साठीलाच सोने लागले नाही १०४; वृद्धत्वाची छाया १०५; वागावे कर्मि हे रुचे १०६.

**१५ विवेके करावे कार्य-साधन** (पृ. १०८ ते ११४)

छोडो हिंद १०८; सुटका व अटक १०९; सोव्हिएट पुस्तकांचे वाचन ११०; बन्दिजीवन १११; भाऊसाहेबाना काय समजले ११२.

**१६ नवे राज्य, नवा साज** (पृ. ११५ ते १२९)

अप्रतिनिधिक घडी बदलली ११५; देशभक्त मोकळे झाले ११६; सेवादलाचा अपूर्व मेळावा ११७; सोमणांचा स्वातंत्र्य–संदेश ११७; विधान–परिषदेचे अध्यक्ष सोमण ११८; भारताचा राष्ट्रपिता गेला ११९; जनतेतील प्रक्षोभ १२०; सरकारी कृपा व डेक्कन–रिलीफ फंड १२१; फुटीर वृत्ति अपायकारक १२२; स्थानिक स्वराज्याचे काम काय १२२; स्वराज्याची सप्तपदी १२३; न्यू इंग्लिश स्कूलचा महोत्सव १२४; प्रजासत्ताक भारत १२४; अ–विस्मरणीय आघात १२५; अध्यक्ष म्हणून कामगिरी १२६; स्वतंत्र भारतातील पहिली निवडणूक १२८.

**१७ दीप तेवतो, जाळुनि घेतो** ( पृ. १३० ते १३९ )

मोडक मास्तरांचा सत्कार १३०; जलमंदिर–चोरी १३१; वेस्टर्न इंडियाची पुणे-इमारत १३५; सातारा–स्वदेशी १३७; वेस्टर्नमध्ये सोमण १३८; लँडमॉर्गेज बँकेत सोमण १३९; दत्तोपंत परांजप्यांचा साठी समारंभ १३९.

**१८ सहज खुंटले बोलणे** ( पृ. १४० ते १४८ )

भाऊसाहेबांचे अखेरचे निरोप १४० ते १४३; देशभरीचे दुःखोद्गार १४४ ते १४८.

**१९ विद्यार्थी सोमण** ( पृ. १४९ ते १५३ )

जो गुण बाळा, तो जन्मकाळा १४९; सोमणांच्या अभ्यासाची रीत १५०; जीवनाचा बोध १५१; शाळेतील गमती १५२; काम तेव्हा काम, खेळ तेव्हा खेळ १५३.

**२० शिक्षक सोमण** ( पृ. १५४ ते १५७ )

विद्या असते शाळेत १५४; सोमण काय शिकवीत १५५; विद्यार्थ्यांचा लघळपणा १५६; शिक्षकीचा पेढा कंदी पण फिका १५७.

**२१ वकील सोमण** ( पृ. १५८ ते १६१ )

दादासाहेबांची विद्या १५८; भाऊसाहेबांची वैशिष्ठ्ये १५९; अनुभविकाच्या डोळ्यातून सोमण १६०; वैगुण्य न वाटता मालबोट १६१.

**२२ संपादक सोमण** ( पृ. १६२ ते १६७ )

चुतुःसूत्रीचा अग्नि फुलविला १६२; 'प्रकाश' च्या संपादनाचे वळण १६३; ब्राह्मणेतर चळवळीसंबंधी धोरण १६४; 'प्रकाश' च्या लेखनातून मराठीचे लघु–लेखन १६५; दुसऱ्यांच्या लेखांची संपादकीय जबाबदारी १६६; जिल्हापत्र कसे असावे १६७.

**२३ जिल्हा-सभेचे जीवन सूत्रधार, सोमण** ( पृ. १६८ ते १७४ )

जिल्हासभेचा जन्म व स्वरूप १६८; गणेश व्यंकटेश जोशांचा आशीर्वाद १६८; जिल्हा कॉंग्रेस कमिटीमार्फत जिल्हा–सभा १६९; अधिवेशने खेडेगावात १७०;

अधिकाऱ्यांच्या निवडीतील दृष्टी १७१; खर्चाची व्यवस्था १७१; भाषणांच्या तऱ्हा १७१; राजकीय व इतर ठरावामागील बैठक १७२; जनता पराक्रमी असावी लागते १७३; भाऊसाहेबांचे सूत्रचालन १७४.

**२४ पुढारी सोमण** ( पृ. १७५ ते १८२ )

दादासाहेबांचे मानसपुत्र १७५; सोमणाअगोदरचे नेते १७६; पुढील पिढीचे कौतुक १७७; भिन्नपक्षीयाबद्दलही आदर १७७; राष्ट्रीय कार्यकर्त्यांबद्दल आत्मीयता १७८; सोमणांचे व्रत १७८; पुढाऱ्यांचा कस १७९; समन्वय सोज्वळ न्यायाचा १८०; सोमणांच्या पुढारीपणाचे पैलू १८०; अनेक संस्थाना पुढारीपणाचा उपयोग करून दिला १८१; " दावियेला मार्ग जाती थोर जये जन । " १८२.

**२५ गृहस्थ सोमण** ( पृ. १८३ ते १९३ )

सोमणांची बिऱ्हाडे १८३; सूनबाईना गृहलक्ष्मीचा मान १८४; वडिलार्जित मिळकत १८४; घर खरीदले व बांधले १८४; दान नाही तर काही तरी चुकले १८५; धंद्यातील हिशोब १८६; दुःखितांचा कळवळा १८७; सोमणांची आतिथ्यशीलता १८८; पैशामागे आपण, नव्हे, आपल्या मागे पैसा यावा १८९; तुकारामाची संसारातील कर्तव्यजागृति १९०; हाताखालची माणसे घरच्यासारखी १९१; ठळक सांगाती १९२; परिचिता धन्योद्गार १९३.

**२६ सोमण–दर्शन** ( पृ. १९४ ते २०२ )

भाऊसाहेबांच्या स्मरणाचे तीन गुण १९४; दैनंदिन जीवनातील थाट १९५; भाऊसाहेबांचा हिशोबी दण्डक १९६; अजातशत्रु म्हणजे काय १९७; सातारा जिल्ह्यात नैतिक अधिराज्य १९८; संपादकाचे सोमण–दर्शन १९९; सोमणांचे धोरण २००; राष्ट्रीय सभेचा कार्यक्रम हाच नंदादीप २०१; सेवेचा कर्मयोग २०२.

**शुद्धिपत्रक** (पृ. २०३ ते २०४ )

**लोकप्रिय भाऊसाहेब सोमणः**– कालक्रमणिका.

**परिशिष्ट** १ (अ) महाराष्ट्र प्रांतिक परिषद, सातारा १९२५, स्वागताध्यक्ष रा. ग. सोमण यांचे भाषण; (आ) ऐक्याची प्रथा; (इ) लोकसेवासंघासाठी; (ई) रिपोर्टबद्दल इषारा; (उ) वेस्ट लॉज ( मलबार हिल ) मुंबई ( १९५२ जानेवारी. )

**परिशिष्ट** २– सोमणांच्या आयुष्यभरीचा सातारा जिल्हा.

**परिशिष्ट** ३– जलमंदिर चोरीप्रकरण.

**परिशिष्ट** ४– पाटणा हाय–कोर्टाचे माजी न्या. भाऊसाहेब ढवळे आय्. सी. एस्. पुणे, यानी मुंबई सरकारला सादर केलेल्या जलमंदिर प्रकरणातील उतारे.

**चरित्राची सूचि.**

दे. कुंदनमल सोभाचंद फिरोदिया बी. ए., एल्‌एल्. बी. (ॲडव्होकेट,)

माजी स्पीकर, मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्ली, यांची

# प्रस्तावना

(१) कै. भाऊसाहेब सोमण यांच्या मृत्युनंतर त्यांच्या मित्रमंडळींनीं व चाहत्या लोकांनीं त्यांचें योग्य तें स्मारक करावें या हेतुनें एक स्मारक समिति स्थापन केली. त्या समितीचे योजनेप्रमाणें स्मारकांपैकीं एक भाग म्हणून त्यांचें चरित्र त्यांच्या प्रथम पुण्यतिथीला ता. ११–२–५६ रोजीं प्रसिद्ध करावयाचें आहे. या चरित्र ग्रंथास मी प्रस्तावना लिहावी असें मला समितीकडून कळविणेंत आलें तेव्हां थोडा घोटाळ्यांत पडलों व भाऊसाहेबांच्या चरित्राची प्रस्तावना कोणातरी ज्येष्ठ व श्रेष्ठ अशा गृहस्थाकडून लिहून घ्यावी व माझेवर हा भार घालूं नये असें मी कळविलें. परंतु समितीकडून हें काम मीच करावें असें निश्चयपूर्वक कळविणेंत आल्यावरून कर्तव्य म्हणून व भाऊसाहेबांचे चरणी श्रद्धांजलि वाहणेची एक संधी म्हणून हें कार्य मी नम्रबुद्धीनें करीत आहे.

भाऊसाहेब सोमणांचा व माझा प्रथम परिचय सन १९१४ सालीं सातारा येथे भरलेल्या मुंबई प्रांतिक ( राजकीय ) परिषदेला मी, नगर येथील हरिभाऊ पटवर्धन, रा. ब. चितळे व इतर मंडळी गेलो होतों तेव्हां झाला, त्यानंतर सार्वजनिक कार्याच्या निमित्तानें गाठीभेटी होत असत परंतु त्यांना अगदीं जवळून पाहण्याची संधी सन १९४७ ते १९५२ पर्यंत आम्ही उभयतां मुंबई राज्याच्या कायदे मंडळाच्या दोन शाखावर अध्यक्ष म्हणून काम करीत होतों तेव्हां मिळाली. या मुदतींत भाऊसाहेबांचे स्वभावांतील चांगल्या गुणांची माझे मनावर चांगली छाप पडली व माझे जीवनांतही मला त्यापासून बोध घेतां आला.

(२) भाऊसाहेबांचा जीवनकाल सन १८७६ ते १९५५ पर्यंतचा. हा काल स्वातंत्र्यासाठीं झालेल्या प्रयत्नांच्या उषःकालापासून तों स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचा काल होय. या कालांत स्वातंत्र्य संग्राम करणारी काँग्रेस संस्था. भाऊसाहेब काँग्रेसचे निष्ठावंत अनुयायी व कार्यकर्ते. भाऊसाहेबांची कार्यभूमि सातारा जिल्हा. हा जिल्हा मराठेशाहीच्या राजधानीचा जिल्हा. भाऊसाहेबांनीं देशाच्या स्वातंत्र्य लढ्यांत काँग्रेसच्या निरनिराळ्या अवस्थांतून म्हणजे नेमस्त, जहाल, गांधीवादी या सर्वांत धडाडीनें भाग घेतला असल्यामुळें भाऊसाहेबांचें चरित्र म्हणजे सातारा जिल्ह्याचा गेल्या पाऊण शतकाचा राजकीय व तदनुशंगिक अनेक आंदोलनांचाच इतिहास होय.

(३) भाऊसाहेबांचा जन्म गरीब कुलांत झालेला. वडिलांचे गरीब परिस्थितीमुळें त्यांचें शिक्षण दुय्यम शालांत परिक्षेपलीकडे होऊ शकलें नाहीं. ते १८९२ सालीं त्यावेळची यू. एस्. एफ्. ची परीक्षा पास झाले. परंतु कुटुंब परिस्थितीमुळें त्यांना पुढें कांहीं वर्षे शिक्षक व कारकून म्हणून काम करावें लागलें. तथापि त्यांना त्या परिस्थितींत समाधान नव्हतें म्हणून शेवटीं त्यावेळच्या सर्व बाजूंनी आकर्षक वाटणाऱ्या वकीली पेशाकडे ते ओढले गेले. खाजगी रीतीनें अभ्यास करून ते सन १९०१ सालीं डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा देऊन वकील झाले. वकील झाल्यानंतर त्यांना सुदैवानें महाराष्ट्रांतील ख्यातनाम व प्रसिद्ध वकील दादासाहेब करंदीकर यांचे हाताखालीं दुय्यम म्हणून काम करण्याची संधी मिळाली. दादासाहेब करंदीकर वकीलीचे धंद्यांतील निष्णात वकील, न्यायाधीश व पक्षकार यांच्याशीं प्रेमळ संबंध ठेवणेची त्यांची हातोटी असलेमुळे साहजिकच हे सर्व गुण भाऊसाहेब सोमणांनीं आत्मसात करून घेतले व तेही उत्तम प्रथम दर्जाचे वकील म्हणून प्रसिद्ध झाले.

(४) वकीली करून नुसता आपला खाजगी प्रपंच सुधारावा ही भाऊसाहेबांची वृत्ती नसल्यामुळें त्यांनीं लोकहितासाठीं होणाऱ्या सर्व चळवळीमध्यें भाग घेतला. त्यासाठीं त्यांनीं "प्रकाश" नांवाचें वर्तमानपत्र काढून स्वतः पुष्कळ वर्षे चालविलें. भाऊसाहेबांनीं लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखालीं झालेल्या सर्व चळवळीमध्यें धडाडीनें भाग घेतला. लोकमान्यांचे ते निस्सीम भक्त होते. लोकमान्यांचे नंतर महात्मा गांधींच्या राजकारणांतील बऱ्याच गोष्टी म्हणजे राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी बहिष्कार, दारुबंदी वगैरे चळवळींत पुढाकार घेऊन भाग घेतला तथापि महात्मा गांधींच्या राजकारणाशी ते पूर्णपणें रंगून जाऊ शकले नाहींत त्यामुळें वकीली न सोडणें, स्वतःची केस लढविणें व हजरी देणें वगैरे गोष्टी परिस्थितीमुळें व स्वभाव भेदामुळें त्यांना कराव्या लागल्या. हें कांहीं असले तरी गांधींची चळवळ देशाला निःसंशय पुढें नेत आहे अशी खात्री झाल्यामुळें त्यांनीं त्या चळवळींत पैशानें, स्वतःच्या वकीली ज्ञानानें व पुढें १९४० व १९४२ सालीं प्रत्यक्ष तुरुंगवास पत्करून देहदंड सोसून भाग घेतला.

(५) भाऊसाहेब हे पहिल्या प्रतीचे वकील म्हणून जिल्ह्यांतील सर्व दर्जाचे लोकांशीं यांचे संबंध आले. प्रथमपासून बहुजन सुखास आपल्या सर्व चळवळी चालल्या पाहिजेत ही भाऊसाहेबांच्या स्वभावांतील बैठक पक्की असलेमुळें सातारा जिल्हा जरी कांहीं काल सत्यशोधक समाजाचा बालेकिल्ला समजला जात असे तरी त्यांनीं आपल्या गोड स्वभावानें, निर्मल चारित्र्यानें व लोकहित दृष्टी सदैव तेवत ठेवल्यानें बहुजन समाजामध्यें त्यांचे विषयींचा आदर अखंड कायम राहिला. याचें एक प्रतीक म्हणून सन १९३४ सालीं मुंबई कौन्सिलच्या निवडणुकींत

धनजीशा कूपर जे त्यावेळीं सरकारचे मंत्री होते व ज्यांचा त्यांच्या धंद्यामुळें व इतर कारणामुळें बहुजन–समाजावर मोठें वजन आहे असें मानलें जात होते त्यांचे पक्षीयाविरुद्ध भाऊसाहेब सोमणांना काँग्रेसतर्फे उभे करणेंत आले व ते प्रचंड बहु–मतानें निवडूनही आले हें होय. बहुजन–समाजांतील अनेक तरुण कार्यकर्ते भाऊ–साहेबांस मोठ्या आदरानें पाहत व त्यांचें मार्गदर्शन घेत असत व भाऊसाहेबांसही त्यांत मोठा आनंद व अभिमान वाटत असे.

(६) सातारा जिल्ह्यांत व शहरांत लोकहिताची अशी एकही चळवळ साप–डणार नाहीं ज्यांत भाऊसाहेबांचा प्रामुख्यानें भाग नव्हता. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनीचे आरंभापासून भाऊसाहेब हे प्रमुख कार्यकर्ते व आधारस्तंभ होते. भाऊसाहेबांनीं अनेक सत्प्रवृत्त लोक आपणांपाशीं जवळ केले होते. पांडुआण्णा शिराळकरःसारख्या श्रीमंत गृहस्थांनीं आपले एकसष्टी समारंभाचे वेळीं रुपये तीस हजार लोकसेवेचे कार्यासाठीं दिले. यांतही भाऊसाहेबांचीच प्रेरणा मुख्यतः कारणी–भूत होती. भाऊसाहेबांचा एकसष्टावा वाढदिवस साजरा झाला, त्यावेळीं लोकांनीं त्यांचा मोठा सत्कार करून त्यांस मानपत्र दिलें व रुपये पांच हजारांची थैली अर्पण केली. या पांच हजारांत भाऊसाहेबांनीं स्वतःचे रुपये पांच हजार घालून ती सर्व रक्कम व पांडुआण्णा शिराळकर यांनीं दिलेले तीस हजार रुपये यांचा एक ट्रस्ट करून त्यांतून लोक–जागृतीचें व लोक–सेवेचें कार्य होत रहावें असें ठरविलें. त्यांच्या या एकसष्टाव्या वाढदिवस समारंभाचे अध्यक्ष नरसोपंत केळकर होते. त्यांनीं भाऊसाहेबांस त्यावेळीं " लोकप्रिय " किताब दिला व तो सर्वतोपरी यथार्थ असाच होता.

(७) भाऊसाहेब सातारा म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष तीन वर्षें होते. सन १९३७ ते १९३९ व १९४६ ते १९५२ पर्यंत मुंबई कौन्सिलचे सभासद, उपाध्यक्ष व अध्यक्ष होते. या सर्व कार्यामध्यें त्यांची काम करण्याची विशिष्ट हातोटी होती. त्यामुळें त्यांच्या सहकारी मंडळींचा त्यांनीं आदर संपादन केलेला होता. भाऊसाहेबांचें निर्मल चारित्र्य, गोड मनमिळावू स्वभाव, दुसऱ्याचें मन सहसा न दुखवितां कार्य करणें, खेळीमेळीनें वागणें, तसेंच दंभ व अहंकार यांचा अभाव, निस्सीम देशभक्ती, स्वार्थत्याग या सर्व गुण समुच्चयांमुळें व त्यांचे समतोल बुद्धीचे वागणुकीमुळें सन १९४७ सालीं त्यांना कौन्सिलचें अध्यक्ष निवडणेंत आले.

(८) भाऊसाहेबांचे वृद्धापकाळीं मुंबई कौन्सिलची जबाबदारी त्यांचेवर टाकण्यांत आली. ती त्यांनीं अतिशय उत्कृष्टपणें पार पाडली. ज्या गृहाचे ते अध्यक्ष होते, त्यांतील सर्व सभासदांशी त्यांचे संबंध आपुलकीचे व प्रेमाचे होते व काँग्रेस पक्षाचे एक म्हणून जरी त्यांची निवडणूक झाली असली तरी

त्यांनीं आपल्या निवाड्यानीं निःपक्षपातीपणाची छाप सर्व पक्षीय लोकांवर पाडली. कायदेमंडळांतील नोकर वर्गामध्यें त्यांचेबद्दल नितांत आदर असे. ते सर्वांना मोठ्या प्रेमळपणानें व समतेनें वागवीत. त्यांच्या या पांच वर्षांच्या कारकीर्दींत खटका उडण्याचा प्रसंग कधींच आला नाहीं. दुसऱ्या गृहाचे अध्यक्ष म्हणून माझेशीं तर त्यांचे संबंध अतिशय प्रेमाचे व विश्वासाचे असे होते, त्यामुळें कायदे–मंडळाचे खात्यांतील व्यवस्थेसंबंधानें आम्ही सर्व कामें खेळीमेळीनें, एकमतानें करीत असू. सरकारचे मंत्री व कायदे–मंडळांतील कॉंग्रेस पक्ष हे सर्व त्यांस मोठ्या आदरानें वागवीत व भाऊसाहेबही तितक्याच खुल्या दिलानें सर्वांशीं वागत.

भाऊसाहेबांच्या स्वभावांत लहानपणाचा आट्यापाट्या खेळांतील कोंडी फोडणेचा गुण होता. हाच कोंडी फोडणेचा गुण त्यांचे उत्तर आयुष्यांत त्यांना फार उपयोगी पडला. सार्वजनिक कार्यांत जेव्हां कोंडी निर्माण होत असे त्यावेळीं भाऊसाहेबांचा अचुक सल्ला फार उपयोगी पडत असे.

(९) भाऊसाहेब सोमण, " लोकप्रिय सोमण " यांचेसारखा धीरोदात्त पुरुष चरित्र नायक, बाबूराव गोखल्यासारख्या तळमळीचे व अंतःकरण ओतून चरित्रांतून सर्व लहान मोठ्या गोष्टी रेखीवपणें मांडून त्यांचे धागेदोरे प्रांतिय व राष्ट्रीय चळवळीशीं कसे जोडता येतात हे दर्शविणारे ओजस्वी चरित्र–लेखक, यांची जोड मिळाल्यामुळें स्मारक समितीनें तयार केलेला हा स्मारक–ग्रंथ अतिशय आकर्षक व स्फूर्तिदायक झालेला आहे. अत्यंत निकृष्टस्थितींतून स्वतःचे कर्तबगारीनें व शुद्ध निर्मल चारित्र्यानें प्रांतांतील मोठ्या बहुमानाचे पदवीपर्यंत पोहोंचलेल्या भाऊसाहेबांचें हें जीवन–चित्र सर्वांस स्फूर्तिदायक होवों व देशाचे हल्लीचे परिस्थितीप्रमाणें देशसेवा व मानवसेवा करणेस उपयुक्त होवों अशी इच्छा प्रकट करून ही प्रस्तावना भाऊसाहेबांचे चरणीं श्रद्धाबुद्धीनें सादर करीत आहे.

अहमदनगर
ता. ४–२–१९५६


**कुं. सो. फिरोदिया**

भारताचे स्वातंत्र्य व त्याचा सर्वांगीण विकास या
करिता अहर्निश निःस्वार्थपणे झटणाऱ्या
ज्ञात, अज्ञात सेवकास–
सादर समर्पण



: लेखक :

पु. पां. गोखले



**कै. रामचंद्र गणेश तथा भाऊसाहेब सोमण**

जन्म : २४ नोव्हेम्बर १८७६
मार्गशीर्ष शु॥ अष्टमी शके १७९८

मृत्यु : ११ फेब्रुआरी १९५५
माघ व॥ पंचमी शके १८७६

# लोकप्रिय सोमण

## १ इतिहासाचा दुवा

देशाचे भागाचे व कालखंडोचित इतिहास

विसाव्या शतकाचा पहिला पूर्वार्ध हा एक भाग्यशाली कालखंड आहे. जगाच्या आणि विशेषतः भारताच्या इतिहासाचा अभ्यास करताना विसाव्या शतकाची पहिली पन्नास वर्षे अभ्यासकाला अविस्मरणीय होतील. जग झाले अगर देश झाला, तरी तो आपल्या प्रादेशिक अवयवांच्या हालचालींच्या दृढभाजकानेच आपला इतिहास सांगत असतो. पहिलवानी पेशात एकंदर शरीराची रग आणि त्याच्या अवयवाचा रागरंग पहातात, त्यावेळी प्रत्येक अवयवाची बळकटी आणि विकास यांच्याकडे बारीक नजर देतादेताच सर्व अवयवांच्या सामर्थ्यसमन्वयाकडेही लक्ष द्यावे लागते. देशाच्या इतिहासातील तेजाचा दृढभाजकही त्याच्या प्रादेशिक अवयवांच्या विकास–सामर्थ्य–समन्वयावरच निश्चित ठरतो. केवळ याच दृष्टीने देशाच्या विभागाचे कालखंडोचित इतिहास महत्त्व पावतात. भारताच्या गेल्या पन्नास–पाऊणशे वर्षातील इतिहासात महाराष्ट्राला व महाराष्ट्राच्या त्या काल–खंडातील इतिहासात सातारा जिल्ह्याला वर दिलेल्या दृष्टीनेच पण स्वतंत्र असे महत्त्व आहे.

इतिहास म्हणजे काय?

इतिहास म्हटला की अमुक अमुक घटना घडल्या त्यांची जंत्री अगर यादी नव्हे. त्या घटनात (इति + ह + आस) महाप्राण असेल तरच त्या इतिहासात नमूद होतात. म्हणून कार्लाइलने "विभूतींच्या"– कर्तबगारांच्या चरित्र–समन्वयाला इतिहासाची प्रतिष्ठा दिली आहे. पण केवळ कर्तबगारांच्या चरित्रानी इतिहास रंगता, तर कोणताही कर्तबगार आपल्या परिस्थितिशरणतेने वा संयमसंयोजनाने उपेक्षित अगर अप्रसिद्ध राहता ना ! परिस्थितीच्या परिघात निपजून परिस्थितीवर मात करीत करीत परिस्थितीला जो वळण लावतो, त्याच्या चरित्राचा परामर्ष इतिहास घेतो. म्हणूनच ज्याच्या ज्याच्या काही कार्याचा वा कर्तृत्त्वाचा बरा-वाईट परिणाम सामुदायिक जीवनावर थोडाफार होतो आणि त्या कर्तृत्त्वाचा ठसा उमटलेला आढळतो, त्याच्या त्याच्या त्या कार्याचा वा कर्तृत्त्वाचा लेख इतिहासाच्या ललाटी येतो. सातारा जिल्ह्याच्या अशा भाग्य–भगवंतात श्री. रामचंद्र गणेश उर्फ भाऊसाहेब सोमण यांचे नाव विसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नाशीला प्रामुख्याने शिरोधार्य मानावे लागेल.

हे खरे असले तरी भाऊसाहेब सोमण हे जन्मतःच काही इतिहास– पुरुष नव्हते. एका साध्या शाळाशिक्षकाचे ते चिरंजीव. आणि या एका साध्या अवस्थेतून उमललेले भाऊसाहेब सोमण सहस्रदल चंद्रकमलाप्रमाणे सातारा जिल्ह्याची प्रतिष्ठासूत्रे आल्हादमय करणारे इतिहास पुरुष ठरले, याचा विचार मनात आला, म्हणजे त्यांच्या चरित्राच्या सिंहावलोकनाकडे विचारवंताची प्रवृत्ति साहजिकच वळते. त्या प्रवृत्तीला पहिला आढळ होतो तो असा की––

# २ सोमण साताऱ्यास आले

सोमण कुल

. सातारा जिल्ह्याशी सोमणांचा संबंध आला, तो भाऊसाहेब सोमणांचे आजोबा वडूथ येथे आल्यापासून. ते आले रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्यातून. त्याच्या पूर्वीच सोमणकुलाची ३६ घराणी कोकणभागातच पांग–लेली होती. त्यामुळे सोमणकुळीचे मूळ गाव कोकणात झाले तरी–अमुकच असे अंजून तरी सांगता येत नाही. तथापि छत्तीसही घराण्यांच्या कुलपरंपरात छत्तीसाचा आकडा तपशीलाबाबतही नाही. सोमण कुळाचे गोत्र शांडिल्य, वेद ऋग्वेद, शाखा शाकल, सूत्र आश्वलायन. शांडिल्य गोत्राचे शांडिल्य आसित–देवल हे तीन प्रवर. शांडिल्य हे काश्यप–गणातील असल्यामुळे शांडिल्य व काश्यप या दोन गोत्राव्यतिरिक्त इतर सर्व गोत्राशी सोमण कुलाची विवाहमैत्री. असे हे कोकणस्थ कुल. कोकणस्थ समाजातील जी काही घराणी पेशवाईपूर्वी देशावर आली व राजकारणापासून शक्य त्या सर्व क्षेत्रात प्रतिष्ठा ज्यानी मिळविली अशा उल्लेखनीय घराण्यांच्या कुलापैकी सोमण हे कुल असून पंताजी शिवदेव सोमणांची कार्यतत्परता छत्रपती घराण्याने आदरणीय मानल्याचे उल्लेख आहेत. तथापि छत्रपतींच्या काळच्या कर्तबगारीवरून अगर कोकणातील कोठच्या मूळ गावावरून "सोमण" हें उपनाव अगर आडनाव लोकप्रचारात आले असा अंदाज करण्यासही जागा नाही. ते उपनाव कोणत्या काळी चालू झाले याचाही शोध नाही. खारेपाटण ( जि. रत्नागिरी ) येथील शिलाहाराच्या शिला–लेखात "महाप्रधान सोमय्यदेव" असे व्यक्तिनाम आले आहे. ( इंडियन अँटिक्वरी, व्हॉल्युम ९, पृष्ठ ३३ पहा ) त्या सोमय्य या व्यक्तिनामावरून पुढे त्यांचे रक्त अंगात खेळवणाऱ्या वंशजाना "सोमण" म्हणू लागले असावेत असा काही संशोधकानी तर्क बसविला आहे. त्या तर्कात गर्क होऊन राहण्यासारखे मात्र काही नाही. नाशिकसारख्या ठिकाणच्या तीर्थोपाध्यायांच्या वह्यातून सोमण मंडळींचे लेख शके सोळाशेपासूनचे आढळतात. पण आडनावाची उपपत्ति लावण्यासारखा निश्चित आधार म्हणून त्या लेखांचा दूरान्वयानेही उपयोग होण्यासारखा नाही. जी मूळ गाव किंवा तीर्थोपाध्यायाजवळील लेख यांची स्थिती तीच–"कुलस्वामी–" चीही. निरनिराळी घराणी निरनिराळे कुलस्वामी मानतात. पण जोगेश्वरी ही कुलदेवता बहुसंख्य सोमण घराण्यात आहे. ही जोगेश्वरी रत्नागिरी जिल्ह्यातील की मोंगलाईतील बीड जिल्ह्याच्या आंबेगावची, हे निश्चित नाही. पण जोगेश्वरीच्या सारखेच क्षेत्र परशुराम येथील श्रीभार्गवराम हेही एक कुलदैवत काही सोमण घराण्यात असून त्यांच्याकडे परशुराम जयंतीचा उत्सव होतो. क्षेत्र त्र्यंबकेश्वर, उज्जनी, धावडशी या ठिकाणी जशी भार्गवराम मंदिरे आहेत, तशीच खुद्द कोकणात

क्षेत्र परशुराम व ( देवाचे ) गोठणे येथेही आहेत. भाऊसाहेब सोमणांचे आजोबा या ( देवाच्या ) गोठण्याची कुलपरंपरा घेऊनच सातारा जिल्ह्यात आले.

(देवाचे) गोठणे हा गाव रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर तालुक्यात राजापुरापासून सहा मैलावर खाडीचे काठी आहे. जैतापूर बंदरावर उतरून खाडीतून होडीने गोठणे येथे जाता येते.. सारे दोन मैलाचे अंतर. या गोठणे गावच्या सोमणघराण्यातील मंडळी कार्ले, वायंगणी, मालपे, नागोठाणे, तुराडे, थेऊर, सातारा, पाडळी, इचलकरंजी, घुगरी, नरसिंहपूर, अकोलखेड अशा भागांत पसरत पसरत पनवेल, मुंबई, कल्याण, पुणे, सोलापूर, खांडवा, इंदूर, बढवाय, बुलढाणा, यवतमाळ, अकोला, नागपूर, काशी येथपर्यंतही वास्तव्य करून राहिली आहेत. यांच्या कुलदेवता जोगेश्वरी, महालक्ष्मी, वाडेश्वर, भार्गवराम, गोवर्धनेश्वर, नवलादेवी, हसलादेवी, काळकाई, आदिष्टी, ब्रह्मदेव व वास्तुपुरुष. देवदिवाळीला या देवताना सोमण घराण्यात नैवेद्य होतो. अश्विनात देवीचे नवरात्र, त्यातही ललितापंचमीचे व्रत/आणि मंगलकार्यानंतर बोडण ही सोमणांच्या कुलाचारातील वैशिष्ठ्यें होत. या वैशिष्ठयानिशी भाऊसाहेबांचे आजोबा महादाजी भास्कर सोमण सन १८३५ साली वडूथ येथे येऊन स्थायिक झाले. राजापूर तालुक्यातील (सोलगाव) गोठणे व मालपे येथील शेतीवाडी सोडून साताऱ्याजवळ कृष्णाकाठी ते काय हिशेबी येऊन राहिले हे सांगणे कठीण आहे. कारण ते जे एकदा आले, ते त्यानी कोकणात जाण्याचे फिरून नाव काढले नाही की तिकडची विचारपूसही केली नाही. ते मोठे वैराग्यशील वैदिक म्हणून सर्वांच्या आदरास पात्र झाले होते; कारण भोजनोत्तर राममंदिरात बसून आपद्–ग्रस्ताना टाणीटुणी औषधे सांगून त्यांची सेवा करावी असा त्यांचा क्रम होता. तरी ज्योतिषाच्या व्यासंगावर त्यानी तेथे विष्णुभट भिकंभट पटवर्धन यांचेकडून चार सहा मण दाणे येतील एवढी जमीन आणि श्रीशकुंतेश्वराच्या सन्निध गणपतिमंदीराशेजारी नऊखणी एकपाखी घर संपादन केलेच होते. या संबंधांत सापडलेले मोडीतील बक्षिसपत्र आहे ते असे–

## बक्षिसपत्र

" वेदमूर्ति राजेश्री माहादेवभट बिन भास्करभट उपनाम सोमण गोत्र शांडिल्य वास्तव्य मौजे वडूथ संमतनिंब यास

बक्षिसपत्र बेशमी विष्णुभट बिन भिकंभट पटवर्धन वास्तव्य मौजे वडूथ संमतनिंब प्रांत वाई तालुके सातारा, जिल्हा मजकूर याणी शके १७६९ प्रभवनाम संवत्च्छरे कार्तिक शु॥ १ प्रतिपदा सोमवार ते दिवसी दिल्हे बक्षिसपत्र ऐसाजे. तुम्ही मौजे मजकुरी श्रीकृष्णातीरी स्नानसंध्या करून कुटुंबासुद्धा आहात. परंतु तुम्हास कुटुंबाचे योगक्षेमार्थ उत्पन्न काही नाही सबब काही उत्पन्न करून द्यावे असेविसी तुम्ही आहमास फार वेळा बोलत आला आणि तुम्ही गरीब ब्राह्मण

तुम्हास निर्वाहार्थ काही उत्पन्न नाही हे जाणोन तुम्हास आपले उत्पन्नापै।। काही उत्पन्न करून द्यावे असे मनांत आणोन मौजे मजकुरीपै।। आम्हास इनाम जमीन असोन सदरीस जमीन आमचे तीर्थरूप भिकंभट बिन गणेश पटवर्धन यांचे नावे सरकार हिशेबी खर्च पडत होते. वडील मयत जाहले सबब त्यांचे औरस पुत्र आह्मी सबब आमचे नावे इनाम जमीन समरीसेटलमेंट लागू होऊन खर्च पडत आहे. सदरहू इनामाची सर्वे मोजणी जाहली परंतु आध्याप तरमजमाबंदी जाहली नसोन नंबरही समजले नाहीत. सदरील जमिनीची मोजणी पेशजी महाराज सर–कारचे कारकीर्दीत मेहरबान आदमसाहेब बाहादूर याणी केली त्यापैकी नंबर ४३ घरवाहा. जमीन आहे पै।। दले काळे याचा माल उर्फ पाडळ मार्गाचे कदीन जमीन अजमासे बिघे ५ पाच याची मोजणी हली घरी करून पाहता साहा हाताचे काठीने ५।।३।१। साडेपाच बिघे सवातीन पांड सवाकाठी जमीन भरली यासी च्यतुःसीमा १ पूर्वेस आमचे इनामपै।। दले वाकुसिदी मिरासदार वडजू विठाजी पौ।। भाऊपणा २ पश्च्यमेस आमचे सदर ४३ नंबरपै।। पडक रान असोन बदीस पाच दगड दक्षण उत्तर रोऊन दिल्हे आहेत ३ दक्षणेस पाडळमार्ग असोन सर्वेकडील बांद दगड आहेत४ उत्तरेस आमचेपै।। माळ वागमाज्याचा. दरम्यान बांद दगड सर्वेकडील आहेत. येकूण च्यतुःसीमापूर्वक सदरहू जमीन ५।।३।१। साडेपाच बिघे सवातीन पांड सवाकाठी आकार लागणी रुपये ९ नऊ रुपये आकाराची जमीन सालमजकूर सरकारजुडी नजर चौथाईबदल व हाकदार सदरील करून नंतर तुमचे कुटुंबाचे योगक्षेमार्थ धर्मादाय बक्षीस दिल्ही असे तरी सदरहू जमिनीचा उपभोग तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने आनभवून सुखरूप राहावे हे बक्षीसपत्र आम्ही आपले स्वसंतोष लिहून दिल्हे सही तारीख २८ माहे आकटोंबर सन १८६७ इसवी दस्तुर मार्तंड त्रिबक कुलकर्णी मौजे मजकूर

सही **विष्णुभट बिन त्रिबकभट** दस्तुर खुद

१ विष्णु गोविंद मराठे इनामदार मौजे वडूथ ता।। म।। दस्तुर खुद १ रामभट बिन कृष्णंभट तेलंग ईनामदार मौजे मजकूर दस्तुर खुद ( ही सही बाळबोधात आहे–ग्रंथकार ) १ वामनाजी वासुदेव खरे इनामदार मौजे वडूथ ता।। म।। दस्तुर खुद।।

सही **नारायण विष्णु पटवर्धन** दस्तुर खुद

१ मारुती बिन शिवराव वैद्य इनामदार मौजे वडूथ ता।। मजकूर दस्तुर खुद ”

“ प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ” करून घेताना, “ प्रपंची पाहिजे ते सुवर्ण ” आणि “ परमार्थी. पंचीकरण ” ही दोनही आपल्या कमाईची हवीत, अशा स्वाभिमानाची व आत्मविश्वासाची जाग येऊनच कदाचित् त्यानी कोकण सोडले असेल व वडूथ येथील शंकुतेश्वराची सेवा केली असेल.

# सोमणांची वंशावळ

- गणेश (दादं)
  - महादेव
    - गणेश
      - भास्कर
        - महादाजी (१८०५ते१८९२)
          - गणेश (१८३९ते१९०८)
            - **रामचंद्र** (१८७६ ते १९५५)
              - भास्कर (१९०४ते१९३७)
                - माधव (१९२६ते५३)
                  - अशोक १९४९
                - विनायक १९३४
                - सुधाकर १९३६
              - विठ्ठल १९०६
                - सुरेश १९३७
                - संजीवन १९४८
              - गंगाधर १९०९
                - विष्णु (१९४८ते४९)
              - शंकर १९११
                - विकास १९४६
              - मधुकर (१९२१ते१९२८)
        - रामचंद्र
        - लक्ष्मण
      - महादेव
      - दत्तात्रय
      - अनंत
    - गोविंद
      - धोंडो
  - भास्कर
    - कृष्णाजी
      - हरी

# ३ पाळण्यातील पाय

भाऊसाहेबासंबंधी भविष्य वा तोंडचा हिशेब

~~सोमणांची उपलब्ध वंशवेल शेजारचे पानावर दिली आहे.~~

महादाजीपंत सोमणानी वडूथ येथे वास्तव्य केल्यावर त्यांचे पोटी सन १८३९ साली एक पुत्ररत्न झाले. ते गणेशपपंत. सदर गणेश महादेव हेच भाऊसाहेब सोमणांचे पिताजी. गणेशपंत यांचा ओढा वैद्यकीकडे. पण वडिलांच्या आग्रहावरून ते फर्स्ट इयर ट्रेण्ड शिक्षक झाले आणि शाळाखात्यात त्यानी नोकरीही केली. आदर्श शिक्षक म्हणून गणेशपंतांचे नाव सातारा जिल्ह्यातील कुमठे चिमणगाव (ता. कोरेगाव), पाचवड (ता. वाई), वडूथ (ता. सातारा) वगैरे ठिकाणी अजूनही कृतज्ञतेने निवत असते.

गणेशपंत सोमणाना भागूबाई व गंगूबाई अशा दोन कन्या आणि रामचंद्र हा पुत्र अशी तीन अपत्ये झाली. वडूथचे खरे व मोरगिरीचे साने यांचेकडे दिलेल्या कन्या कुंकू घेऊन देवाघरी गेल्या. रामचंद्र ऊर्फ भाऊसाहेब यांचा जन्म चिमणगाव येथे मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी शके १७९८ म्हणजे ता. २४ नोव्हेंबर १८७६ रोजी झाला. या आपल्या नातवाच्या सतराव्या वर्षापर्यंत महादाजी भास्कर आणि या आपल्या मुलाच्या बत्तिसाव्या वर्षापर्यंत गणेश महादेव आपल्या आशिर्वादांचा वर्षाव आपल्या कुलदीपकावर करीत होते. कोकणापासून गुजराथपर्यंत आणि वऱ्हाड, मध्यप्रदेश, काठेवाड धरून गोमांतकापासून मूर्तिजापूर–हैद्राबादेपर्यंत पसरलेल्या सोमण मंडळीत १९४१ पर्यंत (म्हणजे भाऊसाहेब सोमण–संसार–निवृत्तिपर्यंत) ५७६ कर्ते पुरुष असतील; त्यामधील ४२ गणनीय महाभागात जे नामांकित २० वकील होतील त्या लौकिक महामंडळात आपला रामचंद्र मानाचे स्थान पटकाविणार आहे अगर आपल्या चरित्राने व चारित्र्याने सातारा जिल्ह्यात एक अभिमानास्पद असा अभिनव कालखंड उभारणार आहे, असे भविष्य महादाजी भास्कराना दिसले होते की नाही अथवा तसा तोंडचा हिशोब तरी गणेश महादेवांच्या नजरेसमोर आला होता की नाही हे कोणासही त्या उभयतांच्या स्वभाव-चित्रावरून सांगता यावयाचे नाहीं. कदाचित् महादाजी भास्कराना तसे भविष्य दिसलेही असेल ! गणेशपंत सोमण मास्तरानी आपल्या हिशोबी तसे उत्तरही मनाशी ठरविले असेल. पण त्याची वाच्यता बरीक कोणीच केली नाही. भूतकाळाची भलाई आणि भविष्यकाळाची बढाई वर्तमानकाळातील वस्तुस्थितीला धरून करावयाच्या कर्तव्याना व कर्तबगारीला फारशा उपयोगी नसतात. हा ठोकताळा उभयतानाही दृक्प्रत्ययाचा असल्याने रामचंद्राचे जे "पाळण्यातील पाय" त्या वडिलधाऱ्यांना दिसले, त्याना नीट वळण लावण्याची कर्तव्यनिष्ठा त्या उभयतानी सांभाळली हे साहजिक व्यवहारचतुराइचेच होते. त्यामुळेच आजोबांच्या ज्योतिषाची दूरदृष्टी

आणि वडिलांच्या शिक्षकीचे वात्सल्य यांचा वारसा घेऊन तो सवाईने राष्ट्रसेवे-साठीच चालविण्यास रामचंद्र गणेश पुढे आले, असे म्हटले तरी भावपूर्ण हृदयास अतिशयोक्ति वाटणार नाहीं.

पहाटे पूर्वीचा काळोख.

महाराष्ट्रात निबंधमालेचा जन्म हा अभिनव चैतन्ययुगाचा अरुणोदय मानला जातो. ह्या अरुणोदयापूर्वी दारूण काळोखाने काही कमी धुमाकूळ घातला नव्हता! ज्या सातारा जिल्ह्यात महादाजी भास्कर सोमण आले, त्या सातारा जिल्ह्यात त्या काळोखाने कहर केला होता. १८३६ मध्ये काही लोकांच्या कार-वाईमुळे इंग्रजाविरुद्ध प्रतापसिंह राजे भोसले कट करीत असल्याचा संशय आल्यावरून सातारचा रेसिडेंट कर्नल लॉडविक प्रभृतीचे गुप्त चौकशी कमिशन बसले आणि त्याच्या निर्णयानुसार सुमारे एकवीस वर्षे प्रजाहितदक्षतेने व इंग्रजानी देखील विलातेहून रत्नजडीत तलवार नजर करण्याइतक्या चतुराईने हाकलेले चौदा लक्षाच्या मुलुखाचे राज्य प्रतापसिंहाना ५ डिसेंबर १८३९ रोजी सोडावे लागले होते. त्यापुढे औरस संततीच्या पोकळ सबबीवर १८४९ साली सातारचे राज्यच खालसा झाले. १८५७ साली सुरू झालेल्या स्वातंत्र्य युद्धाने अखिल भारत तापवून सोडला असता, प्रतापसिंहांच्या घराण्यातील राण्याना अहमदनगरच्या किल्यातील बंदीखाना पहावा लागला. प्रतापसिंहांचे दत्तकपुत्र "जंगलीमहाराज" याना कराचीस हद्दपार व्हावे लागले आणि रंगो बापूजी गुप्त्यांचे चिरंजीव सीतारामपंत व सोळा अनुयायी याना सातारच्या गेंडामाळावर ता. ८ सप्टेंबर १८५७ रोजी तोफेच्या तोंडी देण्यात आले. छत्रपतींच्या विपन्नावस्थेची परिसीमा २१ मार्च १८७४ रोजी रंगमहालाच्या इमारतीस आग लागून अधिकाऱ्यांच्या हयगयीमुळे झाली. १८७५ च्या २३ एप्रिलेस धनीनीच्या बागेतील बंगल्यास आग लागून त्याची राख झाली तर मे १८७६ अखेर छत्रपतीना नवा राजवाडा ब्रिटिश सरकारच्या डिस्ट्रिक्ट जज्ज व फर्स्ट क्लास सब्-जज्ज यांच्या न्याय-मंदिराकरिता खाली करून द्यावा लागला. महाराष्ट्राला आनंदवनभुवन करून सोडणाऱ्या छत्रपतींच्या घराण्याचे हे असे झाले, तर ब्रिटीश रिसायतीच्या आरंभी नवे राज्य म्हणजे "ईश्वरी प्रसाद" असे बहुजन समाजाला आणि आधिकारलोलुप पांढरपेशा वर्गाला वाटले ही गोष्ट काही खोटी नाही. इंग्रजी राज्यामुळे जे पाश्चिमात्त्य ज्ञान-भांडार येथे खुले झाले, आणि इंग्रजी विद्येच्याद्वारे जागतिक प्रवृत्तींचा ओघ परिचित होऊ लागला, इतकेच नव्हे तर इंग्रजाला हाडाचे दुष्मन् समजणारासही आपल्या तोटकेपणाची आणि खाकेतील निखाऱ्याना फुलवून ठेवणाऱ्या परकीय युक्तिबाजीची ओळख झाली, हाच खरोखर इंग्रजी राज्याच्या रूपाने आलेला ईश्वरी प्रसाद होय. एरवी हे सर्वानाच कबूल होते की इंग्रज लोकांचे राज्य झाल्यापासून राजापासून रंकापर्यंत साऱ्याना सारखी निस्तेजता आली. बुद्धीला



पंतोजी
गणेशपंत
व
त्यांची
शिष्यमंडळी
पाचवड



गणेशपंतांच्या मृत्यूसमयी
आप्पा. आई.



भाऊसाहेबांचे गुरुजी कै. दादासाहेब करंदीकर



युनियन क्लबच्या परिसरात. ( १९०७ )
उजवीकडून तिसरे– डोसाभाई माणेकजी; चौथे भाऊसाहेब

उत्तेजन, व्यापाराला खप व कलाकौशल्याला पोशिंदा नाहीसे झाले. त्यामुळे विश्वविद्यालयातून पदवीधर बाहेर पडू लागल्यावर सरकारमान्य मार्गांनी लोकांची गाऱ्हाणी दूर करण्याकरीता " जिल्हा असोसिएशन " नावाची संस्था स्थापन झाली आणि " घराखालील जमीन मोजणीच्या कायद्यासंबंधी नामदार गव्हर्नर-जनरलसाहेब याजकडे शेकडो सह्यानिशी अर्ज " वरील असोसिएशनतर्फे १८ डिसेंबर १८६८ रोजी झाला. सातारा जिल्ह्याच्या सार्वजनिक राजकीय आयुष्याचा हा लोकसंमत प्रारंभकाल समजावयास हरकत नाही. पुढे सातारा येथे लायब्ररीत २६ जून १८७० रोजी " स्वाभिमानपूर्वक सार्वजनिक हितासाठी व तरुण लोकांची सुधारणा व्हावी " या हेतूने एक सभा स्थापन झाली. या विद्वानांच्या सभेत " सरकार जे कायदे करते ते योग्य की अयोग्य " हे ठरवीत असत. अशा सभानी शेतकऱ्यासुद्धा सर्व लोकाना एकत्र जमवून देशस्थिती समजाऊन देण्याचे प्रयत्न १८७० साली वाई, वाळवे, कऱ्हाड, खटाव येथे केले. असे विखुरलेले प्रयत्न होत असताच, महाराष्ट्रात एकजीव चळवळ व एकमुखी मत-प्रदर्शन करता यावे म्हणून खटपट करणारे, मूळचे सातारचे पण पुण्यास जाऊन " सार्वजनिक काका " झालेले गणेश वासुदेव जोशी हे ता. २८ मे १८७१ रोजी साताऱ्यास आले; आणि गणेश नारायण कोल्हटकर व कृष्णराव सखाराम महाजनी यांच्या सहाय्याने त्यानी " सार्वजनिक सभा " स्थापन केली. त्यापूर्वीच न्यायमूर्ती रानड्यांच्या प्रेरणेने वाईस सार्वजनिक सभा स्थापन झाली होती. होता होता सार्वजनिक सभांचे जाळेच जिल्हाभर झाले आणि " पोलीसपट्टीबद्दलचे कायद्यासंबंधी सरकारास सूचना करण्याविषयीचा इंग्रजी अर्ज " पाठविण्यात आला. १८७२ साली खानदेश रिलीफ-फंड सार्वजनिक सभामार्फत जिल्हाभर जमविण्यात आला; वाई येथील कृष्णेत नग्नावस्थेत स्नानास उतरणाऱ्या लष्करी युरोपियनापासून नेटिवास त्रास होई तो सरकारच्या नजरेस आणण्यात आला; व मिठावरील कराची ओरडही करण्यात आली. तात्पर्य राजकीय बाब मुख्य धरून तिच्या अनुषंगाने लोकांच्या गाऱ्हाण्यांचा शेवट लावून घेण्याकडे सार्वजनिक सभांचा कटाक्ष होता. १५ आक्टोबर १८७४ रोजी सातारा सार्वजनिक सभेतर्फे " सर्व हक्क राजाचे व प्रजेचे काही नाही " म्हणून सदाशिव रावजी गोवंडे यानी ब्रिटिश कारभारावर टीका केली तर सार्वजनिक काकानी " स्वदेशाभिमान व स्वदेशी कपडा " याचे महत्त्व लोकाना पटवून दिले होते. १८७५ त बडोद्याचे मल्हारराव गायकवाडावर ज्यावेळी तेथील रेसिडेंटाला विषप्रयोग केल्याचें किटाळ आले, त्यावेळी वाईच्या सार्वजनिक सभेने जोराने उचल केली. १८७६ च्या दुष्काळानिमित्ताने तासगांव येथील लोकानी धान्य आणण्यासाठी दस्तुऱ्यांची माफी मागितली. ती मिळाली नाही, हा भाग निराळा. सरकारकडे मागण्या करूनच लोक थांबले नाहीत, तर ७ जुलै १८७६ रोजी सार्वजनिक काकांच्या हस्ते साताऱ्यास

लवाद कोर्टही लोकानी स्थापन केले. निबंधमालेच्या चैतन्य–युगाचा अरुणोदय अशा प्रकाश–शलाकानी झळकू लागला असताच, भाऊसाहेब सोमणांचा जन्म झाला, ही गोष्ट लक्षात घेतली तर आपल्या जन्मापासून मुलाच्या जन्मापर्यंत सातारा जिल्ह्याच्या ऐतिहासिक चित्रपटाचे चिंतन गणेश महादेव सोमण गुरुजीना आपल्या मुलास व विद्यार्थ्यास वळण लावण्यासाठी कसे उपयोगी पडले असेल याची समज विद्यार्थीप्रिय यशस्वी शिक्षकाच्या परिचित निरीक्षकाला तेव्हाच ओळखता येण्यासारखी आहे. वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत वडिलांच्या देखरेखी–खाली रामचंद्र गणेश सोमणांचे मराठी शिक्षण झाले.

आप्पा मास्तर

सोमण मास्तर उर्फ आप्पा मास्तर हे रामचंद्र गणेशांचे पिताजी, विद्यार्थ्यास एक आदर्श होते. ते मुलात मूल व थोरात थोर म्हणून वागले तरी मर्यादा–पुरुषोत्तम मानले जात. मुलांच्या चुकाबद्दल रागावले अगर उनाडकीबद्दल शिक्षा करू लागले तरी त्यांच्या उग्र स्वरुपातही विद्यार्थ्यांना कालीमातेचा प्रेमळपणा दिसे, असा निर्वाळा आप्पा मास्तरांचा विद्यार्थी व रामचंद्र गणेशांचा वर्गबंधु बाबू अंबू महार पाचवडकर आजकालही स्मरणपूर्वक देतो. विद्यार्थ्यांना मोकळेपणा भरपूर दिला तरी त्यांच्यात स्वच्छंदीपणा संचरू नये म्हणून मोकळेपणाचा अतिरेक व्हाव-याच्या आतच आप्पा मास्तर खाकरत, की विद्यार्थी आपल्या पुढील कार्यक्रमाला शिस्तशीर लागत. मोडी कित्त्याच्या वळणदार अक्षराबाबत अक्षदा टाकल्या तर आप्पा मास्तरांचा हात इतर सर्व विषयात कोणासच धरता येत नसे, एवढेच नव्हे तर आपल्या विद्यार्थ्यांपैकी कोणता विद्यार्थी कशा योग्यतेला चढण्यासारखा आहे व त्यासाठी त्याच्या पालकानी कोणती खबरदारी घ्यावी याचेही मार्गदर्शन आप्पा मास्तर करीत, असा आपला अनुभव महामहोपाध्याय श्रौताचार्य धुंडिराज गणेश दीक्षित बापट यानी सांगितला आहे. आप्पा मास्तर विद्यार्थ्याला ज्या त्या गुण-वैशिष्टचानुसार टोपण नाव ठेवीत आणि त्या नावानेच त्यास हाका मारीत. टोपण नाव आप्पा मास्तरानी दिले की विद्यार्थ्यास अभिमान वाटे व मास्तरानी अरेतुरे म्हणून संबोधण्यांत ते आपल्याविषयी स्वतःच्या मुलाइतकाच जिव्हाळा बाळगतात याचा विद्यार्थ्यास मोठा अभिमान वाटे. वडिलांच्या या वागण्याच्या रीति रामचंद्र गणेश यानी उचलल्या होत्या हा सोमणांच्या सान्निध्यात वागणाराना अनुभव होताच.

# ४ शाळेचे व जीवनाचे वळण

१८७६ च्या मे महिन्यात छत्रपती घराण्याला नवा राजवाडा खाली करून ब्रिटिश न्यायमंदिरासाठी द्यावा लागला आणि पुढे दोनच-महिन्यात साताऱ्यात लवाद कोर्ट झाले व राजवाड्याच्या झालेल्या न्यायमंदिरात वकिली करून नाव लौकिक मिळविणारे भाऊसाहेब सोमण, राजवाडयाचे न्यायमंदीर झाल्यापासून सहा महिन्यात जन्माला आले, याची काही संगति ज्योतिषशास्त्र लावू शकत असले तर कोणास ठाऊक ! पण भाऊसाहेब सोमण १९०१ साली सातारा येथें त्या राज-वाडयाच्या न्यायमंदिरात वकिली करावयास येईपर्यंत सातारा जिल्हा काय करीत होता व अप्रत्यक्षरीत्या का होईना, पण सोमणांच्या मनावर त्याचे काय पडसाद उमटत होते, हे पाहणेही उद्बोधक होईल.

रामचंद्र गणेश एक वर्षाचे होण्याचे आतच सातारा हायस्कूलचे हेडमास्तर जठार व कृ. पां. आगटे यानी सातारा म्युनिसिपालिटीत "साखरेचा कारखाना" काढण्याचे ठरविले होते. मात्र दरिद्रयाच्या मनोरथाप्रमाणे सदर साखरेचा कार-खाना यावेळी कागदीच प्रगति करू शकला. ता. १७ नोव्हेंबर १८८२ चा शुभसूचक बरीक सांगतो की सातारा जिल्ह्यातील गणेश गोपाळ पंडीत बी. ए. व विठ्ठल महादेव गोखले आय् सी. ई. या दोन गृहस्थानी अहमदाबादेस चिटाची गिरणी काढली व टर्की रेड सूत तयार केले. खुद्द सातारा जिल्ह्यात पाहता, केसरीवरील बर्वे प्रकरणाच्या खटल्याकरता फंड जमविणेत आला आणि त्या निमित्ताने दादासाहेब करंदीकरानी सातारा जिल्ह्याची कुंडली मांडली. मराठा-केसरीकर्त्यास झालेली शिक्षा माफ व्हावी म्हणून ता. ११ ऑगष्ट १८८२ रोजी साताऱ्याहून आणि वाई-कऱ्हाडहून अर्ज झालेही. पण ता. २ जुलै रोजी घाटे थिएटरात नारायणराव फडणीस यांचे अध्यक्षतेखाली सभा भरवून दादासाहेब करंदीकरानी रिपन साहेबाच्या स्थानिकस्वराज्याच्या योजनेवर भाषण करून लोकाना जी समजूत दिली व त्यांच्याच प्रेरणेने गंगाधर रामकृष्ण किराणे कऱ्हाड, वाळवे, तासगाव, पाटण या भागात जे त्या योजनेच्या प्रचारार्थ हिंडले, तेच त्या सालचे सातारा जिल्ह्याचे खरे कार्य होय. १८८३ च्या १४ जानेवारीला केशव पांडुरंग नातु, व बाळाजी महादेव गोळे यांच्या समवेत दादासाहेब करंदीकर सातारा सार्वजनिक सभेचे चिटणीस निवडून आल्यावर त्यानी शेतकरी-कर्ज-मुक्ततेच्या कायद्याचा फायदा शेतकऱ्याला भरपूर व्हावा म्हणून भारी खटपट केली. १८७४ चे जानेवारीत पुणे सार्वजनिक सभेचे का. त्र्यं. खरे सातारा जिल्ह्यात "शेतकरी ॲक्ट" समजावण्यासाठी चक्कर मारून गेले आणि वाईची सार्वजनिक सभा नानासाहेब वैद्यांच्या देखरेखीखाली कार्य-क्षमतेने नाव करून बसली होती.

राष्ट्रीय सभेचा दृष्टिकोन

अशा सर्व विचारजागृतीच्या जोरावर १८८५ साली "सार्वराष्ट्रिक कॉन्फरन्स" उर्फ राष्ट्रीय सभा जेव्हा होऊ घातली तेव्हा तिच्यापुढे ठेवण्याची महत्त्वाची गोष्ट म्हणून "विलायतेत इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड या प्रांतातून पार्लमेंट–सभेमध्यें जसे मेंबर पाठविले जातात त्याप्रमाणे हिंदुस्थानच्या तर्फेने काही मेंबर पाठविण्यास आम्हास अधिकार मिळावा" अशी विचारसरणी सातारा जिल्ह्यात धर धरीत होती. १८८५ ला (काँग्रेस) राष्ट्रीयसभा जन्माला आली आणि तिच्या तिसऱ्या वर्षापासून दादासाहेब करंदीकर, बळवंतराव सहस्रबुद्धे, बळवंतराव कोल्हटकर आणि अष्टयाचे गोविंदराव लिमये यानी राष्ट्रीय सभेचे रहस्य समजावून घेऊन ते तिचे नियमित धारकरी बनले. कारण अखिल भारताचे एकमुखी मागणे जगापुढे मांडण्याकरिता किंबहुना भारतवर्षाने आपले सार्वजनिक सामर्थ्य व मतप्रदर्शन करावे आणि धर्म व पंथ यांचा विचार न करता लहान-मोठ्या सर्व दर्जाच्या लोकाना आपल्या संपूर्ण व स्वयंपूर्ण वाढीसाठी क्षेत्र निर्माण करावे, असा [राष्ट्रीय सभेचा दृष्टिकोन सातारा जिल्ह्याच्या कर्त्या पुढाऱ्याना पटावयास व तिचा त्यानी प्रचार आणि पाठपुरावा करावयास सुरुवात केली, तो पर्वकाळ साधून जणु रामचंद्र गणेश सोमणानी इंग्रजी शिक्षणासाठीं सातारा येथे येऊन बिऱ्हाड थाटले होते.]

राष्ट्रीय सभेचा प्रचार

"देवांचे राज्य" हा इंग्रजी राज्याबद्दलचा काही मंडळीना झालेला भ्रम राष्ट्रीय सभेच्या जन्मानंतर चारच वर्षात उतरू लागला आणि परकीय राज्यामुळे हिंदुस्थानला जळवा लागल्याचा ध्वनि राष्ट्रीय सभेच्या अर्जआर्जवातून प्रारंभा-पासूनच निघू लागला. सातारा जिल्ह्यातही त्याचा पडसाद १८८९ सालीच ऐकू आला. त्या सालच्या सप्टेंबरात ता. १० ला दादासाहेब करंदीकरांच्या दैनंदिनीत नमूद आहे की "राष्ट्रीय सभेच्या चळवळीस मदत करू नका म्हणून कोरेगावच्या मामलेदारानी खेड्यातील अधिकाऱ्यास सांगितले". १८८६ पासूनच जिल्ह्यात राष्ट्रीय सभेचे काम सतत चालावे म्हणून तालुकानिहाय "मंडळी" स्थापण्याचा उद्योग जिल्ह्याचे पुढारी करीत होते आणि कृष्णाजी अबाजी गुरुजीसारखी मंडळी त्याना साथ करीत होती. राष्ट्रीय सभेने विचारार्थ घ्यावयाच्या ठरावासाठीं सूचना करण्याचा उपक्रमही १८८८ सालापासून झाला. आणि १८८९ त तर "तालुक्या-तालुक्यातील प्रत्येक गावाकडून घरापाठीमागे एकेक पैसा घेण्याची सुरुवात झाली. पैसा घेणारा, घरवाल्यास आपण पैसा कशासाठी घेतो व त्यापासून उपयोग काय, हे समजाऊन सांगतो" असे २९ जुलै १८८९ चे वृत्तसारात नमूद आहे. त्याच साली गोविंदराव लिमये प्रभृतींनी राष्ट्रीय सभेची तत्त्वे रुजविण्यासाठी "छोटया काँग्रेस" चा उपक्रम सुरु केला तो १८९७ अखेर तेजाने चालला होता. राष्ट्रात निढळाच्या घामाने जो वर्ग अन्नादि जरूरीची जीवितसाधने उत्पन्न करतो, त्याला

वाचा फोडून त्याचे म्हणणे राष्ट्रीय सभेपर्यंत कसे पोचवावे आणि राष्ट्रीय सभेत ठरलेले अखिल भारतीय धोरणाचे लोण शेतकऱ्यापर्यंत कसे पोचवावे याचा तो बिवलकरी कित्ता होता. पण तालुक्यातालुक्याला अशा छोटचा काँग्रेस भरवून अवाढव्य खर्च व तालुकातालुक्याच्या पुढाऱ्याना ठिकठिकाणी जमण्याचा तो उद्योग करून ठेवण्यापेक्षा सबंध जिल्ह्याचीच एक छोटी काँग्रेस असावी व ती दरसाल फिरत्या पाळीने तालुक्यातालुक्यांतून भरवावी म्हणून दादासाहेब करंदीकरानी १८९२ सालीच ‘ जिल्हासभा ’ या नावाने प्रयोग केला. त्यावेळीं तो रुचला तरी रुजला नाहीं.

या सार्वजनिक उठावाच्या बरोबरीने लोकजागृतीचे वैयक्तिक प्रयत्नही काही कमी नव्हते. १८८६ साली मुनशी शेखवल्लद शेखचांद यानी सातारा जिल्ह्यातील लोकास देशाभिमान जागृत ठेवण्याबद्दल, दारू न पिण्याबद्दल आणि बालविवाह न करण्याबद्दल उपदेश करीत करीत दौरा काढला होता. डेक्कन कॉलेज बंद न करण्याबद्दल आणि लायसेन्स टॅक्सपेक्षा इन्कमटॅक्स फाजील असल्यामुळे सातारा, जावली, वाई, कोरेगाव इकडून तक्रारी झाल्या होत्या आणि १८८७ त तर कराड तालुका सडकेच्या कडेवर असलेल्या झाडाची मालकी रयतेची आहे हे सिद्ध असता सरकार झाडे आपली म्हणू लागले म्हणून कराडकरानी विदूषकातून कलेक्टरास नोटीस दिली. १८८८ साली सातारच्या वक्तृत्वोत्तेजक सभेने चढाओढीसाठी “ राष्ट्रीय सभा ” हा एक विषयच ठेवून दिला होता, मग वाढलेल्या मीठ कराबद्दल जिल्ह्याने दाद मागितली असली तर नवल काय? १८८९ त राष्ट्रीय सभेवर अधिकाऱ्यांची गैरमर्जी होताच श्रीमंत नारो विठ्ठल घाटे यानी कृष्णाजी अबाजी गुरुजीस कराड येथे आणवून राष्ट्रीय सभेवर व्याख्यान करविले, हेही पुष्कळ दृष्टीनी बोधप्रद उदाहरण झाले. १८९१ त तर ठिकठिकाणची गायराने जप्त झाली म्हणून ऑगस्ट महिन्याचे शेवटच्या आठवडयांत कराड, पाटण वगैरे तालुक्यातून हजारो शेतकऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी कलेक्टरसाहेबांच्या बंगल्याभोवती जमा झाल्या होत्या.

१८९२ साली सातारच्या घाटे थिएटरात कृ. आ. गुरुजीस मुसलमान मित्रानी रुप्याचे पदक लावलेला बनातीचा डगला दिला. आणि त्याच सालच्या काँग्रेसला गेलेल्या शांतवृत्ती दत्तोपंत पारसनीसानी “ काँग्रेसचे व विशेष स्थळांचे वर्णन ” हे राष्ट्रीय सभेवरील सातारा जिल्ह्यातील पहिले प्रकाशन केले. याच साली इस्लामपूर ‘ प्रतोद ’ वर फॅगन या फॉरेस्ट ऑफीसरवरील टीकेचा खटला होऊन संपादकास सहा महिनेची शिक्षा झाली.

१८९३ मध्ये वाईच्या छोटचा काँग्रेसने दादाभाई नौरोजीना सातारा जिल्ह्यातर्फे मानपत्र देण्याचा ठराव केला व त्याप्रमाणे १६ डिसेंबरास ते मुंबईस देण्यातही आले.

द्वारांच्या खटला

१८९४ साली वाई येथील द्वारांचा म्हणून जो खटला गाजला, आणि " वाईकर मंडळीवर जो प्रसंग गुदरला, त्याचे मुळाशी केवळ झांजेचा ( म्हणजे मशीदीसमोर वाद्ये वाजविण्याचा ) खटला नव्हता. वाईतील बरीच मंडळी सार्वजनिक कामात असतात, ती एकदा डँबीस ठरवून टाकली की इतर ठिकाणच्या लोकासही ते एक प्रकारचे उदाहरण होईल व अलिकडे सरकारी अधिकाऱ्यावर जो ओरडा होत असतो तोही बंद होईल " असा राजकीय डाव त्यात असल्याचे प्रतोदने स्पष्ट अभिप्रायिले होते.

विचारांचा आचारात

१८९५ हे साल विचारांच्या घडणीबरोबर आचाराच्या चढणीची सुरुवात करणारे ठरले. त्या साली एप्रिलमध्ये सातारा डिस्ट्रिक्ट बोर्डाने मते टिळकाना दिल्यामुळे त्या पुण्यपुरुषाचे पाय साताऱ्यास लागले. सातारा ते खानदेश असा पसरलेला जो मध्यभाग त्यातील डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डातर्फे मुंबई कायदेमंडळात प्रतिनिधी निवडून यावयाची पहिली निवडणूक झाल्यावर लोकमान्य टिळक २७ ऑगष्ट १८९५ रोजी साताऱ्यास प्रथम आले. त्या प्रसंगी ग. पां. तथा दादासाहेब आगटे यांचे अध्यक्षतेखाली घाटे थिएटरात त्याना मानपत्र झाले. सातारा डि. लो. बोर्डाची ( एक लाख लोकसंख्येस एक याप्रमाणे असलेली ) तेराच्या तेरा मते, लोकलबोर्ड सभासद ल. ब. उर्फ तान्यासाहेब मुतालिकांच्या खटपटीने टिळकाना मिळाली होती. प्रतापगंजातील सदर मुतालिकाकडेच टिळकांचा मुक्काम असला तरी दिवाणांचे दिवाणखान्यात अण्णासाहेब चिरमुल्यांचा लॉक्लास होता, त्यास त्यानी भेट दिली. याच वर्षी साताऱ्यास सार्वजनिक गणपत्युत्सवाचा उपक्रम होऊन गणपतराव. फणसळकरांचे पुरस्काराने यादोगोपाळ मारुतीपुढे टिळकाना पानसुपारी झाली तेव्हा सुप्रसिद्ध रामशास्त्री गोडबोले यांचा आशीर्वादही त्याना झाला. पुढे आक्टोबर महिन्यातील ३ तारखेस त्या साली पुण्यास होणाऱ्या कॉंग्रे–सच्या अधिवेशनासाठी जनरल सेक्रेटरी या नात्याने निधी जमविण्यास टिळक आले. त्यावेळी त्यांचे " राष्ट्रीय सभेची तयारी " म्हणून व्याख्यान झाले असता त्यानी राष्ट्रीयसभानिष्ठ सातारा जिल्ह्याबद्दल धन्योग्दार काढले. त्यांच्या इच्छेप्रमाणे दोन हजार रुपये पुण्याच्या कॉंग्रेससाठी सातारा जिल्ह्याने दिले. राष्ट्रीयसभेच्या मंडपात सामाजिक परिषद भरू द्यावयाची, न द्यावयाची असा वांधा पडून पुण्यास राष्ट्रीय सभा भरते की नाही असा गोता झाला होता, तेव्हा करंदीकर–लिमयांची संमति घेऊन नानासाहेब वैद्य प्रभृति वाईकर मंडळीनी त्या सालची राष्ट्रीयसभा भरविण्याची तयारी दाखविली होती.

पुढच्या वर्षीही लोकमान्य व नामजोशी कोल्हापूरच्या छत्रपतींच्याकडे शिवाजीस्मारकनिधीकरता जाताना साताऱ्यास थांबले होते. समर्थनवमीचा तो योग असल्यामुळे सज्जनगडावरही ते जाऊन आले. त्याच दिवशी रात्रौ घाटे

नाटकगृहात जाहीर सभा होती. हिंदुस्थान सरकारने हिंदी कापडावर नव्याने बसविलेल्या एक्साईज डयूटीच्या निषेधार्थ ती सभा होती. आण्णासाहेब पिंगळे यांच्या अध्यक्षतेखालील त्या सभेत टिळकानी भाषण करून स्वदेशी व बहिष्कारांच्या चळवळीचा नारळ फोडला. हिंदुस्थानातील परकीय अंमल हा सर्व बाजूनी शोषण करीत आहे, इतका की स्वाभिमानी माणसाला हे शोषण थांबविण्याचा प्रयत्न केल्याशिवाय गप्पच राहवू नये. याची जाणीव जिल्ह्यात हळूहळू होत होती. १८९६ च्या शिवाजीगणपत्युत्सवानी या जाणीवेला तोंड फोडले. सार्वजनिक हिताकरिता कसल्याहि आपत्तीची पर्वा न करण्याइतकी बेपर्वाई १८९६ च्या दुष्काळात कऱ्हाडात दिसून आली. हसन मुंजावरानी बाजार गोरगरीबाकडून लुटविला त्याबद्दल त्याना चार वर्षाची शिक्षाही झाली. आणि १८९७ पासून स्वावलंबनाचे पाऊलच पडले. तासगावचे रामचंद्र विनायक कुलकर्णी यानी, सार्वजनिक काम करावयाचे नाही अशी वरिष्ठांची तंबी मिळाल्यामुळे कुलकर्णीपणच सोडले. मासळी वाईच्या मोदवृत्तावरील "आमचा सरकारवरचा विश्वास अगदी उडाला" वगैरे लेखाबद्दल झालेल्या खटल्यात भाऊशास्त्री लेल्याना नऊ महिन्याची शिक्षा झाली ! प्रतोदवरही राजद्रोहाचा खटला "स्वतंत्र होण्याची तयारी" या लेखाबद्दल होऊन पहिल्या कोर्टात कशाळकर संपादकाना जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा झाली, पण अपील झाल्यावर हायकोर्टात ती एक वर्षावर आली. पुढे प्लेग–दुष्काळानी त्रासविले असताही सातारा रेटपेअर्स असोसिएशन १८९९ साली स्थापन झाली आणि १९०० सालची प्रांतिक परिषद साताऱ्यात झाली, तीमुळे "तडजोडीच्या राजकारणाची राजधानी" असा साताराचा लौकिक झाला. या पार्श्वभूमीवर सोमणांची यू. एस्. एफ्. झाल्यावर नोकरी करता करता आणि वकीलीचा अभ्यास करता करता, सार्वजनिक सेवेच्या ज्या पुस्त्या काढल्या त्यांच्यावरून त्यांचे मनाचे पापुद्रे कोणाही चिकित्सकाला उलगडता येण्यासारखे आहेत.

---


सन १८८७ त रामचंद्र गणेश इंग्रजी शिक्षणासाठी साताऱ्यास दाखल झाले. त्यावेळीच काय, पण एकोणीसाव्या शतकाच्या शेवटच्या वर्षापर्यंत साताराच्या सरकारी हायस्कूलात सुमारे तीनशे व दोन खाजगी हायस्कूलात मिळून तितकेच विद्यार्थी असत. १८८०–१८९० चे दरम्यान माजगावकरांची शाळा मोतीतलावाचे उत्तरेस भोईटे यांच्या वाडयात चालू होती. त्यातूनच दोन शाळा निर्माण झाल्या. जोशी व देशपांडे यांच्या. श्री. दत्तोपंत जोशी हे त्यावेळी एक खाजगी शाळा चालवीत. तीतच रामभाऊनी इंग्रजी विद्येच्या "वाघिणीचे दूध" घेण्यास सुरवात केली. जोशी यांची शिस्त वाखाणण्यासारखी होती. त्यांच्या शाळेतील सखाराम बापू अभ्यंकर हे नामवंत व रुबाबदार शिक्षक वरच्या वर्गास शिकवीत. गणपतराव मालशे व कृष्णाजी

नीळकंठ द्रवीड हे उत्तम लौकिक झालेले शिक्षक याच शाळेत बारा वर्षे नोकरी करीत करीत एम्. ए. झाले. पुढे पुण्याचे फर्ग्यूसन कॉलेजमध्ये चमकलेले प्रा. चादोरकर यांचे जोशांच्या शाळेतील संस्कृतचे अध्यापन लोकप्रशंसेस पात्र झाले होते. त्या वेळच्या गावठी किंवा खाजगी शाळा चालविणारांची आर्थिक कुतरओढ पण स्वतःच्या हिंमतीवर शाळा चालविण्याचा महत्वाकांक्षी हव्यास लक्षात घेतला तर व्रतासाठी वाताहात पत्करणाऱ्या हरिश्चंद्राचे दिव्य कित्येकानी केलेले आढळते. या दिव्याचे कौतुक सहकारी मंडळीना असले तर निभाव लागतो; नाहीतर मत–भेदाने मनेच्या मने बुरसतात आणि संस्थाचे संस्थान तरी होते किंवा संस्था–न तरी होते. दत्तोपंत जोशांच्या शाळेला ही दुसरी अवकळाच येऊ घातली होती. म्हणून १८८९ साली जोशांच्या प्रमाणेच रा. बळवंत रंगो माजगांवकरानी त्यांच्या शाळेतून फुटून ना. गो. देशपांडयांचे सहकाराने एक शाळा काढली होती, तीत रामभाऊ सोमण जाऊ लागले. इंग्रजीचे उत्तम शिक्षक म्हणून देशपांडे यांचा लौकिक होता. विद्यार्थी हुशार असला तर देशपांडे त्याचे शिक्षण फीसाठी नडू देत नसत. अनेक गरीब विद्यार्थी त्यानी अन्नाला लावले. तथापि या शाळेत संस्कृत, बीजगणीत, भूमिती, यांच्यात मन न रमल्यामुळे येथील शिक्षणाचाही रामभाऊंचा काळ दोनच वर्षांचा ठरला. तेथून दप्तर गुंडाळून रामभाऊ १८९१ साली सरकारी हायस्कूलात प्रवेश मिळवून बसले व १८९२ साली रा. ब. पाठकासारख्या हेडमास्तरांच्या देखरेखीखाली युनिव्हर्सिटी स्कूल फायनल परीक्षा झाले. आपल्या इंग्रजी शिक्षणाच्या अशा तीन तऱ्हा झाल्या तरी आपणास भेटलेले शिक्षक खरो–खरच "गुरू" पदवीला लायक होते व त्यानी आपल्या मनावर चिरस्थायी असे जीवन–सिद्धान्त बिंबविले, अशी कृतज्ञता रामभाऊनी कितीतरी वेळा व्यक्त केलेली त्यांच्या बरोबरीच्या मंडळीना आठवे.

स्वतःचे वडील शिक्षक. त्याना आपले विद्यार्थी नुसते पुस्तकातील किडे झालेले खपत नसत, हे रामभाऊंच्या पूर्ण परिचयाचे होते. मेंदूने तल्लख तसेच मनगटाने बळकट असे आपले विद्यार्थी असावेत ही गणेशपंत सोमण मास्तरांची मनीषा असे. याबाबत ते स्वताही दोन्ही बाजूनी कणखर होते. तालीमखान्या–समोरील दगडी गुंड पेलण्यात सोमण मास्तर ताठर असत, अशी त्यांची कीर्ति. एकदा एका नोकरीच्या गावी घरात रात्रौ एक धटिंगण दरोडेखोर शिरला असता, त्याला आपल्या कवळीत धरून आपल्या पत्नीस (रामभाऊंच्या मातोश्रीस) त्या दरोडेखोराच्या दाढीला लामण दिव्याने आग लावावयास सोमण मास्तरानी सांगितले व तसे घडल्यावर त्याला जाऊ दिले. आपल्या हाडाची चोयटी होऊन दाढी का जळली हे आपल्या सवंगडयाना सांगायची त्या दरोडेखोराला सोयच उरली नाही ! आग झाली तरी बोंब मारण्याची सोय आपल्या सामनेवाल्याला



खुर्चीवर बसलेले डावीकडून उजवीकडे
१ **भाऊसाहेब**. २ कडुसुकर. ३ गुंजाळ. ४ केळकर. ७ अन्तूकाका फडणीस.



– भाऊसाहेबांच्या वाडयातील आंगणात – (१९२५)
उभे:– गणूमामा, सितारामदास, काळोपंत जोशी.
खुर्चीवर:– शंशोराव, अष्टेकर, **भाऊसाहेब**, माणिकचंद.
बसलेले:– कोठावळे, भाटे, पालकर.



– भाऊसाहेबांची कन्या चि. सौ. बाबीताई इचे विवाहसमयी – ( १९२७ )
' भाऊसाहेबांचे मांडीवर त्यांचा नातू माधव '

उरू नये अशी स्वताची धोरणे ठेवण्यात रामभाऊनी आपल्या वडिलांचे वळण घेतले असेल काय ? तथापि दगडी गुंड वगैरे उचलण्यासारख्या उफाडचा खेळांची आवड असण्यापेक्षा रामभाऊना आटचापाटचा (सुरपाटचा) या खेळाची मातब्बरी विशेष वाटे. मूर्ती जातीचीच ठेंगू; त्यामुळे सुरपाटचातील कोंडी फोडण्याचे कामात ठेंगूपणाचा उपयोग फार. त्यामुळेच की काय, सुरपाटचा खेळण्याच्या वळणाने कोंडी फोडण्याचा स्वभाव रामभाऊंचा एवढचा मोठचा प्रमाणात तयार झाला की पुढे सार्वजनिक जीवनातही अनेक पेचप्रसंगातील कोंडया फोडण्यास ठेंगू अथवा विनम्र होऊन त्या आपल्या खेळकसबाचा उपयोग रामभाऊनी केला. देशपांडे मास्तरापासून शिकलेल्या इंग्रजीचा उपयोग जसा झाला, तसाच त्यांचा विद्यार्थ्यांना उपयोगी पडण्याचा गुणही रामभाऊनी उचलला व जन्मभर संगोपिला. रा. ब. पाठक हे तर न्यायमूर्ति रानडयांचे वर्गबंधू. आपली सरकारी नोकरी सांभाळूनही ते सार्वजनिक कामात लक्ष घालीत त्यांचा धडा घेऊनच आपल्या आवश्यक कर्तव्याच्या क्षेत्राबाहेरील विशाल जगाकडे पाहण्याची ऊर्मी रामभाऊ सोमणाना आली.

विद्यार्थीदशा संपल्यावर गरीब तरुणाची जबाबदारी कौटुंबिक जीवनास हातभार लावण्याचीच होऊन बसते. तीच रामभाऊंच्या वाटचास आली. सरकारी नोकरी हा त्याकाळी सुखकर जीवनाचा सोपान होता. कारकुनीपासून खजिनदारी–पर्यंत चढत जाणे ही एक मामुली बाब होती. पण १८९२ साली आप्पाना म्हणजे गणेशपंत सोमणाना आपल्या चिरंजीवाना सरकारी शाळेत नोकरी मिळावी म्हणून शाळाखात्याचे डायरेक्टर चाटफील्ड यास भेटणे प्रशस्त वाटले. रामभाऊ मॅट्रिक नसल्याने व हायस्कुलात फक्त पदवीधर शिक्षक नेमावयाचे सरकारी धोरण ठरल्यामुळे, साहेबानी रामभाऊना वर्ष दोन वर्षे ट्रेनिंग कॉलेजात घालण्याचा सल्ला दिला, व प्राथमिक शाळेत रामभाऊनी नोकरी केल्यास डेप्युटी इन्स्पेक्टरची जागा मिळण्याची आशा दाखविली. वडिलाना ते रुचले नाही तरी वडिलानी तिकडेच बोट केले. रामभाऊनी तिकडे पाहिलेच नाही. अंतःकरणातला अंकुर त्यानी उघडाही करून दाखवला नाही. वडिलांची बेअदबी तर होऊ नये, कौटुंबिक जीवनास आर्थिक हातभार लावण्याची आपली जबाबदारीही टाळू नये आणि “ राजपथ सोडूनी आडपथ का धरा ?” असा प्रश्नही आपणास कोणी करू नये, असा एक तोडगा रामभाऊनी आपल्या मनाशी ठरवला आणि ना. गो. देशपांडे यांच्या ज्या शाळेत रामभाऊ शिकले होते, त्या “ खाजगी हायस्कुलात ” रुपांतर झालेल्या शाळेत ते “ चाकरीस लागले. ” दरमहा दहाबारा रुपये रामभाऊ मिळवू लागले व शिक्षकपेशाचे वडिलार्जित वळण पुढे चालवू लागले. या खाजगी हायस्कुलाच्या अगोदरचे श्री. दत्तोपंत जोश्यांचे जे न्यू इंग्लिश स्कूल होते, ते दरम्यान चिकाटीने

चालविता चालविता मेटाकुटीस आलेल्या दत्तोपंतानी डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडे समर्पण करण्याचे ठरविले. तो विधि यथासांग होत असताच रामभाऊनी न्यू इं. स्कूलमध्ये शिक्षकी पतकरली.

हा शिक्षकाचा पेशा पतकरून रामभाऊ जन्मभर राहते, तर गणेशपंत सोमणांची गुरुपरंपरा चालवून वडिलांच्यापेक्षा चिरंजीव सवाई झाले असा लौकिक त्याना लाभला असता. कारण शिक्षकीमुळे विविध प्रकृतीच्या तरुणांचा व सोमणांचा घनिष्ट संबंध असल्यामुळे, लहानथोर, गरीब श्रीमंत, अशा सर्वांचे लक्ष केंद्रित करून शिकवण्याचे कसब साध्य करता करता, सोमण विद्यार्थीप्रिय शिक्षक झाले होते व त्यामुळे त्याना पालकवर्गाकडूनही भलेपणा मिळू लागला होता. त्याचा फायदा खाजगी शिकवण्या करून प्राप्ती वाढविण्यासाठी घ्यावा, असा मोह कोणाही शिक्षकास होता ! पण त्यापेक्षा निराळीच कुंडली रामभाऊंच्या कपाळी काळाचा ओघ मांडीत होती. १८९२ साली ते यू. एस्. एफ्. ची परीक्षा पास झाले. विद्यार्जनाचा हा रामभाऊंचा समाप्तिकाल ठरावयाचा, तर नव्या कालौघाच्या पहाट कोंबडयाचे आरव त्यावेळी जे सुरू झाले त्याकडे दुर्लक्ष केल्याचे पातक रामभाऊंचे हातून घडले असते ! क्रमिक पुस्तकांच्या खिडक्या–झरोक्यातून जग न पहावयाची रामभाऊंच्या गुरुजनानी त्याना सवय लावली असल्याकारणाने, दरमहा दिसणाऱ्या वेतनाच्या रुपयानी गुंग करून टाकण्यासारखे रामभाऊंचे मन मामुली राहिले नव्हते. १८९२ साली रामभाऊ यू. एस्. एफ्. होण्यापूर्वी केवळ चारच दिवस ताप येऊन वयाच्या ८५ व्या वर्षी सोमणांच्या घरातील जबाबदार वडील माणसाच्या म्हणजे आजोबांच्या मृत्युमुळे १८९३ हे साल रामभाऊंच्या जीवनात जसे स्थित्यंतराचे, तसेच लोकमान्यानी सुरू केलेल्या सार्वजनिक गणपत्युत्सवामुळे महाराष्ट्राच्या व भारताच्या जीवनक्रमात ही स्थित्यंतराचेच. फार काय शिकागोच्या सर्व–धर्म–परिषदेत हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून जाऊन “ हे विश्वचि माझे घर ” अशी शिकवण देणाऱ्या भारतीय संस्कृतीची जगाला ओळख करून देऊन जीवनाला–व त्याचेच एक व्यावहारिक अंग म्हणून राजकारणाला–आध्यात्मिक वळण आवश्यक आहे, असे स्वामी विवेकानंदानी पटवून दिल्याकारणाने जागतिक इतिहासातही १८९३ हे वर्ष स्थित्यंतराचेच. याच वर्षात दादाभाई नौरोजी ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद झाले व बाबू अरविंद घोष आणि कोल्हापूरचे बॅरिस्टर केशवराव देशपांडे भारतात परत आले. पहिले बाबूजी बडोद्यास प्राध्यापक झाले व दुसरे देशपांडे न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे इंदुप्रकाशचे संपादक झाले. १८९३ च्या इंदुप्रकाशचे रकान्यातून “ जुन्या जागी नवे दिवे ” ( न्यू लॅम्प्स् फॉर दि ओल्ड ) ही लेखमाला सुरू झाली. आणि अर्ज–आर्जवानी राष्ट्रीय जीवनाचा गाडा चालविणाऱ्या “ भल्या बुद्धिच्या

सागरानां " त्या लेखमालेमुळे धक्के बसले. " भारतीय सनदी नोकर " ( इंडियन सिव्हिल सर्वंट ) व्हावयास गेलेल्या अरविंद बाबूनी " घोड्यावर बसण्याच्या " परीक्षेत माघारपण का घेतले आणि या माघारीत भारताच्या सेवेच्या नव्या दीपकिरणांचा झोतच्या झोत कसा होता याची आठवणही इंदुप्रकाशच्या वाचकाना आनंदाचे रोमाँच उभी करणारी आहे. रामभाऊ सोमणांच्या वाचनात युगपालटाचे हे लेख–आलेख येत असता परिस्थितिशरणतेने काही केले–घडले, तरी व्हायला–करायला काय पाहिजे याच्या संवेदना त्यांच्या अंतःकरणाला व मेंदूला चैन पडू देत नव्हत्या, ज्या टांकसाळीतून वकील, न्यायमूर्ति, मंत्री, मुत्सद्दी, सेनापति, शास्ते, तत्त्वज्ञ, तक्ताधिपति यांची खणखणीत नाणी पाडता येतात, त्या शिक्षकीचे सौभाग्य रामभाऊंच्या पाचव्या वर्षापासून म्हणजे पुणे–न्यू इं. स्कूलच्या जन्मापासूनच महाराष्ट्र पहात होता. शाळेच्या आवारात मुलाना आणि वृत्तपत्रांच्या रकान्यातून पोरासह थोराना प्रभावी शिकवण कशी देता येते, हे टिळक–आगरकरानी विष्णुशास्त्री चिपळूणकरांची तालीम चालवून रामभाऊ सोमणांच्या विद्यार्जनाचे सुरुवातीसच महाराष्ट्राला पटवून दिले होते. त्या स्फूर्तीतूनच गोपाळ कृष्ण गोखले हे " भारतीय सनदी नोकर " व्हावयाचा राजमार्ग सोडून " भारत सेवक " होण्याच्या सात्विक इच्छेने डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सभासद झाले होते. " श्रीगणेशायनमः " पाटीवर गिरवायला लागल्यापासून भोवतालच्या वडीलधाऱ्यामधून चालणाऱ्या अशा विषयांची चर्चा रामभाऊ सोमणांच्या कानी पडत आल्याकारणाने त्याचा संकलित परिणाम, " जुन्या जागी नवे दिवे " ही लेखमाला डोळ्याखालून घालीत असता, रामभाऊंच्या मेंदूला विचारसंचालना दिल्याशिवाय कशी राहिली असेल ? त्याचवेळी दुसराही विचारौघ रामभाऊंच्या मेंदूचे महाबळेश्वरावर निर्माण होत होता. " आमच्या देशाची स्थिती " हा निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूण–करांच्या विचारप्रवर्तनातून आचारसंजीवन देणारा लेख शास्त्रीबुवा सरकारी नोकरीचे बंधन सोडून आल्यावर प्रसिद्ध शकले; डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या राजिनाम्यानंतर बाळ गंगाधर टिळक हे " मनासारखे लोकजागृतीचे कामास मोकळे झाले " तर " इष्ट असेल ते बोलणार व शक्य असेल ते करणार " असे बंधन स्वतःला घालून घेऊन आगरकराना रहावे लागत आहे; तेव्हा शिक्षकीची टांकसाळसुद्धा परिश्रमपूर्वक चालविली तरी परकीय सत्तेखाली आणि मूळ त्या शिक्षकीच्या स्वाभाविक मर्यादात राहून बेताचेच काम करून देणार. त्यापेक्षा कायद्याने चालणाऱ्या आणि शिस्तीचा सांभाळ करणाऱ्या इंग्रजांच्या राज्यात लोकजागृतिबरोबर लोकसेवा करून जुन्या जागी नवे दिवे लोकास दाखवावयास कायद्याच्या ज्ञानाचा भरपूर उपयोग होईल आणि वकील झालो तर आपल्याकडे होणाऱ्या लोकांच्या ये–जामधून लोकाशी आपला दाट संबंध येत जाईल. त्या संबंधातून माणसाची पारख होता होता स्नेहसंबंधाच्या साखळ्या बांधता येतील.

या साखळ्यांच्या बळकटपणावर नुसती लोकजागृतीच नव्हे, तर लोक-कृतीही उभारता येईल आणि त्याचबरोबर जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या अर्थार्जनाचा मार्ग खुला होऊन वकिलीमुळे अधिकारीवर्गाशी येणारे संबंधातून कारभारी धोरणाला वळवून अगर वळसा घालून लोककल्याण जमले तर जमले, अशा तऱ्हेच्या विचारांची खळबळही रामभाऊ सोमणांच्या मेंदूत [१८९३ साली] होऊ लागली. न्यायमूर्ति रानड्यांच्या अनुषंगाने ठिकठिकाणी काम करणाऱ्या मंडळीत, लोक व अधिकारी यांच्यावर कोणाच्या शब्दाचा प्रभाव परिणामकारक होत असला तर तो वकिलांचा होतो, असा त्यावेळचा ठिकठिकाणचा अनुभवही होता. त्यामुळे [(p-leader म्हणजेच public leader)] ह्या वस्तुस्थितीवर मन खिळून [रामभाऊ सोमणाना वकील व्हावेसे वाटू लागले] हे स्वाभाविकच होय.

तथापि संकल्प आणि सिद्धी यांच्यामध्ये सद्यःस्थिती व तिचे साक्षात्कार सज्ज असतात. [१८९५ साली सोमणांच्या आजी वारल्या, आणि लगेच ती. आप्पानी उर्फ सोमणांचे वडिलानी वर्गात ख्रिस्त्याची मुले बसवून घेतली पाहिजेत असा वडूथ येथील शाळेत हुकूम आल्याने अकाली पेन्शन घेऊन ( १७ रु. पगार, ८॥ ऐवजी ८ पेन्शन ) सेवानिवृत्त झाल्यामुळे वकील व्हावयाचे मनांत आले तरी धरलेली नोकरी सोडण्याची सोय नव्हती.] मुंबईसारख्या कायद्याच्या शिक्षणाची खास सोय असलेल्या शहरी जावे तर वकीलीचा वर्ग, त्याचा अभ्यास आणि नोकरीची वेळ नि मेहनत यांचा "सुरेख संगम" झाला तर ठीक; नाहीतर हातचे सोडता येते म्हणून सोडले, पळते पाठीमागे लागूनही पकडीच्या पलिकडे राहिलेच, असा प्रसंग यावयाचा ! म्हणून रामभाऊनी एक व्यावहारिक पर्याय काढला. वकील होऊन तरी पुढाकाराने लोकसेवाच करावयाची, तर त्या लोकसेवेची कास शिक्षकीच्या जोडीनेच धरावी आणि वकील होता येईल त्या दिवशी वकील होऊन आपल्या लोकसेवेच्या व्यावहारिक वळणाला अनुभवाचा उजाळा द्यावा असा तो पर्याय होता. साताऱ्यातील सामाजिक चळवळीचे पुढारीपण कविवर्य सर रवींद्रनाथ टागोर यांचे ज्येष्ठ बंधू व साताराचे पहिले हिंदी आय्. सी. एस्. डि. जज्ज ( १८९५-९६ ) सत्येंद्रनाथ टागोर, फ. क्ला. सब्‌जज्ज काशीनाथ बाळकृष्ण मराठे व मुन्सफ चिंतामण नारायण भट यांच्याकडे होते. टागोरांच्या प्रेरणेने प्रार्थना-समाज स्थापला गेला. ( याच्या उत्सवप्रसंगाने सर डॉ. भांडारकर यानी सेवानिवृत्तीनंतर आधुनिक कीर्तनाचा लाभ सातारकरास काकडेवाड्यात दिला होता. ) त्या उदाहरणानी रामभाऊ सोमणाना उमेद येत गेली. कारण [१८९३ व नंतर झालेल्या वाळवे-वाईच्या छोट्या कॉंग्रेसच्या यात्रा रामभाऊनी पायी पायी केल्या होत्या. १८९५ त आण्णासाहेब चिरमुल्यानी काढलेल्या वकीलीच्या वर्गात- लॉ क्लासात त्यानी नाव घातलेच होते. त्या वर्गातर्फे लोकमान्य टिळकांचे

स्वागत झाले त्यावेळी पहिले भाषण करून आपली पहिली चमक रामभाऊनी दाखविली; १८९६ त गणपती उत्सवाचा प्रौढ मेळा काढला; त्या मेळ्यात सोमणांचे क्रीडाप्रिय मित्र सामील असत. शुभ्र धोतर, अंगरखा, रुमाल व उपरणे अशा साध्या शुभ्र पोशाखाची ही तरुण मंडळी गाण्याच्या वेळी टिपरीचा ताल धरताना व शिस्तीच्या रांगानी रस्त्यावरून जाताना जनमनावर नवजीवनाचा ठसा उमटविल्याशिवाय रहात नसत. ज्या चिमणगावी सोमणांचा जन्म झाला त्या चिमणगावच्या गणपत्युत्सवात कुस्त्यांचे फड होत. त्याच्याच आवृत्त्या सोमणानी साताऱ्यास व मधून मधून दुसऱ्याही गावी काढल्या. कुस्त्याबरोबर दुसऱ्याही खेळांची जोड सोमणानी दिली. (न. चिं.) केळकर बंधु व शंकरराव कोल्हटकर सारख्याना निर्णायक (पंच) करून खेळाना व खेळाडूना शिस्तही सोमणानी लावली. १८९७ त लोकमान्य टिळकांच्या (२ऱ्या) कायदेमंडळ निवडणुकीसाठी रामभाऊनी मते मिळविली. त्याच साली लोकमान्यावर राजद्रोहाचा पहिला खटला झाला; पण पुढे दीडवर्षाऐवजी एकच वर्षाची शिक्षा भोगून ते सुटले. मुंबई सरकारने त्याना सहा महिने अगोदर सोडले म्हणून मुंबई सरकारचे आभार मानण्याचा ठराव दादासाहेब करंदीकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत झाला. त्याच सभेत टिळकांचेही अभिनंदन करण्याचा ठराव व्हावा अशी तरूण मंडळींची अपेक्षा होती. पण अध्यक्षानी सभाच बरखास्त केली. तेव्हा त्याच सभेला नव्या सभेचे रूप देण्यास सोमण पुढे झाले. "प्रेक्षक" चे संपादक व डॉ. कुशाभाऊ देशपांडे यांच्याशिवाय, जुने पुढारी गेले होते तरी श्री. बाळाजी नारायण या वृद्ध नागरीकांची योजना करून नवी सभा झाली. तुकाराम बाळाजी ठाकूर व श्री. त्र्यं. द्रवीड या वकीलांच्या भाषणानंतर टिळकांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वसंमत झाला. आणि १९०० साली (डिस्ट्रिक्ट प्लीडरच्या) जिल्हा—वकिलीच्या परीक्षेस रामभाऊ जसे जाऊन आले, तसेच साताऱ्यास भरलेल्या प्रांतिक परिषदेचे प्रेक्षक म्हणून आले असताही स्वयंस्फूर्तीने, फणसळकर व डॉ. भिडे यांच्या प्रोत्साहनाने, लोकमान्य टिळकांच्या गव्हर्नर अभिनंदन विरोधी ठरावाला मतेच मते रातोरात सोमणानी मिळविली. अशारीतीने लोकसेवेची आपली उमेदवारी सार्थ झाली, असे समाधान स्वताला होत असताच त्यावेळचे जिल्ह्याचे पुढारी रा. ब. पाठक आणि दादासाहेब करंदीकर यांचेही लक्ष रामभाऊ सोमणानी आकर्षून घेतले.

ता. १२ व १३ मे १९०० रोजी झालेल्या प्रांतिक परिषदेनंतर बरोबर दोन महिन्यानी तरूण उत्साही मने सातारा जिल्ह्यातील एका बंडाने वेधून घेतली. त्र्यंबक कृष्ण खरे हा ता. १३ जुलै रोजी वर्धनगडास हरी मल्हारी कुलकर्णी याजकडे जाऊन इंग्राजाविरुद्ध बंड उभारल्याचा दावा सांगू लागला. चाळीस हजार माणसांची आपली सेना पुरंदर व रायगडाजवळील एका किल्ल्यावर जमून बंडाचे निशाण

उभारणार असा निर्वाळा त्याने दिला. तूर्त बंदुकीची दारू आणण्यासाठी आपण निजाम हद्दीत माणसे रवाना केल्याचेही तो बोलत होता. पुण्याच्या मातबर पुढाऱ्यानी आपणास पाठिंबा दिला असून वर्धनगडाकडे आपणास पोलादी कांबीसारखी माणसे हवीत, असे त्याचे म्हणणे होते. अर्थात् सरकारने त्याबाबत शोध केला तसा रामभाऊ सोमणानीही आपल्या जन्मभूमीकडून म्हणजे चिमणगावच्या चौकस मंडळीमार्फत माहिती मिळविली. वर्धनगडच्या हरि मल्हारीला तर त्र्यंबक कृष्ण मूर्ख वाटलाच होता; पण ता. ३ जुलै रोजी परळीवर एका तरुणीवर हात टाकून तो पळाल्याचेही शोधानंतर उघडकीस आले. १८९९ त त्र्यंबकला भोर संस्थानात आर्म्स ॲक्टखाली व दरोडयास उत्तेजन देणारा म्हणून शिक्षा झाली होती, ती भोगून तो १९०० च्या मार्चमध्ये बाहेर पडला, व वरील पराक्रम करीत १५ जुलैस परत परळीस येऊन पुण्याचे मार्गे कुलाब्यात उतरला. ता. २८ जुलै रोजी त्यास पकडण्यात येऊन १०० रु. च्या जामीनावर तो मोकळा राहिला. हा शीलशून्य त्र्यंबक १८८१ तील कोल्हापूरच्या रामभटाची एक आवृत्ति ठरली व असल्या पांचट खुळापासून राष्ट्राची शक्ति क्षीण होण्याशिवाय काही होणे शक्य नाही, हा बोध घेऊन रामभाऊ सोमण आपल्या धोपट मार्गाला लागले.

# ५ अधिकारी झाला परमार्थासी

रामभाऊ (डिस्ट्रिक्ट प्लीडर) जिल्हा–वकील होऊ घातले. पण कायद्याचे पुस्तकी पांडित्य प्रत्यक्ष व्यवहाराच्या समजूतीनी उपयोगात आणताना, काही जुने वळण आणि अनुभव पहावेच लागतात. म्हणून शिक्षकीवरून वकीलीमध्ये प्रवेश करताना सांधेपालट बरोबर साधण्यासाठी सन १९०० च्या जानेवारीपासून इसलामपूर न्यायालयात रामभाऊनी 'उमेदवारीत' ही काही दिवस काढले. सातारा हायस्कूलमधील एकेकाळचे लोकप्रिय शिक्षक गोपाळ अनंत भट हे यावेळी इसलामपुरास मुन्सफ असत. पेन्शनीत जाण्याच्या बेतात आलेले, पण इसलामपूरास आपल्या रंगेलपणाने रमलेले हे न्यायमूर्ति आपले निवाडे दोन चार पानाइतकेच सुटसुटीत लिहीत त्यामुळे रामभाऊ सोमणाना पहिल्या महिन्याला चार तर दुसऱ्या महिन्याला अडीच रुपये लिखाई मिळाली! निवाडे लांबलचक लिहून उमेदवारांच्या पोटावर दया करावयाची विनंती करावयास गेलेल्या सोमणाना भटसाहेबानी मुंबई गॅझेटमधील बोअर युद्धाची वर्णने वाचावयास लावली व वकीलीच्या परीक्षेत सखोल अभ्यासामुळे नुसता उत्तीर्णच होशील असे नव्हे, तर यशस्वी वकील होशील असा आशिर्वाद दिला. रावसाहेबांच्या राष्ट्रीय वृत्तीबरोबरच सोमणाना प्रतोदचे संपादक रामभाऊ कशाळकरांच्या सहवासाचा लाभ झाला. राजद्रोहाबद्दल शिक्षा भोगून आलेले कशाळकर रामभाऊ सोमणाना देशभक्तीच्या व्यावहारिक सोहाळा सांगत. हा लाभ इतर उमेदवाराना नव्हता. उमेदवारी करणारीं मंडळी वकिलीच्या व्यावहारिक तंत्रात रुळली घोळलेली असतात. ती शाई हाताबोटाला लागली म्हणजे मनुष्यस्वभावातील कज्जेखोरीच्या रेषा उमगू लागतात. या दृष्टीने रामभाऊनी उमेदवारी आरंभिली हे ठीकच झाले. पण पुस्तकी परीक्षा पास झालेल्या रामभाऊनी वकिलीची पाटी लावून प्रतिष्ठितपणाने उठा–बसावयाचे सोडून आपल्यात बसून मांडी मोडावयास सुरुवात केली, ही गोष्ट रामभाऊंच्या विनयशील शिकावू वृत्तीची मानली जाण्याऐवजी समव्यवसायिकात एक "नसती पीडा" समजली गेली. ही समजूत रामभाऊंच्या सौजन्याने फार काळ टिकली नाही, हा भाग निराळा. रामभाऊ या उमेदवारीच्या ओघळीत वकिलीच्या व्यवसायाच्या व्यावहारिकपुस्त्या हस्तगत करण्यासाठी उतरले होते, ही गोष्ट खरी; तितकीच हीही गोष्ट खरीच की नुसती वकिलीची पाळी केवळ त्या प्रतिष्ठित रुबाबाच्या पायी आली, तर वेळ–काळ निभावून निघाला नसता, अशीच रामभाऊंची आर्थिक अवस्था होती. रामभाऊ आता चतुर्भुज झाले होते. कौतुकाच्या वडील–मातुश्री आपणास व आपल्या नूतन परिणित पत्नीस आशीर्वाद द्यावयास तत्पर असल्या तरी प्रपंचाचा भार आता सर्वस्वी आपणावर आहे, याची जाणीव रामभाऊना पक्की होती. वडिलांचे पेन्शन आणि किरकोळ औषधपाणी देण्याचा व्यवसाय

यांच्यावर वाढत्या प्रपंचाचा गाडा नीट चालणे अवघड होते. प्रापंचिक कर्तव्यांची ओढ एका बाजूने अशी असतानाच, लोकमान्यांच्या अनुयायित्वास साजेशी लोक-सेवा करण्याची संधी मिळावी म्हणून रामभाऊंच्या मनाची उचल चाललीच होती. या दोनही वृत्तींचा समन्वय साधण्यासाठीच इसलामपूराच्या उमेदवारीत शिकावयाचे ते शिकून झाल्यावर त्याकाळचे सातारा येथील लोकमान्य वकील दादासाहेब (रघुनाथ पांडुरंग) करंदीकर यांच्या हाताखाली मदतनीस वकील म्हणून काम पहावयास सातारा येथे १९०१ मध्ये रामभाऊ आले. त्यामुळे कोणाला खुपावयाचे म्हणून नाही, या कटाक्षाने वागणारे सोमण गेल्यामुळे एका सज्जनाच्या सहवासाला आणि त्या सज्जनत्वामुळे उमेदवारीला ही जी एक आदरक्षमतेची उंची आली होती, त्या उंचीला मुकल्याची हळहळ इसलामपूर न्यायमंदिरातील उमेद-वाराना वाटल्याशिवाय राहिली नाही. तरी पण रामभाऊ सोमणांच्या आयुष्यात दादासाहेब करंदीकरांच्या हाताखाली काम करण्याची संधी ही एक उन्नतीची पायरी होती आणि तिचा उपयोग सोमणानी मातबरपणे करूनही घेतला.

दादासाहेब करंदीकरांच्या हाताखाली सोमण तीस रुपये तनख्यावर वकि-लीचे वळण गिरवू लागले. दादासाहेबांच्या हाताखाली काम करणे हे येरागबाळाचे काम नसे. दादासाहेब आपल्या पोशाखापासून वकिलीच्या खाक्यापर्यंत टापटिपीचे व हिशोबी असत. बोलावयाच्या शब्दापासून ठसवावयाच्या मुद्यापर्यंत बारकावे आणि रेखीवपणा हा दादासाहेबांचा स्थायीभाव. हा ज्यांच्या लक्षात न भरे, त्याना दादासाहेबांच्या लकबीतील काव्यमय आभासाच्या पोकळीनी अगर लहर लागली तर प्रदर्शित होणाऱ्या पांडित्याने असे घसरावयास होई की स्वताची अवस्था उदासी अगर दिङ्मूढ असल्यासारखी वाटे. सोमणाना दादासाहेबांच्या ठेवणीतील या पथ्याचे कानेकोपरे सांभाळून एकनाथाच्या भक्तिभावाने वकिली-कौशल्य तर कमवावयाचे होतेच; पण दादासाहेब त्याकाळी करीत असलेल्या लोक-सेवेतून ते जे लोकनायक झाले होते त्यातील काही कौशल्य आपल्या अंगी मुरवता येते की नाही, हेही सोमणाना पहावयाचे होते. विविध कज्जांचे कागद दादासाहेब स्वत: वाचीत व त्यावरील टिपणांच्या युक्तायुक्ततेची चर्चा ते आपल्या लहान मोठ्या सहकाऱ्याशी मोकळेपणाने करीत, त्यामुळे मर्मग्राही नवशिक्यासही कायद्याचा सखोल अभ्यास करण्याची संधि मिळून त्यास धंद्यातील खाचाखोचा समजू व उमजू लागत. शिवाय दादासाहेबांचा खाजगी व सार्वजनिक पत्रव्यवहार मोठा असल्याने तो नजरेखालून घालण्याचा व त्याबाबत स्वताशी चर्चा करण्याचा आपल्या शिष्याना दादासाहेबांचा आग्रह असे. त्यासाठी त्यांचा सार्वजनिक पत्रव्यवहार न्याहाळावा आणि ते सांगतील तेव्हा तो जबाबदारीने करावा, असा उपक्रम दादा-साहेबांच्या येथे गेल्यावर लवकरच सोमणानी सुरू केला. आपला हा शिष्य

नुसताच सांगकाम्या नाही किंवा नुसताच पोटभरू नाही, हे दादासाहेबांच्याही नियंत्रक नजरेला आले.

गुरुशिष्यांची अशी गुणवती दृष्टभेट होणे आवश्यकच असते. सोमणांच्या आजोबापासून दादासाहेबांच्या घरी सोमण घराण्याची जा–ये असे; किंबहुना सोमणांच्या वडिलाना दादासाहेब आणि त्यांच्या घरची मंडळी बहोत मानीत. अशा स्थितीत घरोब्याचा तरुण जवळ केला आणि तो स्वतःच्या मुलालेकरांच्या निष्ठेने व नेकीने वागत गेला तरच आपल्या जवळकीचा गुण दरवळला, असे साहजिकच कोण्याही मनुष्याला वाटते. दादासाहेब तरी या मनुष्य–स्वभावाला अपवाद कसे असणार ? सोपविलेली कामे चिकाटीने करणारा आणि " राजी राखणे सकळ लोक । कठीण आहे ।। " हा अनुभव असता " राखावी बहुतांची अंतरे । " या अदबीने चालणारा आपला शिष्य पाहून १९०६ पासून काही प्राप्तीची कामे दादासाहेब सोमणांच्यावर स्वतंत्रपणे सोपवू लागले. तीस रुपयाच्या तनख्यावर आपल्या प्रपंचाची गुजराण करणाऱ्या सोमणाना या स्वतंत्र कामामुळे आत्मविश्वास येण्यास मदत झाली व आपले म्हणून वैशिष्टच दाखविण्यास सवड सापडली.

१९०५ साली काशी येथे ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेसने जिल्हा सभा स्थापावयाच्या ठरविल्याप्रमाणे सातारा जिल्हा सभा नियमितपणे भरविण्याची व त्यासाठी तालुकानिहाय पूर्वतयारी करण्याची जबाबदारी दादासाहेब करंदीकरानी " लोकसंग्रहमेवापि संपश्यन् " अशा आपल्या शिष्यावर म्हणजे रामभाऊ सोमणावर सोपविली. गुरुनी टाकलेली ही जबाबदारी शिष्याने जिव्हाळयाने सांभाळली. सुरवातीस साताऱ्यासच अधिवेशने झाली. दादासाहेब करंदीकर यांचे मार्गदर्शन, काळोपंत जोश्यांची व्यवस्था व टापटीप आणि सोमणांचा त्याग या जिल्हा सभेच्या रक्तवाहिन्या मानल्या जात. प्रतिनिधी–शुल्क नाममात्र एक रुपया असे. ती रक्कम जिल्हा सभेचे दप्तर सांभाळणाऱ्या ( लायब्ररेरिअन् ) काशीकर यास देणेत येई. चिटणीशी गणपतराव फणसळकर, नारायणराव आगाशे, डॉ. विष्णुपंत भिडे यांचेकडे आलटून पालटून बहुधा असे. वेळच पडली तर सोमण पडेल ती जबाबदारी घेत, पण पडद्यामागील सूत्रचालकत्त्व आणि निधिपालकत्त्व सोमणाकडे असे. सामान्यपणे जिल्ह्यातील रयतेची गाऱ्हाणी, शेतसारा–वसुली, रेल्वे प्रवासाच्या गैरसोई, जंगलासंबंधी खेडुतांच्या अडचणी, गोरक्षण, मद्यपान–निषेध, स्वदेशी वगैरे विषय जिल्हासभेत प्रामुख्याने चर्चिले जात. १९०७ च्या सुरत काँग्रेसनंतर जहाल–मवाळ (नेमस्त) पक्षाचा समेट हा विषय निर्माण झाला. सातारा जिल्हासभेने त्या बाबतीत दीर्घकाल चिकाटीने प्रयत्न केल्याने तिचे सर्वत्र कौतुक होऊ लागले. लोकमान्यांच्या शिक्षेनंतर रा. ब. ग. व्यं. जोशी यानी दोन तीन वर्षे नेतृत्व करावे अशी योजना सोमणानी केली व ती

अनेक स्नेही जिल्हासभेत भाग न घेण्याचा सल्ला देत असत तरी रा. ब. जोश्यानी मान्य करून आपले कर्तव्य पार पाडले. सातारा जिल्ह्यातील राष्ट्रीय वृत्तीच्या पण मतमतांतराच्या पक्षोपपक्षांचा समन्वय करून सोमणानी जिल्हासभा नियमितपणे भरविण्याचा उपक्रम असा बेतावेताने सुरू केला की जिल्हा सभेबद्दल सर्वांना आस्था व आपुलकी वाटावी. जिल्ह्यातील अडीअडचणीना वाचा फोडावी, स्थानिक अधिकाऱ्यांचा कारभार सुधारण्याला विधायक सूचना कराव्या, परकीय सरकारच्या धोरणात जुलूम–जबरदस्ती अथवा भारतीयांच्या स्वाभिमानाला, राष्ट्रीय परंपरेला अगर कर्तृत्वाला प्रतिबंधक काही आढळल्यास त्याचा निषेध करावा; राष्ट्रीय सभेच्या भारतीय धोरणास आपुलकीने पाठिंबा देऊन राष्ट्रीय सभेचे बळ आपल्या जिल्ह्यात कसे वाढते राहील या गोष्टीवर अचल लक्ष ठेवावे; या सर्वातून लोकांची प्रत्यक्ष सेवा करण्याचा जो कार्यक्रम निघेल, त्याला नवे उमेदीचे तरुण हेरून योजावेत, असा सातारा जिल्हासभेचा एकंदरीने उभार होता. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या तपात सोमणानी पाहिलेल्या " छोटचा काँग्रेसांचे" हे जिल्हाभरीचे रूप होते, असे कोणी म्हटल्यास त्यात काही वावगे नाही. तरीपण त्या छोटचा काँग्रेसांच्या जमान्यातील सातारचे एक कर्तृत्ववान पुढारी बळवंतराव सहस्रबुद्धे १९०५ साली कैलासवासी झाल्याने जिल्हासभेचे वळण घटलेल्या हातानी निघावयाचे, त्या योगाला खार आला होता. तरीही या जिल्हासभेच्या निमित्ताने जिल्ह्यातील निरनिराळ्या तंत्राच्या व मंत्राच्या कार्यकर्त्यांचे व विचारवंतांचे दोन दिवस संमेलन भरल्यासारखेही होई. पुढारी म्हणून गणले गेलेल्यांचे " कैसे बोलणे, कैसे चालणे । " हे नव्या होतकरू दमदार मंडळीना पहावयास–निरखावयास सापडे, तसेच नवीन उमेदीच्या मंडळीतील प्रवृत्तीचे, प्रकृतीचे आणि प्रकारांचे दर्शनही जुन्या अनुभविकाना घडे. त्यामुळे पिढ्यापिढ्यांचा समन्वय व परंपरा प्रवाही राहण्यास मदत होई. पक्षोपपक्षांच्या विचारवंतांचा व कार्यकर्त्यांचा मेळावा जिल्हासभेत होत असल्याकारणाने परस्पराबद्दल आदरभाव सांभाळून आपले मतभेद स्पष्टपणे मांडण्याची कोणाची तीव्रता कशीही कमीअधिक असली, तरी मूळ स्नेहाळूपणाला बाध न येण्याची काळजी कार्यैकदृष्टीने करण्यात येई. जिल्हासभेच्या या धोरणामुळे सातारा जिल्हा ही एक समेटभूमि आहे अशी प्रसिद्धि सातारा जिल्ह्याला राजकीय क्षेत्रांत दोन तपे मिळाली. सातारा जिल्हासभा प्रारंभापासून १९३५ पर्यंत सातत्याने वरील धोरण बिनचूक सांभाळून भरत राहिल्या, याला सोमणांची चिकाटी आणि व्रतवत्सल जागरूकता इतक्या प्रामुख्याने प्रोत्साहक होत्या की सोमण हे प्रारंभापासूनच त्या जिल्हासभेचे जीवन–सूत्रधार मानले जात. " राष्ट्रीयसभेच्या हेतूचा प्रसार करणे, राष्ट्रीय सभेला लागणारी माहिती गोळा करणे " म्हणजे राष्ट्रीय–सभा मुख्य मार्गदर्शक व मनाची समजून जिल्ह्यातील जीवनाचे प्रश्न जिव्हाळ्याने सोडविण्यावर जिल्हासभेचा भर असे.

अशा तऱ्हेने जिल्हासंघटनेचे एक प्रभावी साधन सोमणांच्या हाती जे दादासाहेबानी दिले होते, ते पाजळून चमकदार करावयास लागताच, सोमणाना लोकशिक्षणासाठी व लोकसमजुतीसाठी एका कणखर वृत्तीच्या पण समन्वयी समजदारीच्या वृत्तपत्राची आवश्यकता वाटू लागली. सातारा जिल्ह्यात वाईचे मोदवृत्त व वृत्तसार, खुद्द साताऱ्याची शुभसूचक, श्रीशाहू, महाराष्ट्रमित्र ही आणि कऱ्हाडचा विदूषक व विशेषतः इसलामपूरचा प्रतोद इत्यादि वृत्तपत्रे यापूर्वीच आपापली कारकीर्द गाजवून बसली नव्हती असे नाही. श्रीशाहू, शुभसूचक अशा काही वृत्तपत्रातून सोमणानी यापूर्वीच काही महत्त्वाचे लिखाण केलेही होते. पण "देशद्रोही तितुके कुत्ते । मारोनी घालावे पालथे ।।" अशा विचारसरणीपेक्षा "अज्ञाने आणि स्वार्थाने । लोकांचे चुकत जाणे ।। ध्यानी घेवोनी नीटपणे । मार्ग त्याते दावावा ।।१।। जे जे काही आपणासि ठावे । ते ते हळुहळू शिकवावे ।। शहाणे करोनि सोडावे । सकळ जन ।।२।।" या साठी सोमणाना एक स्वतंत्र वृत्तपत्र हवे होते. आपले गुरु दादासाहेब करंदीकर व त्यांचे सहकारी सहस्रबुद्धे यांचा एक "सहस्र–कर" छापखाना होताच. त्याचे वर्धमान स्वरूप म्हणून सोमणानी तो आपल्या ताब्यात घेऊन त्याला 'आनंद' केला. व आपले "प्रकाश" वृत्तपत्र १९०६ मध्ये सुरू केले. या उद्योगात सोमण एकटेच पुढे होते असे नव्हे, तर त्यांचे सहकारी व सहविचारी स्नेही त्यात होते हे खरे. तथापि आपल्या शिष्याच्या नव्या संकल्पास सढळ हाताने सहाय्य करण्यासाठी 'सहस्र–कर' छापखान्याचा सारा सरंजाम सोमणांच्या स्वाधीन बेताच्या मोबदल्याने केला गेला. प्रकाश पत्रासाठी स्वताचा छापखाना आणण्याचे योजून सोमणानी आपले वकील मित्र ब. रा. उर्फ काकाराव जोगळेकर (विटे) व गोविंद बापूजी श्रोत्री (सातारा) यास भागीदारी देऊन अडीच हजारांचा छापखाना पुण्याचे आनंदाश्रमाकडून आणविला, व पंचपाळे हौदाचे पूर्वेस म्युनिसिपल इमारतीत तो थाटला. (म्यु. शाळा क्र. १ काही दिवस तेथे होती. हल्ली कस्तुरबा–प्रसूतिगृह आहे.) जोगळेकराना वकीलीपेक्षा यंत्रकलेचा नाद असल्याने छापखान्याची व्यवस्था ते आस्थेने पहात; गोविंदराव श्रोत्री सार्वजनिक कामाचे, लेखनाचे, व लोकमान्यांचे छंदी असल्याने ते वृत्तपत्राचे व्याप उरकीत. सोमणानी त्या दोघांच्या सहाय्याने, प्रकाशपत्र प्रारंभी जोमाने चालविले. पुढे पुढे सोमणावरच जबाबदारी पडल्यावर, स्वताला दृष्टिमांद्य आल्यामुळे नाना भाटे व अष्टेकर यास लेखक म्हणून मदतनीस घेऊन आर्थिक आघाडी सोमणाना खंबीर ठेवावी लागली. इतकेच नव्हे तर विनायकराव नाफड यांचे लघुलिपीचा उपयोग करून पुष्कळ लेख लिहावे लागले.

एकोणिसावे शतकाचे शेवटच्या पंचविशीत पांडोबा भोसल्यांचे महाराष्ट्रवृत्त निघे ते ज्योतिराव फुल्यांच्या पठडीतील असे. १८९७ चे प्लेगनंतर मारुतीराव गुजर यानी मित्रोदय काढला होता पण त्यांच्या मृत्यूबरोबरच तो संपला. भाऊराव

कारेकर यांचा छत्रपतीही छापखान्याचे अभावी बंद पडला. प्रकाशचेच काय पण रामभाऊंच्याही जन्मापूर्वी दोन दशके रामभाऊ चितळ्यांचे "शुभसूचक पत्र" शिळेवर पण नियमित निघत असे. महाराष्ट्र–मित्र व बोधसुधाकर ही दोन साप्ताहिके सोमणांच्या बरोबर जन्माला आलेली. ती टाइपावर निघावयाची आणि त्या काळच्या सर्वच प्रतिष्ठित साप्ताहिकाप्रमाणे आपले काही रकाने इंग्रजीने भरावयाची! महाराष्ट्रमित्राचे संपादक गणपतराव कोल्हटकर १८९६ साली व त्यांचे जेष्ठ पुत्र माधवराव १८९७–९८ साली निधन पावल्याने महाराष्ट्र–मित्राचे वारे "अहा! ते लोपले सारे!!". बोधसुधाकराचे चालक वामनराव दीक्षीत हे भलते उद्योगी! त्यानी व १८८५ त निघालेल्या "वृत्तसुधा" कारानी छापखाना चालवून घरे केली, असा तो काळ होता. परतभेटीची पत्रे वाचावयास धडपडणारांची वाचनमंदिरेच या वृत्तपत्रांच्या कचेऱ्या असत. त्यातूनच हौशी लेखकाना संधि मिळून संपादकाचेही पुष्कळ श्रम वाचत. तरीसुद्धा प्लेगने खटावकर बंधु परलोकवासी झालेवर वृत्तसुधा बंद पडलीच! तेव्हा वामनराव दीक्षितांच्या प्रोत्साहनाने वामनराव ढवळचानी १८९९ साली श्रीशाहू काढला. त्याचा पहिला अग्रलेखच रामभाऊ सोमण मास्तराकडूनच त्यानी लिहून घेतला होता. रा. ब. द. ब. पारसनीस यांचे मासिक 'महाराष्ट्र कोकिळ' काही दिवस गाजले होते. पण ते तोटयात येऊन बंद पडल्यावर १८९४ ते १८९६ दरम्यान कॉंग्रेसच्या प्रचारासाठी दादासाहेब करंदीकरानी पारसनीस यास हाताशी धरून राष्ट्रसभा–समाचार नावाचे द्वैमासिक सातारा- सोलापूर- स्टँडीग- कॉंग्रेस–कमेटयांच्या छत्राखाली सुरू केले होते. वर्गणीदारांच्या अनास्थेमुळे ते बंद करावे लागले. तीच गत पारसनीसांच्या इतिहास–संग्रह या नियतकालिकाची झाली होती. पारसनीस यांच्या कार्याच्या उठावणीसाठीच मुख्यतः करंदीकर व बळवंतराव सहस्रबुद्धे यांच्या समाईकीने "सहस्रकर" छापखाना (१८९७–९९) उभारलेला होता. पण नित्याचे काम म्हणून वृत्तपत्र काढण्याची कल्पना पुढे आली असताही इंग्रजीचे बाके लेखक करंदीकर मराठी लिहिण्याचे मनात आणीनात. तरीही १८९७ च्या दडपशाहीने प्रेक्षक जन्मास आल्यावर दादासाहेबानी त्याच्या पडत्या काळात दोन महिने संपादकी केली होती. सदर प्रेक्षक गणपतराव फणसळकरानी आर्थिक व राजकीय आच लागत असताही १९०५ पर्यंत हिमतीने चालविला. पुढे सोमणानीही १९०५ मध्ये न्यू इं. स्कूलमधील एक शिक्षक गोविंदराव दीक्षित यांच्या सहाय्याने वर्षभर प्रेक्षक चालवून कमालीच्या काटकसरीमुळे १७५ रु. वर्षाचा मोबदला दीक्षित व त्यांचे सहकारी याना संपादकी सांभाळण्याबद्दल दिला. त्यामुळेच की काय शाळा खात्याकडे चहाड्या झाल्या आणि दीक्षिताना संपादकीय संबंधातून मुक्त व्हावे लागले. प्रेक्षकासंबंधी गणपतराव फणसळकरानी काही योजना पूर्वी आखल्या होत्या, त्यातून प्रेक्षकास ताज्या झालेल्या किफायतीच्या

लोभाने काही कायदेशीर कटकटी निर्माण होऊ लागल्या, त्यावर मात करण्यासाठी प्रेक्षकाच्या प्रकाशनाचे दिवशीच "प्रकाश" सोमणानी काढला व प्रेक्षकाचा विराम झाला. प्रेक्षकाची जागा भरून काढतांना त्याचा बाणेदारपणा व लोकसंग्रहात्मक लोकशिक्षण ही सोमणाना सांभाळावयाची ध्येये होती व ती त्यानी निष्ठेने सांभाळलीही.

१९०७ पासून १९२४ पर्यंतचा काळ लक्ष्यात घेतला तर तो जसा स्वराज्याच्या राष्ट्रीय चळवळीच्या दृष्टीने चढत्या वाढत्या जोमाचा होता, तसाच परकीय सत्तेच्या वक्रदृष्टीचे संक्रांतीचाही होता. सोमणांचे सातारा हायस्कूलातील स्नेही औंधचे श्रीमंत नानासाहेब पंतप्रतिनिधी यांची कारकीर्द औंधच्या प्रजेस समाधानकारक झाली नाहीच; पण औंधचे सरकारनियुक्त कारभारी जेकब बापूजी इस्त्राईल यांचा पिऱ्या मांगाकडून खून करविण्याचा कट केल्याबद्दल त्याना गादीला मुकावे लागले. त्याबाबत सी. ए. किंकेड व लोगन यांच्या चौकशी कमिशनचे काम सातारा रेसिडेंसीतील दरबार हॉलमध्ये व पुढे महाबळेश्वरी चालू असता फिर्यादीतर्फे रावसाहेब काळे व जहागीरदारातर्फे बॅ. ब्रॅन्सन, दाजी आबाजी खरे व दादासाहेब करंदीकर काम चालवित असता प्रकाशने दैनिक आवृत्त्या काढून ती हकीगत जनतेस पुरवली आणि बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे नानासाहेब प्रतिनिधींचे "राघो भरारी" काका कसे आहेत, हे लोकास कळविले; त्यामुळे प्रकाश व सोमण सरकारच्या व पुढे बाळासाहेबांच्या इतराजीस पात्र ठरले. त्यातून सोमण हे लोकमान्य टिळकांच्या राजकीय चतुःसूत्रीचे उपासक आणि राष्ट्रीय सभेचे आयुष्यभरीचे निष्ठावंत अनुयायी असल्याकारणाने समन्वयी सोमणांच्या प्रकाशवर परकीय सत्तेची करडी नजर राहिली असेल, हे न सांगताही समजण्यासारखे आहे. त्यातून लोकमान्यांच्या ५१ व्या वाढदिवसानिमित्ताने कृष्णाजी आबाजी गुरुजीनी त्यांचे चरित्र प्रसिद्ध केले; तेवढे सोमणांच्या हातून झाले नाही तरी, साताऱ्यास घाटे थिएटरात लोकमान्यांच्या अभिनंदनाची प्रचंड जाहीर सभा सोमणानीच भरवली– भले, त्या सभेत ना. कृ. आगाशे व गणपतराव फणसळकर यांचीच तेवढी भाषणे झालेली असोत! केसरीत सोमणांचाच उल्लेख 'संघटक' म्हणून आला होता, या गोष्टी राज्यकर्त्या सरकारच्या नजरेतून सुटल्या नव्हत्या! शिवाय, सोमणांच्याच मुख्यतः चळवळीने (पोवारांच्या) निगडीपासून साताऱ्यासारख्या राजधानीच्या शहरापर्यंत आणि खेडेगावातील जत्रायात्रातून आणि कुस्त्यांच्या फडातून सोमण व त्यांचे सहकारी स्वदेशीचा अखंड प्रचार करीत आणि कुस्त्यांच्या फडावर, जोडी–मल्लखांब करणारास आणि दगडी गुण्ड उचलणारास चढाओढी लावून उत्तेजन देत, या गोष्टीही सरकारच्या डोळ्यावर काय येत नव्हत्या? आणि तरीही सोमणाना एकदम घेरणे अवघड होते. सहकारी पद्धतीने काढलेल्या स्वदेशी कापडाच्या दुकानावर विक्रेते म्हणून सोमण दिवसाकाठी

दोन तास काम करीत, हेही सरकारच्या कानी कसे गेले नसेल ? रेशमी हात-मोजाखालील पोलादी मुठीचे मुत्सद्दी म्हणून नामदार गोखल्यांची त्या प्रकाशच्या प्रारंभ काळात प्रसिद्धि होती. सोमण हे विष्णुशास्त्री चिपळूणकरानी निर्माण केलेल्या राष्ट्रीय परंपरेतील कणखरपणाला बळकट असले तरी गोखल्यांच्या "मऊ मेणाहूनी आम्ही देशदास । कठीण वज्रास भेदू ऐस ॥" या वृत्तीतील मोडमांडणीचा परिणाम पंतोजीचे चिरंजीव असलेल्या व दादासाहेब करंदीकरांच्या शिस्तशीर तालमीत काम करणाऱ्या सोमणांच्या लेखणी-वाणीवर झाल्याशिवाय राहिला नव्हता. आणि तरीही "माझिनी" च्या चरित्राचे परीक्षणात्मक लेखाबद्दल सोमणांच्यावर खटला करण्यास आणि "प्रकाश" ला सरकारमान्य संस्थात वाचला न जाण्यास प्रेस अॅक्टखाली सरकारने कमी केले नाही. माझिनीचे विनायकराव सावरकरानी जे चरित्र लिहिले त्याचे परीक्षण इसलामपूरचे श्री. विष्णुपंत (पुढे इसलामपूरास 'भारतमाता' वृत्तपत्र काढणारे) आठल्ये यानी 'प्रेषित' या सदरात केले होते. औंध खटल्यातील (आताचे डॉक्टर) आठल्ये यांचे नाव सोमणानी घ्यावे अगर मूळ लेखकाचे नाव सोमणानी सांगावे हे सरकारला हवे होते. असे नाव देणे संपादकीय सांप्रदायाला बट्टा आणणारे असल्याकारणाने, तो विचार सोमणांच्या मनाला शिवलाही नाही. फार काय, तो लेख असंपादकीय आहे, अशी एक ओझरती पळवाट काढण्याचा सल्ला काटेकोर कायदेबाजानी गुन्ह्याचे स्वरूप सौम्य होण्याच्या दृष्टीने दिला असताही, सोमणानी ते काहीच न मानता, त्या लेखाच्या कानामात्रासुद्धा सर्व मांडणीची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आणि जाहीर संपादक म्हणून आपले नाव असता वृत्रपत्रात प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्याच्या लेखाबद्दल देखील होईल तो सरकारी रोष आपण आनंदाने पत्करलाच पाहिजे, हा जो संपादन-क्षेत्रात लोकमान्यानी धडा घालून दिला होता तो त्यांच्या अनुयायास शोभेशा धीमेपणाने सोमणानीही छानदार गिरविला. माझिनीच्या परीक्षणाचा अंक औंध बॉम्ब केसमध्ये सरकारी वकीलानी गुदरला होता. कारण लो. टिळकांची व त्यांच्या पक्षाची वृत्तपत्रे वैयक्तिक घातपाताला आणि ब्रिटिश सरकार उलथून पाडण्याच्या कटाला भावना-प्रक्षुब्धतेचा व सूचक मार्गाचा पुरवठा करितात, असा सरकारने आपला पक्का समज करून घेतला होता. माझिनीच्या परीक्षणात्मक लेखाचा संबंध औंध बॉम्ब केस व त्या केसमधील आरोपी चालवित असलेली अभिनव भारतसंस्था यांच्याशी जोडण्याचा सी. आय्. डी. इन्स्पेक्टर छबी यानी आपल्या जबानीत प्रयत्न केला. त्यामुळे सोमणांची साक्ष त्याही खटल्यात काढून लेखन प्रसिद्धीच्या सगळ्या जबाबदारीचा खुंटा हलवून बळकट करण्यात आला होता. या सर्व वावटळांचा संकलित परिणाम सोमणांच्या वकिलीची सनद रद्द करण्याच्या शिफारशी होण्यापर्यंत झाला. ज्या डि. जज्ज पर्सीव्हलनी तशी शिफारस केली, तेच पुढे मुंबई सरकारचे कायदे

सल्लागार झाल्यावर सदर प्रकरणाचा अंतिम निर्णय लागण्याचा योग आल्याकारणाने दरम्यानच्या काळात झालेल्या सोमणांच्या साधुवृत्तीच्या परिचयाचा परिणाम म्हणून आणि नाही म्हटले तरी दादासाहेबानी काही खटपटी केल्या म्हणून–झाल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यावर सोमणांचा वृत्तिच्छेद झाला नाही. नाहीतर अधु झालेल्या डोळयाच्यामुळे वकिली सोडून स्वदेशी दुकानात विक्रेता म्हणून पोट भरण्याचा विचार सोमणानी आखला होताच. दादासाहेबामार्फत मिळालेल्या निरोपाप्रमाणें पर्सीव्हल साहेबांच्या वैयक्तिक इज्जतीचा सांभाळ करून सोमणानी 'प्रेषिताच्या लेखात अत्याचाराला उत्तेजन मिळण्याचा संभव असल्याचा संशय येण्याइतका अवसर राहिल्याबद्दल दिलगिरी व्यक्तवून 'स्वार्थ परार्थ'चा मेळ घालण्याचा मध्यमपणा पत्करला. सरकार व सोमण या दोघांच्या वृत्तीसंबंधाने 'प्रकाश'ची चौकट अशी साफ सांगितल्यावर, सरकारी जाहिराती वगैरे प्रकाशकडे ढुंकुनही वळत नसतील, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे, अशास्थितीत प्रकाशचा आर्थिक संसार सांभाळण्यासावरण्याकरता, वर्गणीदारांचे सक्रिय आशिर्वाद व वाढत्या वाचकांचे गुणग्रहण यांचे समाधान मानीत मानीत, सोमणाना स्वताच्या प्राप्तीतून दर महिन्याला घस सोसावी लागत होती. तशी घस सोशित सोशित १९२५ पर्यंत प्रकाशची धुरा गोविंदरावजी श्रोत्री प्रभृतींच्या सहाय्याने सोमणानी चालविली व त्यासाली प्रकाश बाबूरावजी भिडयासारख्या तडफेच्या तरुणाचे स्वाधीन केला.

सार्वजनिक कामासाठी घस सोसण्यासारखी आपल्या पैशातून गैदास सोमणाना १९०८ पासून हळूहळू होऊ लागली होती. त्यावर्षी लोकमान्य टिळकांच्या अपीलासाठी दादासाहेब करंदीकर विलायतेस गेल्यावर जसे धंद्याने तसे नेतेपणानेही सोमण स्वतंत्र संसार करू लागले. वकिलीच्या धंद्यातील व सार्वजनिक कामातील मार्गदर्शक जसा लोकमान्यांच्या अपीलासाठीं म्हणून दूर झाला, तसाच ज्याने बोटाला धरून लहानपणी चालविले आणि पुढे सतत आशीर्वादाचे व आदर्श चारित्र्याचे छत्र धरले तो सोमणांचा जन्मदाता गणेशपंत सोमण हा पुरुषही काळपुळीने परमेश्वराचे बोलावणे आल्यामुळे इहलोक सोडून गेला. सर्वच बाजूनी एकाकी झालेल्या सोमणाना परिस्थितीला तोंड देत देत आपल्या गुरुजीना व पिताजीना कमीपणा न येईल असा मार्ग काढावयाचा होता आणि जमल्यास त्या उभयता वडीलधाऱ्यांचा लौकिक वाढवावयाचा होता. सरकारची यावेळची दृष्टी सर्व भारतभर उग्रमंगल होऊ लागली होती. त्यावेळचे गव्हर्नर जनरल यानीच सांगितले आहे की "We have a party small in numbers, but of considerable influence and inspired by convictions strongly and even fanatically held, who are opposed to the circumstance of British rule. The party may be divided into two classes.

The first consists of those who desire autonomy but seek to obtain it by passive resistance and the continual sapping of the foundations of loyalty by means of attacks in the press, on the platform and on more private occassions. They do not ordinarily advocate a resort to violence though many of them secretly sympathise with courage and assassination and all alike care to be unwilling to assist in the suppression of political crime.

The second comprises those who advocate and paradise methods of terrorism, directed against servants European and Indian- against all persons assisting justice with information, evidence etc. --Youths they are bounded together in societies (in Bengal, Bombay, C. P., Berar, Punjab, Native States, U. P., Madras, Burma N. W. P.) with no central body to control." अशा सरकारी दृष्टीमुळे १९०९ हे साल तर साताऱ्याच्या इतिहासात संस्मरणीय झाले आहे. लोकमान्य टिळकाना मंडालेला पाठविल्यावर त्यांचे बालेकिल्ले म्हणून नाशिक व सातारा या जिल्ह्याच्या पाठीमागे सरकार महाराष्ट्रात तरी हेतुपुरस्कर लागलेले दिसते. सरदार गणपतराव पानसे सारख्या सद्‌गृहस्थानी सर्व दर्जाच्या लोकानी एकत्र जमण्यासाठी काढलेला "युनिअन क्लब" तेथे सर्व भेदभाव विसरून लोक येऊन खेळत, विचारविनिमय करीत, व्याख्यानेही करवीत. "नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनं।" ही कालिदासोक्ति जरा बदलून "यू क्लब्" भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्। अशी कीर्ति त्या संस्थेची होती. तेथे विभूतिपूजाच नव्हती; मग कोणा महाशयाच्या तसबिरी कशाला असतील? नाही म्हणावयास संस्थापक पानसे यांची एक तसबीर तेथे होती. आणि ?—१८९७ साली केसरीवरील खटल्यात टिळकाना दीड वर्षाची शिक्षा झाल्यावर ॲडव्होकेट ऑफ इंडियाच्या (मुंबई) अंकात आलेला एक फोटो एका सागवानी चौकटीत बसवून बळवंतराव सहस्रबुद्धे यानी सहज लटकविला होता. तसे झाल्यापासून बारा वर्षात कोणाच्या माथ्याला तिडीक उठली नव्हती, ती १९०९ साली सरकारी अधिकाऱ्याच्या डोक्याला उठली. ते चित्र हलविण्याबद्दल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचे फर्मान आले. सरकारी अधिकाऱ्याना युनिअन क्लबात बंदी होईल, एवढेच नव्हे तर क्लबालाही टाळा बसेल असे वातावरण निर्माण झाले. क्लबच्या सभासदांचे मत घेता बॅलटबॉक्सने सरकारी धोरणाच्या सपशेल विरुद्ध निकाल दिला. तेव्हा त्याचा परिस्फोट होताच, क्लबचे मरण चुकणार नाही, व व्यक्तिशः सभासदानाही त्रास होईल, हे जाणून त्या निकालाची वाच्यता झाली नाही. लोकमताचा हा दिलासा पटल्यावर बळवंतराव सहस्रबुद्धचांचे चिरंजीवानी आपण होऊनच टिळकांच्या त्या फोटोची मागणी केली. आण्णासाहेब हे सोमणांचे

बालमित्र असल्याकारणाने त्यानी आण्णासाहेबांच्या मागणीस नकार मिळू नये म्हणून वजन खर्च केलेच. १८४४ ते १८६२ व विशेषतः १८५९ साली शस्त्र-जप्तीचे हुकूम सुटले असता, ज्यानी आपल्या पूर्वजाना इतिहासात स्थान दिले, त्या शस्त्रास्त्राना परकीयांच्या स्वाधीन करण्यापेक्षा घरातील भिंतीत माचून टाकणाऱ्या आणि दसऱ्या दिवशी त्यांची दरसाल उजळून पूजा करणाऱ्या बापजाद्यांचा आठव त्या टिळकांच्या फोटोस घरी न्यावयाच्या वृत्तीस प्रेरक होता. अशुभ काळ येताच "कूर्म गुरु" करण्याचाच तो काळ होता. शमीच्या झाडावर शस्त्रास्त्रे ठेवून धर्म-राजानी अज्ञातवास पत्करला तरी, भीमाच्या स्वाभिमानपूर्वक सत्त्वसंरक्षणाचा भाव जसा उफाळून येत असे, तसा फोटोप्रकरणी गोविंदराव श्रोत्री प्रभृतींचा सात्त्विक भाव उफाळून येत राहिलाच. फोटो बरोबरच त्यांचा पाय युनियन क्लबमधून निघाला तो १९१६–१७ साली स्वतः टिळकाना युनियन क्लबात पानसुपारी झाली तरी त्या वेळीही श्रोत्रींचा पाय युनियन क्लबच्या प्रवेशद्वाराच्या बाहेरच थबकला.

सार्वजनिक संस्थावरील दडपशाहीच्या वरवंट्याखालून मंडळी लोण्यातील पावट्यासारखी निसटताहेत, ती सोमणांच्यामुळे हे सरकारने आता हेरले होते. त्यामुळे सरकारच्या दृष्टीने आक्षेपार्ह असलेल्या मंडळींचीही वर्दळ सोमणांच्याकडे असल्यामुळे, सरकारी झडपा सोमणानाही सोसाव्या लागल्या. १९१० साली सोम-णांच्या छापखान्याची व घराचीही झडती झाली. सदर झडती प्रहर रात्र होऊनही संपेना म्हणून दादासाहेब करंदीकरानी पोलीसाकरवी सीले करवून त्यांचा व आपल्या नोकरांचा पहारा बसविला. आणि सोमण कुटुंबियास आपले घरी वस्तीस नेले. त्याच सुमारास वाईस व कऱ्हाडास झालेल्या तात्या नित्सुरे व बाबुराव अंगापूरकर यांच्या झडतीत छत्रपति शिवाजीची व क्रांतिकारक बंगाली तरुणाची तसबीर असे काही सापडून पोलिसानी ते जप्तही केले होते. सोमणांच्याकडे तसे काही घबाड हाती लागेल अशी पोलिसानी खूणगाठ मनाशी बांधली होती. पण त्याना त्याबाबत हात चोळीतच आपले चाळे बंद करण्याची पाळी आली.

खुद्द सोमणच नव्हेत, तर सातारा शहरातील स्वदेशी चळवळ चालविणारे गणपतराव फणसळकर–प्रभृति मंडळी 'स्वजनहितैषी' नाटक कंपनी काढून तिच्या नाटकाचे द्वारा इंग्रजी राजवटीबद्दल विद्वेष पसरवितात; अच्युतराव कोल्हटकरांचे 'स्वर्गसोपान' आणि कृष्णाजी आबाजी गुरुजींचे "राष्ट्रीय संक्रांत" ही नाटके वस्तुतः इंग्रजी राज्याबद्दल द्वेष पसरविणारी नसली तरी तिटकारा निर्माण कर-णारी आहेत; पण कायद्याच्या चौकटीत घालून त्या नाटकांचा बळी घेता येत नाही; तेव्हा ज्या सवाई माधवरावांच्या दरबारात मॅलटसाहेब खुरमांडी घालून बसला आहे, त्या दरबारचे चित्र आणि साहेब सत्तारूढ होताच आपली रिक्षा हिंदी हमालाकडून ओढवतो, हे दृश्य दाखविणारे एका कोपऱ्यातील चित्र नाटक कंपनीच्या

दर्शनी पड्यावर आहे, तो पडदाच सातारच्या डि. मॅ. ती आक्षिप्त ठरवून जप्त केला. फणसळकरानी आपल्या विधुरावस्थेत घरोबा केलेल्या अम्बू (कलावंतीण) मसूरकरला पुढे करून "सातारकर स्त्री संगीत मंडळी" या नावाने "स्वजनहितैषी" ची सुधारलेली नवी आवृत्ति पाच पाच हजारांच्या कर्जाची तोषीस लावूनही चालविली. हे सरकारचे माथे भडकविण्यास आणखी कारण झाले. तेव्हा कोल्हापुरच्या पोलीस अधिकाऱ्यानाच सातारच्या म्हणजे महाराष्ट्राच्या जुन्या राजधानीच्या स्वास्थ्याची अधिक काळजी लागली! पूर्वी रेव्हेन्यू खात्यात काम करून सहकारी खात्यात आलेले मि. कॅम्बेल हे सातारचे माहितगार म्हणून वरचेवर कामानिमित्त येरझारा घालू लागले. किकली ता. जावली येथील त्यांचा हस्तक भाऊराव बाबर आणि कोल्हापूरचे पोलीस अधिकारी फर्नांडीस यांचा हातमेळ झाला. "पोलिटिकल हेरगिरी" करण्याबद्दल दौड करावयास भाऊराव बाबराना एक घोडा मिळाला. या घोडदौडीतून बाबरानी चार भोळी माणसे पुढे करून, फणसळकर वकीलाना एक वकीलपत्र द्यावयाचे निमित्ताने अंबू मसूरकरच्या घरी १९०९ मध्ये त्यांचा प्रवेश साधला. भाकरीचे गाठोडे म्हणून तिच्या घरातील एका खुंटीला "पक्क्या सुतळीने बांधलेल्या दोन करवंटचाचे" गाठोडे अडकविले. दोन दिवस झाले तरी ती भोळी माणसे फिरकली नाहीत, तेव्हा प्रसंगावधान राखून फणसळकरानी व बाईनी सिटी सब्–इन्स्पेक्टर देशमुख व सिनीअर सब्–इन्स्पेक्टर उस्मान नथू यास वर्दी देऊन डे. पो. सु. अब्दुल रसीदखान यांचेदेखत पंचनामा करविला. अठ्ठेचाळीस तासांचे आत फणसळकरावरील व सातारा शहरावरील या गोत्याची बातमी लाहोरपासून मद्रासपर्यंत सर्व इंग्रजी व हिंदी दैनिकात प्रगट झाली. सातारचे फणसळकर–सोमण प्रभृति तरुण पुढारी आपले विद्यार्थी असून ते अत्याचारप्रवर्तक नाहीत असा निर्वाळा रा. ब. पाठक मास्तर देत, याची दखल अबदुल रसीदखान यानी घेऊन, त्यानी भाऊराव बाबराचे ते भोळसर चारही संवगडी ता. ८।१२।१९०९ रोजी धरले, व खटला भरला. त्या खटल्याच्या पुराव्यातच देशभक्ताना जन्मातून उठविणाऱ्या वर सांगितलेल्या कारवाया उघड झाल्या. चारपैकी तीन आरोपीना रीतसर व्हावयाच्या त्या शिक्षा झाल्या व एक निर्दोषी सुटला. त्या शिक्षा होण्यात राष्ट्रीयवृत्ति–मारकांचा पराभव होता. 'A false bomb case was got up to injure a pleader named Phansalkar' असाच शेरा सातारा सी. आय्. डी. ने या कारस्थानाचे विरुद्ध मारल्याचे प्रसिद्ध आहे. अंबू मसूरकरणीपासून सातारच्या सर्व थरातील लोक अत्याचाराचे सहाय्यक आहेत असे सिद्ध करून साताऱ्यात दडपशाहीचा वरवंटा फिरत रहावा, या मनोवृत्तीला यश आले असते, तर शिवाजीउत्सव, जिल्हासभा वगैरेंच्याद्वारा राष्ट्रीय वृत्तीचा व चळवळीचा जो नंदादीप साताऱ्यात तेवत ठेवता आला, तो आला असता की नाही, याची शंकाच आहे. त्या आपत्तीतून सातारा

सुटावा यासाठी आपले सल्लामसलतीने चालणाऱ्या तरुण वकिलापैकी अबदुल मजीदखान याचेवर असलेल्या आपल्या नैतिक वजनाचा सोमणानी फणसळकराना उपयोग होऊ दिला ही गोष्ट काही खोटी नाही. अबदुल रशीदखान याची बदली झाली त्यावेळी त्याच्या पानसुपारीचे निमित्ताने गणपतरावजी फणसळकर यानी रशीदखानाची कर्तव्यदक्षता व न्यायनिष्ठुरता यांची स्तुति केली. ती खानसाहेबाना बाधक होऊ नये आणि कृतज्ञता व्यक्त करावयाची असली तरी खानसाहेबही या देशाचे असल्याकारणाने देशभक्तीवर अकारण गंडांतरे कोणी आकसाने आणू नयेत हे पाहणे त्यांचे कर्तव्यच असल्याकारणाने आणि प्रतोदवरील १९०९ चे खटल्यात सुटकेची आशा दाखवून इसलामपूरचे वासुदेव दामोदर मुंडल्यांचेकडून गुन्हा कबूल करावयास लावण्यासाठी फणसळकर याना रशीदखानानीच भुरळ पाडली असल्याकारणाने सोमणानी फणसळकरांची हजेरी घेतली, ही गोष्टही अनेकांच्या स्मरणात अनेक दिवस राहणारी आहे.

अशा स्थितीत कोणत्याही सामान्य माणसाला गोंधळावयासच झाले असते ! पण परिस्थिती जेवढी तुटून पडणारी, तेवढा त्वेष त्या परिस्थितीवर तुटून पडण्यात यावा. 'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्।" या गीतेच्या शिकवणीस आपल्या आचरणशुद्धतेत महत्त्वाचे स्थान देणाऱ्या लोकमान्यांच्या परंपरेचा तो विशेष होता. आपल्याला तो साधल्याचे सोमणानी १९१४ पर्यंतच्या काळात घरच्या, दारच्या व जिल्ह्याच्या लोकांचे प्रत्ययास आणून दिले. सोमणांचा गोडवा, नेटकेपणा, वकिलीच्या धंद्यात व अनुषंगाने कुटुंबाच्या प्रपंचात जसा प्रत्ययाला येऊ लागला तसाच सार्वजनिक कामांत व लोकाना अचूक मार्गदर्शन करण्यातही प्रत्ययाला येऊ लागला.

मोर्लेमिंटो सुधारणाखालील मुंबई विधिमंडळात दादासाहेब करंदीकर १९११ साली निवडून आले त्यातही सोमणांची सेवा होतीच. १८९२ पासून सुधारलेल्या विधिमंडळात तिसरा हिस्सा लोकनियुक्त सभासद बसले, तरी एकाद्या दुसऱ्या अपवादाखेरीज मुंबईबाहेर लोकप्रतिनिधित्त्व गेले नाही. दादासाहेब करंदीकर जसे त्यांच्या वैशिष्ट्यामुळे लब्धप्रतिष्ठिताना हवेहवेसे वाटत नसत, तसेच सरकारासही. या सरकारी नजरेलाच सोमण–फणसळकर महत्त्व देत व दादासाहेबाना पराकाष्ठेचे सहाय्य करीत. कै. गणेश व्यंकटेश जोशांच्या अकाली मृत्यूमुळे रिकाम्या झालेल्या जागेवर मध्यभाग म्युनिसिपल मतदार संघातर्फे निवडून येण्यास सोमणांच्या प्रकाशने व विशेषत: केसरीने केलेला पुरस्कार कारणी लागला. या कामी फणसळकरानी आपली म्युनिसिपल कौन्सिलरशिप् जशी सोडली तसेच काकासाहेब जोश्यांची म्युनिसिपल निवडणुकीची उमेदवारीही आपल्या व सोमणांच्या अजीजीने थोपविली. त्यामुळेच काका राष्ट्रीय पक्षाशी शेवटपर्यंत आपुलकीने वागले.

आणि दादासाहेब करंदीकरांची म्यु. कौंसिलर म्हणून बिनविरोध निवड होऊन, मुंबई विधिमंडळाचे सभासदत्त्वही दादासाहेबाना लाभले. शहरवासीयांच्या बाहेर लोकप्रतिनिधित्त्व खेडचापाडचाकडे वळविण्याचा हा भगीरथ प्रयत्न १९११ साली यशस्वी झाला म्हणून सोमणाना धन्यता वाटली आणि आपल्या शिष्य–सहकाऱ्यानी केलेल्या श्रमासारखी विधिमंडळातील दोन वर्षात दादासाहेबानीही लोकसेवा करून खेडचापाडचातील लोकप्रतिनिधीना आत्मविश्वास येण्यासारखे वळण विधिमंडळातील कामात घालून दिले.

अशा रीतीने सार्वजनिक कार्ये चालली असतानाच, वकिलीच्या आपल्या स्वतंत्र प्राप्तीने सोमणानी १९१४ साली ता. २७ जानेवारी मंगळवार माघ शु. १ शके १८३५ रोजी रामचंद्र नारायण आगटे यांचेकडून एक घर खरेदी करून ते मालकीचे केल्यामुळे स्वतःच्या मातोश्रीचे समाधान केले एवढेच नव्हे, तर १९१४ साली साताऱ्यास झालेल्या प्रांतिक परिषदेच्या खर्चामुळे जी १५०० रु. ची तूट आली होती ती भरून देण्यात प्रामुख्याने भाग घेतला व सर्वच बाजूनी "भला रे भला!" म्हणून लोकांचे आशीर्वाद मिळविले. १९१४ ची प्रांतिक परिषद साताऱ्यास भरवून, मवाळांच्या घटनेने राष्ट्रीय सभेला आलेले संकुचित स्वरूप घालवून मवाळ–जहालांच्या एकीने तिला बळकटी व तेज आणण्याचा श्रीकार तयार झाला.

# ६ चढती वाढती पदवी

धुळ्याच्या तेराव्या प्रांतिक परिषदेस सुरतेच्या कन्व्हेन्शनचे नियमाप्रमाणे बड्या धुरीणानी मान्यता दिली नाही. लोकमान्यांच्या गैरहजेरीत त्यानी सुरत व मुंबई येथे दोन अधिवेशने केली, पण महाराष्ट्रीय व विशेषतः राष्ट्रीय पुढाऱ्याना सर्वत्र गाजलेल्या गहजबामुळे त्यांची प्रगति खुंटली. ही कोंडी फोडण्यासाठी तात्यासाहेब केळकर व दादासाहेब करंदीकर यांचेत विचारविनिमय होऊन जिल्हा परिषदेची प्रथा धीमेपणाने व सर्वसंग्राहक वृत्तीने चालविणाऱ्या साताऱ्यानेच ही जबाबदारी स्वीकारावी असे ठरले. सातारकरानी परिषदेतील मतप्रदर्शनाबाबत तटस्थपणाचे धोरण शक्य तो ठेवावे आणि जमेल तर जहालमवाळांची एकी घडवून आणण्याला मदत करावी असा मनसुबा झाला. १९०७ साली राष्ट्रीय सभेत सुरतेला ज्या जहाल व मवाळ अशा दोन फळ्या पडल्या, त्याबद्दल साताऱ्यालाच विशेष खबरदारी घ्यावीशी वाटली होती. १९०६ च्या राष्ट्रीयसभेत पसार झालेल्या स्वदेशी बहिष्काराच्या ठरावाच्या अनुरोधानेच १९०७ च्या प्रांतिक सभेत धोरण ठेवण्याबद्दल प्रतिनिधीना बजावण्यात आले होते. राष्ट्रीय मनोवृत्तीचा हा पारा सुरतेच्या बखेडानंतरही खाली उतरवू न देण्याबद्दल सातारा जिल्ह्याने काळजी घेतली. ११ आक्टोबर १९०८ रोजी झालेल्या तिसऱ्या जिल्हासभेच्या अध्यक्षानी बजावले होते की "टिळक गोखले यांच्या सारखे जहाल-मवाळ पुढारी आम्हाला श्रेष्ठ आहेत. तेव्हा त्यानी एकी करून राष्ट्रीय सभेचे १९०८ चे अधिवेशन भरवावे आणि राजकीय प्रगति अखंड चालवावी. मवाळांच्या कन्व्हेन्शन कमिटीतर्फे गोपाळराव देवधर व चिंतोपंत देवळे त्या वेळी आले होते. त्याना प्रांतापुरती तरी एकी साधण्यासाठी सातारा जिल्ह्याने बांधलेला चंग आढळला. दादासाहेब करंदीकर, गणपतराव फणसळकर, भाऊसाहेब सोमण प्रभृतींची एक समिती नेमून एकीचा प्रयत्न व्हावयाचे ठरले. धुळ्याच्या प्रांतिक परिषदेने चिंतामणराव वैद्य, न. चिं. केळकर अशी समिती गणेश व्यंकटेश जोशी यांच्या नेतृत्त्वाखाली त्या कामासाठी योजिली होती. तिच्याशी सहकार्य करून सातारकरानी गणेश व्यंकटेश जोशी यांच्या आकडे-शास्त्रीय गुरुगिरीचा गोखल्यावर परिणाम केला व १९१४ सालची प्रांतिक परिषद घडवून यश मिळविले. सातारा परिषदेनंतर १९१४ डिसेंबरात आप्पासाहेब आळतेकराना घेऊन नगरच्या रा. ब. चितळ्यासमवेत सोमण मद्रास कॉंग्रेसला उपस्थित राहिले. कन्व्हेन्शनच्या डिस्ट्रिक्ट कॉंग्रेस कमिटीची चिटणीशी काका जोश्यांचे सहकार्याने संपादून लो. टिळकाना १९१५ साली सोमणानी निरोप पाठविला की "सार्वजनिक सभेस पंधराचेवर प्रतिनिधी पाठविता येत नाहीत; पण आमच्या कमिटीवर तसे बंधन नाही. आपण प्रतिनिधींची यादी पाठवा. मंजूर होईल." मग सर्व चक्रे सुरळीत फिरली आणि काय चमत्कार सांगावा !

राष्ट्रीय सभेने कलकत्त्यास दिलेल्या स्वराज्याच्या चतुःसूत्रीवरील विश्वास सिडनहॅमशाहीच्या दहशतधुंद काळातही चळू न देता नंदादीपाप्रमाणे शांत प्रकाशात ठेवण्याचे काम आपल्या सहकारी स्नेह्यांच्या सोबतीने पण पुढाकाराने चालविले असता लोकमान्य सुटून आल्यावर त्यांच्या आशीर्वादाने साताराच्या सोमणांच्या त्या खटपटीला तेज चढले व दुभंगलेली राष्ट्रीयसभा पुढे एकजीव झाली. १९१६ साली लखनौ काँग्रेसमध्ये ते एकीचे दृश्य सोमणानी पाहिले, एवढेच नव्हे, तर बॅ. जिनाशी करार होऊन हिंदुमुसलमानात समझौता झाल्याचा आनंदही त्याना चाखता आला.

१९१६ साल लखनौ काँग्रेसमधील एकीच्या संजीवनीने आणि होमरूल-लीगच्या चळवळीच्या तेजाने जसे भारताच्या इतिहासात महत्त्वाचे आहे, तसेच ते महाराष्ट्राच्या इतिहासातही महत्त्वाचे आहे. त्या वर्षी लोकमान्याना साठ वर्षे पुरी झाली. त्यांच्या एकसष्टीच्या निमित्ताने त्याना एक लक्ष रुपयांची थैली अर्पण करावी अशी कल्पना निघाली. लोकमान्यांच्यावर परकीय सत्तेने केवढाही रोष प्रगट केला तरी लोक त्याना आपल्या अंतःकरणाचा राजाच मानीत आले, हे प्रगट करण्याचा जसा तो एक मनसुबा होता, तशीच आपली कृतज्ञता सक्रिय प्रगट करण्याची जबाबदारी जनता कशी उत्कटत्वाने प्रगट करते, याचा कसही त्या प्रसंगाने लागणार होता. लोकमान्यांच्या प्रदीर्घ गैरहजेरीत त्यांच्या मार्गदर्शनाचे अभावी आणि परकीय सत्तेच्या मान-तोड जुलुमशाहीत, लोकमान्यानी राष्ट्रात फुलविलेला देशभक्तीचा अग्नि महाराष्ट्राने एकाद्या अग्निहोत्र्यासारखा जपून ठेवल्याचे ते दृश्य त्या थैलीने सिद्ध होणार होते. सातारा जिल्ह्यासारखे जिल्हे त्या अग्निश्रीला नंदादीपही लाविता राहून सातत्याने ते दैवत जागृत ठेवण्याचे काम करीत होते, त्या लक्ष रुपयांच्या थैलीची भर जिव्हाळयाने झाली. ती होताना सोमण प्रभृतीनी पुढाकार घेऊन आठ हजार रुपये निधी जमविला तो बेळगावबरोबरीने गौरवास्पद ठरला.

सातारा जिल्हा होमरूल चळवळीबाबत आधीच सुसंघटीत होता. सोमणानी जातीने पुढाकार घेऊन जिल्हयाच्या वाटयास आला तेवढा निधी तालुकानिहाय जमवून प्रांतिक अगर राष्ट्रीय पुढाऱ्यास सातारा जिल्हयात येण्याचा शीण दिला नाही. त्यांचे या कामातील विश्वस्त सहकारी दिगंबर बळवंत गोखले वकील व गोविंदराव कुबेर वकील हे होते. होमरूल-लीगच्या चळवळीच्या पहिल्या प्रवर्तक मिसेस् ॲनी बेझंट याना अटक करून त्यांची लीग सरकारने जेव्हा १९१७ साली बेकायदा ठरविण्याची धमकी दिली, तेव्हा "होमरूल लीग बकायदा ठरली तरी आम्ही लीगचे सदस्य कायम राहू" अशा प्रतिज्ञापत्रकावर जिल्हयातील कित्येक लोकानी सह्या देवून आपली नावे वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली. मिसेस् बेझंट पुढे बंधमुक्त झाल्या त्या दिवशी लो. टिळकानी वाई, लिंब, सातारा येथे

त्यांच्या अभिनंदनपर भाषणे केली. लोकमान्यांची सातारला ही शेवटची भेट होती. दादासाहेब करंदीकरांच्या साठीसमारंभाचे वेळी व पुन्हा या खेपेस लोकमान्य टिळक भाऊसाहेब सोमणांच्याकडे घरी येऊन गेले. त्यामुळे भाऊसाहेबांच्या मातोश्रींना धन्यता वाटली. १९०७ साली स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीत भाऊसाहेब सोमण भाग घेत आहेत, त्यांना काही उपदेश करण्याबद्दल भाऊसाहेबांच्या मातोश्रीने भाऊसाहेबांच्या वडिलाना विनविले होते तेव्हा "तो शहाणा आहे; तो या मोठ्या माणसांच्या भक्तीने चालतो आहे; त्याच भक्तीने त्यालाही मोठेपणा येईल, अशी समजूत गणुआप्पानी म्हणजे भाऊसाहेबांच्या वडिलानी त्यांच्या मातोश्रींची काढली होती. १९१४ मध्ये भाऊसाहेबानी खरेदी केलेल्या घराला १९१७ साली लोकमान्यांचे पाय लागले आणि त्या दरम्यान भाऊसाहेबांचा लौकिक जो झाला होता त्यामुळे आपल्या पतीचे भविष्य खरे ठरल्याचे दुर्गाताईना समाधान होते. या समाधानातच त्यानी २ नोव्हेंबर १९१७ रोजी जगाचा निरोप घेतला आणि भाऊसाहेबांच्या पाठीवरील घरच्या मायेचा हात नाहीसा झाला. तरी आपल्या वडील–मातोश्रींचे आशीर्वाद आपले नेहमीच पाठीराखे आहेत असा विश्वास बाळगणाऱ्या भाऊसाहेबानी कसूर म्हणून कशी ती केली नाही. १९१८ सालीही लोकमान्य टिळकानी सर व्हॅलंटाईन चिरोल यांच्यावर विलायतेत बेअब्रूची फिर्याद दाखल केली असता, टिळकाना खर्चासाठी अर्पण करावयाच्या थैलीची परिपूर्तता करण्यास सोमणानी परिश्रम घेतले. त्याना लोकानी दिलेली साथ ही ता २२ मे १९२० रोजी लोकमान्याना अर्पण केलेल्या तीन लाखाच्या थैलीत त्यांच्या ज्युबिली फंडाच्या वेळेप्रमाणेच घसघशीत रक्कम मिळाल्या कारणाने सातारा जिल्ह्याने आपले नाव राखलेसे झाले. मध्यंतरी १९१७ साली लोकमान्यांच्या अध्यक्षतेखाली साजरी झालेली दादासाहेब करंदीकरांची षष्टचब्दीही जशी सातारा जिल्ह्याच्या आपुलकीची तशीच दादासाहेबाविषयी सोमणांच्या गुरुभक्तीची उत्कट साक्ष होती. आणि हे सर्व करताना हिंदी राष्ट्रीय स्वातंत्र्याचा सोमणांचा ध्यास आणि त्यामुळेच लोकाना राजकीय चळवळीचे शिक्षण देण्याचा हव्यास वाढत्या चंद्रकलेप्रमाणे सर्वास आकर्षित करीत होता. "बहुत जनास चाळवी । नाना मंडळे हालवी ।। तेणे हे समर्थ पदवी । प्राप्त होते ।। " असा न्याय असल्याकारणाने रामभाऊ सोमणाना लहान थोर सर्वच लोक आता दादासाहेब करंदीकरांच्या देखत भाऊसाहेब सोमण म्हणून संबोधू लागले. फार काय, माँट–फोर्ड–सुधारणाखाली काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारात सातारा जिल्ह्याचे उमेदवार म्हणून भाऊसाहेब सोमणांचे नाव लोकमान्यानी मुक्रर केले. वडिलापेक्षा चिरंजीव आणि गुरुपेक्षा शिष्य सवाई व्हावा आणि तो 'चढत्या वाढत्या पदवीला पावलेला' पहावा, या भारतीय संस्कृतीच्या सामाजिक परंपरेतील स्वारस्य ज्याना राष्ट्रीय जीवनाचा ओघ जिवंत व प्रवाही राहण्याचे दृष्टीने कळते त्याना, या वेळी

दादासाहेब करंदीकराना केवढा मनोमन आनंदच आनंद झाला असेल याची बरोबर कल्पना येईल.

या वेळी नोकरशाही आगलाव्या धोरणाचा खेळ खेळत होती. भाऊसाहेब सोमणाना जनतेच्या हृदयात आदराचे स्थान होते म्हणूनच १९२० साली रहिमतपूर येथील जिल्हा सभेचे अध्यक्षस्थान लोकमान्यानी देवरेप्रभृति रहिमतपुरकराना दिलेल्या सल्ल्याने त्याना मिळाले. इंग्रजी राजवटीने येथे शिक्षण सुरू करून आपल्या कारभारास कारकून आणि केरोपंत मिळवण्याचा एक कारखाना निर्माण केला असला, तरी इंग्रजांचा आणि युरोपचा नवा-जना इतिहास अभ्यासलेल्या नि त्या अभ्यासाच्या जोरावर आपल्या देशाच्या स्थित्यंतराचा विचार करणाऱ्या मेंदूचा कधीच तुटवडा पडला नव्हता. इंग्रजी राज्य ही एक परमेश्वरी कृपा आहे, असे बोलणारा सुशिक्षितांचा एक वर्गच्या वर्ग भारताच्या इतर प्रदेशाप्रमाणे महाराष्ट्रातही निर्माण झाला असला, तरी महाराष्ट्रात इंग्रजी राज्याच्या आगमनाने आनंदाच्या उकळ्या तर कुणाला फुटल्या नाहीतच, पण इंग्रजी राजवटीला टिचण्याचे मार्ग इंग्रजानी दिलेल्या विद्येतूनच कसे काढावयाचे, याचा विचार "वाघिणीच्या दुधाचा" गुण लागलेले लोक करू लागले होते. "थोडाही गुण मिळता घ्यावा" या न्यायाने विष्णुबुवा ब्रह्मचारीनी पार समाजवादी राज्यनिर्मितीपर्यंत राजकारण बोलून टाकले होते. आपल्या समाजातील अनेक दोष घालवून इंग्रजांचे अनेक गुण आपण उचलले पाहिजेत असे सांगता सांगता भारताचे म्हणून स्वतंत्र पार्लमेंट झालेच पाहिजे, असे दूरगामी भविष्य म्हणून का होइना, लोकहितवादीनी स्पष्टपणे दिग्दर्शन केले होते. पुढे विद्यापीठे स्थापन झाल्यावर जे पदवीधर निघाले, त्यांचे मुगुटमणी न्यायमूर्ति रानडे यानी राष्ट्राच्या खऱ्या उन्नतीचा मार्ग केवळ राष्ट्राच्या राजकीय मोक्षात नसून, राजकीय तशाच सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व संशोधक अशा सर्वच क्षेत्रात समन्वयी प्रगति होत राहिली पाहिजे, असा सिद्धान्त मांडून तशा सुधारणेचा फुलोरा दरवळावयाचा असेल तर "लघुतम विरोधा"च्या धोरणाने चालले पाहिजे असा सल्ला दिला तरी भारताचे दास्य गेलेच पाहिजे व त्याला मानाचे स्थान स्वाभिमानपूर्वक मिळालेच पाहिजे, या ध्येयावरील लक्ष विचलित होऊ दिले नाही. भारताच्या उन्नतीसाठी इंग्रजी पार्लमेंटातच भारतीय प्रतिनिधी हवेत अशी खटपट न्या. मंडलिकानी केली. स्वातंत्र्याच्या अशा गोष्टी करिताना या पुढाऱ्यांच्या डोळ्यापुढे पार्लमेंटरी राज्यपद्धति असो वा समाज-सत्तेचे राज्यतंत्र असो, त्यात बहुजनसमाजाची - आम जनतेची - प्रवृत्ति-प्रकृती प्रतिबिंबित झाली पाहिजे, हा त्यांचा आर्जव होताच. तो आर्जव हा ब्रीदमंत्र घेऊन मिशनऱ्यापेक्षा मिशनरी होऊन पतिताना पावन करून घेण्यात आणि त्यांच्या हक्काना मानाचे स्थान मिळाल्याशिवाय देशाच्या उन्नतीच्या गोष्टी फोल आहेत, हे (महात्मा)

ज्योतिराव फुले यानी आपल्या कार्यतत्परतेने समजाविले. १८७० च्या आसपास पुण्याचे सार्वजनिक काका, साताराचे स्वदेशी–कीर्तनकार माटे, इंदापूरचे देशपांडे, वसईचे गोविंद नानाजी जोशी, आणि याशिवायही काशीनाथ त्र्यंबक खरे, दिनकर बल्लाळ चक्रदेव, विष्णु परशुरामशास्त्री पंडित यानी नव्या काळाला व राजवटीला अनुसरून लोकसमाजाने कसे वळण घेतले पाहिजे, याचा प्रचार धुमधडाक्याने, निदान तालुक्याच्या व तालुक्यातील डगळ गावापर्यंत मजला मारून चालविला. नव्या राजवटीबरोबर नव्या परिचित झालेल्या सुधारणासंशोधनांचा सदुपयोग भारताने करून घेताना आपल्या राष्ट्राच्या हजारो वर्षांच्या इतिहासाचा धिक्कार करण्याचे कारण नाही; उलट स्वाभिमानपूर्वक पाश्चिमात्य सुधारणेचा जेवढा अंगिकार करता येईल तेवढा करून भारताने आपल्या स्वताच्या पायावर स्वताच्या अकलेने उभे राहून आपले स्वातंत्र्य कमावले, राखले, व तेजाळले पाहिजे असा संजीवनीमंत्र निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकरानी महाराष्ट्राला दिला. त्या मंत्रास अनुसरून रानडे व ज्योतिराव फुले यांच्या धोरणातील मख्खी ओळखून राष्ट्राच्या सर्वांगीण सुधारणेवर तीव्रतेने भर दिला पाहिजे व आपापल्या कर्तृत्वाचे क्षेत्र निवडून तरुण मंडळीनी उत्कटत्वाने कार्याची उभारणी सगळ्या बाजूनी केली पाहिजे असा "सर्व क्षेत्री जहाल समानत्व" सांभाळण्याचा इशारा आपल्या देशबांधवाना देऊन भारताच्या मूळ यज्ञमय संस्कृतीला मोंगल साम्राज्याने जी उपभोगरतीची संस्कृती जोडून दिली आहे, तिच्यात इंग्रजी राजवटीने ओळख करून दिलेल्या उद्यमरतीच्या संस्कृतीचे धागेदोरे विणून भारताने नव्या संस्कृतीचा ब्रह्मदेव झाले पाहिजे असा गोपाळराव आगरकरांचा कटाक्ष होता. तथापि ज्याच्या हाती ससा तो पारधी हा जसा जगाचा एक व्यावहारिक न्याय आहे, तसाच ज्याच्या हाती सत्ता त्याच्याकडे भविष्याचा मक्ता, हाही एक व्यावहारिक न्याय आहे. हे जाणून बाकीच्या सुधारणा सहज साधतील तितक्या करीत राहता राहता, राजकीय पारतंत्र्याचे उच्चाटन पहिल्या प्रथम कसे होईल हे पहाण्याकडे बारीकसारीक गोष्टीपासून क्षणाक्षणानी विचारवंत मंडळीनी भर ठेवला पाहिजे असे प्रतिपादन करून इतिहासातून स्वाभिमानपूर्वक व ज्ञानपूर्वक नव्या राष्ट्राची उभारणी झाली पाहिजे याच प्रेरणेने शिवाजी–गणपत्युत्सवातून लहानथोर राष्ट्रभक्तीने शहारून सोडण्याचा उद्योग लोकमान्य टिळकानी उभारला होता. निबंधमालारूप अरुणोदयाने ज्या युगाला सुरुवात केली त्या युगाचे प्रारंभ–काळात भाऊसाहेब सोमण जन्मले आणि तेल्यातांबोळ्यांचे पुढारी होऊन भारतात लोकशाही स्वराज्याची पताका कटीखांदा घेऊन लोकमान्य बहुजन समाजाला–सुशिक्षिताला आणि अशिक्षिताला उठवू लागले असता भाऊसाहेब सोमण सार्वजनिक सेवेची गुटी घेऊ लागले, या गोष्टी लक्षात घेतल्या तर भाऊसाहेब सोमणांच्यावर १९२० साली नोकरशाहीचा राग कसा असेल याची काहीशी कल्पना कोणालाही येऊ शकेल. वरील

राष्ट्रीय धोरणाच्या प्रवर्तनाचा वारसा आपल्या क्रियाशीलतेने चालविल्याकारणानेच भाऊसाहेब सोमणाना जिल्हा सभेचे अध्यक्षस्थान सन्मानपूर्वक मिळाले. पण त्याच कारणाकरता नोकरशाहीचा संताप–बिंदुही ते होऊन बसले होते.

आपण चटक लावलेल्या शिक्षणातून पगडचा धोतरे पेहरणारे साहेबच तेवढे निर्माण व्हावेत ही मेकॉलेने केलेली अपेक्षा फोल ठरल्याकारणाने इंग्रजी राजवटीचे कारभारी जे चवताळले ते विनाकारणच होते. कारण काही केले तरी इंग्रजी राज्याचे स्वागत महाराष्ट्रात मनापासून कधीच झाले नाही आणि त्याचा साक्षात्कार पेशवाईला उठवून लावणाऱ्या मालकमलाही झाला होता. तो साक्षात्कार पुढे घालूनच पुण्याच्या डि. सु. पोलिसानी १८५७ च्या उठावाचे वेळी आपला अहवाल ता. १४ ऑगस्ट रोजी वरिष्ठाकडे धाडला होता. लोकांच्या मूळ स्वभावालाच परकीय सत्तेचे वावडे असल्याकारणाने इंग्रजी विद्या न शिकलेले लोक आपापल्या परीने इंग्रजी राजवटीला उठवून लावण्याच्या उद्योगात होते. साताऱचे चतुरसिंग भोसले (१८०३–१८११), उमाजी नाईक (१८२६ ते १८३१), सुभाना निकम ( १८३९ ते १८४५ ), नरसप्पा पेठकर ( १८३६–१८४१ ) यांच्या तलवारी म्यानातून निघाल्या पण धारेला आणि धोरणाला कमी पडल्या; रंगो बापूजीनी पदभ्रष्ट प्रतापसिंहाची वकीली सनदशीरपणे इंग्लंडात तेरा वर्षे ( १८३९ ते १८५२ ) करून अपयश आल्यावर भोरपासून बेळगावपर्यंत उत्तर हिंदुस्थानात नानासाहेब पेशव्याने उठविलेल्या जंजाळाला साथ दिली व देवविली; सत्तावनच्या त्या स्वातंत्र्योन्मुख उठावातून जिते–जागते राहिलेले लोक संन्याशी, गोसावी, फकीर झाले पण पुन्हा संसारात व इंग्रजाच्या कायदा सुव्यवस्थेतील आरामात न पडता सत्तावनच्या कथा आणि संग्रामगीते लोकांच्या कानात व मनात घुमवित राहिले. त्यांचे पडसाद कानी असल्यामुळेच शस्त्र–बंदी, मीठकर, उत्पन्नकर यांच्या प्रयोगांचेवेळी लोकानी परकीय सत्तेला युक्तीपेक्षा शक्तीने विरोध करण्याचा प्रयत्न केला. त्यातून दुष्काळाच्या वेळीही चारचार वर्षे पोटे मारावयास लागलेल्या प्रजेची दाद लागेना म्हणून वासुदेव बळवंत फडक्यानी इंग्रजी राजवटीला गनिमीकाव्याने लढत देण्याचा प्रयत्न १८७९ साली केला; हा सगळा इतिहास व त्याचा राष्ट्रीयबोध जसा इंग्रजी राजवटीच्या शैक्षणिक क्षेत्रात पावन झालेल्या विचारवंतानी घेऊन लोकसंघटनेचा, लोकशिक्षणाचा आणि लोकमतदर्शनाचा मार्ग आखला होता, तसाच इंग्रजी राजवटीचा कधीच न मावळणारा म्हणून गाजलेला सूर्यही एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात समजून चुकला होता की पाश्चिमात्य काय पण कसल्याही शिक्षणाचे संस्कार न झालेला बहुजन समाज आणि पाश्चिमात्य शिक्षणाने तार लागलेले बोलके विद्वान् हे राजकारणातील भावनाशील उत्थापनात एकच आहेत; आणि जर का, त्या शक्तियुक्ति एकठायी होतील तर भारताचा भाग्यभगवंत लवकरात लवकर

अवतारल्याशिवाय राहणार नाही. त्याचे सुदर्शनचक्र आपल्यामागे लागू नये म्हणून, ज्या महापुरुषाने इतिहासाचा ओघ लक्ष्यात घेऊन राष्ट्रीयत्त्वाचे मळे पिकविण्याचे आपल्या शिरी घेतले होते, त्या बाळ गंगाधराचे पुढारीपण आपटण्याचा निदान नकटे करण्याचा चंग बांधून ब्रिटिश राजवटीने जी फोडझोडीची भूतावळ उभी केली होती, ती आता म्हणजे १९१६ साली लोकमान्यांची होमरूल चळवळ तेजाळल्यापासून जातीय तेढीचे रूप व पीळ घऊन बसली होती. शिवाजी–गणपति उत्सव करून राष्ट्रीय चैतन्य टिळक फुलवितात म्हणून स्वता छत्रपतींच्या सत्ताधारी वंशजाकडूनही शिवाजीउत्सव न होतील असे पहाणाऱ्या इंग्रज राज्यकर्त्यांना फ्लँडर्सच्या रणांगणावर पराक्रम गाजविणारे ' राजनिष्ठ ' समजले गेलेले रंगरूटही " शिवाजी महाराज की जय " ! असे म्हटल्याबरोबर रणरंगी रंगून जातात असा अनुभव आल्याबरोबर त्या राजनिष्ठ मराठ्यातूनच, " स्वराज्य व संरक्षण यांची सांगड सुटणार नाही " असे ठासून सांगणाऱ्या व स्वराज्याची चळवळ रंगरूट भरतीच्या निमित्तानेही नेटास लावणाऱ्या टिळकाना प्रतिस्पर्धी पुढारीपण निर्माण व्हावे म्हणून इंग्रज राज्यकर्त्यांनी जिवाचे रान केले; माँटफोर्ड सुधारणात मराठ्याना म्हणून स्वतंत्र प्रतिनिधी मोर्लेमिंटो–सुधारणातील मुसलमानाना कित्ता ठेवून दिले. छत्रपतींचे नाव शिरोधार्य मानणाऱ्या मराठ्याना भारताच्या राष्ट्रीय–त्वाचे मारेकरी म्हणून, " जातीय स्वतंत्र मतदारसंघाचे मिषाने " उभे करण्यातील विष कोणीहि विसरण्यासारखे नव्हते. हे विष कसे उतरावयाचे, या विचारात राष्ट्राचे स्वयंसेवक व संघटक असताच, रहिमतपुरची चौदावी जिल्हापरिषद भाऊसाहेब सोमणांच्या अध्यक्षतेखाली ता. २८ व २९ मार्च १९२० रोजी भरत होती व ती उधळून लावण्यासाठी, निदान मृतप्राय करण्यासाठी वरील विष सोमण व जिल्हासभा यांच्या भोवती सत्यसमाजाच्या नावाखाली धिंगाणा घालू लागले. रहिमतपूर येथील रोकडोबाच्या देवळात तमाशे करून ती परिषद रोडकी करण्याचा प्रयत्न झाला होता. हे दृश्य गांगरविणारे होते. तत्राप भाऊसाहेब सोमण हे लोकमान्यांचे अनुयायी म्हणून हा सगळा अट्टाहास एका बाजूने होता तर दुसऱ्या बाजूने सोमण स्वता समन्वयी असल्याकारणाने त्यानी ते विष शंकराच्या सात्त्विकतेने आपल्या गळा घेतले. भारतात होणारे स्वराज्य हे लोकशाही स्वराज्य असल्याकारणाने बहुजन–समाजानेच जिल्हासभापासून सर्व राष्ट्रीय संस्था पुढारीपणाने चालवाव्यात, " याचसाठी केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ॥ " असे ज्यावेळी भाऊसाहेब सोमणानी समजाविले, त्यावेळी वातावरणात एकदम फरक दिसला की नरसिंहाचे उग्र रूप जाऊन जिल्हासभेच्या पोटात काय आहे, हे न्याहाळण्याचे कार्य. सुरू झाले. हिरण्यकश्यपूच्या पोटात प्रल्हादच प्रल्हाद सापडावेत म्हणून संशोधन करणाऱ्या सात्त्विक वेडाने समाज–नरसिंहाला घेरलेले दिसले. उलट भरताच्या सेवानिष्ठेने आपण सांभाळलेल्या जिल्हासभेकडे चवदा वर्षानी का होईना, परकीय सत्तेच्या तालमीने राष्ट्रीयत्त्वाचा वनवास करणारा बहुजन समाज आग्रहाने वळला

म्हणून भाऊसाहेब सोमण व त्यांचे सहकारी याना रामभेटीनंतर झालेल्या भरताच्या बंधुभावाचे निरागस समाधान लाभले. जिल्हासभेच्या रहिमतपूर अधिवेशनाचे अध्यक्षपदावरून सोमणानी सातारा जिल्ह्यातील जनतेस ऐक्याचा संदेश दिला आणि सातारा जिल्हयातील जनतेमध्ये असलेल्या परस्पर सहानुभूतीला चिरडण्याचा प्रयत्न बाहेरच्या तिऱ्हाइतानी करू नये, त्यात चिरंतन यश येणार नाही, असा आत्मविश्वासही सोमणानी त्यावेळी प्रगट केला. रहिमतपुरची जिल्हासभा भाऊ–साहेब सोमणांच्या आयुष्यात जशी नोंदण्यासारखी, तशीच ती सातारा जिल्ह्याच्या आणि महाराष्ट्रीय इतिहासात उदाहरण म्हणून बोधप्रद ठरली, तिच्या समजुतीची साखळी वरील प्रमाणे लक्ष्यात घेतली, तर त्या सभेचे दृश्य पाहणाऱ्या व वृत्त वाच–णाऱ्या सर्व मंडळीना, ते सर्व "संस्मृत्य, संस्कृत्य" अंगावर आनंदाचे शहारेच येतील.

यावेळी भवितव्यता मात्र देशाची कुंडली भलतीच मांडून बसली होती. जालियन बागेचा भडका, लोकमान्यांचा १ ऑगष्ट १९२० रोजी घडलेला मृत्यु, असहकाराच्या सामुदायिक उठावाची सुरुवात, यामुळे सगळ्या राष्ट्राच्या जीवनालाच निराळे वळण लागले. उगवत्या युगाची पावले ओळखून त्याशी समरस होण्यात व राष्ट्राची प्रगतीपर सेवा करण्यात आळस करावयाचा नाही, असा भाऊसाहेबांचा पायंडा असल्यामुळे ते इतिहास–घडणीला हांतभार लावू लागले. असहकारयुगाच्या त्रिपादभूमीत शाळाकॉलेजाप्रमाणे कोर्टावरील वहिष्कार हा समाविष्ट असल्याकारणाने, तशा बहिष्काराला जोवर आपण तयार नाही, तोपर्यंत आपण पुढाकार घेऊन समाजात ढोंगीपणाला वाव करून देऊ, हा कटाक्ष ठेवून भाऊसाहेबानी आपण होऊन दुय्यम भूमिका पत्करली. कायमची वकिली सोडण्यापेक्षा मुदतबंदीने वकिली सोडणारे महाभाग मुदतबंदीने शाळाकॉलेजावर बहिष्कार घालणाऱ्या विद्यार्थ्यासारखेच त्यावेळी काही कमी नव्हते. तो मार्ग स्वीकारण्यास भाऊसाहेबांचा कोणी हातही धरला नसता. पण ज्या वकिलीवर आपण सुस्थिर झालो व जिच्यामुळे लोकाशी आपला संपर्क येऊन आपण सातारा जिल्ह्याच्या लोकाना काही वळण लावू शकलो, इतकेच नव्हे, तर धंदा करतानाही आपल्याला वकीलपत्र देणाऱ्या पक्षकाराची चाकरी इमानेइतबारे करून त्याच्या राजीखुषीने त्याचेकडून आपल्या कामाचा मोबदला म्हणून पैसा घेतला तरी त्या जनतेच्या कृपेतील काही अंश जनतेच्याच सेवेसाठी आपण अर्घ्यरूपाने देऊ शकलो अशा त्या धंद्याच्या रूळीस पडलेल्या मार्गावर आपण मुदतबंदीने बहिष्कार घालण्याची भाषा काढणे म्हणजे स्वताच्या आक्रमशक्तीच्या मर्यादा न ओळखणे होय, हे आत्मनिरीक्षक भाऊसाहेब सोमणाना पक्केपणी ठाऊक होते. त्याच बरोबर परकीय सत्तेच्या न्यायमंदिरात सात्त्विक माणुसकीच्या बुद्धीवादाला जागा नाही, असे न्यायमंदिरावरील बहिष्काराने बहुजन समाजाच्या मनावर ठसेल आणि इंग्रजी न्यायबुद्धीवर विश्वास ठेवून कायदेशीर न्यायनिवाडा मिळविण्यासाठी झटणारा वकील वर्ग जर त्या इंग्रजी न्यायमंदिरावर सार्वजनिक

बहिष्कार घालून बसला तरी इंग्रजी राजवटीची जगात नाचक्की झाल्याशिवाय राहणार नाही, या गोष्टीचे मंडन करणाऱ्यांच्या म्हणण्यातील रहस्य भाऊसाहेब सोमणाना उमगत नव्हते असे नाही. शिवाय कज्जेदलालीने, शपथेपुरते परमेश्वराचे नाव घेऊन बाकी प्रचलित कायद्याच्या चौकटीत बसवून आपल्या पक्षकाराला " धुवट सोवळा " म्हणून न्यायमूर्तींच्या मनावर ठसविताना खऱ्याचे नेहमीच खोटे करावे लागत नसले, तरी त्याला मुरड घालावी लागते, जुन्या सासुरवाशिणीप्रमाणे अर्ध्या दाराआडून आपला हलकासा अविष्कार करावा लागतो, आणि " सत्य, सर्वस्वी सत्य, सर्वस्वी निर्भेळ सत्य आणि सत्यापरते काहीच नाही " ही शुद्ध नीतीची ठेवण कटाक्षाने सांभाळताच येत नाही, याची अनुभवजन्य जाणीवही भाऊसाहेब सोमणाना होती. त्यामुळे गणपतराव फणसळकर, वामनराव घाणेकर, नारायणराव आगाशे प्रभृतीनी आपल्या सहकारी सज्जनांच्यामार्फत एक लवाद कोर्टही स्थापण्याचा प्रयत्न केला. पण यश आले नाही म्हणून आपल्या आर्थिक, व्यावसायिक, व व्यावहारिक मर्यादा ओळखून, ज्या आप्पासाहेब आळतेकर, बंडोपंत अष्टपुत्रेप्रभृती मंडळीनी सामाजिक नीतिशुद्धीसाठी व राजकारणासाठी वकिली सोडली त्याना त्यांचे सन्मानाचे स्थान सादर समर्पण करून भाऊसाहेब सोमण आपला कर्मयोग आचरीत राहिले. तरीही सोमणांच्या पुढची काळी रेघ सरकारने जी १९०७ सालापासून मारली होती ती पुसली नाही की फिकी केली नाही. नोकरशाहीच्या हस्तकानी, लोकमान्यांच्या पादुका बोरखळ येथे सदाशिवराव बापट व त्यांचे पिताजी यानी तात्यासाहेब केळकर यांच्या हस्ते समारंभपूर्वक बसवित असता खो घालण्याचा प्रयत्न केला आणि त्याच वेळी उत्साहभरात सत्यसमाजाच्या नावाखाली जी दंगल झाली, तीमुळे समाजात शांतता नांदावी म्हणून खटपट करणारे भाऊसाहेब सोमण, तात्यासाहेब केळकर, शंकरराव लवाटे आदि लोक समाजस्वास्थ्याचे विनाशक म्हणून एका खटल्यात गुंतविले गेले. ता. २० ऑक्टोबर १९२० रोजी बोरखळ–पाडळी येथे ब्राम्हण पहेलवानानी ब्राह्मणेतर पहेलवानास व अधिकाऱ्यास जुमानले नाही आणि मारामारी केली, अशा अर्थाची फिर्याद नागोजीराव फाळके यानी प्रथम डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटपुढे गुदरली. पण पुढे हुजूर डेप्युटी फणसे यांचेकडे वर्ग होऊन ती चालली. तारखावर तारखा होऊन शेवटी ता. ५ मे १९२१ रोजी खटल्याचा निकाल लागला. त्यात आरोपी म्हणून गोवलेले भाऊसाहेब सोमण, तात्यासाहेब केळकर, शंकरराव लवाटे, महादूकाका गाडगीळ, बळवंतराव चितळे, गणपतराव साठे, गणपतराव गोळविलकर, मारूति खिरे, पिलोबा कुलकर्णी (लिंबकर) आणि सीताराम बापूजी कुलकर्णी यांच्यावर काहीच आरोप सिद्ध झाला नाही. उलट अशा भल्या माणसांची इज्जत घेतल्याबद्दल फिर्यादीस ४३० रु. दंड झाला. व त्यापैकी पहिल्या तिघास प्रत्येकी ५० रु. व बाकीच्याना प्रत्येकी ४० रु. भरपाई म्हणून देवविले. पुढे सेशन कोर्टात अपील होऊन सेशन्स् जज्ज मि. बेकर यानी ते फेटाळून लावताना असे लेखी नमूद करून ठेविले की मी स्वतः जरी मॅजिस्ट्रेट असतो तरी या खटल्याचा निकाल सिटी मॅजिस्ट्रेट फणसे यानी दिला तसाच दिला असता यात तिळमात्र संदेह नाही.

भाग २ पूर्ण

# ७ लोकसंग्रही सेवेची विविधता

लोकमान्यांच्या मृत्यूनंतर राजकीय चळवळीचा राष्ट्रीय वीणा खांद्यावर घेऊन असहकाराचा अभंग सुरू करणाऱ्या महात्मा गांधीना विरोध दाखविण्यासाठी मराठा मंडळीना पुढे करून शिवाजी महाराजांचे स्मारकही इंग्रज राजपुत्राचे हस्ते नोकरशाहीने पुण्यात उभे केले. लोकमान्यांच्या चळवळीचा हा एकतऱ्हेने नैतिक विजय होता.

१९२० साली असहकाराची चळवळ सुरू झाली. तिचा एक सामूहिक कार्यक्रम म्हणून अज्ञान देशबांधवातील दारूचे प्रचारास आळा घालण्याचा प्रयत्नही जोरात झाला. १० जुलै १९२३ तारखेस गोविंदराव श्रोत्री वकिलांचे अध्यक्षते–खाली दारूबंदीची सभा मामा गोलवलकरानी बोलाविली. त्या सभेत दिलेल्या अहवालात वाई भुईंज येथील गुत्ते पूर्वीच ओस पडल्याचे आणि साताऱच्या गुत्त्याना आठ जूनपूर्वीच १०० ते २०० रुपयाचे नुकसान रोज येऊ लागल्याचे जाहीर झाले, हे नोकरशाहीस कसे खपणार? शांत रीतीने पिकेटिंग करणाऱ्या स्वयंसेवकाना डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट बास्कर विल्हे यानी कडक शिक्षा दिल्या व त्याना अत्त्याचारी ठरविले. म्हणून १६ जून रोजी निषेधपर भाषणे केल्यावरून हुजूर डेप्युटी डोमिंगो यानी अष्टपुत्रे, नाथ घाणेकर, हकीम नज्मुद्दीन यांच्याबरोबर भाऊसाहेब सोमणानाही दोन महिने भाषणबंदी केली. तरी पिकेटिंग चालूच होते आणि खटल्याना कोणी बिचकत नव्हता. तेव्हा नोकरशाही गोंधळली. तथापि एवढ्यात प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानात १७ नोव्हेंबरास यावयाचे जाहीर झाले. पण राष्ट्रीय सभेने युवराजांच्या त्या आगमनावर बहिष्कार घातला. तो साताऱ्यात यशस्वी होऊ द्यावयाचा नाही या ईर्षेने सोमण, अष्टपुत्रे प्रभृति नऊ इसमावर १६ नोव्हेंबर रोजी भाषणबंदीची नोटीस लागली. तरीपण आव्हानपूर्वक कायद्याच्या मर्यादेत सोमण अष्टपुत्रे प्रभृतीनी भाषणे करून सभा पार पाडली. तिचा परिणाम होऊन १७ नोव्हेंबरचा हरताळ कल्पनातीत यशस्वी झाला. १९२२ च्या पहिल्या तिमाहीत असहकारितेच्या आंदोलनांत लोकांच्या उत्साहाचा कढ अजून चढत असताच, ता. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी खटाव येथे सब् रजिस्ट्रार उस्मानशा आणि माजगावकर यांच्यामध्ये कटकट उत्पन्न झाली. कारण सरकारी मनोवृत्ती व राष्ट्रीय मनोवृत्ती यांचा तो झगडा होता. दुसरे दिवशी भाऊसाहेब सोमण खटावला गेले आणि सायंकाळी आव्हानपूर्वक सभा भरवून आदले दिवशी सब् रजिस्ट्रारने केलेल्या अतिप्रसंगाबद्दल भाऊसाहेबानी टीका केली. पुढे सब रजिस्ट्रारना नोटीस देऊन वृत्तपत्रातून अनावृत पत्र कलेक्टरास लिहिले. त्याचा परिणाम सरकारी प्रकोपात होऊन असहकारी मंडळीवर उडाणटप्पूपणाचे खटले भरण्याचा निर्णय

नोकरशाहीने घेतला. गणेश हरी साठे या तरुण पहेलवानाचा पहिला बळी घेऊन त्यास नोकरशाहीने विसापुरास धाडले. पण तेवढ्याने तिचे समाधान झाले नाही, तिला जालियनवाला बागेचा राष्ट्रीय सप्ताह दिसत होता. तेव्हा नाथ घाणेकर, हकीम, आपटे यांची चालू असलेली प्रचारप्रमुखे बंद होण्यासाठी त्याना १४४ कलम लावण्यात आले. पण दादासाहेब करंदीकर, आगाशे, डॉ. आठल्ये, श्रोत्री, निळुभाऊ घाणेकर, प्रभृति मंडळींच्याबरोबरीने भाऊसाहेब सोमण राष्ट्रीय सप्ताहाची जागृति जिल्हाभर करून आले. पुढे नाथ घाणेकरांच्या पुढाकाराने साताऱ्यास राष्ट्रीय शाळेची स्थापना १९२१ साली झाली, तिला एका शिक्षकाचा पगार आपण होऊन दरमहाच्या दरमहा पोचविण्याचे व्रत राष्ट्रीय शाळेची परिसमाप्ती १९३५ साली होईपर्यंत भाऊसाहेबानी अखंड पाळले होते.

१९२१ सालीही असहकाराच्या विधायक कार्यक्रमाचे एक अंग म्हणून दारूच्या दुकानावरील शांततापूर्वक निरोधनाचा एक कार्यक्रम होता. दारूबंदी बाबत एकमत असलेल्या सर्व मंडळीना एकत्र आणून विचारविनिमय झाल्यावर त्यातून सातारा येथे एक मद्यपानप्रतिबंधक मंडळ रा. ब. काळे यांच्या अध्यक्षते-खाली स्थापन झाले. दादासाहेब करंदीकर व भास्करराव जाधव यांच्या प्रमाणेच त्या मंडळाचे एक उपाध्यक्ष म्हणून भाऊसाहेब सोमण होते व चिटणीसद्वय म्हणून वाग्भट देशपांडे व नानासाहेब जोशी होते. या सर्वसंग्राहक, शांतताप्रिय, सनदशीर मंडळातर्फे चाललेल्या दारू दुकानावरील निरोधनाचा कार्यक्रम चालू असता, त्या-वेळचे जिल्हाधिपती इ. एल्. मॉयसी यांच्या धोरणाचा ताल धरणाऱ्या पोलिसानी निरोधकाना बेताल त्रास देण्यास सुरुवात केली. आणि तिची दाद रा. ब. काळ्यानी अबकारी मंत्री सर चुनिलाल मेहताकडे मागितली असता, मद्यपानप्रतिबंक मंड-ळाच्या पोलीस विरुद्धच्या तक्रारीत तथ्यच नाही असा शिस्तशीर रिपोर्ट जिल्ह्यातून अधिकृतपणे झाला. एका बाजूने सनदशीर चळवळ करणाऱ्या रा. ब. काळ्यांचा हा अपमान आणि दुसऱ्या बाजूने पोलीसांच्या क्लृप्त्यानी चळवळ गारठलेली, असा तेल–तूप जाऊन धुपाटणे लोकाहाती येण्याचा प्रसंग आलेला पाहून ता. ९ डिसेंबर १९२१च्या सभेत कायदेभंग करूनही निरोधन करावे असा सल्ला सोमणानी दिला, व सोमणानी आव्हानपूर्वक निरोधन करून कारागृहवास पत्करावा असे उत्तेजन रा. ब. विठ्ठलराव पाठकानी दिले. तात्पर्य मर्यादा ओळखून प्राप्त परिस्थितीत शक्य तितक्या सर्व लोकाना बरोबर घेऊन, राष्ट्राच्या उन्नतीसाठी व सातारा जिल्ह्याच्या कार्यतत्पर प्रतिष्ठेसाठी जे काही लहान मोठे कार्य उत्कटत्त्वाने करिता येईल, त्याचा उठाव स्वताकडे दुय्यम प्रतिष्ठा घेऊनही भाऊसाहेब सोमण गांधीयुगातही करीत राहीले. कारण लोकमान्य गेल्यावर भारताच्या तेजस्वी व प्रागतिक यशोवर्धनाला महात्मा गांधींच्या सारखा दुसरा नेता नाही आणि त्यांच्याशी काही

बाबतीत मतभेद असले तरी अगर त्यांचे काही कार्यक्रम स्वताला निभणारे नसले तरी महात्माजींच्याच फळीत स्वताच्या पुरती असेल ती जागा पत्करून अखंड देशसेवेचा कार्यक्रम—कर्मयोग आचरत राहण्यातच आपण आपल्या राष्ट्राची सेवा बळकट लोकशाहीसाठी करू शकू असा सोमणांचा विश्वास होता.

असहकार सुरू करताना राजकारणाच्या परिणामकारिकतेसाठी परदेशी वस्तुंच्या बहिष्काराबरोबर कायदेमंडळे, शाळाकॉलेजे आणि न्यायमंदिरे यांच्यावरील बहिष्कारांची त्रिपादभूमि नवी निर्माण करण्यात आली होती. पेण येथे १९२२ साली दुसरी महाराष्ट्र प्रांतिक परिषद भरली असता कॉंग्रेस कार्यक्रमाबद्दलच्या ठरावास सोमणानी पुष्टी दिली, इतकेच नव्हे तर त्यांची नेमणूक महाराष्ट्रातील ब्राह्मण ब्राह्मणेतर एका राजकीय पातळीवर आणण्याच्या समितीवरही झाली. गावोगाव लवाद मंडळे निर्माण व्हावीत, राष्ट्रीय शाळांच्या स्थापना व्हाव्यात आणि सामाजिक संघटनेचे संकेत लोकांचे लोकानी पक्के करून आचरण शुद्ध राखावे म्हणजे उच्चार न करताच लोकतंत्र प्रतिसरकार निर्माण होईल आणि त्यायोगे परकीय सत्ताधाऱ्याना भारताच्या राजकीय आकांक्षा पूर्ण कराव्या लागतीलच लागतील, असा अंदाज ज्या देशभक्तानी बांधला होता, त्याना तीन वर्षाच्या अनुभवाने आनंदाने मोहरून जाण्यासारखे त्या चळवळीत काही घडले नाही; पण विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापेक्षा या तिसऱ्या दशकात नवनवे तरूण आणि तेही समाजाच्या सर्व थरातील अहमहमिकेने पुढे आले; राष्ट्रीय शाळांचा जम आणि जोम राष्ट्रीय चळवळीना खात्रीशीर स्वयंसेवकांचा पुरवठा करण्याइतका तेजीचा राहिला; आणि कज्जेदलालानी आपले धंदे सोडले नसले अगर गावोगाव लवाद मंडळे निर्माण झाली नसली तरी कार्यकर्त्यांच्या अनुषंगाने असणाऱ्या मंडळींच्या मार्फत ब्रिटिश न्यायमंदिरावरील विश्वास संशयातीत राहिला नाही. सगळ्या बाजूनी व्यावहारिक राजकारणात पड आली ती कायदेमंडळाच्या कामकाजाने निर्माण होणाऱ्या कारभाराबाबत. अनेकानेक मतदारसंघांचे प्रतिनिधीत्वच झाले नसते अगर निवडून—अगदी हातावरच्या बोटाइतकीच मते घेऊन, पण निवडून आलेल्या मंडळीनी परकीय सत्तेच्या राजकारभाराला नामोहरम नसले तरी स्तंभित करण्याइतपत बळकटी दाखविली असती, तरी कायदेमंडळावरील बहिष्काराबाबतचा दृष्टिकोन सफल झाला असे तरी म्हणता आले असते. पण लोकानी मते नाहीच द्यावयाची असे ठरवूनही परकीय सत्तेच्या "जी हुजूरीत" असणारानी अगर तिच्या पायिकानी मतदान पेटचात पाच बोटांची पूजा वाहिली तिचे जोरावर कायदेमंडळात बसणाऱ्या मंडळीना सनदशीर प्रतिनिधीत्वाचे अष्टाधिकार आले आणि त्याच्या शिरसामान्यतेवर चाललेला राज्यकारभार हा लोकमताच्या प्रतिनिधीत्वाचे संपत्तिने चाललेला राज्यकारभार असा डांगोरा परकीय सत्ताधाऱ्याना सहज पिटता आला. लोकबहिष्कृत कायदेमंडळात बसलेले भाग्यवंत

"आमचे पुढारी वा प्रतिनिधीच नव्हत" असे कोणी म्हणता तर त्याला वास्तवतावादी व नैतिक सत्याचे स्वरूप असूनही कायदेशीरदृष्टचा आणि राजकारणंव्यवहारात ते प्रत्ययास येत नव्हते. अशा स्थितीत कायदेमंडळाच्या सभागृहाचे चतुष्कोनात लोकातर्फे धकेचपेटे देणारे कोणीच नाही आणि चुकूनमाकून असले, तर त्यांची दखलही न घेण्याइतके ते बाजूस पडलेले, अशी शोचनीय अवस्था आली ! त्यामुळे लोकांच्या हितसंबंधाना मात्र मनात आणले तर कायदेमंडळात व बाहेरही सुरुंग शिलगावयाची संधी परकीय सत्तेच्या पायिकाना सुतराम् मिळत गेली ! यामुळे कायदेमंडळाच्या बहिष्काराने जो राजकीय लढा निर्माण व्हावयाचा तो झाला नाही. त्यामुळे कायदेमंडळावरील बहिष्कार शिथिल करून स्वराज्यपक्षाला नव्या त्रैवार्षिक निवडणुकीपासून कायदेमंडळातील सरळ सामना उभा करण्याचा परवाना राष्ट्रीयसभेने दिला. त्याबरोबर काँग्रेस डेमॉक्रॅटिक पक्षाचे सातारा जिल्ह्याचे उमेदवार म्हणून १९२० साली मुक्रर झालेले, पण असहकाराचे अंग म्हणून कायदेमंडळावरील बहिष्काराच्या अंमलबजावणीसाठी आपली उमेदवारी रहित करून बसलेले भाऊसाहेब सोमण स्वराज्य पक्षातर्फे सातारा जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून १९२३ साली ८१६९ मते मिळवून पहिल्या क्रमांकाने निवडून आले आणि ते सर्व पक्षीयांच्या पाठबळाने. निवडणुकीसाठी ब्राह्मणेतर आपल्या पक्षाच्या भास्करराव जाधव या उमेदवाराच्या विजयासाठी सत्यशोधक समाजाच्या तमाशाचा उपयोग करीत असताही "काही वरच्या दर्जाचे मराठे एका ब्राह्मण उमेदवारास ( म्हणजे सोमणांस ) मेहनत घेऊन मदत करीत आहेत" (some of the better class Marathas are actively helping a Brahmin candidate) असा सातारा डि. पोलिस सुपरिंटेंडंट साहेबानी ता. २० ऑक्टोबर१९२३रोजी मुंबई सरकारकडे त्यावेळी रिपोर्ट करण्याइतपत सोमणांचे वजन व यश सरकारलाही जाणवले होते. या सत्रात भाऊसाहेब सोमणानी लोकपक्षीयात स्वताबद्दल आदर उत्पन्न होईल आणि परकीय सत्तेच्या रखवालदाराना अस्वली गुद्गुल्यांचा अनुभव चाखावयास मिळेल अशा तोलाने काम करून लोकसेवा बजावली. भाऊसाहेब सोमणानी त्या तीन वर्षात लँड रेव्हेन्यू कमिटीवर काम केले आणि असा अभिप्राय व्यक्त केला की "उत्पन्नाच्या १७ ते ५० टक्केपर्यंत हल्ली सारा झाला असून शेतकऱ्याच्या कुटुंबाचा खर्च व लागवडीचा खर्च हे दोनही ठोकळ उत्पन्नातून वजा जाता राहील ते निव्वळ उत्पन्न मानावे." शेतकऱ्यासंबंधी होणाऱ्या उघड उघड अन्यायावरचा हा तोडगा जसा सोमणानी सुचविला तसा त्यांच्यावर होत असलेला गुपचूप आघातही उघडकीस आणला. कोणी मरे पेन्मन् नावाच्या चहाच्या मळेवाल्याचा हस्तक सातारा जिल्हचात मुदतबंदीचे मजूर तीन महिने ( १९२५चे डिसेंबरपर्यंत ) गोळा करीत राहिल्याचा सरकारी जबाब १९२६ च्या मार्चमध्ये सोमणानी एका प्रश्नाने मिळविला. सातारा जिल्ह्यातील

विशेषतः शिराळे पेट्यातील ( जो भाग आजच्या दक्षिण साताऱ्यात आहे) सरकारी जंगलाशेजारील खाजगी पडजमिनीत असलेली झाडे सरकारी निरख देऊनही तोडण्याची परवानगी मिळत नव्हती. तेव्हा सोमणांच्या प्रश्नाने ती झाडेच मालकाकडे सोपविण्याचे काम झाले. १९२२ साली तयार झालेल्या कॅनालच्या पाण्याचे नियम सातारा जिल्ह्यातील लहान कॅनालला लागू करण्याचे कारण नसताना ते लागू करून अधिकाऱ्यानी खटाव तालुक्यात वसूलही केला होता. तेव्हा १३ ऑक्टोबर १९२४ रोजी एका प्रश्नाने सोमणानी सरकारकडून असे आश्वासन घेतले की, सातारा जिल्ह्यातील कृष्णाकॅनाल आदिकरून सहाही बारीक कॅनालवरील ३१ डिसेंबर १९२५ अखेर बागाईतदाराकडे कॅनाल नियम ११ व १२ यांची बजावणी होणार नाही. आणि एवढ्यावरच न थांबता खटाव तालुक्यातील लोकाना मुंबई सरकारचे दिवाणाना भेटवून निष्कारण वसूल झालेले त्यांचे वीस हजार रुपये सोमणानी परत देवविले. मग लहान लहान पाटबंधाऱ्याबद्दल ओढे कोरडे पडले तरी पाण्याचा कर भरावा लागे किंवा त्याची तसलमात जमा होऊन तशी वसूली होई, या सर्व प्रकारास सोमणानी आळा घालविला हे मुद्दाम सांगावयास नको. जिल्हासभेचे वेळी मागणी केल्याप्रमाणे जिल्ह्याच्या कारभाराचे अहवाल जिल्हाधिकाऱ्याकडून कायदेमंडळाच्या सभासदाना तरी विकत मिळण्याची व्यवस्था सरकारी फर्मान निघून झाली ती सोमणांच्या खटपटीने. याशिवाय लँड रेव्हेन्यू कोडाच्या दुरुस्ती विधेयकावरील चिकित्सा–समितीवर सोमणानी मर्मग्राही कामे केली आहेत.

काँग्रेसने कायदेमंडळाच्या प्रवेशाचा परवाना दिल्यामुळे भाऊसाहेब सोमणाना वरील तऱ्हेची प्रत्यक्ष लोकसेवा कायदेमंडळात करता येऊन राष्ट्रीय वृत्तीचा एक गटच्या गट जो मुंबई कायदेमंडळात परकीय सत्तेचा सामनेवाला म्हणून उभा राहिला, त्यात भाऊसाहेब सोमण हा एक सामर्थ्याचा क्षेत्रसंरक्षक समजला जात होता. एका दृष्टीने स्वता भाऊसाहेबाना, सातारा जिल्ह्याला आणि स्वराज्यपक्षाला हे सर्व भूषणभूत असले तरी, कायदेमंडळातील प्रवेशाच्या परवान्यामुळे राष्ट्रीय–सभानिष्ठ राजकारणी पक्ष दुभंगला आणि त्यात फेरवाले आणि नाफेरवाले म्हणजे असहकाराच्या मूळ कार्यक्रमात बदल हवे असणारे व नको असणारे असे दोन प्रवाह उत्पन्न झाले, एवढेच नव्हे तर त्यांचा संघर्ष निर्माण होऊन कायदेमंडळाच्या बाहेरील कार्यक्रमात या दोनही प्रवाहांच्या प्रपाताने वा वेढ्याने परकीय सत्तेचे सूत्रसंचालक, सर्वाधिकारी व मानकरी घेरले जाण्याऐवजी त्या संघर्षातून वीजही नाही आणि रीजही नाही अशी दुरवस्था समाजात निर्माण होण्याचा प्रसंग ओढवू पहात आहे, आणि राष्ट्राच्या अंतिम हिताचे दृष्टीने ते घातक आहे, हे भाऊसाहेब सोमणानी पक्के ओळखले होते. सुरतेचा प्रसंग झाल्यानंतर दुभंगलेल्या राष्ट्रीय–सभेच्या परिणामापेक्षा या नव्या दुरवस्थेचे परिणाम शल्य म्हणून राष्ट्रीय अंतरंगात

राहणे हा एक दुःसाध्य रोग होईल आणि तो लक्षात आला असता त्याच्या परिहाराकरता प्रयत्न न करणे पातक ठरेल हे भाऊसाहेब सोमणांच्या मनाने पक्के घेतले. सुरतेनंतर राष्ट्रीय सभेची सूत्रे आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी मवाळ मंडळीनी आपली एक साचेबंद घटना बनविली आणि जहाल मंडळीनी तिच्यावर बहिष्कार घातला ही गोष्ट खरी. पण आपल्या घटनेचा हट्ट धरण्यापलीकडे मवाळमंडळी काही करू शकत नव्हती; जनतेत त्या घटनेचा प्रचार करून आपल्या शिस्तबाजीचा उद्‌घोष करावयास ते गेले असते, तर राष्ट्रीयसभेच्या स्वराज्यचतुःसूत्रीतील बहिष्काराबाबत परकीय सत्तेची मर्जी मोडण्याचे धाडस या मंडळीत नाही म्हणून आपल्या त्या दुबळाईवर शिस्तखोरपणाचे पट्टे ही मंडळी चढवीत आहेत, अशा समजुतीच्या अफाट जनतेने त्याना तोंड काढू दिले नसते. या पक्क्या जाणीवेमुळे मवाळ पक्ष आपल्या परीने काही हालचाल करीत नव्हता, तर जहाल पक्ष हा प्रमुखतः लोकमान्य टिळकांचा पक्ष असल्याकारणाने त्यांचे पुढारीपण मोडून काढण्याचा निश्चय करून बसलेल्या परकीय सत्तेने टिळकपक्षाचे मोहरेच नव्हे तर चिल्लरही दडपशाहीच्या भटारखान्यात धगधगत ठेवली होती. अशा विपन्नावस्थेत राष्ट्रात काही राजकीय कर्मयोगाची संगोपना वा उभारणी होण्याऐवजी, "येता अशुभसा काळ नवा। सुखाने ध्येय मनी सेवा ।। स्वकर आवरा, कूर्म गुरु करा ।।" असा उपदेश जनतेस झाला असला आणि तिने तो ऐकला असला तरी स्वताच्या हातानी स्वताचे नुकसान करून घेतले आणि परकीय सत्तेच्या हाती राष्ट्राला आवळावयास अधिक अवसान दिले, अशी विवंचना तरी निर्माण होण्याची पाळी नव्हती. फेर–नाफेर पक्षांच्या चाललेल्या सद्धेतुप्रेरित लोक–शिक्षणात्मक प्रचारात देखील ज्यावेळी परस्पर वैयक्तिक अनादरापासून धिक्कारा–पर्यंत आपटबार उमटू लागले, तेव्हा दोन शहाण्यांच्या दुफळीमुळे जनता तर "किं कर्म, किमकर्मेति" म्हणू लागेलच, पण राष्ट्रीयसभानिष्ठ पक्षातील या संघर्षाचा फायदा परकीय सत्तेचे ठेकेदार उठविल्याशिवाय सोडणार नाहीत, याची रुखरुख भाऊसाहेब सोमणाना लागून राहिली. त्यामुळे सातारच्या समेटभूमीत १९१४ सालसारखा नवा प्रयत्न करण्याचे त्यानी आपल्या सहकारी मित्रांच्या मदतीने ठरविले आणि १९२५ साली साताऱ्यास बॅ. रामराव देशमुख यांचे अध्यक्षतेखाली प्रांतिक परिषदेचे अधिवेशन घेतले. राष्ट्रीयसभानिष्ठापैकी कोणाच्याही हाती राष्ट्रीयसभेची सूत्रे राहिली तरी राष्ट्रीयसभेला एकाद्या मठाचे वा तटाचे संकुचित स्वरूप येऊ नये आणि महात्मा गांधीनी कॉंग्रेसची सूत्रे हाती घेतल्यापासून देशात जे ओज उत्पन्न झाले ते कमी न होता कॉंग्रेससंस्था सर्वसंग्राहक करता यावी म्हणून (१) स्वता कातलेले सूत देऊन कॉंग्रेसचे सभासद होणे (२) सुताच्या किमतीबद्दल अल्पशी वर्गणी रोखीने देऊन कॉंग्रेसच्या विधायक कार्यक्रमापैकी एकाद्या बाबी-प्रीत्यर्थ प्रत्यही विवक्षित काळ अंगमेहनतीने खर्ची घालणे (३) रोखीने वर्गणी

देऊन काँग्रेसच्या बहिष्कार–समितीने ज्या विदेशी वस्तूंचा बहिष्कार व्यवहार्य आहे असा अभिप्राय दिला त्यापैकी एकाहून अधिक वस्तूंचा बहिष्कार आचरणशुद्ध राखण्याची प्रतिज्ञा करणे, (४) रोखीने काँग्रेसची वर्गणी भरून शहरात स्थाईक वा अन्यरीत्या राहिलेल्या सुबुद्ध वा पांढरपेशा माणसाने खेडेगावच्या परिस्थितीचा अभ्यास करण्याकरता किमानपक्षी तेथे पंधरा दिवस राहण्याची अट पाळणे,–असे पर्याय त्या प्रांतिक परिषदेच्या स्वागताध्यक्षीय भाषणात "सुतास मता"ला भाऊसाहेब सोमणानी सुचविले. "सुतास मत" या दंडकातील जो हेतू की प्रत्येक राष्ट्रभक्ताने शेतकरी–गरीब–वर्गाशी समरस झाले पाहिजे, तो सोमणानी वरील पर्याय सुचविताना बिलकुल दृष्टिआड केला नव्हता आणि म्हणून परिषदेपुरतेच बोलावयाचे तर सोमणाना त्या वेळी अपेक्षेपेक्षाही अधिक यश मिळाले. तथापि अपेक्षित परिणामांच्या मोजमापाने बोलावयाचे तर १९०७ साली काँग्रेसच्या सत्ताधाऱ्यानी जे केले त्याचीच पुनरावृत्ती याही वेळी झाली. अर्थातच "यत्ने कृते यदि न सिध्यन्ति कोऽत्र दोषः।" एवढेच समाधान सोमणाना व सातारा जिल्ह्याला मानून घ्यावे लागले.

आणि तरीही कर्मयोगी सोमणाना आपल्या खेड्यापाड्यापासून भरलेल्या खऱ्या भारताची सेवा करावयाचीच असल्याकारणाने कायदेमंडळातील कामाबरोबर आणि न्यायमंदिरातील आपल्या व्यवसायाबरोबर खेड्यापाड्यांच्या उन्नतीसाठी करता येणारे ते सगळे करीत रहावयाचे असा व्रतधारीपणा सोमणानी चालू केला. कृष्णाकॅनाल बागाइतदार संघाचे सल्लागार म्हणून भाऊसाहेबानी अनेक वर्षे म्हणजे १९३७ पर्यंत काम केलेच आणि तारळे–पाटण सारख्या मागासलेल्या डोंगराळ भागातील शेतकरी आपल्या दुःखांची दाद भाऊसाहेब सोमणांच्या मार्फतच लावून घेत असत. सातारा जिल्हासभेची अधिवेशने चालू होतीच; त्यात 'सुतास मत' म्हटल्यामुळे जो सांप्रदायिकपणा यावयाचा तो अपरिहार्य असेल तेवढ्या प्रमाणात पत्करून सातारा जिल्ह्याचे प्रश्न सर्वसंग्राहक वृत्तीने सोडविण्याचे काम चालूच होते. सर्वसंग्राहक जिल्हासभेला राष्ट्रीयसभानिष्ठेचा आणि म्हणूनच 'सुतास मताचा' जो काहीच्या मते उपसर्ग लागला त्याचे खरे कारण जिल्हासभेने देखील आपल्या सर्वसंग्रही व समन्वयी धोरणाला आणि कार्यप्रणालीला स्वराज्यसन्मुख अशा सामर्थ्यसंवर्धनाची जोड दिली पाहिजे असा काळाचा ओघ उठावाने आला होता. सर्वसंग्राहक जिल्हासभा सदिच्छाप्रवर्तक मंडळ होण्यापलीकडे कार्यशाली होऊ नये आणि "सर्वेषाम् अविरोध" होत रहावा एवढ्या अजीजीने तिने कार्य–करीत रहावे असा आवाका ठेवण्याने कर्तृत्वशून्य राहण्याची पाळी येत असल्या–कारणाने, स्नेहसंमेलनाच्या गमतीबाजी पुरती जिल्हासभेची मोडमांडणी असावी अशी इच्छा बाळगणाऱ्या सत्प्रवृत्तांची त्याबाबत १९२२ सालापासून निराशा

झाली आणि भाऊसाहेब सोमणाना त्या वृत्तीतील मंडळींचा वाईटपणा, जिल्हासभेला लोकमताचे कणखर प्रतिबिंब बनविताना, स्वताच्या मनात नसूनसुद्धा घ्यावा लागला. तो घेऊन जिल्हासभेचे कार्य चालते-चालविते ठेवताना, दुसऱ्याही स्वतंत्र चळवळीकडे भाऊसाहेब आपुलकीने जिल्ह्याच्या सेवाबुद्धीने पहात होतेच. जावली पाटण तालुक्यातील कोयनाखोऱ्यात हेळवाकपर्यंत ५० मैल लांब व ८ मैल रुंद असे मोठे थोरले धरण बांधून टाटा कंपनी वीज उत्पन्न करणार आणि ती वीज मुंबईच्या सेवेला नेताना, कोयनाखोऱ्यातील कोकण्याना आपल्या घरादाराला व जमिनीला मुकावे लागणार असे काजवे १९२६ पासूनच सातारा जिल्ह्यात चमकत होते. त्या सालच्या जून अखेर टाटा कंपनीने आपली योजना सरकारपुढे मांडली होती. भाऊसाहेब सोमणानी त्याबाबत प्रश्न विचारून, "सर्व कांही लोकसंमतीने होईल असे सरकारकडून आश्वासन घेतले होते. तथापि घरादाराला मुकताना धरणाचे कामावर त्या कोकण्याला मजूर म्हणून काम मिळावे, त्याच्या मुलाबाळांच्या नुसत्या पुस्तकी शिक्षणाचीच नव्हे तर धरणासाठी चालणाऱ्या कामास अनुसरून लोहारकी-सुतारकी-गवंडीकी अशा धंदे-शिक्षणाची तरी निदान सोय व्हावी, धरणाखालीं बुडणाऱ्या कोकण्याच्या घरादाराबद्दल व जमिनीबद्दल बाजार-दराने होणारी रक्कम त्याला मिळून त्या रकमेची मुदतबंद ठेव व्हावी व त्या कोकण्याला वर्षाचे वर्षास सरकारी निरखाप्रमाणे व्याज मिळावे-अशी काही तरतूद मात्र होणार नाही; ह्या उभय जाणिवानी मेंदू घेरल्यावर सोमणांच्या मनाने मूळ तो कोकण्याच त्या धरणासंबंधात जागृत केला पाहिजे, असे खास घेतले. म्हणून तेथे १९२७ मध्ये मुख्यत: परचुरेशास्त्री, बाबा बहुलेकर व शाहीर एकबोटे याना प्रचारक पाठवून त्या डोंगरपठारातूनही टाटा कंपनीला धरणाची परवानगी देऊन सर्व प्रकारची मदत करणाऱ्या पण कोयनाखोऱ्यातील शेतकऱ्यांच्या सुखदु:खाबद्दल बेपर्वा राहणाऱ्या ब्रिटिश राजनीतीबद्दल वाईच्या गणेश हरी खऱ्यानी १९२६ साली जे कार्य सुरू केले होते ते पुरे केले. हा जागर करविण्यात भाऊसाहेब सोमण यानी प्रामुख्याने पुढाकार घेतला आणि कोयनाधरणाखाली सापडणाऱ्या गावाच्या लोकांच्या दोन सभाही घेतल्या. त्यात ता. १३ मे १९२८ रोजी तळोशीच्या पायथ्याशी देवघर नावाच्या खेड्यात १२०० लोकांची झोळा-ईच्या वनात सभा झाली ती महत्त्वाची ठरली. कारण कोयनाधरणातील शेतकऱ्यांच्या सहानुभूतीने त्यांच्या अडचणीना वाचा फोडण्यास सातारा जिल्ह्यातील व महा-राष्ट्रातील नामांकित कार्यकर्ते एकत्र आले होते. त्यामुळे त्या कोकण्या शेतकऱ्याना मोठा धीर आला. त्या सभेमुळेच पुढे नानासाहेब देशपांडे यानी प्रश्न पत्रोत्तरे सरकारशी केली, त्यात "कोयनेचे धरण तूर्त लवकर होणेचा संभव नाही. तथापि जेव्हा होईल तेव्हा लोकाना तक्रारी मांडण्यास पूर्ण संधी देण्यात येईल" असे २४०७।२७ एम्. मुंबई कॅसल ता. ११-७-२९ ने मुंबई सरकारचे आश्वासन मिळाले."

या प्रासंगिक चळवळीबरोबर जिल्ह्याच्या स्थायी स्वरूपाच्या प्रवाही जीवनावर भाऊसाहेब सोमणानी अखंड लक्ष राखलेच होते. याच १९२२–२७ च्या पंचवार्षिक कालखंडात सत्यसमाजाची चळवळ जोरात झाली. सदर चळवळीत ब्राह्मण मंडळीवर तेवढे हत्यार उपसले गेले आणि सोमणही ब्राह्मणसमाजात जन्माला आले असल्यामुळे त्या हत्याराचा प्रसाद थोडाफार सोमणानाही मिळाला. सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागात भाऊसाहेब सोमण व नाझर कचेरीतील लिमये गुरुजी हे फिरतीवर असता त्यांच्यावर दगडमार झाला व त्यांत लिमये गुरुजींचा डोळा कायमचा दुखावला. आपल्यावर झालेला हल्ला दुसऱ्याच्या दुःखास कारणीभूत झाला याबद्दल भाऊसाहेब सोमणाना जन्मभर हळहळ होती. पण सत्यसमाजाच्या धुरंधरांची विचारपूस एकाद्या थोरल्या भावाप्रमाणे भाऊसाहेब सोमणानी केलीच केली आणि १९२७ सालात तुकडेपट्टीच्या बंदीचे विधेयकास विरोध करण्याचे आंदोलन सुरू झाले असता, शेतकऱ्यांच्या तुकडेबंदीचे अंमलबजावणीतूनच येणाऱ्या बेकारीवर तोडगा निघत नाही तोपर्यंत, एरवी राष्ट्रीयदृष्ट्या अवश्यक असलेल्या त्या आर्थिक नियोजनाला अपरिहार्यपणे तोंड द्यावयास शेतकरी समाज स्वताच उभा रहावा म्हणून सत्यसमाजाच्या दिनकरराव जवळकराना जवळ करण्यात आणि आपल्या मोटारीतून त्यांच्या दौऱ्याची स्वतःसमवेत सोय करण्यात भाऊसाहेब सोमणानी हौसच मानली. शेतीचे बारीक बारीक तुकडे झाल्याकारणाने ‘जान देईन पण जमीन देणार नाही’ या शेतकऱ्यांच्या म्हणण्यात आता जीव उरला नाही, हे त्या बिलाचे जनक सर चुनीलाल मेहता व त्यांचे दुसरे पुरस्कर्ते यांच्याप्रमाणे सोमणाना दिसत नव्हते असे नाही; पण गाव नमुनेदार करण्याकरता बारीक सारीक तुकड्यांच्या जमिनी उडवून मोठमोठे जमीनदार उत्पन्न करण्यात, हजारो हजार शेतकऱ्यांच्या तोंडचा अर्धामुर्धा घासही काढून घेऊन राष्ट्रात बेकारांची भलती भर होईल आणि फायदा झालाच तर सरकारला आपला सारा बिनधोक वसूल करण्यात होईल. “तेव्हा हिंदी शेती ही राष्ट्रीय संपत्ती आहे हे जाणून त्या शेतीची आणि शेतकऱ्यांची सुधारणा करण्याकरिता ठराविक प्रमाणाखाली जमिनीचे तुकडे होऊ देता कामा नयेत हे अंतःकरणपूर्वक मान्य असेल तर पहिल्या प्रथम या गोष्टी करा. कमीत कमी दोन डोयापर्यंत हल्लीच्यापेक्षा शेतसारा एक कपर्दिकेनेही वाढणार नाही याबद्दल खात्री करा. त्यायोगे शेत कसण्यास उत्तेजन येऊन शेतकऱ्यास जरा तरी हातपाय हलविण्यास सवड सापडेल. त्याचबरोबर तुमचे जे काही जमीननिहाय व गावनिहाय ठराविक प्रमाण ठरेल ते कमीत कमी पण भरपूर मुदतीनंतर अमलात येईल असे जाहीर करून ठेवा म्हणजे ठराविक प्रमाणाइतकी जमीन पैदा करावयाची अगर आहे ती जमीन सोडून दुसराच उद्योग करावयाचा, याची निश्चिती शेतकऱ्यास करता येईल. सदरच्या कमीतकमी पण भरपूर मुदतीत शेतकऱ्यांच्या मुलाना तरी साक्षर करून पुस्तकी पोपटपंचीपेक्षा

काही विधायक आणि उत्पादक धंद्याचे वळण लावा आणि शेतीची सुधारलेली कला हिंदी परंपरेशी मिळती घेऊन शिकवा." सरकारला करावयाच्या खड्या सवालाची हीच विचारसरणी भाऊसाहेब सोमण व त्यांचे सहकारी यांची होती. ती ता. २ मे १९२८ रोजी पुणे सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात भरलेल्या सातारा जिल्हा सभेच्या कार्यकारिणीनेही पसंत केली व आपल्या ठरावाने तिच्यावर शिक्कामोर्तब केले. एवढेच नव्हे तर पुढे तालुका परिषद भरता भरता सातारा जिल्हा शेतकरी परिषद इसलामपूर येथे अहमदनगरचे नामदेवराव नवले यांचे अध्यक्षतेखाली ८ जुलै १९२८ रोजी होऊन वरील विचारसरणी शेतकऱ्यानी उचलून धरताच सरकार नमले.


जिल्ह्यातील खेडेन्खेडे संघटित झाले पाहिजे म्हणून सातारा तालुक्यात प्रारंभीचा श्रीगणेशायनमः करण्याकरता, गाव नि गाव टिपून काढणारा प्रचारक म्हणून परचुरेशास्त्र्यांची योजना भाऊसाहेबानी ११ सप्टेंबर १९२७ रोजी केली आणि परचुरेशास्त्र्यांच्या चिकाटीने व स्वताच्या मार्गदर्शनाने भाऊसाहेब सोमणानी खेडुताना बोलते करण्याचे श्रेय मिळविले. परचुरेशास्त्र्यांच्या अखंड यात्रेमुळेच १९२९ सालीं २ मार्च रोजी सातारा तालुका खेडकरी परिषद भरली. सातारा न्यू स्कूलमधील त्या सभेस पुण्याचे शंकरराव भागवत, ठेंगडी, फुले, आचार्य रबडे, काशीबाई देवधर, श्रीमती डॉ. साठे वगैरे मंडळी मुद्दाम हजर होती. या सभेत ऐंशी शेतकऱ्यानी आपली गाऱ्हाणी आपल्या तोंडाने सांगितली. असाच धीटपणा अंगी मुरला, बाणला म्हणजे राष्ट्रीयतेने पुलकित झालेला कोणी धीर–पुरुष शेतकऱ्यांचे आणि खेडकऱ्यांचे पुढारीपण नेटाने करीत राहील, अशी तेजस्वी परंपरा त्या बहुजनसमाजात उत्पन्न होण्यातच राष्ट्राचा उद्धार व लोकशाहीच्या तळमळीने देशसेवेसाठी धडपडणाऱ्या पुढाऱ्यांच्या श्रमाचे चीज आहे, हे भाऊसाहेब सोमणानी १९२५ साली प्रांतिक परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून काढलेले उद्‌गार सार्थ नाहीत असे कोण म्हणेल? म्हणूनच सातारा ग्रामसेवा संघाचे अभिनंदन विलेपार्ले येथील प्रांतिक परिषदेत झाले.

१९२७ साली मे महिन्यातील ९ तारखेस राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष श्रीनिवास अय्यंगार यांचा दौरा कराड, सातारा, वाई, पाचगणी, महाबळेश्वर असा होऊन जनतेचा उत्साह वाढला आणि राष्ट्रीय सभेच्या शिस्तीचे स्वयंसेवक–दल सातारा राष्ट्रीय शाळेच्या पटांगणावर ता. २६ डिसेंबर रोजी स्थापन झाले. पुढे त्याच्या जिल्हाभर शाखा उत्पन्न होत गेल्या. ता. ११ सप्टेंबर १९२९ रोजी सेवादलाचे काम पहाण्यासाठी डॉ. हर्डीकर जिल्हाभर हिंडले असता आप्पासाहेब आळतेकर, आण्णासाहेब चिरमुले, भाऊसाहेब सोमण यांच्या तोलाची मंडळी युनिफॉर्ममध्ये सेवादलाचे सहाय्यक म्हणून वावरताना पाहुन हर्डीकराना केवढे समाधान झाले असेल! आपली पन्नाशी उलटल्यावरही सेवादलाचा गणवेश अंगावर घालून ती मंडळी उभी राहिली याचे कारण तरुणानाच तसली लष्करी शिस्त पाहिजे असे नव्हे तर राष्ट्रसेवक म्हटल्याबरोबर "वृद्धोऽपि तरुणायते !" अशी वृत्ति समाजात बाणली पाहिजे हा त्या सर्वांचा उद्देश होता. महाराष्ट्र सेवादलाचे अध्यक्षच भाऊसाहेब

सोमण होते. त्यांच्या सल्ल्याने डॉ. आठल्ये, सासवडकर, मोडक, यानी ता. ७ नोव्हेंबर १९२९ रोजी स्वयंसेवकांचे एक शिबीर उघडले, आणि त्यात आण्णासाहेब भोपटकर, वासुदेवराव मुंडले, नाथ घाणेकर, मामासाहेब देवगिरीकर, शंकरराव देव, डॉ. आठल्ये वगैरे आधिकारी अभ्यासूंची बौद्धिके झाली. सेवादलाच्या कार्यक्रमाबरोबरच व्यायामशाळेला उत्तेजन देण्यास सोमण विसरले नव्हते. २९ डिसेंबर १९२९ रोजी गजानन व्यायाम शाळेच्या वार्षिक समारंभाच्या सभेत "सदर व्यायाम शाळा उगवत्या पिढीच्या शारीरिक सुदृढतेची वाढ करण्याच्या दृष्टीने स्थापिली आहे. या योगे कालानुरूप आपल्या मायभूमीला ते तिच्या प्रस्तुत शृंखलातून मुक्त करू शकतील" असे सांगून सोमणानी व्यायाम शाळेला शंभर रुपयांची देणगी दिली.


राष्ट्रीयसभेच्या शिस्तीचे स्वयंसेवक वरील प्रकारे तयार होऊ घातले होते तोच १९२८ च्या प्रारंभी हिंदुस्थानला नव्या राजकीय सुधारणा देण्याच्या मिषाने सायमन सप्तक आले. या सप्तकावरील सार्वत्रिक बहिष्काराची तारीख ३ फेब्रुवारी होती. जिल्ह्यात दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत कडकडीत हरताळ झाला. सरकारी धोरणाचा पोकळपणा जनतेला समजावून देण्यात आला. त्याच बहिष्काराच्या दिवशी झालेल्या लाला लजपतरायावरील लाठी हल्ल्याचा निषेध करण्यात सातारा जिल्ह्यातील सर्व पक्षियानी जो समान पातळीवरून भाग घेतला, तो जितका स्वयंप्रेरणेने तितकाच भाऊसाहेब सोमणांच्या सर्वसंग्राहक धोरणाने.

१९२८ ची कॉंग्रेस झाल्यावर १९२९ साली ११ जानेवारीलाच वाईस रामभाऊ भावे वकिलांचे अध्यक्षतेखाली कलकत्ता कॉंग्रेसचा संदेश सांगून बाबूराव वैद्य व भाऊसाहेब सोमण यानी नेहरू रिपोर्टात सांगितलेले स्वराज्य आम्हास पाहिजे असे शिंग फुंकले. याचे सादपडसाद जिल्हाभर उठता उठताच ता. २८ मे ते १ जून पर्यंत सातारा जिल्ह्याच्या पूर्वभागात नेहरू रिपोर्ट, खादी व बहिष्कार यांच्या प्रचारार्थ पांडुआण्णा शिराळकर आणि बाबूराव वैद्य यांच्यासह भाऊसाहेब सोमणानी दौरा काढला. जागृतीची ही वीज जिल्हाभर अशी चमक मारत गेली की १९२१ प्रमाणेच कॉंग्रेसच्या सभासदांची संख्या ( अपेक्षित २५०० असता ) ४२४३ झाली. कॉंग्रेसच्या कार्यक्रमाच्या प्रचारातून 'स्वातंत्र्याची तुतारी' ऐकू येऊ लागली आणि आपल्या लोकोत्तर प्रायोपवेशनाने देशासाठी देह ठेवणारा जतीन्द्र, तरुण अंतःकरणाना उत्थापन देण्यास कारणीभूत झाला. प्रचंड मिरवणूक काढून साताऱ्यास सोमणांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेप्रमाणेच जिल्ह्यात इतरत्र झालेली भाषणे स्वातंत्र्याची तळमळ उत्पन्न करणारीच होती. इतक्यात "काळा" च्या काळ्याकभिन्न चेहऱ्यावर "स्वातंत्र्य" ही अक्षरे महाराष्ट्रीय तरुणास वाचावयास शिकविणारे "काळकर्ते" परांजपे कालवश झाले! २९ सप्टेंबर रोजी त्यांच्या दुःखप्रदर्शनार्थ भरलेल्या सातारा जिल्ह्यातील सभातून भाऊसाहेब सोमणांच्या प्रमाणेच "हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीनेच आण्णासाहेब परांजप्यांच्या आत्म्याला मोक्ष मिळो" अशा प्रार्थना करण्यात आल्या.



प्रांतिक हिंदुस्थानी सेवादल शिबिर, सातारा १९२९

छायाचित्रांतील डाव्या बाजूस उभ्यापैकी शेवटून प्रारंभ करून १० वे श्री. **भाऊसाहेब सोमण** (सेवादल प्रांतिक शाखेचे अध्यक्ष ) बसल्यापैकी निशाणाच्या डाव्या बाजूस डॉ. आठल्ये (प्रांतिक शाखेचे सेक्रेटरी) आणि उजव्या बाजूस शिबिर प्रमुख श्री. साखवळकर.



– सातारच्या व्यायाममंडळात – ( १९३७ )
पंतप्रधान नामदार बाळासाहेब खेर यांचे समवेत भाऊसाहेब

# ८ अग्निदिव्य

१९२९ च्या राष्ट्रीय सभेने "स्वातंत्र्य" हेच हिंदुस्थानचे ध्येय जाहीर केले आणि त्या ध्येयासाठी लोकांचा लोकानी आचरावयाचा राजकीय मार्ग 'मिठाच्या सत्याग्रहाचे रूपाने' महात्मा गांधीनी घालून दिला. त्यासरशी एक तऱ्हेचा विद्युत् संचार होऊन जबाबदार लोकांच्या हालचाली होऊ लागल्या. कायदेभंगाची पथ्ये, कुपथ्ये लोकाना समजावण्यात आली. हिंदुस्थानी सेवादलाचे चिटणीस डॉ. आठल्ये याना फेब्रुवारी १९३० मध्ये पुण्यास पाचारण होऊन त्यास महाराष्ट्र कायदेभंग–मंडळावर नेमण्यात आले. तेथून पुढे शांतिसंग्रामार्थ सातारा जिल्ह्याचा हात हलू लागला. मार्च उगवताना सातारा जिल्हाधिकारी म्हणून दत्तात्रय कृष्ण गोसावी नेमून आले. वाईची प्राज्ञपाठशाळा व सातारचे टिळक राष्ट्रीय विद्यालय यातील शिक्षक व जाणते विद्यार्थी मार्चचे अखेरीस आपली दप्तरे गुंडाळून स्वयंसेवकांच्या विजारी व पिशव्या घेऊ लागले. ठिकठिकाणचे कार्यकर्ते चळवळीच्या उठावासाठी घाम गाळू लागले. या साऱ्या गजबजणाऱ्या रंगभूमीवर भाऊसाहेब सोमणांची हालचाल नजरेत भरणारी कोणा प्रेक्षकास आढळली नाही, तरी सरकारच्या पारदर्शक चष्म्याला ती न्याहाळता आली. सातारचे "संग्राम–मंत्री" म्हणूनच त्यांच्याकडे सरकारची नजर राहिली. रंगभूमीपेक्षा रंगपटातून अगर पडद्यामागून नटांच्या हालचालीवर नजर ठेवणाऱ्या, किंवा त्यापेक्षाही समर्पक रीतीने बोलावयाचे तर आपल्या तंबूत बसून दुर्बिणीतून आपल्या सैन्याच्या हालचाली न्याहाळणाऱ्या आणि संदेशवाहकावरून शिस्तबद्ध संचलन करविणाऱ्या आधुनिक सेनापतीचा दिमाख इंग्रज सरकारने सोमणांच्या पार्श्वसंगीतातून चाखला. चळ–वळीपायी आपल्या प्रस्तुत प्राप्तीतील पंचवीस टक्के सोमणानी वाहिलेच होते, आणि आपल्या सल्लामसलतीने व समाचार–सहानुभूतीच्या धोरणाने सातारा जिल्ह्याचे ते अनभिषिक्त नियंत्रक आहेत याची पुरेपूर जाणीव सरकारला झाली होती. कारण, शेतसाऱ्यात सूट मिळावी म्हणून सरकारकडे सातारा जिल्ह्यातून शेतकऱ्यांचा जो अर्ज झाला त्याच्यावर शेतकऱ्यांच्या सह्या मिळण्यास भाऊसाहेब सोमणांची प्रेरणा कारण आहे, असेच शेतकरी व त्यांचे पुढारी उघड उघड सांगत. जुलै १९३० मध्ये व नंतर बिळाशीला जो जंगल सत्याग्रह झाला आणि त्यानंतर इंग्रजी राज्याच्या सत्तासूत्राना जो तुटकपणा आला, तो सांधण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यानी सोमणांची आराधना वरील भावनेनेच केली होती आणि त्यांच्या सहकार–सौजन्यावर भर ठेवला होता. "बिळाशीचा राष्ट्रीय झेंडा उतरण्याच्या गोष्टीकडे आम्ही दुर्लक्ष करतो; पण फॉरेस्ट मधील लोकानी आणलेला सागवानी सोट लिलावात नाममात्र किंमतीस तरी लोकानी घ्यावा व सरकारची इज्जत राखावी, असा प्रयत्न सोमणानी करावा," असाही निरोप सरकारी गोटातून

सोमणांच्याकडे आला व पाऊस असला तरी वहातुक नसलेल्या त्या डोंगराळ भागात सोमणाना जिल्हाधिकाऱ्यानी घोड्यावरून नेण्याची तयारी दर्शविली. तथापि "आपल्याला घोड्यावर बसता येत नाही !" असे सोमणानी मार्मिक उत्तर केले. त्यायोगे तरुणांचा व राष्ट्रीय चैतन्याचा तेजोभंग आपल्या सहकार–सौजन्याने करू देण्याइतकी "दिसे ठेंगणी मूर्ति बावळीशी।" आहे, ही सरकारची कल्पना गडगडली आणि भाऊसाहेब सोमणांचा प्रत्यय अपेक्षेबाहेर येऊ लागला. माणुसकीचे कायदे पाळणे हे जसे कोणाही प्रामाणिक माणसाचे कर्तव्य, तसेच अन्याय्य कायदा अवमानणे व त्याला न्याय्य स्वरूप येईपर्यंत कायदेभंगाबद्दल सरकार देईल ती शिक्षा आनंदाने सहन करणे हेही त्याचे कर्तव्यच. लोकातील अशा वृत्तीशिवाय लोकशाही म्हणजे केवळ थट्टा होईल. हीच शिकवण शांतिसंग्रामाशी संबंधित असलेले घटक लोकाना देत होते. त्यामुळे सातारा जिल्ह्यातून दोन हजार लोक शांतिसंग्राम लढवावयास तयार झाले, आणि नव्या दमाचे नवे शूर शिपाई खेड्यापाड्यातून व बहुजन समाजातून पुढे येऊ लागले. या गोष्टीइतका आनंद भाऊसाहेबाना दुसऱ्या कशातच नव्हता. त्यामुळेच सत्याग्रहीना धरणे आले की, भाऊसाहेब सोमण त्यास हार घालीत व त्याना न विचारताच त्यांच्यापैकी ज्यांची कुटुंबे असहाय्य स्थितीत असल्याचे कळले वा निदर्शनास आले, त्यांचे कुटुंबाकडे भाऊसाहेब सोमणानी हस्ते परहस्ते अयाचित मदत पोचविण्याची दक्षता घेतली. सोमणांच्या या काळजीवाहू संचालनाचा वास दुरून का होईना सरकारास असल्यामुळेच, सातारा जिल्ह्याला आपल्या सार्वजनिक जीवनात एक कुटुंब मानणाऱ्या भाऊसाहेब सोमणाना १९३० च्या चळवळीचा पाठकणाच सरकार मानीत राहिले, तर नवल नाही.

महात्मा गांधींच्या चळवळीमागे लाखो लोक जात आहेत, हा एक ब्रिटिश साम्राज्याला बेअब्रूचा डाग आहे असे मानून तो धुवून काढण्यास ब्रिटिश सरकारलाच आपली निष्ठा लोक सादर करतात, हे दृश्य जगापुढे उभे करावे, म्हणून मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांची सातारा जिल्ह्याला भेट व्हावयाची व तेथे सातारा–कराड नगरपालिकांची नामदार–साहेबाना मानपत्रे मिळावयाची, असा कार्यक्रम मुक्रर झाला. १९३० जुलैच्या १२ व १३ तारखा त्यासाठी ठरल्या. एकोणिसाव्या शतकात गव्हर्नरसाहेबाना सालोसाल सातारला मिळालेल्या मानपत्रावर आणि कैसरीकंदनाचे (१९१४–१९१८) वेळी सातारा जिल्ह्यातून झालेल्या रंगरूट–भरतीवरून, विशेषता माँटफोर्ड सुधारणांचे तांबड फुटल्यापासून चाललेल्या ब्राह्मणब्राह्मणेतरवादाच्या वावटळावरून, नि नगरपालिकातून लोक–प्रतिनिधी म्हणून बसलेल्या दमदार राजनिष्ठांच्या भरंवशावरून, परकीय सत्तेने वरील दृश्य उभारले होते. पण बदललेला काळ, लोकाना राजकीय शिक्षण मिळाल्यामुळे झालेली जागृति, आणि निवडणूकपेट्यातील मतापेक्षाही लोकमताचा सामूहिक आविष्कार या बाबतीतील सरकारचा तौलनिक हिशेब शून्यप्राय ठरला. लोकाना दबाब वाटावा म्हणून त्या सुमारास साताऱ्यातून पलटणीची परेड काढ-

ण्याची प्रथा पाडण्यात आली होती. गव्हर्नरसाहेब फिरकावयाच्या वाटेवर तीन तीन तास कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला, आणि तरीही ता. १२ जुलै रोजी काळ्या निशाणांच्या माळांच्या माळा गव्हर्नरसाहेबांच्या स्वागतार्थ सज्ज राहिल्या. गव्हर्नरांचे रस्त्यावरील प्रत्येक घरावर राष्ट्रीय निशाण फडकत होते. गुरुवारचे परजावरून नगरपालिकेत मानपत्रासाठी गव्हर्नर जावयाचे तर लाठीबंद पोलीसानी लोकाना सगळे रस्ते रोखले होते. त्या पोलिसांच्या साखळीबाहेर दहा हजार लोक काळी निशाणे फडकवितच होते. या बहुजनसमाजातच भाऊसाहेब सोमण सामील होते. नगरपालिकेच्या वाटेवरील राजवाड्यासमोरच्या जवाहरलाल बागेत राष्ट्रीय झेंड्याचे रक्षण करीत स्वयंसेवक उभे होते. सकाळीच सत्याग्रह शिबिरातून प्रभातफेरी काढून शिबिर-प्रमुख बाबा लेले यानी तो झेंडा उभारला होता व तेथून निषेधाची मिरवणूक घेऊन बाबा गुरुवारचे परजावर गेले होते. बागेजवळील झेंड्याचे संरक्षणार्थ दोघा दोघा स्वयंसेवकांची योजना केली होती. एक, दोन, तीन जोड्याना सरकारने पकडून नेले. झेंड्याच्या संरक्षणाला आता अन्य कोणी पाठविण्यात अर्थ नाही. त्याच्या संरक्षणार्थ आता येईल ते संकट आपणच ओढवून घेतले पाहिजे, कारण येथे "आले तर संकट जसे उग्रतम, तसेच त्याला तोंड देणारांची संख्या आकड्यापेक्षा मातबरीने गव्हर्नरसाहेबाच्या डोळ्याना पटली तरच परकीय सत्तेच्या डावांचा पराभव होऊन, राष्ट्रीय चळवळीला तेज चढेल" असा विचार मेंदूवर कळत न कळत चमक मारून जात असताच, मूळच्या पकडलेल्या स्वयंसेवकांची जागा भाऊसाहेब सोमणानी घेतली आणि त्याना पाहिल्याबरोबर सरकारी हस्तकांच्या आक्रमक हालचाली थंड पडल्या. झेंड्याच्या रक्षणाला एकटे भाऊसाहेब उभे आहेत हे कळताच गुरुवारच्या परजाकडून परतलेल्या सत्याग्रह्यांच्या मेळाव्यातील बाबा लेले, रामभाऊ मोडक, विठ्ठलराव हडप पोलीसांची रांग पांगवून भाऊसाहेबांच्या जवळ जाऊन उभे राहिले. नव्या राजवाड्यात गव्हर्नरसाहेब गेले, आणि जुन्या राजवाड्याजवळ लागूने असलेल्या (त्यावेळच्या) सिटी पोस्टाजवळ सरकारच्या निषेधाची सभा झाली. तीत बाबा लेले, भाऊराव पाटील, निळूभाऊ घाणेकर, विठ्ठलराव हडप गरजले. नगरपालिकादि संस्थातर्फे मानपत्रांचा विधि आटोपून परत निघालेल्या गव्हर्नरसाहेबाना फडफडत्या भारतीय निशाणाकडे पाहून अभिमानाने "गांधी महाराज की जय!" गरजणाऱ्या जनतेपुढे नम्र मस्तकाने आपली वाट सुधारावी लागली. दुसरे दिवशी कऱ्हाडास चाळीस वर्षानंतर झालेल्या गव्हर्नर-भेटीचा आनंद साताऱ्याइतक्याच सप्तसुरात रंगलेला ऐकून भाऊसाहेब सोमणांचे कान स्वातंत्र्योन्मुख जनतेच्या आवाजानी रममाण झाले. तथापि सातारा जिल्ह्यातील व अन्यत्र उठलेल्या लोकभैरवीनी सरकार चिडले आणि ता. २१ ऑगष्ट रोजी काँग्रेसकमिट्या व स्वयंसेवक शिबिरे बेकायदेशीर ठरविण्यात आली. तसा वटहुकूम लोकांच्या पहाण्यात ता. २२ ऑगष्टच्या

डाकेने यावयाचा, तो येण्यापूर्वीच सगळीकडे धरपकडी झाल्या. साताऱ्यात भाऊ-साहेब सोमण यांच्या घराची झडती सकाळी ७॥ पासून पाच तास झाली. त्याना स्नान जेवण न करताच पळविण्याचा बेत नोकरशाहीने केला होता. पण "आपल्या निरोपाप्रमाणे एका तासात भेटावयास येतो" म्हणून जिल्हाधिपतीना कळवून भाऊसाहेबानी सर्वांचा निरोप घेतला. दुपारी दोन वाजता सरकारी गाडीतून ते जाण्यापूर्वी त्यांचा लोकानी हार घालून सत्कार केला. व सुमारे दोन हजार लोक त्याना डि. एस्. पी. ऑफीसपर्यंत पोचवावयास गेले. सोमणांच्याप्रमाणेच गोविंदराव श्रोत्री, बाबूराव भिडे, विठ्ठलराव हडप, होनराव, हणमंतशास्त्री महाजनी, निळू-भाऊ घाणेकर, रामभाऊ मोडक, राजाभाऊ पालकर व माधवराव आठल्ये याना अगोदरच क्रि. लॉ. अ. १७ ( १,२ ) खाली पकडले होते. पैकी हडप, महाजनी, घाणेकर याना खटले चालवावयाचे नव्हते, बाकीच्याना होते. आरोपीना जामीनावर सोडावयाचे नाही, व झडतीत सापडलेल्या कागदपत्रांच्या छाननीचे सबबीवर खटल्याची सुरवातही लांबवावयाची या सरकारी कुचंबणेत महिना गेला. शेवटी खटला चालला व एकंदरीने पुरावा शाबीत होत नाही, असे पाहिल्यावर पोलीसाना सूडबुद्धि सुचली ! आरोपींची इज्जत घेण्यासाठीच जणू, रोज आरोपीना पोलिस मोटारीतून कोर्टात नेत असत तसे न करता कैदखान्यातून न्यायमंदिरात ता. २९ सप्टेंबर रोजी नेताना, भाऊसाहेब सोमणासुद्धा सर्वाना बेडचा ठोकून व काढण्या लावून नेले. त्या कारणाने खटला चालविणारांचे सांगीवरून त्यांचे वकील नानासाहेब जोशी, वाग्भट देशपांडे, शंकरराव साठे, दादासाहेब करंदीकर प्रभृति न्यायमंदिरावर बहिष्कार घालून परतले. एवढेच नव्हे, तर सायंकाळी नागरिकातर्फे पाठकभवनात करंदीकरांचे अध्यक्षतेखाली सभा होऊन सरकारच्या अमानुषतेचा कडकडून निषेध करण्यात आला. बारमध्येही ता. १ ऑक्टोबर रोजी माणकजी डोसाभाई यांचे अध्यक्षतेखाली निषेधपर सभा झाली. तरी इकडे सरकारने ठोठवा-वयाच्या होत्या त्या शिक्षा ता. ३-१०-३० रोजी ठोठावल्याच. भाऊसाहेब सोमणास तीन महिने कैद व ५०० रु. दंड आणि दंड न दिल्यास सहा आठवडे अशी शिक्षा झाली. हायकोर्टाकडे अपील झाले आणि गॅझेट लोकनिदर्शनास यावयाच्या आत धरपकडी केल्यामुळे सरकारचा सगळा खटाटोपच वरिष्ठ न्यायमंदिराने बेकायदेशीर ठरविला. भाऊसाहेब सोमणांची सुटका इतर सर्व मंडळीबरोबर झाली. परकीय सत्तेचे न्यायमंदिरावरील लोकविश्वास उडविण्याचे दृष्टीने न्यायमंदिरावरील बहिष्काराचे पथ्य आपल्या मनोमर्यादेप्रमाणे कसे पाळावयाचे, याचा एक आडाखा सोमणांचा म्हणून होता, त्याचा उल्लेख मागे आलाही आहे. स्वराज्यात झाले तरी मानवी मेंदूच्या निःपक्षपातीपणावर विश्वास ठेवूनच चालावे लागणार असल्याका-रणाने, त्याच सूत्रावर परसत्तेच्या न्यायमंदिरातही स्वाभिमानाला धक्का न लागेल अशी व्यवस्था असेपर्यंत खटला चालवावा आणि तेथील न्यायमूर्तींच्या पक्षपाती-

पणाचा कस पहावा; त्या प्रयत्नात आपल्याला न्याय मिळण्याची खात्री सुतराम् नसली तरी खटला चालविताना आपण सत्य सोडले नाही तर परसत्तेबद्दलचा जनमनातील असंतोष दृढमूल होतो आणि खटल्याच्या अनेक अंगोपांगांची चर्चा न्यायमंदिराप्रमाणेच लोकांच्या समूहासमूहातून व्हावयास चुकत नाही. या चर्चा-तूनच लोकमत मनमोकळेपणाने तयार होत असते. आपणा स्वतावर जरी काही टीकाप्रतिटीका होत राहिल्या तरी त्या आपण जनतेच्या मतस्वातंत्र्याचा हक्क म्हणून स्वागतार्ह मानून योग्य तो बोध घेत राहावा; म्हणजे परकीय सत्तेच्या न्यायमंदिराला आपण न्याय मिळण्याच्या आशेने महत्त्व देतो असे लोक न समजता हडसून खडसून न्याय मिळवण्याचा प्रयत्न परकीय सत्तेच्या गुहेत शिरून केल्याबद्दल लोकाना समाधान होते आणि तेवढ्यापुरता परकीय सत्तेला बसवावयाचा तेवढा चिमटा बसतो. चिरोलवरील बेअब्रूचा खटला लोकमान्यानी इंग्लंडात लढवून कायदेशीर काटेकोरपणाचा परिणाम म्हणून अपयश घेतले असले तरी, तो लढवि-ण्यातील रहस्य भाऊसाहेब सोमणाना वरील तथ्यांशासारखे वाटत असल्याकारणाने आपल्या मर्यादा संपूर्णपणे ओळखून भाऊसाहेब चालले व स्वाभिमानाला बाध आला नाही तोपर्यंत १९३० सालीही त्यानी आपला खटला लढविला आणि परिणामाला सज्ज राहिले. याच साली आसमंतात वावरणारी लहानमोठी माणसेही त्यानी त्यांच्या त्यांच्या कुवतीप्रमाणे कामास लावली, हे विठ्ठलराव सोमणांच्या आदर्शभूत ठरलेल्या प्रभातफेरीवरून कोणाच्याही लक्षात येईल. भाऊसाहेबांची ही वृत्ति लक्षात घेऊनच की काय, भाऊसाहेब कैदखान्यात असताना त्यांच्या थोरल्या सूनबाई चंपूताई वाड्यापुढे सत्याग्रही मिठाची विक्री करण्यासाठी मोठ्या धीटपणाने गेल्या होत्या.

भाऊसाहेब सोमण कैदखान्यात असताना, सभा, हरताळ, जंगल-सत्याग्रह, बिळाशी-बंड, अशी एकेक प्रकरणे दिवसेदिवस वाढतच गेली. जिल्ह्यातील चळवळीचा आणि विदेशी कापडाच्या होळीचा अग्नि 'पेटविताची पेटत ' असतानाच शिरोडे, रत्नागिरी, वगैरे भागातून आचार्य जावडेकर, नाथ घाणेकर, डॉ. आठल्ये शांतिसंग्रामाचे पराक्रम गाजवून सातारा जिल्ह्याचे नाव करीतच होते. सातारा जिल्ह्याच्या या पराक्रमात सोलापुरच्या लष्करी कायद्याच्या अमदानीत दामूआण्णा एकबोटे प्रभृति झेंडासत्याग्रह गाजवून आले. या रोमहर्षक घटनानी भाऊसाहेबाना केवढी तरी धन्यता वाटली.

अशा प्रकारे सातारा जिल्ह्यातील लहानथोर मंडळीनी जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर शांतिसंग्रामात अभिमानास्पद भाग उचलला असला तरी ता. ५ मार्च १९३१ रोजी झालेल्या गांधी-आर्विन करारापर्यंत ज्या राजकीय विचाराची प्रगति झाली होती, तो दृढमूल होऊन रहावा म्हणून काळजी घेणे भागच होते. त्या दृष्टीने

लोकपुढारी म्हणून आपली जबाबदारी ओळखून काही योजना भाऊसाहेब सोमण मनोमन आखून आपल्या सहकारी मंडळीशी विचारविनिमय करीत असतानाच गांधीआर्विन कराराने आपली इज्जत बारगळली अशी समजूत करून घेतलेल्या नोकरशाहीने साधी प्रकरणे सुद्धा हातझोंबीवर नेण्याचा सपाटा चालविला. तेव्हा २८ एप्रिलच्या समर्थमधून पोलीसांच्या त्या लीलेबद्दल भाऊसाहेबानी जिल्हा–धिकाऱ्याना एक अनावृत्त पत्र लिहिले. त्यापासून परिणाम इतकाच झाला की ६ मे रोजी साताऱ्यास कोणा माथेफिरूने दगडफेक केल्यामुळे अत्याचाराची व शांततेची जबाबदारी समजावून सांगण्याची कामगिरी जिल्हाधिपतीनी उलट सोमणा-वर सोपविली. गांधी–आर्विन कराराने या देशातील लोकाना आता कारभारकुशल–तेची जबाबदारी पेलण्यासाठी पुढे व्हावे लागणाऱ्या प्रहररात्रीचा कोंबडा आरवला, अशी मनोमन खात्री असलेल्या सोमणानी जिल्हाधिपतींचे ते आव्हान स्वीकारले. आणि निर्वाळा दिला की जिल्हयातील कोणीही सच्चा सत्याग्रही अत्याचारी नाही. त्याचवेळी लहानथोर सर्व कार्यकर्ते विधायक कार्यक्रमात गुंतवून लोकसेवेस लावले पाहिजेत म्हणूनही काही योजना करण्यात आली. स्वराज्याच्या तपश्चर्येचा महामंत्र म्हणून स्वदेशी आणि स्वदेशीचे शुद्धस्वरूप ‘खादी’ असल्याकारणाने ता. १६ फेब्रुवारी १९३० रोजी सोमणांचे येथे जिल्हयातील कार्यकर्ते मिळाले असता, पाच पाच रुपयांचे शेअर काढून खादीच्या पैदाशीसाठी २५०० रु. भांडवल उभारण्याचे ठरले होते. पण पुढे चळवळीच्या तीव्रतेत हे राजकीय कार्यकर्ते गुंतल्याबरोबर, ती कल्पना साकार करावयास कोणी पुढे आले नाही. तेव्हा एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यातच साताऱ्यास परदेशी कापडावर साष्टांगनमस्काराचे अनुष्ठान मामा गोलवलकर प्रभृतीकडून सोमणानी बसविले. त्याचा सुपरिणाम होऊन परदेशी कापड सीलबंद झाले. याच तऱ्हेचे प्रयत्न दिव्याने दिवा लागावा तसे मग जिल्हाभर उठावाने झाले. काही ठिकाणी तर ‘परदेशी बहिष्कार’ सप्ताहाच्या लाटावर लाटा उठल्या.

१९३१ मध्ये गांधीआर्विन करार झाल्यावर एकसळ ता. कोरेगाव येथे शेतकरी-सेवासंघ दादासाहेब साखवळकरानी काढला व त्या संघाचा दवाखाना उघड-ण्याचा समारंभ ता. १७ जून रोजी सोमणांच्या हस्ते झाला. त्यायोगे शेतकऱ्यांचा काँग्रेससंबंधीचा जिव्हाळा सोमणानी वज्रलेप केला, अशी नोकरशाहीची खात्री झाली. एकच महिन्याने आनंद छापखान्यात १९ जुलै रोजी सातारा जिल्हा कार्यकारणी भरली असता, विदेशी कापडाच्या सीलबंदीतून विदेशी कापडाच्या वापराचा संभव आपण फार तर दूरावतो; त्याहून ऐनजिनसी त्याचा खपच न होईल अगर ते कापड खरेदी करण्याचा मोह न होण्याइतके स्वदेशी कापड स्वस्त आणि सफाईदार निघेल, त्यातूनही खादीच तशी तयार होईल, तर त्या


विधायक कार्यक्षमतेचा परिणाम टिकाऊ राहू शकेल अशी विचारसरणी भाऊसाहेब सोमणानी मांडली, व तेथे बाकीचे विचार सोडून खादीच्या पैदाशीसाठी तीन हजार रुपयांचा निधि जमविण्याचा संकल्प होऊन ती कामगिरी बाबुराव वैद्य व भाऊसाहेब सोमण यांच्याकडेच सुपूर्त झाली. पुढे दुसऱ्या गोलमेज परिषदेसंबंधी होणाऱ्या महात्मा गांधी व सरकार यांच्या वाटाघाटीतून राष्ट्रीयसभा कोणता मार्ग पत्करते आणि राष्ट्राला ताबडतोब एकादे दिव्य करावे लागते की काय व ते करावयाचे झाल्यास कार्यकर्त्यांची दमछाट न होण्याबद्दल काय दक्षता घ्यावयाची या विवंचनेकडे सर्वांचेच लक्ष लागले. अर्थातच राष्ट्राच्या रसरशित अशा संतत–धारेच्या जीवनाला अवश्यक असणारे वरीलसारखे कार्यक्रम कागदी ठरावातच गुंडाळून पडले. त्या अगोदर जिल्ह्यातही रायफल क्लबाची चळवळ सुरू झाली होती, तिला एका जाहीर सभेत सोमणानी पाठिंबा दिला आणि फर्ग्यूसनमध्ये हॉटसन्वर झालेल्या गोळीबाराचा स्पष्ट निषेधही केला. संस्थानी–स्वराज्याच्या चळवळीतील संस्थानी–सप्ताह पाळण्याचे ठरल्यावर सोमण जिल्ह्यातील संस्थानी मुलखातून लोकजागृति करून आले.

गांधी–आर्विन कराराने राष्ट्रीयसभेला हिंदुस्थान सरकार इतके महत्त्व आलेले नोकरशाहीला खपणारे नव्हते. म्हणूनच दुसऱ्या गोलमेज परिषदेला राष्ट्रीय-सभेचे एकमेव पुढारी म्हणून गेलेल्या महात्मा गांधींचा पाय परत हिंदुस्थानला लागण्यापूर्वीच, नोकरशाहीने १९३२ साली दडपशाही सुरू केली आणि स्वाभिमान–संरक्षणार्थ कायदेभंगाच्या चळवळीचा आसरा करणे भारताला भाग आले. १९३० च्या चळवळीत ज्यानी सूत्रसंचालना केली अथवा विशेषत: धडाडीने तरी भाग घेतला अगर स्वयंसेवकाच्या नम्रतेने कामे केली त्या सर्वांना डिसेंबर १९३१ मध्येच चापचून भावी अपेक्षित चळवळीपासून अलिप्त ठेवण्याचा खटाटोप जिल्हाधिपतींनी आपुल–कीच्या मुलाखतीचा आव घालून केला होता. त्याला काही 'वाघ' म्हणून १९३० साली गाजलेले बळीही पडले. "तुम्ही टिळकाईट म्हणून चळवळ करा, गांधाईट होऊ नका" या त्यांचे शांतिपाठातील गुंगीने "तरुणांची तंद्री" लागण्यासारखी नव्हती. १९३० सालच्या वरिष्ठन्यायमंदिरातून फजित पावलेल्या नोकरशाहीने १९३२ साली आपले फर्मानी वा "वरवंटी" कायदे जाहीर केल्यावर दोन दिवसानी म्हणजे ७ जानेवारी १९३२ रोजी सातारा जिल्ह्याचे सर्व मातबर पुढारी स्थानबद्ध केले. त्यात, भाऊसाहेब सोमणांच्यावर संक्रांत आल्याशिवाय राहिली नाही. ही स्थानबद्धता प्रथम दोन महिन्यांचीच ठरली. ता. १८ जानेवारी–पासून 'काँग्रेसच्या चळवळीशी कसलाही संबंध न ठेवण्याच्या आणि पोलिस ठाण्यावर आठवड्यातून अगर दिवसातून एकदा हजेरी देण्याच्या नोटिसा जिल्ह्या–तील कार्यकर्त्यांना लागतच होत्या; तोच प्रयोग दोन महिन्यांच्या स्थानबद्धतेतून

सुटून आलेल्या महाभागावरही झाला. सातारा जिल्ह्यात सुमारे ८५ जणावर हा मोहिनीमंत्र येऊन बसला तरी राष्ट्रीयसभेच्या इज्जतीसाठी त्या नोटिसाना चिठोऱ्याची किंमत देऊन कित्येकानी बंदिवास पत्करला तर त्या नोटिसांचे वैय्यर्थ्य अधिकाऱ्यांच्या नजरेस आणूनही उपयोग होत नाही असे पाहून दुसऱ्या काहीनी बंदीवास स्वीकारला. भाऊसाहेब सोमणानी यातील मार्ग न स्वीकारता हजेरी दिली, जानेवारी महिन्याचे पहिले आठवड्यात कार्यकर्त्यांच्या संख्येचा आणि कार्य–क्षमतेचा पुरवठा चळवळीच्या अखेरचे कालमर्यादेपर्यंत सतत होत रहावा म्हणून (१९३० च्या आंदोलनातून आलेल्या व सामूहिकपणे प्रगट झालेल्या कौटुंबिक व आर्थिक थकव्याचा विचार करून) नियोजनपूर्वक हजेरी देण्या–न–देण्याचे वेळापत्रक आणि हजेरी देत राहिलेल्यांच्यासाठी ‘ उदंड करी परी गुप्तरूपे ।” असा कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्याचा प्रयत्न आणि थोडासा अट्टाहासही झाला होता. पण त्या प्रयत्नातील नैतिक मूल्यापासून वीरवृत्तीपर्यंत सर्व अंगोपांगांची तीव्र मतभेदप्रदर्शनाच्या अंतिम टोकाला नुसत्या चर्चाच होत राहिल्या कारणाने, गनिमी युद्धाचा तो पर्याय विचारकक्षेबाहेरच टाकून देऊन, ज्याना वैयक्तिक आरोग्यासाठी अगर स्वाभिमानपूर्वक कौटुंबिक संचालनासाठी हजेऱ्या देण्याची आवश्यकता वाटली त्यानी आपल्या मर्यादांच्या जाणिवेने लघुत्व पतकरून हजेऱ्या दिल्याच होत्या. भाऊसाहेब सोमणानी आपल्या आरोग्यासाठी तोच मार्ग स्थान–बद्धतेतून सुटल्यावर पतकरला. स्वताच्या मर्यादा ओळखूनच भाऊसाहेब सतत चालत असले तरी, आता त्याना जिल्ह्याचे पुढारीपणाने महत्त्व आले होते. साठीकडे झुकणाऱ्या वयाचा व आरोग्याचा विचार करता, आपण संसारासुद्धा सगळ्या गोष्टीतून मुरड खावी असा विचार डोकावू लागला असला तरी जिल्ह्याचे इभ्रतीचे दृष्टीने, त्यांच्या स्थान-महात्म्यामुळे हजेरी देत रहाणे भल्या कणखरपणाचे नव्हते. त्यानी हजेरी द्यावयास सुरुवात केल्याबरोबर, त्यांचे उदाहरण पुढे करून नोकरशाही इतर कार्यकर्त्याना गारद करण्याचा प्रयत्न करीत होती. तिला यश आले नाही. याचे कारण, आता लोक–उठावाची सूत्रे स्थानिक पुढाऱ्यांच्या नावावर, इज्जतीवर किंवा धोरणावर हलावयाचे बंद होऊन ती सूत्रे राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या नावावर, इज्जतीवर आणि धोरणावर हलावयास सुरुवात झाली होती. यात विभूतिपूजेचा विकास असला तरी राष्ट्रीय पूजाविकासाचा तोच कोंब होता. खुद्द साताऱ्यासही त्याचे प्रत्यंतर यावयास चुकले नाही. ता. ३१ जुलै १९३२ रोजी सातारच्या गांधीमैदानात मराठ्याचे संपादक शंकरराव आगाशे यांचे अध्यक्षतेखाली हणमंतशास्त्री महाजनीनी स्वागताध्यक्ष होऊन जिल्हासभा भरविली. व ता. ३१ऑगस्ट रोजी सातारला गव्हर्नरसाहेबांची स्वारी पुन्हा एकदा मानाचे मुजरे घ्यावयास आली असता त्यांच्या मोटारीपुढे छत्रीला काळे निशाण व खांद्यावर काळी घोंगडी फडकावून पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तातील गर्दीतूनही मोहिते, आडवे पडले.



सातारा नगरपालिकेचे अध्यक्ष असताना. ( १९३८ )



वेस्टर्न इंडिया विमा कंपनी रजत–महोत्सव १९३८ सातारा.

खुर्चीवरील– ( डावीकडून ) गणपतदास देवी, लक्ष्मणराव आपटे, वा. गो. चिरमुले, सर विश्वेश्वर आय्या, नरसोपंत केळकर, यशवंतराव पटवर्धन, **भाऊसाहेब सोमण**, रा. ग. कुबेर.

आणि त्यांच्यामागील स्फूर्ति म्हणून आत्माराम पाटील, नाना पाटील व डॉ. हिंगमिरे याना येरवड्याच्या यात्रा घडल्या.

अशा तऱ्हेने लोकांची चळवळ लोक करू लागले व त्यांच्या मार्गदर्शनासाठी सर्वस्वी नसले, तरी त्यांच्या तेजोवर्धनासाठी नव्या दमाची मंडळी पुढाकार घेऊ लागली याचे समाधान आपल्या स्वयंसंकोचित सार्वजनिक जीवनात भाऊसाहेब सोमण मानीत असता, चळवळीला १९३३ साली उतार लागला आणि एक प्रकारची असहायता समाजाला घेरू लागली असे दिसताच सोमणांचा कर्मयोग त्याना स्वस्थ बसू देईना. त्या सालच्या नोव्हेंबर महिन्यात अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची सभा भरवून लोकाना निश्चित कार्याची दिशा मिळावी असा भाऊसाहेब सोमणानी प्रयत्न केला आणि त्यांच्या या प्रयत्नाचे रोप वाढीस लागून पुण्याला लोकनायक अणे यांच्या अध्यक्षतेखाली पुढे काही मार्गदर्शक निर्णयही त्या समितीने घेतले. १९३४ च्या मे महिन्यात लोकशाही स्वराज्यपक्षाच्या मध्यवर्ती सभेनेही त्याना पार्लमेंटरी कामकाजाबाबतच्या सल्लामसलतीसाठी बोलाविले होते. कोणी ऐको न ऐको, सल्ला विचारल्यावर मनमोकळेपणाने तो द्यावयाचा या व्रतामुळे भाऊसाहेब तेथेही गेले होते. त्याच साली सातारा जिल्ह्यातर्फे महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीवरही भाऊसाहेबांची निवड झाली. स्वताच्या जिल्ह्यातही ता. १३ जानेवारी १९३४ रोजी रा. ब. काळे यांचे अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय साताराजिल्हा-रयतसभा इसलामपुरास धोंडजीकाका पाटील, नलवडे प्रभृतींचे पुढाकाराने भरवून शेतकऱ्यावरील करासंबंधी जागृति राखण्यात आली व स्वयंनिर्णयाचे स्वदेशीतून निर्माण होणारे स्वराज्य बहुजनसमाजात जीवनाशी एकरूप कसे होईल हे पाहण्यात आले. अशा तऱ्हेच्या चळवळीबाबत "दास डोंगरी राहतो । उत्सव रामाचा पहातो ।" हा आनंद भाऊसाहेब सोमणानी चाखला आणि राजकीय फर्मानशाहीखाली लोकचळवळीचे अदमुरे झाले असता, कशा मार्गानी गेले पाहिजे याचा कित्ता सोमणानी जिल्ह्यापुढे ठेवला.

१९३०–३४ च्या शांतिसंग्रामाच्या काळात जनता राष्ट्रीय सभेची आहे हे सातारा जिल्ह्याने दाखवून दिले असताही सरकारी मापाने ते सिद्ध होणे आवश्यक होते. विधानसभाधार्जिणी मनोवृत्ति स्थायी झाली असल्याचा प्रत्यय महात्मा गांधीनी बोलून दाखविला. त्याच सुमारास साताराजिल्ह्याचे धनजीशहा कूपर यांचा समावेश मंत्रिमंडळात गव्हर्नरसाहेबानी केल्यामुळे त्यांच्या जागेकरता पोटनिवडणूक व्हावयाची ठरली. स्वराज्यपक्षाच्या अनुज्ञापक निवडणुकानंतर कॉंग्रेसची खास निवडणूक पहिल्याने लढविण्याचा हा मोका होता. असहकाराच्या ऐन भरानंतर म्हणजे १९२६ साली दिल्लीच्या असेंब्लीसाठी केसरीकार तात्यासाहेब केळकर व दादासाहेब करंदीकर असे दोघेही उभे राहिले

होते. भाऊसाहेब सोमणांचे अगोदर वकिलीसाठी दादासाहेबांच्याजवळ केळकर काही काळ नांदलेले, म्हणून भाऊसाहेबाना दोघेही एकपरी वडीलच होते. दादासाहेब करंदीकराना विरोध, निदान त्यांच्या निवडणुकीबद्दल बेफिकिरी हा सामान्य समजुतीने गुरुद्रोह होता. पण कायदेमंडळातील प्रवेशासंबंधी काँग्रेसच्या श्रेष्ठींशी पुष्कळ काळ वाईटपणा घेऊनही केळकरानी बुद्धिवाद केला होता. शिवाय, दिल्लीच्या असेंब्लीत उभे करावयाचे वातावरण सर्व लहानथोर राष्ट्रीयांच्या समन्वयाने उभे करावयाचे तर दादासाहेब करंदीकरांच्यापेक्षा केळकरांच्या अभ्यासूपणाने, गोडीगुलाबीने आणि कार्यक्षमतेनेच ते जमणारे आहे, हे पक्केपणी ओळखून सोमणानी केळकराना आपला पाठिंबा दिला होता. त्यात वैयक्तिक संबंधापेक्षा राष्ट्रसेवेच्या परिणामकारकतेवर अधिक लक्ष्य ठेवले होते. मध्यवर्ती भारतीय सरकारच्या सूत्रधाराना असेम्ब्लीतील कामकाजानी सळो का पळो करून सोडणाऱ्या स्वराज्यपक्षाचे चिटणीसपद पुढे केळकराना मिळाले. आणि लोकपक्षाच्या कायदेमंडळातील कार्यप्रणालीस केळकरांची संघटनसमर्थता सहाय्यक झाली, हा इतिहास पाहिल्यावर सोमणानी केळकराना पाठिंबा देण्यात विवेकशुद्ध राष्ट्रसेवेचा अंगिकार केल्याचे मान्य करावे लागेल. ता. ४ ऑगष्ट १९३४ रोजी व्हावयाच्या निवडणुकीसाठी भाऊसाहेब सोमणाना उमेदवार म्हणून काँग्रेसने उभे केले. यासंबंधांत ‘ कायदेमंडळातील सहा वर्षे ’ या आपल्या पुस्तकात काकासाहेब गाडगीळ म्हणतात “ काँग्रेसने निवडणुकी लढविण्याचे ठरविल्यानंतर निवडणुकीचा कार्यक्रम अमलात आणण्याची ही पहिलीच संधी आली. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कार्यकारी मंडळात या बाबतीत समसमान मते पडली. अध्यक्ष देव यानी आपले जादा मत दिले व ‘ लढवावी ’ असा कमिटीचा निर्णय झाला. मी ‘ लढवू नयेत ’ असे मत दिले. कारण वेळ थोडा व खुद्द मतदार संघातील लोक किती उत्सुक आहेत याबद्दल शंका होती. तथापि निर्णय झाल्याबरोबर त्याच रात्री मी साताऱ्यास गेलो. दुसरे दिवशी पाठक हॉलमध्ये आमचे उमेदवार भाऊसाहेब सोमण यांच्या निवडणुकीच्या लढ्याची पहिली घोषणा केली. ‘ अब तो शुरू हुवा है जंग ’ ही घोषणा करून सातारा जिल्ह्यात मी व केशवराव जेधे यानी दौरा काढून सर्वत्र खळबळ उडवून दिली. केशवरावाना सभेत जातिनिष्ठाकडून तीव्र विरोध होत होता. नानाप्रकारचे आरोप त्यांच्यावर करण्यात येत होते. रहिमतपुरच्या सभेत मारहाणीपर्यंत पाळी आली. पण हाती घेतलेले कार्य त्यानी सोडले नाही. ”

आपण उभे रहावे न रहावे अशी विवंचना सोमण करीत असताच काँग्रेसच्या आज्ञेप्रमाणे तुम्ही उभे राहिलेच पाहिजे असा निरोप पुण्याहून ठामपणे आला. इतकेच नव्हे तर पुण्याहून या निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी तात्यासाहेब केळकर व दा. वि. गोखले सातारा जिल्ह्यात दौरा करून गेले. १९३२ साली प्रकृति स्वास्थ्यासाठी हजेरीची नोटीस पाळणाऱ्या भाऊसाहेबाना काँग्रेसने उभे केल्याबद्दल

वीरवृत्तीने राष्ट्रीय चळवळीत शिक्षावर शिक्षा भोगणाऱ्या, व हजेरीची नामुष्की तत्त्वतःच नापसंत असणाऱ्या अशा दोनही उत्साही गटाना काँग्रेसचा शिक्कामोर्तब आश्चर्याचा वाटला. आपल्याला ती उमेदवारी काँग्रेसने दिली तरी भाऊसाहेबानी नव्या दमदार तरुणाचे नाव सुचवून व त्याचे निवडणुकीसाठी सातारा जिल्ह्याच्या राष्ट्रीय इज्जतीचे दृष्टीचे काही खर्चही करून भाऊसाहेबानी आपली आस्था कशी व्यक्त केली नाही, याचेही पुष्कळाना आश्चर्य वाटले! पण सर्व भारतातील ती काँग्रेसने लढवावयाची पहिली निवडणूक होती; सरकारच्या सर्व सहानुभूत्या आणि सहाय्याचे हात काँग्रेसविरोधी उमेदवाराच्या विजयासाठी सज्ज होते; काँग्रेसउमेदवाराचा पराभव एकातरी मताने करून जनता सरकारधार्जिणीच आहे, हे जगाच्या डोळ्यात भरविण्यासाठी परसत्ता टपली होती. अशा वेळी संभव–शक्यता यांच्या कटावर सोंगटी मांडून उपयोग नाहीच, पण सरकारच्या इज्जतीचा पटच उधळला पाहिजे, इतकी मते काँग्रेसच्या उमेदवाराला मिळाली पाहिजेत, असा काँग्रेस श्रेष्ठींचा निश्चित दृष्टिकोन असल्याकारणाने त्यानी भाऊसाहेबांच्या पूर्वपुण्याईचा मोहराच इरेला घालावयाचे ठरविले. सोमणाना मागे सारून नव्या तरुणाला निवडून आणावे म्हटले तर तो आटापिटा करावयास वय–परत्वे व प्रकृतिपरत्वे भाऊसाहेबाना ताकद नाही; पैशाने ती कामे न होता, उमेदवारासंबंधी सामूहिक सदिच्छेच्या सामर्थ्यावरच ती होत असल्याकारणाने विधानसभेत सरकारी तोडीला तोड देणारा अमूक एक उमेदवार सामूहिक सदिच्छेच्या सामर्थ्यसंपन्नतेने पुढे करण्यासारखा आहे, असे कोणी आत्मविश्वासपूर्वक धिटाईने सांगितलेही नाही. दुसरा कोणी उमेदवार उभा रहावयास तयार व्हावा म्हणून स्वता भाऊसाहेब सोमणानीही प्रयत्न केला होता. काँग्रेसमधील व बहुजनसमाजातील नि ब्राह्मणेतर पक्षातील पुढाऱ्यानाही भाऊसाहेबानी आपल्या घरी बोलावून विचारणा केली होती पण त्यांची निराशा झाली. त्यामुळे १९३२ च्या आपल्या हजेरी देण्यातील संकोचलेल्या पुढारीपणाची जाणीव असूनही काँग्रेसने भाऊसाहेबाना उमेदवार म्हणून कायम करताच, काँग्रेसची आज्ञा म्हणून भाऊसाहेबानी निवडणूक लढविली. या वेळी पाटखळ–बोरखळ प्रकरणापासून त्याना विरोध करणाऱ्या सर्व मंडळीनी आणि पक्षानी भाऊसाहेबाना मनोभावे सहाय्य केले. 'एकंदर सर्व परिस्थितीचा विचार करता सर्वांच्या परिचयाचे व सर्वांना पसंत वाटतील असे उमेदवार साताराचे प्रसिद्ध वकील रामचंद्र गणेश उर्फ भाऊसाहेब सोमण हेच लोकहिताच्या दृष्टीने निवडून येण्यास योग्य आहेत म्हणून त्यासच निवडून द्यावे' असे विनंतीपत्रक केशवराव विचारे, धोंडजी पाटील, लक्ष्मण आण्णा फलटणे प्रभृति मंडळीनी ता. १६ जुलै १९३४ रोजी काढले होते. आचरेकर, राणे असे प्रतिष्ठित वकील भाऊसाहेबाना जातीने सहाय्य करीत होते. त्याचा परिणाम होऊन भाऊसाहेबाना, १४,९२७ मतनोंदणी झाली, तीपैकी ८,६०६ मते मिळून म्हणजे

विरोधी उमेदवारापेक्षा तीन हजार मते अधिक पडून ता. ९ ऑगष्ट १९३४ रोजी यश मिळाले. साहजिकच त्याना त्या वेळेला तालुक्यातालुक्यातर्फे आणि काँग्रेस-कमिटचातर्फे सत्कार आणि हार मिळू लागले. निवडणुकीचा निकाल झालेबरोबर झालेल्या सत्कारास उत्तर देताना भाऊसाहेब म्हणाले, "आज आपणास जो हा आनंद होत आहे, त्याला आपल्या सर्वांचे व सर्व मतदारांचे श्रमच कारणीभूत आहेत. माझे अभिनंदनाचा हा प्रसंग नव्हे. काँग्रेसच्या अभिनंदनाचा हा प्रसंग आहे. काँग्रेसच्या त्या वंदनीय संस्थेनेच मला उभे केले आहे. तिची आपण इभ्रत राखली ही गोष्ट अभिनंदनीय आहे. या निवडणुकीचे वेळी सर्व पक्षांची व जातींची जी एकी दिसून आली तिचेबद्दल परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत. त्याच परमेश्वराने जिल्ह्यातील राजकीय सामाजिक वगैरे प्रश्नाबाबत अशी एकी राखण्याची सर्वांना बुद्धि द्यावी अशी त्याचे चरणी माझी नम्र प्रार्थना आहे."

निवडणुकीनंतर १९३५ च्या पहिल्या कौन्सिल–बैठकीत भाऊसाहेब सोमणानी 'बागलाण–कळवण' मधील शेतकऱ्यांच्या दुःस्थितीसंबंधी एका ठरावाने सरकारी खडकात कोठे पाणी लागते का पाहिले. शिराळेपेटचातील गावेच्यागावे पोस्टाच्या यत्किंचित् सोयीशिवाय सुधारलेल्या इंग्रजी राज्यात असल्याचे सरकारी तोंडानी जाहीर व्हावयास एका प्रश्नाने लाविले आणि शेवटी दुसऱ्या बैठकीत फर्मानी कायद्याच्या जोरावर सरकार इलाखाभर ठाण्याठाण्याला ज्यांच्या विरुद्ध दाद मागण्याची सर्वथैव बंदी आहे असे चिमणे हुकूमशहा (पेट्टी गव्हर्नर्स ) शांततेच्या काळात अकारण निर्माण करून ठेवण्याचा आपला हट्ट सोडत नाही असे पाहिल्यावर सरकारच्या निषेधार्थ रावसाहेब काळे प्रभृतींच्या बरोबर भाऊसाहेब सोमण यानीही " वॉक औट " केला. कोन्सिलरशिपच्या या दोन वर्षात खानबहादूर कूपर यांचा व भाऊसाहेबांचा पुष्कळच परिचय झाला. आणि जिल्ह्याच्या प्रश्नासंबंधी कूपर–काळे–सोमण यांचे रोजमेळ होऊ लागले.

या कौन्सिलमधील कामगिरीबरोबर बाहेरच्या चळवळीतही भाग घेणे भाऊसाहेबाना अपरिहार्यपणे अवश्यक वाटे. ता. २७ एप्रिल १९३५ रोजी ताकारीस भरलेल्या शेतकी–परिषदेचे अध्यक्ष म्हणून सोमणाना निवडण्यात आले. १९२३ पासून कृष्णाकॅनाल बागाईतदारसंघाचे ते सल्लागार होतेच. शेतकऱ्यांचा विश्वास त्यानी कसा संपादन केला होता, याचे ते अध्यक्षपद हे गमक होते. "सरकारी अधिकारी शेतकऱ्यांशी सहानुभूतीने वागले नाहीत तर शेतकरी बिचारा देशोधडीस लागेल " असा इशारा अध्यक्षपदावरून सोमणानी दिलाच, पण "शेतकऱ्यानी आपल्या हक्कास जागरूक रहावे आणि त्यांच्यावर गदा आल्यास त्यांची राखण जीवापाड त्यानी करावी " अशी चेतनाही सोमणानी दिली.

असे कार्यक्रम चालू असताच त्या वेळचे राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांचा दौरा १४ मे १९३५ पासून दोन दिवस सातारा जिल्ह्यात झाला. आचार्य कृपलानीही बरोबर होते. जिल्ह्याचे पुढारी म्हणून भाऊसाहेबाकडेच ही पाहुणे मंडळी होती. हा राजेंद्रबाबूंचा दौरा १९२७ च्या फेब्रुवारीच्या अखेरीस सातारा जिल्ह्यात झालेल्या महात्मा गांधीनी खादी प्रसारार्थ केलेल्या दौऱ्याइतकाच महत्त्वाचा होता. आधिभौतिक मोक्षाचे उर्फ राष्ट्रीय स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान जनतेच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवून सुखाचा संसार थाटण्यास मदत करणारे असावे लागते. महात्मा गांधीनी असल्या विधायक कार्य–प्रणालीसाठी १९२७ साली सांगली, दुधगाव, अष्टे, इस्लामपूर, कराड, सातारा, रेठरेहरणाक्ष वगैरे जिल्ह्यातील ठिकाणी सभा घेऊन खादी भांडारे उघडली. हरिजनांच्यासाठी देवमंदिरे आणि वसतिगृहे यांची उद्घाटने केली आणि स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या मानपत्राबरोबर मुलाबाळांचीही स्वागते स्वीकारली. जन–संपर्काचा उठाव कसा करावा हे महात्मा गांधीनी सातारा जिल्ह्याला दाखविले. त्याच धर्तीवर राष्ट्रीय सभेचे राजकारण बहुजनसमाजात कसे रुजवावयाचे आणि राजकारणाच्या दृष्टीने लोकांची तयारी कशी करावयाची हे आता १९३५ च्या दौऱ्याने बाबू राजेंद्रप्रसादानी सातारा जिल्ह्याला प्रत्यक्ष दाखविले. बोरगाव, इस्लामपूर, रेठरेहरणाक्ष, कऱ्हाड, तांबवे, मसूर, उंब्रज, वाई, सातारा, कोरेगाव, पुसेगाव, बुध, खातगूण, खटाव, वडूज, म्हसवड येथे शेतकऱ्यांच्या सभा होऊन राजेंद्रबाबूंची भाषणे झाली. त्या सर्वांचा मथितार्थ एवढाच होता की, "महाराष्ट्राचे कणाकणातून ऐतिहासिक तत्त्वे व संघटना, भरलेली आहे. या दौऱ्याच्या निमित्ताने मी सातारा जिल्ह्याच्या खेडचापाडचातून व जंगलातून हिंडलो तेव्हा स्वराज्यप्रेमी बंधुभगिनीनी माझा सत्कार केला यावरून या भागातील लोकात स्वराज्य मिळवण्याची भावना जागृत झाली आहे हे दिसून येते. प्रत्येकास अन्नवस्त्र व घर मिळणे हे मिळवावयाच्या स्वराज्याचे स्वरूप काँग्रेसने कायम केले आहे. हे स्वराज्य समतेचे आहे. एकी शिवाय ते मिळत नाही व मिळाले तरी टिकणार नाही. आपण जर स्वार्थ आणि स्वदेशार्थ एक समजू तर स्वराज्य दूर नाही. आमचे तरुण बुद्धिबलात मागे नाहीत, सैनिकात युद्धनैपुण्य भरपूर आहे असे असून जग आमच्या देशाकडे तिरस्काराने पहात आहे याचे कारण आम्हाला स्वराज्य नाही, स्वातंत्र्य नाही हेच होय." राजेंद्रबाबूंच्या या दौऱ्यात सोमणाना जिल्ह्याच्या जागृतीचा साक्षात्कार झाला. महात्मा गांधीच्या १९२७ च्या दौऱ्याचे वेळी ज्याप्रमाणे नाथ घाणेकर प्रभृति जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व इतर कार्यकर्ते यानी महात्माजीना अर्पण करावयाचा निधी आत्मविश्वासाने जमविला होता तसाच राजेंद्रबाबूंना द्यावयाच्या थैलीचा निधीही त्याच मंडळीनी पहिल्याइतकाच आत्मविश्वासाने जमविला. अशा तऱ्हेची कार्यैकतत्परतेची जोड जिल्ह्यात झालेल्या जागृतीला लवकरच दिली पाहिजे. तशी दिली गेली तर जिल्ह्याचे तेज अधिकाधिक तळपत

राहील, आणि आपल्यापूर्वीच्या दोन पिढ्यानी जे राष्ट्रीयसेवेचे लोण आपल्यापर्यंत आणून पोचविले तेच सर्वसंग्रही लोकसेवेचे लोण पुढच्याही पिढीत चालू राहील असा सोमणाना विश्वास वाटू लागला.

सातारा जिल्ह्याचे तेज विकासवादाने सोमणांच्या पुढे असले तरी पहिल्या महायुद्धापासून सार्वजनिक कार्यक्षेत्रात नवीनच आलेल्या उमेदीच्या तरूणाना पूर्वेतिहास सुपरिचित नसल्यामुळे त्याना आपल्या जिल्हाच्या परंपरेची ओळख व्हावी या दृष्टीने आपल्या जिल्ह्याचा मुख्यतः राजकीय इतिहास काँग्रेसच्या सुवर्ण-महोत्सवाचेवेळी तरुण मंडळीच्या हाती द्यावा आणि जिल्ह्याजिल्ह्याचे असे इतिहास तयार व्हावे म्हणजे सबंध राष्ट्राच्या इतिहासाची साधनसामुग्री तयार होईल. या जाणीवेचा प्रारंभ करावा अशी कल्पना निघाली. ही कल्पना विनायक शंकर उर्फ बाबुराव वैद्य (संपादक समर्थ, सातारा ) यानी नेटाला लावली आणि तिचा पुरस्कार दत्तात्रय कृष्ण उर्फ बुवासाहेब गोसावी यानी करताच. भाऊसाहेब सोमणानी त्या कल्पनेला सर्वस्वी पाठिंबा दिला. त्यामुळेच १९३५ च्या डिसेंबरात 'जागृत सातारा' या नावाने सातारा जिल्ह्याचा १८४० पासूनचा ९५ वर्षांचा इतिहास काँग्रेस महोत्सवाचे वेळी प्रसिद्ध होऊ शकला. काँग्रेस–सुवर्ण–महोत्सवाचे निमित्ताने महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीने काँग्रेसच्या कामगिरीबद्दल शाहीराना पोवाडे करण्याचे आवाहन केले होते. महाराष्ट्र काँग्रेस कमिटीकडे आलेल्या सर्व पोवाड्यात इसलामपुरचे दळवी, एकसळचे दादा साखवळकर आणि साताराचे मारुतराव हळबे यांचे पोवाडे पहिल्या प्रतीचे ठरले. याबद्दल भाऊसाहेब सोमणाना आणि एकंदर सातारा जिल्ह्याला सहाजिकच अभिमान वाटला. सातारा जिल्ह्यात काँग्रेसचा सुवर्ण–महोत्सव दिवाळी–दसऱ्याच्या आनंदाने साजरा झाला. प्रभात–फेऱ्या निघाल्या, मुलाना खाऊ वाटले, पोवाडे गायनाचे कार्यक्रम झाले, कुस्त्या झाल्या, स्त्रियांची हळदीकुंकवे झाली, गोरगरिबाना अन्नदान झाले, हरीजन वस्तीत स्वच्छता करण्यात आल्या, पालख्यातून देशपुढाऱ्यांच्या तसबिरी मिरव–ण्यात आल्या, मुलांचेकडून निबंध लिहून घेऊन त्याना बक्षिसे देण्यात आली आणि दीपोत्सवही झाले. या दिवशी झालेल्या सभातून काँग्रेसने राष्ट्राच्या केलेल्या सेवेचा कृतज्ञतापूर्वक आढावा घेण्यात आला. साताराच्या अशाच सभेचे अध्यक्ष म्हणून भाऊसाहेब सोमण म्हणाले, " काँग्रेसच्या आजच्या या सुवर्ण-महोत्सवाबद्दल आपणास आनंद वाटणे सहाजिक आहे. गेल्या पन्नास वर्षात काँग्रेसने महत्त्वाची शिकवण दिली ती 'स्वदेशी'ची होय. आज सर्व लोकानी खादी वापरण्याचा निश्चय केला तर खराखुरा काँग्रेसचा महोत्सव साजरा केला असे होईल. काँग्रेसचे कार्य नेटाने व सतत चालावे असे वाटत असल्यास सर्वस्वी यासाठीच वाहिलेली काही माणसे हवीत. त्यांची संस्था निर्माण झाल्यास जिल्ह्यातील कार्य आजपर्यंतच्याही–पेक्षा जास्त उत्साहाने होईल."

# ९ आयुष्यातील सुवर्ण–क्षण

(~~खादी समारंभ~~)

१९२५ च्या प्रांतिकपरिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून, बहुजनसमाजातूनच राष्ट्रीयवृत्तीचे तरुण पुढारी म्हणून आले पाहिजेत, ही जी अपेक्षा भाऊसाहेब सोमणानी केली होती तिला १९३० सालच्या चळवळीतील उठावावरून काही रंगरूप येईल अशी आशा सोमणाना वाटू लागली होती. त्या आशेचे आविष्करण सोमणानी आपल्या अनेक सहकारी सज्जनाजवळ केल्यामुळे गांधी–अर्विन कराराने राजकीय चळवळीला अंग धरता येईल अशी खात्री वाटणाऱ्या सर्वच मंडळीना खेड्यापाड्यांचे आदर्श ठिकठिकाणी निर्माण करण्याची आवश्यकता पटली. विधायक कार्यक्रमानी खेड्यांची दैनंदिन सेवा करणारी आणि खेडूत जीवनाला नुसते राष्ट्रीय व सहकारीच नव्हे तर एकजिनसी वळण लावणारी संस्था निघेल आणि त्या संस्थेचे संचालक व सेवक शीलसंपन्न व निरपेक्ष असतील तर बहुजन–समाजातील पुढारी मंडळी आघाडीला राहून जी जी आंदोलने उठवतील त्याना त्याना सामूहिक असा भरभक्कम पाठिंबा मिळत राहील, हा भरंवसाही विचारवंतांच्या मनात वाटल्याशिवाय राहिला नाही. अर्थातच् ज्या वेळी लोकनायक माधवरावजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली मसूर येथे साताराजिल्हापरिषदेचे अधिवेशन झाले त्या वेळी ना. गोखल्यांच्या भारत सेवक समाजाच्या वा लाला लजपतरायांच्या लोकसेवकसमाजाच्या धर्तीवर सातारा जिल्ह्यात एक कायम स्वरूपाची संस्था काढावी असा ठराव त्या जिल्हापरिषदेने पसंत केला असल्यास नवल काय? तथापि तो विचार त्या वेळी साकार होण्यास पुढे लगेच सुरू कराव्या लागलेल्या आन्दोलनामुळे फुरसत सापडली नाही. १९३४ च्या निवडणूकी होऊन ज्यावेळी राजकीय जीवनाला एक प्रकारचा संथपणा आला त्यावेळी भाऊसाहेब सोमणांच्या मेंदूत लोकसेवासंघ काढण्याची कल्पना पुन्हा उसळी मारू लागली. १९३५ साली राष्ट्रसभाध्यक्ष म्हणून बाबू राजेंद्रप्रसादांचा दौरा जिल्ह्यात झाला त्यावेळी गावोगावच्या जागृत लोकशक्तीपुढे विधायक कार्यप्रणालीचा आदर्श ठेवण्याची आवश्यकता भाऊसाहेब सोमण व पांडुआण्णा शिराळकर याना तीव्रपणे भासू लागली आणि चाफळचे विष्णुआण्णा देशपांडे प्रभृति ज्या मंडळीनी लोक–मान्यांच्या स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीपासून खेड्याखेड्यातून राष्ट्रीयवृत्तीची जोपासना केली होती, त्यांचा त्या कल्पनेस दुजोरा व सहाय्य मिळते आहे, असे पाहताच भाऊसाहेब सोमणानी १९३५ चे डिसेंबरात राष्ट्रीयसभेचा सुवर्णमहोत्सव साजरा होण्याचा मुहूर्त साधून लोकसेवासंघाच्या कल्पनेला जोराची चालना दिली. १९३६ च्या मे महिन्यात पांडुआण्णा शिराळ–

करांची एकसष्टी सार्वजनिक रीत्या साजरी झाली असता सोमणांच्या लोकसेवासंघाच्या कल्पनेला क्रियाशील करण्यासाठी तीस हजार रुपयांचा स्वताचा निधी जाहीर केला, तेव्हा जिल्ह्यात नाथ घाणेकर, गणपतराव खरे, बाबा बहुलेकर, गणपतराव गोडसे, बाबुराव गोखले व सर्वात विशेष म्हणजे परचुरेशास्त्री यानी लोकजागृतीचे नि लोकसेवेचे जे मागील दीड तपात काम केले होते ते राजकीय आणि ग्रामसुधारणाविषयक काम ठाऊक असणारी मंडळी भाऊसाहेब सोमणांच्या लोकसेवासंघाला शक्य तेवढ्या लवकर साकार करावयास उत्सुक झाली. पुढे नोव्हेंबरमध्ये भाऊसाहेब सोमणानाच साठ वर्षे पूर्ण होताहेत हे पाहून प्रतोदकार वासुदेव दामोदर मुंडले यानी म्हटल्याप्रमाणे " त्यांचा गोड नि निगर्वी स्वभाव, लहानथोरात मिळूनमिसळून व खेळीमेळीने वागण्याची त्यांची पद्धति, दुसऱ्यांचे मन सहसा न दुखवण्यासारखे वर्तन ठेवण्याची दक्षता, ज्या ज्या तऱ्हेने लोकांच्या उपयोगी पडता येईल त्या त्या तऱ्हेने खाजगी किंवा सार्वजनिक कामात कळकळीने व सचोटीने लोकांचा उपयोग करण्याचा त्यांचा परिपाठ, सातारा जिल्ह्यातील सर्व महत्त्वाच्या चळवळींना स्वकष्टार्जित द्रव्याचे पुरविलेले पाठबळ इत्यादि गुणावर लुब्ध झाल्यामुळे त्यांच्या एकसष्टीचा सोहळा साजरा करण्याच्या वाटाघाटी लोकानी सुरू केल्या, त्यावेळी वैयक्तिक गौरव करून घेण्याचा मना–पासून तिटकारा करणाऱ्या भाऊसाहेब सोमणांच्या विवेकशीलतेला, आपली लोकसेवासंघासंबंधीची तळमळ आणि १९३१ पासून त्या तळमळीने झालेली विचारजागृतीची प्रगति लोकापुढे ठळकपणे ठेवण्यासाठी आपणास ती एक संधी लाभेल, असे वाटले म्हणून त्यानी त्या लौकिक समारंभास संमति दिली. सदर संमति देताना भाऊसाहेब सोमणाना अशीही प्रेरणा होत होती की सर्व पक्षोपक्षांची आपले लोभातील मंडळी त्या निमित्ताने आपलेकडे जमतील त्या वेळी नवीन राष्ट्रीय जीवनाचा ओघ लक्ष्यात घ्यावा, आणि १९२० पासून फेर-नाफेर कायदेकौन्सिल प्रवेशवादी व कायदेकौन्सिल बहिष्कारवादी वगैरे जे भेद पडून महाराष्ट्रातील राष्ट्रीयशक्तीला फाटे फुटत राहिले आणि त्या योगाने सार्वजनिक जीवनाला जो रसरशीतपणा रहावयास हवा होता तो राहिला नाही, त्याचे परिमार्जन आपल्यापरी सर्वात दिलजमाई घडवून आणण्याचा प्रयत्न करून साधले तर साधावे. १९३० च्या प्रारंभी त्या वेळचे मराठ्याचे संपादक ग. वि. केतकर हे साताऱ्यास सातारा जिल्हा कॉंग्रेस कमिटीची बैठक भाऊसाहेब सोमणांचे येथे भरली असता फेर–नाफेरवाल्यांचा एकमेळ करण्याचे दृष्टिने आले होते. शंकरराव देव हेही त्या वेळेस हजर होते त्या वेळेस झालेल्या वाटाघाटीतून समाजात अधिक विस्कळीत-पणा निर्माण होईल असे दिसताच भाऊसाहेब सोमणानी " कृपा करून आमच्या जिल्ह्यात असलेल्या कॉंग्रेसनिष्ठेला आणि परस्पर सहकाराला बाध येईल अशी विचारसरणी पेरू नका" असे बजावताच सर्वजण त्यांचा शब्द मानून गप्प बसले होते.

त्याच आत्मविश्वासाने आपण आता महाराष्ट्रासाठी एकजुटीचा प्रयत्न करावा असे भाऊसाहेबांच्या मनाने घेतले. भाऊसाहेबाना या बाबतीत यश येईल अशी आशा पुष्कळाना होती. कारण आण्णासाहेब भोपटकर यानी म्हटल्याप्रमाणे "राष्ट्रात निरनिराळीं आंदोलने होऊन मतभेद माजलेले असताही महाराष्ट्रातील ज्या चार दोन पुढाऱ्यानी राजकीय क्षेत्रातील आपले स्थान कायम राखिले त्यापैकी दे. भ. भाऊसाहेब सोमण एक होते." त्रिकाळकार शिवरामपंत करंदीकर प्रभृति मंडळीना ही ऐक्य प्रस्थापनेची कल्पना पसंत पडली तर सातारच्याच काही निस्पृह निरीक्षकाना सदर प्रयत्नात यश येईल अशी आशा वाटली नव्हती. तरीपण १९०० सालापासून साताऱ्याची समेटभूमी म्हणून जी कीर्ति आहे, ती राखण्याचा दोनदा यशस्वी व एकदा अर्धयशस्वी असा जो प्रांतिक–परिषदाद्वारा प्रयत्न झाला तसा प्रयत्न करावयास कोणाचाच विरोध नव्हता. शिवाय, हा प्रयत्न स्नेहांकित वातावरणात खेळीमेळीने व्हावयाचा असल्यामुळे कोणाच्या इज्जतीचा, नेतृत्वाचा वा मानापमानाचाही प्रश्न नव्हता. तात्त्विक भूमिकेला सात्त्विकवृत्तीने व्यावहारिक स्वरूप देऊन सहकाराचा शक्य तेवढा जास्तीजास्त आविष्कार सर्व राष्ट्रीयवृत्तीच्या मंडळीत सातत्याने होत रहावा यासाठी "सर्वेषां मित्र" असलेल्या भाऊसाहेब सोमणांच्या बैठकीवर दिलजमाईने हातजमाई व्हावयाची होती. गांधी–आर्विन करारापासून आपली प्रकाशकिरणे टाकू लागलेल्या स्वराज्य–सूर्याच्या उपासनेसाठी मतमतांतरांच्या प्रामाणिक देशभक्तांचा जास्तजास्त सहकार कसा होत राहील हे पहात राहण्यातच राष्ट्रीय बळकटीचा कस आहे; असे ज्यांचे ज्यांचे मत होते ते ते विचारवंतांच्या तशा सहकारस्नेहाकडे आशेने डोळे लावून बसले होते. भाऊसाहेब सोमणांच्या साठीसमारंभाची तारीख २२ नोव्हेंबर १९३६ होती, तर शनिवार ता. २१ रोजी जवळ जवळ रात्रीचा दिवस करून भाऊसाहेब सोमणांचे सर्व स्नेहांकितामध्ये अपेक्षित चर्चेचा जागर झाला. त्याचे प्रसादफळ मात्र भाऊसाहेब सोमणांच्या अपेक्षेपेक्षा अगदीच भिन्न निघाले. तरीपण प्रयत्नान्ती परमेश्वर भेटला नाही म्हणून आपले प्रयत्न कोणी सोडत नाही "अचूक चुकेल कोठे ॥" हा समर्थदंडक जो यशासाठी लागतो, तो आपल्या हाती नाही, असे कळून आल्यावर मंडळी जमल्यासारखा व आरंभल्यासारखा साठीसमारंभ रविवारी झाला.

आवश्यक ते धार्मिक विधि भाऊसाहेब सोमणानी अर्थातच केले, पानसुपारी सर्वत्रास झाली, लहानथोर सर्वच पाहुणेमंडळीना भाऊसाहेब सोमणासमवेत आपले घरी व न्यू इंग्लिश स्कूलचे इमारतीत गोड जेवण झाले. वडिलमंडळींचे त्यानी आशीर्वाद घेतले, बरोबरीच्यांचे अभिनंदन स्वीकारले, लहानांच्या अभिवादनाला कौतुकाचा साक्षात्कार दिला; आणि संबंधित व्यक्तीपैकी व संस्थापैकी ज्यानी

अत्याग्रहाने आपल्याकडे नेले त्यांच्याकडेही भाऊसाहेब जाऊन आले. शनिवार ता. २१ रोजी व्यायाममंडळाने सोमणाना त्यांचे एकसष्टीबद्दल पानसुपारी केली होती. ठाकोरदासबोवांचे वाड्यातील वसंतगायनसमाजाने त्याच दिवशी गायनसमारंभाने सत्कार केला होता. रविवारी दुपारी वेस्टर्न इंडिया, आर्यांग्ल वैद्यकविद्यालय वगैरे ठिकाणचा सत्कार स्वीकारून बरोबर २॥ वाजता, अध्यक्ष दे. भ. तात्यासाहेब केळकर यांचेसह सोमण श्रीकृष्ण थिएटरात आले. बँडच्या सुस्वर निनादात ते स्थानापन्न झाल्यावर सातारा जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातूनही आलेल्या सर्व दर्जांच्या व सर्व पेशांच्या तीन हजार जनसमुदायाने केलेल्या जयजयकाराने समारंभास सुरवात झाली. चाफळचे आबासाहेब महाराज, विनायकबुवा मसूरकर, दे. भ. शंकरराव देव, लोकशक्तीकार आचार्य जावडेकर, एरंडोलचे पी. जी. जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रौताचार्य धुंडिराजदीक्षित बापट इत्यादि मंडळी भाऊसाहेबासमवेत अध्यक्षांच्या सान्निध्यात विराजमान होती.

ईशस्तवन, स्वागतपर पद्य, आणि चाफळकरस्वामी विनायक महाराज व श्रौताचार्य यांचे अनुक्रमे समर्थ सांप्रदायिक आणि वैदिक आशीर्वाद झाल्यावर अध्यक्ष दे. भ. केळकर म्हणाले:—" पूर्वीच्या काळी ' देवानां प्रिय: ' अशी पदवी दिलेली ताम्रपटात आढळते. आता देवानी आपला अधिकार लोकाना दिला आहे. तेव्हा भाऊसाहेब सोमणाना आजपासून ' लोकानां प्रिय: ' म्हणून लोकप्रिय या पदवीने गौरवावे असे मला वाटते. "

केळकरांच्या या प्रास्ताविकानंतर समारंभास आलेले शुभसंदेश शिवरामपंत लिमये यानी वाचून दाखविले. त्यात लोकनायक अणे, बाळासाहेब प्रंतप्रतिनिधी औंध, बॅ. जयकर, बॅ. जमनादास मेहता, कन्हैयालाल मुन्शी, बाळासाहेब खेर, बॅ. कोयाजी, भय्यासाहेब गजेंद्रगडकर, खा. ब. कूपर, आण्णासाहेब भोपटकर, पं. सातवळेकर, प्रा. पोतदार, शंकरराव किर्लोस्कर, रामभाऊ मंडलीक, प्रि. धनंजयराव गाडगीळ, नानासाहेब सप्तर्षि (नगर), अच्युतराव पटवर्धन, वासुदेवराव मुंडले यांचे संदेश प्रमुख होते. संदेश वाचनानंतर सत्कार–मंडळाचे अध्यक्ष शंकरराव साठे यानी प्रथम पाच हजार रुपयांची थैली व खालील मानपत्र समर्पण करून हार घातला.

* * *

## मानपत्र

**प्रिय महाशय—**

आम्ही सातारा जिल्ह्यातील नागरीक आज आपल्या ६१ व्या वाढदिवसाचे शुभप्रसंगी, आपले अंत:करणपूर्वक स्वागत करतो.

आपला जन्म या जिल्ह्यात झाल्याने व आपले आतापर्यंतचे आयुष्य येथेच गेल्याने आपण जसे या जिल्ह्याचे झाला आहा, तसेच आपल्या प्रेमळ व परोपकारी, दानशूर व देशाभिमानी वृत्तीने आपण हा जिल्हा आपलासा केला आहे. गेली ३०।३५ वर्षे आपण या जिल्ह्याची बहुमोल सेवा केली आहे व या जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनावर आपल्या सर्वसंग्राहक कार्यकुशलतेचा ठसाच उमटविला आहे.

शुद्ध, निर्मल, चरित्र्य, गोड आणि मनमिळाऊ स्वभाव, दंभ आणि अहंकार यांचा पूर्ण अभाव, निस्सीम देशभक्ति, अलोट स्वार्थत्याग, इत्यादि गुण–समुच्चयामुळे आपले जीवन जनतेला आदर्शभूत झाले आहे; आणि अजातशत्रु, म्हणून आपण लौकिक मिळविला आहे.

१८९२ साली प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर प्रथम आपण काही वर्षे सातारा येथील इंग्रजी शाळातून शिक्षकाची नोकरी पत्करून आपल्या सार्वजनिक आयुष्याला सुरवात केली. परंतु ईशकृपेने यापेक्षा जास्त व्यापक कार्यक्षेत्र आपणास लाभावयाचे होते. त्यामुळे लवकरच म्हणजे सन १९०० साली आपण वकिलीची परीक्षा उत्तीर्ण होऊन सातारा येथे वकिलीच्या धंद्यात पाऊल टाकले व तेथूनच आपला व सातारा जिल्ह्यातील जनतेचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध सुरू झाला. त्यातून दैवयोगाने, निष्णात कायदे–पंडित व जिल्ह्यातील प्रसिद्ध पुढारी कै. दादासाहेब करंदीकर यांच्या देखरेखीखाली काम करण्याची संधी आपणास मिळाली; त्यामुळे वकिलीच्या धंद्यात काय अथवा सार्वजनिक कार्यात काय, आपण कै. दादासाहेबांचे शिष्य म्हणून लवकरच चमकू लागला; व उत्तरोत्तर सार्वजनिक कार्यात पुढाकार घेऊन आता पावेतो या जिल्ह्याच्या राजकारणाची धुरा आपण आपल्या खांद्यावर कुशलतेने वागवित आला ही अत्यंत अभिमानाची गोष्ट होय.

सातारा जिल्ह्याचे उत्कृष्ठ वकील म्हणून आपली जशी ख्याती झाली आहे, त्यापेक्षाही सातारा जिल्हयाचे विश्वस्त सल्लागार व एकमेव पुढारी म्हणून झालेला आपला लौकिक अत्यंत अभिमानास्पद होय. या जिल्ह्यात इतर ठिकाणाप्रमाणे अनेक पक्षोपपक्ष आहेत. परंतु ते सर्व आपल्याकडे आदराने पहातात व आपल्या कार्यात शक्य ते सहकार्य करू इच्छितात, यामुळे सातारा जिल्हयातील सार्वजनिक जीवन इतराना आदर्श वाटण्या–सारखे एक–संधी झाले आहे. विशेषतः १९२० सालापासून काँग्रेसच्या राजकारणात तरुणांच्या धडाडीने व अतुल काँग्रेसनिष्ठेने भाग घेऊन आपण जो देह झिजविला आहे व कारावासादि कष्ट भोगले आहेत त्यामुळे व वकिलीच्या धंद्यात मिळणाऱ्या हजारो रुपयांच्या कमाईचा विनियोग राष्ट्रकार्या-

कडे करून आपण जो स्वार्थत्याग केला आहे, त्यामुळे आपल्या विषयीचा सर्वांचा आदर सहस्रपटीने वाढत गेला आहे.

आपल्या अखंड लोकसेवेच्या कार्यात सातारा जिल्ह्यातील जनतेने आपल्याला शक्य ते सहाय्य केले आहे. १९२३ साली स्वराज्य पक्षाचे उमे-दवार म्हणून आपण मुंबई कायदेमंडळाचे निवडणुकीस उभे राहिलात, तेव्हा प्रचंड बहुमताने निवडून देऊन जनतेने आपल्यावरील विश्वास प्रगट केला आहे. या जिल्ह्यातील अनेक सार्वजनिक संस्थांचे अध्यक्ष व सल्लागार म्हणून आपण काम केले आहे. सातारा जिल्हा सभेचे नेते म्हणून व प्रकाश पत्राचे संपादक म्हणून झालेली आपली कामगिरी अत्यंत स्पृहणीय अशीच झाली आहे. विशेषतः आपण या जिल्ह्यातील सार्वजनिक कार्यासाठी आजन्म सेवकांची सोसायटी काढण्याचे जे काम हाती घेतले आहे ते तर आपले केवळ जीवित-कार्यच होणार आहे. आपल्या या बहुविध लोकसेवे-बद्दल सातारा जिल्ह्यातील जनता आपली फार ऋणी आहे.

शेवटी परमेश्वराने आपणाला उदंड आयुरारोग्य द्यावे व देशाची अधिकतर सेवा करण्यास आपणास संधी द्यावी अशी त्या जगन्नियंत्याजवळ आमची प्रार्थना आहे.

* * *

यानंतर जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील दीडशेच्यावर संस्थानी सोमणाना हार घातले. नंतर वाङ्मयाहेर वाचून दाखविण्यात आले. पैकी महत्त्वाचे वाङ्मय-याहेर असे:-

**एकसष्टीच्या वेळचा काव्याहेर**

राष्ट्राचे हित आपलेच समजे स्वार्था कधी ना करी ।
घेई लोकहितार्थ कष्टही बहू ना कीर्ति इच्छी परी ।।
अर्पूनि धन-देह-चित्त अपुले मानी स्वताला कृती ।
शोभे स्वकृतिनेच **सोमणकुलालंकार** हा भारती ।। १ ।।

तेजे न्यायसभेत हा तळपतो जैसा नभी भास्कर ।
बंधा तोडुनिया निरागस जना आनंदवी सत्वर ।।
वानू काय पटुत्व वादसमयी बिनतोड कोटिक्रम ।
साश्चर्ये तुकवीति मान अवघे पाहोनी तद्विक्रम ।। २ ।।

विद्या यस्य विनिर्मलाधिकतरं नम्रत्वतो राजते ।
सम्पत्सातिशयाधिगच्छति कृतार्थत्वं परं दानतः ।
कीर्तिः शीलगुणान्वयाच्च धवला शुक्लेन्दुवत् वर्धते ।
दीर्घायुर्वितर प्रभो, गुणानिधौ तस्मिन् गणेशात्मजे ।।

२२-११-३६ { **म. वि. काशीकर**
**का. म. देशपांडे**

या आहेरामुळे केळकरानी सोमणाना दिलेल्या "लोकप्रिय" पदवीची समर्पकता सर्वानाच पटली. हार व अहेरानंतर सोमणाना वाक्सुमने अर्पण्यात आली.

कर्नाटक–सिंह गंगाधररावजी देशपांडे म्हणाले, " मर्यादित क्षेत्रातील भाऊसाहेबासाखे कुशल कार्यकर्ते आपल्यात अत्यंत दुर्मीळ आहेत. प्रथम ते दुसऱ्याची विवंचना करतात. सरळपणाने वागणारा मनुष्य आपल्या राजकारणातल्या प्रति–स्पर्ध्यावर देखील कशी छाप पाडू शकतो याचे भाऊसाहेब हे मूर्तिमंत उदाहरण आहे. लोण्यापेक्षा मऊ बनून भाऊसाहेब प्रतिस्पर्ध्याला गिळतात. या त्यांच्या सौजन्यातही चैतन्य आहे. त्यामुळे त्यांच्याशी भांडावे कसे हेच माझ्यासारख्याला कळत नाही. "

शंकरराव देव म्हणाले " भाऊसाहेबांना सार्वजनिक राजकारणातील मह–त्वाकांक्षा कशी ती शिवली नाही. आह्मा देव दानवांच्या पुष्कळच गोष्टी त्याना पसंत नाहीत; पण असे असूनही ते सर्वाना प्रिय आहेत, याचे कारण त्यांच्या सर्व विचारांच्या मागे देशप्रेमाची उत्कट भावना आहे. पैसा, वेळ, आणि श्रम याबाबत ते कोणाच्याही उपयोगी पडण्यात ' होयमूर्ति ' आहेत."

पी. जी. जोशी म्हणाले, " दुसऱ्याचे गुण घेणे व आपले दोष जाणणे हाच माणुसकीचा अर्थ आहे. याच गुणामुळे भाऊसाहेबांच्यासाठी सर्व माणसे एकत्र येतात. सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या अंगी हा गुण अधिक प्रमाणात दिसू लागेल, तर देव–दानवांचे युद्ध केव्हाच नाहीसे होईल. "

नाथ घाणेकर म्हणाले, " सोमण म्हणजे कालिदासाने वर्णन केलेले सर्वोपकार-क्षम वृत्तीचे आदर्श गृहस्थाश्रमी होत. या वृत्तीमुळेच शक्यता असताही ते शून्याधीशाचे लक्षाधीश होऊ शकले नाहीत. "

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणाले " सोमण आमच्या प्राज्ञपाठशाळेचे कळकळीचे संचालक आहेत. देशात जे काही विचारप्रवाह वहात असतील त्यातील जबाबदारी ते ओळखणारे आहेत. "

भाऊराव पाटील म्हणाले, " मला सोमण म्हणजे मोदी पेढे वाटतात. त्यांची माझी पहिली गाठ पाटखळ–बोरखळच्या प्लॅटफॉर्मवर. पण मला सांगण्यास आनंद वाटतो की त्यानी ब्राम्हण–ब्राम्हणेतर वाद मिटविण्याच्या कामी फार परिश्रम केले व या जिल्ह्याला आदर्श केले. आताच मला सोमण यानी २५ रु. गुपचूप देणगी माझ्या संस्थेसाठी दिली. ती देत असता मला पहिल्याने वाटले की माझे घोंगडेच हिसकावून घेत आहेत. या देणगीतून सेकंड एल्. एल्. बी. च्या मांग मुलास मी ' सोमण प्राईज् ' देणार आहे. सोमणाना तुम्ही कितीही पदव्या दिल्यात तरी रामभाऊ या नावानेच त्याना खरा आनंद आहे. "

आणखी अनेक मंडळीनी गौरवपर भाषणे केल्यावर, भाऊसाहेबानी या सत्का-राचा स्वीकार विनम्रतेने करताना, आपल्याला मिळालेल्या थैलीत स्वताचे पाच

हजार रुपये घालून सातारा जिल्ह्याच्या सेवेला अर्पण करीत आहोत असे जाहीर केले. ते गहिवरलेल्या अंतःकरणाने उद्गारले "मी देशाचा ऋणकरी आहे. प्रत्येक-जण देशाचा ऋणकरी आहे. जोपर्यंत ऋण फेडीत नाही तोपर्यंत कोणताही मनुष्य मोठा नाही. या दृष्टीने मी अत्यंत लहान आहे. मला मोठे म्हणण्यातील रहस्य एवढेच आहे की जनताजनार्दन माझ्या अवगुणाकडे लक्ष देत नाही."

पारि प्रभुहि संग्रही सकल वस्तुला ठेविती।
गुणा न म्हणता उणा अधिक आदरे सेविती ।।

"ज्या कुळामध्ये माझा जन्म झाला, त्याच्या गुणांचा परिणाम माझे ठिकाणी झाला आहे. अजातशत्रु म्हणवून घेण्याची पात्रता माझे अंगी असलीच तर त्याचे श्रेय मला नाही. माझ्या पूर्वीच्या राजकीय पिढीचे उदाहरण डोळयापुढे ठेवून मी वागत आलो, तिचे ते श्रेय आहे. मला महत्त्वाकांक्षा नाही हे म्हणणे चुकीचे आहे. मी स्वार्थी आहे. जिल्ह्याची सेवा सातत्याने करणारी संस्था सातारा जिल्ह्यात काढावी व तिच्यासारख्या संस्था इतर जिल्ह्यातही निघाव्यात अशी माझी स्वार्थाची महत्त्वाकांक्षा आहे. माझ्या हातून ते कार्य घडवून घ्यावे, अशी बुद्धि परमेश्वराने सर्वांना द्यावी, अशी माझी प्रार्थना आहे. आपण सर्वांनी ते कार्य होईपर्यंत मला मरूच देता उपयोगी नाही व सहाय्य करून कामगिरी करवून घेतली पाहिजे."

सोमणांचे असे भाषण झाल्यावर केळकरानी समारोप केला. दे. भ. केळकर आपल्या भाषणात म्हणाले, "लोकप्रिय भाऊसाहेब सोमण यांचा व माझा गेल्या चाळीस वर्षांचा परिचय आहे. मला वाईट वाटेल अशी एकही गोष्ट त्यानी केली नाही. या अवधीत त्यांचा दोष कसा तो ऐकला नाही. असाच मनुष्य पुढारीपण मिळवू शकतो. इतक्या संस्था व व्यक्ति यानी सोमणाना जे हार अर्पण केले ते काही तोंडदेखलेपणाचे काम नाही. कृतज्ञता जितकी दाखवावयास पाहिजे तितकी दाखविली पाहिजे. सोमणानी आपल्या भाषणात कितीही विनय दाखवला असला तरी त्याना आपल्या गौरवाला संक्षेप देता आला नाही. कदाचित् त्यांचे गणित कच्चे असेल. अंशछेदाचा संक्षेप होऊनही शेवटी काही गणित उरतेच. आता त्यांच्यासंबंधाने जी भाषणे झाली तो काय गौरवाचा देखावाच होता? सोमणानी मर्यादा आखून काम केले असे सांगण्यात आले. पण कर्तव्याला मर्यादा कसली? कर्तव्य—मर्यादेची भावनाच चुकीची आहे. जे पिंडात ते ब्रह्मांडात. खेड्यातील पुढाऱ्यांची किंमत देशाच्या पुढाऱ्याइतकीच. जो गुणानी मोठा तोच मोठा. वाणी संतुष्ट झाला तर मूठभर पीठ भिक्षेकऱ्यास देतो; राजा संतुष्ट झाला तर एका गावाचे उत्पन्न देतो. त्यांच्या दातृत्वाचा गुण एकच आहे. खेड्यांच्या व देशाच्या पुढाऱ्यात देशभक्ति, चातुर्य, कर्तृत्व व त्याग एकपंखी असू शकतात. "हातात फासा, डोईवर मासा, बोडका ब्राह्मण चालला कसा"? यातील मर्म घेण्यासारखे आहे. कर्णाने म्हटलेच आहे की "दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्"। कार्य-कर्त्यांनी म्हणू नये की मी पुढारी कसा होईन? कार्य करीत राहिल्यास तो पुढारी होऊ

शकतो. सौजन्य, स्वार्थत्याग, आणि सत्कार्यप्रवृति या तीन गुणामुळेच भाऊसाहेब पुढारी आहेत. साठीच्या समारंभाला मी एकदा टाईपरायटरच्या घंटेची उपमा दिली होती. मी म्हटले होते की घंटा झाल्यावर पुन्हा टक् टक् केले तर अक्षर उमटणार नाही. जो कार्यमग्न झाला त्याला घंटाच ऐकू येत नाही. भाऊसाहेबाना ही घंटाच ऐकू येऊ नये व कोणी ऐकवूही नये. कार्यार्थ त्याना तुम्ही जगवा. त्याला ते तयार आहेत. बरे कार्य लवकर होऊन जावे लागले तर त्यासही त्यांची ना नाही. सायंकाळ होऊन गेली म्हणजे दिव्यात तेल आहे आहे, नाही नाही असे आपण म्हणतो. तसाच साठीच्या पुढच्या आयुष्याचा प्रकार आहे. भाऊसाहेबाना जिल्ह्याने देशसेवेच्या ऋणमुक्ततेची पावती आताच द्यावयास हरकत नाही. जगात विश्वास म्हणून काही आहे की नाही ?"

केळकरांच्या या भाषणानंतर बॅरिस्टर करंदीकर यानी आभार मानले. पानसुपारी, अत्तर–गुलाब व राष्ट्रगीत होऊन हा समारंभ संपला. सदर समारंभानंतर सार्वजनिक कार्याविषयी आस्था बाळगणारे रॉयल उपहारगृहाचे मालक दत्तोपंत कुलकर्णी मास्तर यानी केळकर सोमणाना व पाहुणे मंडळीना अल्पोपहार दिला.

या समारंभाचे निमित्ताने समर्थाने आपला एक विशेष अंक काढला होता. या समारंभाची सर्व व्यवस्था १९२० सालापासून पुढे आलेल्या सोमणांच्या नव्या चाहत्यानी बहुधा केली होती. आपल्या जुन्या पुढाऱ्यांचा गौरव करण्याची प्रवृत्ति नव्या कार्यकर्त्या पिढीत आहे याबद्दल सोमणांच्या बरोबरीच्या मंडळीना आनंदच वाटत होता. तथापि या आनंदाबरोबरच सोमणांच्या गौरवात आपले त्यांचे संबंध असण्याइतका मनमुराद भाग आपल्याला घेता आला नाही, याचा किंचित् विषादही त्या मंडळीना वाटत होता. या सर्वांपेक्षाही स्वतः भाऊसाहेबांची मनोवृत्ती 'झपूर्झा' सारखी झाली होती. हर्ष खेद मावळले होते. याचे कारण आपल्या येथे जमलेल्या मंडळीत आदल्या दिवशीच्या चर्चेने अपेक्षेप्रमाणे दिलजमाई झाली नाही हे तर होतेच; पण लोकांचे आशीर्वाद घेऊन आपण एकतऱ्हेने कृतकार्य होत असता आपल्याला सार्वजनिक कामाचे मार्गदर्शक असलेले गु. रा. ब. पाठक आणि विशेषतः दादासाहेब करंदीकर हे हा समारंभ बघावयास नाहीत; फार काय ज्यानी आपल्या वडील–बंधूसारखे सार्वजनिक कार्यात आपल्याला सहकार्य केले ते गणपतरावजी फणसळकर, नानासाहेब आगाशे, वामनराव घाणेकर वकील, कडूसकर वकील आणि डॉ. विष्णुपंत भिडे इत्यादि मंडळी आपल्या या आनंदाचे प्रसंगी भागीदार व्हावयास नाहीत हीसुद्धा विषण्णता भाऊसाहेबांच्या मनावर होती. आपल्यासारख्या साध्या माणसाने सद्बुद्धीने सतत कार्य करीत राहिल्यास जनता गौरवाचा अभिषेक साध्या माणसावरही करू शकते असे दृश्य उगवत्या पिढीपुढे राहिले तर सातत्याने देशसेवा करीत राहण्याचा उत्साह तिला राहील; या एका पवित्र भावनेने आपण सदर समारंभाला संमति दिली व त्यात जरूर तेवढा भाग घेतला हेही समाधान भाऊसाहेबाना मनोमन होते यात शंका नाही.

# १० विधान परिषदेत

१९३७ सालच्या 'पसतीसच्या सुधारणाखाली' झालेल्या निवडणुकीत मुंबईच्या विधानपरिषदेसाठी भाऊसाहेब सोमणाना काँग्रेसतर्फे उभे करण्यात आले. हा प्रतिष्ठासंपन्न मतदारसंघ पदवीधरांचा व "व्हेस्टेड इंटरेस्ट" वाल्या जमीनदारांचा, इतमामी लोकांचा होता. भाऊसाहेब सोमण पदवीधर नव्हते, तसेच ते गरीबीतून वर आले असले तरी गब्बरही नव्हते. तरीही पुंजीपतींचे दावेदारही नव्हते. पण शेतकऱ्यांच्या आणि खेडूतांच्यामध्यें मिसळून त्यांच्या सेवेसाठी हयात घालविणारे आणि शेतकरी कामकऱ्यांचे राज्य करू इच्छिणाऱ्या काँग्रेसचे सोमण, हा मतदारसंघाचा विचार केला तर गौणपक्षच होता. पण सुशिक्षितांचा आणि श्रीमंतांचा प्रनिनिधी बहुजनसमाजाचे प्रश्न कळकळीने पाहाणाराच असा यशस्वी झाला तरच काँग्रेस सर्व-वर्ग-समन्वयाची भूमिका साकार करू शकेल अशी परि-स्थिती असल्याकारणाने पुणे जिल्ह्याच्या पदवीधर व प्रतिष्ठावंत मंडळींचा आणि भाऊसाहेब सोमणांचा तितका दाट परिचय नसताही सातारा-पुणे या जोड जिल्ह्यांच्या मतदारसंघात भाऊसाहेब सोमणांची उमेदवारी हा एक कस होता. त्यातून आपल्या प्रादेशिक वा मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकी लढविणारे या दोनही जिल्ह्यातील उमेदवार आणि त्यांचे सहाय्यक, आपल्या अगर आपल्या उमेदवाराच्या यशाला अनुकूल होईल, इतकेच सहाय्य भाऊसाहेबांच्या निवड-णुकीला करणार, नाहीतर सदिच्छा प्रगट करणार, ही मनुष्य स्वभावातील छटाही लक्षात घेतली, तर एकटया सातारा जिल्ह्यातील सर्वसंग्रही परिचयावर आणि कृतकार्याच्या पुण्याईने, पुणे जिल्ह्यातील मिळणाऱ्या आशीर्वादावर भिस्त ठेवण्यापलिकडे दुसरा खात्रीचा आधार निवडणुकीच्या यशास नव्हता. फर्ग्यूसनचे प्रिन्सिपॉल रँग्लर महाजनी हे निवडणुकीच्या प्रागंणातील प्रागतिक पक्षीय उमेदवार त्याच मतदार संघात असल्याकारणाने, त्यांचे नाव, त्यांचे शिष्यसंबंध, प्रागतिक पक्षातील व इतरही त्यांचे मातबर सहाय्यक, सातारा जिल्ह्याशी जन्मभूमी म्हणून असलेले त्यांचे संबंध या सर्व गोष्टींचा विचार करता त्यांच्या यशाबद्दल कोणालाच सहसा शंका नव्हती. पण त्यामुळेच आपल्याच जिल्ह्यातील आपल्याच गावच्या एका कर्तृत्वाने तेजास चढलेल्या तरुणाच्या उमेदवारीशी किंचित् चढाओढीचा संबंध निवडणुकीत आल्यामुळे, आपल्यासाठी खटपट करणारा उत्साहाच्या भरात किंवा मोहविवश होऊन काही वाह्यात्पणा होऊ नये अशी खबरदारी भाऊसाहेब सोमणाना निक्षून घेणे कर्तव्यच वाटले. आपल्या पक्षाचे ध्येय धोरण व स्वताची लायकी यांच्या कसावरच लोकानी आपणास प्रतिनिधी म्हणून निवडून द्यावयाचे असल्यास द्यावे, अन्य पक्षियांच्या निंदेने वा धिक्काराने आपली निवडणूक मुळीच डागळता उपयोगी नाही, ही दक्षता भाऊसाहेब सोमण

जन्मभरच घेत आले; पण पदवीधर–प्रतिष्ठासंपन्नांच्या मतदार संघात ती त्यांची दक्षता दुणावली. अशा स्थितीत विधान–परिषदेच्या निवडणुकीचा निर्णय काँग्रेसला अनुकूल असा लागला आणि भाऊसाहेब निवडून आल्याबद्दल काँग्रेसच्या पाइकाना पहिल्या नंबरचा आनंद वाटला. भाऊसाहेबांच्या या यशास पं. जवाहरलाल नेहरूनी निवडणुकीच्या निमित्ताने केलेला सातारा जिल्हयातील दौरा आणि सर्व लहान थोर कार्यकर्त्यांनी केलेले सहाय्य ही प्रामुख्याने कारणीभूत होती आणि त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास भाऊसाहेब चुकले नाहीत. रॅंग्लर महाजनी पहिल्या क्रमाने निवडून आले आणि आपण दुसऱ्या क्रमांकाने आलो यात स्वता भाऊ–साहेब सोमणांचा आनंद तिहेरी होता. त्या मतदार संघास काँग्रेसचा उमेदवार एकच असल्याकारणाने काँग्रेसचा तो शंभर टक्के विजय होता. तेजस्वी तरुणांची विद्वत्ता पहिल्या क्रमांकाने सन्मानण्यात पदवीधराबरोबर प्रतिष्ठा–संपन्नानी भाग घेतला व गुणगौरवाची वृति प्रकट केली. आपल्याला दुसरा क्रमांक मिळाला असला तरी बदलत्या काळाच्या जमान्यात काँग्रेस सांगते आहे तशी पावले टाकणे–आपल्या हितसंबंधाच्या जपणुकीची पराकाष्ठा करून का होईना ! – आता आवश्यक आहे, हे पदवीधर–प्रतिष्ठा–संपन्नातील मंडळीनी ओळखले. भाऊसाहेब सोमणाना स्वताच्या निवडणुकीने झालेल्या आनंदाचे हे तीन सर होते.

१९३७ च्या या निवडणुकीत काँग्रेसपक्ष बहुसंख्येने निवडून आला. लोक–शाहीच्या तत्त्वास अनुसरून काँग्रेस पक्षाने मंत्रिमंडळे स्वीकारली पाहिजेत असा प्रसंग उद्‌भवला. १९३५ चा सुधारणा कायदा हा भारताच्या अपेक्षेप्रमाणे मुळीच नसल्याकारणाने त्या सुधारणा राबवाव्यात न राबवाव्यात याबद्दल भवति–न–भवति झाली होती. किंबहुना एल्‌एल्. बी झालेला मनुष्य मॅट्रिक आहे आणि एम्. ए. झालेल्या बाई साक्षर आहेत असे दाखले मतदार होण्याकरता लोकाना मागितल्या कारणाने निवडणुका होऊनही काँग्रेसपक्षाने सुधारणा राबविण्याचा प्रयत्न केला तर अपमानाचे प्रसंग वरचेवर येतील अशी भीति काँग्रेसपक्षाला वाटल्याशिवाय राहिली नाही. त्या वेळी भारताच्या सात प्रांतात काँग्रेसला बहुमत मिळाले होते. त्या त्या प्रांतातील काँग्रेसपक्षीय नेत्याना प्रांताधिपतींनी मंत्रिमंडळ बनविण्यासाठी भेटीस बोलाविले असता वर प्रगट केलेली भीति प्रांताधिपतींच्या पुढे स्पष्ट मांडून काही आश्वासनावर मंत्रिमंडळाचा स्वीकार करण्याचे आपण मान्य करू असे काँग्रेसने त्याना सांगितले. प्रांताधिपतींच्या सत्‌प्रवृत्तीवर विश्वास ठेवून काँग्रेस नेते मंत्रिमंडळे बनवावयास तयार नाहीत, तर आपणही काही आश्वासने द्यावयास तयार नाही असे सरकारने सांगितले. अर्थातच काँग्रेसच्या व्यतिरिक्त दुसऱ्या पक्षाची मंत्रिमंडळे १९३७ साली स्थापन झाली. त्यात मुंबई इलाख्याचे मंत्रिमंडळ बनविण्याची कामगिरी खा. ब. धनजी शहा कूपर यांचेकडे

आली. कूपर मंत्रिमंडळाचा कारभार सुरू झाला. बॅ. सावरकराना बंधमुक्त करण्यासारखी काही कामगिरीही त्यानी केली. पण बहुसंख्य पक्षाला डावलून लोकशाहीची भाषा करणे इंग्रज सरकारला अवघड होते म्हणून सरकारची काँग्रेसपक्षाशी पुन्हा बोलणी झाली आणि सरकारच्या सत्प्रवृत्तीची शंका येताच काँग्रेसजनानी तसे स्पष्ट कळवून राजीनामे द्यावयास हरकत नाही अशा सूचक आश्वासनावर काँग्रेसपक्षाने मंत्रिमंडळे स्वीकारली. मुंबई इलाख्यात ना. बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ स्थापन होऊन काँग्रेसचा कारभार सुरू झाला. भाऊसाहेब सोमण ज्या वरिष्ठ कायदे–मंडळात ( विधान–परिषद ) निवडून आले होते तेथे त्यांचे नाव त्या कायदे–मंडळाच्या उपाध्यक्षपदासाठी काँग्रेसपक्षाने कायम केले. भाऊसाहेब सोमण यांची उपाध्यक्षपदावर बिनविरोध निवडणूक होऊ नये म्हणून कूपर मंत्रिमंडळाचे अर्थमंत्री जमनादास मेहता यानी आपले स्नेही एस्. सी. जोशी याना भाऊसाहेबांचे विरोधक म्हणून उभे केले; पण शेवटी भाऊसाहेब सोमणच यशस्वी झाले. १९३७ च्या जुलैमध्ये भाऊसाहेब सोमणानी हा अधिकार स्वीकारल्यानंतर आपल्या मतदार संघातील प्रतिष्ठासंपन्नांची वकिली करण्याचा प्रसंग कुळकायद्याच्या निमित्ताने गोखले हॉल पुणे येथे भरलेल्या सभेतच भाऊसाहेब सोमणावर आला.

शनिवार ता. १६ व रविवार ता. १७ जुलै १९३८ रोजी मुंबई विधि–मंडळातील काँग्रेसपक्षाच्या सभासदांची महत्त्वाची सभा पुणे येथे गोखलेमंदिरात भरली होती. विधिमंडळाच्या येत्या पावसाळी बैठकीत काँग्रेसप्रधानमंडळ, कुळकायदा, कर्जसवलती वगैरे जनतेच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नासंबंधी जी बिले मांडणार होते, त्यांच्या योजनांचा त्या सभेत विचार होणार असल्याने तिला बरेच महत्त्व नि गांभीर्य प्राप्त झाले होते. प्रधानमंडळाच्या योजना ना. खेर यानी सभासदासमोर मांडल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यानी भाषण केले. "आजपर्यंत मध्यम वर्गातील छोटया जमीन–मालकानी काँग्रेसला सहाय्य केले आहे, तेव्हा त्यांचे हित आपण रक्षण केले पाहिजे. मात्र जमीनदार, सरदार या लोकानी आतापर्यंत काँग्रेसला विरोध केला हेही विसरता कामा नये. सरकारी योजनावरील चर्चेत महत्त्वाच्या तात्त्विक प्रश्नावरच भर द्यावा" असेही सरदारानी सुचविले. नंतर काही आमदारांची भाषणे झाल्यावर शनिवारचे काम संपले. रविवारी सकाळी कर्नाटकसिंह गंगाधररावजी देशपांडे यांचे भाषण झाल्यावर वरिष्ठ विधिमंडळाचे उपाध्यक्ष भाऊसाहेब सोमण यानी गंगाधरराव यांच्या म्हणण्याला पाठिंबा देऊन पुढील मुद्दे मांडले. "काँग्रेस–प्रधान–मंडळ अधि-कारारूढ झाल्याकारणाने आपला डोईजड शेतसारा कमी होईल अशी अपेक्षा आज शेतकरीवर्ग करीत आहे. त्या बाबतीत काहीच हालचाल न करता आज विना–

कारण हा कायदा पुढे मांडण्यात यावा हे आश्चर्य आहे. या कायद्याची आजच काय नड आहे हे कोणीही अजून पटवून दिलेले नाही. डोईजड खंडामुळे कुळाची पिळवणूक होते ही गोष्ट वास्तविक प्रधानमंडळाने आधी सिद्ध धरून – सिद्ध करून नव्हें, – या योजनेत तालुकदार–सरदारांच्या बरोबर सर्व इनामदारानाही गोवण्यात आले आहे. महाराष्ट्रात इनामदारांचे हिस्से पै–पै पर्यंत लहान झालेले असतात. अशा लहान हिश्याच्या इनामदाराना ते केवळ नावाचे इनामदार आहेत म्हणून हे अन्याय्य होणार आहे. या एकाच गोष्टीवरून या सर्व गुंतागुंतीच्या प्रश्ना–बद्दल इतकी घिसाडघाई का? चौकशीमंडळ नेमून या प्रश्नाची साद्यंत चौकशी करा व मग काय त्या योजना आखा. सरदार पटेल म्हणाले की, 'आम्ही हा प्रयोग करतो आहोत.' पण मागील नोकरशाहीने केलेल्या प्रयोगाचे परिणाम अजून जनता भोगते आहे. त्यातून आधी तिला मोकळी करा, आणि मग तरी हे नवे प्रयोग सुरू करा. मंत्रिमंडळांत आर्थिक तज्ञ आहेतच. मला आणखी एक मुद्दा सुचवावयाचा आहे की या कुळकायद्याच्या योजनेने जमिनीच्या किंमती खाली उतरतील. त्यामुळे इलाख्यातील एकंदर मालमत्तेची–अॅसेट्सची–किंमत कमी होणार आहे. प्रधान–मंडळाने या मुद्यावर आपले म्हणणे पुढे मांडावे.

आपल्या मतदार संघाच्यावतीने सोमणानी असे सडेतोड केलेले भाषण अनुत्तरितच राहिले.

कौन्सिलचे उपाध्यक्ष म्हणून निवडणूक झाल्यावर भाऊसाहेब सोमणानी आपल्या मतदारांची आणि जिल्ह्यातील जनतेची गाऱ्हाणी दूर करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. ब्रिटिश रिसायतीत ज्यांच्यावर अन्याय झाले होते त्याना त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्याचा सोमणानी कसोशीने प्रयत्न केला. प्राथमिक शिक्षकापैकी गणेश पांडुरंग कुलकर्णी यांच्यासारख्या ट्रेण्ड शिक्षकाना एज्युकेशनल इन्स्पेक्टर कितीतरी वर्षे अगोदर होण्याचा हक्क असताना तो डावलला गेलेला हक्क भाऊसाहेबांच्या प्रयत्नानी त्याना सुपूर्त झाला. होमरूल–लीग चळवळीच्या वेळी ज्यांची पेन्शने आणि इनामे चळवळीत भाग घेतल्यामुळे जप्त झाली होती ती त्याना सोमणांच्या शब्दानी परत झाली. अशा तऱ्हेचे काम सरकारी धोरणाला धरून करीत असताही त्यांचे खरे लक्ष खेडुतांच्या जीवनमानाकडे होते.

# ११ लोकसेवासंघ

कित्येक वर्षापासून लोकांचे लक्ष खेड्याच्या उद्धाराकडे होते. खेड्यांच्या उद्धाराचे कार्य बरेच त्रासाचे व जिकिरीचे म्हणून कित्येक दिवस त्या कार्याची उपेक्षाही झाली. तथापि त्या कार्याला पद्धतशीर आरंभ केल्याशिवाय ना. बाळासाहेब खेर यानी प्रांतिक ग्रामसुधारणा–मंडळापुढे म्हणल्याप्रमाणे "स्वराज्य याचा अर्थ स्वताच्या संसाराची व आपल्या देशाच्या कारभाराची जबाबदारी आपल्या वाट्याप्रमाणे स्वतावर घेऊन तो सुरळीत करणे होय." असा असल्याकारणाने भारतात नांदावयाची लोकशाही यशस्वी करण्याकरता जबाबदारी शिरा–वर घेऊन ती पार पाडण्यास ग्रामीण जनतेस समर्थ केले पाहिजे. ही तळमळ भाऊसाहेब सोमण याना आपल्या सार्वजनिक जीवनाच्या आरंभापासूनच होती. सातारा जिल्हा लोकसेवासंघाचे चिटणीस यानीच त्या संघाच्या कार्यासंबंधी संकलित निवेदन केले आहे, तेच येथे देतो म्हणजे भाऊसाहेब सोमणांच्या सहाय्याने, प्रेरणेने व मार्गदर्शनाने कसा उठाव घेतला होता हे वाचकांच्या लक्षात येईल. "भाऊसाहेब सोमण यांची प्रकृति सौम्य आणि शांत व प्रवृत्ति विधायक आणि सेवापरायण होती. या त्यांच्या मूळ स्वभावाप्रमाणे त्यानी सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यापासून विधायक लोकसेवेकडेच त्यांचा ओढा असे. सन १९२७ साली "ग्राम-सेवा-संघ" या लहानशा संस्थेची त्यानी स्थापना केली. या कार्याची मुख्य धुरा दत्तात्रय वासुदेव परचुरेशास्त्री यानी आपल्या शिरावर घेतली. या संस्थेच्या कार्यवाहाचे काम गोपाळ वासुदेव जोशी वकील सातारा आणि दत्तात्रय कृष्ण गोसावी वकील, सातारा या उभयतानी पत्करले. सातारा तालुक्यातील सर्व खेडी एवढेच मर्यादित क्षेत्र या कामासाठी परचुरेशास्त्रीं यानी वरील मंडळींच्या सल्याने निश्चित केले होते. सातारा तालुक्यात सुमारे १५० किंवा थोडी अधिकच खेडी आहेत. तालुका प्रायः डोंगराळ मुलखाचाच आहे. अशा या भागात प्रत्येक खेड्यास शास्त्रीबुवा पायी गेले. खेडे प्रत्यक्ष पाहून आणि काही वेचक गावकरी मंडळींशी समक्ष भेटून, बोलून, मिळेल ती बहुतेक सर्व माहिती मिळविण्याचे बिकट काम शास्त्रीबुवानी एकट्याने पार पाडले. या कामात कित्येक गावात गावकरी मंडळीनी त्यांची जेवणाखाण्याची सोय केली तर काही थोड्या गावात त्याना प्रसंगी उपासही काढावे लागले. पण कोणत्याही कष्टाची वा गैरसोयीची पर्वा न करता शास्त्रीबुवानी हे अंगीकृत कार्य तडीस नेले. आणि मिळविलेल्या माहितीच्या आधारे 'खेड्यातील यात्रा' या नावाचे एक ७५।८० पानाचे छोटे पुस्तक सन १९२९ साली प्रसिद्ध केले. या पुस्तकावरून त्यानी केलेल्या या बिकट कामगिरीची पूर्ण कल्पना येणारी आहे. सदर माहितीच्या आधारे ज्या सार्वजनिक तक्रारी आढळून आल्या त्यापैकी काहींचा परिहार सरकारी मार्गाने भाऊसाहेब आणि त्यांचे सह-

कारी सेक्रेटरी यानी केला. ग्राम–सेवासंघाचे हे काम सुमारे दोन अडीच वर्षे म्हणजे १९२९ साल अखेरीपर्यंत सरासरी चालले. पुढे १९३० साल उजाडून पहिला सत्याग्रह– संग्राम आल्याने हे काम कायमचे स्थगित झाले. या कामासाठी लागणारा मासिक सुमारे ५० रु. खर्च स्वतः भाऊसाहेब यानी एकटयाने बहुतेक सर्व पदरचा केला. मध्यंतरी ४।५ महिन्यांचा खर्च दादासाहेब करंदीकर यानी सोसला. तसेच 'खेडयातील यात्रा' हे पुस्तक छापण्यासाठी लागणारा खर्चही त्यानीच सोसला."

"१९३० च्या सत्याग्रह–संग्रामाची समाप्ति गांधी–आर्यविन करारानें ५ मार्च १९३१ रोजी झाली. आणि त्यानंतर आलेल्या शांततेच्या काळात मे १९३१ रोजी मसूर ता. कऱ्हाड जि. सातारा येथे सातारा जिल्हा राजकीय–परिषदेचे अधिवेशन लोकनायक माधव श्रीहरी उर्फ बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. सदर अधिवेशनात लोकसेवासंघाची कल्पना चाफळचे विष्णुआण्णा देशपांडे आणि कऱ्हाडचे पांडुआण्णा शिराळकर या उभयतानी भाऊसाहेबांचे सल्यास अनुसरून एका ठरावाचे रूपाने मान्य करून घेतली. तथापि वर्षभरातच १९३२ चे आरंभी पुनः सत्याग्रहाचा लढा देशात सुरू झाल्यामुळे या कल्पनेस लवकर मूर्त स्वरूप येऊ शकले नाही. पण सन १९३६ साली पांडुआण्णा शिराळकर यानी एकटयाने या कामा–साठी तीस हजार रुपयांच्या मोठ्या देणगीचे जाहीर अभिवचन देऊन या कल्पनेस पुनः जोराची चालना दिली. दादासाहेब करंदीकर यानीही आपली एक हजार रु. देणगी प्रत्यक्ष देऊन या कल्पनेला उत्तेजन दिले. पुढे १९३६ च्या नोव्हेंबर महिन्यात भाऊसाहेब सोमण यांचा ६० वा वाढदिवस समारंभ झाला. त्या वेळी लोकानी त्याना अर्पण केलेली ५००० रु. ची थैली त्यानी लोकसेवासंघाचे कार्यास अर्पण केली. शिवाय स्वतः त्यानी पदरचे आणखी ५००० हजार रु. या कामासाठीं दिले. तसेच जिल्ह्यातील अनेक लोकाकडून लहान मोठ्या देणग्या मिळविण्याचा प्रयत्नही चालू ठेवला. अशा रीतीने द्रव्यनिधीची काहीशी सोय झाल्यानंतर श्रीशिवराज्याभिषेकोत्सवाच्या शुभदिनापासून म्हणजे ता. २१–६–१९३७ पासून लोकसेवासंघाचे कार्याचा प्रत्यक्ष उपक्रम सुरू करण्यात आला. कराडचे सुप्रसिद्ध लोकसेवक "समाजभूषण" पुरुषोत्तम पांडुरंग उर्फ बाबूराव गोखले यानी स्वता कार्याची जबाबदारी अंगावर घेतल्याने कार्याला एकतऱ्हेचा उठाव आणि उंची एकदमच प्राप्त झाली. त्याच सालच्या लो. टिळक–पुण्यतिथीपासून ( १–८–३७ पासून ) वाईचे ( सध्या कराडचे ) भय्याशास्त्री वाटवे, हेही गोखले यांचे जोडीने काम करण्यास तयार झाले. तसेच ता. १५–८–३७ पासून दहिवडी ता. माण जि. सातारा येथील धोंडीराम नारायण काशीद हे कार्यकर्तेही वरील उभयताना येऊन मिळाले. लोकसेवासंघाच्या सेक्रेटरी स्थानाची जबाबदारी द. क्र. गोसावी वकील सातारा यानी ता. १–८–३७ पासून हौसेने पत्करली. अशा रीतीने

शिराळकर आणि सोमण या उभयतांचे मार्गदर्शनाखाली लोकसेवासंघाचे कार्य सातारा जिल्ह्यात उत्साहाने आणि जोमाने सुरू झाले. कराड, कोरेगाव, खटाव, खानापूर, जावली, तासगाव, पाटण, माण, वाळवे आणि सातारा अशा जिल्ह्याच्या बहुतेक सर्व तालुक्यातून सुमारे २००–३०० गावाना वरील तीन (गोखले, वाटवे, काशीद) कार्यकर्त्यांनी पायी फिरून समक्ष भेटी दिल्या आणि अवश्य तितका वेळ प्रत्येक गावात राहून गावातील जरूर त्या सर्व मंडळींच्या समक्ष भेटी घेतल्या. त्यांच्या नानाविध अडचणी–जंगल, पाटबंधारे, शिक्षण, हरिजनांच्या गैरसोयी, पिण्याचे पाणी, रस्ते, कर्जबाजारीपणा, टपालाची गैरसोय, नदीवरील नावांची गैरसोय, अधिकाऱ्यांची बेफिकिरी, गुंडाचा उपद्रव इत्यादि सर्व प्रकारच्या अडचणी समजावून घेतल्या आणि त्यापैकी शक्य तेवढ्या अडचणींचा परिहार (मुख्यतः भाऊसाहेब सोमण यांचे सल्याप्रमाणे सरकार दरबारी प्रयत्न करून) करवून घेतला."

"वरील तीन कार्यकर्त्यांचे कामास पूरक म्हणून गोटखिंडीचे श्री. नारायणराव जोशी, शिराळ्याचे नेमिनाथ अण्णा कत्ते व रामचंद्र महादेव जोशी, तासगावचे चिंतोपंत काळे आणि नागठाण्याचे श्रीपाद हरी जोशी या कार्यकर्त्यांनीही आपले इतर व्यवसाय संभाळून आपापल्या भागातील खेडेगावात वरील प्रकारचेच विधायक काम लोकसेवासंघाचे वतीने केले. या कार्यकर्त्यांना प्रवासखर्च व पोस्ट खर्च एवढीच अल्प आर्थिक मदत संघाकडून केली जात असे. अशा तऱ्हेने संघाने एक वर्ष (२१–६–३७ ते १–८–३८) काम केल्यानंतर दुसरे वर्षासाठी अधिक भरीव काम करण्यासाठी कोरेगाव तालुक्यापैकी चिमणगाव या गावाची निवड केली. आणि त्या गावात संघाचे दोन कार्यकर्ते बाबूराव गोखले व धोंडिराम काशीद हे प्रत्यक्ष जाऊन राहिले. मधून मधून स्वतः भाऊसाहेब सोमण, शिराळकर, गोसावी, अळतेकर वगैरे मंडळी चिमणगावाला भेटी देत. परंतु खरे काम गोखले व काशीद या दोघानीच केले. चिमणगावला जाणेचे सुमारास संघाचे तिसरे कार्यकर्ते भय्याशास्त्री वाटवे यांची प्रकृति नादुरुस्त झाल्यामुळे त्याना संघाचे कामाचा राजिनामा द्यावा लागला. त्यांचे राजिनाम्याने संघाची एक शक्ती कमी झाल्यासारखे झाले. सुमारे ३।४ महिने गोखले व काशीद यानी चिमणगावची सर्व बाजूनी सेवा व निरीक्षण केले. प्रथम गावची स्वच्छता गावकऱ्यांचे सहकार्याने घडवून आणली. मलविसर्जनाची आणि गात्रस्वच्छतेची अमंगळ पद्धत सदर गावात काही प्रमाणात आडाणी लोकात चालू होती. गोखले यानी स्वतः चिकाटीने आणि लोकांचा रोष पत्करून ही सवय बदलून टाकण्यात यश मिळविले. आणि ओढ्यातील पिण्याचे पाण्याची अधिक स्वच्छताही गोखले या आपल्या कामाने राखू शकले. या प्राथमिक कामानंतर गावातील रस्ते गावकऱ्यांचे सहकार्याने सुधारले. चिमणगावच्या सर्वच कामात गावचे पुढारी शंकरराव पाटील आणि रामराव पाटील यांचे बहुमोल सहाय्य गोखले व काशीद याना झाले. लोकांचे

ज्ञानात भर घालण्यासाठी ज्ञानप्रकाश, केसरी, नवाकाळ, समर्थ, ऐक्य, त्रिकाळ इ० वर्तमानपत्रे गावकऱ्याना ही मंडळी वाचून दाखवीत असत. श्रीमत् दासबोधावर गोखले हे प्रवचनेही देत, व लोकांची नैतिक उंची वाढविण्याचा प्रयत्न करीत. तरुण पिढीला व्यवसायाची आवड उत्पन्न केली आणि नमस्काराचे सामने घडवून आणून यशस्वी उमेदवाराना बक्षिसेही दिली. या सामन्यात ब्राह्मणापासून हरिजनापर्यंत अनेक तरुणानी भाग घेतला. विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत व मार्गदर्शन करण्याचेही काम गोखले व काशीद यानी केले. काही रामोशी व हरिजनावर अन्यायाने सरकारी अधिकाऱ्यानी घातलेली रोजच्या हजेरीची अट संपूर्ण पूर्व चौकशी करून गावकऱ्यांचे माहितीने व मान्यतेने सरकारी अधिकाऱ्यांकडून रद्द करून घेणेचे कामात गोखले व काशीद यानी यश मिळविले. चिमणगावातील शेतीच्या जमाखर्चाची बारीकसारीक सर्व माहिती मिळवून शेतीच्या जमाखर्चाचा पद्धतशीर तक्ता गोखले यानी प्रसिद्ध केला. सुमारे ३।४ महिन्यात वरील स्वरूपाचे काम पुरे करून तासगाव, पाटण, वाळवे व शिराळे या भागातील खेडेगावात संघाचे कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. तासगाव तालुक्यातील ४९ गावांपैकी ४० गावात प्रत्यक्ष जाऊन पिकांची पाहणी व पिकांची आणेवारी सरकारी नियमाप्रमाणे कशी कशी करावयाची ती पद्धत प्रत्यक्ष करून गावकऱ्याना संघाचे मंडळीनी शिकवली. पाटण, वाळवे, शिराळे भागात लोकांचे जीवित वित्त आणि अब्रू धोक्यात आहे असे संघाचे कार्यकर्त्यास आढळून आले. वाटमाऱ्या, जळिते, चोऱ्या, स्त्रियांचे अब्रूवर घाला, असा प्रकार म्हणजे दुसऱ्या वर्षाचे रिपोर्टात संघाने दाखल केल्याप्रमाणे " राज्य इंग्रजाचे, कारभार काँग्रेसचा पण अम्मल गुंडाचा " असा बहुत प्रकार दिसून आला. लोकस्थितीच्या पाहणीचा हा प्रकार उघड केल्यानंतर परळी खोऱ्यातील " वेणेगाव " हे गाव अकस्मात बहुतेक सर्व जळून गेल्याने त्या गावास मदत मिळवून देण्याचे काम संघाचे कार्यकर्त्यांनी केले. मुंबई राज्यात पहिल्या काँग्रेस मंत्रिमंडळाचा कारभार चालू असल्याने दारुबंदीची हवा उत्पन्न झाली होती. त्यासाठी सातारा जिल्ह्यात दारुबंदीचा अम्मल व्हावा म्हणून अवश्य ती आकडेवार माहिती गोळा करून त्या माहितीचा तक्ता संघाचे कार्यकर्त्यांनी प्रसिद्ध केला. या कार्यास ब्रह्माश्रमस्वामी काशी (पूर्वाश्रमीचे सातारचे कार्यकर्ते गोविंदराव श्रोत्री, यानी रु. १००० देणगी देऊन दारुबंदीच्या कार्यास आशीर्वाद दिला. संघाचे कार्यकर्ते गोखले यानी कृष्णा कॅनाल बागाईतदार संघाचे कामास मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील ५०।६० गावातील कर्जाची माहिती मिळवून लोकांच्या कर्जबाजारी-पणाची माहितीही सरकारचे आणि लोकांचे निदर्शनास आणली. येणेप्रमाणे संघाने आपल्या दुसऱ्या वर्षाचे (१–८–३८ ते ३१–७–३९) काम पुरे केले."

संघाच्या पहिल्या दोन वर्षाचे अहवालावर अनेक वृत्तपत्रानी उत्तम अभिप्राय व्यक्त केले. त्यापैकी नमुन्यादाखल दोन अभिप्राय खाली दाखल करीत आहे--

" ता. १७-८-३९ च्या अंकात सर्व्हंट ऑफ इंडिया या पुण्याच्या सन्मान्य इंग्रजी साप्ताहिकाने खालील मराठी आशयाचा अभिप्राय व्यक्त केला आहे--

" संघाच्या कार्यकर्त्यानी आपल्या पुढील अफाट कार्यास योग्य तऱ्हेने हात घातला आहे. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे खेडुताना जीवनाच्या उदात्त तत्त्वावर व्याख्याने न झोडता त्यांच्या सेवेची निरनिराळी कार्यक्षेत्रे त्यानी शोधून काढली आहेत. "

पुण्याचे दैनिक सकाळ आपल्या ता. ९-८-३९ चे अंकात खालील अभिप्राय व्यक्त करीत आहे.

" अहवाल माहितीने इतका भरला आहे की दोन अगर तीन कार्यकर्ते एका जिल्ह्यात किती काम करू शकतात याची त्यावरून कल्पना येते. खेडेगावातील परिस्थिती किती हलाखीची आहे याची आकडेवार माहिती एखाद्या संशोधक संस्थेप्रमाणे दिली आहे. संघाचे कार्य असेच चालू राहिल्यास सातारा जिल्ह्यातील खेडोपाडी सुधारणा होण्यास त्याचा फार उपयोग होईल. "

अशा तऱ्हेच्या उत्तेजनाने हुरूप येऊन संघाने आपले काम अधिक जोमाने तिसऱ्या वर्षी पुढे चालू ठेवले. या वर्षी जिल्ह्याचे पूर्व भागात दुष्काळाची चिन्हे दिसू लागल्याने संघाचे कार्यकर्त्यानी त्या भागाचे प्रत्यक्ष पहाणीचे काम सुरू केले होते. माण तालुक्यात संघाचे कार्यकर्ते काशीद व त्यांचे एक सहकारी पिसाळ यानी पहाणी केली. कोरेगाव लोणंद भागात संघाचे नवे कार्यकर्ते ए. एम्. काझी यानी पहाणी केली. खानापूर तालुक्यात स्वतः गोखले फिरून आले. या पहाणीत गोळा केलेल्या माहितीच्या आधाराने सरकारकडे निवेदने पाठवून काही मदत लोकाना मिळवून देण्यात आली. यानंतर आचार्य शंकरराव जावडेकर यांचे जवळ संघाचे कार्यकर्ते इस्लामपुरास दोन महिने सार्वजनिक प्रश्नांचे शिक्षण घेण्यासाठी जाऊन राहिले होते. आचार्यानी संघाचे कार्यकर्त्याना समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांच्या मूलतत्त्वांची स्थूल ओळख करून दिली. तसेच इस्लामपूरचे प्रसिद्ध वकील नानासाहेब रानडे व एस्. आर्. कुलकर्णी (सध्या पब्लिक प्रॉसिक्यूटर कोल्हापूर) या उभयतानी व्यवहारोपयोगी कायद्याची स्थूल माहिती संघाचे कार्यकर्त्यास करून दिली. यानंतर संघाचे कार्यकर्त्यानी आपला मुक्काम श्रीसमर्थांचे पायधुळीने पवित्र झालेल्या परळी गावी ठेवला आणि परळ खोऱ्यातील ७२ गावांचे खोल निरीक्षण केले. या भागात जनतेच्या दारिद्र्याचे भेसूर दर्शन संघाचे कार्यकर्त्यास झाले. त्यांच्या अनेक अडचणीही कार्यकर्त्याना दिसून आल्या. या भागातील स्वच्छता, व्यायामाची आवड, पिण्याचे पाण्याची स्वच्छता, बांधाच्या दगडाबद्दलच्या तक्रारी, शाळा नसलेल्या गावी नव्या शाळा उघडणे, सावकारी वादात तडजोड, आडाना रहाट लावणे, नारूचा उपद्रव इत्यादि अनेक बाबतीत लोकाना सहाय्य करून त्या अडचणी दूर केल्या.

आचार्य जावडेकर यांचेकडून संघाचे कार्यकर्त्यानी जसे समाजशास्त्र व अर्थशास्त्राचे धडे घेतले तसेच सातारचे डॉ. वा. वि. आठल्ये, आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी, (सध्या मुक्काम मुंबई) डॉ. कोल्हटकर, डॉ. पटवर्धन इ० मंडळीनीही संघाचे कार्यकर्त्यांना वैद्यकविद्येतील स्थूल व आवश्यक पण उपयुक्त ज्ञानाचे धडे दिले. या तिसऱ्या वर्षी (१-८-३९ ते ३१-७-४०) पहिले सुमारे आठ महिने ए. एम्. काझी या तरुण मुसलमान कार्यकर्त्याची संघाचे कार्यास जोड मिळाली होती. तसेच जून १९४० पासून सुमारे एक वर्षाहून अधिक काळ कराडचे काशीनाथ राजाराम देशमुख यानी संघाचे वतीने प्रथम परळी येथे कामास सुरुवात केली. समाजाच्या अडचणी समजावून घेऊन संघाचे सहाय्याने त्या निवारण करणे असे त्या कार्याचे स्वरूप होते. भजनकीर्तनादि कार्यक्रमानी सत्संस्कार करणे याकडेही त्यांचे लक्ष होते. परळी येथील वास्तव्यात समाजकार्यकर्त्यांना औषधोपचाराची सामान्य माहिती असणे जरूर आहे याची जाणीव संघास तीव्रपणे झाली. त्यामुळे तसे ज्ञान घेऊन कराड तालुक्यातील तांबवे व भोवतालच्या गावात काम करण्यास सुरुवात केल्यावर देशमुखाना आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा फायदा महामारीने गांजलेल्या शेकडो लोकास देता आला. त्यामुळे ९५ टक्के लोकांचे जीव बचावले. नंतर देशमुखानी तांबवे येथे स्वावलंबन कार्यालय सुरू केले. चारपाचशे मंडळी त्यातून सूत काढण्याची कला शिकून गेले. पुढे वैयक्तिक सत्याग्रहास सूत कातण्याची कला आवश्यक शर्त ठेवल्यामुळे तांबव्याच्या स्वावलंबन कार्यालयातील अनेक कार्यकर्ते त्यात भाग घेऊ शकले. त्यासाली अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात दुष्काळ पडला होता, तेव्हा त्याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी अनेक परिषदा घेऊन सरकारी सहाय्याने लोकास मदत मिळवून दिली. अशा तऱ्हेने चाललेल्या लोकसेवासंघाच्या कार्याबद्दल अनेक तज्ञानी संघाला धन्यवाद दिले आहेत. ता. ६ ऑगस्ट १९३९ च्या संघाचे वार्षिक सभेत प्राचार्य धनंजयराव गाडगीळ म्हणाले " मला या संस्थेला धन्यवाद द्यावेसे वाटतात. आज थोड्याशा राजकीय हक्काचे काळात अशी संस्था असणे अत्यंत आवश्यक आहे. अशा संस्थेचा उद्देश चळवळीपेक्षा कोठलीही परिस्थिति अभ्यासणारी मंडळी तयार करणे हा असतो. हा अभ्यास केवळ पंडितानीच न करिता जे खरोखर खेडेगावात मिसळू शकतात आणि ज्याना सार्वजनिक कार्याची आवड आहे अशानीच अशी कामे करणे जरूर असते. जिल्हानिहाय अशा संस्था निर्माण करणे आवश्यक आहे. नामदारसाहेब आपल्या खुर्चीवर बसले की सर्वज्ञ होतात असे नाही. त्याना लोकसेवासंघासारख्या जिल्हानिहाय असणाऱ्या अभ्यासू मंडळीनी आकडेवार माहिती पुरविणे जरूर असते." त्याच समारंभाचे अध्यक्ष व मुंबई काँग्रेसमंत्रिमंडळाचे अर्थमंत्री आण्णासाहेब लठ्ठे म्हणाले " संघ निघाल्याची बातमी कानावर आल्यापासून मला त्याबद्दल आदर वाटत आहे. आपल्या समाजाची सध्याची परिस्थिति

लक्षात घेता अशा संस्था अस्तित्वात असणे अत्यंत जरूर आहे. आज देशात उथळ राजकारणाला महापूर आलेला आहे. राजकीय क्षेत्रात आपल्याशिवाय सार्वजनिक कार्यकर्ता मूर्ख आहे असे म्हणू इच्छिणाऱ्या वाचिवीरांची गर्दी झाली असून प्रामाणिक मतभेदापेक्षा वैयक्तिक स्वार्थ, हेवादावा, स्पर्धा यांचेच प्राबल्य माजून राहिले आहे. सुशिक्षित सुबुद्ध नागरिकांची ही तऱ्हा; मग अडाणी, अजाण शेतकऱ्यांची उन्नत्ति कोण व कशी करणार? त्यांचे अगोदरच कष्टमय झालेले जीवन स्वार्थी, पक्षांधमंडळींच्या काचाने जास्त कठीण होते. हिंदुस्थानचा खरा बहुजन–समाज शेतकरी; त्या वर्गाच्या खऱ्या अडचणी दूर करून त्याला स्वाभिमानाने जगविण्याचा प्रयत्न परकाष्ठेने होणे जरूर आहे. अशा वेळी हा संघ निघालेला आहे. त्याला सर्वपक्षीय सहानुभूति आहे. खऱ्या राष्ट्रीयत्वाची शिकवण देण्याचे कार्य तो करीत असल्यामुळे मी त्याचे अभीष्ट चिंतितो. समाजाच्या तक्रारी पुष्कळ आहेत; जोपर्यंत खेड्यातील खेडुताना स्वताचे अधिकाराबद्दल जागरूक राहून अधिकाऱ्यांचे हातून आपली कामे करवून घेण्याची नैतिक ताकद येत नाही, तोपर्यंत खेडी अपूर्णच राहतील. सशाला जसे शिंग नाही तसा पैसे न खाणारा सब्-रजिस्ट्रार नाही. इंग्रजीत एक म्हण आहे त्याप्रमाणे समाज ज्या लायकीचा त्याप्रकारची राजव्यवस्था त्या समाजाला मिळते. म्हणून रयतेच्या तक्रारी दूर करणे हे रयतेच्या व शेतकऱ्यांच्या शिक्षणावर अवलंबून आहे. त्याना आपल्या सुधारणेबद्दल आणि हक्काबद्दल जागरूक करण्याचे कार्य सातारा–जिल्हा–लोकसेवासंघ करीत आहे म्हणून मी त्यास धन्यवाद देत आहे."

यानंतर वैयक्तिक सत्याग्रहाचा 'छोटा' लढा आणि 'छोडो हिंदुस्थान' ची प्रचंड चळवळ या दोन लढ्यात संघातील पुढारी सोमण, शिराळकर, आणि सर्व कार्यकर्ते गुंतल्यामुळे संघाचे काम १९४१ ते १९४६ जूनपर्यंत सुमारे ५।६ वर्षे बंदच होते.

संघाचे जनक आणि संचालक भाऊसाहेब सोमणानी सन १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे लढ्यात जातीने भाग घेतला. त्या आधी ता. ४–१–४१ रोजी संघाचे विश्वस्तपत्र ( Trust Deed ) करून ठेवले आहे. त्यातील संघाच्या कार्याच्या हेतूचे कलम खालीलप्रमाणे आहे–

"न्याय्य व शांततेच्या मार्गानी राजकीय, सामाजिक, आर्थिक, औद्योगिक व शैक्षणिक इ० हरएक प्रकारची लोकहिताची कामे सातारा जिल्ह्यात करून लोकांचे अंतःकरणात राष्ट्रीय भावना व उच्च–उच्चतर प्रकारच्या जीवनाकांक्षा निर्माण करणे व या कार्याकरिता राष्ट्रीय कार्यकर्ते अधिकाधिक निर्माण करणे असा लोकसेवासंघट्रस्टचा हेतू आहे. सदर कार्य करताना लोकसेवासंघ हा पक्ष, धर्म, जाती या भेदापासून अलिप्त राहील."

सर्व लढे संपून देशात स्थिरस्थावर झाल्यानंतर ता. १–७–४६ रोजी तासगाव तालुक्यापैकी नागठाणे येथील कार्यकर्ते श्रीपाद हरी जोशी यांची संघाने नेमणूक केली. तासगाव–वाळवे–खानापूर या भागात श्रीपाद हरीनी आपले काम सुमारे तीन वर्षे म्हणजे १–७–४९ पर्यंत चालू ठेवले होते. नंतर वाईचे सुप्रसिद्ध कृषिशास्त्रज्ञ वामन रामचंद्र गाडगीळ यानी ओझर्डे ता० वाई या गावी संघाचे वतीने आपला सहकारी शेतीचा प्रयोग ता. १–४–५० पासून ३१–३–५१ अखेर एक वर्ष करून पाहिला. सदर प्रयोगात परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळे अपेक्षित यश येऊ शकले नाही. या नंतर वऱ्हाड मधील कार्यकर्ते नारायण बाळकृष्ण घुटे यानी ता. १–१०–५० पासून ता. १५–५–५२ पर्यंत सुमारे १॥ वर्ष महागाव ता. सातारा या गावी विविध प्रकारची लोकसेवा संघाचे वतीने केली. या नंतर लोकसेवासंघाच्या कामाची दिशा बदलण्यात आली. आतापर्यंत लोकसेवासंघ काही काही खेड्यातून करीत असलेले काम सरकारने सर्व इलाखाभर विकासयोजनादि रूपाने सुरू केल्यामुळे, लोकसेवासंघाची चिमुकली शक्ति समाजातील बौद्धिक उंची वाढविण्याचे कामी लावणे हेच संघास योग्य वाटले. सुप्रसिद्ध शाहीर व राजकीय कार्यकर्ते कृष्णाजी माधव उर्फ दादा साखवळकर यानी ता. १–११–५२ पासून ता. ३०–६–५५ पर्यंत सुमारे २॥ वर्षे कोरेगाव जि. सातारा या तालुक्याचे गावी प्रौढ विद्यार्थी यांचेशी शक्य तो एकत्र राहून त्याना त्यांचे अभ्यासात मदत आणि शिवाय व्यापक विचारांचे, उच्चतर संस्कृतीचे शिक्षण देण्याचा प्रयोग केला. या प्रयोगाबरोबर भोवतालच्या ठळक गावातील शाळानाही ते भेटी देत व प्रौढ विद्यार्थ्यावर सदाचार, सद्विचार व संस्कृति यांचा ठसा उमटविण्याचा प्रयत्न करीत. तथापि या कामाला लागणारी कोरेगावातील विद्यार्थ्यांची संख्या अपुरी वाटल्याने संघानेच हा प्रयत्न ता. ३०–६–५५ पासून स्थगित केला आहे."

# १२ नगरदेवतेच्या द्वारातून

१९३८ साली कॉंग्रेसने राज्यकारभार आपल्या हाती घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे मुंबईकारभार आपल्या हाती घेतला. स्थानिक–स्वराज्य–संस्थातून निर्भेळ लोकशाही स्थापन व्हावी म्हणून मुंबईच्या कॉंग्रेससरकारने अधिकारावर येताच त्या संस्थातून "नियुक्त सभासद" बंद केले. त्याप्रमाणे सातारा शहर नगरपालिकेतही झाले. १९३८ सालचे पूर्वी सातारा नगरपालिकेचे अध्यक्ष रावबहादूर रावजी रामचंद्र काळे व दिवाणबहादूर मोतीलाल बाळमुकुंद मुथा होते; ते सरकारनियुक्तापैकी होते. आता नव्या जमान्यातही रा. ब. काळ्यांसारखा कार्यक्षम गृहस्थ अध्यक्ष म्हणून गाजलाच असता. पण ते १९३६ साली कैलासवासी झाले. त्यामुळे अध्यक्षपदासाठी योग्य असा कोण इसम निवडावा असा जनतेपुढे प्रश्न आला. यावेळेपर्यंत नगर–पालिकेच्या कारभारात भाऊसाहेब यानी बाहेरून सल्ला देण्यापेक्षा जास्त लक्ष घातले नव्हते. शहर कॉंग्रेसतर्फे नगरपालिकेच्या निवडणुका लढविण्याचे ठरले व कॉंग्रेसचे स्थानिक नेतेपण भाऊसाहेब यांच्याकडे असल्यामुळे त्यांना शनिवार पेठ वॉर्डातर्फे निवडणुकीस उभे करण्यात आले व ते निवडून आले. पण कॉंग्रेसपक्षाला निर्विवाद असे बहुमत लाभले नाही. यावेळी हिंदुमहासभेतर्फेही निवडणुका लढविण्यात आल्या होत्या व त्यांचे काही सभासद निवडून आले होते. पूर्वीच्या कूपरपक्षाची काही मंडळी होती. असे नगरपालिकेत तीन पक्ष यावेळी होते. राजकारणात कॉंग्रेस व हिंदुमहासभा यांचे जमत नव्हते. तरीपण भाऊसाहेब सोमण यांचे व्यक्तिमत्व व त्यांचेविषयी इतर पक्षात वसत असलेला आपलेपणा यामुळे हे दोन पक्ष एकत्र आले. एवढेच नव्हे तर महंमद गौसखान यांच्यासारखा विचारी मुसलमान भाऊसाहेबाना येऊन मिळाला. त्यामुळे निश्चित बहुमत होऊन भाऊसाहेब अध्यक्षपदी व गौसखान उपाध्यक्षपदी विराजमान झाले. कूपरपक्ष म्हणजे त्यावेळचा ब्रिटिश सरकारचाच पक्ष मानला जात होता. त्या पक्षाचा विरोध लोकप्रिय भाऊसाहेब याना झाला. भाऊसाहेब यांच्या पक्षास १७ व विरुद्ध पक्षास १६ सभासद होते. अशा एका सभासदाचे बहुमतावर काम करणे म्हणजे एकप्रकारचे दिव्यच होते.

भाऊसाहेब हे लोकशाहीचे कट्टे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यानी पहिली कोणती गोष्ट केली. असेल तर नगरपालिकेच्या कारभारात संपूर्ण लोकशाही पद्धत सुरू केली. त्यांच्यापूर्वी जरी नगरपालिकेत पक्षोपपक्ष असले तरी त्यांच्या स्वतंत्र सभा भरून कोणत्याही विषयाचा विचार होत नसे. सभेच्या आयत्यावेळी जो विचार होईल तेवढाच. पण कायदेमंडळातील पक्षोपपक्षांच्या धर्तीवर भाऊसाहेब यानी

सभेच्यापूर्वी आपल्या पक्षाचे सर्व सभासदांना आपल्या घरी बोलावून त्याना सर्व विषय विशद करून सांगून ठरावाचे मसुदे तयार करण्याची प्रथा सुरू केली. अशा पद्धतीमुळे प्रत्येक विषयाचा संपूर्णपणे विचार होऊन ठरावही व्यवस्थितपणे होत असत.

नगरपालिकेतील काम म्हणजे एक फावल्या वेळचा उद्योग असा प्रकार गणला जात होता; परंतु भाऊसाहेब अध्यक्षपदी निवडून आल्यापासून दररोज नगरपालिकेच्या कचेरीत येऊन आपले दोन तीन तास खर्च करीत. ते नगरपालि-केतील आपले काम म्हणजे आपले दैनंदिन कर्तव्य, असे मानीत; कचेरीत आले म्हणजे सर्व कागदपत्र पहाता येतात व कामाचा उरक त्वरित होतो. प्रत्येक बाब ते अत्यंत बारकाईने पहात. कोणत्याही गुंतागुंतीच्या कामात त्वरित व अचूक निर्णय घेण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी होती. त्यामुळे बाराबयतीच्या कामात नेहमीच गोंधळ आणि विलंब ही गोष्ट त्यानी आपल्या कर्तृत्वाने खोटी असल्याचे सिद्ध केले. जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती व अशा सर्वांचा मेळ घालून काम करावयाचे म्हणजे त्याला असाधारण असे मनुष्यस्वभावाचे ज्ञान लागते. आपल्या विरुद्धपक्षातील लोकांच्या भावना भाऊसाहेब यानी कधीही दुखविल्या नाहीत.

भाऊसाहेब यांचा संबंध अनेक संस्थाशी होता. तथापि ते ज्यावेळी ज्या संस्थेच्या कामाचा विचार करीत त्यावेळी ते त्यांचा दुसऱ्या संस्थेशी आपला असलेला संबंध लक्षात घेऊनही न्याय्य तेच निर्णय घेत. नगरपालिका व वेस्टर्न इंडिया विमा कंपनी यांच्यामध्ये कर्जाचे बाबत एकदा वाद निर्माण झाला होता. भाऊसाहेबांचा दोन्ही संस्थाशी घनिष्ठ संबंध. त्यामुळेच दोन्ही संस्थांच्या हितसंबं-धांचा समन्वय होईल अशा बेतानेच त्यानी आपल्या निर्णयातील न्यायाचा तोल राखला.

राजकारणात स्वतंत्र पक्ष असलेले दोन पक्ष नगरपालिकेत एकत्र आले म्हणून ते एकजीव थोडेच होणार ? काही कटु प्रसंग येणारच. अशावेळी भाऊ-साहेब आपला पक्षाभिमान व स्वतःचा मोठेपणा टाकून केवळ लोकहित साधण्या-साठी स्वतः दुसऱ्या पक्षाचे नेत्याकडे जाऊन त्यांची समजूत करण्यात कमीपणा मानीत नसत. अशा धोरणामुळे भाऊसाहेब यांच्या नगरपालिकेतील कारकीर्दीत डोळचात भरण्यासारख्या गोष्टी घडल्या त्या अशाः–

राजवाड्यासमोर हल्ली जे प्रतापसिंह–उद्यान आहे त्याची जागा सरकार-मार्फत विक्रीला निघाली होती. त्यामुळे सरकारला फार मोठी रक्कम मिळण्याचा योग होता. कदाचित् त्या ठिकाणी एकादी मोठी टोलेजंग इमारत आज दिसली असती. परंतु भाऊसाहेब याना शहरवासियासाठी व विशेषतः स्त्रिया व लहान

बालकांना मोकळी हवा खाता येईल अशी मध्यवर्ती जागा पाहिजे होती व मुलींच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनीसाठी तशीच जागा पाहिजे होती. त्यासाठी त्यानी थेट मुख्य मंत्र्यापर्यंत पत्रव्यवहार करून ती जागा नगरपालिकेसाठी मिळ-विली व तेथे उद्यान सजविले. तेथे रोज सायंकाळी असंख्य लहानमुले व स्त्रिया आराम करताना दिसतात.

आग विझविण्यासाठी पूर्वी नगरपालिकेकडे हातबंब असत. एकदा शहरात एका गरीबाच्या घरास आग लागली. तेव्हा भाऊसाहेब जातीने तेथे हजर होते. हातबंबाचे काम जेमतेमच चालायचे. ती गोष्ट त्यांच्या मनाला फार लागली. तेव्हा रस्त्यावर पाणी मारणेसाठी व आग विझविणेसाठी सुसज्ज अशी मोटार घेण्याचे प्रयोजन त्यानी सभासदाना पटविले व त्याप्रमाणे तजवीज केली. तेव्हापासून रस्त्यावर पाणी मारण्यात येऊ लागले व आग विझविण्याचे काम परिणामकारक होऊ लागले.

भाऊसाहेब रोज सकाळी फिरावयास जात. गावातील निरनिराळ्या भागातून नेहमीसारखे फिरताना अध्यक्ष झाल्यापासून नगरपालिकेच्या कामाची तपासणी ते करीत. असेच एकदा मंडईत आंब्याच्या मोसमात गेले असता लोकाना बसा-वयास पुरेशी जागा नाही असे त्याना आढळून आले. त्यावेळी मंडईमध्ये अमेरिकन मिशनची जागा होती. ती जागा मंडईसाठी घेतली पाहिजे असे त्यांच्या मनात आले. त्यानी ती जागा सरकारमार्फत नगरपालिकेसाठी (अक्वायर) पैदा केली. त्याच-प्रमाणे अशीच त्यानी एकदा प्रसूतिगृहास भेट दिली तेव्हा तेथे बाळंतिणींची बरीच गर्दी असल्याचे त्याना दिसून आले, व प्रसूतिगृहासाठी अधिक जागेची अवश्यकता आहे हेही त्याना पटले. बाहेरच जोशी यांची जागा असल्यामुळे त्यानी लगेच जोशी यांच्याशी समक्ष वाटाघाट केली व जागा विकत घेतली. हल्ली जे नवीन ऑपरेशन थिएटर आहे तीच ती जागा. तेथे भाऊसाहेबांच्या कारकीर्दीत चार नवीन खोल्या झाल्या.

नगरपालिकेस शाळासाठी स्वतःच्या इमारती असल्याखेरीज त्यामध्ये शाळाना पाहिजे तशी सोय करता येणार नाही असे भाऊसाहेब यांचे मत होते. त्यासाठी त्यानी मंगळवार पेठेत कात्रेवाडा ही इमारत सरकारतर्फे (अॅक्वायर) पैदा करणेचे काम सुरू केले व आता ती इमारत नगरपालिकेस मिळाली आहे. तसेच शिर्केवाडा या इमारतीतील माटे यांच्या ताब्यात असलेला निम्मा हिस्सा भाऊसाहेबानी नगरपालिकेसाठी विकत घेतला. त्यांच्या कारकीर्दीत एकदा कासचे पाणी कमी पडले तेव्हा कासला जाण्याची त्यांची फार इच्छा होती; परंतु रस्त्याचे अभावी त्याना जाता आले नाही. ही गोष्ट त्यांच्या मनाला बरीच खटकली. सदरचा रस्ता लोकलबोर्डाचा असल्यामुळे त्याने तो दुरुस्त करावयास पाहिजे.

तथापि सर्व खर्च लोकलबोर्ड करणे शक्य नाही. म्हणून त्यानी लोकलबोर्डाचे अध्यक्ष व कलेक्टरसाहेब यांची याबाबतीत समक्ष भेट घेतली व तो रस्ता त्वरित दुरुस्त करावा व त्यासाठी लागणारा खर्च लोकलबोर्ड, सरकार व नगरपालिका या तिघानी सारख्या प्रमाणात करावा असे सुचविले. पण या सूचनेस त्यांच्या कारकीर्दीत मूर्त स्वरूप प्राप्त झाले नाही; पण तेव्हापासून या रस्त्याची बाब सारखी सरकारपुढे असल्यामुळे हल्ली तो रस्ता तयार होत आहे. त्याचा उगम भाऊसाहेब यांच्या त्यावेळच्या चालनेत झालेला होता.

पाणी पुरवठ्यामधील दोषांची त्याना पदोपदी जाणीव होत होती; पण त्याबाबत काय करावे याची निश्चित योजना काहीच तयार नव्हती. त्यासाठी त्यानी मुंबई सरकारचे सेवानिवृत्त पब्लिक हेल्थ इंजीनिअर दिवाणबहादूर व्ही. जी. शेटे याना स्वतः विनंती केली व पाणी पुरवठ्याबाबत काय सुधारणा करणे इष्ट आहे यासंबंधी त्यांच्याकडून अभिप्राय मागविला. पुढे भाऊसाहेब यांची कारकीर्द थोडीच राहिल्यामुळे या कामांत प्रगती होऊ शकली नाही. तथापि ती योजना त्रोटक असल्यामुळे तपशीलवार योजना करून ती सरकारकडे पाठविल्याशिवाय पुढे पाऊल टाकता येणार नाही, म्हणून त्या योजनेस अनुसरून नवीन संपूर्ण योजना तयार झाली व त्याच योजनेप्रमाणे आता प्रत्यक्ष काम सुरू झाले आहे. यावरून हल्ली जी जल–योजना सुरू आहे तिचे मूळ भाऊसाहेब सोमण यांच्या प्रयत्नाकडे जाते.

नागरिकबाबीपुरतेच आपले क्षेत्र मर्यादित न ठेवता भाऊसाहेब सोमण यांच्या कारकीर्दीत आमच्या जिल्ह्यात दारुबंदी प्रथम करावी, अशी मागणी करणारा ठराव सातारा नगरपालिकेत करण्यात आला. तसेच दुभती जनावरे मारण्यास बंदी करणारा कायदा सरकारने करावा अशीही मागणी करण्यात आली. प्रौढ शिक्षणासाठीही अर्थसंकलपामध्ये तरतूद करण्यात येई.

भाऊसाहेब यांचा स्वभाव फारच मायाळू असल्यामुळे त्याचा फायदा अनेक लोक घेत असत. त्यांच्या गरीब स्वभावामुळे करांच्या रकमा वेळचेवेळी वसूल होणे कठीण पडे. लोकानी येऊन त्यांच्यापुढे वेडेवाकडे तोंड केले की त्याना दयेचा पाझर फुटे व त्याला मुदत मिळे.

तसेच मंडईतील वगैरे भाडेकरी लोकानी भाडे फार डोईजड म्हणून ओरड केली व त्यानी तेव्हापासून लिलावाने भाडे ठरविण्याची पद्धत बंद करून योग्य भाडे कमिटीने ठरविण्याची पद्धत सुरू केली व तीच पद्धत अद्याप चालू आहे. शहराच्या चार टोकाना चार पार्कस् करावेत अशी त्यांची कल्पना होती व त्याप्रमाणे त्यानी सन १९४०–४१ सालच्या अर्थसंकलपात तरतूद केली होती;

परंतु वेळीच त्यासाठी सोईस्कर अशा जागा मिळू शकल्या नाहीत म्हणून या कल्पनेस मूर्त स्वरूप प्राप्त झाले नाही. ४ फेब्रुवारी १९४० रोजी सातारा कलेक्टरसाहेबांकडून M. U. N. 1820 ने विचारणा झाली की "नगरपालिकेच्या इमारतीवर तिरंगी झेंडा सर्व वर्षभर अगर समारंभप्रसंगी लावण्याचा ठराव झाला आहे की काय अगर त्यासंबंधात आपण नगरपालिकेचे अध्यक्ष या नात्याने काही हुकूम दिला आहे की काय? त्याचप्रमाणे नगरपालिकेच्या शाळातून दररोज अगर समारंभप्रसंगी विद्यार्थ्यांनी वन्दे-मातरम् हे गीत म्हणावे असे काही हुकूम शिक्षकवर्गाला आणि विद्यार्थ्यांना दिले गेले आहेत की काय ते ताबडतोब उलट टपालाने कळविण्यात यावे." भाऊसाहेब सोमणानी त्याबाबत ता. १७ डिसेंबर १९३५ चा ठराव क्र. तीन सातारा शहर म्युनिसिपल बरोच्या स्पेशल जनरल मीटिंगने शंकर विष्णू भिडे आदिकरून दहा सभासदांच्या यादीवरून पसार केला होता त्याची आणि ता. २२ जानेवारी १९३८ रोजी स्कूलबोर्डाने पास केलेल्या क्र. ४ च्या ठरावाची नक्कल कलेक्टरसाहेबास ताबडतोब पाठविली आणि कॉंग्रेसच्या राजवटीत हा काय प्रकार चालला आहे, याची दखल घेण्याबद्दल मुंबईकडे लिहिले. त्यात भाऊसाहेबानी स्पष्ट लिहिले होते की– ("I cannot understand what has prompted the Collector to make these inquiries or whether he has been inspired to do so by the present Government. If so, the matter requires serious attention. If I receive any further instructions in this matter, I may not personally like to comply with these instructions and if necessary the congress members of this body may perhaps have to take a drastic step. Will you please make inquiries, if possible, whether this inquiry is inspired by the present Government. If it is the personal whim of the collector which has prompted him to make these inquiries, some action also will be needed to be taken. So let me know your advice in this matter, so that my decision may not be considered to be out of the way, looking to the present state of affairs in the country.") या चौकशा करावयास कलेक्टरास काय कारणाने उबळ आली हे मला समजत नाही; किंवा प्रस्तुत सरकारनेच त्यास या चौकशा करावयास स्फूर्ति दिली आहे? असे असेल तर या गोष्टीकडे गंभीरपणे लक्ष दिले पाहिजे. याबाबत मला आणखी काही सूचना आल्या, तर त्या सूचना मान्य करण्याचे व्यक्तिशः मला मानवणार नाही? आणि जरूर तर या संस्थेच्या कॉंग्रेस सभासदाना एकादे कठोर पाऊलही उचलावे लागेल. शक्य असेल तर आपण प्रस्तुत सरकारकडून सदर चौकशा उत्स्फूर्त झाल्या आहेत की काय याची कृपेने चौकशी कराल काय? कलेक्टराचीच वैयक्तिक लहर लागून त्याने या चौकशा केल्या

असल्या तरीही काही तरी करावे हे लागेलच. म्हणून याबाबत आपला सल्ला मला कळावा म्हणजे देशातील प्रस्तुत वस्तुस्थितीचा विचार करता, माझा निर्णय वाह्यात् ठरावयाचा नाही. "

नगरपालिकेच्या इमारतीवर सदैव फडकणाऱ्या छोटया व महत्त्वाच्या प्रसंगी फडकणाऱ्या मोठ्या तिरंगी झेंड्यासंबंधात अगर शाळावर लागणाऱ्या झेंड्या-संबंधी अथवा वंन्देमातरम् गीत गाइले जाण्यासंबंधी भाऊसाहेबांच्या वरील पत्र-व्यवहारानंतर चौकसखोर अधिकाऱ्यानी मूग गिळले, ते मग कायमचेच. अशा-रीतीने भाऊसाहेबानी नगरपालिकेतील "खराटयाचे स्वराज्य" कसे लोकसेवेच्या तळमळीने, बाणेदारपणाने आणि सर्व प्रवृत्तीच्या लोकांना सांभाळून चालवावे, याचे उदाहरण घालून दिले. लोकशाहीचा यशस्वी विकास तळापासून व्हावयास अशाच कारभाराची मदत होणार असल्याकारणाने भाऊसाहेब यांची नगरपालिके-तील कारकीर्द अत्यंत यशस्वी झाली यात शंका नाही. सातारा नगरपालिकेचा ता. ३१-३-१९४२ चा एकमताने पास झालेला ठराव ही तीच खात्री पटवील.

"ठराव नं. २०- मे. रामचंद्र गणेश ऊर्फ भाऊसाहेब सोमण यानी गेली ३॥ वर्षे म्यु. चे अध्यक्ष म्हणून जी अमोलिक कामगिरी केली त्याबद्दल ही सभा पूर्ण समाधान व्यक्त करिते. त्यानी आपल्या कारकीर्दीत पक्षोपपक्ष व जातिविशिष्ट धोरण यापासून अलिप्त राहून अनेक नाजूक व आणिबाणीच्या प्रसंगी कर्णधाराचे काम उत्तम व यशस्वी रीतीने केले आहे. तसेच आपल्या सहकारी सभासदांच्या भावना न दुखविता त्यांची अनेक लोकहिताची कामे केली आहेत. श्री. भाऊसाहेब यांचा संबंध इलाख्यातील अनेक संस्थाशी आहे. त्यांचे अंगी सौजन्य, मनमिळाऊ-पणा वगैरे अनेक सद्गुण असल्याने ते सर्वाना अत्यंत प्रिय आहेत. त्याचे वयाचे मानाने त्याना करावे लागणारे परिश्रम त्यानी मनात न आणिता म्यु. चे काम ३॥ वर्षे अत्यंत यशस्वीरीतीने केले. त्यांच्या कामाचा योग्य गौरव सरकारने आपल्या रिपोर्टात केला आहे. त्यांच्या वयाचे मानाने व त्यांच्या इतर कामाच्या व्यापाच्या दृष्टीने त्यानी म्युनिसिपल कारभारातून आपले अंग काढून घेतले. ही त्यांची उणीव भासल्यावाचून राहणार नाही. त्याना परमेश्वराने पूर्ण आयुरारोग्य द्यावे व त्यांचा मानमरातब अधिक वाढावा अशी परमेश्वराजवळ आम्हा सर्वांची प्रार्थना आहे. त्यानी अध्यक्ष व सभासद म्हणून जरी आपले अंग काढून घेतले असले तरी त्यांनी आम्हास योग्य मार्गदर्शन करीत जावे अशी आमची त्याना विनंती आहे. त्यांचे तैलचित्र म्युनिसिपल सभागृहात लावण्यात यावे. "

## १३ व्यायाम परिषदेचा दरबार

राष्ट्राच्या बांधणीस खेडेगावांची पुनर्घटना जशी अवश्यक तशीच राष्ट्राचे प्रत्येक तरुणाची मानसिक, बौद्धिक व शारीरिक तरबेजीही आवश्यक. भाऊसाहेब सोमणाना याची जाणीव ते जाणतेपणात आल्यापासूनच होती. स्वतःच्या लहान–पणी वडिलधाऱ्यांच्या शिकवणुकीमुळे व भोवतालची बरोबरीची मुले काय करतात ते पाहून त्यांच्यामध्ये आपण कमी पडू नये एवढ्याच केवळ इच्छेने भाऊसाहेबानी स्वतः व्यायाम घेतला असेल. त्यावेळच्या रूढ पद्धतीप्रमाणे भाऊ–साहेब सूर्यनमस्कार नित्य घालीत; कधी काळी आखाड्यातही उतरत; पण मर्यादित जागेतील वैयक्तिक विकासवाढीच्या व्यायामापेक्षा भाऊसाहेबाना मैदानी खेळाची आवड आरंभापासूनच जास्त होती; विटीदांडू ते खेळत, चेंडू–लगोऱ्या खेळणेही त्याना आवडे; तरी ते दोन्ही खेळ खेळण्याचे वय निघून गेल्यावर खेड्या-पाड्यातूनसुद्धा त्याकाळी रूढ असलेला आट्यापाट्या हा खेळ त्याना फार प्रिय असे. पुणे, वाई, सातारा, या ठिकाणच्या आट्यापाट्यांच्या संघातून स्नेहार्द्र सामने ( मित्रत्त्वाचे सामने ) होत, त्यावेळी साताऱ्च्या संघामध्ये भाऊसाहेबांचा समावेश नेहमी असे. पाट्या चपळाईने व कौशल्याने ओलांडणे तसेच एकाकी असतानासुद्धा कोंडी फोडणे याबद्दल त्यांची ख्याती होती. " राष्ट्राची रग शाळातील क्रीडांगणा–वरच रंगते " या वॉटर्लूच्या विजेत्याचे उक्तीची सत्यता महाराष्ट्राच्या पूर्ण प्रत्ययाची आहेच. महाराष्ट्राच्या काऱ्याकोपऱ्यातून खेळला जाणारा हा आट्या–पाट्यांचा खेळ म्हणजे लष्करी–शिक्षणाचा जणू पायाच. लढवय्यास लागणाऱ्या अनेक बौद्धिक व मानसिक शक्तींचा आणि गुणांचा विकास आट्यापाट्यानी जेवढ्या प्रमाणात होतो तेवढा पल्ला दुसऱ्या खेळाने साधत नाही असेच अनेक व्यायामतज्ज्ञांचे मत आहे. अनेक स्वरूपाची शारीरिक चपळाई आणि तीमधील कुशलता, सांघिक मनोवृत्ती, एकजूटपणा, सहकार्य–वृत्तीची जोपासना, प्रसंगावधान, संधिसाधना, डावपेचाने झगडण्याची दक्षता, तोडीस तोड देण्याची वाकबगारी, बेडरवृत्तीने प्रतिपक्षावर करावयाची मात, धोरणाने लोण देण्याचे टप्पे गाठण्यातील धीरोदात्त वृत्ति, अशा अनेकविध गुणांचा विकास आट्यापाट्याच्या खेळाने खेळाडूमध्ये होतो. आपल्या बरोबरीच्या प्रत्येक खेळाडूच्या खेळाकडे व प्रगतीकडे लक्ष देऊन आणि प्रतिपक्षाच्या बदलत्या डावपेचावर नजर राखून आपले सवंगडी बाद न होता त्याना लोण पोचविण्याचे कौशल्य भाऊसाहेबानी आत्मसात केले होते.

अशा रीतीने स्वतःच्या शरीराची निगाच भाऊसाहेबानी केली असे नव्हे तर लोकमान्यांचे संघटक अनुयायी या नात्याने अनेक उत्सव प्रसंगी भाऊसाहेबानी तरुणांच्या मैदानी व मर्दानी खेळाना उत्तेजनही दिले. उत्सवांच्या मिरवणुकीतून

पट्टा, तलवार, फरी–गदका, पेलण्या–चालविण्याची प्रात्यक्षिके करावयास ते प्रोत्साहन देत आणि कित्येक वर्षे दसऱ्याचे सीमोल्लंघनाचे मिरवणुकीपूर्वी तशा प्रात्यक्षिकांची योजनाही ते करीत. तरबेजी दाखविणाराना श्रीफल देऊन त्यांचा गौरव करण्याचा त्यांचा परिपाठ असे. पहिल्या महायुद्धानंतर झालेल्या शांत–तोत्सवातील प्रात्यक्षिकात भाऊसाहेबांच्या वरीलसारख्या प्रयत्नामुळेच अनेक तरुणाना आपले कौशल्य दाखविता आले.

१९२१ सालापासून सातान्यात जिल्हासामना–मंडळातर्फे दरसाल सामने होऊ लागले. त्या सामन्यातील अनेक पेचप्रसंग भाऊसाहेबानी अत्यंत कुशलतेने सोडवून कार्यकर्त्याना उत्तेजन दिले. पांडुआण्णा शिराळकरादि उदारमनस्का–कडून बक्षिसाकरता ढालीही सोमणानी मिळवून दिल्या. सातान्यातील सामन्यांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे तरुणांच्या अनेक संघटना निर्माण झाल्या. परस्परांचे सह–कार्य वाढू लागले. कधी काळी त्या संघटनातून संघर्ष होऊ लागल्यास तो दिलसफाईने भाऊसाहेबानी मिटविला. १९२० साली विठ्ठलराव सोमणांची व्यायाम शाळा स्थापन झाल्यापासून त्या संस्थेच्या आणि भिडे गुरुजींच्या कार्यपरंपरामध्ये उत्पन्न झालेला संघर्ष भाऊसाहेबानी सफाईने मिटविला हे अनेकांच्या स्मरणात असेल. अशा रीतीने संवर्धित केलेली तरुणांची सहानुभूती अशी वाढत गेली की वाई, कऱ्हाड, तासगाव इत्यादि अनेक ठिकाणी सामने होऊ लागले. सामन्यात भाग घेणारे तरुण भाऊसाहेबाना असहकाराच्या काळापासून पुढील सर्व चळवळीना उपयोगी पडले आणि त्यानी जिल्ह्याचे तेज वाढविले.

तरुणानी व्यायाम करून खेळ खेळून आपल्या शारीरिक व मानसिक शक्तीचा विकास करण्यास बहुसंख्येने व धिटाईने पुढे यावे याकरता १९२९ साली भाऊ–साहेबानी व्यायाम–प्रोत्साहन–मंडळ स्थापन केले. त्यापूर्वी १९२७–२८ सालचे सुमारास जिल्हासामन्यांचे वेळी, “ जुने विरुद्ध नवे ” असा आटचापाटचाचा सामना झाला होता; त्यात भाऊसाहेब व त्यांच्या बरोबरीचे डॉ. तात्यासाहेब गोखले हेही खेळले होते. पन्नाशी उलटलेली ही वृद्ध मंडळी मैदानात उतरलेली ज्यानी पाहिली त्या त्यावेळच्या नव्या तरुणाना आपल्या मनश्चक्षूसमोर ते दृश्य सहज उभे करता येते. १९३५ साली हुतुतूचा खेळ लोकप्रिय होऊ लागल्यावर देखील, त्याच्यापेक्षा आटचापाटचाच्या खेळात सार्वत्रिक लक्ष ठेवून सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची कार्यक्षमता खेळाडूत कशी येते, हे भाऊसाहेबानी प्रत्यक्ष आटचापाटचा ऐन साठीत खेळून दाखविले होते. त्यावरून भाऊसाहेब तरुणपणी कसे खेळले असतील याचे उत्साहजनक चित्र कल्पिता येते. १९२७ साली विठ्ठलराव सोमणांच्या व्यायाम शाळेला व्यायाममंडळाचे व्यापक स्वरूप देवविण्यास भाऊ–साहेबांचे मार्गदर्शनच कारण झाले. गणपतराव साठ्यांची गजानन–व्यायाम–शाळा

ही भाऊसाहेबांच्या मर्जीतीलच होती. गावातील व्यायाम संस्थांच्या जोरावर 'व्यायाम प्रोत्साहन मंडळ' काढण्याचा व्याप भाऊसाहेबानी उभारला; नियमित व्यायाम करणारे तरुण शिस्तीने नेमके जमण्यासाठी स्वत: प्रचार केला आणि पेठा-निहाय करविला; "प्रचारापेक्षा व्यायाम प्रत्यक्ष करण्याचे उदाहरण घालून द्या" अशी एका व्यायाम शाळेच्या चालकानी सूचना करताच वय अगर प्रकृति यांची सबब न सांगता नमस्कारांचा व्यायाम घेऊनच भाऊसाहेब प्रचार करू लागले. सेवा-दलाच्या संघटनात्मक कार्यात अंगावर दलाचा पोशाख चढवून भाऊसाहेबानी कवायतीत भाग घेतला आणि स्वयंसेवकाच्या वाट्यास येणारी कामगिरीही केली. अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाची संघटना नावारूपाला आल्याबरोबर सातारा जिल्हा सामना मंडळाचे रूपांतर त्या मंडळाच्या शाखेत झाले ते भाऊसाहेब सोमणांच्या प्रेरणेनेच. स्थानिक संस्थानी आपले अस्तित्व अलग अलग न ठेविता व्यापक संघटनेत विलीन होऊन वाढत्या जोमाने कार्याचा उठाव करावा असाच सल्ला त्यानी कार्यकर्त्यास दिला. भाऊसाहेबांचा आधार आपल्याला कोणत्याही परिस्थितीत हमखास मिळेल अशी खात्री असल्यामुळेच कार्यकर्त्यांना नवीन नवीन संघटनात्मक कार्य हाती घेण्यास मोठा उत्साह वाटे. १९३८ साली मुंबईच्या शारीरिक शिक्षण परिषदेत पुढील वर्षाचे आमंत्रण साताराच्या दत्तात्रय रामचंद्र परांजपे प्रभृति कार्यकर्त्यानी दिले ते भाऊसाहेब सोमणांचे व्यायामप्रेम, त्यानी त्याबाबत केलेले कार्य आणि त्यांचे तरुणाना असणारे पाठबळ यांच्या पूर्व परिचयामुळेच. साताराच्या तरुणानी आपल्याला न विचारता ती जबाबदारी अंगावर घेतली तरी भाऊसाहेबानी कार्यकर्त्यांना निरुत्साही केले नाही.

साताराच्या अ. म. शा. शि. परिषदेच्या अधिवेशनाचे स्वागत सभाध्यक्षाची जबाबदारी आपल्या अंगावर घेऊन भाऊसाहेबानी परिषदेचे नेतृत्व स्वीकारले. "परिषदेचे अधिवेशन भरविणे म्हणजे स्थानिक कार्यकर्त्यांच्या कार्यक्षमतेची, एकीची व कार्यकुशलत्वाची कसोटीच होती. परंतु अनेक अडचणी असूनही हे अधिवेशन यशस्वीपणे पार पडले, याचे श्रेय भाऊसाहेब सोमण व त्यांचे उत्साही, निरलस व कार्यतत्पर सहकारी व सातारा शहरातील व्यायामप्रेमी जनता याना दिले पाहिजे. कोटेश्वर मैदानावरील पाच हजार विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या शिस्तशीर कवायतीचे ते भव्य दृष्य पाहून आपल्या समाजाचे भवितव्य उज्ज्वल व आशादायी आहे अशी प्रेक्षकांची खात्री झाली. अधिवेशनापूर्वी शारीरिक शिक्षण सप्ताह भरवून साठ-सत्तर हजार मुलामुलींच्या कवायती ठिकठिकाणी घडवून आणून सबंध जिल्हाभर मोठी जागृति सातारकरानी निर्माण केली. अध्यक्षांची मिरवणूक, अधिवेशनांचे वेळी पाच राजांची उपस्थिती, परिषदेचे स्वागताध्यक्ष श्रीमंत् सरकार आप्पासाहेब पटवर्धन सांगलीकर व परिषदेचे अध्यक्ष हिजहायनेस फरजंद-इ-खास दौलत-इ-इंग्लीशिया महाराज प्रतापसिंह गायकवाड सेना खास खेल समशेर बहाद्दर महाराजा बडोदे, आंत्‌रविभागीय सामन्यांचे उद्‌घाटक साताराचे छत्रपती शाहू महाराज, व्यायाम संस्था प्रतिनिधी चर्चेचे अध्यक्ष श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी,

खुल्या अधिवेशनाचे वेळी अध्यक्षांचे नाव सुचविणारे श्रीमंत मालोजीराव नाईक-निंबाळकर यांची बोधप्रद व्याख्याने, परिषदेचा दरबारी थाट इत्यादि गोष्टी खात्रीने चिरस्थायी होतील. सातारा अधिवेशन अपूर्व झाले असाच प्रत्येकाचा अभिप्राय पडला. सातारा परिषदेने शारीरिक क्षेत्रात एका नवीन युगास सुरुवात केली असे ह्मणण्यास प्रत्यवाय नाही." .अशा तऱ्हेचे धन्यवाद सातारकराना मिळाले ते भाऊसाहेब सोमणानी पत्करलेल्या नेतृत्वामुळेच. सातारचे अधिवेशन ता. ३० नोव्हेंबर व १ ते ४ डिसेंबर १९३९ अशा पाच दिवसात पार पडले. परिषदेचा विशेष उपक्रम ह्मणून जो केला होता तो ह्मणजे ठिकठिकाणच्या व्यायामसंस्था-चालकांची सभा बोलावणे हा होय. व्यायामसंस्था चालविण्याची जबाबदारी ज्यानी आपल्या शिरावर केवळ स्वयंस्फूर्तीने घेतली त्याना त्या संस्था चालविताना विशिष्ट प्रकारच्या अडचणी येतात. योग्य नियंत्रण आणि अनुभवशीर मार्गदर्शन करणारी मध्यवर्ती संस्था नसल्यामुळे व्यायाम संस्थांच्या कार्यामध्ये सुसूत्रता दिसून येत नाही; निश्चित अभ्यासक्रम नाही; पूर्वापार व्यायामपद्धतीत आधुनिक विचारसरणीला अनुसरून बदल नाही; विद्यार्थ्यांच्या गरजेस अनुसरून व्यायाम देण्याची व्यवस्था नाहीं; व्यायामात वैशिष्टच आणण्याची इच्छा नाही; किवा व्यायामाला खेळांची जोड देण्याची जरुरी भासत नाही; अशा प्रकारची स्थिती कितीतरी व्यायाम संस्थातून दिसून येत आहे. कित्येक व्यायामसंस्थानी आपले धोरण अभिनव दृष्टीला धरून ठेवले आहे. तेव्हा सर्व व्यायामसंस्थाचालकाना विचारविनिमय करण्यास सुलभ जाऊन व्यायामसंस्थाना सुधारण्याची दिशा लागेल या कल्पनेने व्यायामसंस्था चालकाची सभा परिषदे-बरोबर भरविली आणि यशस्वी प्रकारे पारही पडली.

सातारच्या अधिवेशनाचे वैशिष्टच असे की अधिवेशनास संस्थानिकानी हजर राहून व देणग्या देऊन परिषदेबद्दलचे आपले प्रेम व्यक्त केले. सातारा जिल्हा व दक्षिण महाराष्ट्रातील संस्थाने यामधून व्यायामसप्ताह साजरा होऊन संघटित व एकसूत्री शारीरिक शिक्षण प्रसाराचे लोण खेडचापाडचापर्यंत पोचविले. सरकार, सरकारी अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, यांची आस्थायुक्त मदत झाली. व्यायामसप्ताह साजरा करण्यात गावोगावच्या संस्था व आस्थावंत लोकानी भाग घेऊन व्यायामक्षेत्रात एकसूत्रीपणा व संघटना वाढविण्यास मदत केली. या कार्याकरिता स्वागतमंडळाने सांघिक कवायतीचे एक पुस्तक छापून त्यातील अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्यास गावोगावी वर्ग काढले. सातारा शहरात प्राथमिक व दुय्यम शाळा व प्रौढास शिक्षण देणाऱ्या संस्था, यांच्या संघटनेस सांघिक कवाय-तीच्या प्रात्यक्षिकाने मदत केली. लाठी, काठी, लकडी, यांची चर्चा करून त्या व्यायामप्रकारात एकसूत्रीपणा आणणे किती जरूर आहे याची जाणीव कार्य-कर्त्यास दिली. कलावंत हौशी खेळाडूचे खेळ करून त्यांच्या कलेची कल्पना लोका-पुढे मांडली. व्यायाम, शेतकी, सृष्टिनिरीक्षण, कला यांचे प्रदर्शन उभारून त्यांची शैक्षणिक उपयुक्तता लोकांचे नजरेस आणली. परिषदेच्या निरनिराळ्या कार्यक्रमांचा चित्रपट घेऊन कार्याचा प्रचार केला. आंतर्विभागीय सामने भरविण्याने मंडळाने

केलेल्या नियमांचा प्रसार झालाच; शिवाय शाळा, व्यायाम शाळा, यांच्यापेक्षा विभागीय प्रेम वाढण्यास व त्यामुळे राष्ट्रीय प्रेम वाढण्यास मदत झाली. मंडळास कार्याध्यक्ष असावा, व्यायामप्रसाराबरोबर खुराक म्हणून गोदुग्धाचा प्रसार व्हावा, लष्करी शिक्षणाची तरतूद व्हावी, व्यायाम शिक्षकाकरता एक अभ्यासक्रम ठरवून सरकारने त्यात उत्तीर्ण होणाऱ्यास प्रशस्तिपत्रके द्यावीत, संस्थानिकानी शारीरिक शिक्षणाकडे लक्ष देवून शारीरिक शिक्षण संस्थास मदत द्यावी, मुलांची शारीरिक परीक्षा स्थानिक संस्थानी वेळोवेळी घ्यावी इत्यादि महत्त्वाचे ठराव पास केले. आणि शारीरिक शिक्षणाचे वाङमय प्रसिद्धीस निधी मिळविला.

[" दत्तोपंत परांजपे मास्तर व त्यांचे सहकारी मित्र यांच्या व त्यांच्या स्फूर्तिदायक नेतृत्वाखाली आस्थेने काम करण्यास शिकलेल्या खऱ्या स्वयंसेवकांच्या सेवेचे फळ म्हणजेच अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेचे अधिवेशन " असे भाऊसाहेब सोमणानी परिषदेच्या अहवालात निवेदिले असून " निरनिराळ्या पदावर आरूढ झालेले आपल्यासारखे लोक नाममात्र आहेत; खरी कामगिरी खालच्या थराच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या लोकांची आहे. साताऱ्यातील सर्व लोकानी शारीरिक शिक्षणाच्या पवित्रक्षेत्रात आपपरभाव सोडला, मतांतरे सोडली, पक्षोपपक्ष मनात आणले नाहीत, एका दिलाने खांद्यास खांदा लावून कामे केली " याचे समाधान भाऊसाहेब सोमणानी अत्यंत मोठे मानले.] कायदे कौन्सिलचे उपाध्यक्ष आणि सातारा नगरपालिकेचे अध्यक्ष या दोन्ही नात्यानी साताऱ्यात होणाऱ्या व्यायाम परिषदेची जबाबदारी कर्तृत्ववंत तरुणांच्या प्रेमाने भाऊसाहेब सोमणानी अंगावर घेतली आणि सर्व लोकांच्या दिलसाफ सहकार्याने पारही पाडली.

परिषदेनंतर शिल्लक राहिलेल्या निधीमधून देशी विविध व्यायामप्रकारात एकसूत्रीपणा आणण्याचे दृष्टीने सर्वमान्य ग्रंथ तज्ज्ञांच्या समितीकडून करविण्याचे ठरले. अशा रीतीने राष्ट्रीयवृत्तीला पोषक असे कार्य, शारीरिक शिक्षण क्षेत्रात वैयक्तिक बळकटीपासून सामाजिक संघटनेपर्यंत भाऊसाहेब सोमणानी केले. फार काय, व्यायाम कार्यास ज्यानी ज्यानी वाहून घेतले त्यांचा त्यांचा गौरव करण्यास त्यानी सदैव प्रोत्साहन दिले. दामोदरपंत भिडे गुरुजी यांच्या षष्टयब्दिपूर्तीच्यावेळी माधवरावजी अणे, आण्णासाहेब भोपटकर यांच्या जोडीला भाऊसाहेब सोमणानी गुरुजींचे राष्ट्रीय कार्य लोकांच्या नजरेपुढे आणले. भाऊसाहेबांच्या राजकीय कार्यास व्यायाम क्षेत्रात काम करणाऱ्यांचा फारच उपयोग झाला. पडद्याआड करावयाची अनेक कामे त्या लोकाकडून त्याना करविता आली. १९२२ साली साताऱ्यात बालवीर संस्था स्थापन झाल्यापासून त्या संस्थेच्या कार्याबद्दल ते नेहमीच कळकळ दाखवीत. बालवीरांचे मेळावे व बालवीर–शिक्षक–परिषद या संघटनात्मक कार्यास त्यानी प्रोत्साहन दिले. अशा भाऊसाहेबांच्या वृत्तीमुळे व कार्यामुळे भाऊसाहेबांच्या दीर्घ आयुष्याप्रमाणेच त्यांचा पडद्यामागील अनुयायी व सहाय्यक वर्गही पल्लेदार राहिला.

# १४ वागावे कार्मि हे रुचे |

१९३६ साली आपला साठी समारंभ झाल्यानंतर भाऊसाहेब सोमण विधान परिषदेत निवडून गेले; अनेक दिवसांच्या संकल्पाप्रमाणे लोकसेवा संघाची प्रेरक व संयोजक शक्ति होऊन भाऊसाहेबानी खेड्यांच्या पुनर्रचनेला सुरवात केली; सातारा नगरपालिकेचे अध्यक्षपद स्वीकारून " खराटचाचे स्वराज्य " लोकसेवा–बुद्धीने आणि सर्वसंग्रहवृत्तीने कसे चालवावे ते त्यानी लोकाना दाखविले; भरीला, अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेचे कार्यनेतृत्व पत्करून सातारा शहराचे व जिल्हयाचे नाव सोमणानी सर्वत्र केले. गांधीआर्विन–करारापासून राष्ट्राच्या सर्वांगीण आणि समन्वयी विकास वाढीची जबाबदारी विचारवन्त समाजसेवकानी उचलली पाहिजे; हा बुद्धीचा सिद्धान्त झालेल्या मंडळीना भाऊसाहेब सोमण आपल्या उतारवयातही शक्य त्या सर्व क्षेत्रात प्रत्यक्ष सेवा करीत असलेले पाहून नवानवा हुरुप येत होता. विधिमंडळातून केलेल्या कार्याने आणि सनदशीर मार्गानी राष्ट्रीय बांधणीला सत्तासंमत बळकटी येते; प्रत्यक्ष लोकात मिसळून त्यांची सुखदु:खे समजावून घेऊन त्यांच्या चालीने चालता चालता व त्यांच्या बोलीने बोलता बोलता, त्यांच्याच पाठबळावर ज्या सुधारणा होतात, त्या स्थैर्य पावतात; सेवा आणि सत्ता यांचा प्रीतिसंगम साधून सामूहिक सहजीवनाची उंची स्थानिक–स्वराज्यात जीव लावून काम करण्याने साधते; आणि राष्ट्रातील तरुणतरुणी मनाने, मेंदूने, मनगटाने बळकट हव्यात, तशाच त्या शिस्तीने, संघटनेने व शास्त्रीय चपळाईने वजनदार हव्यात, हे साध्य व्यायाम संस्थांच्या द्वारा जनमनावर बिंबवता येते; भाऊसाहेबानी १९४० पर्यंत केलेल्या प्रमुख कार्यप्रणालीचा हा रोख होता. भाऊसाहेबांचे आजोबा ज्यावर्षी सातारा जिल्हयात आले, त्याचा शतसांवत्सरिक उत्सवच जणु भाऊसाहेबांचे साठीसमारंभाने झाला. सातारचे राजाना उठविण्याच्या इंग्रजी प्रयत्नांचा वचपा कसा काढावा हे भाऊसाहेब विधान परिषदेत सत्तास्थानी लोकमताचे जोरावर बसून बरोबर शंभर वर्षानी विराजमान होऊन दाखवित आहेत, अशी श्रद्धाळू अंत:करणाना भावना होऊ लागली. " न्याय मंदिरासाठी " सरकारने घेतलेल्या सातारकरांच्या ' नव्या राजवाड्याच्या भवानी–मंडपात ' दरबारी थाटाची अ. म. शा. शि. परिषदेची बैठक भाऊसाहेब सोमणांच्या नेतृत्वाने सुरू असता, आपली जन्मशताब्दि चिरंजीवांच्या त्या कर्तृत्वाने साजरी होत आहे, असे समाधान गणेशपंत सोमण मास्तरांच्या आत्म्याला वाटले असेल, अशीही कित्येक कविहृदयांची कल्पना झाली.

स्वत: भाऊसाहेब सोमण अशा कल्पना तरंगात कधींच रमत नसत. रोकड्या कार्यावर त्यांचा भर असे. म्हणून स्वत: आपल्या शक्तिकुवती प्रमाणे कार्य व

लोकसेवा करीत असता, दुसऱ्यांच्या तशाच प्रवृत्तीवर आणि कृतीवर त्यांची नजर असे. बुधच्या मंडळीनी सातारा जिल्हा-राजकीय परिषद रावसाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली १९३७ मध्ये भरवली असता आपल्या अनुभवी मार्गदर्शनाने ती यशस्वी करण्यास भाऊसाहेब सेवातत्पर राहिले. महात्मा गांधी जयन्ति सप्ताहात १९२७ सालापासून सातारा जिल्हा स्वदेशी प्रदर्शने भरत आली होती, त्याप्रमाणें ती या कालातही वाई (१९३७) मसूर (१९३८) रहिमतपूर (१९४०) येथें भरत असता त्यांची गौरवाने प्रतिष्ठा राखण्यास भाऊसाहेब चुकले नाहीत. १९३८ साली मसूरला झालेल्या मातंग–परिषदेस त्या हरिजनबंधूंच्या शिक्षण सुधारणेसंबंधी आपल्या हातून होईल ती सर्व मदत आपण देऊ असा संदेश त्यानी धाडला होता. पुढे सोमवार ता. २७ जून १९३८ रोजी नाथ घाणेकरांचा एकाव–न्नावा वाढदिवस सेनापति बापट यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिकरीत्या साजरा झाला. त्यावेळी आपल्या वडील बन्धुसमान सहकाऱ्याच्या चिरंजीवांचा आणि सातारा जिल्ह्याच्या एका कर्तबगार सुपुत्राचा गौरव होतो आहे, याचे अपरंपार समाधान भाऊसाहेबाना झाले. त्या समारंभात त्यानी नाथाना आशीर्वाद देताना बोलूनही दाखविले की– "स्वार्थत्यागपूर्वक समाजाची सेवा करणारांचा गौरव समाजात होत राहणे हे राष्ट्राच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. राष्ट्रात गुणांचा प्रकर्ष झाला पाहिजे तशी गुणग्राहकताही वाढली पाहिजे. जो आपल्या कर्तबगारीनें आणि कर्तव्यनिष्ठेने समाजाची सेवा करतो, त्याची सेवा समाजाला पटली म्हणजे समाज त्याचा गौरव करतो. "गुणिषु न च लिंगं न च वयः।" असे वचन आहे. म्हणून एकाद्या कर्तव्यदक्ष व कर्तबगार देशभक्ताचा गौरव एकावन्नाव्या नव्हे एकेचाळीसाव्या, एकतीसाव्या, एकविसाव्या वर्षी झाला तरी त्यात आश्चर्य मानन्यासारखे काही नाही. साठीलाच काही सोने चिकटले नाही. सातारा जिल्ह्यात नाथ घाणेकरांचा गौरव एकावन्नाव्या वर्षी होत आहे; त्याना उदंड आयुष्य आजपर्यंतच्या पेक्षाही मोठ्या कर्तबगारीचे मिळो, अशी माझी परमेश्वरा–जवळ प्रार्थना आहे."

१९३९ साली काँग्रेसने इंग्रजी राजवटीच्या युद्धधोरणाशी असहकार करून मंत्रिपदे सोडल्यावर देशात "९३ कलमी राजवट" सुरू झाली आणि कायदेमंडळे वगैरे सर्व बरखास्त झाली. त्यामुळे अ. म. शा. शि. परिषदेकडे लक्ष देण्याचे वाट्यास आल्यावर भाऊसाहेबानी ते कार्य पार पाडले. त्याच बरोबर खानापूर, माण, कोरेगाव, शिराळा या तालुक्यातून विशेष व इतरत्र सामान्यतः पाण्याचा नि वैरणीचा दुष्काळ पडला होता, तिकडे भाऊसाहेबानी सरकारचे लक्ष तर वेधलेच; पण खासगी उदारधींच्याकडूनही आपदग्रस्ताना मदत मिळवून दिली व स्वताही केली. लोणंद भोवतालची कोरेगाव तालुक्यातील काही गावे लष्कराच्या

उपयोगासाठी सरकारने १९४० साली उठविण्याचा बेत केला असता, तेथील रहिवाशांच्या मिळकतीचा मोबदला त्याना बिनचूक बाजारभावाने मिळावा आणि त्यांच्या पुढील व्यवसाय-व्यवहाराना सुगमता यावी; म्हणून भाऊसाहेबानी कोरेगाव, वाई तालुक्यातील आपल्या विश्वासाच्या कार्यकर्त्यांचा सहकार मिळवून खटपट केली आणि तिला बऱ्याच मोठ्या प्रमाणात यशही आले. "युद्ध–फंड सक्तीचा नाही व चावडीच्या रुपयामागे एक आणा युद्धाकरिता अधिकाऱ्यानी मागितला तरी ती वाढलेली चावडी नव्हे;" म्हणून तो परवडेल तरच द्यावयाचा, असे सांगणाऱ्या गट–परिषदा व सभा सातारा जिल्ह्यात १९४० साली ठिकठिकाणी धूमधडाक्याने झाल्या त्यांची स्फूर्ति भाऊसाहेब सोमणांचीच होती.

अशा रीतीने भाऊसाहेब सोमणांची समाजसेवा चालू असताच, मनाच्या धावेबरोबर शरीराचा तग टिकाव धरीत नाही, असा जो भाऊसाहेबांचा अनुभव १९३२ पासून मधूनमधून सुरू झाला होता, तो आता मनावरही पगडा करू लागला. कर्मयोगाचे धडे राष्ट्राला देणारे लोकमान्य टिळक चौसष्टाव्या वर्षी इहलोक सोडून गेले; आपले वडीलही एकोणसत्तराव्या वर्षी या जगाचा निरोप घेऊन गेले; आपल्या वडिलभावासारखी, जी डॉ. भिडे, नानासाहेब आगाशे, गणपतराव फणसळकर, आप्पासाहेब आळतेकर, प्रभृति मंडळी आपल्याला सहकारी म्हणून लाभली, ती सत्तरीच्या आतच आपले अवतारकार्य उरकून गेली. आपण ही आता पासष्टीला पोहोचलो. कर्मयोगाच्या सातत्याने कार्य करीत राहिलो तरी मनाचा उमाळा आणि शरीराची रग यांचे प्रमाण व्यस्त पडू लागल्यावर, आपण आपल्या सार्वजनिक जीवनातील वाईचे नानासाहेब वैद्य, अष्टयाचे गोविंदराव लिमये, दादासाहेब करंदीकर प्रभृति पितृस्थानी असलेली मंडळी पंचाहत्तरी ओलांडण्यास समर्थ झाली, तेवढीच मजल फार तर गाठू; यापेक्षा ईश्वराची काय मर्जी असेल ती असो ! असे विचार भाऊसाहेबांच्या मनात वरचेवर येऊ लागले. म्हणून आपल्यावर असलेल्या कायदेशीर व नैतिक जबाबदाऱ्या हळूहळू हातावेगळ्या करून ज्यांच्या हाती त्या सोपविणे इष्ट व आवश्यक आहे, त्यांच्या हाती सोपविण्यास भाऊसाहेबानी सुरवात केली. १९४१ च्या ४ जानेवारीस पांडुअण्णा शिराळकर व भाऊसाहेब यानी प्रथम लोकसेवासंघाचे विश्वस्तपत्र (ट्रस्ट–डीड) केले. काळाचा ओघ असा दिसू लागला की लोकसेवासंघाने सुरू केलेल्या कामाप्रमाणे लोकसेवेची कामे कॉंग्रेस सरकारला करावी लागतील. त्या कामाला बुद्धिवादी संशोधक तरुणांची जोड खाजगी प्रयत्नानी देणे जरूर आहे, म्हणून पांडुआण्णा शिराळकरानी आपल्या तीस हजार रुपयांचा ओघ पुणे विद्यापीठाकडे वळविला.

आणखीही एक विचार भाऊसाहेबाना यावेळी विषण्ण करीत होता. " आमचे थोरले चिरंजीव भास्कर यांचे कॉलेज शिक्षण प्रकृतीमुळे अपुरे राहून ते घरी परतले; व त्यास सन १९३२ सालापासून एक दुकान काढून देऊन व्यवहारात त्यांचा प्रवेश जाहला. दुर्दैवाने अवघ्या पाच वर्षातच दोषीतापाने त्यांचा अंत जाहला. " १९३७ साली झालेला हा पुत्रवियोग आणि त्यामुळे आपल्या नातवंडासुद्धा सर्व कुटुंबाची वाढलेली जबाबदारी यांचे ओझे मनावरून कमी करण्याकरता आपल्या खाजगत मिळकतीचे एक व्यवस्थापत्र भाऊसाहेबानी १९४१ साली केले. मनाची अशी " वानप्रस्थ " अवस्था व्हावयास स्वताच्या जीवनाचे सिंहावलोकनही कारणीभूत होते.

" कर्मामुळेच सिद्धीस पावले जनकादिक ।
लोकसंग्रहि दे लक्ष, करी कर्तव्य आणिक ॥
जे जे आचरतो श्रेष्ठ, तें तेच दुसरे जन ।
मानी प्रमाण जे जें तो, त्यापरी लोकवर्तन ॥ "

या गीतेच्या शिकवणीची वाणी कानावरून गेल्याकारणाने, त्या वाणीप्रमाणे वागण्याचा प्रयत्न चार तपे साधला तेवढा केला आणि—

" करायाचे मला काही, मिळो ते मिळवायचे ।
त्रिलोकात नुरे तोही वागावे कर्मि हे रुचे ॥ "

अशा एका अवस्थेत आपण आलो आहो, असे भाऊसाहेबाना दिसत होते. सरकारचे " युद्धप्रयत्न " हाणून पाडण्यासाठी म्हणून नव्हे; पण " शान्ति हवी असेल तर युद्धाची सज्जता ठेवा " या उद्घोषाचे तीन–तेरा केसरीकंदनानंतर केव्हाच वाजले होते म्हणून " शान्ति हवी असेल तर शान्तिनिर्मितीचीच सज्जता ठेवा. " या युगघोषणेला इंग्रज सरकार वर्तनान्तरित करीत नाही, ते भारतानेच करावयास पाहिजे म्हणून, आपल्या सांस्कृतिक इतिहासाची परंपरा राखण्यासाठी ज्यावेळी काँग्रेसने इंग्रजी राजवटीच्या युद्धप्रयत्नाशी अलिप्ततावाद स्वीकारला आणि " शान्तिसाठी शान्तिसेवेची तयारी " म्हणून वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला, त्यावेळी त्या वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेणेस भाऊसाहेबानी महात्माजींची परवानगी मागितली होती. ती आल्यावर सोमवार ता. ६ जानेवारी १९४१ रोजी भाऊसाहेब सोमणांचा व आमदार शंकर हरी तथा तात्यासाहेब साठे यांचा सत्याग्रह व्हावयाचा.

पण रविवार ता. ५ जानेवारी रोजी पहाटे दोघानाही स्थानबद्ध करण्यात आलेल्याना सरकारी अधिकारी घेऊन जात असता, (लक्ष्मणराव) आण्णासाहेब आपटे यानी जमलेल्या जनतेस संदेश देण्यासाठी आग्रह केल्यामुळे सोमण म्हणाले ''महात्माजींच्या आज्ञा निष्ठेने पाळा,'' असा संदेश देऊन सोमण बंदीवासात गेले. त्यांच्या संदेशाप्रमाणे जिल्ह्याने वैयक्तिक सत्याग्रह तर निष्ठेने पाळलाच; पण जेधे, गाडगीळांच्या तुरुंगवासाने दिल्ली असेंब्लीतील रिकाम्या झालेल्या जागांची जी पोटनिवडणूक झाली, तिच्यात कॉंग्रेसचेच उमेदवार यशस्वी व्हावेत, म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा जिल्ह्याने केली. सर्व सत्याग्रही डिसेंबर १९४१ मध्ये सुटले त्यात ४ डिसेंबर १९४१ रोजी सोमण नाशीक तुरुंगातून सुटले व जिल्ह्यात असलेल्या जागृतीचा आढावा ऐकून त्याना संतोषही झाला.

---

# १५ विवेके करावे कार्य—साधन

[१९४२ साल उगवले. हिटलरी होरपळीच्या ज्वाला जग व्यापून बसल्या होत्या. शांतियुगाची आणि मानव्याच्या प्रस्थापनेची धडपड करणाऱ्या महात्मा गांधीना सगळ्या आशियाटिक राष्ट्राबरोबर "छोडो आशिया" असे इंग्रजास म्हणावयाचे होते. पण आशियातील जपानसारखी राष्ट्रेच युद्धात गुंतलेली; वेळ वखत पाहून जपान इंग्लंडवर मात करणार असा रंग दिसू लागताच, महात्माजींच्या प्रेरणेने 'छोडो हिंदची चळवळ' या सालच्या ता. ९ ऑगष्टपासून काँग्रेसने आरंभिली; त्यासरशी सातारा जिल्ह्याने आपल्या कुवतीप्रमाणे आपला वाटा त्या चळवळीत उचलला.] जिल्ह्याने अनेक खडतर प्रसंगास तोंड दिले. कार्यकर्ते मोडले पण वाकले नाहीत. काहीतर मृत्युला कवटाळून अमर झाले. अगदी अल्पकाळ का होईना, पण ज्या कित्येक खेड्याना, सरकार वेळेवर अन्न व वस्त्र पोचवू शकत नव्हते, त्याना जीवाची तमा करून काँग्रेसपैकी 'गुप्ते' (भूमिगत) झालेल्या मंडळीनी अन्नवस्त्र पोचविले, आपसात तडजोडीने गावातील भांडणे मिटविली; चोराचिलटापासून अभय दिले; यालाच खरे म्हटले तर साताराचे प्रतिसरकार म्हणतात. 'गुप्त्या'नी अशी कामे चालविली असताच, परकीय सत्तेचा कारभार बंद पाडण्याच्या कारवायाही अनेक ठिकाणी झाल्या. त्यामुळे इंग्रजी राजवटही खव–ळली, व तिच्या हस्तकानी दुर्वृत्त लोकानाही काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणून स्थानबद्ध केले. परकीय सत्तेच्या हस्तकानी काँग्रेसच्या गोटात केलेली ही रंगरूटभरती एका बाजूने जिल्ह्याला जाचक झाली! आपण खरोखरच परकीय सत्तेला अस्वस्थ करू शकतो व लोकांच्या कल्याणाची सेवा करू शकतो; या आत्मविश्वासाच्या मंडळीपैकी ज्यांचा आत्मविश्वास आत्मश्लाघेत परिणत झाला, त्यांच्या हातून कळत न कळत झालेल्या अत्याचार-अनाचारामुळे, प्रतिसरकार असलेल्या मूळच्या संस्थेला लवकरच "पत्रि" सरकारचे स्वरूप यावयास मदत झाली!! आणि विरोध करील अगर नीतिच्या गोष्टी सांगेल त्याच्याबद्दल तसल्या तोल सुटलेल्या कार्यकर्त्यात असहिष्णुता वाढली व जनसामान्यात एकतऱ्हेचे भयप्रद वातावरण निर्माण झाले. 'गुप्त्यां'च्या गुप्ततेचा फायदा जातिवंत गुन्हेगारानीही घेण्यास कमी केले नाही. परकीय सत्तेला काँग्रेस तत्त्वभ्रष्ट ठरविण्यास हे सर्व होईल तर हवेच होते; म्हणून राज्यकारभाराचा 'ऑलवेल' सांगण्यापुरतीच बंदोबस्ताची यंत्रणा तिने जारी केली. मूळ चांगल्या गोष्टीचा असा विचका होत असता, परिस्थिती काबूत ठेवून तिला राष्ट्रीय अशा सात्त्विक वळणावर नेणारा नियंत्रक नेता नाही, हे अनेक सात्त्विक अंतःकरणाचे दुःख सातारा जिल्ह्याला होते. तरीही खरोखरच देशभक्तिने प्रेरित होऊन ज्यानी भारताच्या केवळ स्वातंत्र्यासाठी तळहातावर शिरे घेतली, अगर हाल–अपेष्टाचे दिव्य सोसले, अथवा जन्मभर बऱ्या न होणाऱ्या

दुखण्याचा ससेमिरा लावून घेतला, त्या अव्वल देशभक्तांचा परामर्ष बिनचूक घ्यावयास खेड्यापाड्यातील बायाबापड्याही चुकत नसत; मग भाऊसाहेब सोमणानी तशा सोज्वळ राष्ट्र–सेवकासाठी बंदीखान्यात बसूनही मुंबईच्या धनिकाकडून डायाभाई पटेलांचेमार्फत पाच हजार रुपयांची मदत मिळवून पाठविली असली आणि आपल्या पूर्वबंदिवासाची उपकार–रत परंपरा चालविली असली तर नवल काय ?

भाऊसाहेब सोमण हे १९४२ साली स्थानबद्ध झाले ते प्रथम सातारा जिल्ह्याच्या निवडक पुढाऱ्याबरोबर. ता. ९ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातून पकडून आणलेल्या पुढाऱ्यासमवेत साताऱच्या सब्–जेलमध्ये त्यांची काही बोलणी सुमारे तासभर होत आहेत, न होत आहेत, तोच खुद्द डि. मॅ. साहेबानी त्याना भेटीस बोलाविले. आणि प्रकृतिच्या अस्वास्थ्यामुळे व वयाचे वृद्धत्वामुळे सोमणाना त्यावेळी त्यानी सोडण्याचे ठरविले. सोमण कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेणार नाहीत आणि परिस्थितीमुळे त्याना घ्यावासा वाटला, तर सोमणानी आपणास अगाऊ कळवावे अशीही अपेक्षा डि. मॅ. ने केली; एक तासभर डि. मॅ. साहेबांशी बोलणे झाल्यावर भाऊसाहेब सोमणानी परत येऊन आपल्या राजकीय सहकाऱ्यास झालेला प्रकार निवेदन केला, आणि डि. मॅ. च्या सूचनेप्रमाणे सोमणाना घरी आणून सोडण्यात आले.

९ ऑगस्टपासून ता. २३ सप्टेम्बरपर्यंत भाऊसाहेब सोमण घरीच होते. डि. मॅं. नी सोमणांच्या संबंधी जी सद्भावना धरली होती, ती जिल्ह्यातील राजकीय चळवळ आटोक्यात आणण्याचे दृष्टिने उपयोगी नाही; असे जिल्ह्याच्या पोलीस अधिकाऱ्यांचे मत असावे, असे त्यांच्या एकंदर हालचालीवरून म्हणावे लागते. ‘ चले जाव ’ च्या घोषणेनुरूप उघड अगर गुप्त चळवळ करणारे तरूण भाऊ–साहेब सोमणांच्या कडूनच स्फूर्ति घेत असले पाहिजेत, असा समज नोकरशाही दिवसेदिवस दृढ करून घेत होती. त्यात गणपति उत्सवाचे सुमारास युक्त प्रांताचे लोकसेवक राघवेंद्र शेषो पाच्छापूरकर उर्फ बाबा राघवदास भाऊसाहेब सोमणाना भेटून गेले, हे एक आयतेच निमित्त नोकरशाहीला सापडल्यासारखे झाले. सदर अनुमान खरे असो वा खोटे असो लोकांचा तर्क तरी त्या दिशेने वहात होता; शिवाय ‘ चले जाव ’ चळवळीची प्रचार पत्रके (बुलेटिन्स) छापण्यासाठी सातारा जिल्ह्यात आलेले सायक्लोस्टाईल मशीन भाऊसाहेबांच्या येथे आलेले आहे असा समज हणमंतशास्त्री महाजनी आणि भाऊसाहेबांचे चिरंजीव यांच्या १९३० मध्ये प्रवासी मोटारीत झालेल्या संवादाप्रमाणे नोकरशाहीच्या हस्तकानी करून घेतला होता, असे दिसते. कारण बुधवार ता. २३ सप्टेंबर रोजी अनंतचतुर्दशीची मिरवणूक झाल्यावर

रात्री दहाच्या सुमारास भाऊसाहेबाना, त्यांच्या एका हितचिंतकाने पुढे येणाऱ्या प्रसंगाची खबर अगाऊच दिली असावी, म्हणून भाऊसाहेबही तयारीनेच आपल्या गादीवर बसले होते. रात्री ११ च्या सुमारास भाऊसाहेबाना गिरफदार करण्यात आले आणि दुसरे दिवशी येरवडयास नेऊन गुदरण्यात आले.

भाऊसाहेबांच्या अस्वस्थ प्रकृतिला येरवडयाचा बदल फारसा मानवला नाही. म्हणून पुढे काही दिवस त्याना ससून हॉस्पिटलमध्येही ठेवण्यात आले होते. येरवड्यातील पहिल्या वर्गाचे राजबंदी काही दिवस इंडस्ट्रिअल स्कूल पुणे या संस्थेच्या आवारातही हलविण्यात आले होते. तेथे भाऊसाहेब आपला काळ कसा घालवित याचे चित्र कोरेगावचे रामभाऊ देवरे यानी पुढील प्रमाणे रेखाटले आहे.

"भाऊसाहेब हे सर्वात वयोवृद्ध; तेथे आमच्या बरोबरीचे तिशीच्या आतील तरुणही पुष्कळ होते. आचार्य भागवत व आचार्य जावडेकर यांचेसारखे राजकीय द्रष्टे व तत्त्वज्ञानीही तेथे होते. राजकारणाची चर्चा व तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करण्याची ती एक उत्तम संधी लाभली होती. आचार्यांची वक्तशीर प्रवचने सुरू झाली. आम्हा तरुणाना त्यांचे फार आकर्षण. ज्ञानेश्वरीवर तास– गावचे पागे यांची रसाळ प्रवचने सुरू होती. पण भाऊसाहेब हे कोणाचेही श्रोते बनले नाहीत. त्यांच्यासारखी वृद्ध मंडळी नव्या विचाराकडे आकृष्ट होणार नाहीत, अशी आमची गैर समजूत. पण थोडे स्थिरस्थावर झाल्यावर भाऊसाहेब नेहमीच्या फेरफटक्यातून आमच्या बराकीत आले, आमच्या जवळची पुस्तके त्यानी पाहिली, बू–साहेब साठे यांचे जवळची 'सोव्हिएट शेती, उद्योग व शिक्षण वगैरेची माहिती देणारी पुस्तके' पाहून भाऊसाहेब मला म्हणाले– 'चल, आपण ही पुस्तके वाचा– यला लागू.' रोज दुपारच्या चहानंतर तीन ते पाच, मी ती पुस्तके त्याना वाचून दाखवू लागलो. ती पाच सहा पुस्तके वाचून झाली की भाऊसाहेबांचे समाधान होईल असे मला वाटले होते, पण ती चटकन् वाचून संपली नाहीत. कारण भाऊसाहेब नुसते ऐकून घेत नसत. एकाद्या गोष्टीबद्दल पूर्वी कोठे उल्लेख आला आहे व त्याची नीट संगत लागते की नाही, अनेक ठिकाणी आलेला उल्लेखातून काय निष्कर्ष निघतो, हे ते पहात. अमक्या पुस्तकात अमक्या प्रकरणात, अमक्या पाना– वर असा असा संदर्भ येऊन गेला आहे असे नेमके सांगत. तो हुडकून काढायला मला वेळ लागे; पण त्यांचे सांगणे अचूक असे. भाऊसाहेबांची दृष्टि वाचनक्षम नसताना केवळ स्मरण शक्तिवर त्यांचा हा अचूकपणा चालत असे. वेब पतीपत्नीची कम्युनिझमवरील पुस्तकेही भाऊसाहेबांनी माझ्याकडून वाचून घेतली. त्यातील 'नॅशनॅलिटीज्' चा प्रश्न रशियाने कसा सोडविला त्याचे वाचन फार चिकित्सेने झाले. त्यावेळी मुस्लीम लीगची पाकिस्तानची मागणी जोरात चालू होती, व

राजगोपालाचार्यांचा फॉर्म्यूला कॉंग्रेसपुढे होता. आमच्या वाचनानंतर भाऊसाहेब एवढेच उद्‌गारले की ' हिंदुस्थान अठरा पगड नॅशनॅलिटीचे राष्ट्र नाही हेच प्रामुख्याने खरे आहे. ' त्यानंतर त्यानी माझ्याकडून जवाहरलालजींचे आत्मचरित्र, जगाचा इतिहास, हिंदचा शोध वगैरे पुस्तके वाचून घेतली व नव्या विचाराबद्दल आस्था दर्शविली. पुस्तक प्रचारात्मक असले तरी त्यातील जेवढा भाग वस्तुस्थिति निदर्शक असेल तो हुडकून काढण्यात भाऊसाहेबांचा हातखंडा. ते तेवढ्याच भागावर आपले लक्ष केंद्रित करून स्वतःचे निष्कर्ष काढीत. त्यांच्या कुशाग्र बुद्धीचे हे वैशिष्टच माझ्या स्मृतीतून कधीही जाणार नाही. "


बंदीवासात असताना अशातऱ्हेने ज्ञानविलासात भाऊसाहेबांचा वेळ जसा जात असे तसाच सहकारी राजबंदींचा परामर्ष घेण्यात, सातारा जिल्ह्यातील इतरही गुन्हेगार म्हणून आलेल्या कैद्यांचा पुसतपास करण्यात, सार्वजनिक कार्य-कर्त्यांच्या बंदीवासामुळे त्यांच्या कुटुंबांचे हाल कमीत कमी व्हावे म्हणून काळजी वहाण्यात आणि चालू असलेले राजकीय आंदोलन आपल्या जिल्ह्यात प्रतिष्ठेने चालू आहे की नाही याची बातमी घेण्यात भाऊसाहेबांचा वेळ बहुधा जात असे.

भाऊसाहेबाना पुढे १९४३ च्या ऑगस्टचे सुमारास नाशिक सेंट्रल प्रिझन-मध्ये हलविण्यात आले. तेथून चळवळीचा भर आटोक्यात आला आहे असा ब्रिटिश रियासतीला विश्वास वाटताच, ज्याप्रमाणे अनेक स्थानबद्धाना सोडण्यात आले त्याचप्रमाणे भाऊसाहेबानाही ता, ४ डिसेंबर रोजी सोडण्यात आले. नाशिकसारख्या आरोग्यप्रद हवामानाच्या बंदिखान्यात राहूनही भाऊसाहेबांची तब्येत खालावली होती आणि त्यांचे डोळे इतके बिघडले होते की, त्याना सरकारने तशा स्थितीत का सोडू नये, असा सवाल केसरीने एक स्फुट लिहून केला होता.


भाऊसाहेब सोमण सातान्यास ५ डिसेंबर १९४३ रोजी आले. आल्याबरोबर राष्ट्रिय-आन्दोलनाचा अंदाज घ्यावयास त्यानी सुरवात केली. कॉंग्रेसच्या आंदोल-नातील धरपकड, अनेक अदृष्ट कार्यकर्त्यांच्या हुडकणीसाठी हजारोंची बक्षिसे, अनेकाना विनाचौकशी स्थलबंदी, यांची माहिती तर त्याना मिळालीच; पण शिरवडे-स्टेशन-जळिता बद्दलचे खटल्यात पुरावा अपुरा पडून सर्व जोडीदार निर्दोषी सुटले असताही सदाशिवराव पेंढारकर व रंगा पाटील याना सातसात वर्षांच्या सक्तमजुरीच्या जबर शिक्षा झाल्याचेही भाऊसाहेब सोमणाना कळले. कॉंग्रेसच्या आन्दोलनाचा फायदा घेऊन प्रक्षुब्धानी बांधलेल्या कमरा व त्यामुळे झालेल्या लुटालुटी, सरकारी टपालांची लांबवण, आगगाड्यांच्या वाहतुकीस आलेले अडथळे आणि अशाच प्रकारातून उद्‌भवलेले सामुदायिक दंड, शिराळे

पेटचातील एकजात पोस्टांचे झालेले उच्चाटन आणि पोलिस–बंदोबस्तात गटवारीने झालेल्या शेतसारा–वसूलीचा सरकारी जुलूम, यांच्या कथा ऐकून भाऊसाहेब विव्हळ झाले. विशेष गटातील व्यापाऱ्याना लाडिकपणाने वागवून सरकारने केलेल्या बाजारभावनियंत्रणाने गरीबाना रुपयाची मोडसुद्धा मिळण्याची पंचाईत होऊन काळचा बाजाराची झालेली चलती व अनुषंगिक सावळा–गोंधळ यांच्या वार्ता त्याना ऐकवेनात. धान्यसाठे कळविण्याचा साप्ताहिक कचाटा आणि त्यातून अज्ञान शेतकऱ्यावर उद्भवलेल्या कटकटी यांच्या हकीकतीनी भाऊसाहेब सोमणांचे चित्त विषण्ण केले. अर्थातच काँग्रेस कार्यकर्त्यावर अत्याचाराबाबत सरकारी खटल्यांचे सत्र सन १९४४ साली सुरू झाल्यावर अनेक खटल्यात आरोपितांची वकिलपत्रे त्यानी घेतली आणि त्यांची निर्दोषी म्हणून सुटका केली. बार्शी लाईटरेल्वेवरील स्टेशने जाळल्याच्या खटल्यातील कोल्हापुरचे डॉ कुलकर्णी, शंकरराव माने, दत्तोबा तांबट, तुकोळ, ईश्वरा पैहिलवान, इचलकरंजीचे शाम पटवर्धन, पाटील प्रभृतीना सातारा सेशनमध्ये शिक्षा झाल्या तरी, हायकोर्टात " कबूलीजबाब देणाऱ्या साता " शिवाय बाकीचे निर्दोषी सुटले. सुरलीघाट–टपाल लुटीच्या खटल्यातील आरोपितही निर्दोषी सुटले. पे-स्पेशल-ट्रेनलुटीतील आरोपितांची वकिली शंकर हरि साठे यानी केली आणि ते सर्व आरोपित निर्दोषी सुटले. तरी तेवढचा–तल्या तेवढचात त्याना स्थानबद्ध करण्यात आले. तरी पण आजारी असलेल्या भाऊसाहेब सोमणांचे दर्शन घेतल्या शिवाय सातारा सोडावयाचा नाही, असा त्यांचा निश्चय असल्यामुळे, तो पुरा झाल्यावरच बन्दिखान्याकडे जाण्यासाठी ते येरवडेकर फौजदारांच्या स्वाधीन झाले. सांगलीच्या बंदिखान्यातून निसटलेल्या वसंतराव पाटलाना भाऊसाहेब सोमणांच्या शिवाय आपल्या खटल्यात वकील देण्याची इच्छा नव्हती. पण भाऊसाहेबांचे आजारीपणामुळे सर्वांचाच नाइलाज झाला.


प्रकृती सांभाळून अशी कामे चालू असताच, भाऊसाहेबांच्या मार्गदर्शनाने काही विधायक कार्यक्रमही सातारा जिल्हचात या काळी साकार होत होते. दुष्काळग्रस्त बंगालला १९४३ साली आपलेपणाने भरीव मदत करणारा सातारा जिल्हा आपल्याच जीवनाबद्दल बेफिकीर कसा राहील ? अन्नधान्याबाबतच्या सरकारी हुकूमातील सातारा, कुलाबा व रत्नागिरी जिल्हयाच्या कलेक्टरानी केलेल्या हुकमातील सत्तर टक्के लोकांच्या जीवनाबद्दलची बेफिकीरी कऱ्हाडचे बाबूराव गोखले यानी उघडकीस आणलीच होती. मग सातारा येथे सर्वपक्षीय बैठक होऊन रयतेच्या दुःखनिवारणार्थ " साठे--समिती " तयार झाली व भाऊराव पाटील यांच्या बहुजनसमाजातील जिव्हाळचामुळे सरकारी धोरणात लोकहित बुद्धीचे इष्ट फरकही थोडे फार झाले. तरी रासनची आणि वाटपाची दुकाने निघाल्यावरही रयतेच्या पोटाचे




आत्माराम पाटील; **भाऊसाहेब;** वीर नरीमन; विठ्ठलराव



दि. ब. मुथा; भाऊसाहेब; सरदार वल्लभभाई; व्यायामपटु गणपतराव;
तात्या साठे; शंकरराव देव. ( १९४० )



नगर वाचनालय सातारा– कार्यकारी मंडळ (१९३९)
खुर्चीवर डावीकडून ४ थे बाबूराव भिडे ५ भाऊसाहेब सोमण ६ तात्यासाहेब जोशी



अ. म. शा. शि. परिषद १९३९ खुले अधिवेशन– नवा राजवाडा दरबार

हाल चाललेच होते. लेव्हीच्या धान्य वसुलीच्या तक्रारी होतच होत्या. थंडीच्या कडाक्याने कोरेगाव तालुक्यातील पिके गेल्यामुळे तेथील लोकांचे हाल वाचविणे जरूर होते. या सर्व बाबतीत भाऊसाहेब सोमणानी लक्ष घालून लोकांची अपेष्टा शून्यप्राय करण्याचा व करवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. दुसऱ्याही एका गोष्टी-कडे भाऊसाहेबांचे लक्ष होते. याच कालात सातारा-रोड, ओगलेवाडी व किर्लो-स्करवाडी येथे मजूर संघटना धर धरू लागल्या होत्या. त्याबाबत खटपटी करणारे भाई विष्णुपंत चितळे यांचा दृष्टिकोन समजावून घेऊन देशी कारखानदारी बंद न पडण्याच्या दृष्टीने त्याना भाऊसाहेब सल्लामसलतही मधून मधून देत, पण त्यांच्या प्रयत्नातील विधायक भागाला पाठिंबाहि देत.

जिल्ह्याची जीवनकळा अशी चालली असता १९४५ सालात ग्रामसेवक म्हणून आपल्या जीवनाची सार्थकता मानणारे सुरलीचे गोविंदराव कुलकर्णी आणि परचुरेशास्त्री यांचे मृत्यू झाल्याने भाऊसाहेबांच्या अंतःकरणाला व्यथाच व्यथा झाल्या. पुढे सप्टेंबरमध्ये इस्लामपूरचे डॉ. भाऊराव वैद्य यांचा कैलासवास झाल्यावर, होमरूल-लीगच्या चळवळीतील आपला तो तरूण, उमदा व दमदार सहकारी आणि एक शीलवन्त, परोपकारी, कर्तव्यदक्ष नागरिक गेल्यामुळे भाऊ-साहेबांचे अंतःकरण हळहळले. सेवादलावर सरकारने सर्वस्वी बंदी घातल्यावर त्यांच्या मनाचे आवेग मर्यादेपलिकडे गेले. पण कापील येथे भरलेल्या सातारा जिल्ह्याच्या विद्यार्थी परिषदेतून, पुसेगावच्या कॉंग्रेसयुवक-परिषदेतून आणि इस्लामपूर येथील सातारा जिल्हा-शेतकरी-परिषदेतून जे ओघ प्रगट झाले, त्यातूनच भाऊसाहेबाना जिल्ह्याच्या उत्कर्ष-प्रकर्षाचे आशामय किरण दिसत होते व तेवढ्यानेच ते आपले समाधान करून घेत होते. १९४५ मध्ये महात्मा गांधींच्या आन्दोलकावर खटले आणि स्थानबद्धता चालूच होत्या. साताऱ्यात ब्रिटिश सरकारचे राज्यच नाही अशा समजुतीने स्त्रियावरही अत्याचार करणारे पोलीस-राज्य चालू होते. त्यामुळे शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ आणि महाराष्ट्रीय वृत्तपत्रसमिती समक्ष चौकशी करून वस्तुस्थिति जगापुढे मांडण्यास पुढे सरसावली. भाऊसाहेब सोमण याना चौकशीचे पूर्वी भेटून आणि आपल्या अवलोकनाचा अहवाल त्याना निवेदन करून मगच ती मंडळी भाऊसाहेबांच्या चिकित्सेनंतर आपले स्वतंत्र मत बनवीत. त्यानीही आन्दोलकांची नैतिक सूत्रे जगजाहीर केली आणि मग परकीय सत्तेला आपले खुलासे प्रगट करता करता पुरेवाट झाली.

साडेतीन वर्षांच्या अस्वस्थ पण ब्रिटिश सत्तेला नामोहरम करणाऱ्या या काळात, १९४५ साली मध्यवर्ती असेंब्लीसाठी कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून भाऊसाहेब हिरे, व काकासाहेब गाडगीळ याना जिल्ह्याने प्रचंड बहुमताने निवडून

दिले आणि परकीय सत्तेचे आव्हान यशस्वीरीतीने स्वीकारले; याचा आनंद भाऊसाहेबाना झाल्याशिवाय राहिला नाही. त्यातच सदर वर्ष काँग्रेसच्या हीरकमहोत्सवाचे असल्यामुळे, त्या उत्सवाचे समारंभ जिल्ह्यामध्ये जिव्हाळयाने झाले आणि त्यात आपल्याला भाग घेता आला याचेही भाऊसाहेबाना समाधानच समाधान झाले.

# १६ नवे राज्य, नवा साज.

काँग्रेसने १९३९ साली ब्रिटिश सरकारच्या युद्ध प्रयत्नापासून अलिप्तता स्वीकारण्यासाठी, सरकारची कारभारी सूत्रे खाली ठेवली. तेथपासून प्रांताच्या गव्हर्नरानी आपल्या हाती राज्यकारभार घेतला होता. कायदेमंडळे बंद ठेवली होती. १९३७ त निवडलेल्या कायदेमंडळांच्या फेरनिवडणुका व्हावयाच्या त्या काँग्रेसने सुरू केलेल्या आंदोलनामुळे सरकारने घडविल्याच नाहीत. मुंबई पुरतेच बोलायचे, तर १९३५ च्या कायद्याप्रमाणे गव्हर्नरसाहेबानी (असेंब्ली) विधानसभा बरखास्त केली होती, तर (कौन्सिल) विधान–परिषद बेमुदत बंद केली होती. १९४५ च्या मध्यावर, ही अप्रातिनिधिक राज्यकारभाराची घडी बदलण्याचे सरकारने ठरविले. हिटलर व त्याचा जर्मनी यांचा पराभव होऊन सर्व वातावरण मोकळे झाल्यावर, निवडणुकी घ्यावयाचे ठरले. मुंबई प्रांतात विधान-सभेच्या निवडणुकीची चक्रे फिरू लागली, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीच्या पार्लमेंटरी बोर्डाची निवडणूक झाली. सातारा जिल्ह्यातील नामवंत पुढारी व विधानपरिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब सोमण यांचे नाव पार्लमेंटरी बोर्डात आले. सातारा जिल्ह्यातून एकंदर नऊ प्रतिनिधी निवडून जावयाचे होते. काँग्रेसचे उमेदवार म्हणून कोणाची नावे मुक्रर करावी, याची भवति–न–भवति होऊ लागली. काँग्रेसचे "गुप्ते" आणि काँग्रेसचे सनदशीर चळवळे या दोघानाही आपापल्या–परी सूचना करावयाच्या होत्या. भाऊसाहेब सोमणानी याबाबात सर्वांचेच म्हणणे शान्तपणे ऐकून घेण्याचा क्रम सुरू केला. पार्लमेंटरी बोर्डाकडे अर्ज कोणी द्यावे याबद्दलही काँग्रेसजनात पुष्कळ खल झाला. "गुप्त्यां" चे प्रभावी मार्गदर्शक म्हणून काम केलेले सातारा जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष स्वामी रामानंद भारती यांच्या सल्लामसलतीने भाऊसाहेब या निवडीबाबत माहिती घेत होते. अनेक "गुप्ते" ही भाऊसाहेब सोमणाना अप्रगटरीत्या भेटत होते. या बाबीत लोकमत अजमाविण्याकरता स्वामी रामानंदानी वाळवे तालुक्यात साखराळ येथे सभाही घेतली होती. निरनिराळ्या बाजूनी प्रगट झालेल्या अशा इच्छा आकांक्षांचा नूर लक्ष्यात घेऊनच भाऊसाहेब सोमणानी पार्लमेंटरी बोर्डात मुख्यतः स्वामी रामानंदांच्या सल्ल्याने चिकित्सा करून सातारा जिल्ह्याचे उमेदवार कायम केले. भाऊसाहेब सोमण उमेदवाराची निवड करताना जे कस लावीत, ते आपणास मार्गदर्शक असत असे मत पार्लमेंटरी बोर्डावरील कित्येक सभासदानी पुढे प्रगटही केले. पार्लमेंटरी बोर्डाने मुक्रर केलेल्या काँग्रेसच्या उमेदवारापैकी आठ निवडून आले. दुर्दैवाने काँग्रेसला मुस्लीम सीट मिळाली नाही. १९४६ साली नवीन निवडून आलेल्या सभासदांचा शपथविधि होऊन काँग्रेसचे प्रधानमंडळ रीतसर कारभार करू लागले.

राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरता ज्यानी तळहातावर शिरे घेऊन अघोरी शिक्षा भोगावयास तयारी दाखविली, किंवा जे गुप्त राहून प्रतिसरकार स्थापण्याचा प्रयत्न करीत होते, ते सर्व अहिंसेचा सात्विक मार्ग सात्विकपणे आचरीत राहिले, असे शंभर टक्के कोणालाच म्हणता येण्यासारखे नव्हते. तरीही शूराची अहिंसा आचरणे ज्याना शक्य नव्हते, ते देशाकरताच धडपडले. हे जाणून त्यांच्यासुद्धा शिक्षा भोगत असलेले, अगर वॉरंटाचा ससेमिरा असलेले सगळे देशभक्त शांततामय आणि संथ जीवनासाठी बंधनमुक्त करणे हे काँग्रेस मंत्रिमंडळाचे कर्तव्यच होते. त्याप्रमाणे त्या सर्व देशभक्तावरील बंधने मंत्रिमंडळाने एक महिन्याच्या आत काढून टाकली. ता. ५ मे १९४६ रोजी सर्व शांतीचे आणि क्रांतीचे उपासक कोणेगाव ता. कराड येथे प्रगट झाले. त्यांचा सत्कार आणि त्यांच्या कार्याचा गौरव हजारो मुखानी जनतेने केला; आपण वनवासी–राम म्हणून नांदत असताना जनतेने आपल्याला वात्सल्याने सांभाळले याबद्दल त्या सर्व देशभक्तानी जनतेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नंतर त्यांचे कराड, सातारा वगैरे ठिकाणी जाहीर सत्कारही झाले. गुरुवार ता. ९ मे १९४६ रोजी सातारा येथे सर्व क्रांतिवीरांचा सत्कार भाऊसाहेब सोमण यांच्या अध्यक्षतेखाली झाला; त्या वेळी शिरवडे स्टेशन कामगिरीचे नायक सदाशिवराव पेंढारकर हे ता. १२ एप्रील रोजी म्हणजे अवघ्या एकच महिन्यापूर्वी दिवंगत झाल्यामुळे सर्वच क्रांतिवीराना चुकल्या–चुकल्या सारखे झाले ! डॉ. जीवराज मेहता यांचा वैद्यकीय सल्ला घेण्याची आणि त्या प्रमाणे औषधोपचार करण्याची खटपट करूनही आपल्याला सदाशिवराव पेंढारकराना बरे करण्याचे बाबतीत यश मिळाले नाही, याबद्दल भाऊसाहेब सोमण याना भर सभेतही अश्रु आवरले नाहीत. क्रांतिकारकावरील वॉरंटे रद्द करण्याचे बाबतीत मंत्रिमंडळ निर्णय घेत असतानाच 'चले जाव'च्या चळवळीतील ज्या देशभक्तांची खाजगी मिळकत जप्त केली असेल, अगर जेथे सामुदायिक दंड बसले असतील, त्यांच्या खाजगी मिळकती आणि तेथील दंड काँग्रेस मंत्रिमंडळाने परत करावेत असा पत्रव्यवहार भाऊसाहेब सोमणानी चालविला; त्यास एव्हाना काँग्रेस मंत्रिमंडळाची सहानुभूति आल्याकारणाने, भाऊसाहेबानी एक जाहीर पत्रक प्रसिद्ध करून (समर्थ सातारा ता. १२ मे १९४६) माहिती मागविली. माहिती-प्रमाणे ज्याची त्यास मिळकत मिळाली आणि सामुदायिक दंड परत झाले ते गावातील सार्वजनिक कार्याला उपयोग करण्याच्या शर्तीवर.

या १९४६ साली भाऊसाहेबाना दोन धक्के बसले. एकतर त्यांचे वर्गबंधू आण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचा मृत्यू घडला आणि आ. चंद्रोजीराव पाटलांचा खून झाला. त्या योगे आपल्या ७१ व्या वाढदिवसादिवशी लोक सत्कार करू चहात होते, तो त्यानी करू दिला नाही.

सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीचा फायदा घेऊन जी गुंडगिरी मूळ धरून बसली, तिचे निर्मूलन करण्यासाठी मुंबईचे गृहमंत्री मुरारजी देसाई आणि पंतप्रधान बाळासाहेब खेर यांचे दौरे सातारा जिल्ह्यात झाले, त्या दौऱ्यांचा सुपरिणाम थोडाफार दिसला तरी, गुंडगिरी बिमोड झाली नाही; याचे राहून-राहून सोमणाना वाईट वाटे, म्हणून सातारा येथे प्रांतिक सेवादलाचा अपूर्व मेळावा १९४७ साली मेजर शहानवाज यांच्या अध्यक्षतेखाली झाला असता, रावसाहेब पटवर्धन आणि भाऊसाहेब सोमण यानी तरुणाना स्वयंसंरक्षक व समाज-संरक्षक होण्याचा उपदेश केला. तरुणानी समाज-संरक्षणाची जबाबदारी घेतल्याशिवाय गुंडगिरी मुळापासून निपटून निघावयाची नाही, हे भाऊसाहेबांचे ठाम मत होते. शीलवंत तरुणानी समाजसंघटनेची जबाबदारी घ्यावी; असाच उपदेश सानेगुरुजीनी आपल्या दौऱ्यात सातारा जिल्ह्यातील तरुणाना त्या साली केला. त्या सदुपदेशाचा प्रकाश भाऊसाहेबाना उत्साह-वर्धक वाटला.

अशा मनाच्या प्रसन्नतेत भाऊसाहेब सोमण असतानाच, अखिल भारतीय राजकारणाची वाढ अशी झाली होती की, भारताचे स्वातंत्र्य दृष्टिपथात येत होते. १९४७ च्या फेब्रुवारीपासून तसा स्पष्ट ध्वनी राजकारणात उमटत होता. त्याचे पडसाद ऐकता ऐकताच प्रतोदकार वासुदेव दामोदर मुंडले ता. ७ फेब्रुवारी रोजी इहलोक सोडून गेले. या दुःखापेक्षाहि भारतीय स्वातंत्र्य सिद्ध होत असता अखंड भारताचे दुखंड होणार ही कल्पना दृढ होत गेली; तिचे दुःख अनेक विचारवंताप्रमाणे भाऊसाहेबाना विशेष झाले. तथापि कराचीपासून कलकत्त्यापर्यंत आणि केदारेश्वरापासून कन्याकुमारीपर्यंत इंग्रजी सत्ता अजिबात जात आहे, याच एका समाधानात, अपरिहार्यपणे का होईना, सर्वच देशभक्ताना रहावे लागले, तसेच सोमणानाही रहावे लागले. ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी समर्थाच्या विशेष अंकात दिलेल्या लेखात सोमण स्पष्टच म्हणतात की– " आजचा शुभदिन म्हणजे ज्या तरुणानी भारतवर्षाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक कष्ट सोसून आपल्या प्राणांच्या आहुत्या दिल्या, त्यांचे स्मरण करून त्याना वंदन करण्याचा आहे. पारतंत्र्य नाहीसे झाल्याने आपलेवरील जबाबदारी वाढली आहे. देशातील व्यक्तिमात्रावर येऊन पडलेल्या या जबाबदारीची जाणीव प्रत्येक हिंदवासीयाने लक्षात ठेविली पाहिजे. पूर्वीच्या गुलामगिरीत देशात जे भिन्न पक्ष निर्माण झाले व भारत वर्षात पूर्वी असलेल्या भिन्न जातींच्या लोकातील जातीभेदास जे जातीद्वेषाचे स्वरुप प्राप्त झाले, त्या दोषातून मुक्त होणे हे पहिले कर्तव्य आज प्रत्येकापुढे उभे ठाकले आहे. भिन्न भिन्न जातींच्या व धर्मांच्या या देशातील सर्व जनतेने एकरुप होऊन व एकजूट करून भारतवर्षाच्या गत वैभवाची छाप सर्व जगावर कोणत्या रीतीने बसविता येईल, याचा विचार प्रत्येकाने करणे जरूर आहे. पाकिस्तान व हिंदुस्थान असे

देशाचे दोन तुकडे पडले, तथापि या दोन तुकड्यांचे भिन्न स्वरूप चिरायु न होऊ देता पुन्हा भारत–वर्ष अखंड स्वरुपात कसा येईल, याचा विचार आजच्या शुभदिनप्रसंगी गंभीरतेने करणेस प्रत्येकाने सुरवात केली पाहिजे. "

"परकीय अंमलामुळे हिंदुस्थानावर आलेले दारिद्र्याचे संकट कसे निवारण होईल व या देशातील प्रत्येक लहान–मोठ्या नागरिकास शिक्षणद्वारा व सांपत्तिक दृष्ट्या आपला पूर्ण विकास करून, देशात समता कशी निर्माण होईल या गोष्टी–बद्दल आज आपल्या पुढाऱ्याना चिंता लागून राहिली आहे. एक उच्च एक नीच, एक शिक्षित एक अशिक्षित, एक श्रीमंत एक गरीब, यामुळेच प्रत्येक ठिकाणी स्वार्थाचा पगडा दिसून येतो. या स्वार्थबुद्धीचा त्याग करून सर्व वर्गास एका सामान्य पातळीवर आणणे व समानतेने वागविणे हेच प्रत्येकाचे प्रथम–कर्तव्य ठरते. या दिशेने प्रयत्न केल्यास सर्व जनतेची अंतःकरणे खरी मुक्त होऊन देशातील प्रत्येक व्यक्तीस सुख लागेल. "


सातारा जिल्ह्यातील जनतेला असे मार्गदर्शन करणाऱ्या सोमणाना नव्या पिढीतील न. वा. लिमये यानी आपल्या स्वातंत्र्य अंकात असे अभिवादन केले आहे की, "सातारा जिल्ह्याचा राजकीय इतिहास लिहावा तर, लोकप्रिय भाऊसाहेब सोमण यांचे अबोल जीवन–चरित्र लिहावे. राजकीय लढ्यात सदैव आघाडीवर असणाऱ्या या जिल्ह्याच्या कर्तबगारीची बैठक ज्या काही मोजक्या व्यक्तींच्या जीवनावर आधारलेली आहे, त्यात भाऊसाहेब सोमण प्रमुख आहेत."

भाऊसाहेब सोमणाना आपण सार्वजनिक चळवळीत पडल्याचा आणि "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे; आणि मी तो मिळवीनच" हा मंत्र राष्ट्राला देणाऱ्या टिळकांचा अनुयायी झाल्याचा खरा आनंद १५ ऑगस्ट १९४७ रोजी झाला. भारताच्या पुनर्रचनेसंबंधी आपणावर पडणारी कर्तव्ये आपण आपल्या प्रकृतीची तमा न करता पार पाडली पाहिजेत, असा निश्चय त्या आनंदामुळेच त्यानी केला. भारत स्वतंत्र झाल्यावर भारताच्या सर्वच राज्यांचे राज्यपाल (गव्हर्नर) भारतीय नेमले गेले. १९३७ साली मुंबई विधान–परिषदेचे अध्यक्ष झालेले ना. पक्वासा हे मध्यप्रदेशाचे राज्यपाल म्हणून गेल्यामुळे भाऊसाहेब सोमणाना विधान–परिषदेचे अध्यक्ष एकमताने निवडले. त्यानी ती जबाबदारी लोकमताला मान देऊन पत्करली. भारतीय जीवनाला उच्चता आणण्याचे दृष्टीने कायदेकानू बनविण्यापासून लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्या–पर्यंत आणि सामाजिक नीतिमत्ता सोज्वल करण्यापर्यंत काय काय करता येईल, या विचारात सातारा जिल्ह्याचे देशभक्त असता, एकाएकी आमदार के. डी. पाटील यांचा खून झाल्याची वार्ता एक दिवस कानावर आदळली. विधिमंडळाच्या बैठकी

त्यावेळेस चालू होत्या. आपण लोकप्रतिनिधी व्हावयास ज्याना लायक ठरविले आणि लोकानी मते देऊन ज्याना मान्यता दिली, त्यापैकी गणपतराव तपासे उद्योगमंत्री होऊन आणि यशवंतरावजी चव्हाण गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी होऊन, प्रत्यक्ष राज्यकारभाराची काही सूत्रे हालवीत आहेत आणि इतर आमदार मंडळी सातारा जिल्ह्याची दुःखे व अडचणी यांचा परिहार करून घेत आहेत, असे दृश्य पहात रहाणाऱ्या सोमणाना, बहुजनसमाजाच्या प्राथमिक शिक्षणासाठी तळमळीने झटणाऱ्या के. डी. पाटलांचा खून झाल्याचे ऐकून केवढा चटका लागला असेल, याची कल्पनाच केलेली बरी ! !

सार्वजनिक जीवनातील असे प्रसंग सहन करीत करीतच आपले नियोजित आणि परिस्थिति–प्राप्त–कर्तव्य लोकसेवकाना करावे लागते. भाऊसाहेब सोमणानाही तसेच करावे लागले. गृहखात्याच्या दक्षतेने पुढे चंद्रोजीराव पाटलांचे व के. डी. पाटलांचे खुनी शिक्षा पावले. दरम्यान विधिमंडळाची कामे काय चालावयाची ती चालली. १९४७ च्या अखेरी–अखेरीस पाकिस्तान आणि हिंदुस्थान यांच्यामध्ये पंचावन्न कोटी रुपयांच्या देवाणाचा प्रश्न उपस्थित झाला. महात्मा गांधीनी त्याबाबत निश्चयात्मक मत देताच त्यांच्याबद्दल काही तरूण मेंदु पिसाट झाले. मतभेद प्रगट होतच होते. तरीही हिंदुस्थान सरकारने महात्माजींच्या शब्दाला मान देऊन पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये दिले. या घटनेने बहकलेल्या एका तरुणाने दिल्ली येथील महात्माजींच्या प्रार्थना–सभेच्या आरंभीच ता. ३० जानेवारी १९४८ रोजी महात्माजींच्यावर गोळी झाडली ! ! ! या अपकृत्याने जगाला धक्का बसला. मानवी जीवनाची उंची नैतिकदृष्टचा वाढविणाऱ्या विसाव्या शतकातील ख्रिस्ताचा तो अंत होता. त्याने जग हादरले. भारताचा राष्ट्रपिताच गेला. त्याच्या त्यावेळच्या भावना व्यक्त करण्याचे सामर्थ्य शब्दात नाही. साताऱ्यासही सर्व जनता शोक-सागरात बुडून गेली. भाऊसाहेब सोमण या वेळी साताऱ्यात होते. त्याना मेल्यापेक्षा मेल्यासारखे झाले. कारण महात्माजी–सारख्या जागतिक विभूतीचा शेवट करणारा तरुण महाराष्ट्रीय होता. लोकमान्य टिळकांच्या महाराष्ट्रात असा अविचाराने बहकलेला तरुण निपजावा, ही पुढे भाऊसाहेबांच्या अंतःकरणाची व्यथा शेवटपर्यंत होती. त्यामुळे ता. ३० जानेवारीच्या रात्रीच्या सभेत भाऊसाहेबानी आपले अंतःकरण मोकळे केले. विधान-परिषदेचे अध्यक्ष म्हणून महात्माजींच्यासंबंधी आपले पदानुषंगिक कर्तव्य करण्यासाठी, ते दुसरे दिवशी सकाळी मुंबईकडे रवाना झाले. साताऱ्यास त्यावेळेस मराठी–पत्रकार–परिषदेचे आठवे अधिवेशन भरावयाचे होते, ते राष्ट्रीय आपत्तिमुळे अर्थातच महात्माजींच्याबद्दल दुःखवटचाचा ठराव करून बेमुदत स्थगित झाले. आणि सातारा जिल्हाही महात्माजींच्या संबंधीच्या आपल्या कर्तव्यास लागला.

महात्माजींच्या रक्षाविसर्जनादिवशी भाऊसाहेब नाशिकास गेले होते, तेथील रामकुंडावर त्यानी महात्माजीना आपली श्रद्धांजली वाहिली. इकडे सातारा जिल्ह्यातही तितक्याच पवित्र भावनेने तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी जनतेने भजनपूर्वक श्रद्धांजली वाहिली. महात्माजींच्या मृत्यूनंतरचे दहा दिवसातही ठिकठिकाणी महात्माजीना सभासभातून श्रद्धांजल्या गावोगाव वाहण्यात आल्या. श्रद्धाळु, सात्विक आणि विचारी जनता आपल्या विदीर्ण अंतःकरणाचे आवेग अशा तऱ्हेने आवरत होती. पण समाजात महात्मा गांधींचा खून झाला म्हणून अंगाचा तिळपापड झालेलेही महाभाग होते. त्याना महात्माजींच्या खुनाचा बदला घेतलाच पाहिजे, या भावनेने वेडे केले. पुण्यामुंबईला तसल्या माणसानी कायदा हातात घेतला, हे वृत्तपत्रातून वाचल्यावर, सातारा जिल्ह्यात त्याचे अनुकरण व्हावयास चुकले नाही. ता. १ फेब्रुवारीपासून त्या प्रक्षोभाच्या आविष्काराला सुरवात झाली. महात्मा गांधींचा खुनी "राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून" वाढलेला, हिंदुमहासभेचा प्रचारक, सावरकरांचा चाहता, जातीने ब्राम्हण; तेव्हा त्यांच्यावरच संतापाचा पहिला भर उसळला. जातीय प्रवृत्तीची मुळेच खुडून टाकण्याची महत्त्वाकांक्षा पेट घेऊन बसली. जातीय संस्थांचा अभिमान बाळगणाऱ्या मंडळीना बाहेर तोंड काढण्याची सोय उरली नाही. एवढ्या बहिष्कारानेच भागले नाही. त्यांची चीजवस्त आणि घरेच्या घरे अग्नीच्या भक्षस्थानी पडू लागली. कऱ्हाड आणि त्याच्या भोवतालच्या दहा मैलांच्या त्रिज्येतील टापूत असले अत्याचार घडले नाहीत; तरी सर्व जिल्हाभर आगी धगधगल्या. महात्माजींचा खुनी आडनावाने गोडसे होता. तेव्हा त्या आडनावाच्या एका ब्राम्हण कुटुंबाच्या तीन पिढ्यांचे तीन पुरुष उभे जाळण्यात आले. वडूज येथील एक प्रसूतिगृह अग्नीच्या भक्षस्थानी पडले. सांगली येथील कापडाची मोठी गिरणी व लिंब येथील लहान गिरणी भस्मसात झाली. या सगळ्या अनाचारात बळी पडत होते, त्यांच्या पक्षोपपक्षाबद्दल, धर्माबद्दल अगर जातीबद्दल विवेक नव्हता. लाखो रुपयांचे वाडे जळाले आणि ऐतिहासिक महत्त्वाचे कागदपत्र खाक झाले! पाकिस्तानच्या निर्मितीमुळे भारतात लोटलेल्या निर्वासितांच्या लोंढ्यापेक्षा, गावोगाव आपल्याच मायभूमीत झालेल्या निर्वासितांचे हलकल्लोळ ठिकठिकाणी ऐकू येऊ लागले! महात्माजींच्या प्रेमामुळेच काही मंडळी अशी संतापाने बेफाम झाली असली तरी, काही स्वार्थ्यांनी आपले खाजगी सूडही या धांदलीत उगवून घेतले. कीर्तनाला जमणाऱ्यात जसे जोडेचोर भेटतात, तसे भूमिगत राहून क्रांतिकारकांच्या चळवळी चालल्या असताना, जातीवन्त गुन्हेगार व गुंड "आपले साधून" घेतात, हा सातारा जिल्ह्याला अनुभव पूर्वीचाच होता. त्याचीच यावेळी पुष्कळ पुनरावृत्ति झाली. महात्मा गांधींच्या भक्तीने काही लोकाना त्यांच्या खुनाचा बदला घ्यावासा वाटला तो अत्याचाराने, याबद्दल



प्राथमिक शिक्षक स्नेह–संमेलन. वाई. सन १९२४

खुर्चीवर बसलेले– मध्यभागी भाऊसाहेब त्यांचे उजवेबाजूस बापूसाहेब काथवटे व डावे बाजूस बाळासाहेब साठे.

विचारवन्तांची अंतःकरणे विव्हळ होत होती; त्यात गुंडगिरीच्या आकांडतांडवाने त्या अंतःकरणाना काय झाले असेल ! ! ! अनत्याचाराचा, अहिंसेचा, हृदय परिवर्तनाचा तपोनिधी उभारणाऱ्या महात्मा गांधींच्या भक्तीच्या नावाखाली हा सर्व प्रकार होत असल्यामुळे, तो थांबविण्यासाठी काँग्रेसच्या, महात्मा गांधींच्या आणि शांतिब्रह्माच्या उपासकानी आपल्या प्रयत्नांची पराकाष्टा केली. काँग्रेसचे मंत्रिमंडळ त्याना साथ द्यावयास पुढे आले. गुंड प्रवृत्तीच्या आणि अत्याचाराच्या उत्तेजकाना व दंगेखोराना बन्दिवास घडू लागला आणि हद्दपारीची पाळी येऊ लागली.

याचवेळी भाऊसाहेब सोमणानी मंत्रिमंडळास आपल्या अनुभवाचा पोक्त सल्ला दिला. महात्माजींच्या प्रेमाने वेडे होऊन त्यांच्या खुनाचा बदला घेण्याच्या मोहात ज्यांचे हातून अत्याचार–अनाचार घडले, त्याना आपल्या हातून महात्मा–जींच्या तत्त्वप्रणालीला व शिकवणीला बट्टा लागला, अशा जाणीवेने खरोखरच पश्चाताप होत असेल तर, त्याना एकवार माफी मिळावी, अशा अर्थाचा तो सल्ला होता, समाजात मिसळून काम करणाऱ्या ठिकठिकाणच्या अनुभविकांचा तसाच सल्ला होता. सरकार त्याच्याही पुढे गेले. सरकारने "पश्चात्तप्ताना माफी" जाहीर केली. त्याप्रमाणे अनेकानी माफी मागितली. ते आपापल्या संथ जीवनाला मोकळे झाले. बहुजनसमाजाचे प्रतिनिधि असलेल्या काँग्रेस सरकारला ज्या निष्पाप अल्पसंख्याकावर व विशेषतः त्यातील " विधवावर आणि अज्ञानावर " घडलेल्या अत्याचारानी विनाकारण अन्याय झाला असे आढळून आले, त्याना जीवनाचा मार्ग सुगम करण्यासाठी सरकारी खजिन्यातून आर्थिक मदत करणे आवश्यक वाटले. अगदीच निराश्रित झालेल्या व होरपळलेल्या पण एरवी सरळमार्गी असलेल्या रयताना घरबांधणीस जंगलातील लाकूडही सरकारने दिले. आगीच्या आपत्तीत सापडलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्याना त्यांचे शिक्षण पुरे करण्याकरिता फीची माफी दिली. तथापि सरकारने उदारपणे देऊ केलेली अशी मदतही तोकडी पडत होती. हे लक्षात आल्यावर भाऊसाहेब सोमणानी आपला डेक्कनरिलीफ-फंड सुरू केला. कूपर इंजिनिअ-रिंग वर्क्सच्या लालचंदशेटपासून मुंबईचे राज्यपाल महाराजासिंग यांच्यापर्यंत सर्व मातब-र मंडळीनी भाऊसाहेबानी उभारलेल्या त्या फंडास मदत केल्यामुळे, तो पंचवीस हजार रुपये जमला. अगदी ज्यांच्या घरांची धर्मशाळाच झाली होती, अशा बेळगाव–विजापूर कडील, आजच्या दक्षिण आणि उत्तर साताऱ्यातील, कुलाबा जिल्ह्यातील आणि रत्नागिरी कडील, ब्राह्मण, मुसलमान, हरिजन मंडळीना ती मदत त्यांच्या त्यांच्या भागातील विश्वासाच्या मंडळी–मार्फत भाऊसाहेब सोमणानी स्वता जाऊन, अगर एम्. डी. कुलकर्णी व बुवासाहेब गोसावी यांना समक्ष पाठवून वाटली.

खेड्यापाड्यातून उध्वस्त झालेल्या ब्राह्मण कुटुंबानी सुरक्षिततेकरता शहरातून वसाहती कराव्यात, असा सल्ला एका जाहीर पत्रकाद्वारे १९४८ च्या मार्च महिन्याचे प्रारंभात आण्णासाहेब भोपटकर यानी दिला होता. तेव्हा ता. ११ मार्च १९४८ रोजी भाऊसाहेब सोमणानी पत्रक प्रसिद्धिले की, " मी एक नम्र काँग्रेस अनुयायी व दक्षिण मराठी प्रदेशाचा अनेक वर्षांचा रहिवासी या नात्याने सांगतो की भोपटकरांचे 'ब्राह्मणानी शहराशहरातून आपल्या निराळ्या वसाहती कराव्यात,' हे मत मला पसंत नाही. या प्रदेशातील समाज–जीवनाचा मला प्रत्यक्ष अनुभव आहे. ब्राह्मण कुटुंबानी खेड्यातील आपली घरेदारे सोडावी ही कल्पना मला साफ अमान्य आहे. या विचारसरणीमागे सांस्कृतिक, स्वतंत्र गट बनविण्याची कल्पना आहे. अशी फुटीर वृत्ति हिंदी राष्ट्रीय जीवनाला अपायकारक म्हणून टाकून दिली पाहिजे. हिंदी राष्ट्राचा दिव्य भूतकाळ आणि उज्ज्वल भविष्यकाळ याना ती विरोधी आहे. अशा तऱ्हेच्या हानिकारक कल्पनापासून समाजाला दूर ठेवणे हेच प्रत्येक विचारी माणसाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. पूर्वीप्रमाणे सामाजिक जीवनात पूर्ण एकोपा राहणे हेच अत्यंत इष्ट आहे. अशा प्रयत्नाना पूर्ण सहकार्य देण्याची मी सर्वांना कळकळीची विनंती करतो. " समाजातील निरनिराळ्या घटकानी परस्पराशी सहकाराने वागून स्वतंत्र भारताच्या एकजिनसी बांधणीला कायावाचामनाने मदतच केली पाहिजे, संकटानी किंवा आपापसातील भेदभावानी जीवनाच्या मुख्य ध्येयावरील लक्ष चळता कामा नये, यावर भाऊसाहेब सोमणांचा कटाक्ष होता.

मुंबईहून भाऊसाहेब सोमण मे महिन्यात साताऱ्याकडे आले. जूनच्या प्रारंभी ते सांगलीकडे गेले असता, ता. ९ रोजी त्याना सांगली–नगरपालिकेने मानपत्र दिले. त्याला उत्तर देताना भाऊसाहेब सोमणानी मार्गदर्शन केले की– " परकीय राजवटीत नगराध्यक्ष व सभासदाना आणि स्थानिक–स्वराज्यसंस्थाना नाममात्र स्वातंत्र्य होते. १५ ऑगस्टपासून स्वातंत्र्य आले, याचा सभासदावर निराळा संस्कार झाला पाहिजे. सभासदावर पूर्वीपेक्षा जबाबदारी वाढली आहे. स्थानिक स्वराज्य–संस्था या आज मुंबई सरकारशी एकरूप आहेत. या संस्थांच्या कार्याची जबाबदारी मर्यादित असली तरी, तीच व्यवस्थित उचलली तर, मुंबई सरकारचा भार कमी होईल. स्वातंत्र्यानंतर सर्व पक्ष व उपपक्ष जाऊन सगळ्या सभासदांचा एकच पक्ष झाला पाहिजे. म्हणजे प्रत्येक सभासदाने एकाच ध्येयाने वागण्यास तत्पर राहिले पाहिजे. नगरपालिकेच्या ज्या कामाकरता ज्या रकमा नियोजित असतील, त्या रकमांचा त्या कामाकरता योग्य उपयोग होतो की नाही, यासाठी त्यांच्यावर देखरेख करणारी बाहेरची संस्था असली की, योजना पूर्ण व व्यवस्थित होते. सांगलीचे सांस्कृतिक-जीवन व नागरिक-जीवन उच्च प्रकारचे आहे. नागरिकाना नागरिकत्वाच्या कर्तव्याची जबाबदारी दाखवून देणे हे स्थानिक–स्वराज्य–संस्थांचे काम आहे. "

अशा तऱ्हेने लोकाना आपल्या जबाबदारीची जाणीव भाऊसाहेब सोमण देत होते; त्यावेळीच सातारा जिल्ह्यात शेतकरी-परिषदाही भरत होत्या, त्यातून प्रगट होणारी कार्यप्रवृत्ति भाऊसाहेबाना आनंदवीत होती.

१९४९ साली दक्षिण व उत्तर साताऱ्यांची निर्मिति मुंबई सरकारने कार-भाराच्या सोयीसाठी केली, तरी पण लोकांतील मूळचा जिव्हाळा कायमच राहिला. महाबळेश्वर येथे महाराष्ट्र कार्यकर्त्यांचे शिबिर झाले. त्यानंतर २० नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे सरसेनापति जनरल करिआप्पा यानी साताऱच्या मुक्त सैनिकाना भेट दिली. त्यावेळी पंधरा हजारांचा समुदाय उत्साहाने जमला होता. सरसेनापतीना स्थानिक-स्वराज्य-संस्थांची मानपत्रे झाली. लोकलबोर्डाच्या मानपत्रात अध्यक्ष बाळासाहेब देसाई यानी जिल्ह्यातील घरटी एक सैनिक स्वातंत्र्य-रक्षणासाठी येण्यास तयार आहे, असे आश्वासन देऊन, सातारा जिल्ह्याच्या बहुत दिवसांच्या लष्करी शाळेच्या मागणीचा उल्लेख केला. १९२९ सालापासून सातारा जिल्हा अशी मागणी करीत होता. १९३१ साली पं. मदनमोहन मालवीय सातारा जिल्ह्यात दौऱ्यावर असता, ते भाऊसाहेब सोमण यांच्याकडे उतरले होते. त्याना दिल्लीस असलेल्या दादासाहेब करंदीकरानी तार करून "साताऱ्यास लष्करी शाळा उघडण्याची आवश्यकता आपण लोकांच्या मनावर ठसवा" अशी विनंती केली होती. त्याप्रमाणे पंडित मालवीयानी केले. साताऱ्याला 'इंडियन सँढर्स्ट' निर्माण करावे, असा ठरावही पास झाला होता. १९३९ साली स्थापन झालेल्या रायफल क्लबचे उपाध्यक्ष होऊन, भाऊसाहेबाना लष्करी शाळेबद्दलच मुख्यत: खटपट करा-वयाची होती. महाबळेश्वरच्या शिबिरानंतर करिआप्पांच्या आगमन-प्रसंगी बाळा-साहेब देसाईनी केलेली मागणी, ही भाऊसाहेबाना सहजक्रमाची वाटली. पारतंत्र्याची अस्पष्ट कल्पना, राष्ट्रहानीची स्पष्ट कल्पना, अर्ज-शिष्ट-मंडळाच्याद्वारा राजकीय सुधारणा मिळविण्याचे प्रयत्न, विधिमंडळातील सनदशीर चळवळ, प्रतियोगी सहकार, स्वदेशी आणि बहिष्कार, गुप्त-मंडळचा आणि सक्रिय प्रतिकार अशी सप्तपदी चालून झाल्यावर, भारताने स्वाभिमानपूर्वक सत्याग्रहाच्या जोरावर जे स्वातंत्र्य कमावले, त्याच्या संरक्षणासाठी देशातील तरुणानी सज्ज राहणे कर्तव्यप्राप्त आहे; या दृष्टीने लष्करी-शाळेची केलेली मागणी योग्य व सुसंगतच होती, म्हणून भाऊसाहेबानी त्या मागणीबद्दल सातारा जिल्ह्याची व बाळासाहेब देसाई यांची समक्ष पाठ थोपटली. सरसेनापतीनीही सदर गोष्टीस आपल्या भाषणाने उत्तेजन दिले. "सैन्य हे लष्करी वा बिन्‌लष्करी जमातीवर अवलंबून नसून देशातील प्रत्येक तरुणाच्या मनात जी राष्ट्रियत्वाची जाणीव असते, त्या जाणी-वेनेच, सैन्य राष्ट्रासाठी तळहातावर शिर घेऊन लढते. परतंत्र काळात जमातीच्या नावावर पलटणी उभारीत, तो जमाना आता बदलला आहे; जातीभेदातीत

राज्यचक्र आता भारतात उभे आहे, लोकसेनेला शिस्त व संघटनेचे शिक्षण मिळत असल्यामुळे सैनिक आदर्श नागरिक बनले पाहिजेत; ते घरी जातील, खेड्यात जातील, तेव्हा त्यांच्या वागणुकीने इष्ट परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाही. ''

न्यू इंग्लिश स्कूल सातारा यासंस्थेची स्थापना ६ डिसेम्बर १८९९ रोजी सीतारामपंत देवधर याना प्रमुखाध्यापक करून डेक्कन एज्युकेशन सोसायटीने केली. त्या वेळी भाऊसाहेब काही दिवस त्यासंस्थेचे शिक्षक म्हणून होते. त्या वेळेपासूनच त्यासंस्थेबद्दल भाऊसाहेबाना आत्मियता वाटत होती. भाऊसाहेबांच्या राजकीय मतामुळे त्या संस्थेच्या स्थानिक सल्लागार मंडळावर जरी त्यांची नेमणूक झाली नव्हती तरी त्या शाळेच्या प्रमुखाध्यापकाना शाळेच्या अनेक बिकट प्रसंगी योग्य सल्ला ते देत आले व शाळेच्या हरएक बाबतीत त्यांचा सल्ला मार्गदर्शक होत असे. डे. ए. सोसायटीच्या कौन्सिलचे ते सभासद होते. ६ डिसेम्बर १९४९ रोजी त्या शाळेचा सुवर्ण–महोत्सव पंतप्रधान नामदार बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षत्वाखाली मोठ्या वैभवाने साजरा झाला. त्यावेळी आरंभीच्या स्वागताच्या आपल्या भाषणात संस्थेच्या बहुमोल कामगिरीबद्दल, त्यातील तळमळीच्या कुशल सेवकाबद्दल, त्यानी धन्योद्‌गार काढून संस्थेच्या प्रगतीबद्दल आनंद व्यक्त केला. सातारा जिल्ह्यातील सर्वात मोठी नमुनेदार शाळा म्हणून शाळेचा लौकिक होण्याला ज्या निष्ठावंत शिक्षकांचे परिश्रम कारणीभूत झाले त्यात शंभुराव आठल्ये, गोविंदराव दीक्षित, नानासाहेब भाटे या सारखे त्यांचे बाळपणचे अनेक सवंगडी व मित्र होते.

९ डिसेंबर १९४६ पासून स्वतंत्र भारताची घटना निश्चित करण्याकरिता अखिल भारतातील जनतेच्या विचारवंत पुढारी–मुत्सद्यानी दोन वर्षे अकरा महिने सतरा दिवस पर्यंतच्या अवधीत अकरा बैठकी घेऊन डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षत्वाखाली व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या खंद्या घटनातज्ञ मुत्सद्याच्या मार्गदर्शनाने भारतीय गणराज्याकरिता घटना तयार करून तिला मंजुरी दिली. ही घटना २६ जानेवारी १९५० पासून भारतीय गण–राज्यात सामील झालेल्या सर्व प्रांताना व घटक राज्याना लागू केल्याचे जाहीर होऊन, भारतात सार्वभौम प्रजासत्ताक राज्य–कारभार सुरू झाला. भारताच्या इतिहासातील सुवर्णाक्षरानी लिहिला जाणाऱ्या या प्रसंगाने भाऊसाहेबांच्या अंतःकरणाला कृतार्थतेच्या आनंदाने भारावून सोडले असल्यास नवल नाही. लोकशाहीच्या खऱ्या अनिर्बंध राज्यकारभारास सुरवात होत असताना भारताच्या विकासास, कल्याण–कारक राज्यकारभारास, एकजुटीने, निःस्वार्थवृत्तीने भारतीय सुपुत्रानी लागले पाहिजे, या जबाबदारीची जाणीव भाऊसाहेबाना तीव्रतेने वाटू लागली. सार्वभौम गणराज्यातील

नागरिकास समता, व्यक्तिस्वातंत्र्य, सांस्कृतिक, राजकीय वगैरे हक्क मिळाल्यामुळे ते पेलण्यास लागणारी आमजनतेच्या मनाची तयारी करण्याचे काम तरुण सुशिक्षित भारतीयावर पडणार असल्याकारणाने त्यांची तशा रीतीची तयारी करण्यास सर्व सुबुद्ध पुढाऱ्यानी अहर्निश झटले पाहिजे, असे विचार त्यांच्या मनात सदैव खेळू लागले.

सातारच्या छत्रपती शाहू राजांच्या अपघाती मृत्यूची बातमी २० मार्च १९५० रोजी ऐकून त्यांच्या मनांत विषण्णता उत्पन्न झाली. महायुद्धाच्या काळात सैन्यभरतीकरिता छत्रपतीनी खटपट केल्याकारणाने प्रथम दर्जाच्या सरदारांच्या दर्जातून त्याना 'राजे' हा किताब मिळाल्यामुळे संतोषजनक वातावरण निर्माण झाले होते. साताऱ्यातील जनता मात्र त्याना छत्रपती या उच्च हुद्यानेच संबोधित असते.

काँग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्यापैकी डॉ. वा. वि. आठल्ये यांच्या ६१ व्या वाढदिवशी झालेल्या समारंभाचे वेळी भाऊसाहेब २२ ऑगस्ट १९५० रोजी जातीने हजर राहून त्यांनी गौरवपरभाषणाने त्यांचे अभिष्ट चिंतन केले. डॉ. मामासाहेब आठल्ये हे भाऊसाहेबांचे कुटुंबीय वैद्यक सल्लागार असल्यामुळे परस्परांचे जिव्हाळ्याचे ऋणानुबंध अनेकवर्षे सातत्याने वृद्धिंगत होत राहिले.

भाऊसाहेबांच्या विद्यार्जनाच्या समाप्तिकाळाचे वेळी ज्यांच्या लेखानी त्यांच्या मेंदूला बेचैन केले व अंतर्मुख आत्मनिरीक्षणाने लोकसेवेच्या कल्पना त्यांच्या अंतःकरणात निश्चित होण्यास मदत झाली ते, योगेश्वर अरविंदबाबू ३ डिसेंबर रोजी समाधिस्त झाल्याचे वृत्त ऐकून भाऊसाहेबाना आपले राजकीय गुरु नाहीसे झाल्याने परमदुःख झाले. अरविंदांचे आध्यात्मिक गुरुजी परमहंस विष्णुपंत लेले यांचे पाय आपल्या घरास लागल्याचे त्याना समाधान लाभत होतेच. अरविंदांच्या अनेक राष्ट्रिय विचारप्रवर्तक भारदस्त लेखानी भाऊसाहेबांच्या तारुण्यातील भावना भारावून गेल्या होत्या व त्यांच्याबद्दल नितांत आदर त्यांच्या अंतःकरणात ठाव देऊन राहिला होता. राजकारणातून अरविंदबाबूनी जरी संन्यास घेतला तरी, त्यांचे शेवटकाळपर्यंतचे मानव्याच्या कल्याणास चिरकाल पोषक असे विचार भाऊसाहेबाना अमृतवाणीप्रमाणेच वाटत. योगी अरविंदांच्या निधनामुळे भारताचाच नव्हे तर सर्व जगताचा एक तळमळीचा ऋषितुल्य गुरु नाहीसा झाला, असे त्याना वाटत होते. परंतु याहीपेक्षा १५ डिसेंबर रोजी सरदार वल्लभभाईंच्या स्वर्गवासामुळे भाऊसाहेबाना फारच मोठा आघात झाला. ब्रिटिशांच्या नानातऱ्हेच्या कारवायाना मोठ्या चातुराईने सरदारानी हाणून पाडले. भारतातून आपला पाय काढून

घेताना त्यानी संस्थानाच्यावरील आपले सार्वभौमत्व सोडून दिल्याकारणाने भारतीय गण–राज्याला हा संस्थानांचा प्रश्न सोडविण्याचे दृष्टीने मोठचा कणखर मुत्सद्याची जरुरी होती. सरदार वल्लभभाईनी सुमारे ७०० स्वतंत्र संस्थानाना मोठचा धीरोदात्त व बेडर धोरणाने भारतीय गणराज्यात विलीन व्हावयास लावून भारतीय गणराज्याची अनुपमेय सेवा केली. भारत हा एक सुसंघटित देश बनविण्यास सरदार वल्लभभाई पटेलानी अतुलनीय परिश्रम घेतले व भारताचा लौकिक सर्व जगतात पसरविला. अशा या थोर पुरुषाच्या निधनामुळे स्वतंत्र भारताचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले, असे भाऊसाहेबाना अनेक देश-बांधवाप्रमाणे वाटले.

१९५१ साली ता. ९ एप्रिल रोजी कराडचे दानशूर पांडुआण्णा शिराळकर यांचा कैलासवास झाला. त्यांच्या स्मशानयात्रेला भाऊसाहेब मुद्दाम हजर राहिले; त्यावेळच्या त्यांच्या गद्‌गद्‌लेल्या अंतःकारणावर एक प्रकारची विषण्णतेची छाया होती. आपल्यापेक्षा सहाच महिन्यानी वडील असलेले पांडुआण्णा देवाधीन झाल्याने आपणही आपल्या मनाची तयारी आता केली पाहिजे, अशी चमक त्यांच्या बुद्धि–वर उमटली. तथापि आपण कर्मयोगी टिळकांच्या महाराष्ट्रात रहातो आणि आपले एकवेळचे गुरु विमामहर्षि आण्णासाहेब चिरमुले यांची आचरण–शीलता डोळचापुढे आणून भाऊसाहेब आपले प्राप्त–कर्तव्य करीतच होते. सातान्यास झालेल्या ग्रामपंचायतींच्या सेक्रेटरी–वर्गाचे उद्‌घाटन त्यानी त्या साली ग्रामोद्धाराच्या कळकळीने केले. त्याच साली सोमनाथाच्या प्रतिष्ठापनेसाठी स्वामी केवलानंद, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रौताचार्य बापट या सातारा जिल्ह्यातील विद्वानाना पुढाकार मिळाला, या योगे भाऊसाहेबाना एक प्रकारचा अभिमान वाटला. पातंजल–योग–दर्शनकार बाबा कोल्हटकर यांच्या सत्काराने भाऊसाहेबांचे अन्तःकरण आनंदाने फुलले. पण विमा–महर्षींच्या कैलासवासाने भाऊसाहेब दुःखित झाले. अशाही स्थितीत ते विधान–परिषदेच्या अध्यक्षाचे काम मन लावून करीतच होते.

१९४७ साली विधान–परिषदेचे अध्यक्ष झाल्या पासून त्यानी आपले काम सर्व पक्षियाना राजी राखून लोकसेवा बुद्धिनेच केले होते. १९४६ सालापासून प्राथमिक शिक्षकांच्या जीवन–वेतनाचा आणि प्रतिष्ठेचा उभा राहिलेला प्रश्न, आयुर्वेद–वैद्यक–बोर्डाच्या निवडणुकीबाबत आयुर्वेदाचार्यावर अन्याय होऊ नये म्हणून चाललेल्या खटपटी, सातारा जिल्ह्यात आणि इतरत्र चाललेले अनाचार आणि त्याना आळा घालावयास अपुरे पडलेले पोलीस, त्यांच्याबाबतच्या तक्रारी, तात्पर्य, लोकाना स्वाभिमान पूर्वक, संथ आणि सुखी जीवन स्वराज्यात मिळाले पाहिजे, या जाणीवेने कोणत्याही पक्षाच्या विचारसरणीस पूर्ण वाव देण्याचे धोरण सोमणानी आपल्या कारकीर्दीत निर्वेधपणे राखले होते. आपल्याला

आपली मते मांडावयांस वाव मिळाला नाही किंवा आपली कुचंबणा झाली अशी तक्रार कोणत्याही प्रश्नावर विधान–परिषदेच्या कोणत्याही सभासदाला करता येऊ नये, अशी उदारता सोमणानी आपल्या सर्व कारकीर्दीत राखली होती. रामभाऊ मंडलीक, रामभाऊ खेडगीकर अशा काँग्रेस व्यतिरिक्त पक्षातील विचारवंत नेत्यानीही सदर गोष्ट–म्हणजे भाऊसाहेबांची उदारता–मुक्त कंठाने मान्य केली आहे. अर्थ–संकलपाच्या भाषणात वैद्यक–बोर्ड निवडणुकीचा प्रश्न मंडलीकानी १९४७ साली घेतला असता, त्यानी काही तक्रार अर्ज वाचून दाखविले आणि ना. गृहमंत्र्यानी त्याबद्दल हरकत घेतल्यावर, कळावयाची तेवढी सगळी बाजू गृहाला कळली आहे, असे पाहून सोमणानी गृहमंत्र्यांच्या शब्दास मान दिला. अशी कितीतरी उदाहरणे दाखविता येतील. सरकारसमोर प्रत्येक प्रश्नावरील लोकमत प्रगट होण्याकरता आणि दैनंदिन जीवनातील लोकांची दुःखे नाहिशी होण्याकरता, अगर लोकाना पाहिजे असलेल्या प्रगतीच्या सोयी करून घेण्याकरता, विधीमंडळाचा कोणी सभासद खटपट करीत असेल, तर त्याला सूचकपणे आपला नैतिक पाठिंबा देण्यास भाऊसाहेब मागे घेत नसत. कोणी नवखा तरुण आणि होतकरू सभासद विधिमंडळाच्या कामकाजाबाबत बोलावयास गेल्यास, त्याचे काम परिणामकारक रीतीने व्हावयासाठी भाऊसाहेब त्याला बिनचूक मार्गदर्शन करीत आणि त्याने बिनचूक काम केले, म्हणजे खाजगी भेटीस बोलावून त्याची पाठही थोपटीत. भारताच्या पुनर्रचनेत विधि–मंडळाचा जो उपयोग असेल तो पद्धतशीरपणे, शिस्तीने व नेटाने सर्व सभासदानी करून घ्यावा, हा दृष्टिकोन ठेवून, भाऊसाहेब आपल्या वात्सल्याची पाखर त्या सर्वांवर घालीत. या जिव्हाळ्याने भाऊसाहेबांचे काम १९५१ च्या अखेरीपर्यंत सातत्याने चालले आणि त्या सालच्या अखेरी अखेरीस नव्या निवडणुकांचे साद–प्रतिसाद उमटू लागल्यावर, ते सातार्‍यास येऊन राहिले.

या वेळी त्यांची प्रकृति थोडीफार खालावलेलीच होती. त्यामुळें निवडणुकीच्या हमाम्यात पूर्वी सारखा भाग घेणे, त्याना शक्य नव्हते. १९४६ च्या निवडणुकीत काँग्रेस तिकिटावर उभे राहिलेले, पण दुर्दैवाने निवडून न आलेले इस्माईल नूरमहंमद हकीम याना या खेपेस काँग्रेसने तिकीटच दिले नाही, म्हणून स्वतः हकीम आणि त्यांचे कित्येक चाहते काँग्रेस–श्रेष्ठीवर रुष्ट होते. या रुष्ट मंडळीत भाऊसाहेबांच्या सान्निध्यात वावरणारी काही कार्य–कुशल मंडळीही होती. १९१८–२० सालापासून हकीम कसल्याही मोहाला बळी न पडता काँग्रेसनिष्ठेने आणि महात्मा गांधींच्या भक्तीने लोकसेवा करीत आले होते. भाऊसाहेब सोमण आणि जिल्ह्यातील सर्व कळकळीचे काँग्रेसभक्त याना हकीमांची राष्ट्रसेवा पूज्य वाटतच होती. हकीमानी राष्ट्रीय स्वातंत्र्याकरता तुरुंगाचे हालही कमी

सोसले नव्हते. अशा स्थितीत हकीमाना काँग्रेस–श्रेष्ठीनी निवडणुकीचे तिकीट देणे न्याय्य होते, असे लोकमतही होते आणि व्यक्तिशः भाऊसाहेबांचेही तसेच मत होते. सेंट्रल पार्लमेंटरी बोर्ड हकीमांचेच नांव जाहीर करील अशीच जनतेचीही अपेक्षा होती. तथापि ऐनवेळी महाराष्ट्र काँग्रेसच्या पार्लमेंटरी बोर्डाने मुस्लिम समाजातील नवे होतकरू सुशिक्षित तरुण इब्राहिम रसूल बागवान याना तिकीट दिले. भारताच्या विकास योजनात या उत्साही तरुणाचा आणि त्याच्या विद्वतेचा उपयोग जास्त होईल, असे पार्लमेंटरी बोर्डाला वाटले असावे. म्हणून पार्लमेंटरी बोर्डाने दिलेला निकाल मान्य करून पुष्कळसे काँग्रेसजन काँग्रेसच्या इतर उमेदवाराप्रमाणे बागवानांचा प्रचार करू लागले. संस्थेने एकदा आपला निर्णय घेतल्यावर, आपले मत बाजूला ठेवून, संस्थेची शिस्त पाळलीच पाहिजे, म्हणून भाऊसाहेबानी बागवानानाच पाठिंबा दिला. एका जाहीर सभेत बुवासाहेब गोसावी यानीही हकीमाना शिस्त मोडून स्वतंत्र उमेदवार म्हणून उभे राहू नका अशी विनंती केली. तिचा उपयोग झाला नाही. स्वता भाऊसाहेब हकीमाना व हकीमांच्या उत्तेजकाना कह्यात न ठेवण्याइतके दुबळे ठरले. भाऊसाहेबानी मात्र आपले प्रकृतीस अनुसरून सर्व जनतेस बागवानाना मत देण्यास आणि काँग्रेसची शिस्त पाळण्यास सांगितलेच सांगितले. हकीम स्वतंत्रपणे उभे राहिले असता, आपल्या भोवतीची माणसे त्याना मदत करीत आहेत, हा शिस्तभंग भाऊसाहेबाना मान्य नव्हता. आपल्या डोळ्यांच्या अधुपणामुळे मतदानात चुकूनही चूक होऊ नये, ही खबरदारी घ्यावी म्हणून त्यानी पोलिंग ऑफिसरला आपले मत बागवानांचे नावापुढे नोंदावयास विनंती करून, आपले कर्तव्य केले. यावेळी हकीम व भाऊसाहेब यांचे अनेक वर्षांचे संबंध आणि भाऊसाहेबांच्या भोवतालची मंडळी हकीमाकरिता करीत असलेली खटपट, यामुळे भाऊसाहेबांच्या बद्दल अनेक गैरसमजही पसरले व पसरविण्यात आले. देखावे दिशाभूल करतात आणि निवडणुकीच्या धमाल्यात काय वाटेल ते पिकवता येते, हा अनुभव लक्षात घेतला तर स्वता जितके खंबीर रहावयाचे तेवढे राहून, आपले कर्तव्य करणे, एवढेच मनुष्याच्या हाती उरते; तेवढेच भाऊसाहेबानी केले. हाराला मान, तशी माराला पाठ, तयार ठेवणे हे कोणत्याही सार्वजनिक कार्यकर्त्याच्या कपाळी असतेच.

काँग्रेसच्या कार्यकर्त्यातील मतमतांतरामुळे निवडणुकीचा निकाल व्हावयाचा तो झाला. जुने कार्यकर्ते हकीम स्वतंत्र उभे राहिले तेही पडले, आणि नवे काँग्रेसनिष्ठ बागवान तेही निवडून आले नाहीत. ता. १४ व १५ जानेवारी १९५२ रोजी झालेल्या निवडणुकीच्या निकालातील वरील घटनेने भाऊसाहेब सोमणाना खेदच झाला. एवढेच नव्हे तर विधान–सभेवर निवडून यावयाच्या जिल्ह्याच्या अकरा

जागापैकी एकंदर आठ जागा काँग्रेसला मिळाल्या, या घटनेने त्यांचे समाधान अपुरेच राहिले, तथापि दिल्लीच्या लोकसभेवर अगदी नव्यानेच निवडणुकीस उभे राहिलेले काँग्रेसचे एकनिष्ठ सेवक व विद्वान वकील गणपतरावजी आळतेकर ९१,००० मते मिळवून उत्तर सातारा जिल्ह्यातर्फे पहिल्या क्रमांकाने निवडून आले, यामुळे सातारा जिल्ह्याचे नाव खास उजळेल, असा आत्मविश्वास भाऊसाहेब सोमणाना आला. त्याच समाधानात विधान-परिषदेच्या आपल्या कारकीर्दीचा शेवट करून सर्व पक्षियांचे

" The talk of veteran 'Bhausaheb', as Mr. Soman is affectionately known, has a flavour and quality of its own. There is something Roman in the chiselled face of this wise, kindly old man. Something Roman too in the simplicity of his speech and habits. "

Men, Matters and Memories, Times of India.
24 Feb. 1952

" Since 1903 onwards he has been a participant in the long turbulant political struggle which charactcrised country's attainment of independance. His guiding principle in life has been to keep in touch with both the old and new worlds. "

Bombay Man's Diary. Evening News.
20-2-1952

असे धन्यवाद घेत घेत १९५२ च्या एप्रिल महिन्यात आपला वृद्धापकाळ शक्य तितक्या संपूर्ण विश्रांतीने घालविण्यासाठी भाऊसाहेब साताऱ्यास परतले.

भाऊसाहेब सोमण विश्रांति घेण्याचा उद्देश धरून आता उरलेले आयुष्य स्वस्थतेने घालवावयाचे असा बेत करून साताऱ्यास येऊन राहिले. याचा अर्थ हरिहरि करीत बसावयाचे, असा मात्र मुळीच नव्हे. कामाचा बदल म्हणजे विश्रांति, हा कर्मयोग्यांचा खाक्या असतो. सकाळी एक दोन सोबत्याबरोबर फर्लांग, दोन फर्लांग फिरावयास जावयाचे, घरी आल्यावर वृत्तपत्रांचे वाचन करावयाचे, कोणी विचारल्यास सुचेल ती सल्ला-मसलत द्यावयाची, " महात्मा " या तेंडुलकरांच्या पुस्तकाचे नियमित वाचन ऐकावयाचे, जुन्या धार्मिक ग्रंथांचे श्रवण करावयाचे, आपल्या जुन्या पक्षकारापैकी अगर सहकाऱ्यापैकी आग्रहाने अथवा आपुलकीने वकीलपत्र घेतलेच पाहिजे असे धरणेच धरल्यास कोर्टात काम चालवावयाचे, मनाला बदल व जुन्यानव्या व्यवसाय-बंधूंच्या सहवासाची लज्जत म्हणून काही काळ बाररूममध्येही घालवावयाचा आणि सायंकाळी थोडा वेळ गोखले सराफ अगर पेठेतील एकाद्या दुसऱ्या दुकानी बसून एकंदर वस्तुस्थितीची हालहवालही कानावर घ्यावयाची, असा त्यांचा कार्यक्रम आता सुरु झाला.

---

## १७ दीप तेवतो, जाळुनि घेतो ।

सार्वजनिक व खाजगी जीवनातून निवृत्ति साधणाऱ्या जीवनक्रमाचा ओघ सरासरी चार महिने चालला. या अवधीत साताऱ्च्या कन्याशाळेचे प्रमुखाध्यापक वि. आ. मोडक यांचा सत्कार समारंभ महर्षि आण्णासाहेब कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. कन्याशाळा साताऱ्यास निघावयाची ठरली, त्यावेळी स्वतंत्र स्त्रीशिक्षणाच्या संस्थेचा निभाव कसा काय लागेल अशी शंका असणाऱ्या भाऊसाहेबाना, येथे ती संस्था एकदा सुरू झाल्यावर, प्रसंगवशात् तिची जबाबदारी घ्यावी लागली. ती भाऊसाहेबानी कशी पार पाडली, याची माहिती कन्याशाळेचे प्रमुख पुं. वि. उर्फ नानासाहेब गोळे यानी दिली ती अशी की,– " कन्याशाळेच्या स्थापनेपासून भाऊसाहेबाना तिच्याबद्दल ममत्व होते. १९३५ साली जेव्हा शाळा हिंगणे स्त्रीशिक्षणसंस्थेकडे आली, त्यावेळेपासून शेवटपर्यंत भाऊसाहेब तिच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष होते. मंडळाचे ते जणु डोळेच होते. वरिष्ठ विधिमंडळाचे अध्यक्ष झाल्यावर त्यानी आपणास शाळेच्या जबाबदारीतून मुक्त करावे, अशी इच्छा प्रदर्शित केली होती. परंतु इतर सभासद या गोष्टीस तयार होईनात. अडीअडचणीचे प्रसंगी पुण्यामुंबईच्या वाऱ्या करूनसुद्धा शाळाप्रमुख त्यांचा सल्ला घेत. भाऊसाहेबांच्या वजनामुळेच शाळेचे वजन वाढले. नामदार बाळासाहेब खेरासारखी प्रधान मंडळी किंवा डहाणूकरांच्या सारखी दानशूर मंडळी शाळेच्या संमेलनाचे अध्यक्षस्थानी लाभली. शाळेचा रौप्य–महोत्सव अगर मोडक यांचा मे १९५२ मधील सत्कार समारंभ भाऊसाहेबांच्या शब्दामुळेच मोठ्या इतमामाने साजरे होऊ शकले. राजकीय अशांततेच्या वातावरणामध्येही शाळेला कसली ती झळ पोचली नाही. प्रत्येक अडीअडचणीचे प्रसंगी आम्ही त्यांच्याकडे जावे व त्यानी मोठ्या आपलेपणाने शेजारी बसवून चौकशी करून उपाय सुचवावा, अशी भाऊसाहेबांची प्रथा. आमच्या शाळेच्या संबंधात त्यांची वात्सल्याची भावना अपत्य स्नेहाची होती," म्हणूनच रा. ब. काळयांच्या उदार देणगीच्या व लोकांच्या प्रेमळ सहानुभूतीच्या जोरावर, महर्षि कर्वे यांच्या आशीर्वादाने कन्याशाळेचे प्रत्यक्ष संवर्धन, अंग मोडून करणारापैकी मोडकांचा सत्कार झाला; त्या प्रसंगी त्या पुण्यवन्त कर्त्या पुरुषाच्या समाज-सेवेला आपला थोडा तरी हातभार लागला, याबद्दल भाऊसाहेबाना संतोष झाल्याशिवाय राहिला नाही. म्हणूनच त्या समारंभाला, स्वतःची प्रकृति नीट नसताही ते हजर राहिले, मोडकांच्या सारखी निरलस सेवा करणारी मंडळी असावी आणि गुणग्राहकतेने त्यांच्या सेवेला सहकार देण्याची संधि आपणास सापडली तर ती एक धन्यता आहे, ही भाऊसाहेबांची भावना असल्याकारणाने मोडक सातारा सोडून जाणार या कल्पनेने त्याना शहराच्या दृष्टीने किंचित् विषादही वाटला. पण त्यापेक्षाही भाऊसाहेबांच्या अंतःकरणाला पीळ पाडणारी गोष्ट भवितव्यता रेखाटीत होती व तिचा ध्वनि जुलै १९५२ चे अखेरीस आलाच.

ता. २३ जुलै १९५२ मावळली. ती रात्र काळोखाची होती. पाऊस पडत होता. सातारच्या छत्रपतींच्या जलमंदिरातील सोन्याच्या ४३५ भाराच्या तीन मूर्तींची त्या रात्री चोरी झाली. ११ व १२ वाजण्याचे दरम्यान गस्तीच्या पोलीसा व्यतिरिक्त फारसे कोणी हिंडत नसताना ५७६६९ रुपयांचा ऐवज गेला. पाऊणशे वर्षांच्या दोन पहारेकऱ्यानी उजाडल्यावर सदर चोरीचा बोभाटा केला. त्यामुळे गावात चोरीची बातमी ताबडतोब पसरली. या चोरीबद्दल शहरातील भर रस्त्यावर ठिकठिकाणी माणसे जमून तर्ककुतर्क व चर्चा करू लागली. हे तर्ककुतर्क व चर्चा यांचे मूळ खऱ्या गुन्हेगारानी सदर चोरीच्या तपासाची गाडी भलत्या रुळावर जावी यासाठी केलेल्या प्रयत्नात असावे की काय, अशी शंका घेण्यास जागा झाली. सदर चोरीचा अपूर्व ( परिशिष्ठातील जलमंदिर चोरी प्रकरण पहा. ) पद्धतीने तपास झाला आणि पोलिसांचे हाती ना चोर, ना चोरीचा माल लागला ! ! गावातील चर्चेचा मुळवा धरून सातारच्या चाणाक्ष म्हणविणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यानी आपल्या तपासास वळण दिले असावे; कित्येक गटात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नाव जलमंदिर चोरीसंबंधात बोलले गेले म्हणतात; पोलीस तपासाची पावले ही त्या दिशेनेच पडू लागली, असे म्हणावे लागते; हायकोर्टाकडे जलमंदिर चोरी प्रकरणात पोलिसानी पकडलेले शंकरराव उर्फ बापूसाहेब आपटे ( लिंबकर ) यानी हायकोर्टाकडे केलेल्या हेबिअस कॉर्पसचे कामी वाढता जातिद्वेष निर्माण होत असल्याचा भास पोलिसानी आपल्या प्रतिज्ञालेखानी केला होता, आरोपीना अटक केल्या दिवसापासून रंगमहालाकडील मेटावरील महारवाडा व शनिवार पेठेतील ब्राह्मण वस्तीची वरची आळी या दोन्ही क्षेत्रात साध्या व ड्रेसच्या पोलिसांचे अहोरात्र जाळे ११ ऑगस्ट १९५३ म्हणजे खटल्याचा निकाल लागून जाईपर्यंत पसरले होते. शहरातील इतर भागात या चोरीचे निमित्ताने पोलिसानी नाकेबंदी केली होती. एस्. टी. च्या गाड्यानी व इतर रीतीने प्रवास करणाऱ्या सर्व स्त्रीपुरुष उतारूंच्या ट्रंका, बोचकी, पिशव्या तपासून हाल चालविले होते. आरोपींच्या घरांची अनेकदा झडती घेऊन त्यांच्या जमिनी उखणून, सोने लपविले आहे की काय हे पाहण्याचे यंत्र लावून, तपास करण्याची कसोशी झाली होती. परंतु ता. ३० जुलै १९५२ रोजी भावे यांचे घरातून झडतीचे वेळी दोन तिखट कुटण्याच्या पहारा नेल्या होत्या; त्याशिवाय कोणत्याही झडतीत पोलिसाना काहीही मिळाले नव्हते.

छत्रपतींच्या जलमंदिरातील चोरीचा तपास लावण्याच्या कामी चाललेली ही स्वराज्यातील पोलीसांची बिकट वाट भलत्या दिशेला जात ~~आत~~ आहे; विनाकारण जनसामान्यांचा छळ होत आहे; याबद्दल भाऊसाहेब सोमणाना सात्विक संताप येत होता. अधिकारी स्वराज्याच्या प्रतिष्ठेला व कार्यक्षमतेला कमीपणा आणित आहेत, या विचाराने भाऊसाहेबांचे मन प्रक्षुब्ध होई. उभ्या

महाराष्ट्रातील सर्वच जमातीमध्ये छत्रपतींच्या घराण्याबद्दल असलेली आपुलकी आणि तीमुळेच छत्रपतींच्या चोरीचा बिनचूक तपास लागलाच पाहिजे व गुन्हेगार–भले, ते केवढेही प्रतिष्ठित वा वजनदार असोत !–त्याना शिक्षा झाल्याच पाहिजेत ही जाज्वल्य भावना, यांचा अवमानच अवमान तपासाच्या चाललेल्या अकांड–तांडवाने होत आहे, याचा भाऊसाहेब सोमणाना खेदच खेद होत होता. त्यातही कुलकर्णी, जोशी सारखे विद्यार्थी आणि नीळकंठ भाव्यासारखा काँग्रेस–प्रवृत्तीचा तरुण यांचा पोलीसानी केलेला अमानुष छळ ! ! याहीउप्पर प्रस्थापित कीर्तीच्या व संशयातीत शीलांच्या कोणीतरी चार माणसानी आपल्याला चोरी करावयास सांगितली, एवढेच नव्हे, तर शेवटी चोरीचा माल त्या शीलवन्त, प्रतिष्ठित महा–शयानीच पचविला असा कबुली जबाब आरोपितानी द्यावा, अशी पोलिसानी केलेली अपेक्षा, यांच्या खऱ्या खोट्या बातम्या ऐकून भाऊसाहेब सोमणांचा तिळपापड होऊ लागला; अन्यायिताला न्याय मिळवून द्यावा आणि अन्यायकाला शिक्षा झालीच पाहिजे म्हणून प्रयत्न करावा, अशी आपल्या व्यवसायाची दिशा आणि तशीच आपल्या खाजगी नि सार्वजनिक मार्गदर्शकांची आपणास शिकवण, हे लक्षात वागत असल्याकारणाने, त्या जलमंदिर–चोरीचा तपास सरकारने निर्मळ दृष्टीच्या अधिकाऱ्याकडून ताबडतोब सुरू करावा, याबद्दल भाऊसाहेबांचा अट्टाहास होता.

स्वत: कलेक्टरसाहेबांची गाठ ता. ३ ऑगस्ट रोजी घेऊन गुन्हा–हुडकणीत डी. एस्. पी. ना आपण योग्य मार्गदर्शन करावे अशी विनंतिही भाऊसाहेबानी केली होती. शंकर विठोबा शिंदे या एक वेळच्या मोटार–वाल्या पण त्यावेळी व आजही शेती करणाऱ्या सद्गृहस्थाला, जलमंदिर–चोरी–प्रकरणी काही माहिती कळली आहे, हे समजताच छत्रपती राणीसाहेब व मुंबईचे नामदार मुख्य मंत्री यांचे काना-वर त्याला कळलेली हकीकत त्याने स्वत:च सांगावी म्हणून त्यांच्याकडे धाडले होते. त्याच्या हकीकतीत काही तथ्य नाही असे मुख्यमंत्र्याकडून भाऊसाहेबाना पुढे कळले; स्वता भाऊसाहेबानी दोन वेळ मुख्यमंत्र्याना स्वताचे मत सांगितले. सरकारी गुप्तहेर खाते या प्रकरणी कार्यक्षमतेने लक्ष का घालीत नाही, याचा त्याना आचंबा वाटे. आरोपी म्हणून पकडलेल्या गरीब बिचाऱ्या महारापोरांचा नि विद्यार्थ्यांचा, तसाच आपटे भाव्यांचा विनाकारण जो छळ झाला, त्यातील अन्याय दूर व्हावा अशी भाऊसाहेबांची तळमळ, छत्रपती घराण्यातील झालेली चोरी सापडलीच पाहिजे व खऱ्या गुन्हेगाराना शिक्षा झालीच पाहिजे या भावने इतकीच तीव्र होती. म्हणून भाई एस्. एम्. जोशी, आमदार रामभाऊ मंडलीक, खासदार गणपतराव अळतेकर, काळकर्ते मामा दाते, केसरीकर्ते जयंतराव टिळक इत्यादि-कांच्या प्रयत्नाकडे आशेने पहात होते. छळ झालेल्या तीनही महारानी भाई एस्. एम्. जोशी व बुवासाहेब गोसावी यांची ओळख लावून ता. २९ सप्टेंबर १९५३ रोजी मुंबईच्या मुख्यमंत्र्यांची मुलाखत घेतली. त्यावेळी त्यानी मुख्य

मंत्र्याना उघड उघड सांगितले की "आपटे–भावे याना नुसत्याच पोलिसानी मारले नाही, तर आमचेकडूनही त्याना मारवले. आम्हा तिघानाही पोलिसने जलमंदिर प्रकरणी अतिशय मारल्यामुळे आम्ही अधू झालो आहोत.आमचेने कष्टाचे व श्रमाचे काम आता होत नाही. त्यामुळे उपासमार होत आहे. त्याचप्रमाणे आम्ही कोठे काम मिळवावे तर पोलिस आम्हास काम मिळू देत नाहीत. फितुरी करतात. म्हणजे मालकाला हे बदमाश लोक आहेत, त्याना काम देऊ नका असे सांगून काम बंद पाडतात. तसेच चवकशीचे वेळी आमची घरे उकरल्यामुळे घराच्या भिंतीपण पडल्या आहेत. तरी आमच्या तक्रारींची चवकशी करावी आणि आमच्या पोटा–पाण्याची काही तजवीज करावी. तसेच पोलिसांचेकडून आम्हास पीडा होणार नाही असे करावे." दुसरे दिवशी म्हणजे ता. ३० सप्टेंबर १९५३ रोजी पोलि–सानी छळलेल्या नीळकंठराव भाव्यानी मुख्य मंत्र्यांची मुलाखत स्वताच मिळविली. मुंबईला ऑल इंडिया सिव्हिल लिबर्टीज कौन्सिल आहे, त्याच्या मार्फत् मुंबई सर–कारला व लोकाना, पोलिसांच्या छळाची कल्पना खालील सारख्या परिच्छेदा–वरून आली.–

"Bhave may have got his injuries—the fracture of the right fifth metatarsal (together with a healed ecchymosis on the right buttock and healed multiple tiny linear abrasions on the back-mid-line upper third, which were all estimated by the Subcharge as more then 15 days old on the 17th August), while traversing a devious route from the rendez—vous to the scene of the theft, or back, stumbling or falling while jumping from a wall; and Apate may have injured himself intentionally in the jail—to frustrate the investigation, possibly under the instigation of some pleaders or others who interviewed him in the jail or accidently." या डी.एस्.पी.च्या प्रतिज्ञालेखावरील टीका अशी की– "A little inquiry would have shown the Additional District Magistrate (if he had allowed himself to think of the limp suggested by common sense) whether or not Bhave had been attending the office (in the Western India Life Insurance Company, head office Satara) since the 24th and walking with or without a limp (to say nothing of the funeral on the 27 July 1952 of Shri. R. G. Soman's daughter-in law, in which he took an active part.)"

जलमंदिर प्रकरणी आरोपितांचा छळ झाला तसा स्वराज्यात होऊ नये म्हणून पुण्याच्या भारत सेवक समाजाचे एस्. जी. वझे आणि पाटणा हायकोर्टाचे माजी न्यायमूर्ति एस्. बी. ढवळे आय्. सी. एस्. नि केसरीकर्ते जयंतराव टिळक

यांचे शिष्टमंडळही मुख्यमंत्र्यापर्यंत जाईल, असे भाऊसाहेबानी पाहिले. शिष्टमंडळाने तयार केलेली विस्तृत (फुलस्केप साठ पानांची) टिपणी वाचून ठेवून ता. १३ जुलै १९५४ रोजी मुंबई–सरकारचे कायद्याचे सल्लागार धुरंधर व होमसेक्रेटरी मीरचंदानी यानी त्यांचे म्हणणे ऐकूनही घेतले. केवळ पोलीसछळाची जलमंदिर खटल्याचीच कहाणी नसून मॅजिस्ट्रेटांच्या सहकाराशिवाय अगर बेफिकीरीशिवाय सदरचा छळ शक्य नव्हता, अशी ही कहाणी असल्याकारणाने त्या कहाणीबाबत डिपार्टमेंटल चौकशी व्हावी आणि त्या चौकशीच्या अनुरोधाने नियमावलीत जरूर त्या सुधारणा व्हाव्यात, असा आपला रोख असल्याचे शिष्टमंडळाने स्पष्टही केले. न्यायदानातील व न्यायखात्यातील अनेकानेक अनुभववृद्धाना न्यायमूर्ती ढवळे यानी तयार केलेली टिपणी दाखविल्यावर, त्यानी त्या टिपणीला "An airtight case for a searching inquiry" असे शिफारसपत्रही दिले. तथापि अशा शिफा–शीच्या टिपणीबद्दल एक अवाक्षरही न बोलता आगस्ट १९५४ चे तिसऱ्या आठवड्यात मुंबई सरकारचे कुलूपबंद उत्तर आले की ("Government is of the opinion that it is not necessary to reopen the matter as little useful purpose will be served by it.") "हे पान उलगडण्याची गरज नाही असे सरकारचे मत आहे. कारण त्या योगे उपयुक्त असे काही होणे असंभवनीय आहे."

स्वराज्यात न्याय आणि न्यायच मिळेल. एकाही निष्पापाचा विनाकारण छळ व्हावयाचा नाही, अशा जनतेच्या अपेक्षा असता, काँग्रेसने चालविलेल्या स्वराज्याच्या कारभारात त्या पुऱ्या होऊ नयेत, मातबर निःपक्षपाती माणसानी प्रयत्न करूनही त्या पुऱ्या होऊ नयेत, याबद्दल वरील तऱ्हेने जलमंदिर प्रकरणावर पडदा पडल्या–कारणाने भाऊसाहेब सोमणांची तगमग होत होती. साहजिकच, आरोपितापैकी स्वताच कोणीतरी अगर सार्वजनिक सेवाबुद्धीच्या न्यायाकांक्षी राष्ट्रहितवाद्याने जलमंदिर चोरी प्रकरणी विनाकारण छळ करणाऱ्या व करविणाऱ्या अधिकाऱ्यावर फिर्याद दाखल करून, छत्रपतींच्या घराण्यातील चोरीचा सुगावा लागण्याचा मार्ग सुकर करावा, व गुन्हा शोधण्याच्या कामी दिशाभूल झाली असताही त्याचे प्राय–श्चित्त न घेणारांचा समाचार घ्यावा अशी भाऊसाहेबांची तळमळ होती. पण उपयोग काय ? "संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ।" ही जाणीव सत्ताधि–ष्ठित शहाणपणात उमटेल तेव्हा खरे !


पोलिस छळामुळे सर्वत्र गाजलेले जलमंदिर प्रकरण न्यायमंदिरात कायदेशीर–पणे ता. २३ जुलै १९५३ पासून सुरू झाले. आणि ता. ११ आगस्ट रोजी त्या खटल्यातील सर्व आरोपी निर्दोषी म्हणून सुटले. चोर सुटून संन्याशांचा झालेला छळ अशा रीतीने थांबला. यापेक्षा या सर्वत्र गाजलेल्या प्रकरणांतून काहीही निष्पन्न झाले नाही. सातारा जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात छत्रपतींच्या घरची देवांच्या

मूर्तींची चोरी सापडली नाही याबद्दलचा असंतोष तीव्र असून, राज्यकारभाराच्या कार्यक्षमतेबद्दल सदर प्रकरणामुळे लोकास वाटावा तितका विश्वास वाटत नाही, ही रुखरुख कायमच राहिली. त्यामुळे भाऊसाहेब सोमणांच्या अंतःकरणातही सदर रुखरुख होती. अनुषंगिक गोष्टीनीही त्यांच्या मनाला अधिकाधिक हळवेपणा आल्याशिवाय राहिला नाही. जलमंदीरात चोरी झाल्यावर चारच दिवसानी ता. २७ जुलै १९५२ रोजी भाऊसाहेबांची सून कैलासवासी झाल्याने त्यांच्या तृतीय चिरंजीवांचा संसार विस्कटलाच होता. पुढे जलमंदिराचा निकाल लागल्यानंतर सुमारे दोन महिन्यानी गुरुवार ता. २२ ऑक्टोबर १९५३ रोजी पुण्यास नोकरी निमित्त असलेले भाऊसाहेबांचे नातू माधव भास्कर सोमण यानी देवीच्या पूजेनंतर स्वताच्या गळ्यास फास लावून घेऊन आत्महत्या केली, असे वृत्त सातान्यास भाऊसाहेबांच्याकडे आले. वास्तविक पहाता सदर धक्क्याने कोणाही वृद्ध गृहस्थाला मरण–प्राय दुःख व्हावयाचे. पण भाऊसाहेब सदर दुःखदवार्ता ऐकल्यावर एकदा " काऽय ! " एवढाच उद्गार काढून थांबले आणि आपल्या पुढील कर्तव्यास लागले. लोकानी दुःखवटयाची सहानुभूती दाखविताच " दीर्घ जीवन हा एक शाप आहे! " असा उसासा टाकण्यापलीकडे भाऊसाहेब काहीच करीत नव्हते.

या वेळी भाऊसाहेब सोमण वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुरन्स कंपनीच्या बोर्डाचे अध्यक्ष होते. पुण्याला असलेल्या कंपनीच्या शाखेसाठी जी नवी इमारत बांधली होती, तिचे उद्घाटन ता. २७ ऑक्टोबर १९५३ रोजी सर राधाकृष्णन् यांचे हस्ते व्हावयाचे होते. भाऊसाहेबांच्या शब्दामुळे सर राधाकृष्णन् त्या कार्यक्रमास येणार; पण वरील कौटुंबिक आपत्तीमुळे भाऊसाहेब साताऱ्याहून पुण्यास येतील की नाही आणि त्याना पुण्यास न्यावे की नाही, याबद्दल सर्व संबंधित मंडळी चिंता करीत होती. पण खाजगी सुखदुःखापेक्षा सार्वजनिक संस्थांची सेवा आणि सार्वजनिक संस्थातील पदसिद्ध जबाबदारी, भाऊसाहेब नेहमीच अधिक महत्वाची मानत असल्यामुळे, सर राधाकृष्णन् यांचे वे. इं. तर्फे स्वागत करण्यास पुणे येथे हजर रहावयाचे, असे भाऊसाहेबानी मनाशी ठरविले. कारण वेस्टर्न इंडिया इन्शुरन्स कंपनी हे, त्यांचे गुरु आण्णासाहेब चिरमुले यांचे सार्वजनिक अपत्य होते आणि त्याच्या संगोपन–संवर्धनाच्या कार्यात भाऊसाहेबानी ता. १३ ऑगस्ट १९१३ रोजी ती कंपनी स्थापन झाल्यापासून सदैव लक्ष घातले होते. सातारा शहरात विमा–कंपनी काढावी व आण्णासाहेब चिरमुले यानी ते काम मनावर घ्यावे म्हणून, १९१२ पर्यंत साताऱ्यात विमा–एजंट म्हणून काम करणारे व राजकीय दृष्टया प्रागतिक पक्षाचे अभिमानी असलेले गृहस्थ, काकाराव जोशी यानी दादासाहेब करंदीकर, रा. ब. पाठक, रा. ब. काळे, रा. ब. बोडस, नानासाहेब आगाशे, आण्णासाहेब आपटे, कृष्णराव कडूसकर, भाऊसाहेब सोमण अशा मंडळीना आपली

कल्पना समजावून सांगितली. १९१३ च्या अखेरीस आण्णासाहेब चिरमुल्यानी विमा कंपनी काढण्याचे मनावर घेतले आणि उद्देशपत्रिका तयार केली. पंचवीस हजार रुपयांचे सरकारी कर्जरोखे घ्यावयाची व्यवस्था झाल्यावर १३ ऑगस्ट १९१२ रोजी कंपनी रीतसर नोंदविण्यात आली. आण्णासाहेब चिरमुले प्रभृति मंडळीना विम्याचे क्षेत्र नवे असले तरी आर्थिक उन्नतीची कामे अंगावर घेऊन ती समाजाच्या सेवाबुद्धीने पार पाडण्याचा त्याना चांगलाच अभ्यास होता. राष्ट्राची सेवा विधायक मार्गाने प्रत्यक्षत: जी निष्ठेने करता येईल ती सातत्याने करावी, अशा प्रवृत्तीची सदर मंडळी होती. ]


[ लोकमान्यांची चतु:सूत्री सातारा जिल्ह्यात जीवाभावाने ज्यानी फैलावली त्यात भाऊसाहेब सोमण, दादासाहेब करंदीकर, आण्णासाहेब चिरमुले, नानासाहेब आगाशे, गणपतराव फणसळकर, डॉ. भिडे इत्यादि मंडळींचा प्रामुख्याने समावेश होतो. ] १९०५ साली स्वदेशीच्या चळवळीकडे राष्ट्रातील सर्वच लोकांचे लक्ष केंद्रित झाले. स्वदेशीची दुकाने गावोगाव निघू लागली. कराड येथे पांडुआण्णा शिराळकर प्रभृतिनी आगकाड्यांचा कारखाना उभारण्याचे ठरविले आणि त्याला १९०९ साली मूर्त स्वरूप आले. वाईस १९०२ साली भावे यानी साखरेचा छोटासा कारखाना काढला आणि धोम येथे आगकाड्या तयार होऊ लागल्या. अशा या चैतन्य कालात साताऱ्याच्या यूनियन क्लबमध्ये बसून राष्ट्राचा विचार करणाऱ्या मंडळीना काहीतरी केल्याशिवाय स्वस्थ रहावेना. साताऱ्यास स्वदेशी कापड दुकानाचे प्रयत्न १८९६ सालीच वामन अनंत भिडे यानी केले होते. त्यानंतर धोंडु बापू अभ्यंकर आणि दादासाहेब करंदीकर व बलवंतराव सहस्रबुद्धे यांचेही प्रयत्न झाले. पण त्याना यश लाभले नव्हते. नाना दीक्षित, विनायकराव भागवत व विष्णुपंत प्रभुणे अशा मंडळीनी १९०४–५ चे सुमारास दिवाणांच्या चाळीत स्वदेशी–कापड–दुकान थाटले होते. पण त्यालाही यशाचा लाभ झाला नव्हता. ही अपयशाची नोंद तरुण मनाना प्रयत्न–पराङमुख करू शकली नाही. विचारवंत लोक ज्या उद्योगात पाऊलही टाकण्यास धजणार नाहीत अशा ठिकाणी भावनाप्रधान माणसाना बुद्धिचा वापर बेधडकपणे करून कदाचित् यश मिळविता येते. [ युनियन क्लबमधील तरुण राष्ट्रभक्तामध्ये आण्णासाहेब चिरमुल्यानी वरील तऱ्हेची विचारसरणी मांडताच आण्णासाहेब आपटे, कृष्णराव कडूसकर, नानासाहेब आगाशे, भाऊसाहेब सोमण, गोविंदराव श्रोत्री, दांडेकर अशा सात मंडळीनी प्रत्येकी शंभर रुपये घालून ता. २८ जानेवारी १९०६ रोजी साताऱ्यात एक लिमिटेड कंपनी काढण्याची तयारी केली. ] दादासाहेब करंदीकरानी कंपनीचे बरेच भाग खरेदी केले. मग रा. ब. पाठक, रंगाचार्य रड्डी, नरसिंहाचार्य गजेंद्रगडकर, गणपतदास देवी, रा. ब. काळे वगैरे मंडळीनी शेअर खरेदी केले. [ ते भांडवल चार हजार रुपयांचे झाले. याप्रमाणे सातारा येथील स्वदेशी कापड दुकानास सुरुवात झाली. ] दुकान चालविणे सोपे नव्हते.



**भाऊसाहेब** नाशिक तुरुंगात स्थानबद्ध असताना (१९४३)
चि. सौ. ताई ( अन्नपूर्णाबाई साठये ) व भाऊसाहेबांची नातवंडे.
मागे उभा असलेला राजाराम गडी.




हकीम; ना. तपासे; नामदार **भाऊसाहेब**; बाळासाहेब देसाई. (१९४९)



– सातारच्या व्यायाममंडळात १९४६ –

१ विठ्ठलराव २ नारायणराव गोरे ३ जयप्रकाश नारायण
४ भाऊसाहेब ५ अच्युत पटवर्धन ७ स्वामी रामानंद भारती.



कराड टिळक हायस्कूलचे स्नेहसंमेलन प्रसंगी
वळवडे, दादासाहेब अळतेकर, नामदार भाऊसाहेब, पाठक.

रोज सकाळी आठ वाजता व सायंकाळी पाचचे सुमारास आण्णासाहेब चिरमुले अव्याहत हजर राहू लागले. स्वदेशी माल लोकाना शक्य तितक्या योग्य दरात पुरवावा ही चालकांच्या मनीची हौस अपेक्षेबाहेर सफळ झाल्याकारणाने ती कंपनी रीतसर नोंदवण्यात आली. पुढे दुकानाकरिता ठेवी घेण्यात येऊ लागल्या आणि मग हळू हळू दुकानदारीपेक्षा बँकेचेच व्यवहार अधिक प्रमाणात सुरू झाले. सोन्याचांदीच्या आणि मालाच्या तारणावर कर्जे देण्याची प्रथा पडत गेली. तसे शेअर भांडवल वाढत गेले; गंगाजळी निर्माण झाली; सरकारी रोख्यात पैसे गुंतविले गेले आणि भरपूर भाग–नफेही वाटण्यात आले. त्यातून १९१३ सालापासून आण्णासाहेब चिरमुल्यानी सहकारी चळवळीत लक्ष घातल्याबरोबर सातारा स्वदेशी कंपनीला १९२० पर्यंत बँकेचे यथास्थित स्वरूप आले. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनीचे पैसे किफायतशीरपणे गुंतविण्यास सध्याची स्वदेशी कमर्शिअल बँक उपयोगी ठरली. ती सहकारी बँक असल्यामुळे, १९३५ साली आणखीही एकादी बँक वेस्टर्न इंडियाशी सहकार करावयास आवश्यक आहे, असे आढळून आल्याकारणाने युनायटेड वेस्टर्न इंडिया या बँकेचा जन्म १९३६साली झाला. तिचा पाळणा हलविण्यातही भाऊसाहेब सोमणांचा हात होताच. अशा तऱ्हेने स्वताच्या लहान–मोठ्या बहिणीसारख्या दोन बँकांची जोड घेऊन आपल्या प्रगतीने लोकांच्या डोळ्यात भरणारी वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स–कंपनी कसलीही अडचण न येताच प्रगति करीत होती, असे मानण्याचे मात्र कारण नाही. सर्वच विमा–कंपन्याना सर्वसाधारणपणे ज्या दिव्यातून जावे लागते, त्यातून वेस्टर्न इंडिया कालानुरुप जातच होती. पण १९२७ साली कंपनीत एक अंतर्गत वादळ उत्पन्न झाले. आण्णासाहेब चिरमुले ज्या सावधगिरीने कंपनीचे काम चालवित होते, तीत प्रगतीची धिमी पावले होती तरी इतर काही कंपन्याप्रमाणे ती प्रगति धडाडीची नव्हती. बाजारात चढाओढीसाठीं उभ्या राहिलेल्या समव्यवसायीच्या बरोबरीने अगर अधिकच कार्यक्षमतेने कोणाही व्यक्तीने अगर संस्थेने टिकाव धरल्याशिवाय निभाव नसतो. वेस्टर्न इंडियाने आपल्या पंधरा वर्षांच्या कारकीर्दीनंतर आता धडाडीने भारताच्या आर्थिक क्षेत्रात व्याप वाढविला पाहिजे, असे रा. ब. काळे यांचे नि तत्पक्षीयांचे मत होते. ती धडाडी आततातईपणाची होईल, येऊ घातलेला काळ आपणास अनुकूल होईल अशा बेताने वाकवावयाचा असल्यास, चिरमुल्यांच्या सावध धीमेपणात भित्रेपणा नसून निश्चित प्रगतीचा ठामपणा आहे व तोच शेवटी यशस्वी होईल असे आण्णासाहेब आपटे दादासाहेब करंदीकर, भाऊसाहेब सोमण प्रभृतींचे मत होते. हा दोन प्रवृत्तींचा झगडा होता. यात राजकीय पक्षोपपक्षांचा काहीच संबंध नव्हता. काळाचा ओघ, समाजाच्या प्रकृति व प्रवृत्ति, सरकारी कायदेकानूंचे धोरण आणि चालकातील ध्येय–व्यवहार–समन्वय–शक्ति यांचा मेळ घालण्याचा कस यावेळी लागणार होता. म्हणून प्रागतिक व राष्ट्रीय पक्षाच्या नावावर १९२७ सालच्या वेस्टर्न–

इंडियाचे डायरेक्टरबोर्ड निवडण्यापासून सगळचा व्यवस्थेसंबंधी लेख-प्रतिलेख निर्माण झाले असले, तरी ज्यांच्यासाठी व ज्यांच्या पाठिंब्यावर कंपनी चालवावयाची, त्यांचा पाठिंबा कोणत्या धोरणास मिळेल यावर सर्व गोष्टी अवलंबून होत्या. म्हणून एका बाजूने वाग्भट देशपांडे प्रभृति व दुसऱ्या बाजूने सोमण प्रभृति मंडळीनी विमेदाराना व भागदाराना उद्देशून पत्रके काढली. विमेदारानी व भाग-दारानी निवडणुकीत चिरमुले यांच्यावतीने कौल दिला. त्यानंतर सर्व वादळ अगदी चहाच्या पेल्यातील वादळासारखे शमले. विमाकंपनीची प्रगति त्या वादळा-नंतरही होत राहिली. आण्णासाहेब चिरमुले यांच्यावरील नितान्त प्रेमामुळे व त्यांच्या कर्तृत्वावरील विश्वासामुळे भाऊसाहेब सोमण कंपनीच्या संस्थापनेपासून आपल्या वाटचास येईल ती कंपनीची सेवा करीतच आले. कंपनीचे सुरवाती-पासून ते कंपनीचे कायदेशीर सल्लागार होतेच. शिवाय, १० जून १९१७ ते २ जून १९१८, ३० जून १९२९ ते २८ जून १९३१, ९ जुलै १९३९ ते ६ जुलै १९४९ अशा काळात ते बोर्डाचे सभासद निवडून आले होते; तर ५ जुलै १९३८ पासून एक वर्षभर आणि ५ जुलै १९५२ पासून शेवटपर्यंत भाऊसाहेब बोर्डाचे स्वीकृत सभासद होते. २४ जून १९३४ ते २१ जून १९३६ अखेर ते निवडून आलेले सभासद असता बोर्डाचे कार्याध्यक्ष म्हणून कंपनीचे काम पहात होते. त्या काळांत कंपनीच्या मुंबई शाखेची संपूर्ण वाढ झाली, अहमदाबाद येथे कंपनीची शाखा निघाली, सातारा येथील कंपनीच्या मुख्य कचेरीच्या पिछाडीस आणखी नव्या ३६' × ८४' जागेवर इमारत झाली. कंपनीची प्रगती व प्रतिष्ठा अशा तऱ्हेने वाढत असताच साताऱ्यातील नव्या इमारतीचे उद्घाटन १३ ऑगस्ट १९३५ रोजी डॉ. जयकर यांच्या हस्ते झाले; मुंबईच्या इमारतीचे उद्घाटन १० एप्रिल १९३८ साली बिर्ला शेठजींच्या हस्ते झाले; २४ फेब्रुवारी १९३९ ला कंपनीच्या रौप्य महोत्सवास सर विश्वेश्वरय्या अध्यक्ष लाभले; आणि आता ६ जुलै १९५२ पासून कंपनीचे ते अध्यक्ष असता, पुण्याच्या इमारतीचे उद्घाटनास २७ ऑक्टोबर रोजी सर राधाकृष्णन् यांच्यासारखा तत्त्वज्ञानी सत्पुरुष लाभला याचे कारण सोमण होते. त्यामुळे सोमणानी सदर समारंभास हजर रहावे, अशी सर्वांची साहजिकच इच्छा होती, पण सोमणांच्या घरी नातवाच्या अपमृत्यूचे दुःख घनदाट पसरले असता, त्याना पुण्याच्या समारंभाला चलण्याबद्दल कोण आग्रह करणार? पण, वैयक्तिक सुखदुःखापेक्षा सार्वजनिक कर्तव्य मुख्य मानणाऱ्या "स्थित-प्रज्ञ" भाऊसाहेब सोमणानी स्वताच पुण्यास जाऊन आपले कर्तव्य केले. परिचिताना त्यांच्या संयमशीलतेचा आचंबा वाटला. सर राधाकृष्णन् याना ज्यावेळी भाऊसाहेबांच्यावरील प्रसंगाची कल्पना काही निमित्ताने कोणाच्यातरी भाषणातून आली, तेव्हा "शिस्त, सहकार, निःस्वार्थी सेवा या कर्मयोगाच्या तीन वैशिष्ठ्यांचा अवलंब केल्यामुळे वेस्टर्न इंडियाची प्रगति

प्रत्येकाला अभिमान वाटावा अशी झाली, " असा तर त्यानी उल्लेख केलाच; पण " मनःशांन्ति आणि बाह्य जगाबद्दलचे निःस्वार्थी प्रेम ही महान शिकवण आपल्या राष्ट्रपुरुषांनी घालून दिली ती आचरणात आणणारे संचालक कंपनीला लाभले, ही गोष्टही विसरता यावयाची नाही. " असा उल्लेख केल्यावाचून सर राधाकृष्णन् याना राहवले नाही.

सातारा शहरातील आणि औद्योगिक स्वरुपाच्या पण मध्यम वर्गीय जनतेच्या जीवनोपयोगाच्या अर्थव्यवहारी संस्थातून भाऊसाहेब सोमणांचे काम मुख्यतः झाले. तरी जिल्हयातीलही अर्थ व्यवहारी संस्थांच्याकडे त्यांचे कमी लक्ष नव्हते. शेतकरी आर्थिक दृष्टचा निष्कर्जी झाला पाहिजे, एवढेच नव्हे, तर तो अर्थस्वावलंबी झाला पाहिजे, असा भाऊसाहेब सोमणांचा रोख होता. त्या दृष्टीने स्वतः उत्कृष्ट शेती व उत्कृष्ट व्यापार कसा करावा याचे सातारा जिल्ह्यात उदाहरण असलेले कोळचाचे आण्णासाहेब कल्याणी यांचा १९५४ साली मृत्यु झाल्याचे ऐकून भाऊसाहेब सोमणाना परम दुःख झाले. १९३६ साली शेतकऱ्याना आपली आर्थिक स्थिती सुधारण्यास हातभार लावणारी जमीन–तारण–बँक निघाली, तिचे अध्यक्षपद अठरा वर्षे आण्णासाहेब कल्याणी यानी यशस्वीरीत्या चालवून अनेक शेतकरी बांधवांचा दुवा घेतला होता. आण्णासाहेब कल्याणींच्या त्या कार्यक्षेत्रात आपल्याला त्या संस्थेच्या संस्थापनेपासून सहकार करावयास सापडला याबद्दल भाऊसाहेब सोमणाना आनंदच वाटत असे. सातारा जिल्हा को ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँकेचे मॅनेजर पुटाणी यानी भाऊसाहेबांच्या प्रत्यक्ष बँकेतील सेवेचे वर्णन दिले आहे की " ता. १७ जानेवारी १९३६ रोजीच्या रा. ब. काळे यांचे निधनानंतर रजिस्ट्रार साहेब को ऑ. सो. यानी भाऊसाहेब सोमण यांची या बँकेच्या कार्यकारी मंडळावर नेमणूक केली. ३० सप्टेंबर १९३८ अखेर अडीच वर्षे त्यानी काम केले. इतराप्रमाणे त्यानी बोर्डाच्या सभेस हजर राहण्याबद्दल प्रवासखर्चाची देखील मागणी केली नाही. मीटिंगचे वेळी हजर राहून महत्वाच्या विषयावर बापूसाहेब राजाज्ञे, परुळकर, बी. जे. शिंदे वगैरे आपल्या सहकाऱ्याबरोबर अत्यंत खेळीमेळीने व सहकार्याने संस्थेचा पाया भरभक्कम होईल इकडे त्यानी लक्ष दिले. "

असे पाये भक्कम करण्याचे काम भाऊसाहेब सोमण संस्थामधून जसे करीत तसेच होतकरू व्यक्ति, जीवनात चढत्या वाढत्या पदवीला चढताना पाहिल्यावर ते आनंदाने मोहरून जात. दत्तोपंत परांजप्यासारखा एक सच्छील, प्रसिद्धिविन्मुख, सर्व राष्ट्रीय चळवळीस मदत करणारा, व्यायाम नि शिक्षणक्षेत्रात नावारुपास आलेला व आपल्या डोळचादेखत लोकादरास वाढत्या क्रमाने पात्र झालेला उमदा गृहस्थ १९५४ साली साठीपर्यन्त येऊन त्यांचा ५ डिसेंबर १९५४ रोजी झालेला सार्वजनिक गौरव आपल्याला पहावयास मिळतो आहे, या आनंदातिशयाने त्याना हार्दिक आशीर्वाद भाऊसाहेबानी दिले असले तर नवल काय ?

# १८ सहज खुंटले बोलणे !

भाऊसाहेब सोमणानी सार्वजनिक व खाजगी अशा दोन्ही संसारातील कार्यैकदृष्टी कायम ठेवून केवळ सल्लामसलतीचे व्रत अखंड तीन वर्षे चालविले. वयाला ७८ वर्षे झालेली, अनेक सार्वजनिक नि खाजगी दगदगीनी व आघातानी देह व मेंदू शिणलेला, डोळयाचा अधूपणा वाढत पुष्कळ वेळा मोतिबिन्दू होऊन तो अनेक उपायान्तीही दुणावलेला, पासष्टी उलटल्यानंतर वरचेवर कफविकार नि परिणामतः दमा निर्माण झालेला, अशा प्रकृतीच्या अवस्थेत मेंदूच्या तरतरीइतके व मनाच्या संयमशीलते–इतके "कृतान्त कटकामलध्वज–जरा" चढलेले शरीर काम देईनासे झाल्यावर ता. ११ जानेवारी १९५५ रोजी भाऊसाहेब सोमणांच्या प्रकृति–सल्लागारानी म्हणजे डॉ. वा. वि. आठल्ये व त्यांचे सुपुत्र डॉ. शरच्चंद्र यानी भाऊसाहेबाना घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आणि पुढे एक दोन दिव–सांच्या अनुभवाने तो मानवला असेही दिसले. घरात वावरून आपली दिनचर्या संपूर्णतः आनंदात घालवित असता, ते सर्व ता. ६ फेब्रुवारी १९५५ पर्यंत यथासांग निभले. पण त्या दिवशीच्या माघशुद्ध पौर्णिमेच्या रात्री अस्थम्याने एवढा जोर केला की भाऊसाहेबांच्या प्रकृतीचा विश्वास कोणासच लागेना. सज्जनगडावर दुसरे दिवसापासून समर्थोत्सव सुरू होता आणि भाऊसाहेब अलिकडे तीन वर्षात रोज पहाटे देवापुढे जो धावा म्हणत तोच " धावा हो धावा, धावा श्रीगुरुराया । बुडलो मी भवसागरि पडतो तुमच्या पाया ।। पुत्रकलत्रहि आप्तेष्टादिक जाति सर्वहि दुरी । अंतकाल हा समिपचि येता त्यात एकला परी ।। " आत्मीयतेने आळवू लागले. सोमवार उजाडला व " जरामरणमोक्षाय " शरीर अस्वस्थ होत असताही त्या दिवशी प्रत्येक समाचाराला येणाऱ्या सहृदयाला भाऊसाहेब " बर ऽ आहे ऽ ! " असे सांगू लागले. भाऊसाहेबांच्या प्रकृतीच्या अशक्तपणाची कल्पना असणाराना ते निरोप देत–घेत असल्याची भावना चाटून जात होती; पण आपुलकी असणा–राना आपल्या प्रकृतीची चिंता घालमेलावयास कारणीभूत होऊ नये, ही त्या शब्दा–तील दक्षताही भाऊसाहेबांच्या त्या संयमशील शब्दद्वयातून प्रतीत झाल्याशिवाय रहात नव्हती. उत्तरोत्तर अशक्त होत जाणाऱ्या " हृदया " बद्दल डॉ. आठल्ये, यानाही धाक वाटत असल्याकारणाने, धाप लागलेल्या भाऊसाहेबाना हालचालीची व उठून बसण्याचीही त्यानी बंदी केली होती. पण हातपाय हालवता येताहेत तो–पर्यंत शौचमुखमार्जनादि सारी शरीरसेवा स्वावलंबनानेच झाली पाहिजे असा कटाक्ष ठेवणाऱ्या भाऊसाहेबानी ते सर्व विधि जरूर तेव्हा आपल्याच हातानी घरातल्या घरात सोमवारी उरकले.

मंगळवार हा त्यांच्या कुलदेवीचा वार. तो उजाडताच भाऊसाहेब आपल्या पायानी शौचकूपापर्यंत जाऊन प्रार्तर्विधि उरकून आले, आणि प्रकृतिसल्लागारानी

त्याना तपासले तर ते सल्लागारही भाऊसाहेबांच्या प्रकृतीचा त्या दिवशीचा तकवा पाहून थक्क झाले. त्या मंगळवारच्या प्रकृतीवरून अमंगळ दिसू लागले होते ते पळाले, अशी भेटभाऊना आशा नव्हे! खात्री वाटू लागली. डॉक्टरांचे उपचार चालूच होते.. त्या दिवशी आणि बुधवारीही जवळजवळ संध्याकाळपर्यंत भेटावयास येणारांचा समाचार जन्मभरीच्या सवयीप्रमाणे घेण्याचा क्रम भाऊसाहेबानी चाल-विलाच होता. त्याला बुधवारी रात्री खळ पडली. त्या रात्री भाऊसाहेबाना पुन्हा अस्थम्याचा जो झटका बसला त्याने त्यांचे अवसान हरल्यासारखेच झाले. तथापि आपल्या आवाजासुद्धा क्षीण झालेल्या सर्व शक्तीनी समाचारास येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत करून "बर ऽ आहे ऽ!" म्हणण्याचे कार्य चालूच होते. गुरुवारी जिल्ह्यातील सोमणांचे सुहृद, उपकृत, स्नेहांकित येत होते; दुपारी तर स्वता डिस्ट्रिक्ट जज्ज वागळेसाहेब येऊन समाचार घेऊन गेले आणि सायंकाळच्या सुमारास सातारच्या छत्रपती राणीसाहेब भेट देऊन गेल्या. त्या सर्वांना यथायोग्य कुशल, आशीर्वाद, अभिवादन हे "बर ऽ आहे ऽ!" या शब्दद्वयानेच भाऊसाहेब करीत होते.

गुरुवार हा सोमण-कुटुंबात अनेक वेळच्या अनुभवानी घातवार मानला जाई. होरपळलेल्या मनाची ती माया या गुरुवारी सर्व कुटुंबावर पसरली होती. अपवाद फक्त दोनच. एक छातीचा भाता झालेले भाऊसाहेब आणि दुसरा एकशे तीन डिग्री तापाने पाचदिवस अंथरूणावर खिळलेल्या भाऊसाहेबांच्या पत्नी. अशा त्या भयकृत रात्री मध्यान्ह उलटल्यावर आपल्या कुलदेवतेचा शुक्रवार उगवून पुन्हा भाऊसाहेबांच्या प्रकृतिला मंगळवारसारखे बरे वाटू लागेल, अशी आशा पालवू लागली. पण, निसर्ग उलट कौल देत होता. शुक्रवारी सकाळी डॉक्टरमंडळीनी प्रकृती तपासून निश्वास सोडला आणि स्वता भाऊसाहेबानी आपले मन सर्वस्वी भोवतालच्या सृष्टीतून काढून घेऊन व "न चुकणाऱ्या होणाऱ्याला" तोंड देण्यासाठी एकाग्र केले. भाऊसाहेबांचे चहाते, शेजारी, स्नेहसंबंधीत, ओळखीचे असे सर्व, भाऊसाहेबांच्या प्रकृतीची बातमी कळल्यामुळे दर्शन घेऊन जाऊ लागले. आपल्या सातारा शहराचा, जिल्ह्याचा कर्ता पुरुष आणि महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक तीर्थक्षेत्र झालेला महाभाग परलोकीचे प्रस्थान ठेवून बसल्याची जाणीव त्या दर्शनदक्ष माणसांच्या चेहऱ्यावर साफ साफ दिसत होती. अशा त्या चिन्तामग्न सकाळच्या घटका, घंटे, प्रहर लोटू लागले आणि भाऊसाहेबांच्या शरीराचा त्याच क्रमाने चैतन्य-तत्त्व संन्यास करू लागले. होता होता अकरा वीस वाजल्याचे घडचाळ किटकिटू लागले आणि तात्यासाहेब करंदीकरांचे समर्थचरित्र सज्जनगडावर प्रसिद्ध करताना समर्थांच्या समाधीजवळ "हीच माझी शेवटची वारी" असे उद्-गार आदले वर्षी काढले होते ते जणु सार्थ होऊन सोमणानी या जगाचा अखेरचा निरोप घेतला! !

" फोडुनि टाहो जगती प्रथम तुवा उघडिलेस जैं डोळे ।
हसले आनंदाने भवती जे पाहते तुला झाले ।। १ ।।
चालो तर मग जीवन सौभाग्ये ज्यास देव भुलतील ।
कर्तृत्वपाठ घेतिल आकांक्षांचे तरूण खुलतील ।। २ ।।
आणिक जैं शान्तमने हासत मिटशील नेत्र शेवटिचे ।
ऊर भरोनी रडतिल भवतीचे, लांबचे नि लगटीचे ।। ३ ।।

असा आशीर्वाद सोमणाना चिमणगावी गृहदेवतानी आपल्या मूकसंकेतानी १८७६ साली दिला असेल तो तेथून ७८ वर्षांनी सातारा येथे अक्षरशः खरा ठरला. सगळे सातारा शहर आणि सातारा जिल्हा, फार काय त्यांचा प्रत्येक परिचित दुःखसागरात सापडला. ज्याला ज्याला शक्य होते तो तो आपल्या त्या जिव्हाळ्याच्या नेत्याला अखेरचा मुजरा करण्यासाठी साताऱ्यात आणि सोमणांच्या घरी धाव घेऊन आला. या साऱ्या मंडळीत प्रथम भाऊसाहेबाना " अखेरचा नमस्कार " करण्याचा प्रसंग अर्थातच त्यांच्या धर्मपत्नीवर होता. जुन्या धार्मिक वृत्तीच्या या व्रतधारी गृहलक्ष्मीला आपण अहेवपणी जावे, निदान पुराणप्रसिद्ध सीतामाउलीप्रमाणे आपल्यालाही आपले पतीचे अगोदर धरणीने गडप करावे, असे हजारोवेळा वाटले असेल ! पण " आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना । " हा धर्मनिष्ठ मनाचा विश्वास असल्याकारणाने, संयमशील भाऊसाहेब सोमणांच्या त्या अर्धांगीने भाऊसाहेबांच्या सत्वधीरतेला साजेलशा संयमाने भाऊसाहेबांच्या सर्वांगाला आदबीने स्पर्श केला आणि मनोभावे प्रणिपात करून भाऊसाहेबांची ती गृहदेवता आपल्या आजारपणाच्या अंथरुणावर कपाळीचे कुंकू वाढवलेल्या स्थितीत स्थिर झाली !! पतिवियोगाने शरीराचा दगड झाल्यावर डोळे पाणावले तरी पाझरच आटतात. त्या अवस्थेचा साक्षात्कार आश्चर्यवत् पहाणाराना आला !!!

हळहळत्या अंतःकरणाना आणि हुळहुळत्या भावनाना आपल्या गालावर अश्रुधारानी वहावयास वाट करीत करीतच हजारो नागरिकानी आणि स्नेहांकितानी भाऊसाहेबांचा पार्थिवदेह भाऊसाहेबांच्या घरातून आदरांजलीचे हारावर हार पडत असताना जेव्हा हलविला, तेव्हाचे जनमनाचे हुंदके कित्येकांच्या कानात जन्मभर घुमत राहतील. सगळ्याना अखेरची श्रद्धांजली वाहता यावी म्हणून शहरातील ज्या ज्या रस्त्यानी देहयात्रा गेली तेथे तेथे हजारो नागरिकांची दुतर्फा प्रचंड गर्दी जमली आणि " आकाशातून फुले । धरेवर फुले । लोकाकरी ही फुले ।। " अशा हारानी भाऊसाहेबांच्या पार्थिव देहाचाही सत्कार झाला. वाटेत शनिवारच्या सुभाष–चौकात भाऊसाहेबांचा एक मुसलमान वर्गबंधु अबदुल कादरभाई शेख त्यांच्या देहयात्रेत आला आणि " रामभाऊ ! ! " अशी साद देऊन त्याने आपल्या अंतःकरणातील जिव्हाळ्याची अश्रुमाला भाऊसाहेबाना समर्पण केली, तेव्हा करुण रसाची गंगा सर्व चेहऱ्यावर वाहिल्याशिवाय राहिली नाही.

सायंकाळी सूर्यास्ताचे समयी भाऊसाहेबांच्या पार्थिव देहास श्रीक्षेत्र माहुली येथे कृष्णेच्या संगमावर अग्निसंस्कार त्यांचे चिरंजीवांचे हस्ते करण्यात आला. त्यावेळी खासदार आळतेकर, नाथ घाणेकर, बाळासाहेब देसाई, रामानंद भारती, डॉ. आठल्ये, गोसावी, ना. चव्हाण, ना. नाईक निंबाळकर, ना. तपासे आदिनी सर्वांच्या वतीने अखेरच्या श्रद्धांजल्या वाहिल्या आणि भाऊसाहेबांच्या पार्थिव देहाचे अग्निसंस्कारातून ज्वाळा उफाळताच ना. यशवंतराव चव्हाण यानी म्हटल्याप्रमाणे प्रत्येकापुढे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाचा इतिहास धगधगून उभा राहिला.

भाऊसाहेब इहलोक सोडून गेले आणि ती वार्ता ज्यांच्या ज्यांच्या कानावर आली, त्यांचे त्यांचे अंत:करण दु:खाने भरून आले. भाऊसाहेबांचे नातेवाईक, स्नेही, चहाते, आणि उपकृत यानी दु:खाश्रु गाळले. भाऊसाहेबांच्या विरुद्ध पक्षात असलेल्या लोकांच्या डोळयापुढे, भाऊसाहेबांची सज्जनता आता कोठे दिसेल? असे प्रश्नचिन्ह उभे राहिले. कारण, भाऊसाहेबांच्या जीवनातील आणि स्वभावातील प्रत्येक अंग प्रत्येकाला पसंत नसले तरी एकंदरीने भाऊसाहेब ही समाजाची सात्विक शक्ति आहे, ही जाणीव मात्र प्रत्येकास ठामपणे होती; फार काय, भाऊसाहेब म्हणजे सातारा आणि सातारा म्हणजे भाऊसाहेब, असे समजण्याइतका भाऊसाहेबांचा जीवनक्रम एक संदर्भ–ग्रंथ आहे, असे महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही मानले जाई. त्यामुळे भाऊसाहेबांच्या मृत्युबरोबर त्यांच्या कुटुंबियाकडे सहसंवेदनादर्शक शेकडो पत्रे आणि तारा आल्या. सर्वत्र पसरलेल्या दु:खोदधिच्या लाटा निरीक्षिताना ज्या भावनांची उत्कटत्त्वाने भेट होते, त्यांचा रागरंग आढळून येतो तो असा:–

आपले ख्यातनाम वडील व महाराष्ट्रातील प्रमुख व श्रेष्ठ श्रेणीचे देशभक्त कार्यकर्ते भाऊसाहेब, यांच्या निधनाची वार्ता आज सकाळी वर्तमानपत्रात वाचली, तेव्हा पराकाष्ठेचे दु:ख झाले. भाऊसाहेबांचे जीवन, हे नि:स्वार्थ राष्ट्रसेवा करणाऱ्या देशभक्ताचे जीवन होते. भाऊसाहेब करारी पण दुराग्रही नव्हते ; भाऊसाहेब स्पष्ट वक्ते पण मर्मभेदी अपशब्द बोलणारे नव्हते; ते अजातशत्रु होते. त्यांच्या मृत्यूने महाराष्ट्रच नव्हे तर राष्ट्रीयसभापक्ष एका आदर्श कार्यकर्त्यास व त्याच्या पोक्त व अनुभवी मार्गदर्शनास मुकला आहे. त्यानी आपल्या आयुष्याचे नि:सीम मातृभूमिची सेवा करून सार्थक केले आहे. तोच आदर्श पुढे ठेवून चालणे, हेच त्यांचे खरे व स्थायी स्मारक होय. असे करण्याचा निश्चय हीच त्यांच्या संबंधाची श्रद्धांजलि होय.

मजवर निर्व्याज प्रेम करणारी मजपेक्षा वडील माणसे होती. त्यात भाऊसाहेब होते. माझ्या दुखण्यात स्वत: अपंग असताना सुद्धा हाल सोसून मुंबई पुणे येथे दोनदा येऊन भेटून गेले. हा मृत्युलोक आहे. वयोमानाने भाऊसाहेब योग्य काळाला स्वर्गवासी झाले असले तरी, त्यांच्या चांगुलपणामुळे त्यानी जो स्नेह

निर्माण केला, त्यामुळे त्यांच्या मृत्युबद्दल मनाला दुःख जहाल्याखेरीज रहात नाही. आता पुन्हा असा पुरुष दृष्टीस पडणार नाही. त्यांच्यासारखे पुरुष पुढील पिढीत निपजोत, हेच भगवंतास मागणे. आपल्या सर्व बंधू-भगिनींच्या आणि आप्तेष्टांच्या दुःखात मी सहभागी आहे, व मजप्रमाणेच महाराष्ट्रातील सर्व सुजाण जनता आणि भारतातील कॉंग्रेसचे वयस्कर कार्यकर्तेही सहभागी आहेत, एवढे सुचवून आपण आपला शोक आवरून धरावा आणि कुटुंबियांचे सांत्वन करून भाऊसाहेबांच्या लौकिकास अनुरुप अशारीतिने आपल्यावर पडलेली कौटुंबिक व सार्वजनिक जबाबदारी पार पडण्यास झटावे. परमेश्वर आपणास धैर्य व बुद्धि-सामर्थ्य देवो. आणि भाऊसाहेबांचा आत्मा त्याचे चरणी निरंतर विलीन राहो.

—आपला समदुःखी, माधव श्रीहरी अणे, पुणे. (१२-२-५५)

त्यांचे वय झाले होते तरी, आज त्यांच्या नेतृत्वाची व मार्गदर्शनाची साताराला तर विशेष गरज होती. —म. म. द. वा. पोतदार, ( १८-२-५५ )

एक थोर लढवय्या आपल्यातून गेला. —ल. ब. भोपटकर,पुणे २, (१४-२-५५)

त्यांच्या चारित्र्याचे व स्वतंत्रबाण्याचे मी दुरून फार कौतुक करी. त्यांच्या निधनाने सबंध देशाचे अपरिमित नुकसान झाले आहे.

—श्री. ग. वझे, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी. ( ८-३-५५ )

जलमंदिर प्रकरणी विद्यमान मंत्रिमंडळास भाऊसाहेबानी दिलेला योग्य सल्ला मंत्रिमंडळाने धिक्कारला, अशा गोष्टी भाऊसाहेबांच्या जिव्हारी लागल्या.

—धर्मवीर विश्वासराव डावरे पुणे ( २५-२-५५ )

कोणत्याही बिकट प्रश्नाचा गाभा ते सहज आकलन करीत आणि त्यातून अचूक मार्ग दाखवित. व्यक्तिशः मला तर ते पितृस्थानी वाटत. साताराच्या शाळेची सूत्रे हाती घेतल्यावर त्यानी दिलेले प्रोत्साहन आणि केलेले कौतुक माझ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यास कारणीभूत झाले.


—श्री. रा. पारसनीस, फर्ग्यूसन कॉलेज पुणे ( १२-२-५५ )

१९४५ सालापासून मी त्यांच्या जवळ आलो. १९४६ च्या निवडणुकीमध्ये उमेदवारांची त्यानी ज्या कटाक्षाने निवड केली होती, त्याचा अनुभव मला १९५१-५२ च्या निवडणुकीच्या वेळी उपयोगी पडला. उतार वयातही ते प्रत्येक घडामोडीची काळजीपूर्वक माहिती घेत व मार्गदर्शन करीत. —ना. भाऊसाहेब हिरे


महाराष्ट्रात निरनिराळे पक्ष असताना व जातीय-वाद डोके वर काढीत असतानाही कॉंग्रेसचे हात बळकट करण्यात ज्यांचे हात आहेत, त्यापैकी भाऊसाहेब सोमण हे एक होते. मुंबई विधान-परिषदेचे चेअरमन या नात्याने मुंबई विधि-मंडळाची त्यानी उच्च परंपरा राखिली होती. —ना. कुंटे स्पीकर




वेस्टर्न इंडिया हाउस पुणे या नव्या इमारतीचे उद्‌घाटन प्रसंगी. २७–१०–१९५३
खुर्चीवरील (डावीकडून) पांचवे– नामदार चव्हाण, डॉ. आगाशे, डॉ. राधाकृष्णन्, भाऊसाहेब, डॉ. परांजपे, काकासाहेब गाडगीळ, शंकरराव साठे.




— अन्त्यदर्शन —




' अन्त्यदर्शन ' — वेस्टर्न इंडिया विमा कंपनी समोर —




स्मशान यात्रा



अन्त्य यात्रा



– अन्त्य यात्रा –



स्मशानयात्रा– ११ फेब्रुआरी १९५५

पोक्त वयातही ते तरुणापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वांशी मिळून मिसळून वागत असत. त्यांच्याजवळ कोणीही मनुष्य गेला तरी तो सुखी व आनंदी होऊन परत जात असे. –आ. तुळशीदास जाधव

गेल्या ४० वर्षातील सातारा जिल्ह्यातील सार्वजनिक चळवळीचे ते प्राण होते. –नामदार रा. श्री. हुक्केरीकर, ( ११–२–५५ )

सातारा जिल्ह्यातील लोकमान्य किंवा महात्मा अशा तऱ्हेने त्याना संबोधिले जात होते. –धनी वेलणकर, सांगली.

त्यानी केलेला त्याग, दाखविलेला संयम, व्यक्त केलेले विचार आजचे कॉंग्रेस–जनाना आदर्श व मार्गदर्शक ठरतील. –आमदार बाळासाहेब देसाई. ( १२–२–५५ )

भाऊसाहेबांच्या कर्तृत्वाचे ऋण सर्वांनी त्यांचे प्रमाणे अंशतः तरी आचरणाने फेडणे प्राप्त आहे. –वि. रा. देशपांडे, चाफळ ( १३-२-५५ )

अत्यंत बिकट परिस्थतीला तोंड देऊन तुकारामाप्रमाणे विदेह स्थितीत, जसे बोलले तसेच वर्तन करून भाऊसाहेबानी आपली इहलोकची यात्रा निष्काम सेवा करून संपवली. –एकनाथ बाळशेट गांधी, मलकापूर ( कोल्हापूर ) ( १४-२-५५. )

ती. भाऊनी विद्यार्थीदशेत असताना केलेली आर्थिक मदत व त्याच वयात प्रकाश पत्रातून माझ्या लेखनाला त्यानी दिलेली प्रसिद्धि ही मी यावत्–जन्म विसरणे अशक्य आहे. –वि. ना. कोठीवाले पुणे. ( १२-२-५५ )

गेली वीस वर्षे मिरज वकील वर्गाशी त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आला असून त्यांचे दिवंगतीमुळे आमचेपैकी प्रत्येकजण पोरका झाला आहे.

–मिरज बार असोसिअेशन ( १२-२-५५ )

प्रापंचिक आघात सहन करण्याची परिसीमा झाली तरी त्यानी स्थितप्रज्ञता सोडली नाही. हेच मोठ्या लोकांचे वैशिष्ठ्य असते. –भास्कर दामले, गोंदिया.

भाऊसाहेबानी आमच्या वडिलाना नोकराप्रमाणे कधीही वागवले नाही. ते आप्ताप्रमाणे वागले. आमच्या आजच्या परिस्थितीस केवळ तेच कारणीभूत आहेत. या उपकाराच्या जाणीवेने अंतःकरण भरून येते.

–मोरेश्वर विष्णु जोशी, नाशिक ( १२-२-५५ )

भाऊसाहेब हे माझ्या वडिलांचे निकट स्नेही. दादासाहेब करंदीकर आम्हाला पत्रव्यवहाराने धीर देत असत; भाऊसाहेब यानी तीच परंपरा अखेरपर्यंत ठेविली. कुठे सातारा कुठे वांबोरी ! दोन पिढ्यात प्रेम पुरून वाटले.

–प्र. भा. कोटस्थाने, वांबोरी, जि. नगर. ( १६-२-५५ )

लोकमान्य टिळकांच्या भोवती त्यावेळी तरूण पिढीतील स्वार्थत्यागी, तरूण, कर्तबगार आणि निष्ठावान् अशी बोटावर मोजण्याइतकी महाराष्ट्रीय मंडळी पुढे आली, त्यात सोमण अग्रभागी होते. –संपादक, सकाळ पुणे. ( १३-२-५५ )

त्यांच्या सान्निध्यात जातीय ज्वाला थंड होत, पुढारलेला व मागासलेला हा वाद मागे पडे व त्यांचा सल्ला सर्वजण ऐकत. लोकमान्य टिळकांच्या वेळेपासून स्वातंत्र्य-प्राप्तीच्या कालापर्यंत सातारा जिल्हा राजकीय चळवळीत आघाडीवर राहिला याचे बरेचसे श्रेय भाऊसाहेब सोमणांच्या सर्वसंग्राहक वृत्तीला व संघटना-कौशल्यालाच द्यावे लागेल. --केसरी, पुणे. (१३-२-५५)

मतभिन्नता निर्माण झाली म्हणून भाऊसाहेब सोमण कोणाशीही कठोरतेने कधीही वागावयाचे नाहीत. दुसऱ्यांचा दृष्टीकोन समजाऊन घेण्याची त्यांची तयारी असे. त्यांच्या मृत्यूने महाराष्ट्राच्या शिवमंदिरातील नंदादीप निमाला आहे.

--ग. वा. जोशी, गोफण, पंढरपूर. (१५-२-५५)

ते मानवतावादी होते म्हणूनच गांधी यांचे त्याना आकर्षण वाटले, व समाजवादाची त्याना भीति वाटली नाही. सवंग लोकप्रियता मिळण्यासाठी त्यानी आपली प्रामाणिक मते कधी दडवून ठेविली नाहीत. निर्वैर वृत्तीने समाज कल्याण साधण्याची त्याना तळमळ होती. --साधना. (१९-२-५५)

" दुःखार्तीने हृदय फुटले ऐकुनी घोर वार्ता !
लोकाना या मृदुल वचनी सांतवी कोण आता !
वात्सल्याची मधुर सरिता वाहवीली जनात,
शोकी तीच प्रगटुनि दिसे आज लोकासवात !! "

–गिरीश. (२१-२-५५)

Please accept my deepest sympathies and condolence in the great loss you have suffered and kindly convey my feelings to your brothers.

Bhausaheb has left us a rich legacy in as much as he showed us how to retain the sanctity of personal relationships in the midst of storms of controversies which are unavoidable in public life. I remember many occessions when he overwhelmed me with his kindness, even when he and I could not agree about a situation.

Such a generosity is rare in the the field of political work and he had made it sacred nature.

–Achyut Patwardhan, Raj Ghat; Benaras. (16-2-55.)

His liberalism and broad understanding astonished me. Such men are getting rare now.----

–Bandopadhyay, Bombay, (14-2-55.)

Satara District has lost a wise counseller and sobering influence in an otherwise volable politics of the District.---

–M. B. Kadam Bar-at-law, Bombay (14-2-55.)

He was a person of varied and wide interests and activities. He was a person who was respected by all shades of opinions and he contributed not only to the public life of his District or of Maharashtra, but he contributed very greatly to the public life of the state. He was respected by all the members of the council as its President and there was seldom any voice raised in displeasure against any of his rulings as long as he was the President of the council. In Satara, especially, he was a source of strength to allthe public workers and personally I profitted by his experience in that District to a very large extent. His passing away will be a great void in the public life. We can learn from his life the lessons of tolaration and appreciation of other people's views, while sticking to one's own views with firmness.

-Hon. Moraraji Desai. (15-2-55.)

I can never forget the protective arm that protected us when we were fighting against imperialists. In 1942 I came into contact with him in the Yerawada prison. If it had not been for his encouragement, I do not know how many of us would have been able to face the difficulties that were in front of us. His main quality was his intense human feeling coupled with his broad outlook of his life. It can be truely said of Bhausaheb Soman that he was both great and good. There were many occassions when we differed from him; but inspite of that, he used to encourage us and gave us fatherly affection which we found very rare in those days—in those days when we were fighting with the British. Gradually I find that there is an atmosphere which is not very welcome. It is becoming more and more critical and arrogance is becoming dominant with intollerance. Under such circumstances, a man like Bhausaheb Soman would have been of great use to us in this country to make democracy successful and democratic institutions thrive in this land...

-S. M. Joshi.

He wanted to help everybody and it is a matter of pride that during his life and especially his public life, he did not make even a single enemy. Everybody was his closest friend.

-R. K. Khedgikar.

His life may be described as a life of duty and dedication to the cause of freedom. He was not merely a leader himself but also a maker of leaders. K. G. Pandit. (15-2-55.)

We have no man of his stature left in the public life of this state.

–S. B. Dhavale. Rtd. High Court Judge, Patana (15-2-55)

Nation has lost a true and worthy disciple of Lokamanya Tilak. We need sober, steady and true patriots like him. Personnally I have lost elder political brother.

–Dadasaheb Pataskar. New Delhi.

He was so closely connected with my grand-father and he took an interest in my success at the election along with his.

–Principal G. S. Mahajni,

Mr. Soman and myself were members of the Bombay Legislative Council in the year 1924. He was very social and though he belonged to the social democratic party at the time, and I to the Non-Brahmin party, our relations were very friendly. –Rao. S. K. Bole, Bombay. (12-2-55.)

लोकमान्यांच्या गेले पिढीतील अनुयायापैकी महाराष्ट्राच्या या शेवटच्या शिलेदारासंबंधी काकासाहेब गाडगीळ, न्यायमूर्ति भय्यासाहेब गजेन्द्रगडकर प्रभृतींच्या अंतःकरणातही असेच उमाळे आले. वरील दुःखोद्गारातून भाऊसाहेब सोमणांचे एक उद्बोधक जीवन–चित्र अभ्यासकांच्या डोळ्यापुढे साकल्याने उभे रहाते आणि त्याच्या अंगोपांगाचा अभ्यास करण्याकडे सहाजिकच प्रवृत्ति वळते.

# १९ विद्यार्थी सोमण

अभ्यासाच्या दृष्टीने भाऊसाहेब सोमणांच्या चरित्राकडे पहाताना त्यांच्या विद्यार्थी–दशेकडे सहाजिकच प्रथम लक्ष जाते.

" जो गुण बाळा, तो जन्म–काळा. " गणेश महादेव सोमणानी आपला एकुलता एक मुलगा रामचंद्र हा वरील जाणीवेनेच संगोपिला व वाढविला. रिकामी आजा-आजी आणि खेळकर नातवंडे याना गुंतवून संसाराचे राजाराणी आपा–पल्या कामात गुंतून गेले, तर संसारात आळस शिरत नाही; आजाआजीना आपला वेळ नातवंडास खेळवण्यात आणि त्याना वळण लावण्यात सार्थकी लागल्यासारखा वाटतो; ओघानेच नातवंडाना लाडिकपणा करावयास सापडून कुटुंबात चालत आलेले वळण गिरवावयास सापडते. एकत्र कुटुंबपद्धतीतील ही प्रथा कैसरीकंदनापर्यंत प्रचलित होती असे म्हणावयास हरकत नाही. महादाजीपंतांचा गुडघा चढून त्यांचा नातू रामचंद्र गणेश सोमण पहिल्या पाच वर्षातच नव्हे, तर त्याचे मराठी शिक्षण संपेपर्यंत म्हटले तरी चालेल, लाडिकपणानेच वागला. ज्योतिषी म्हणून महादाजीपंत सोमण "हुजूर करंदीकर" म्हणजे दादासाहेब करंदीकरांचे पिताजी आणि स्वता दादासाहेब करंदीकर यांच्याकडे जात येत; त्याप्रसंगी अनेक वेळा महादाजीपंतानी आपला नातू "राम" त्यांच्या येथे "झुलपाब्बरोबर" जरीची टोपी नीट घालून नेला होता व दादासाहेबानी त्याला खाऊही दिला होता. आपल्या येथे येणाऱ्या ज्या मुलाचे कौतुक आपण करतो आहोत, तोच पुढे आपल्या येथे वकिली शिकावयास येईल आणि पुढारी म्हणून आपली जागा सवाईने उजळ करील, याची पुसट तरी कल्पना दादासाहेबाना त्यावेळी आली असेल काय? महादाजी–पंतानी दादासाहेबांच्यासारख्या अनेक लोकाकडे जाताना "विजयीभव चिरंजीव रामचंद्राला" बरोबर टेवल्याने, आपले आजोबा लोकाशी व लोक आजोबाशी कसे वागतात, याचे पाठच रामचंद्र गणेशाना मिळाले. त्यांच्या अंगी व्यवहार–चतुराई बाणण्यास आणि भाषेच्या लपेटीने कटु सत्य सुद्धा शर्करावगुंठित करून सांगण्याची कला येण्यास आजोबांचे ज्योतिषकथनाचे अवलोकन पुष्कळच मूलभूत म्हटले पाहिजे. आजोबांच्या ज्योतिषकथनाचा एवढाच फायदा रामचंद्र गणेशाना मिळाला नाही; १८८७ साली साताऱ्यास आपले मातोश्रीसह रामचंद्र गणेश इंग्रजी शिक्षणासाठी राहिल्यावर, ते आजोबांच्या फिरतीत घरोघर गेले नाहीत हे खरे; पण आजोबाना ज्योतिषाचे जोरावर झालेल्या प्राप्तीतूनच त्यानी आपल्या नातवाला नवी सतरंजी, नवा मुकटा वगैरे गोष्टी कौतुकाने घेऊन दिल्याच.

दोनही वेळेला सोवळे नेसल्याशिवाय जेवावयाचे नाही, अशा शिस्तीचा तो काळ होता. शाळेत परवचा, घरी नमस्कार, संध्या, 'शुभंकरोति' व बाहेर बागडतानाही जाणाऱ्या येणाराबद्दल आदब हा विद्यार्थ्यानी पाळावयाचा

" शिष्टाचार " होता. हा रामचंद्र गणेश नीट सांभाळीत. आजोबांची धार्मिक-वृत्ति रामचंद्र गणेशानी एवढी उचलली होती की कोणत्याही देवापुढे जसे ते हात जोडित, तशीच कोणाही दीन-दुबळ्या अनाथ-अपंगाची व गरजूची कीव त्याना अगदी लहानपणापासून येई. आजोबा व वडील दोघेही कडक; एक न बोलून तर दुसरा वेळप्रसंगी गालावर पाच बोटे उठवूनही. या दोघानीही रामचंद्र गणेशांचे कडून संथा देऊन ' रुद्र ' असा पाठ करवून घेतला होता की चुकून देखील स्वराची, टेक्याची, चमकनमकांची गल्लत व्हावयाची नाही. वयाच्या पडत्या काळात तुरुंगवास भोगित असता आपल्या बरोबरीच्या सत्याग्रहीना रामचंद्र गणेश (भाऊसाहेब) सोमणानी रुद्र एकाद्या वेदशास्त्रसंपन्न गुरुजीसारखा शिकवला; इतका तो त्यांचा लहानपणापासून तयार होता. अगदी १९५४ च्या श्रावण महिन्यात गणुमामा गोळवलकराना घेऊन दर सोमवारी रामचंद्र गणेशानी (भाऊसाहेबानी) रुद्राचे अनुष्ठान वैदिकाच्या अस्खलितपणाने केले. रुद्राच्या या " म्हणण्या " मुळेच रामचंद्र गणेशांची स्मृति जशी पाजळली गेली, तशीच विषयाचा आटोप पक्का करण्याची त्याना सवय लागली. रामचंद्र गणेशांचे प्राथमिक शिक्षण सगळेच्या सगळे स्वताच्याच वडिलांचे हाताखाली झाले. आपल्याला जेवढे काही येते तेवढे सगळे आपल्या विद्यार्थ्यांना सांगून टाकण्याचे काम सगळेच प्रामाणिक शिक्षक करतात. पण आपण सांगितलेले सगळे आपल्या इतकेच आपल्या विद्यार्थ्यांना समजलेले आहे, अशी खात्री पटेपर्यंत त्यांच्या ते मेंदूत उतरविण्याचा प्रयत्न करणारे जे विद्यार्थीप्रिय शिक्षक असतात, त्यापैकी गणेश महादेव होते. अर्थात रामचंद्र गणेशानी ही वडिलांची लकब पाहिली आणि उचलली असली तर नवल काय ? मराठी सहावी इयत्ता झालेल्या शिक्षकाने सहावी इयत्ता शिकवून आपल्या वर्गाचा परीक्षापाक ब्याण्णव, पंचाण्णव टक्के मिळवल्याचा आनंद वर्षानुवर्ष भोगणारे सोमण-कोठावळे-जोगळेकर-आचार्य असे कित्येक शिक्षक त्याकाळी सातारा जिल्ह्याला लाभले होते. रामचंद्र गणेश सोमण शिकत होते तो काळ " पंधरा पाने शिक्षकाने शिकवावीत आणि पुढील पंच्याऐंशी पाने विद्यार्थ्याने सहज स्वावलंबनाने त्या पहिल्या पंधरा पानांच्या शिकवणीचे जोरावर पुरी करावीत " असा तो काळ होता. त्यामुळे शाळेत धडे, खेळात हुदडे, मेळाव्यात रामरगाडे, विद्यार्थ्यांना म्हणजे हातचा मळ होता. मेळाव्यातील रामरगाड्याचा एक नमुना सार्वजनिक उत्सवाच्या आरंभापासून ललितापर्यंत स्वयंसेवकाची अंगमेहनत असे. उद्या उत्सव तर आज रात्रौ मांडव आरास तयार; आज उत्सव संपला तर उद्याला सकाळी तेथे मांडव आरास होती की नव्हती अशी मोज-मांडणीची टीप. दुसरा नमुना शिमग्याच्या सहा दिवसांचा. शाळांना सुट्टी, हातातोंडाच्या गाठी, मोठ्यातमोठी होळी करण्याची चिकाटी. अश्लीलतेला ऊत की आपले पोर धुलवड-रंगपंचमी दिवशी दिसावे भूत.

अशी इच्छा वडिलधारी करीत. या सहा दिवसाखेरीज न लिहिलेली वेळापत्रके मुलाना पाळावीच लागत. रामप्रहरात उठून आजोबांच्या "घनश्याम सुंदरा" दि भूपाळ्या सुरू झाल्या आणि आजीबाईंचा सडा अंगणात पडला की नातवाचे शौचमुखमार्जनादि विधि आटोपून खडा अभ्यास सुरू व्हावयालाच पाहिजे. सूर्यास्ताबरोबर घरी हजेरी, परवचा–संध्या व भोजनोत्तर मुकाटचा–मुकाटचा अभ्यास अगर–वडील आजोबाकडून शक्य असेल ते शंका–समाधान करून घेऊन आजोबांची करुणाष्टके सुरू झाली की विद्यार्थ्यांनी झोपेच्या स्वाधीन व्हावयाचे. "लवकर निजे, लवकर उठे त्यास ज्ञान--संपत्ति आरोग्य झटे।" हा त्या काळच्या विद्यार्थ्यांचा अनुभव होता. वळणदार अक्षर आणि मार्मिक प्रश्नाचे मार्मिक उत्तर यावर शिक्षक, शाळेचे भेटभाऊ आणि खात्याचे निरीक्षक त्या विद्यार्थ्याचा व एकंदर शाळेचा क्रम ठरवित. बक्षीस--समारंभ, संमेलन--चढाओढी अगर उत्तेजनार्थ पारितोषिके यांची प्रथा शाळा--पाठशाळापर्यंत उतरली नव्हती. त्यामुळे सामाजिक मत हेच आपल्या तरबेजीचे मापक मानले जाई. रामचंद्र गणेश याच अनुभवानिशी सातान्यास इंग्रजी शिक्षणासाठी आले आणि नोकरीच्या गावाहून वडील जसे दर शनिवारी वडुथास जात तसेच हेही सातान्याहून जाऊ लागले. त्यामुळे आठवड्यातून कौटुंबिक संमेलन एकदा तरी होई. वडिलाना रामदासवाङ्मय हा व्यवहारकोश वाटत असे; त्याची गोडी त्यानी रामचंद्राला लावली होतीच. सातान्यास इंग्रजी शिकावयास राहिल्यावर अगोदरच वडिलांच्या तोंडून चालू घडामोडीची चर्चा ऐकावयास मिळालेल्या रामचंद्राच्या बुद्धीला स्वराज्यसंस्थापक छत्रपतींच्या समर्थगुरुंच्या दासबोधात व्यावहारिक राजकारणाच्या प्रेरणा दिसू लागल्या व त्या राष्ट्रगुरूवर भक्ति जडून सज्जनगडाचे आकर्षण निर्माण झाले. " सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे ॥ परंतु तेथे परमेश्वराचे। अधिष्ठान पाहिजे ॥" अशा बळकट बुद्धीचा ठसा रामचंद्र गणेशाना त्यांच्या विद्यार्थिदशेत मिळाला आणि लहान थोर अभ्यासण्याचे सवयीबरोबर सतत शिकत राहिले पाहिजे हा जीवनबोध प्राप्त झाला. त्या "नेमाबरोबर"च दैनंदिन जीवनाचा बोध असा ठसून राहिला की

" नाकाने श्वास घ्यावा. चुकुनि न कसले मादक द्रव्य घ्यावे।
झोपावे मोकळासा पवन फिरकतो तेथ शांत स्वभावे॥
खावे, प्यावे, रुचे, ते; परिमित परि ते ना रुचे ते त्यजावे।
राखावे स्वच्छ दाता, जिरवुनि सगळे अन्न की तुष्ट व्हावे॥
रोजी व्यायाम जो का रुजत करुनि तो स्नान सर्वांग व्हावे।
पावित्र्याने जगावे, हसतमुख जना अंतरी नीववावे॥
ध्येयाने जीवनाते मधुर सुरसता नित्य आणीत जावी।
जावो ना की रिकामा क्षण! सरळ तो शुद्ध दीर्घायु होई॥"

रामचंद्र गणेशाचा असा अभ्यास सातान्यास ज्या शाळातून झाला, त्या शाळा दिवाणांची

चाळ ( डॉ. फाटक यांचा हल्लीचा दवाखाना ), दिवाणांचा जुना नगारखाना, गुरुवारातील शिर्केवाडा, सदाशिव पेठेतील तांबोळीमाडी ( हल्ली सुदर्शन हॉटेल ) येथे भरत असत. शाळेचा अभ्यास शक्य तो शाळेतल्या शाळेत रामचंद्र गणेश व त्यांचे सवंगडी उरकीत. सरकारी हायस्कुलात रामचंद्र गणेश शिकत असताना, हेडमास्तर पाठक यानी त्याना एक स्वतंत्र खोलीच अभ्यासासाठी दिली होती. रामचंद्र गणेश सोमण, अबदुल–कादर शेख, आण्णा सहस्रबुद्धे, बंडो गोविंद रानडे आणि विनायकराव अभ्यंकर या विद्यार्थ्यांचा एक शिक्षकप्रिय संच होता. या सर्वांचा अभ्यास आणि खेळ एकजुटीने होई. घोकंपट्टीपेक्षा विषय वरचेवर वाचण्याने तो तोंडपाठ करावयाची पद्धत या संचात असे. रामचंद्र गणेश यांचा विषय ( गणिताशिवाय ) बहुधा एका लक्षपूर्वक वाचनाने तयार होई. " शक्ल् पच् मुच् रिच् वच् विच् " सारखी कारिका मात्र रामचंद्र गणेशाना पाचवेळा आस्थेने वाचावी लागली, तेव्हा ती बिचारी त्यांच्या तोंडात बसली. हायस्कूल–मध्ये त्यावेळी दत्तोपंत माटे संस्कृत शिकवीत. रामचंद्र गणेश सोमण हे त्यांच्या कसास उतरलेले चांगले विद्यार्थी होते. दोघे गोडबोले व तिसरे लाड असे शिक्षकही रामचंद्र गणेशांच्या स्नेहसंबंधावर नजर राखीत व लाड करीत. इंग्रजी शिकविणारे गोडबोले तालमीचे शोकी. कुस्तीचे पेच तसेच इंग्रजी व्याकरणाचे पेच सोडविण्यात ते पटाईत. आपल्या विद्यार्थ्यांनी आपल्यासारखे पटाईत व्हावे अशी त्यांची इच्छा असे. त्या अपेक्षा बहुधा रामचंद्र गणेशाकडून तृप्त व्हावयाच्या. " याची कारणे काय ? " या वाक्याचे भयंकर भाषान्तर रामचंद्र गणेशांचे स्नेह्याने एकदा, what are the becauses of this असे गोडबोले मास्तराना सांगितले. ते दुरुस्त करावयास गोडबोल्यानी सांगताच अब्दुल–कादर शेखानी what are the grounds for this असे केले तर रामचंद्र गणेशानी मूळ वाक्यातील be खोडून of चे जागी फक्त for केले. तसे करताना व्याकरणाचे बारकावे सांगून मराठीतील " कारण " हा एकच शब्द नाम व उभयान्वयी अव्यय म्हणून वापरला जातो तर इंग्रजीत cause हे नाम आणि because हे उभयान्वयी अव्यय हे सांगण्यास रामचंद्र गणेश चुकले नाहीत.


शाळेतील अभ्यासाव्यतिरिक्त रामचंद्र गणेश आणि त्यांचे स्नेही खेळण्या–हुदडण्यातही वाकबगार होते. कुस्त्या खेळण्यापासून सर्व तऱ्हांच्या व्यायामात ही मंडळी हौसेने भाग घ्यावयाची. एकदा छत्रपती घराण्यातील आण्णासाहेब भोसले यांच्याशी कुस्ती खेळण्याचा प्रसंग आला असता, छत्रपतीना टांग द्यावी लागेल म्हणून रामचंद्र गणेशानी तो प्रसंग टाळला; पण कुस्ती खेळताना तसल्या गोष्टीचा विचार करण्याचे कारण नाही, म्हणून आपण खुशाल कुस्ती खेळली अशी आठवण अबदुल–कादरसाहेब शेख यानी स्वताच सांगितली आहे. धबाधबी खेळताना कोणी कोणाची पाठ अधिक तिंबली, अशी चढाओढ रामचंद्र गणेशांच्या स्नेहीमंडळीत



सातारा कन्याशाळा मार्गदर्शन मंडळ १९४८



मुंबईचे गव्हर्नर राजामहाराजासिंग यांचे समवेत नामदार भाऊसाहेब (१९५०)



निवृत्तीकालात १९५३.

मध्यभागी- भाऊसाहेब, बाबूभाई पटेल, स्टेट ट्रान्स्पोर्टचे मोघे, कलेक्टर पाटील.

चालत असे. सुरपाट्या हा सर्वात रामचंद्र गणेशांचा आवडता खेळ. हरीभाऊ आंबेडकर, बापूराव बक्षी, हरिभाऊ भिडे हे पुऱ्या उंचीचे गडी बहुधा सूरवाले असावयाचे तर धोंडोपंत जोशी, महादेवराव सोहनी, रामचंद्र गणेश सोमण यांच्याकडे कोंड्या फोडून लोण पोचवावयाची कामगिरी त्यांच्या ठेंगूपणामुळे असावयाची.

सहली हा काही त्या काळी शाळांचा शिरस्ता नव्हता. तरी अवळीभोजने, वनभोजने अशा काही निमित्ताने सहली होत असत. एकदा वैकुंठ चतुर्दशीला अशी सहल यवतेश्वराला गेली असता, तेथील महादेवास रुद्राभिषेक झाल्यावर, आपल्या इतर सवंगड्याबरोबर तीर्थप्रसाद अबदुल-कादर शेखनाही रामचंद्र गणेशानी देवविला.

अशा खेळीमेळीच्या वातावरणात रामचंद्र गणेशांच्या मनाची, मेंदूची आणि मनगटाची ही तयारी झाली. ही तयारी होत असताना मित्रमेळाव्याचा आनंद अनुपम असे. प्रत्येकाची वृत्ति जणु अशी होई की--

" आला आनंद आला, मिसळुनि गमजा, तो करी रे खमंग ।
सेवाया बोलवी की जिवलग सगळे, जे नव्हेती सवंग ।।
मेळाव्याच्या प्रसंगी उठुनि विलसु दे सूक्ष्म-चातुर्य-रंग ।
प्रेमाचा ज्या जिव्हाळा खुलव-खुलवतो व्यापुनी अंतरंग ।।
ओवी त्याच्या भरीला मनन करुनिया ग्रंथिच्या चार ओळी ।
ज्या योगे या जगाचा परिचय घडुनी चिंतना येइ खोली ।।
घेई झाडा दिनाचा, लगटुनिच करी आखणी की उद्याची ।
ब्रीदाची मात कोठे, फसगत कुठली ओळखी घेइ त्यांची ।।

खेळ आणि अभ्यास अशा दोनही गोष्टीत रमून जाणाऱ्या रामचंद्र गणेश आणि त्यांचे स्नेही याना आपल्या परीक्षा वा कसोटी यातील यशाबद्दल कधीच काळजी नसे. १८९२ साली यू.एस्.एफ्. चा निकाल लागावयाच्या दिवशी ही मंडळी सुरपाट्या खेळण्यात इतकी गुंग झाली होती की परीक्षेचा निर्णय हाती आल्यावर हायस्कूलचे हेडमास्तर रा. ब. पाठक याना राहवले नाही म्हणून त्यानी गणेशपंत सोमणांच्याकडे निरोप पाठवून त्यांच्या चिरंजीवास बोलवून घेऊन निकाल सांगितला व विचारलेही- " रामभाऊ, आज निकालाच्या दिवशी तू असा रे कसा ? " त्यावर रामचंद्र गणेशानी उत्तर केले- " " Work while you work, And play while you play. " हे आपणच नाही का आम्हास शिकविले ?"

## २० शिक्षक सोमण

शिक्षकाचा पेशा पतकरल्यावर आपल्या विद्यार्थ्यांना " बे दुणे चार " च सांगावे लागतात आणि इतक्या बिनचूक व्यवहार–चतुराईने जगात वागता आले म्हणजे कोणी झाला तरी माणसाचा महेश्वर होतो, असे त्यांच्या मनावर बिंबवावे लागते. हे बिंबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रामाणिक शिक्षकापैकी ती कला जन्मभर साधली याचा आढावा कोठे कोणी घेतल्याचे पाहण्यात नाही. कारण " प्रवचनापेक्षा आचरण श्रेष्ठ " असे आपल्या विद्यार्थ्यांना शिकविणारे शिक्षकही तेवढे आपले प्रवचन केले की आपले काम संपले, असे मानण्यातच गर्क झालेले बहुतकरून आढळतात. " प्रवचनापेक्षा आचरण श्रेष्ठ " असा उद्घोष वाक्प्रचार होऊन राहिला याचे खरे कारण ज्याने प्रवचन करावयाचे त्यानेच ते वर्तनांतरित करून दाखविले म्हणजे समाजातील शिकाऊ मनावर त्याचा ठसा कायम उमटतो. प्रवचन किंवा त्यातील जे तत्वज्ञान आचरणशुद्ध राखता येत नाही, ते ग्रंथालयातील नीट लावून ठेवलेल्या कपाटातील ज्ञानाइतकेच सुखरुप व सुंदर असते. म्हणून विद्यार्थ्यांना आपण क्रमिक पुस्तके शिकविताना अगर त्यांच्या वयापरत्वे त्याना निरनिराळे विषय सांगताना त्यांच्या आयुष्यात उपयोगी पडणारे आणि त्यांच्या दैनंदिन जीव–नात आचरणशुद्ध राहू शकणारे तत्वज्ञान त्यांच्या मनावर अप्रत्यक्षरीत्या बिंबवावयाचे असते. त्यासाठी स्वता शिक्षकाला भूतकाळातून वर्तमानकाळ कसा निर्माण झाला आणि त्यातून भविष्यकाळ कसा विकासणार आहे, याची स्वप्ने पडावी लागतात. उद्याचे जग कसे बनेल, त्यात आपला देश कोठे राहील, त्याला त्याचे मानाचे स्थान मिळविण्यासाठी आणि ते मिळाले असेल तर ते टिकवण्यासाठी कोणती जीवनरेखा काढावी लागेल, त्यात आपल्या देशाच्या सुपुत्राना आणि सुकन्याना कोणती कर्तव्ये पेलावी लागतील, ती पेलण्याची तयारी त्यानी कशी करावी, याचे सम्यग् ज्ञान शिक्षकाला असले तरच " राष्ट्राची रचना शाळाशाळांच्या वर्गावर्गातून होते " हे वचन सार्थ ठरावयाचे. ते सार्थ ठरविताना, समाजातील शिष्टाचार, व्यावहारिक जीवनातील दैनंदिन गरजा आणि पालकांच्या आकांक्षा व अपेक्षा, सरकारी शिक्षण–खात्याने लावून दिलेली शिस्त आणि नेमलेली क्रमिक पुस्तके या सर्वांच्या धाग्या–दोऱ्यांची वीण लक्षात घेऊन शिक्षकाला आपल्या विद्यार्थ्यांची मने, मेंदू व मनगटे तयार करावयाची असतात. प्रत्येक विद्यार्थी आपण काही तरी गुणसंपन्न आहोत या आत्मविश्वासाचा, आपण कालच्यापेक्षा काही तरी जास्त आज शिकलो अशा समाधानाचा आणि कालच्यापेक्षा आपण आज काहीतरी गुणाची कमाई केली अशा प्रगति–प्रियतेचा निपजला, तरच " विद्या असते शाळेत ! " हे वचन अनुभ–वसिद्ध ठरेल. शिक्षकाने या गोष्टीकडे लक्ष ठेवले तरच बोलला शब्द न चाटणारा, लिहिला शब्द न खुडणारा आणि टाकले पाऊल माघारी न घेणारा, दमदार असा

राष्ट्रीय घटक विद्यार्थ्याविद्यार्थ्यांतून निर्माण होईल. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आणि मिळवल्यावर ते टिकविण्यासाठी अशा नजरेच्या शिक्षकांची व त्यानी चालविलेल्या शाळांची हिंदुस्थानाला गरज प्रामुख्याने होती व आहे. शिक्षणाचे राष्ट्रियीकरण त्याच उपायाने सुसाध्य आहे.

भाऊसाहेब सोमण १८९३ साली शिक्षकी करू लागले तेव्हा राष्ट्रीय शिक्षणाचा वरील पल्ला नजरेत ठरला नव्हता, मग व्यवहारात कोठून उतरणार? प्राध्यापक विष्णु गोविंद विजापूरकरांच्या राष्ट्रीय शिक्षण–प्रणालीचा किरण अजून क्षितिजावर पडावयाचा होता; पण विष्णुशास्त्री चिपळूणकरानी सुरू केलेल्या स्वावलंबी, राष्ट्रीय वृत्तीच्या शिक्षकानी स्वतंत्रपणे चालविलेल्या व शिक्षण स्वस्ताईने साहेबाच्या तोडीस तोड उठवून देणाऱ्या शाळांचा हंगाम जोरात होता; अशा काळात भाऊसाहेब सोमणानी आठ वर्षे शिक्षकी केली आणि त्याच आठ वर्षात ‘ हिंदी असंतोषाच्या जनकाची ’ कणखर पावले भारतीयाना स्वातंत्र्याची वाटचाल दाखवू लागली होती. या परिस्थितीचा परिणाम सोमणांच्या शिक्षकीवर झाल्याशिवाय राहिला नाही.

एक तर, आपल्याला शिकवावयाचा असेल तो विषय घरी एकदा नीट पाहिल्याशिवाय, सोमण वर्गात शिरावयाचेच नाहीत. शाळा चुकवावयाची नाही; अभ्यासाच्या धड्यातील स्वल्पविरामासुद्धा घडघड शुद्धलेखन सांगितल्यासारखा मजकूर तीव्र स्मृतिमुळे डोळ्यासमोर असावयाचा; पांडित्य–प्रदर्शनापेक्षा सारभूत गोष्टींचा बारकाव्यासुद्धा पाढा एवढा तयार की तोच ऐकून कोणीही सगळा नकाशा तयार करावा! अशा तयारीमुळे शंकेखोर विद्यार्थ्यांना तोंडझोंबी करावयास वावच नसे. सोमण बहुधा भाषाविषय शिकवत. त्यातही इंग्रजी खालच्या इयत्ताना तर संस्कृत व मराठी वरच्या वर्गाना. वडिलापासून विद्यार्थिदशेत मराठी व्याकरणाचे पापुद्रे नि पापुद्रे उलगडावयाला शिकलेले भाऊसाहेब सोमण इंग्रजी व्याकरणाचेही पापुद्रे तसेच आपल्या विद्यार्थ्यांना उलगडून दाखवीत. प्रॉसोडी किंवा छंदशास्त्र समजून घेण्याच्या किंवा देण्याच्या कैचीत ते कधीच शिरले नाहीत. त्याना तो “ खटाटोपो भयंकरः ” च वाटे. संस्कृतमध्ये कालिदासाचा रघुवंश आणि बाणाच्या कादंबरीचे सार ही पुस्तके वाचल्याशिवाय इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्यांचे विद्यार्थीपण ( चांगले १९२५ पर्यंतही ) सार्थ मानले जात नसे. या दोन्हीतही विद्यार्थ्यांची गति सानंद करून देण्यात भाऊसाहेब सोमणांची मोजकी व सूचक शब्दप्रणाली फार परिणामकारक ठरे. मराठी शिकवताना मोरोपंतांच्या केकावली व संशयरत्नमाला यांच्यात गुरफटण्यापेक्षा तुकारामाच्या अभंगवाणीत, रामदासाच्या मनाचे श्लोकात आणि विशेषतः मुक्तेश्वराच्या ओव्यात रंगून जाणे व विद्यार्थ्यांना रंगविणे हा एक सोमणांचा आनंद होता. पण कवितापेक्षा निबंधमालेतील निबंध शिकवण्यात त्याना रस असे. भाषाविषयाच्या खालोखाल इतिहास

व भूगोल शिकविण्यात भाऊसाहेबाना प्रेम वाटे. इतिहासातील घटनांच्या चिकित्सेत भावनाविवशतेपेक्षा बुद्धिवादावर भाऊसाहेबांचा भर असे; पण कोणत्याही कारणाने आदरणीय आणि पवित्र मानल्या गेलेल्या वस्तुजाताची किंवा व्यक्तिप्रकृतीची प्रतिष्ठा कमी होईल, असा बुद्धिवाद ते विद्यार्थ्याना शिकवीत नसत. किंबहुना तशा तऱ्हेचा बुद्धिवाद त्याना वावदूकपणाच वाटे.

शिक्षक म्हणून वरीलसारखे विषय शिकविताना सोपे, सरळ पण ऐकणाराच्या हृदयाला भिडणारे असे बोलण्याची लकब भाऊसाहेबानी आपल्या वडिलापासूनच उचलली होती. बोलल्याप्रमाणेच लिहिणे ठेवले म्हणजे भाषा सोपी, शैली प्रभावी आणि शुद्ध-लेखन टिपीचे होते, अशी परंपरा आप्पा मास्तरानी म्हणजे गणेशपंत सोमणानी घालून दिली होती. तीच भाऊसाहेब सोमणाना आपली शिक्षकी प्रभावी करताना उपयोगी पडली. फार काय, आपण एका नाव केलेल्या शिक्षकाचे चिरंजीव आहोत आणि शिक्षकी करताना आपल्या वडिलांच्या नावाला कमीपणा न येईल, अशी आपण शिक्षकी केली पाहिजे, याची हमेषा काळजी भाऊसाहेबानी घेतली व हरएक प्रसंगातून व धड्यातून घेण्यासारखे काय आहे हे विद्यार्थ्याना शिकवता शिकवता आपल्या आचरणाने "ते घेण्यासारखे" कसे व्यवहार-शुद्ध आहे, हेही विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले.

गणेशपंत सोमणांचा दरारा जेवढा त्यांच्या विद्यार्थ्याना वाटला, तेवढा भाऊसाहेबांचा दरारा त्यांच्या विद्यार्थ्याना वाटला नाही, हे खरे; उलट भाऊसाहेबांचे विद्यार्थी भाऊसाहेबाबरोबर "लघळपणा" ज्याला म्हणता येईल असे स्वातंत्र्य भोगीत म्हटले तरी चालेल; पण ते सर्व वर्गाबाहेर. त्याचा फायदाही स्वता भाऊसाहेबानी उठविला. क्रमिक पुस्तकांच्या आणि ठराविक अभ्यासक्रमाच्या बाहेर अफाट पसरलेले जग बघावयास भाऊसाहेब विद्यार्थ्याना सांगत. वर्गाबाहेर आपल्याशी सलगी करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी "लहान-थोर" परीक्षून कोणी तालमीला, कोणी मेळ्याला, कोणी समाजातून बातमी आणावयाला, अशी निरनिराळ्या कामाला मंडळी लावली आणि कर्तव्यदक्ष नागरिकत्वाचे धडे सामूहिक जीवनात भाग घ्यावयास लावून विद्यार्थ्याना दिले. १८९४ साली वाईचे नानासाहेब वैद्य प्रभृति पुढारी बंदीखान्याबाहेर पडताच, त्याना सातारा शहरात सवाद्य मिरवित न्यावयाच्या परवानगीचा अर्ज संबंधित अधिकाऱ्याकडे देऊन, अनुकूल उत्तराची वाट पहात कचेरीच्या बाहेरील पारावर भाऊसाहेब सोमण मास्तर बसले होते, ते आपल्या विद्यार्थि-अनुयायांच्या जोरावरच. नोकर-शाहीने त्यांची निराशा केली, हा भाग वेगळा ! पण शाळेच्या बाहेर समाजाची सेवा म्हणून जाणत्या माणसाला काही कर्तव्य असते, हे भाऊसाहेब सोमण आपल्या विद्यार्थ्यावर ठसवीत आणि त्यांच्याकडून काही समाजसेवा प्रत्यक्षतः घडवीत. सुटलेल्या वाईकर पुढाऱ्यांचे मूक स्वागत सोमणानी केलेच.

सहली आणि कुस्त्या–खेळांच्या दंगली विद्यार्थ्या–विद्यार्थ्यांमध्ये प्रसंगानुसार अगर उत्सवविशेषी करविणे हाही भाऊसाहेबांच्या शिक्षकीचा एक विशेष होता. शिक्षकाबद्दल विद्यार्थ्यांना भीतिपेक्षा प्रीति वाटली पाहिजे, पण सामाजिक नीति त्यानी निष्ठेने पाळून सर्वांच्या आपुलकीचे आशीर्वाद घेत घेत स्वताची उन्नति साधली पाहिजे व त्यासाठी " साधी राहणी, उच्च विचारसरणी; कल्याणकारक करणी आणि बहुतांचे बहुत सोसून सेवेने मनधरणी " यांचा अवलंब प्रामुख्याने त्यानी करावा, असा शिक्षक भाऊसाहेब सोमणांचा कटाक्ष असे; तथापि त्यांच्या शिकवणीने ते नुसते विद्यार्थी–प्रियच नव्हते तर पालकप्रिय होऊनही त्यानी खाजगी शिकवण्यांच्या मोहाला बळी न पडण्याचे व्रत त्यानी पाळले. खाजगी शिकवणीचा रुका त्यानी आपण होऊन हातावेगळा केला. याचे कारण, शाळेतील शिकवणीकरता आपल्याला ठरलेला दाम मिळतो आणि शाळेतील शिकवणीनेच सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होण्याइतके तयार झालेच पाहिजेत, तरच तो शिक्षक कर्तव्यदक्ष ठरतो, अशी भाऊसाहेबांची श्रद्धाच होती. त्यामुळे रुका जसा त्यांच्या संग्रही पडला नाही, तसा परंपरा सांगणारा शिष्यही, अनेक शाळातून नोकरी केल्यामुळे सातत्याच्या अभावी, भाऊसाहेबाना निर्माण करता आला नाही. त्यांच्या शिक्षकीचा पेढा कंदी असला तरी फिका राहिला, असेच भाऊसाहेबांच्या गोडव्यातीलही माणसांचे मत आहे.

# २१ वकील सोमण

रामचंद्र गणेश सोमण यानी वकिलीची परीक्षा दिल्यावर दादासाहेब करंदीकरांच्या हाताखाली त्यानी वकिलीची वळणे गिरवली. त्या पंचवार्षिक योजनेत दादासाहेबांच्या वकिली कौशल्यातील मुख्य गुण त्यानी नेमका उचलला. मुद्दा सोडावयाचा नाही, जे काही ठसवावयाचे ते मोजक्या शब्दानी ठसवावयाचे आणि " उलट तपासणी " आपल्याच अंगावर ( पक्षकारावर) उलटेल असे काही करावयाचे नाही, हे दादासाहेब करंदीकरांच्या वकिलीचे पवित्रे होते. हे पवित्रे रामचंद्र गणेशानी आत्मसात् केले, तरी दादासाहेब सव्यसाची वकील होते, तो पूर्णपणा रामचंद्र गणेशाना नव्हता. दादासाहेबांच्या वकिलीने विलायतेपर्यंत मुलूखगिरी केली; भाऊसाहेबांच्या वकिलीने महाराष्ट्राबाहेर मजल मारली नाही. दादासाहेब दिवाणी, फौजदारी अशा दोनही तऱ्हांच्या दाव्यात रंगून काम हाकीत. रामचंद्र गणेश उर्फ भाऊसाहेब सोमणाना तो ढंग साधला नाही. फौजदारी खटला लढविण्यातील आपले कौशल्य शंकर हरि साठे यानी बरोबर उचलले तर दिवाणी दाव्यातील आपला रोख सोमणानी आत्मसात् केला असे स्वत: दादासाहेबच सांगत. याचा अर्थ असा नव्हे की मनावर घेतले तर भाऊसाहेब सोमणाना फौजदारी कज्जे चालविण्याचे जमत नसे. आपल्या स्नेह्यांचे, सार्वजनिक कार्यकर्त्यांचे अगर बहोत दिवसांच्या पक्षकारांचे फौजदारी खटले चालवावयाची पाळी आली तेव्हा तेव्हा भाऊसाहेबानी ते चालविलेही. पण सबंध वकिलीच्या सत्तेचाळीस वर्षांच्या लांबीरुंदीत फौजदारी कज्जाचे खातेपानच नव्हते, असे कोणास म्हणावयास सापडू नये, एवढीच त्यांची गणती होती. आणि ती गणती गणिताने अशी बिनचूक होती की हाती घेतलेल्या एकाही फौजदारी कज्ज्यात भाऊसाहेबाना अपयश आलेले नाही. तथापि, फौजदारी कज्ज्यात यश मिळवताना, आपला पक्षकार गुन्हेगार असला तरी त्याला " संशयाचा फायदा " मिळवून द्यावयाची खटपट करावी लागते, आपल्या पक्षकाराबरोबर आपल्या मनाचे नैतिक अधिष्ठान,त्यासाठी सत्याला दुमतेतिमते करावेच लागले नाही तरी दुरमडावे लागत असल्याने, खात्रीने डळमळतेच असे नव्हे, पण क्षणभर चुरगळते तरी खास. अशी वस्तुस्थिति असल्याकारणाने, तो प्रसंगच सहसा नको, असा पोटाचा धंदा म्हणून वकिली करतानाही भाऊसाहेब सोमणांच्या मनाचा कल होता. दिवाणी दाव्यातून तसे प्रसंग येत नाहीत, असे नाही. पण फौजदारीच्या मानाने त्याची टक्केवारी फारच कमी. म्हणून दिवाणी कामे चालविण्याकडे सोमणांची प्रवृत्ति साहजिकच प्रवाही. त्यातून, दिवाणी काय किंवा फौजदारी काय, कज्जेदलालीत " वस्तुस्थिति " न्यायमूर्तींच्या समोर उभी करताना, आपापल्या पक्षकाराला सांभाळून घ्यावयासाठी ती कायद्याच्या कलमबाजीने उभी करण्याचा प्रयत्न करीत असता, वकिलाना अपलाप, " अर्थी विपर्यास, " करण्याचा मोह होतो, एव–

ढेच नव्हे, तर सामाजिक मनाची बराब्बर घडण लक्ष्यात न घेताच, आपल्या राजकीय इज्जतीकरता अगर केवळ उच्चतम पातळीवरून जे कायदे कारभार–नियंत्रकानी केलेले असतात, त्यांच्या घडणजडणीला जपण्याकरताही सत्याचे अपलाप आणि " अर्थी विपर्यास " करून वकिलाना आपल्या पक्षकाराना नि आपल्या धंद्याला शाबूत ठेवावे लागते. ज्यांच्या अंतःकरणाला व मेंदूला हे समरस होण्यासारखे नसते, त्याना पाऊलटाक (ओरिजिनल) न्यायमंदिरात काम करण्याचे जमत नाही. कारण फिर्यादीचा अगर कैफियतीचा मसुदा (ड्राफ्ट) तेथे परिणामकारक असावा लागतो. परिणामकारक मसुदा तयार करणारे वकील विरळा. भाऊसाहेब सोमण हे तशापैकीच वकील होते. पाऊलटाक न्यायमंदिरातून वस्तुस्थिति ठरून न्यायाच्या काटेकोरपणासाठी अगर सोज्ववलतेच्या सिद्धीसाठी अथवा कायद्याच्या व्यवहार–वैयर्थ्यापायी किंवा वस्तुस्थितीतील विपर्यास–विमोचनाकरता, जेव्हा कज्जे दाद–घेऊ (अपील) न्यायमंदिरात येतात, त्यावेळी वकिलांच्या अभ्यासापासून बुद्धिमत्तेच्या तेजाळ चमकदारीपर्यंत सगळ्या गुणाना मोठा अवसर आणि अवसान सापडते. दिवाणी दाव्यात आत्मीयतेने काम करणाऱ्या भाऊसाहेब सोमणांच्या तरबेजीचा लौकिकही दाद-घेऊ न्यायमंदिरातच काम करण्यामध्ये प्रकाशला व फैलावला.

सुटसुटीत, असंदिग्धपणे आपले म्हणणे न्यायमूर्तिपुढे मांडणारा निष्णात वकील म्हणून भाऊसाहेब सोमणांची कीर्ति व्हावयास अर्थातच त्यानी दादासाहेबांच्या सावलीतून बाहेर येऊन स्वतंत्र व्यवसाय उभारल्यावरही एक तप लोटावेच लागले. न्यायासनापुढे आपल्या पक्षकाराची बाजू मांडताना (आर्ग्युमेंटचे वेळी) निरीक्षक म्हणून आलेल्या प्रेक्षकाने, शिकाऊ वृत्तीच्या होतकरू वकिलाने, विरुद्ध बाजू घेऊन सामन्यास उभ्या राहिलेल्या अभ्यस्त व्यवसाय–बंधूने, अगर खुर्चीवर बसून निर्विकार मनाने न्यायाचा तोल सांभाळण्याची आपल्यावर जबाबदारी आहे या जाणिवेच्या उमेदीने कान देणाऱ्या न्यायमूर्तींनी––सर्वांनीच भाऊसाहेब सोमणांच्या डोळ्यात उठणारी एक तऱ्हेच्या आत्मविश्वासाची चमक अगदी पहिल्यापासून पाहिलेली आहे. भाऊसाहेब सोमणांच्या वकिलीतील हेच एक वैशिष्ठ्य होते. न्यायमूर्तींचे शंकासमाधान करीत असताना ते करीत असलेला कोटीक्रम नवख्या वकिलाना तर मंत्रमुग्धच करी. अभ्यासापेक्षा बुद्धीची तीव्र धार आणि तीपेक्षाही समयसूचकता ही भाऊसाहेबांच्या वकिलीची दुसरी वैशिष्ठ्ये होती. दाद–माग (अपील) कितीही गुंतागुंतीची असो, त्या गुंतागुंतीतून वस्तुस्थितीचा सहज बोध ही कला भाऊसाहेबानी एवढी साध्य केली होती की " निर्णयसिंधु " (केस लॉ) मंथनापेक्षा वस्तुस्थितीचा ठसाच भाऊसाहेबांच्या तर्कशुद्ध मांडणीने न्यायाचा काटा स्थिर करी. आपल्या पक्षकाराची कड भाऊसाहेब घेत असता, उलट बाजूच्या वकिलाने मध्येच शंका प्रदर्शित केल्यास

" काऽय ! ! " अशी प्रश्नार्थक व चमत्कारिक मुद्रा करून आकुंचित डोळयानी पहात भाऊसाहेब म्हणावयाचे की–"अहोऽ, पण कऽळलऽकी "! आणि पुन्हा भाऊसाहेबांच्या वाक्प्रणालीची गाडी आपला मार्ग कापीत सरळ जावयांची.

न्यायमंदिराशी आणि कचेरी-व्यवसायाशी संबंध नसलेल्या डोळयानी कधीकाळी पाहिलेल्या भाऊसाहेबांच्या वकिलीचे निरीक्षण असे शब्दध्वनित करण्यापेक्षा भाऊसाहेब सोमणांच्या वकिलीचे निरीक्षण छत्तीस वर्षात अधून मधून पण वरचे–वर करण्याचा योग आलेल्या एका अनुभविकाचा अभिप्राय येथे सादर केला म्हणजे सोमण वकिलांची सार्थ कल्पना कोणाही वाचकास येईल. सदर अनुभवी म्हणतात:–

" दाद–घेऊ न्यायमंदिरातील वकील म्हणून विचार करता, ठाणें, नाशिक, पुणे, सातारा अशा जिल्ह्यातील दादमाग खटले ऐकण्याची जी संधि मला मिळाली आहे, तिच्यावरून असे म्हणता येते की कोणत्याही सुप्रसिद्ध वकिलाला सोमण भारी झाले नाहीत तरी कमी पडणार नाहीत. निर्मळपणा आणि नेमकेपणा सोमणांच्या (आर्ग्युमेंट) मंडनविलासातील " इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपिशरादपि " होत. त्यांचा मंडनविलास ( आर्ग्युमेंट ) कमावलेल्या शब्दसंपत्तीचा आकर्षक झगझगाट कधीच नसे. आपल्याला काय म्हणावयाचे ते नेमके ऐकणाराच्या अंतःकरणाला भिडविणाऱ्या शब्दसंचाराचा तो एक सरकफास असे. त्याशिवाय त्या मंडनविलासात काहीच नसे. आणि तरीही त्यात शब्दांची इतकी काटकसर की पटाईत पुरस्कर्त्यांनी चकित व्हावे आणि सोमणांची कला आपल्याला यावी, असे आशाळू बनावे. आपल्या कायद्याच्या ज्ञानाला गुरुबाजीची झाक सोमणानी कधीच येऊ दिली नाही. पण आपल्याला अनुकूल असा निर्णयसिंधु त्याना पक्का ठाऊक आणि त्यातील मख्खी तर ते कधीच दवडावयाचे नाहीत. एकाद्या कज्जाचा निर्णय म्हणजे बाडच्या बाड का होईना, त्यातील इतस्ततः पसरलेल्या शेऱ्यानी आणि अभिप्रायानी इतर वकील वाहून गेले तरी त्या बाडाचे बिनचूक पृथक्करण सोमण हमखास करावयाचे. अलिकडे अलिकडे, नवीन प्रसिद्धी पावलेल्या निर्णयांचा सोमणांचा अभ्यास यथा–यथाच. पण लॉरिपोर्टांच्या पानापानावरील शीर्षकावर उडती नजर फेकली तरी कायद्याचा तारीखतागायत रोख त्यांच्या ध्यानांत यावयाचा; इतका की पुष्कळ डोके घा–घालून डोळे फाडणारानाही ते जमणार नाही. सोमणांच्या तीन तपाहून अधिक झालेल्या वकिलीच्या रूळी (प्रॅक्टिस) तील अनुभवामुळे, त्यांचा आत्मविश्वास असा दृढावला आहे की अगदी हव्या त्याच क्षणी आपल्या हातच्या खटल्यातील दुबळा दुवा कोठे आहे तो कबूल करण्यास त्याना काहीच वाटत नाही; आणि बिगर महत्त्वाच्या मुद्यावरून तर ते केव्हाच घसरून जातात आणि ऐके–णारांच्या मनाला पळवतात. आपल्या पक्षकाराच्या बाजूने खटल्याचे एकादे दुसरेच अंग असे ठाकठिकपणे सोमण दाखवतील की न्यायदेवतेला कौल लागलाच पाहिजे.

सोमण मोठे चतुराईचे पुरस्कर्ते आहेत. न्यायमूर्तीला ते एकदम हेरतात व हरण करून नेतात. हे होत असता, ताकास तूर लागत नाही. सोमणांची गोड मुद्देमांडणी सहज–शुद्ध पद्धति, परोपयोगी, चपळाई, विरोधी बाजूबद्दलही अकृत्रिम न्यायबुद्धि, यांच्यायोगे सोमण आणि न्यायमूर्ति यांच्यामध्ये हार्दिक सहसंवेदना निर्माण होण्यात केवढा तरी पल्ला गाठला जातो. त्यातून त्यांचे वयोवृद्धत्वाचा एक बाऊच नव्या उमेदीच्या तरुण न्यायमूर्तींना आणि सामन्यास उभ्या राहणाऱ्या ताज्या वकिलाना वाटतो. या जादुगाराने आपल्या खिशात पार तळापर्यंत आपल्याला केव्हा खमाटले ते त्याना पुष्कळवेळा कळतच नाही अगर कळलेच तर फार उशीरा कळते, आणि मग त्यानी धडपड करूनही सोमणांच्या कचाटच्यातून सुटण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी ते त्याना जड गेल्याशिवाय रहात नाही."

हे अनुभवसिद्ध वर्णन खरेच आहे. भाऊसाहेब सोमणानी आपले गुरु दादा–साहेब करंदीकर हे सामन्याला उभे राहिले असताहि खटले जिंकले आणि दादा–साहेबांच्याकडून शाबासकी मिळवली. हे दृश्य ज्यानी पाहिले आहे त्याना तर सांगा–वयाला नकोच, की भाऊसाहेब सोमण आपल्या पक्षकाराच्या गळचात येणारे खटल्याचे अंगही अशा बेताने सांगून टाकावयाचे की खटल्याचे सबंध चित्रात त्याचे वैगुण्य न वाटता गालबोट व्हावे. हा त्यांचा क्रम अव्याहतपणे १९५४ मध्ये मिरजेस (शेवटचा) दादमाग खटला चालवीपर्यंत यशस्वीपणे ठेका धरून होता. सातारा जिल्ह्याचे नाव आणि त्याचबरोबर वकिलीची प्रतिष्ठा दादासाहेब करंदीकरानी पार विलायतेपर्यंत नेली आणि त्या दोहोनाही सात्विकतेची सळसळ दादासाहेब करंदीकरांचे शिष्य भाऊसाहेब सोमण यानी महाराष्ट्रभर देऊन त्याना अविस्मरणीय केले.

# २२ संपादक सोमण

ब्रिटिश रियासतीबरोबर पाश्चात्य संस्कृति, संस्कृतीबरोबर तिची उपकरणे, आणि उपकरणाबरोबर ती वापरावयाची विद्या, हिंदुस्थानात हळू हळू मूळ धरून बसली. वृत्तपत्रांचा संसार हा एक त्यातील भाग असून लोकशिक्षण, लोकमत–प्रदर्शन, आणि सार्वजनिक जीवनाची दैनंदिनी या दृष्टीने वृत्तपत्रे म्हणजे एक शस्त्रशक्ति किंवा सत्तादण्ड होऊन बसली आहेत. सातारा जिल्ह्याला वृत्तपत्रानी राष्ट्रीय वळण लावले ते १८५८ पासून.

१९०६ साली 'प्रेक्षक' पत्रातूनच 'प्रकाश' कसा निर्माण झाला याचा इतिहास मागे सांगितलाच आहे. भाऊसाहेब सोमणानी प्रकाश पत्राची धुरा खांद्यावर घेतल्यापासून काँग्रेसच्या राजकीय धोरणाला जनतेचा पाठिंबा कसा मिळेल याकडेच त्यानी मुख्यत: लक्ष ठेविले. विशेषत: सुरतेच्या राष्ट्रीय बखेड्यानंतर, मतमतांतराच्या हातोड्यानी राष्ट्रीय सभेच्या धोरणाला धक्का बसला तसा तो साताऱ्यातही बसावयाचा. पण जसे लोक तसाच प्रत्येक गोष्टीचा झोक. अर्थात् फटकविला तर चमक देणारा, पण वरून अगदी थंड अशा चकमकीच्या धोंड्या–सारखा सातारा जिल्ह्याचा स्वभाव सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या बेसुरानंतरही वृत्तपत्रांच्या रकान्यातून एकसारखा ओघ राखून राहिला. सोमणांच्या प्रकाश पत्राने १९०६ साली स्वदेशी, स्वराज्य, राष्ट्रीय–शिक्षण आणि बहिष्कार यानी चेतविलेला अग्नि विझू दिला नाही; तर वेळेला, थोडाफार फुलविलाच. दडपशाहीची लाट विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात धिंगाणा घालीत असताही प्रकाशने राष्ट्रीयवृत्तीच संगोपण्याचे आपले व्रत सोडले नव्हते. सरकारची इतराजी झाली तरी लोकाना राष्टीयत्त्वापासून ढळविणाऱ्या गोष्टी कोणत्या, सरकारच्या दडप–शाहीला कोठे, का आणि कसे भिऊ नये, त्याचप्रमाणे लोकांचे लोकानी स्वावलंबी आणि तेजस्वी कसे व्हावे, हे रोजच्या प्रश्नांचा ऊहापोह करून सांगण्यास प्रकाशने कमी केले नाही. प्रकाश नुसत्या राजकीय प्रश्नांचाच विचार करीत होता, असे नाही. सामाजिक आणि आर्थिक प्रश्नही, शैक्षणिक आणि धार्मिक प्रश्नाप्रमाणे प्रकाश हाताळीत असे. पण राष्ट्रीयत्वाबरोबर आपल्या ऐतिहासिक आणि सामाजिक परंपरांच्या स्वाभाविक विकासातून समाजाच्या नव्या शक्ति दरवळल्या पाहिजेत, आणि जीवनाचे नवे रंग उमटले पाहिजेत असा प्रकाशचा कटाक्ष होता.

हा कटाक्ष जिल्ह्यातील बातमी देताना, दुसऱ्यांचे लेख प्रसिद्ध करताना, पुस्तक–परीक्षणातून आणि संपादकीय लिखाणातूनही आढळतो. कसलेल्या वाङमय सेवकाचे लेख म्हणून हुडकावयास गेल्यास प्रकाशच्या रकान्यातून त्यांची भेट क्वचितच् होई. पण व्यवहारी माणसांच्या दक्षतेचे अचूक मार्गदर्शन प्रकाशमध्ये सापडल्याशिवाय रहावयाचे नाही. याचे कारण प्रकाशचे जाहीर संपादक भाऊसाहेब

सोमण आणि त्यांचे सहकारी गोविंदरावजी श्रोत्री–प्रभृति मंडळी ही रसिक असली तरी केवळ कल्पना–सृष्टीत आणि ध्येयवादात गुंगून रहाणारी नव्हती. फार काय प्रकाशचे वाचकही ललितवाङ्मयाच्या लुसलुशीतपणापेक्षा अगर उत्थापनाच्या उठावदार भाषेपेक्षा रोजच्या व्यवहारातील प्रश्नांचा उकाला समजावून घेण्यासाठी अधिक उत्सुक असत. त्यामुळे प्रकाश वर्तमानपत्र भावनाशील तरुणांचे केसरीइतके लाडके नव्हते. पण बुद्धि–भावनांचा मेळ घालणाऱ्या व्यवहारी व सात्त्विक मध्यमवर्गीयांचे, त्याचप्रमाणे आपले साधेसुधे प्रश्न सोडवून घेता घेता टिळकासारख्या राष्ट्रपुरुषाचे सांगणे आपल्याला कसे आचरता येईल हे दक्षतेने पहाणाऱ्या खेड्यातील अक्षर–मित्रांचे, प्रिय पत्र होते. प्रकाश पत्रावर केसरीच्या खालोखाल सरकारी रोष असण्याचे खरे कारण हेच होय. प्रतोदचा अवतार संपल्यावर प्रेस अॅक्टखाली सरकारमान्य संस्थातून प्रकाशला बंदी झाली. मॅझिनीच्या परीक्षणाचे निमित्ताने प्रकाशचा 'अभिनव भारत संस्थे'शी संबंध जोडण्याचा प्रयत्न सी. आय्. डी. नी केला. मग अनेक निमित्तानी प्रकाशला सरकारी ताकिदी मिळाल्या, आणि सरकारी जाहीरातींचा खुराक प्रकाशकडे चुकून सुद्धा वळला नाही, हे मुद्दाम सांगावयास नको. प्रकाशात प्रक्षोभक लेख नाहीत पण सत्ताधाऱ्यांची खुषमस्करीही नाही; स्फोटक राजकीय चळवळींना उत्तेजन नाही तथापि त्या करणारांचा धिक्कारही नाही; केवळ करमणूक करणारे लालित्य नाही, पण वाचकांचा वेळ वाया गेला असे वाटावयास लावणारे एक अक्षरही नाही; अशा तऱ्हेचे संपादन आणि संपादकीय लेखन प्रकाशचे भाऊसाहेब सोमण, गोविंदराव श्रोत्री यानी दक्षतेने केले.

प्रकाशमध्ये संपादकीय लेख लिहिण्याचे काम बहुधा गोविंदराव श्रोत्रींनी भाऊसाहेब सोमणांच्या बरोबरीने केले. कारण त्या दोघानाही सातारा जिल्ह्यात राष्ट्रीयत्त्वाचा विकास करण्याचा ध्यास आणि हव्यास होता. गोविंदरावजी श्रोत्रींचे लेख सात्त्विक असत आणि राष्ट्रीय भावनानी मोहरलेले असत. भाऊसाहेबांच्या लेखातून या दोनही गुणांचा मिलाफ झालेला असे व भरीला राष्ट्रीयपक्षाच्या टीकाकाराना झणझणित उत्तरही असे. तथापि भाऊसाहेबांच्या लेखणीचा झणझणितपणा विरोधकांच्या कपाळाला आठी घालण्यास लावणारा असावयाचा, रागाने मुठी वळावयास लावणारा नसावयाचा. थोड्यात गोडी, मुद्दा अचूक, मार्गदर्शन बिनचूक आणि टिळकांचे अनुयायित्व भाविक, असे भाऊसाहेबांच्या लिखाणातून स्पष्टपणे दृग्गोचर व्हावयाचे. संपादक म्हणून लोकशिक्षणाकरता भाऊसाहेबानी वृत्तपत्र हाती घेतले तरी हिंदुस्थानच्या राष्ट्रीय उत्थापनासाठी नवीन तत्वज्ञान त्यानी शोधून काढले नाही; तर, लोकमान्य टिळकासारख्या तत्वज्ञानी कर्तृत्ववंताने राष्ट्राला जे जे मार्ग दाखविले त्यांचे त्यांचे लोण बहुजनसमाजापर्यंत सोमणांच्या प्रकाशने पोचविले. लोकाची दुःखे लोकानी कशी उघडी

मांडावीत याचे लोकाना शिक्षण दिले. हे करताना भाऊसाहेब सोमणाना अर्थातच राष्ट्रीय पुढाऱ्यांचे जिल्हाभाष्यकार ही भूमिका घेऊन चालावे लागले.

लोकमान्य टिळकांचे पुढारीपण खच्ची करण्यासाठी ब्रिटिश नोकरशाहीने जे अनेक फासे टाकले होते त्यापैकीच महाराष्ट्रातील 'ब्राह्मणब्राह्मणेतरवाद' हा एक होता. या वादाचे बीजारोपण विसाव्या शतकाच्या आरंभापासूनच झाले. तथापि वा. दा. मुंडले यानी म्हटल्याप्रमाणे "कोल्हापुरचे शाहू छत्रपति व इंग्रज सरकार यांचे राजकीय दृष्टचा परस्पर सहाय्यक धोरण ठरेपर्यंत त्या वादास तीव्र स्वरूप आले नव्हते. मुळातच तो वाद विकारवश पायावर उभारला गेल्यामुळे ब्राह्मणाना खाली ओढणे हेच सदरहू चळवळीतून निघालेल्या वादाचे प्रमुख अंग बनले. पुढे सत्यशोधक जलशांची त्यात भर पडली. या जलशानी खेडेगावातील ब्राह्मणेतरात एक प्रकारची जागृति उत्पन्न केली. परंतु गुन्हेगारीकडे सहज प्रवृत्ति असणाऱ्या लोकाकडून काही अत्याचारही घडले." या सर्वांची बातमी देण्यापलीकडे सोमणानी ब्राह्मणेतर चळवळीबद्दल संपादकीय टीका कशी ती म्हणून लिहिली नाही. शिक्षणादि मार्गानी आपली उन्नति करून घेऊन ब्राह्मणाशी स्पर्धा करावयास ब्राह्मणेतर उभे राहिल्यावर ब्राह्मणवर्गात जागृति उत्पन्न होईल आणि समाजातील शक्तियुक्ति यांचा मिलाफ झाला म्हणजे भारताच्या पूर्वेतिहासास आणि संस्कृतीस अनुसरून भारताचा उत्कर्ष झाल्याशिवाय रहाणार नाही असा सोमणांचा विश्वास होता. आणि त्यासाठी ब्राह्मणब्राह्मणेतरांची दिलजमाई राष्ट्रीयवृत्तीने जेवढी करता येईल तेवढी आपल्या लेखाने आणि कृतीने करावयास सोमण चुकले नाहीत. सोमणांच्या या समाजसेवेचा गौरव भाऊराव पाटील यानी भाऊसाहेबांच्या साठी-समारंभाचे वेळी केला. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे ब्राह्मणब्राह्मणेतर चळवळीतील प्रत्येक बारिकसारिक गोष्टीवर भाष्य न करण्याचा जो संयम संपादक या नात्याने भाऊसाहेबानी पाळला त्याचे महत्व चटकन् लक्षात येईल.

भाऊसाहेबानी १९०६ सालापासून १९२४ अखेर २० वर्षेपर्यंत प्रकाशचे संपादन केले. या अवधीत सातारा जिल्हा राजकीय सभा आणि तिच्या कार्य-प्रणाली, सातारा जिल्हचात असलेल्या सहकारवृत्तीची जोपासना आणि मत-भिन्नतेतही शक्य तितका जास्तीतजास्त एक मार्ग काढण्याचा रोख, ही सातारा जिल्हचाची वैशिष्ठचे सोमणानी सातत्याने सांभाळली. लोकमान्य टिळकांची चतुःसूत्री, विशेषतः स्वदेशी, लोकमान्यांचे शिवाजी आणि गणपति उत्सव, आणि त्या निमित्ताने होणारी लोकजागृति, लोकमान्यासारख्या राष्ट्रीय पुढाऱ्यावर सरकारने कडक शिस्त धरताच समाजाला यावयास पाहिजे असा सात्त्विक संताप, होमरूल-लीगची चळवळ व तीमधून स्वार्थत्यागपूर्वक व्हावयाच्या स्वराज्याच्या ध्येयाची उपासना आणि पुढे लोकमान्यांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधीनी सुरू केलेल्या असहकाराच्या चळवळीतील परकीय सत्तेबद्दलची घृणा आणि शुद्ध

स्वदेशीचे स्वावलंबन, इत्यादींचा पुरस्कार सोमणानी आपल्या संपादकीय कार–कीर्दीत मोठ्या हिरिरीने केला. प्रकाश काढल्यापासून वीस वर्षेपर्यंत दरमहा घस सोसून सोमणानी स्वतःच्या अपत्याप्रमाणे त्याचे संगोपन केले. हे करताना आरंभी आरंभी त्यानी स्वतःच लेख लिहिले असले, तरी पुढे डोळे अधू झाल्यावर आपले विचार लेखनिविष्ठ करण्यासाठी त्याना दुसऱ्या लेखकाची मदत घ्यावी लागे. आपले मदतनीस म्हणून काम करणाऱ्या नाना अष्टेकर व नाना भाटे या तरुण स्नेह्यांचा त्याकामी भाऊसाहेबाना फार उपयोग झाला. भाऊसाहेबांचे लेख लिहता लिहताच प्रकाश पत्राचे संपादन करण्याइतकी कुवत अष्टेकर प्रभृतीना आली होती. डोमिंगोला आव्हान देऊन युवराजांच्या आगमनावरील बहि–ष्काराच्या आणि दारूबंदीच्या चळवळीत भाऊसाहेब गुंतले असता नाना अष्टेकरानी प्रकाशचे संपादन भाऊसाहेबांच्या इतक्याच सफाईने केले. भाऊ–साहेबांच्या तोंडून प्रकाशचे संपादकीय लेख टिपून घेत असताच मराठी लघुलेखन–पद्धति निर्माण करण्याची स्फूर्ति विनायकराव नाफडाना झाली. मग त्यानी स्वता ती पूर्णतेला नेली.

१९१४–१५ या सुमारास प्रकाश पत्राचे संचालन सर्वसंग्रहवृत्तीने पण राष्ट्रीय–बाण्याने करावे म्हणून स्वताच्या घरी शंकरराव साठे, दिगंबरपंत गोखले, नाना भाटे, नाना अष्टेकर, काशीनाथपंत माजगावकर, बाळासाहेब राजोपाध्ये, नरहर भिकाजी जोशी, गोविंदराव श्रोत्री, काकासाहेब जोगळेकर, अशा नव्या दमाची मंडळी सोमणानी विचारविनिमयार्थ बोलाविली. प्रत्येकावर प्रकाशच्या संपादनाची जबाबदारीही थोडीथोडी टाकली. त्याप्रमाणे या सर्वांकडून सरासरी वर्षभर लेखनसहाय्यही झाले. पण पुढे हा क्रम फारसा टिकला नाही. प्रकाश–कडे या मंडळीना ओढण्यात, त्याना सार्वजनिक कार्याची गोडी लागावी आणि कोठे तरी त्यानी हौसेने व उत्साहाने जबाबदारी घेऊन काम करावे, असाही भाऊसाहेबांचा उद्देश होता.

१९२२–२३ साली बाबूराव वैद्य यानी सोमणांचा 'आनंद प्रेस' घेतला व प्रकाशपत्र बेताच्या खर्चाने छापून देण्याचे पत्करले. 'प्रकाश' बुधवारी नियमित वेळेवर प्रकाशू लागल्याने, भाऊसाहेब सोमण व त्यांचे सहकारी श्रोत्री, त्याचप्रमाणे गुरु दादासाहेब करंदीकर व आण्णासाहेब चिरमुले याना आनंद–आनंद झाला. पण सोमणप्रभृत्ति राष्ट्रीय पक्षातील मंडळीवर काही तरी तोहमत आणण्यासाठी टप–लेल्या नोकरशाहीला लवकरच एक निमित्त सापडले. प्रकाशमध्ये एक जर्मन लॉटरीची जाहिरात प्रसिद्ध झाली. ही गोष्ट गैरकायदा आहे हे कोणासच कळले नाही. सरकारने प्रकाशचे प्रकाशक गोडसे व मुद्रक बाबुराव वैद्य यांचेवर खटला भरला. जामीन देऊन अगर किरकोळ दंडावर भागेल असे वाटले होते; पण कलेक्टर बास्कर विले यांच्या प्रेरणेने प्रांतसाहेब फणसे यानी प्रत्येकी चारशे रुपये

दंड ठोठावला. सोमणांची माणसे म्हणून हा जबर दंड झाला अशी सर्वत्र बोलवा होती. या दंडप्रकरणात सोमणानी लक्ष घातले नाही. "बरऽ! बघूऽ!!" असे त्यानी म्हणताच, बाबूराव वैद्यानी दंडाची व्यवस्था करून गोडशानाही सोडवून आणले. आत्मविश्वासाने काम करून संकटाला तोंड देणारे बाबूराव वैद्य त्या-मुळेच भाऊसाहेबाना जवळचे झाले. पुढे गोडसे व वैद्य यांचे अपील भाऊसाहेबानीच चालविले आणि दंडाची जवळजवळ माफी मिळविली.

संपादकीय लिखाणाबद्दल ज्याचा तो जबाबदार असला तरी वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या टोपण नावाखालील लेखाबद्दल आणि बातमीपत्राबद्दल संपा-दकाला जबाबदारी स्वीकारावी लागते. ही व्यवसाय-नीति भाऊसाहेबानी मॅझिनीच्या परीक्षणासंबंधी आलेल्या लेखाबाबत जशी पत्करली, तशीच १९१८-१९ साली एका प्राथमिक शिक्षकाने प्रसिद्धीस दिलेल्या स्कूलबोर्डावरील टीकेबाबतही त्यानी स्वीकारली. 'शिकविता पांडू वेगळाची!' या शीर्षकाखाली प्रकाशमध्ये, "सातारा स्कूल बोर्डाच्या कारभारावर झोंबरी टीका प्रसिद्ध झाली. ती टीका लिहिणाऱ्या शिक्षकांचे नाव स्कूल बोर्डाचे चेअरमन व डे. ए. इन्स्पेक्टर याना पाहिजे होते. ते त्याना काही मिळू शकेना. अखेर चेअरमनसाहेब हे संपादकमहाशय भाऊसाहेब सोमण यांचेकडे गेले व माहिती विचारू लागले. भाऊसाहेबानी त्याना नाव न सांगता, "संपादकावर फिर्याद करा; लेखातील आक्षेप न्यायमंदि-रात खोटे ठरले तर त्याबद्दल होणारी शिक्षा संपादक सहन करील. मात्र साप साप म्हणून कोणा शिक्षकास त्रास द्याल तर संपादकाला निराळा मार्ग स्वीकारावा लागेल," असे चेअरमन साहेबाना भाऊसाहेबानी बजावले. या बजावण्यामुळे चेअरमन साहेबांच्या रागाचे डोले थंड झाले. गोविंद जयराम फणसळकर मास्तरानी या सोमणांच्या संपादकीय कारकिर्दीतील दिलेल्या गोष्टीप्रमाणेच सोमणानी आपला 'प्रकाश' तडफदार तरुण पुढाऱ्याचे हाती बाणेदारपणाने चालण्यासाठी १९२५ साली दिल्यावरही एक प्रसंग घडला होता. मुंबईच्या आयुर्वेदाचे संपादक वैद्यराज लक्ष्मण रामचंद्र मळेकर यानी तो प्रसंग खालील प्रमाणे सांगितला आहे. "भाऊसाहेब सोमण यांच्या प्रकाश पत्राचे संपादकत्व शं. वि. उर्फ बाबुराव भिडे वकील यांचेकडे त्यावेळी होते. तारळे ग्रामपंचायतीचे अनागोंदी कारभाराबाबत मी एक बातमीपत्र टोपण नावाने प्रकाशमध्ये दिले व ते प्रसिद्धही झाले. त्यात अक्षेपार्ह वा असत्य मजकूर नव्हताच. परंतु ग्रामपंचायतीने जिल्हा लोकल बोर्ड सातारा मार्फत प्रकाश संपादकाना लेखकाचे नाव कळविणेबद्दल लिहिले. संपा-दकानी, मला जरूर ते कागदपत्र घेऊन सातारला बोलाविले व सोमण यांचेकडे नेले. सोमणानी कागद वाचले व लगेच भिडे याना सांगितले की 'बातमीदाराचे नाव कळविता येत नाही' असे लोकल बोर्डाला उत्तर द्या. प्रकाशनाची सर्व जबाबदारी संपादकाचीच आहे आणि मजकुराविषयी आमची खात्री आहे असेही

लिहिण्यास सांगितले. भिडयानी तसे करताच ग्रामपंचायत आणि लोकलबोर्ड दोघेही गप्प बसली. "

संपादकीय जीवनात असले काटे आणि राजद्रोहांच्या खटल्याच्या कुऱ्हाडी स्पष्टवक्त्या संपादकाला नेहमीच येत असतात. स्वतःच्याच 'प्रकाश'वर तसे प्रसंग आले असता भाऊसाहेब सोमण त्याना तोंड द्यावयास तयार होते हे अगदी साहजिक आहे. पण 'शुभसूचक' वर तसा प्रसंग येण्याचा रंग दिसताच 'आपण तुमचा खटला चालवावयास सज्ज आहोत,' असा त्यानी शुभसूचकच्या संपादकाना धीर दिला होता. आणि १९२१ च्या त्या असहकारितेच्या काळात त्या धीरावरच शुभसूचकाचा निभाव लागला. 'श्रीशाहू' मध्ये तर काय त्यानी आपल्या संपादकीय लेखांच्या पुस्त्याच लिहिल्या होत्या. मग 'श्रीशाहू'च्या संपादकीय धोरणाशी आपली मते जुळती राहिली नव्हती तरी 'श्रीशाहू'चे छापखान्यावर अग्नीची अवकृपा १९३६ साली झालेली दिसताच, सोमणानी त्याच्या पुनर्जन्माचा खटाटोप आरंभिला, हे स्वाभाविकच होय. जिल्ह्यात लोकजागृति करणाऱ्या कोणत्याही राष्ट्रीयवृत्तीच्या पत्रास भाऊसाहेब सोमणांचा नेहमीच शुभाशीर्वाद असे. बाबुराव वैद्यानी १९२६ साली समर्थ वर्तमानपत्र काढले. त्यावेळी किंवा त्याचे पुनरुज्जीवन १९४६ साली न. वा. लिमये यानी केले तेव्हा समर्थास भाऊसाहेबांचा आशीर्वाद मिळाला किंवा अन्यही वृत्तपत्राना त्यानी मार्गदर्शन केले. त्याच्या बुडाशी भाऊसाहेबांचे एक ध्येय असे. जिल्हापत्रानी जागतिक घडामोडींची माहिती आपल्या वाचकाना शहाणे करण्याकरता जरूर तितकी थोडक्यात द्यावी, पण मुख्यतः स्थानिक बाबींचाच परामर्श घेऊन लोकाना मार्गदर्शन करावे, असा त्यांचा कटाक्ष असे. अशा कटाक्षामुळेच, आपल्यावर प्रसंगी टीका करणाऱ्या 'ऐक्य' या प्रागतिकांच्या पत्राचे भाऊसाहेब सोमणाना कौतुक होते. ता. ६-१२-४५ रोजी 'समर्थ' पत्रास आशिर्वाद देताना त्यानी स्पष्टच लिहिले आहे की " समर्थ पत्र मुख्यतः स्थानिक स्वरूपाचे ठेवून जिल्ह्यातील स्थानिक गोष्टींची त्यात विशेष चर्चा व्हावी. नवीन बदललेल्या काळातील तरुणांचा उत्साह ज्यामुळे वृद्धिंगत होत जाईल असे भारदस्त पण स्फूर्तिदायक लेख निरनिराळ्या लेखकाकडून मिळवून ते प्रसिद्ध करणेची विशेष कोशीस करावी. सार्वजनिक कार्य करताना कोणावरही करावी लागणारी टीका सडेतोड असली तरी केव्हाही त्यात शिष्टतेचा भंग न होईल याबद्दल खबरदारी घ्यावी. अधिकाऱ्याना जिल्ह्यातील वस्तुस्थितीची जितकी जास्तीत जास्त ओळख करून देता येईल तितकी करून देण्याची खटपट करावी. सरकारी वक्र दृष्टीला न भिता, चिकाटीने जिल्ह्याला उपयुक्त होईल अशाच रीतीने वर्तमानपत्र चालू राहिल्यास जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनाच्या क्षेत्रात त्या पत्रास उच्चस्थान मिळाल्याशिवाय रहाणार नाही, असे अंतःकरणपूर्वक मी सुचवितो."

संपादक सोमणांचे दर्शन हे असे आहे.

# २३ जिल्हासभेचे जीवन-सूत्रधार, सोमण

भाऊसाहेबांच्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभी दादासाहेब करंदीकरानी जिल्हासभेचे काम भाऊसाहेबाकडे स्वतंत्रपणे सोपविले आणि ते त्यानी समरसतेने केले. म्हणून त्याना जिल्हासभेचे जीवन-सूत्रधारच मानण्यात येई.

बहुजनसमाज लोकशाहीसाठी तयार व्हावा या दृष्टिने सातारा जिल्ह्याने सातत्याने ज्या एका संस्थेमार्फत सेवा केली, ती संस्था म्हणजे सातारा जिल्हा-सभा होय. जिल्हासभा मूळ धरून बसली ती १९०६ च्या राष्ट्रीयसभेच्या त्या अर्थाच्या ठरावानंतरच होय. " राष्ट्रीय सभेच्या हेतूचा प्रसार करणे, राष्ट्रीय सभेला लाग-णारी माहिती गोळा करणे, जिल्ह्याच्या औद्योगिक उन्नतिप्रीत्यर्थ झटणे " या उद्देशानी तालुक्या-तालुक्याचे मत घेऊन व तालुकासभा स्थापून जिल्हासभा ता. ३० जून १९०७ रोजी घाटे थिएटरात दादासाहेब करंदीकरांच्या हस्ते अस्तित्वात आली. जिल्हासभेची पहिली नऊ अधिवेशने चिटणीस म्हणजेच स्वागताध्यक्ष धरून झाली. पुढे चिटणीस व स्वागताध्यक्ष ही कामे निरनिराळ्या व्यक्ती करू लागल्या. वडगाव (१९२७) च्या जिल्हासभेपासून कार्यकारी मंडळाच्या बैठकी तालुक्यांच्या निरनिराळ्या ठिकाणी बाबुराव वैद्यांच्या सूचनेप्रमाणे भरू लागून वर्षभर जिल्हासभेची जागृति राहू लागली. तथापि यापेक्षाही जिल्हासभेच्या चरित्राचा विचार करताना तिचे १९२१ अखेरचे सर्वपक्षीय स्वरूप आणि त्यानंतरचे केवळ राष्ट्रीय-सभानिष्ठ स्वरूपही सहजच डोळ्यात भरतात.

सातारा-जिल्हा-सभा सर्वपक्षीय होती. तरी १९०७ च्या सुरतेच्या राष्ट्रीय-सभेनंतर हिंदुस्थानातील अर्भकाप्रमाणेच तिच्यावर गंडांतर येते की काय अशी भीति होती. पण तिसऱ्या जिल्हासभेत म्हणजे ऑक्टोबर १९०८ मध्येच असा ठराव पास झाला होता की " अलाहाबाद येथे १८ व १९ एप्रिल रोजी कन्व्हेन्शनच्या सभेत पास झालेल्या तर्जुम्यातील आर्टिकल नं. १ मधील राष्ट्रीय-सभेचे हेतु सातारा जिल्हा सभेस मान्य आहेत." त्यामुळे राष्ट्रीय आणि प्रागतिक पक्षात प्रांतांपुरती तरी एकी घडवून आणावी या उद्देशाने पाठक, आगाशे, फणसळकर यांची कमिटीही नेमली होती. या योजनेतील सातारा जिल्ह्याचे मत स्पष्टपणे पाठकानाच कळले असे नाही, तर रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यानाही पटले. आणि जोशांच्या मार्फतच प्रांतिक जहाल-मवाळांचे व त्यायोगे भारतीय जहाल-मवाळांचे ऐक्य साधण्याचा मनसुबा असल्याकारणाने सातारा जिल्ह्यातील दुफळी टळली. टिळक-गोखल्यांच्यामुळे महाराष्ट्र या काळी राष्ट्रीय सभेत अग्रेसर होता. तेव्हा त्यांची एकी होऊन १९०६ चे कलकत्ता काँग्रेसमध्ये स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय-शिक्षण या चतुःसूत्रीमुळे उत्पन्न झालेल्या राष्ट्रीयत्वाच्या अंशाखाली जनतेने

जाता कामा नये अशी दक्षता घेतली पाहिजे, ही दृष्टि राहिली. म्हणूनच, १९०७ ते १९१० ह्या काळी स्वदेशीबाबत सातारा जिल्हा सरसावल्यामुळे सरकारी इतराजीस पात्र झाला असता, दडपशाहीने दबलेल्या लोकाना धीर देण्याकरता गणेश व्यंकटेश जोशी बोलावल्याबरोबर जिल्हासभेला प्रेक्षक म्हणून येत, आपल्या सल्लामसलतीचा फायदा देत आणि आपल्या अर्थशास्त्रीय सम्यग् ज्ञानावर आधारलेले एकादे व्याख्यानही देऊन जात.

"नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता" असा जोशासारखा गृहस्थ पाठीशी आशीर्वादाचे हात उभारून असल्यामुळे त्या धीरावर १९१३ अखेर सातारा जिल्हा-सभा स्थिरपणे भरत आल्या. १९१४ ची प्रांतिक परिषद भरवून मवाळ-जहालांच्या एकीचा पाया सातारा जिल्हयाने घातला. पुढे लोकमान्य मंडालेहून परत आल्यावर त्यांच्या स्वराज्य-संघाच्या होमरूलच्या चळवळीत सातारा जिल्हा समरस झाला.

काँग्रेस स्कीमच्या ऐवजी मँाटफोर्ड सुधारणा आल्या. त्या अपुऱ्या, असमाधानकारक अशा असल्या तरी त्या राबवून घ्यावयाच्या असे ठरले; तरी रौलट-ॲक्ट व जालीयनवालाबाग यांच्या कृपाप्रसादाने राष्ट्रात जो असहकाराचा कल्लोळ उठला, त्यात १९२१ साली, विठ्ठलभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जिल्हासभेने असा आज्ञापक सूर काढला की राष्ट्रीयसभेतील असहकाराचा कार्यक्रम ज्याना झेपेल, तेवढयानीच जिल्हासभेच्या निशाणाखाली रहावे. १९१९ साली कऱ्हाडास खाडीलकरांच्या अध्यक्षतेखाली मँाटफोर्ड सुधारणासंबंधी मतप्रदर्शन करण्याकरता जिल्हासभेचे जादा अधिवेशन भरवून सातारा जिल्हयाने जो दम दाखविला होता, त्याला अनुरूप असाच १९२१ चा सूर होता. १९२२ पासून जिल्हासभेची अधिवेशने जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने व परवानगीनेच भरण्याचे ठरले. त्याप्रमाणे इसलामपूर येथे वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हासभेचे पहिले अधिवेशन भाऊराव वैद्य यांच्या पुढाकाराने भरलेही. त्या अधिवेशनात कौन्सिल प्रवेशाच्या प्रश्नाचे निमित्ताने उलटसुलट बुद्धिवाद सांगण्यात आले आणि तडजोड म्हणून परवानगीवजा कौन्सिल प्रवेशाला मान्यता देणारी एक उपसूचनाही आली; पण बहिष्काराचाच ठराव जिल्हासभेने मान्य केला.

"सुतास मत," व कौन्सिल बहिष्कारामुळे लोकमताच्या खोटया नावावर होयबाना हाताशी धरून सरकारने चालविलेला खेळखंडोबा पहावत नाही अशी एक फळी; तर बहुजनसमाजाच्या जीवित-जपणुकीचा प्रश्न हाती घेऊन स्वावलंबनाने स्वराज्य मिळवू पहाणाऱ्या असहकाराच्या कार्यक्रमाला उचलून धरणाऱ्या निष्ठावंतांची दुसरी फळी; आरंभी ते चारच असले तरी तपश्चर्येच्या जोरावरच सगळी जनता आपल्या मागून येईल या श्रद्धेने सरकार कशाला लोकमत म्हणते याची

ते परवा करीत नसत. पहिली व्यवहारसावध तर दुसरी तत्वजीवन. राष्ट्रीय पक्षातीलच ग्रा दुपाखी संसाराची तोंडमिळवणी करणारा कोणी सर्वमान्य "गणेश व्यंकटेश" सातारा जिल्ह्याला लाभला असता तर बरे झाले असते. तो न लाभल्यामुळे हे दोन्ही पक्ष एकमेकावर कोलमडून न पडण्याची दक्षता दाखवीत होते तरी जिल्हासभेला "येता अपरिचित काळ नवा, सुखाने ध्येय मनी सेवा। स्वकर आवरा, कूर्म गुरु करा ।। " हा उपदेशच आचरणात आणावा लागला.

सन १९२१ पर्यंत सातारा जिल्हा-सभा साधारणपणे तालुक्याच्या गावी अगर रहिमतपूरसारख्या तालुक्यातील प्रमुख गावीच भरत असे. पण असहकारातून बहुजनसमाजाच्या जीवनाशी समरस होऊन राजकारणाचे खरेखुरे भागीदार जर खेडकरी शेतकऱ्याना करावयास हवे आणि त्यादृष्टीने जिल्हा-सभेचे अधिवेशन जर हे एक राजकीय शिक्षण आहे तर जिल्हासभेची अधिवेशने तालुक्या-तालुक्यांच्या पोटातील खेडेगावात झाली पाहिजेत. ही कल्पना पटल्याबरोबर जयरामस्वामीचे वडगाव, लिंब, चाफळ, मसूर, बिळाशी, बुध अशी गिरकी जिल्हा-सभेच्या अधिवेशनानी घेतली. स्थळाप्रमाणेच काळा-संबंधी विचार करता मवाळ-जहालांची एकी करणारी प्रांतिक परिषद भरवून ती यशस्वी करण्याच्या कामात कार्यकर्त्यांची उत्साहपूर्ण सवड आटल्यामुळे १९१४ साली, १९२२ ते १९२७ मधील काळांत, असहकाराच्या तपशीलावरून होणारा राष्ट्रीयांचा गृहकलह टाळण्यासाठी, १९३२ व १९३३ साली कायदेभंगाच्या धूमधडाक्यात जिल्हासभा बंद राहिली आहे. एरवी ती नियमाने भरली आहे, आणि या तिच्या नियमितपणाबद्दल केसरी, बापूजी अणे, चिंतामणराव वैद्य अशानी कौतुकही केले आहे. आता दरेक साली कार्यकर्त्यांच्या, बोलावलेल्या अध्यक्षांच्या आणि राष्ट्रीय चळवळीच्या ओघांच्या दृष्टिनेच जिल्हा-सभेचे दिवस धरण्यात आले, ही गोष्ट खरी. पण स्थळ काळ कोणतेही असले तरी जिल्हासभेचे ठराव आपआपल्या तालुक्यात व पंचक्रोशीत प्रसृत करण्याची जबाबदारी जिल्हा-सभेच्या प्रतिनिधीवर व हितचिंतकावर १९०७ प्रमाणेच म्हणजे आरंभासारखीच नेहमी असे.

स्वागत सभासद, प्रेक्षक व प्रतिनिधी याबाबत जिल्हासभेच्या पहिल्या अधि-वेशनाचे वेळी जो उत्साह दिसला तसापुढे स्वदेशी चळवळीच्या निमित्ताने सरकारने निर्माण केलेल्या दहशतशाहीस बावरून गेलेल्या जनतेला दाखवता आला नाही. पण १९१५ सालापासून म्हणजे लोकमान्य मंडालेहून सुटून येऊन राष्ट्रात फिरुन चैतन्य ओतावयास त्यानी सुरवात केल्यापासून, लोकाना जसा धीर येऊ लागला, तशी जिल्हा-सभेची आस्था जनतेने वाढत्या प्रमाणात दाखविली आणि मसूरच्या व बिळाशीच्या जिल्हा परिषदाना ३००० व ५००० शेतकरी

आपुलकीने झटून आला, राष्ट्रीय-सभेशी जिल्हयातील कार्यकर्ते नेहमी निष्ठेने वागले हे जनतेला मनोमन पटल्याचे गमकच मानण्यात आले.

जिल्हा-सभांच्या चिटणीसांची निवड वर्षभर काम होण्याच्या दृष्टिने जशी व्हावयाची, तशीच स्वागताध्यक्षांची निवडणूक पूर्वकालीन जनसेवा, ( मग ती गाजावाजा न करताही केलेली असेल. ) जनतेवरील वजन, आणि कामाचा उरक या गोष्टी लक्षात घेऊन होई. अध्यक्षांच्या निवडणुकीतही त्यानी केलेल्या तावत्काल-पर्यंतच्या राष्ट्रसेवेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याचा इरादा जसा असे, तसाच प्राप्त परिस्थितीत मार्गदर्शन करणारा कुशलकर्णधार म्हणूनही त्यांच्याकडे पाहा-ण्यात येई; आणि म्हणूनच जिल्हयातील कार्यकर्त्यांच्या गळयात जशा जिल्हा-सभेने अध्यक्षपदाच्या माळा घातल्या; तशाच पुण्याचे केळकर, खाडीलकर, गाडगीळ रावसाहेब पटवर्धन, वऱ्हाडचे वीर वामनराव जोशी, बाबासाहेब देशमुख, माधव-राव अणे अगर गुजराथचे जम्नादास द्वारकादास, विठ्ठलभाई पटेल यांच्याही गळयात घातल्या.

जिल्हासभांच्या खर्चासंबंधी विचार करता हे सर्वसामान्यपणे सांगता येईल की, गणपतराव फणसळकर, आगाशे, डॉ. भिडे, कडूसकर व विशेषत: भाऊसाहेब सोमण प्रभृति पुढाकार घेणाराना त्या कार्यासाठी अखंड पदरमोडच करावी लागली. पहिल्या तीन अधिवेशनास तर दादासाहेबानी दोनशे-पाचशे रुपये असे स्वताच खर्चून तसे उदाहरण घालून दिले होते. परिषदेस शेतकरी आणि अगदी अलिकडे कायदेभंगाचा गरीब स्वयंसेवक हे सन्मान्य पाहुणेच म्हणून समजले जात. स्वागत-सभासदांची आणि प्रतिनिधींची फी इतकी तोकडी असे की खर्चाच्या मानाने ती अपुरीच पडे. नाही म्हणावयास, १९३१ साली कराची काँग्रेसने उघडा मंडप घालून काटकसरीचे उदाहरण घालून देताच त्याच धर्तीवर मसूर व बिळाशी येथे जिल्हासभा भरल्या. तेव्हा पूर्वापार अंदाजाच्या मानाने बराच खर्च कमी येऊ लागला.

स्वागताध्यक्षांची भाषणे अगर जिल्ह्यातीलच अध्यक्ष निवडलेले असतील तर त्यांची भाषणे बहुश: आपल्या स्थानिक व जिल्हयाच्या गरजांचे आविष्करण, जिल्हासभेच्या कामाचा थोडाफार आढावा आणि प्रांतिक व राष्ट्रीय प्रश्ना-वरील मार्गदर्शन यानी भरलेली असावयाची. जिल्ह्याबाहेरून आलेल्या अध्यक्षांची भाषणे राष्ट्रीय राजकारणाच्या गुंतागुंती सोडवून समाधान करणारी असावयाची; मधूनमधून शिवराम महादेव परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर, सौ. लीलावती मुन्शी, चिंतामणराव वैद्य अशासारख्या सन्मान्य पाहुण्यांच्या वक्तृत्वपूर्ण राजकारणी अभ्यासाचाही फायदा मिळाल्याकारणाने जिल्हासभेच्या एकंदर कामाला खरोखर उठाव येई.

जिल्हा सभेच्या कामाचा एकंदरीने आपणास आढावा काढता येईल तो असा. १९१७ चे स्वागताध्यक्ष कृष्णराव कडूसकर स्वराज्यासंबंधी बोलताना म्हणतात की " संयुक्त राष्ट्रीय सभेच्या बाबतीत या जिल्हा-सभेने केलेल्या खटपटीस देशातील सर्व पुढाऱ्यांच्या सहकारितेची जोड मिळाल्याकारणाने या प्रयत्नास पूर्ण यश प्राप्त झाले व डिसेंबरात (१९१६) लखनौ येथे पहिली संयुक्त राष्ट्रीय सभा भरून तिजमध्ये स्वराज्याचा ठराव एकमताने मान्य झाला. ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. " पण काळ बदलला तशी सरकारची धोरणे व जनतेच्या चळवळीची दिशाही बदलली. १९२१ साली जिल्हा-सभेने जशी असहकारास संमति दिली तशी 'नागपुरच्या काँग्रेसने ठरविलेल्या हिंदुस्थानच्या लोकानी सर्व न्याय व शांततेच्या मार्गांनी मिळविण्याचे स्वराज्यास'ही संमति दिली. पुढे १९२९ साली, सर्व-पक्षीय-परिषदेने परिश्रमपूर्वक तयार केलेल्या " नेहरू रिपोर्टास" सातारा जिल्हासभेने संमति दिली, एवढेच नव्हे तर " लाहोरच्या राष्ट्रीय सभेने मान्य केलेले पूर्ण स्वराज्याचे ध्येय या सभेस मान्य असून त्याबाबत काँग्रेसने केलेल्या ठरावास या सभेचा पूर्ण पाठिंबा आहे. " असाहि ठराव १९३० साली जिल्हासभेने केला. स्वातंत्र्यसार ठरावाला एकदा अशी मान्यता दिल्यावर हे जिल्हासभेस क्रमप्राप्तच होते की ज्या होअरविलिंग्डन सु(?)धारणा येणार त्या संबंधी १९३४ साली जिल्हासभेने खालील ठराव करावा:- " त्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला बाधक, संस्थानी प्रजेचे प्रतिनिधित्व नाकारणाऱ्या आणि साम्राज्यशाही कायम करणाऱ्या, त्याचप्रमाणे माँटफर्ड घटनेपेक्षाही कित्येक महत्त्वाच्या बाबतीत पिछेहाटीच्या आहेत. म्हणून त्या सुधारणा त्याज्य आहेत." तथापि हिंदु मुसलमान, स्पृशास्पृश्य, ब्राह्मणब्राह्मणेतर, कोणीही असला तरी तो आपआपल्यापरी स्वयंपूर्ण, स्वयंसिद्ध, आंणि सुखी घटक झाल्याखेरीज राजकीय तत्वज्ञान अगर त्याने मिळालेले स्वातंत्र्य टिकणारे नाही. म्हणून गांधीनी ग्रामोद्धाराची चळवळ काढल्यावर, वा मूलभूत हक्कांचा कराची येथे तीस कलमी ठराव काँग्रेसने केल्यावर, सातारा-जिल्हासभेने त्यास मान्यता दिली. वस्तुस्थिती अशी आहे की जिल्हासभेच्या जन्मापूर्वीपासून बळवंतराव सहस्रबुद्धे व दादासाहेब करंदीकर यानी शेतकऱ्यात राज्य-घटनेचा व आपली दुःखे नाहीशी करून घेण्याच्या मार्गाचा फैलावा करण्याकरता आपल्या 'सहस्रकर' छापखान्यामार्फत साध्या भाषेत शेकडो पुस्तके वाटून जो उपक्रम केला, त्याच्या हेतूची परिपूर्तता जिल्हासभेने अव्याहत केली.

तात्पर्य, समाजात अन्यायित कोणी राहू नये आणि सर्वांचे हितसंबंध अविरोधाने नांदावेत म्हणून जिल्हासभेने काळजी घेतली असून त्या हितसंबंधाचे कपाळ ज्याच्या योगे फुटले किंवा उमटले ते जिल्ह्याच्या कारभाराचे सरकारी रिपोर्ट ( निदान गुप्त भाग वगळून ) जनतेच्या पुढाऱ्याना पहावयास मिळावेत, जनतेला विश्वासात घेऊन जिल्हा-दरबार कलेक्टरानी भरवावे आणि लोकांच्या सहकारि-

तेने व्यवहार्य मार्ग काढावा, असेही मार्गदर्शन जिल्हासभेने केले. मग, प्राथमिक शिक्षण सक्तिचे व मोफत करावे, शिक्षणाकरता जमविलेला, वाढलेल्या लोकल–फंडासारखा पैसा शिक्षणाकरताच खर्च करावा आणि टिळक–राष्ट्रीय विद्यालया–सारख्या घाणेकर बंधू व त्यांचे सहकारी यांच्या स्वार्थत्यागाने चाललेल्या अस्सल राष्ट्रीय–शिक्षण संस्थाना लोकानी सढळ हाताने व स्थानिक–स्वराज्य–संस्थानी झेपेल तशी मदत करावी; सर्व स्थानिक–स्वराज्य–संस्था पूर्णपणे लोकनियुक्तांच्या असाव्या; देशी वैद्यकाचा प्रामुख्याने अवलंब करावा, दारूचे बाबतीत जिल्हा कोरडा–ठणठणीत करावा, स्वदेशी हे स्वराज्याचे अमोघ साधन आहे तेव्हा वैय–क्तिक झीज सोसूनही स्वदेशीच वस्तु प्रत्येकाने वापराव्या, आणि आपला पोशाख शुद्ध खादीचा ठेवावा, इत्यादि स्वरूपाच्या सामान्यजीवनाला अवश्यक असलेल्या गोष्टीविषयी वर्षानुवर्षे जिल्हासभेने आपले शेकडो हात उभारून ठराव केले असले तर तिने आपले कर्तव्यच केले नाही का ?

जिल्हासभेचा खरा विश्वास ग्रामसंघटना, सेवादल आणि बलसंवर्धन यावर असल्याकारणाने त्या गोष्टीवर भर देऊन खेडोपाडी जागृत, सुसंघटित आणि स्वावलंबी करण्याच्या अल्पस्वल्प प्रयत्नांचे जिल्हासभेने आदरून कौतुक केले आहे.

१९१३ साली, “ आज नाही उद्या आपण अंगिकारलेल्या गोष्टीचा पिच्छा पुरवतो असे सरकारास आढळून आल्यास योग्य विचार होऊन आपल्या म्हणण्यास मान मिळालाच पाहिजे, ” अशी आशेची मनोवृत्ति होती, ती दीड तपात इतकी बदलली की जिल्हासभा बोलू लागली ‘ जनताजनार्दनाची विखुरलेली तोंडे एका दिशेला आणून स्वातंत्र्य संपादण्याचे कार्य शिवाजीमहाराजानी केले. हल्लीच्या काळी हा एकीकरणाचा मंत्र सिद्ध करावयास आपण त्यागी बनले पाहिजे, आत्म–समर्पण केले पाहिजे. ” या तयारीच्या स्वयंसैनिकांचीही एक परिषद मसूरच्या जिल्हा–सभेला जोडून झाली होती. तीत संघटनात्मक चळवळ सत्याग्रहीनी करावी असे ठरले. कारण “ पुढाऱ्याइतके ज्ञान जनतेला नसले तरी जनता पराक्रमी असावी लागते. लोकानी पोटाच्या उद्योगात व प्रपंचाच्या अडचणीत सदोदित गुरफटून रहावे म्हणजे आपली चंगळ निर्वेधपणे चालेल असे नोकरशाहीच्या चाल–कास वाटते. पण त्यांची ही इच्छा सफळ होण्याचे दिवस आता राहिले नाहीत. ” जिल्हासभेला हे समाधान सातारा जिल्हा मोठा तल्लख म्हणून लाभले नसून राज–कीय चळवळीच्या अखंड सातत्याने लाभले आहे.

१९०७ च्या सातारचे पहिल्या अधिवेशनापासून १९३७ चे बुधचे “ पूर्णाहुति ” समजल्या गेलेल्या अधिवेशनापर्यंत सातत्याची ज्योत तेवत ठेवाव–यास भाऊसाहेब सोमण यांचे निष्ठापूर्वक लक्षच कारण होते. या एका पिढीच्या अखंड सेवेत जिल्हा–सभेच्या अधिवेशनाला प्रत्यक्ष हजर रहावयास भाऊसाहेबाना सापडले नसेल तर बिळाशीचे अधिवेशनाचे वेळी. आजारीपणामुळे डॉक्टरानीच

त्याना बंदी केली होती. त्यावेळी शंकरराव साठे यानी त्यांचे प्रतिनिधी म्हणून काम पाहिले. एरवी, जिल्हा–परिषदेची स्थळे, तारखा, स्वागताध्यक्ष, अध्यक्ष यांची योजना करण्यापासून अधिवेशनाच्या ठरावातील शब्दयोजनेपर्यंत बारीक लक्ष देऊन जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या दिलसाफ सहकाराच्या मध्यबिन्दुभोवती कार्याचा उभार झाला पाहिजे; यावर भर देत देत, जिल्हासभेच्या प्रत्येक गोष्टीत भाऊसाहेब सोमण काळजी वाहत. प्रतिनिधींच्या निवासव्यवस्थेपासून बाकीच्या गोष्टीत ते काळोपंत जोशासारख्या चिकाटीच्या गृहस्थांची योजना करून, खर्चवेचाची व्यवस्था स्वता भाऊसाहेब सोमण राखीत. पडद्यामागील सूत्रधार आणि निधि–पाल म्हणून सोमण ओळखले जात; त्यातील सूत्र राष्ट्रीय उत्थापनाचे होते. त्याचा पीळ काँग्रेसने अगर लोकमान्य टिळक अगर महात्मा गांधी यानी घातलेला असे. पण जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची आणि जनतेची मने त्या सूत्रात कशी सर्वसमन्वयाने बसतील याची चिंता भाऊसाहेब सोमण वहात. जिल्हासभेचे ते निधिपाल होते म्हणजे जिल्हासभेचा स्वतंत्र निधि होता व तो सांभाळण्याची जबाबदारी भाऊसाहेबांच्याकडे होती, असे नव्हे. प्रतिनिधिंच्या जमा झालेल्या फीमधून अथवा अन्य स्थानिक देणग्यातून शिल्लक बहुधा उरतच नसे. उरली तर ती जिल्हासभेचा निधि व्हावयाची. मसूरच्या अधिवेशना व्यतिरिक्त असा प्रसंगच नव्हता. तेव्हा जिल्हा–सभेच्या अधिवेशनास तूट आल्यास आणि वर्ष–भर कार्य चालविण्यासाठी खर्च करावा लागल्यास, तो सोमणांच्या वकीलीचे प्राप्तीतून निश्चित मिळे, एवढ्याच अर्थाने ते जिल्हासभेचे निधिपाल होते. आपले गुरु दादासाहेब करंदीकर यानी आपल्या स्वाधीन जिल्हासभेचे काम केले, तो एक ठेवा जिल्ह्याच्या सेवाबुद्धिने आपण जतन केला पाहिजे, या कर्तव्यनिष्ठेच्या कसोटीने मात्र भाऊसाहेब सोमण जिल्हासभेचे सर्वार्थानी निधि–पाल होते. विश्वस्ताप्रमाणे, वेळेस स्वताला घस लावून घेऊनही, एक पिढीभर भाऊसाहेब सोमणानी जिल्हासभेचे संगोपन केले. त्या सातत्याच्या आणि सात्विकतेच्या जोरावरच प्रांतिक परिषदांच्या अध्यक्षस्थानी विराजमान होण्याच्या तोलाचे महाभाग सातारा जिल्हासभेला लाभले. लोकमान्यांच्या मंडालेकडील बन्दीवासाच्या अगर गांधींच्या असहकाराच्या चळवळीच्या वेळच्या परसत्तेच्या उग्र दडपशाहीचे काळात सातारा जिल्हा–सभा नेमाने भरत राहिल्या. मसूर अधिवेशनासारख्या अधिवेशनाला प्रांतिक परिषदेची प्रतिष्ठा लाभली आणि जिल्हासभेच्या एकंदर जागृतीने शेतकरी व खेडकरी आपल्या परिषदा स्वतंत्रपणे व स्वावलंबनाने करू लागले.

# २४ पुढारी सोमण

सातारा जिल्हासभेचे कार्य अंगावर घेऊन ते यशस्वीपणे पार पाडता पाडताच, भाऊसाहेब सोमणाना लोक पुढारी म्हणून ओळखू लागले. १८९१ साली शिक्षकीचा पेशा आणि कायदेवर्गाची विद्यार्थीदशा चालविता चालविताच, भाऊसाहेब सोमण स्वयंसेवक होऊन संघटनेच्या पुस्त्या गिरवित होते आणि पुढारीपणाचे वळण घेत होते. दादासाहेब करंदीकर यांच्या हाताखाली वकिली करावयास राहिल्यावर भाऊसाहेब पुढारीपणाच्या खडर्यावर बसले. दादासाहेब करंदीकरांचा सार्वजनिक पत्रव्यवहार त्यानी करून प्रांतिक पुढाऱ्याशी ओळख करून घेतली. स्वताच्या टांग्यातून जिल्हयाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत, आवश्यक तेव्हा, कॉंग्रेसच्या कामासाठी आणि लोकमान्यांच्या चळवळीसाठी प्रवास करावा, ठिकठिकाणच्या कार्यकर्त्याशी घरोबा राखावा, निरनिराळया संस्थांची जिव्हाळयाने चौकशी करावी आणि आपल्याला प्रशस्त वाटेल तेवढे प्रत्येकाच्या उपयोगी पडावे, हे दादासाहेबांचे उदाहरण भाऊसाहेबानी आत्मसात् केले. ते इतके की, ता. २५ एप्रिल १९३५ रोजी दादासाहेब करंदीकर यांच्या दुःखवटयाची सभा रा. ब. काळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली तीत जिल्हा कॉं. कमेटीचे अध्यक्ष नाथ घाणेकर म्हणाले, "आपल्या सार्वजनिक कार्याची दिशा व धुरा मानसपुत्र भाऊसाहेब सोमण यांचेवर आपण हयात असतानाच दादासाहेबानी सोपविली. सार्वजनिक कार्यकर्ते पुढारी आपले शिष्य नेहमी तयार करीत नाहीत. दादासाहेबानी मात्र भाऊसाहेबाना सर्वस्व दिले." आपल्या गुरुजीनी जे दिले ते भाऊसाहेबानी अर्थातच घेतले आणि त्याचे सवाईने चीज करून दाखविले. काही गुण सोनाराचा तसाच सोन्याचाही असावा लागतो. भाऊसाहेब सोमणांच्या डोळयापुढे दादासाहेब करंदीकरांची जशी मूर्ती होती तशीच दादासाहेबांच्या बरोबरीने सातारा जिल्हयात जी कर्ती पिढी होती, तिच्याही कीर्तिमंत मूर्ती होत्या. त्यांच्यापासूनही भाऊसाहेबानी अनेकानेक लोकसेवेच्या स्फूर्ति घेतल्या होत्या. त्यांच्यासंबंधी प्रसंगानुसार व्यक्तिशः अथवा सामुदायिकरीत्या कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय त्याना रहावत नसे. त्यात अष्टयाचे गोविंदराव लिमये, साताऱ्चे रा. ब. पाठक, आणि दादासाहेब करंदीकर, वाईचे नानासाहेब वैद्य, कऱ्हाडचे भाऊसाहेब भागवत ही मंडळी प्रामुख्याने होती. अष्टयाचे लिमये हे इसलामपूरला वकील असून छोटया कॉंग्रेसचे जनक म्हणून ते संस्मरणीय आहेत. कॉंग्रेसचा जबरदस्त प्रचारक म्हणून इंडिया मासिकातसुद्धा त्यांचा उल्लेख येत असे. कॉंग्रेससाठी घरोघर पैसा-फंड निर्माण करण्याची त्यांची कल्पना पुढे महाराष्ट्रातही औद्योगिक कारणाकरीता उचलून धरली गेली. दुसरे रा. ब. पाठक हे तर सातारा हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून भाऊसाहेबांचे गुरूच होते. मवाळ-जहालांच्या

ऐक्याशिवाय राष्ट्रीयसभेला प्रभावी होता येणार नाही अशी यांच्या मनाची खात्री असल्यामुळे सातारा जिल्ह्याला समेटभूमी करण्याचे पहिले पुण्य पाठकाना आहे. रा. ब. पाठक यांच्याप्रमाणे वाईचे नानासाहेब वैद्य यांचीही गोष्ट आहे. न्या. मू. रानडयांचे समकालीन, सातारा जिल्ह्यात पहिली लवाद–कोर्टें स्थापणारे आणि महाबळेश्वरास गव्हर्नर जाता–येता त्यांचेकडून सातारा जिल्ह्याची दुःखे निवारण करून घेणारे, पहिले चळवळे म्हणून त्यांची जशी प्रसिद्धि होती, तशीच १८९५ सालची काँग्रेस पुण्यास भरत नसल्यास आम्ही सातारकर ती भरवतो असे आत्म–विश्वासाने सांगणारे ते धडाडीचे पुढारी होते. खुद्द साताऱ्यात बळवंतराव सहस्त्रबुद्धे ही सार्वजनिक कामाची स्फूर्ति–देवता होती. पडद्यामागे राहून काम करावयाचे आणि ते शेतकऱ्यांच्या कळकळीने करावयाचे, अशा थाटाचे ते वकील होते. ऑस्टन–साहेबानी वकील वर्गाबद्दल अनुदार उद्गार काढताच त्यानी माफी मागेपर्यंत हे गृहस्थ त्यांचे कोर्टात कामाला गेले नाहीत. कित्येक न्याया–धिशाना त्यांचा अभिप्राय घतल्याशिवाय रहावत नसे. असे हे गरीबीतून मोठे–पणाला चढलेले टापटिपीचे, दूरदृष्टीचे निरलस लोकसेवक होते. कऱ्हाडचे भाऊसाहेब भागवत ही सहस्त्रबुद्धयांची छोटी आवृत्ति असून ते आगरकरांचे मामा असल्यामुळे लो. टिळक त्याना आपल्या मामाइतके पूज्य मानीत. या सर्व पुढा–ऱ्यांच्या राष्ट्रीयवृत्तीचा आणि विशेषतः लोकमान्य टिळकांच्या बाणेदारपणाने जिल्ह्यात राष्ट्रकार्य उभारण्याच्या कर्मयोगाचा परिणाम भाऊसाहेबांच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाही.

या वडील पिढीच्या सहकाराने जिल्ह्यातील चळवळीत आणि राष्ट्रीय जागृतीत लक्ष घालणारे नानासाहेब आगाशे, डॉ. विष्णुपंत भिडे, गणपतराव फणसळकर, वामनराव घाणेकर प्रभृती मंडळी भाऊसाहेबाना वडील बंधुसमान होती. वडील पिढीत आणि या पिढीत कालमानाप्रमाणे पडणाऱ्या पद्धति प्रकारात आणि स्वभावातील छटात जे अंतर असावयाचे, ते साहजिक अंतर सांभाळून आपण आणि आपल्या बरोबरीचे गोविंदराव श्रोत्री, रहिमतपूरचे डॉ. नरहर पांडुरंग देशपांडे, वाईचे कुशाभाऊ अभ्यंकर अशा मंडळींच्या समन्वयाने जिल्ह्याच्या सेवेवर भाऊसाहेब सोमणाना लक्ष ठेवावयाचे होते. ते तर त्यानी साधलेच, पण जिल्ह्यातील आपल्या पुढल्या पिढीतीलही कार्यकर्ते हेरून, कार्या–बाबत सल्लामसलत देऊन आणि कार्याबद्दल योग्य गौरव करून त्याना त्यांचे समाजातील योग्य स्थान मिळाले पाहिजे, इकडे लक्ष ठेवले. सार्वजनिक जीवनातील आपल्या बरोबरीच्या दानशूर पांडुआण्णा शिराळकरांचा आदर जिल्ह्यात व्हावा म्हणून भाऊसाहेब जेवढे झटले, तेवढेच आपल्या वडील बंधुसमान अस–लेल्या पुढाऱ्यांचे चिरंजीव डॉ. मोरोपंत आगाशे, नाथ घाणेकर व त्यांचे बंधु नीळकंठराव घाणेकर, आणि बाबुराव भिडे हे आपापल्या कर्तबगारीने जिल्ह्यात

नावलौकिकास चढले याबद्दल आनंद मानून, काही बाबतीत मतभेद झाला तरी, त्याना भाऊसाहेबानी शक्य तेवढा सहकारच दिला. भय्याशास्त्री वाटवे, परचुरे– शास्त्री, बाबुरावजी चरणकर याना त्यांच्या त्यांच्या ग्रामोद्धारातील व बहुजन– समाजातील चळवळीबद्दल भाऊसाहेबानी धन्यवादच दिले. बहुजनसमाजाच्या शिक्षणाची सोय करण्याकरता १९०६ सालापासून मुंबई इलाखा मराठा शिक्षण परिषद काढून साताऱ्यास जमनाबाई बोर्डिंग चालविण्याचे काम तारळ्याच्या राजे महाडिकानी अंगावर घेतले असता, वकिलीमुळे त्या श्रीमंत घराण्याशी संबंध आलेल्या भाऊसाहेबानी त्यावेळी बहुजनसमाजाच्या शिक्षणाची दिशा राष्ट्रीय कशी असावी, याचा सल्ला श्रीमंताना दिला आणि त्यानी चालविलेल्या स्वार्थत्यागपूर्वक बहुजनसमाजोद्धाराच्या कार्याला आपला पाठिंबा दिला. भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेच्या कार्यास त्यांचा पाठिंबा असेच. सत्य– समाजाची चळवळ करताना ब्राह्मणवर्गावर दिनकरराव जवळकरानी वाक्कुठार चालविली असताही, ते " जमिनीच्या तुकडेबंदी " चळवळीचे प्रचारक बनताच भाऊसाहेब सोमणानी त्यांच्याशी दिलसाफ सहकार केला. लोकमान्य टिळकांचे अनुयायी म्हणून तात्यासाहेब केळकर, आण्णासाहेब भोपटकर, सांगलीचे गणपतराव गोडबोले, पेणचे रामभाऊ मंडलीक अशी मंडळी भाऊसाहेब सोमणांचे सहकारी होती; ती महात्मा गांधीच्या जमान्यात काँग्रेस–विरोधी संस्थातून काम करीत राहिली आणि भाऊसाहेब काँग्रेसमध्ये राहिले, तरी एकदा जडलेला स्नेहसंबंध कदापि तुटला नाही; एवढेच नव्हे, तर राजकीय विचारविनिमय मोकळ्या मनाने करून मतभेदाच्या ताणाताणीला सुरवात होताच, " आपण दु–मती आहोत एवढे तरी आपले एकमत आहे " असे हसत हसत म्हणून ही सर्व मंडळी वेगळी व्हावयाची ! अगदी मवाळपक्षात असलेले व एकवेळ औंध बॉम्ब केसमध्ये आपली " उलट तपासणी " घेणारे रा. ब. काळे यांच्याशीही शक्य तेथे सहकार व जरूर तेथे विरोध भाऊसाहेब सोमण करीत आले खरे; पण काळ्यांच्यासंबंधी भाऊ– साहेबाना केवढातरी आदर होता. " कोणतेही काम अंगावर घेतले म्हणजे ते चिकाटीने व अभ्यासपूर्वक तडीस नेण्याचा प्रयत्न करणे हा काळ्यांचा गुण प्रत्येक तरुणाने आदर्शवत पुढे ठेवण्यासारखा आहे. कौन्सिलात कोणत्याही प्रश्नांचा अभ्यासपूर्वक विचार करणारे म्हणूनच त्यांच्याकडे सर्व बघत. त्यांचे दातृत्व मह– शूर आहेच, त्यांच्यावर संकटपरंपरा सारखी कोसळत असताही त्यानी सर्व्हंटस् ऑफ् इंडिया सोसायटीला सव्वालाख रुपये दिले. त्यांच्या निधनामुळे सातारा जिल्हा एका विद्वान् व कर्तृत्ववान् पुढाऱ्याला मुकला. " असे भाऊसाहेबांचे सद्गतित उद्गार आहेत. अन्यपक्षीय पुढाऱ्याबद्दलचा असा गुणग्राहक दृष्टिकोन असणारे भाऊसाहेब सोमण स्वपक्षीय आणि राष्ट्रीय वृत्तीच्या कार्यकर्त्याबद्दल केवढी आत्मी– यता बाळगत असतील बरे ! सरदार नामदारातील आण्णासाहेब मुतालिक आणि

~~रामभाऊ~~ खंडेराव जाधव ( भुइंजकर ) ही भाऊसाहेबांची स्नेहीमंडळी. कऱ्हाडचे लक्ष्मणराव देशपांडे व नरसिंमपूरचे लक्ष्मणराव सावंत पाटील अशी मंडळी भाऊ–साहेबांच्या दिलसाफ सहकाराची. अशा स्थितीत इस्माईल नूरमहंमद हकीम, बुवासाहेब गोसावी यांच्यासारख्या अनेकानेक कार्यकर्त्यांना सार्वजनिक जीवनातील पितृस्थानी भाऊसाहेब सोमण वाटले अगर भाऊसाहेबानीच सार्वजनिक जीवनात मार्गदर्शन ज्याना केले त्याना ते गुरुस्थानी वाटले, तर ते साहजिकच नव्हे काय ? मनुष्यस्वभावाची पारख बरोबर असल्यामुळे, गुणग्राहकतेने भाऊसाहेब नुसते होत–करू मंडळींचे कौतुकच करून थांबत नसत, तर त्या मंडळीना कार्याचे योग्य क्षेत्र कसे मिळेल, याचीही चिंता वहात. गणपतरावजी तपासे यांचे मंत्रिपद हे याबाबतचे एक ठळक उदाहरण असून, १९५२ सालापासून आपली चमक मारणारे तरुण यशवंतराव चव्हाण १९४२ च्या आंदोलनातील 'गुप्त्यां'चे नैतिक अधिष्ठाना–वरील संघटनेचे पुढारी म्हणून कर्तबगारी करून बसल्यावर, त्याना साजेसे कार्य–क्षेत्र मिळताच, कारभार-कुशलतेने १९५४ साली 'यशवंत' पुरवठा मंत्री ठरले, याचा भाऊसाहेबाना निरतिशय आनंद होता. अशा कर्तबगार माणसांचा सल्ला घेण्यात आणि लक्ष्मणशास्त्री जोशी वा गणपतराव अळतेकरासारख्या विद्वान् तरुणाकडून काही शिकण्यात भाऊसाहेबाना कधीच कमीपणा वाटला नाही. शिवाय, खेड्यातून लोकमान्यांच्या वेळेपासून राष्ट्रीयवृत्तीचा प्रसार करणारे चाफळचे विष्णु रामचंद्र देशपांडे यांच्यासारखे पुढारी आणि प्रसिद्धिविन्मुखतेने तेच काम करीत राहणारे प्राथमिक शिक्षक हे भाऊसाहेब सोमणांचे " हुकमी पत्ते " च होते म्हटले तरी चालेल. या सर्व मंडळीना कोणत्याही विषयावर योग्य ती राष्ट्रीय–दृष्टि ठेवून भाऊसाहेबानी दिलेला सल्ला प्रांतिक वा भारतीय पुढाऱ्यांच्या सल्ल्याइतकाच नेहमी मोलाचा ठरे. तशातही कार्याचा गौरव जसे भाऊसाहेब करीत तसेच जरूर त्यावेळी जवळीकीने कोणाचेही कान उपटण्यास भाऊसाहेब चुकत नसत. आणि भाऊसाहेबानी कान उपटले तरी त्यांच्या शाबासकीइतकीच ती कानउपटणी अनु–भवान्ती " मोदक " च ठरल्याची उदाहरणे सातारा जिल्ह्यात काही कमी नाहीत.

भाऊसाहेबांच्या अशा सर्वसंग्राहक धोरणाचा प्रत्यय सातारा जिल्ह्याबाहेर केवढ्या प्रमाणात आला आहे, याचे प्रत्यंतर त्यांच्या मृत्युने ठिकठिकाणी जे दुःखाचे कढ आले त्यावरून येईल. लोकांच्या हार्दिक आपुलकीचे असे पुढारीपण भाऊसाहेबानी भारताच्या स्वातंत्र्याचे सेवेसाठी केले. लोकमान्य टिळक हा त्यांचा आदर्श पुरुष होता आणि राष्ट्रीय चैतन्याचा नंदादीप तेवत ठेवणे व काळाच्या ओघाबरोबर आवश्यक असेल ते तेल–तूप त्या नंदादीपासाठी तयार करीत राहणे हे त्यांचे व्रत होते. त्यामुळेच, महात्मा गांधींच्या सर्व कार्यक्रमाशी जरी ते समरस झाले नाहीत, तरी त्यांच्या व्यवहारी दृष्टीला बहुजनसमाजाचे उत्थापन आणि विधायक कार्यक्रमामुळे राष्ट्रपुनर्रचनेचे साधन महात्माजींच्या चळवळीत स्पष्ट

दिसल्यामुळे, त्या चळवळीतील खादीआदिकरून स्वदेशीच्या अंगांचा जसा ते पाठपुरावा करीत राहिले तसेच बहुजनसमाजाच्या राजकीय जागृतीसाठी व त्यांच्याशी समरस होण्यासाठी ते खिशाला व अंगाला घसही लावून घेऊ लागले. काँग्रेसला धरूनच त्यानी जिल्हासभेची जोपासना केली आणि काँग्रेसशी एकनिष्ठ राहूनच देशाचे स्वातंत्र्य संपादन आणि स्वातंत्र्यसंरक्षण होईल असा त्यांचा विश्वास होता.

मनुष्यप्रकृतीतील बारिकसारिक छटा लक्षात घेऊन त्या छटांचा उपयोग भारताच्या स्वातंत्र्याचे सेवेत करणारा प्रत्येक महाशय भाऊसाहेबाना आपलासा वाटे. त्याना पक्के ठाऊक होते की अनुकूल परिस्थिति, स्वताची उदात्तता आणि उत्साह यांच्या जोरावर आपल्या भोवतालच्या दुसऱ्या माणसापेक्षा जर आपल्याला सरसता येत असेल, तर ती सरसता सोडतो कोण ? त्या भोवतालच्या माणसातील मागे राहणारी मागे राहतील; बरोबरीची कदाचित् बाजूला सरतील; पुढची पुढे नेतील; न जाणो, केव्हा केव्हा आडवीही येतील; मग मात्र बरोबरीची पाय ओढू लागतील आणि मागची उगीच ओरडतील. या सर्वांची सोयरीक साधण्याचा एकच उपाय त्या मंडळीत अगदी तळापर्यंत उतरावे आणि त्याना आपल्या हाताचा आधार पाहिजे असेल तेव्हा तो आवश्यक द्यावा. जीवन हा मानला तर खेळ आहे. माणू-सकी ही त्या खेळाची प्रेरक आहे. त्यासाठी चमकदार खेळाडू व्हावयाचा प्रयत्न करावा. त्या प्रयत्नात समाजाच्या सहकार-संजीवनाचा विसर चुकून पडता कामा नये; कीर्तीचे मंदिर बडव्यांचा गाभारा होता कामा नये, भजनाची दिंडी उभी राहणारा सभामंडप एवढेच स्वरूप व्यक्तीच्या कीर्तिमंदिराला असले पाहिजे. पुढाऱ्यांचा कस या गोष्टीत आहे. त्यांच्या शब्दासरशी अनुयायी उभे राहिले पाहिजेत. चमक दाखवता दाखवता, प्रकाश पडू लागल्याबरोबर पुढारी जर लोकाना सोडून, " एकान्तवास हा पसन्त साधुसन्त । " सारखा वागू लागला, तर उपयोग काय ? पुढाऱ्याचे जीवन हा एक विश्वस्त निधि आहे. त्याचा सांभाळ लोकांच्या सुखदुःखाशी समरस होऊन करावयाचा असतो; परमेश्वराला स्मरून लोकसेवेसाठी जोडून दिलेले जीवनच खरेखुरे सुंदर जीवन ठरते. आपले जे जे काही उत्कट, उत्कृष्ट, भव्य वा दिव्य असेल त्याचे अर्पण दुसऱ्यासाठी झाले तर आपल्या जीवनाचे सार्थक होते. समर्पणात संजीवन आहे, संजीवन म्हणजेच समर्पण.

लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या चरित्रामृताचा, रामदास-तुकारामादि संताचा, शिवाजी-तानाजी वगैरे वीरांचा आणि समाजात सेवा-बुद्धीने वावरणाऱ्या लोकोत्तरांचा रोख वरीलप्रमाणे आहे. भाऊसाहेब सोमणांच्या व्यवहारशुद्ध मनाचा असा निश्चय झाला होता. म्हणून ते आपल्याकडून तसे वागण्याचा प्रयत्न करीत होते आणि आपण फार कमी पडतो आहोत याची

भाऊसाहेबाना पुरेपूर जाणिव होती. या जाणीवेतच भाऊसाहेब सोमणांचे सामर्थ्य होते. त्याच सामर्थ्याच्या जोरावर ते ओळखत होते की जग बदलत आहे. आजच्यापेक्षा ते उद्या अधिक बरे होणार आहे, असा माणसाचा विश्वास असला तरच तो हुरूपाने कर्मयोगी होतो. कालच्यापेक्षा आजचे अगर आजच्यापेक्षा उद्याचे जग बिघडणार, असा ज्यांच्या मनाचा सिद्धांत होतो ते वैफल्यवादी बनतात. म्हणून चिखला–बेडकानी भरलेल्या सरोवरात कमळे पाहण्याची ताकद असलेल्या दृष्टीने निष्ठा, तीतून सत्प्रवृत्ति, बुद्धीची एकाग्रता, आणि परस्परांच्या नियम-नेमातील समन्वय साधल्याशिवाय गत्यंतर नाही. हा समन्वय सोज्वळ न्यायाचा हवा. तरच मनुष्य कर्मयोगी होईल.

भाऊसाहेबानी आपल्या पुढारीपणाचे वळण असे घालून घेतल्याकारणाने, दुःखिताला हात, अन्यायकावर मात, आणि सत्प्रवृत्ताना साथ, असे त्या पुढारीपणाचे पैलू पडतात. भाऊसाहेबांच्या पुढारीपणाची किरणे उत्क्रांतिच्या कोंदणातून खुलतात. त्या कोंदणाचा मध्यबिंदु व्यवहारशुद्ध निष्ठा आहे. म्हणूनच लोकमान्य टिळकांच्या मृत्युनंतर सातारच्या वकीलवर्गात (बार–रूममध्ये) गप्पा चालल्या असता, " टिळक मेले, सातारच्या महाराजांचा हत्तीदेखील नुकताच मेला. त्याबद्दल इतकी हळहळ का ? " असे एका वकिलानी उद्‌गार काढताच, आपल्या संयमशील स्वभावाने त्याला समजुतीच्या गोष्टी भाऊसाहेबानी सांगूनही ते वकील जेव्हा आपली जीभ सरळ करीनात, तेव्हा रांगण्याचे खेळ करणाऱ्या त्या चटोराला सरळ करण्यासाठी हातात जोडा घेऊन भाऊसाहेब धावले ! लोकमान्य टिळकांच्याबद्दल भाऊसाहेबाना केवढी निष्ठा होती, याचे हे उदाहरण आहे. सभोवतालच्या वकिलानी त्याना आवरले आणि डिस्ट्रिक्ट जज्जानी बोलावून घेताच, आपला तोल सुटल्याबद्दल दोघाही हमरी–तुमरीवाल्यानी परस्परांची माफी मागितल्यावर सर्व प्रकरण मिटले, अशी आठवण रामचंद्र धोंडदेव अष्टेकरानी सांगितली आहे. असे तोल सुटल्याचे प्रसंग भाऊसाहेबांच्या पुढारीपणात क्वचित् असले तरी त्यांची लोकमान्यावरील आणि त्यांचे अनुयायी म्हणून आपल्या मर्यादा ओळखून, स्वीकारलेल्या राष्ट्रसेवेच्या ध्येयावरील त्यांची निष्ठा प्रखर होती. कांग्रेसच्या मार्गानेच भारताचे स्वातंत्र्य सिद्ध व समर्थ होईल असा त्यांचा विश्वास असल्यामुळेच काँग्रेसवरीलही त्यांची निष्ठा तशीच सतेज होती. म्हणूनच " सर्व सामर्थ्याचा समन्वय साधण्यासाठी उपयोगी पडणारा सातारचा तो वृद्ध कोठे आहे ?" अशी हरिपुरा काँग्रेसचे वेळी देशगौरव सुभाषचंद्र बोसनी भाऊसाहेबांची चौकशी केली होती. आणि १९४२ च्या धन्वन्तरी कासेगावकर, किसन वीर, वसंतराव पाटील प्रभृति भूमिगतांच्या देशभक्तीबद्दल आदर बाळगणाऱ्या भाऊसाहेबांची चेष्टा सरदार वल्लभभाई पटेल " केम पत्रिसरकार ? " या शब्दानी केल्याशिवाय सोडत नसत.

तथापि समाजाला आपल्या आटोपात ठेवण्याच्या त्यांच्या कलेमुळेच भाऊसाहेबांच्या पुढारीपणाला महत्त्व चढले, हे विसरून चालणार नाही. वादळी सभासुद्धा कसल्याही तऱ्हेची आदळआपट न करता, सर्वांच्या समजुतीने पार पाडावी भाऊसाहेबानीच. सातारा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सोनपत–पानपतची आठवण करून देणारी प्राथमिक–शिक्षक बँकेची सभा, अगर रहिमतपूरची जिल्हा परिषद ही त्या कौशल्याबाबत भाऊसाहेबांच्या आयुष्यातील खास उदाहरणे आहेत. त्याप्रमाणेच त्यानी आपल्या पुढारीपणाचा उपयोग अनेकानेक संस्थाना करून दिला हेही त्यांच्या पुढारीपणाच्या महत्त्वाचे दुसरे कारण आहे. साताऱ्च्या "व्यायाम मंडळास" डॉ. जयकर, चक्रवर्ती राजगोपालाचारी, जनरल करीअप्पा, राजा महाराजासिंग (मुंबईचे राज्यपाल), न्यायमूर्ति छगला यांच्या भेटी भाऊसाहेबांच्यामुळेच झाल्या व त्या संस्थेची प्रतिष्ठा उंचावली. त्याचप्रमाणे आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयालाही भाऊसाहेबांच्या पुढारीपणाचा उपयोग झाला आहे. डॉ. वि. ल. तथा भाऊराव आगाशे लिहितात की– "आर्यांग्ल वैद्यक महा–विद्यालयाची स्थापना होऊन बेचाळीस वर्षे झाली. पहिल्या दहा वर्षांच्या काळात भाऊसाहेब केवळ नियामक मंडळाचे सभासद होते. काही काळ ते उपाध्यक्षही होते. १९३७ साली पहिली लोकमताची सरकारे बनली त्यावेळी संस्थेला सरकारमान्यता मिळून सरकारी वार्षिक ग्रँटही सुरू झाली. भाऊसाहेब सातारा जिल्ह्यातर्फे कायदे-मंडळाचे सभासद असल्यामुळे संस्थेची अनेक कामे ते तेथे राहून करीत. १९४९ साली संस्थेचे एक प्रमुख कार्यकर्ते डॉ. मो. ना. आगाशे यांचा ६१ वा वाढदिवस साजरा झाला व तन्निमित्त संस्थेचे हॉस्पिटल बांधण्याकरता एकाहत्तर हजार रुपये निधि जमविण्यात आला. संस्थेने "डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालयाची" जी इमारत बांधली तीकरता संस्थेला कर्ज उभारावे लागले. त्यावेळी भाऊसाहेबांच्याच पाठिंब्याने वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनीने कमी व्याजाने एकूणपन्नास हजार रुपये कर्ज दिले. या शिवाय भाऊसाहेब ट्रस्टी असलेले दोन निधि होते. त्यातूनही त्यानी संस्थेला देणग्या दिल्या. युनायटेड वेस्टर्न बँकतर्फेही संस्थेला तीस हजार रुपये कर्ज घ्यावे लागले. ते केवळ वैयक्तिक जामीनकीशिवाय मिळणे शक्य नव्हते ! कार्यकर्त्यांच्या कसोटीची ती वेळ होती. इमारत–बांधकाम अपुऱ्या स्थितीत होते व कर्ज ताबड–तोब मिळणे अवश्य होते. भाऊसाहेबानी स्वता जामीन राहण्याची तयारी दर्शविली व कार्यकर्त्यांना अनुभविक सल्ला देऊन कर्ज मिळविण्यात पुढाकार घेतला. अशा तऱ्हेने भाऊसाहेबानी, कसल्याही अधिकाराच्या जागेवर नसतानासुद्धा, संस्थेला धनिकाकडून देणग्या मिळवून दिल्या. १९५२ साली भाऊसाहेबांच्या खटपटीमुळेच डॉ. मेहता इमारतीचे उद्‌घाटन समारंभास अध्यक्ष म्हणून लाभले."

वाईच्या प्राज्ञमठाची नवी पाठशाळा झाली त्या प्राज्ञपाठशाळेच्या संगोपनात तर भाऊसाहेबानी जीवेभावे भाग घेतला. स्वामी केवलानंद सरस्वती (पूर्वाश्रमीचे

नारायणशास्त्री मराठे) यानी ती संस्था स्थापन केली. नैष्ठिक ब्रम्हचर्य पाळून जुन्या वैदिक काळातील आश्रमीय जीवनाप्रमाणे विद्याभ्यास करून उत्तम राष्ट्रीय कार्यकर्ते निर्माण करणे हा संस्थेचा मुख्यतः उद्देश होता. त्याप्रमाणे दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर, कोकजेशास्त्री, आचार्य विनोबा भावे, विष्णुशास्त्री परांजपे वगैरे नामवंत कार्यकर्ते संस्थेने निर्माण केले. नारायण–शास्त्रींचे चतुरस्र शिष्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यानी धर्मकोश, मीमांसा–कोश अशी चिरस्थायी कामे उभारली. राष्ट्रीय–शिक्षणाच्या या परंपरोत्थित नवयुग–समन्वय करणाऱ्या संस्थेतील तर्कतीर्थ व बाबा लेले आणि वर उल्लेखलेली मंडळी यानी भारतीय स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय उत्थापनात प्रकर्षाने भाग घेतला आहे. सदर संस्थेच्या संचालकमंडळावर भाऊसाहेबानी अनेक वर्षे काम केले व तिला आपल्यापरी हातभारही लावला. ता. २१ नोव्हेंबर १९५२ रोजी स्वामी केवलानंद सरस्वतींचा सत्कार झाला, त्यावेळी प्रकृति अस्वस्थ असतानाही केवळ कर्तव्यबुद्धीने हजर राहून स्वामीजींचा यथार्थ शब्दात गौरव केला.

अशाच कितीतरी संस्थाना भाऊसाहेबांचे पुढारीपण उपयोगी पडले आहे. मोफत वाचनालये, मलबार–रिलीफ–फंड, गुजराथ–रिलीफ–फंड, तळेगाव–काच–शाळा–पैसा फंड, सत्याग्रह शिबिरे, शारदोत्सव, अर्कशाळा, खादी–उत्पादन–कार्यालय, चौंडे महाराजांची गोरक्षण संस्था, मसूरचा आश्रम, सज्जनगड-जीर्णोद्धार मंडळ, वेदान्तविद्यापीठ, मद्यपान प्रतिबंधक मंडळ, साताराचे पॉप्युलर स्कूल, कऱ्हाडचे टिळक हायस्कूल व शिवाजी हायस्कूल अशा कितीतरी संस्थाना भाऊसाहेब सोमणानी आपल्या पुढारीपणाचा उपयोग करून दिला. चाफळचे संस्थान सार्वजनिक करण्याबद्दल त्यानी खटपट केली होती. जिल्ह्यात अग्नि–नारायणाने कोठे कोप केल्यास त्या दग्धभूंच्या पुनरुज्जीवनासाठी भाऊसाहेब बिनचूक धावावयाचेच. १९१८ साली जाळगेवाडी ( चाफळ जवळची ) जळली असता, भाऊसाहेब सोमणानी तीन हजार रुपये जमवून त्या गावाला मदत केली होती. अशा स्वरूपाचा त्यांचा हा क्रम अव्याहत चालू राहिला.

तात्पर्य आपल्या पुढारीपणाचे फाजील स्तोत्र न माजविता भाऊसाहेबानी ते शक्य त्या त्या मार्गानी राष्ट्राच्या सेवेला लावले. राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या प्रेरणेने, दादासाहेब करंदीकर प्रभृतींच्या शिकवणुकीने व प्रसिद्धिविन्मुख लोकोत्तरांच्या उदाहरणाने लोकसेवा करता करता भाऊसाहेबांचे जे पुढारीपण विकासले, त्याचा फिरून लोकसेवेतच उपयोग ते करीत गेले; म्हणूनच १९२९ साली सातारा जिल्ह्यात काँग्रेस भरविण्याचा आत्मविश्वास त्याना आला होता. खटपट करूनही काँग्रेस सातारा जिल्ह्यात आली नाही, हा योगयोग ! ! पण समाजातील तळच्या माणसाच्या बारिकसारिक दुखण्यासरण्यापासून राष्ट्रीय उत्थापनाच्या तेजस्वी अग्निकुंडापर्यंत आणि राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या विधायक मार्गदर्शनापासून तो जीवनातील सामाजिक सामर्थ्यसंवर्धनापर्यंत, भाऊसाहेब सोमणानी लहानथोर सर्वांच्याच सेवेत आपले पुढारीपण कारणी लावले आणि नव्या पिढीला जणु सांगितले की–

" दावियेला मार्ग हा मी, जाती थोर जये जन ॥ "

# २५ गृहस्थ सोमण

भाऊसाहेब सोमण सातान्यात १८८७ साली इंग्रजी शिक्षणाकरिता आले. प्रथम ते काही दिवस यादोगोपाळ पेठेत सचिव हौदाच्या शेजारी गणपतराव देवस्थळी यांचे घरी, व पुढे मंगळवारात सर सुभेदारांच्या आळींत हौदासमोर वडाजवळील घरात, नंतर दामुआण्णा जोशी यांच्या घरी असे एकंदर तेरा वर्षे त्या भागात बिऱ्हाड करून राहिले. त्यांच्याजवळ तेव्हापासून त्यांच्या मातोश्री रहात होत्या. आजोबांच्या मृत्यूनंतर आणि विशेषतः आजी पार्वतीबाई यांच्या मृत्यूनंतर गणुआप्पानी लवकरच पेन्शन घेतल्याकारणाने ते वडूथ येथील आपले घरी राहू लागले. अधूनमधून ते सातान्यास येत. जवळजवळ एक हजार रुपये खर्च करून त्यानी वडुथच्या घराची दुरुस्ती केली होती. आपला मुलगा लवकरच वकील होईल आणि त्याचे बिऱ्हाड स्वतंत्रपणे सातान्यास राहील अशी अपेक्षा करून आपले पेन्शनीचे दिवस शांतपणे वडुथात आपल्या स्वताच्या वडिलाप्रमाणे आपण घालवावेत असा बेत गणुआप्पानी केला होता. पण मनुष्य चिंतितो एक, ईश्वरी योजना असते निराळीच.

१८९८ साली आपले चिरंजीव रामभाऊ सोमण यांचा विवाह वरील दृष्टीनेच गणुआप्पानी केला. वाईतील कृष्णापुलाजवळ राहणारे काशिनाथपंत बापट यांची कन्या सौ. का. वालुबाई ही सौ. सीताबाई सोमण होऊन वडुथास नांदावयास आली. रामभाऊ सोमणांचा हा विवाह वे. शा. सं. रामाचार्य कानडे यानी रामभाऊंचे मोडी अक्षर बघून जमविला होता. सौ. सीताबाई सोमण प्रकृतीने धडधाकट होत्या आणि लग्न होऊन आल्यानंतर अवर्षणामुळे वडुथास शकुंतेश्वराला गावकऱ्यानी पाण्यात कोंडले, त्यावेळी देवळात पाणी भरण्याच्या कामी समवयस्क मुलीमध्ये सौ. सीताबाई सोमण याच पहिल्या होत्या, असा अभिमान गणुआप्पाना वाटला. गणुआप्पांची ही धडधाकट सून १८९९ साली प्लेगच्या दुखण्याने देवाघरी गेली ! नंतर कांही दिवस गेले. एवढ्यात सातारच्या व्यंकटपुऱ्यातील वजनदार असे मुखत्यार वकील रघुनाथ विनायक उर्फ तात्या पटवर्धन यांची कन्या सौ. का. बाळूताई यांच्याशी रामभाऊ सोमणांचा विवाह दामुआण्णा जोशी यांचे वाड्यांत होऊन गणुआप्पाना नव्या सूनबाई आल्या. स्वतःच्या दोन मुली, वडुथात दिलेली अनंतराव खऱ्यांची पत्नी व मोरगिरीस सान्यांच्याकडे दिलेली मुलगी आणि पहिली सून ह्या अहेवपणी देवाघरी गेल्याकारणाने गणु-आप्पाना आणि दुर्गाताईना नव्या सूनबाई ह्या स्वताच्या मुली इतक्या जिव्हाळ्याच्या वाटल्या असल्यास नवल काय ? त्यातूनही वयाच्या दीडवर्षापासून मातृसुखाला आचविलेली मुलगी आपली सून झाली आहे या जाणिवेने गणुआप्पा आणि दुर्गा-ताई या वत्सल मंडळीना आपल्या सुनेविषयी अधिकच आपुलकी वाटली. त्यातून

पहिल्या सुनेने नवस करूनही रामभाऊ सोमण, वकील झालेले पाहण्याचे भाग्य तिला मिळाले नाही. तर या दुसऱ्या सूनबाई घरात आल्यावर लवकरच रामभाऊंची वकिली उत्तीर्ण झाली. त्यामुळे या पायगुणाच्या सुनेला नुसत्या रूढ अर्थानेच नव्हे तर सर्व भावनानी गृहलक्ष्मीचा मान मिळू लागला.

रामभाऊ सोमण हे वकिलीसाठी दादासाहेब करंदीकरांच्याकडे मदतनीस म्हणून राहिल्यावर त्यानी आपले मंगळवारातील बिऱ्हाड हालवून शनिवारात शनीच्या देवळासमोर काणे यांचे घरी थाटले. वडुथास बांधलेले नवे घर गणुआप्पाना सुखाचे गेले नाही. कारण तेथे राहिल्यापासून ते वरचेवर आजारी पडू लागले. म्हणून कर्तव्यबुद्धीने रामभाऊ सोमणानी आपल्या नव्या बिऱ्हाडी वडील–मातोश्रीना आणून ठेविले. वडूथचे घर त्यानी रघुनाथ काशिनाथ गोखले या वैदिक ब्राह्मणास बक्षिस देऊन टाकले. आणि गणुआप्पानी वडूथच्या गणपतीच्या देवळाचा जीर्णोद्धार जसा निरपेक्ष बुद्धिने केला होता तसाच वडूथच्या घराचाही लोभ आता सोमण मंडळीनी सोडला. वडूथ येथे आजोबाना बक्षिस मिळालेल्या जमिनीबाबत रामभाऊ सोमण वकील झाल्यापासून सोमण मंडळीनी अशी वृत्ति ठेविली होती की, त्या जमिनीची सरकारबाब आपण भरावयाची आणि कूळ काय दोन आंबे आणून देईल अगर कधी काळी काही धान्य घालील ते महादजीपंत सोमणांचा प्रसाद समजून स्वीकारावयाचे. या प्रमाणे शनिवारात काणे यांचे येथे बिऱ्हाड केल्यावर वडूथ येथील मिळकतीपैकी काही किरकोळ भांडी–कुंडी जेवढी आली तेवढीच वडिलार्जित मिळकत म्हणून जगाच्या बाजारात सोम–णांच्या जवळ राहिली. एरवी वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद आणि वळण हाच आपला खरा वारसा आहे असे रामचंद्र गणेश सोमण स्वताच्या मृत्युपर्यंत समजले. आणि त्यांच्या त्या समाधानात त्यांचे सामर्थ्य होते. वडूथ येथील घराचा एकही चिरा न दिसण्याइतकी, त्या घराची लागलेली वाट आढळून आल्यावरही रामचंद्र गणेशांच्या मनाची शांति ढळली नाही हे या गोष्टीवरून स्पष्ट आहे.

जसजशी वकिलीचे धंद्यात आपली प्रगति होऊ लागली तसतशी भाऊसाहेब सोमणानी काही पुंजीही केली. त्या पुंजीतून १९१४ साली त्यानी शनिवार पेठेतील आगटे यांचे घर खरेदी केल्यावर ते तेथे येऊन राहिले आणि १९२१–२२ साली वीस हजार रुपये खर्चून त्यानी त्या खरेदी केलेल्या घराला सर्व सोईनी सज्ज केले. "जिल्हा (उत्तर) सातारा ता. सातारापैकी शहर सातारा, पेठ शनिवार सि. स. नं. १८८ याचे क्षेत्रफळ ९२२ चौ. वार; यात असलेला पत्र्याचा वाडा पश्चिमाभिमुखी. सदर वाड्यात येण्यास दोन प्रवेशद्वारे आहेत. मुख्य दरवाजा जवळजवळ मध्यावर आहे. वाड्यात प्रवेश केल्यावर उजवे हातास तीन खणी दुघई भर दुमजला असा जुने वाड्याचा भाग आहे. व डावे बाजूस देवडीवजा एक खण असून त्याला लागून उत्तर बाजूस नवीन बांधीव इमारत

पूर्व-पश्चिम बांधलेली आहे. दक्षिण बाजूच्या तीन खणी भागाला लागून जो दरवाजांचा खण आहे, तो आणि देवडीचा खण यावर भर दुमजली माडी आहे. तो भाग दुघई आहे. त्यास लागून फरसबंद अंगण असून त्या अंगणाचे दक्षिण बाजूस दोन खण रुंदीचा व सहा खण लांबीचा असा पडवीवजा बांधीव भाग आहे. या भागातूनच दक्षिण बाजूकडे असलेल्या जिन्याने वर माडीवर जाणेचा मार्ग आहे.

पश्चिमेकडील मुख्य दरवाजातून आत आल्यावर असलेल्या अंगणात एक मोठा हौद आहे. इमारतीचे माजघर व अंगणातील हौद यांचे दरम्यान तीन खणाची एक पडवी आहे. पूर्वेकडील गच्चीखालून मागले चौकात उतरलेवर एक गोठ्याची इमारत राहते व लहानसा चौक राहतो. तशीच पूर्व बाजूची एक दुपाकी खोली राहते. इमारतीतून बाहेर पडल्यावर बोळाचे पलीकडे एक लहानशी बाग आहे. पश्चिम अंगाचे दरवाज्यातून इमारतीत आल्यावर उत्तर बाजूस देवडी व देवडीचे उत्तर बाजूस जो इमला आहे तो सर्व नवीन बांधलेला आहे. तो हौदाचे पूर्व हद्दीपर्यंत. या भागात देवडीचे व दरवाज्यावरील खणाचे माडीपैकी पूर्वेकडील दोन खणी माडीचा समावेश होतो. त्याचे पूर्वेकडे स्वयंपाकगृह असून त्याचे पूर्व अंगास गाडीचा तबेला वगैरे आहे. त्या तबेल्यास लागून दक्षिणेकडे व हौदाचे पूर्वेस मोकळी जागा आहे. हौदाचे पूर्वेस तीन सेप्टिक पद्धतीचे शौचकूप असून पुढे मोकळी जागा आहे. इमारतीचे पूर्व अंगास मागील बोळास लागून दोन शौचकूप आहेत. इमारतीचे दक्षिण बाजूस सोमण व आगटे यांच्या समाईक मालकीची एक विहीर असून विहीरीत दोघांचाही निम्मा हिस्सा व हक्क आहे." सोमणानी सज्ज केलेल्या घराचे वर्णन १९५४ साली केलेले आढळते ते वरीलप्रमाणे आहे. १९२१-२२ साली रामभाऊ सोमणानी वरील तऱ्हेने त्यावेळी "टोलेजंग हवेली" वाटण्यासारख्या घरात राहवयास सुरवात केली. तेव्हा त्यांच्या मातोश्री जिवंत नव्हत्या याचे सोमणाना राहून-राहून वाईट वाटत असे. सुखसोयींनी संपन्न अशी राहण्याची सोय असणारे घर रामभाऊ सोमणानी बांधले आणि ते १९१४ नंतरच्या प्राप्तीतून बांधले यावरून रामभाऊ सोमणांची वकिलीतील प्राप्ती कोणी अंदाजावयास गेल्यास तो सपशेल चुकेल. कारण पैसे मिळवून साठविण्यापेक्षा त्याचा सदुपयोग झाला पाहिजे असा रामभाऊ सोमणांचा कटाक्ष होता. दोन्ही हातानी द्यावे आणि जास्तीतजास्ती लोकांचा उपयोग करावा ही रामभाऊ सोमणानी आपल्या वडील-आजोबापासून घेतलेली वृत्ति होती. रामभाऊ सोमणांची ही दान-वृत्ति त्यांच्या घरातल्या माणसानाच काय पण त्यांच्या निकटच्या स्नेह्या-सोबत्यानाही अजिंक्य वाटे. लोकांचा उपयोग शारीरिक मेहनतीने, बौद्धिक करामतीने अगर प्रत्यक्ष पैशाच्या दानाने सबंध दिवसात जर झाला नाही तर आयुष्यात काही तरी चुकले, अशी चुटपुट रामचंद्र गणेश सोमणांच्या मनाला

लागत असे. कित्येकवेळा त्यानी आपल्या प्राप्तीच्या मानाने दिलेले आर्थिक दान हे हुकमी पैसे गोळा करणाऱ्या सिंहासनाधिष्ठित राजाच्या दानाचे मानानें उधळे-पणाचे वाटे. म्हणून त्यांचे स्नेही त्याना काही बोलू लागल्यास बिडीचा झुरका ओढीत निगरगट्टपणाने सोमण ते ऐकून घेत असत. कोणी गरजू रामभाऊ सोमणाकडे आला आणि त्याच्या गरजेइतके आपल्या जवळ द्यावयास नाही असे आढळून आले तर रामभाऊ सोमण ओशाळले होत. मग तो गरजू त्यांच्या घरातून बाहेर पडल्यावर मिळालेल्या पैशाबद्दल कृतघ्न नसला तरी बेफिकीरही असा-वयाचा ! तथापि दान देण्यातील सौख्य हे रामभाऊ सोमणाना सगळ्यात मोठे सौख्य वाटत असे. त्यातही एका हाताने दिलेले दान दुसऱ्या हाताला न कळेल इतक्या बेताने ते दिले म्हणजे त्यांचे ते सौख्य दुणावत असे. ही त्यांची वृत्ति स्वतःच्या धंद्यातही दिसून येई. आपल्याकडे येणारा अशील आपल्या योग्यते-प्रमाणे आपल्याला आपली फी देतो आहे की नाही या गोष्टीपेक्षा त्याने आपल्याकडे सोपविलेले काम परमेश्वराला स्मरून आपण करतो की नाही याच्यावर रामभाऊ सोमणांचा कटाक्ष असे. त्यामुळे ज्या कामासाठी रामभाऊ सोमणांच्या-पेक्षा दुसरे वकील चोपून शंभर रुपये घ्यावयाचे त्या कामात रामभाऊना पन्नास रुपये मिळाले तरी त्यांची तक्रार नसे. मात्र आपल्या कामाची खरोखर फी किती आहे याची जाणीव दिल्याशिवाय भागतच नाही आणि आपल्या दयाळू वृत्तीचा भलता दुरुपयोग अशील करतो आहे अशी शंका आल्यास त्याला ~~सस्मितपणे~~ सर्व हिशेब समजावून देण्यात रामभाऊ ढिले नव्हते. हे काम बहुधा रामभाऊकडे कारकून म्हणून काम करणाऱ्या वडुथच्या नारायणमामा जोशाकडे असे. नारायणमामानी हिशेब सांगावा आणि तो आपल्याला जड वाटल्यास खुद्द रामभाऊ सोमणाकडून सूट मिळवावी अशी सवयच सोमणांच्या कित्येक अशिलाना लागलेली होती. त्यातून सरकारी निरखाप्रमाणे कांही हिशेब असला तरी आपल्याकडे आलेला अशील हा डोळ्यात अश्रू आणून अगर करुणपणाने आपली कहाणी सांगू लागला तर त्याचे काम मुळीच फी न घेताही सोमणानी करावे अशी उदाहरणे काही कमी नाहीत. त्याच-बरोबर असेही एकादे उदाहरण सापडते की जेथे आपला अशील वाह्यात् वागतो असे आढळले, तेथे सोमण कठोरच राहिले. दादासाहेब करंदीकराकडून सुटल्यानंतर स्वतंत्र धंदा करावयास सुरवात केल्यावर सोमणानी चालविलेले मसूर भागातील एका शेठजींचे अपील त्यांच्या विरुद्ध गेले. मी तुम्हाला वकीलपत्र देऊन फसलो, असे म्हणून शेठजी अकांडतांडव करू लागताच सोमणानी त्यांचे घेतलेले सर्व पैसे परत फेकून दिले, आणि जन्मभर त्यांच्याशी गोड वागले तरी त्यांचे वकिलपत्र पुढे कधीच घेतले नाही. सातारा जिल्ह्याच्या १३५२ गावात असे एकही गाव नाही की जेथे सोमणांचा अेखादादुसरा अशील नाही. या त्यांच्या व्यापक संबंधामुळे त्यांची प्राप्ती

दरमहा पुष्कळ दिवस तरी ८०० ते १००० रुपयांची होती. आपल्या वडिलाना जास्तीतजास्त सतरा रुपये पगार मिळाला आणि आपल्याबरोबर शिकलेल्या मंडळीपैकी पुष्कळसे दरमहा ८० रुपयापासून २५० ते ३०० रुपयापर्यंत मिळवीत राहिले, या गोष्टींच्या निरीक्षणावरून आपल्या अशिलांच्या हातून आपल्याला जो पैसा मिळे त्यावरूनच, "अनंत हस्ते कमलावराने देता किती देशिल दो कराने" असे रामभाऊ सोमणाना होऊन जाई. आणि म्हणून "घे लिख, लिख दे" हे हिशोबी जमाखर्चाचे तत्त्व व तंत्र पूर्णपणे ठाऊक असूनही, ते न अवलंबिता, जिचा संबंध आल्यावर किंवा ओळख पडल्यावर रामभाऊ सोमणानी तिचा थोडातरी उपयोग केला नाही अशी एकही संस्था अगर व्यक्ति सहसा आढळणार नाही.

अशा स्थितीत एकाद्या सार्वजनिक राष्ट्रीय कार्याला भाऊसाहेब सोमण किती तत्परतेने मदत करीत असतील याची कोणासही कल्पना करता येईल. "नाशिक कटातील आरोपींच्या बचावासाठी तात्यासाहेब केळकरानी आठदहा हजार रुपये जमविले. त्यासाठी त्यानी मला चिठ्या देऊन गावोगाव पाठविले होते. प्रथम साताऱ्यास गेलो तो भाऊसाहेब सोमण– गणपतराव फणसळकरानी हजार रुपयांचा चेकच पुढे ठेविला." ही हकीकत सार्वजनिक सभेचे सदाशिवराव बापट यानी स्वता सांगितली आहे. त्यावरून सोमणांची दानवृत्ति लक्षात येईल. विद्यार्थी–वर्गाला फी–पुस्तकासाठी पैसे देण्यातील सोमणांचा आनंद आपण अनुभविलेल्या गरीबीतून विकासलेल्या मनाचा निरागस आनंद असे. दुःखितांचा कळवळा हा गृहस्थ सोमणांच्या अंतःकरणाचा उमाळा होता.

ब्रह्माश्रमस्वामी उर्फ पूर्वाश्रमीचे गोविंदराव श्रोत्री हे लिहितात की "१९२५ साली खटाव तालुक्यातील एका गावी ते गेले होते. तेथे त्यावेळी पाण्याचा दुष्काळ होता. त्या गावी एकच विहीर होती. पन्नास–साठ माणसे घागरी घेऊन तळा–पासून वरपर्यंत बसलेली. खालील मनुष्य डबक्यातील पाणी करवंटीने भरून घागर भरल्यावर ती पार वरच्या माणसाच्या हातात येई. ते दृश्य पाहून भाऊसाहेबाना रडू आवरले नाही. ताबडतोब मुंबई सरकारास तार करून व लगेच सविस्तर पत्र लिहून, त्या विहिरीचे खोदकाम त्यानी लवकरात लवकर घडविले." समाजा–संबंधी सद्गृहस्थाचे कर्तव्यच तेवढे आपण केले, असे त्यासंबंधात भाऊसाहेब नेहमी म्हणत. बाहेर आढळलेल्या दुःखी–कष्टी जीवाबद्दल अशी काळजी वाहणाऱ्या सोमणांचे येथे "आल्या अतिथा मुठभर द्याया, मागे–पुढती पाहु नको।" असा खाक्या असेल, यात मग नवल काय? भाऊसाहेब सोमणांचे वडील गणुआप्पा यानी शाळेच्या भोवती बाग करून झाडाना पाणी घालण्याचे वळण विद्यार्थ्याना लावल्याचे श्रौताचार्य बापट सांगतात. "मास्तरानी लावलेल्या कपाशीच्याच झाडावरील कापसाची मास्तर स्वता जानवी करून घालीत. थंडीच्या दिवसांत सकाळी शाळेच्या बाहेर मुले शेकोटी करीत; तीवर विद्यार्थी व मास्तर थोडा

वेळ शेकून शाळेत प्रवेश करावयाचे. पहिल्या गोष्टीतील स्वावलंबन नि पावित्र्य आणि दुसऱ्या गोष्टीतील समाजाच्या चालीने चालण्याची पद्धत, हा वडिलांचा वारसा भाऊसाहेबानी जन्मभर सांभाळला. आणि त्याला उदार हाताची जोड देऊन गृहस्थाश्रमातील आतिथ्यशीलतेची व्रते कटाक्षानी पाळली." विधान-परिषदेचे अध्यक्ष झाल्यावरही आपला बालमित्र म्हणून आलेल्या श्रौताचार्यांना जवळ घेऊन बिडी ओढत ओढत त्यानीं मलबारहिलवरच्या बंगल्यात गुजगोष्टी केल्या, तशाच खटावचे पंडितराव द. इनामदार या प्राथमिक शिक्षकालाही आपल्या येथे जेवाखावयास व झोपावयास ठेवून घेऊन त्यांच्या संसारयात्रेच्याही चौकशा आपुलकीने केल्या. मग साताऱ्यास आपल्या मुलांच्या खेळगडचाना व वर्गबंधूना त्यानी व त्यांच्या कुटुंबियानी आपुलकीने वागविले असेल यात आश्चर्य मानण्यासारखे काहीच नाही. बा. भा. खटावकर लिहितात की, "आण्णा (भास्कर) व मी एकाच वर्गात. तेव्हा त्यांच्या मुलापैकी मी एक असे ते समजत. दसरा, अश्विनी दिवाळीसारख्या प्रसंगी ओवाळावयाच्या वेळेस मी त्यांच्या मुलासमवेत उपस्थित असावयाचा." मुलांच्या सोबत्यासंबंधी जेथे अशी वृत्ति, तेथे अबदुल-कादर शेखसाहेबासारखे भाऊसाहेबांचे वर्गबन्धु व स्नेही "वहिनी मला भाऊजी मानतात" असा अभिमान बाळगतात, हे साहजिकच होय. भाऊसाहेब सोमणानी आपल्या सार्वजनिक कार्यात जोडलेल्या मंडळीनाही घरी जेवावयाची वेळ झाली असल्यास "भात खाऊन जा" असा आग्रह व्हावयाचा; मग कोणाचेही मूल आल्यावर त्याचे तोंड गोड केल्याशिवाय अगर त्याला खाऊ दिल्याशिवाय, सोडले नाही, हे त्या घराच्या वात्सल्यास साजेसेच आहे.

सार्वजनिक कार्यामुळे भाऊसाहेब सोमणानी जोडलेले लहान-मोठे कार्यकर्ते-वयापरत्वे वा कर्तृत्वापरत्वे सोमणांच्या घरी सन्मानिले जावयाचेच. लोकमान्य टिळक, दादासाहेब करंदीकरांच्या साठीसमारंभाचे निमित्ताने आले असता, त्यानी सोमणांच्या घराला पाय लावले. तेथपासून देशातील मोठमोठ्या लोकांचा पाहुणचार सोमणांच्याकडे झालाच. शंभुराव आठल्ये मास्तर लिहितात की "तेव्हापासून देशभक्ताना सोमणांचे घर म्हणजे साताऱ्यातील सरदारगृह होते." केशवराव छापखाने व काकासाहेब खाडिलकर (१९१७), म. गांधी (१९२० व १९२७) शौकतअल्ली-महंमदअल्ली (१९२०), चिंतामणराव वैद्य (१९२१), मौ. अबदुल महंमद युसफ, आनंदीबाई जोगळेकर, सौ. इंदिराबाई देवधर, गंगाधरराव देशपांडे, तात्यासाहेब करंदीकर (१९२२), तात्यासाहेब केळकर (१९२६, १९३४), राष्ट्राध्यक्ष अय्यंगार, व सौ. कस्तुरबा गांधी (१९२७), नारायणराव गुंजाळ, सदाशिवराव बापट, विनायकराव भुस्कुटे, केशवराव जेधे, सोलापूरचे सुमंत (१९२८), डॉ. हर्डीकर, बाळूकाका कानिटकर (१९२९), ठाण्याचे नानासाहेब

दामले, सोलापूरचे डॉ. अंत्रोळीकर (१९३०), सेनापति बापट, पं. मदनमोहन मालवीय, सुभाषचंद्र बोस ( १९३१ ), काकासाहेब गाडगीळ (१९३४), बाबू राजेंद्रप्रसाद, आचार्य कृपलानी ( १९३५), पं. जवाहरलाल नेहरू ( १९३७ ) बाळासाहेब खेर (१९३८) जयप्रकाश नारायण व सौ. प्रभावतीदेवी, रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, शंकरराव देव, बाबा राघवदास अशा कितीतरी राष्ट्रनेत्यांचा पाहुणचार करावयाचे भाग्य आपल्याला लाभले, याबद्दल भाऊसाहेब सोमणांच्या घराला धन्यताच धन्यता वाटते. १९४२ च्या आन्दोलनातील नाना पाटील प्रभृति शे–दीडशे (भूमिगत) 'गुप्ते,' भाऊसाहेब सोमण प्रकृतिस्वास्थ्यासाठी १९४६ साली पांचगणीस असताना, सोमणांच्या घरी एका रात्री आले असता, तेवढया उशीराही, सोमणांच्या बायकामुलानी त्यांच्या जेवणाखाणाची व्यवस्था केली, हे ऐकून, शंभुराव आठल्ये लिहितात की " दुर्वास ऋषींच्या मेळाव्याला जेवू घालणाऱ्या द्रौपदीच्या थाळीचा आनंद सोमणाना पांचगणीस झाला."

अशा आतिथ्यशीलतेने चालणाऱ्या घरच्या प्रपंचाचा खर्च भागविण्या–पलिकडे स्वता भाऊसाहेब सोमण फारसे हिशोबी लक्ष घालीत नसत. आई होत्या तोपर्यंत आईजवळ, नंतर आपले गृहलक्ष्मीजवळ आणि शेवटी शेवटी आपले चिरंजीवाजवळ आपली प्राप्ती देऊन घरची व्यवस्था भाऊसाहेब करीत. स्वताला पैसे लागले तरी त्यांच्याकडूनच ते मागून घ्यावयाचे. विठ्ठलरावजी सोमण लिहितात की " १९१५ मध्ये आमचे आजीजवळ ठेवणेस दिलेली शंभर रुपयांची नोट त्यांचे कनवटीतून केरात पडली व दुसरे दिवशी बागेमध्ये असलेल्या खताच्या खड्ड्यात गेली. दोन दिवस कोणाच्या लक्षातच आले नाही. भाऊनी प्रश्न केल्यावर आजी घाबरल्या. ते कोर्टात गेल्यावर त्या भर उन्हाचा उकिरडा उकरीत बसल्या. सायंकाळ झाली. भाऊ कोर्टातून आले. आईची चौकशी केली. 'जाऊ दे की, गेली तर गेली.' या एका वाक्याखेरीज भाऊंनी दुसरा शब्दही उच्चारला नाही. पैशामागे आपण जाऊ नये, आपल्या मागे पैसा येईल असे जीवन आपण ठेवावे, असे भाऊंचे सांगणे असे." आईच्या कारकीर्दीत जे, तेच पुढच्याही. आपल्या गृहलक्ष्मीच्या कारभारात ते चुकूनही, असे नव्हे असे, म्हणाले नाहीत. व्यक्तिस्वातंत्र्याचा परिपोष भाऊसाहेब सोमणांच्या घरात कमालीचा आढळा–वयाचा. " प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् ।" हे भाऊसाहेब सोमणानी स्वताच्या आचरणाने सिद्ध करून दाखविले. घरी आलेल्या सुनानाही आपल्या मुलामुलीप्रमाणेच व्यक्तिस्वातंत्र्य. स्वभावातील छटांच्या भिन्नतेमुळे, समाजात वागवताना जी संयमशीलता भाऊसाहेब पाळावयाचे, तीच घरातही. खटावकर लिहितात की " भाऊसाहेब शांत, तर मातोश्री सीताबाई तापट, पण तितक्याच प्रेमळ " स्वभावछटातील असे बारकावे सांभाळून भाऊसाहेबानी आपला संसार तुकारामासारखा केला म्हटले तरी चालेल.

तथापि, ते आपल्या कौटुंबिक कर्तव्यासंबंधी नेहमी जागृतच असत. संसाराच्या प्रारंभकाळात, वेळप्रसंगी झाऱ्यावर स्वता "चांदक्या" भाजून मुलाना दूधभाकरीची न्याहारीही भाऊसाहेबानी घातली. आपल्या बरोबर इसलामपूर कोर्टात उमेदवारी करणारे वाईचे बुवा देशपांडे, यांचा गणित, भूमिति, इंग्रजी व्याकरण, मेकॉले नि बेकन या विषयात हातखंडा. हे भाऊसाहेबाना ठाऊक होते. म्हणून आपले चिरंजीव विठ्ठलराव व गंगाधरबापू याना बुवा देशपांडयापाशी वाईसही एक वर्ष शिकावयास भाऊसाहेबानी ठेवले होते. कॉलेजात भास्करराव शिकत असता, एकदा भाऊसाहेब त्याना भेटावयास गेले. सकाळी उशीरपर्यन्त ते रेसिडेन्सीत आपल्या खोलीत झोपलेले पाहून, पुण्याच्या सदाशिव पेठेतील वाडेकरांच्या चाळीतील रेसिडेन्सीच्या रेक्टरला भाऊसाहेबानी बजावले कीं, "आपण माझ्या मुलाच्या आयुष्याचे नीट वळणाची जबाबदारी सांभाळत नसाल तर मी त्यास साताऱ्यास घेऊन जातो." हे वाक्य उच्चार– ताना, बा. भा. खटावकर लिहितात की, "भाऊसाहेबांच्या डोळयातून घळघळा अश्रु वाहिले. त्यात आपल्यापेक्षाही आपली मुले विद्वान् व कर्तबगार निघावीत, या पितृहृदयाच्या आकांक्षा स्पष्ट दिसत होत्या." अशाच कर्तव्यनिष्ठेने प्रपंचाचा गाडा हाकता हाकता, भाऊसाहेब सोमणानी व्यक्तिस्वातंत्र्याचा परिपोष घरी होऊ दिला, तो मुले–नातवंडे जाणतीसवरती झाल्यानंतरच. १९०४ पासून झालेल्या संततीपैकी चार मुलगे व दोन मुली कर्तीसवर्ती झालेली त्यानी पाहिली. थोरले चिरंजीव भास्करराव दोषी तापाने १९३७ साली दिवंगत झाल्यावर त्यांची पत्नी, तीन मुलगे व एक मुलगी आहेत. भास्कररावांची कन्या सौ. प्रमिला (वामन त्रिंबक वैद्य डोंबिवली) ही दहा वर्षापूर्वी लग्न झाल्यापासून आपले घरी सुखाने नांदत आहे. तिच्या थोरल्या भावाने १९५३ साली आत्महत्त्या केली. त्याला अशोक हा मुलगा आहे. तिचे धाकटे दोन बंधु विनायकराव व सुधाकरपंत कॉलेजमध्ये शिकत आहेत. भाऊसाहेबांचे द्वितीय चिरंजीव विठ्ठलराव व तृतीय चि. गंगाधरबापू साताऱ्यास वकिली करीत असून चवथे शंकरराव सांगली येथील आरवाडे हायस्कूलमध्ये शिक्षक आहेत. विठ्ठलरावांचे पहिले कुटुंब १९४२ साली निवर्तले. त्यांचे दुसरे कुटुंब सौ. इंदिराबाई या बी. ए. बी. टी. असून विठ्ठलरावाना सुरेश, संजीव आणि सौ. प्रभावती (मोरेश्वर रामकृष्ण हर्डीकर पोफळी) व बनुताई अशी संतति आहे. गंगाधरबापू यांचे कुटुंब १९५२ मध्ये काही संतति मागे न राहता निवर्तले. शंकरराव हे आपल्या पत्नी व आपला दहा वर्षांचा मुलगा विकास यांच्यासह आनंदाने संसार करींत आहेत. भाऊसाहेबांच्या दोन्ही मुली सौ. पार्वतीबाई जोगळेकर व सौ. अन्नपूर्णाबाई साठे या अनुक्रमे साताऱ्यास व पुण्यास आपापल्यापरी आनंदाने संसार करीत आहेत.


प्रपंचातील "सुवर्णा" ची काळजी तेवढी करून भाऊसाहेब आपला गृहस्थाश्रम चालवित असता, त्यांच्याभोवती जमलेल्या व त्यानी जमविलेल्या सांगातींचाही विचार अपरिहार्य आहे. भाऊसाहेबांच्या जवळ असलेले कारकून नारायणमामा जोशी याना जसे त्यानी कुटुंबातील एका घटकाप्रमाणेच वागविले, तसेच विधान-परिषदेचे अध्यक्ष झाल्यावरही त्यांच्याजवळ राहिलेले ड्रायव्हर बाबूराव माधवराव गुजर यानाही त्यानी तसेच वागविले. मग, आपल्या हाताखाली मदतनीस वकील म्हणून काम करावयास घेतलेले एकवेळचे आपले शिष्य नाना भाटे याना ते पुत्रवत् वागवीत असतील, हे का सांगावयास हवे ? नाना हयात असेपर्यंत दुपारचा चहाच मुळी भाऊसाहेब त्यांच्या येथे घेत. नाना भाटयांच्या प्रमाणेच यशवंतराव कोठावळे आणि नाना अष्टेकर ही मंडळीही भाऊसाहेबांचे हाताखाली काम करीत असताना त्यानाही भाऊसाहेबानी घरच्या मंडळीप्रमाणे अगदी धाकटया भावासारखेच वागविले. नाना अष्टेकर यांच्याकडे ते बहुधा ओरिजिनल साइडची कामे सोपवा-वयाचे आणि भाटे-कोठावळे यांचेकडे अपीलाची कामे असावयाची. एकामागून एक अपीले चालवावयाची असताना, भाटे यांच्याकडील अपीलाचे कागद व निशाण्या भाऊसाहेब जेवढ्या नेमकेपणाने उल्लेखावयाचे तेवढ्याच नेमकेपणाने लगेच चालणाऱ्या अपीलात कोठावळे यांच्याजवळील अपीलाचे कागद नि निशाण्या उल्लेखावयाचे. १९२७ सालापासून भाऊसाहेबानी आपले जामात बाळासाहेब जोगळेकर यानाही हाताखाली घेतले व विठ्ठलराव सोमणाना तो मान १९३४ साली मिळाला. अष्टेकरांच्याकडून त्यानी प्रकाशपत्राचे संपादनही काही काळ करवून घेतले. त्या कामी लिखाण झाल्यावर, वकिलीच्या कामातील मसुद्याप्रमाणेच, ते सर्व कानावर घेतल्याशिवाय भाऊसाहेब प्रसिद्धीला जाऊ द्यावयाचे नाहीत. आणि अशा आपुलकीने चालून-चालवून, आपल्या हाताखाली अगर बरोबरीने काम करणारांचा तनखा ठरल्या तारखेला भागविण्यावर भाऊसाहेबांचा कटाक्ष होता. जवळ काम करणारापेक्षाही त्यांच्या कुटुंबियांच्या स्वास्थ्याची काळजी वाहणारे मालक विरळा !

भाऊसाहेबांचे याशिवाय ठळक सांगाती म्हणजे शंभुराव आठल्ये मास्तर. यानी भाऊसाहेबांची शेवटपर्यन्त सोबत केली. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक व टाइम्सचे वार्ताहर असलेले आठल्ये बहुश्रुत होते तसेच तपशीलवार आठवणीचे खजिनदार होते. १९०५ सालापासून भाऊसाहेबांच्या बरोबरीने सकाळचे फिरतीत हे बहुधा बिनचूक असावयाचेच. दुसरे जोडीदार दिगंबरपंत गोखले. हे व गोविंदराव कुबेर ह्यानी भाऊसाहेबाना होमरूल-लीग चळवळीच्या वेळी केवढा तरी सहकार दिला होता. शंभुराव आठल्यानीच सांगितलेले आणखी तीन सांगाती म्हणजे जिल्हासभेच्या प्रतिनिधिनिवासासाठी भाऊसाहेब ज्यांची योजना करीत ते काळो-पंत जोशी, गणुमामा गोळवलकर आणि वाईचे माधवराव साठे. पहिल्यांची


जीवितयात्रा भाऊसाहेबानी पदरमोड करून चालविली होती; दुसऱ्यांच्या घरची घडी भाऊसाहेबानी दिलजमाई करून अनेक वर्षांच्या खटपटीने बसवून दिली. हे दोघे काय किंवा माधवराव साठे काय, भाऊसाहेबांच्या तोंडून शब्द बाहेर पडण्याचा अवकाश, ते कार्य उभे करून दाखविणारे " बजरंग " होते. त्यामुळे महाशिवरात्री–सारख्या एखाद्या दिवशी माधवराव प्रभृतीनी घोटून दिलेली "शांभवी"ही भाऊसाहेब घेत. माणसे राखण्यासाठीच होणारी ही भाऊसाहेबांची उतरती भांजणी त्यांच्या अनेक चाहत्याना पसंत नसे. पण काळोपंत जोशांच्या शिवाय कोणासाठीही भाऊसाहेबाना कधी कसलीच आर्थिक घस सोसावी लागली नाही व भाऊसाहेबाना कमीपणा येईल अशा सलगीने ती मंडळीही सार्वजनिक प्रसंगी बसली उठली नाहीत.

बालपणापासूनचे स्नेही म्हणून मात्र गोविंदराव श्रोत्री, काकासाहेब जोगळेकर, रहिमतपूरचे डॉ. नरहर पांडुरंग देशपांडे अशी जी सार्वजनिक सेवेत मंडळी होती त्यांच्या जवळ " गुह्याद्‌गुह्यतरम् " असे भाऊसाहेब रंगत. आण्णासाहेब सहस्रबुद्धे हे असेच भाऊसाहेबांचे जीवाभावाचे स्नेही होते. गोविंदराव श्रोत्रीनी संन्यास स्वीकारुन काशीस वास करताना आपल्या मिळकतीचे सार्वजनिक विश्वस्तपत्र केले, त्याची व्यवस्था करणारात भाऊसाहेबाना प्रमुख स्थान दिले. भाऊसाहेब आपल्या या सर्वच स्नेह्याना सख्ख्या भावासारखे मानीत. आण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचे बन्धु भाऊसाहेब सहस्रबुद्धे कूपर इंजनिअर वर्क्समध्ये ऑफिसर झाले. त्या अगोदर १९३८ साली राजकीय क्षेत्रातील प्रतिपक्षीय असलेल्या कूपरसाहेबाना सहस्रबुद्धयांच्या बरोबर भाऊसाहेब सोमण नुसते भेटले अन् सहस्रबुद्धयांचे काम झाले. माणिकचंद कस्तुरचंद, बंडु–शेठ लुणिया व सीताराम दास देवी, आणि रामभाऊ भिडे यांचा व भाऊसाहेबांचा लोभही लक्षात भरण्यासारखा आहे. या मंडळींच्यापेक्षाही भाऊसाहेबांचे मेहुणे काशीनाथपंत पटवर्धन यांचा भाऊसाहेबावर भावापेक्षाही लोभ असे. त्यांच्या पत्नी दुर्गामामी पटवर्धन या आपली नणंद सीताबाई सोमण व भाऊसाहेब सोमण याना अगदी "घरच्या"च असत व आहेत.

एवढ्या सगळ्या वर्णनावरून खासगत जीवनातील भाऊसाहेब सोमणांची मूर्ति जी मनावर ठसते, ती काय, नियमितपणे आपल्या ठराविक मंडळीसह भली लठ्ठ वेताची काठी घेऊन फेरफटका करावयास निघालेल्या सोमणांची ? अंगात लोकरीचा किंवा खादीचा अगर रेशमी कोट, डोक्याला पुणेरी पगडी, बनातीची अगर खादीची लांबट टोपी, पायात पुणेरी जोडा अगर स्लिपर अशा काही पोशाखात कोर्टाच्या कामाचेवेळी पांढऱ्या कागदांच्या ब्रिफात कामाचे कागद गुंडाळून घेतलेल्या भाऊसाहेब सोमणांची का मूर्ति निरीक्षकाला आकर्षक वाटते ? की काम नसेल त्यावेळी कोटाची सर्व बटणे काढून बिडीची लज्जत घेत घेत



भारतांतील कायदेमंडळांच्या सभापतींची परिषद १९४९ सिमला.
खुर्चीवर मध्यभागी– ना. मावळणकर, **भाऊसाहेब**, फिरोदिया प्रभृति.



नामदार भाऊसाहेब सोमण याना मुंबई मंत्रिमंडळ व मुंबई कौन्सिलचे सदस्य व स्टाफ याजकडून निरोप देते वेळी
जानेवारी १९५२

गप्पा–विनोद करणाऱ्या भाऊसाहेब सोमणाबद्दल पूज्यभाव वाटतो? भाऊसाहेबा–बद्दलचे आकर्षण निराळेच आहे. स्वताच्या कौटुंबिक आपत्तीच्यावेळी भाऊसाहेब धिमेपणाने वागलेच, पण ज्याना म्हणून त्यानी आपले म्हटले अथवा आपले केले, त्यांच्या सुखदुःखाशी भाऊसाहेब सहसंवेदनी झाले आणि आपल्याकडून होईल तेवढा त्या सुखदुःखाचा वाटा त्यानी उचलला. या त्यांच्या वृत्तीत त्यांच्याबद्दलची ओढ आहे. त्यामुळेच भाऊसाहेबांचा प्रत्येक लहानथोर परिचित त्याना म्हणत आला आहे की–

" केले प्रेम तुवा सदैव अपुल्या आप्तेष्ट–मित्रावरी ।
दैवे धाडियला तुवा उचलिला वाटा नव्याने तरी ॥
तोही आणिक धीर–गंभिरपणे, दृष्टी धिमी राखुनी ।
तेव्हा लाविल बोल कोण तुजला? ना मी तरी त्यातुनी ॥ १ ॥

आहे राखियले तुवा निज मनी बंधूजना आपुल्या ।
वारंवार तयास ज्या पडत की चिंताहि सर्वा भल्या ॥
जेथे शक्य तिथे तुवा कर दिला, दुःखाश्रु वा ना तरी ।
तेव्हा देईल दोष कोण तुजला? माझ्या न ते अंतरी ॥ २ ॥ "

---

# २६ सोमण–दर्शन

विद्यार्थी म्हणून, शिक्षक म्हणून, वकील म्हणून, संपादक म्हणून, जिल्हा–सभेचे सूत्रधार म्हणून, पुढारी म्हणून, व गृहस्थ म्हणून लोकप्रिय भाऊसाहेब सोमणांच्या जीवनातील निरनिराळ्या अंगाचा अभ्यास करताना, त्यांचे समग्र दर्शन घेणे क्रमप्राप्तच आहे. रामचंद्र गणेश ऊर्फ भाऊसाहेब सोमण यांचे वर्णन " दिसे ठेंगणी मूर्ति ही बावळीशी । " असे कोणी केले, तर शिवाजीच्या बहिर्जी–नाईकाची आठवण वर्णनकर्त्याला व ऐकणारालाही होऊन बहिर्जी–नाईकाजवळ बातमी काढण्याचा जो बारकावा होता, तो सातारा जिल्ह्याचा सार्वजनिक संसार चालविताना, आपला वकिलीचा पेशा चालविताना अगर कानावर आणि डोळ्या–वर येणाऱ्या माणसांची पारख करताना, भाऊसाहेब सोमणांच्याजवळ होता, अशी सूचना त्या पद्यपंक्तीतून कोणालाही झाल्याशिवाय राहणार नाही. डोळ्या–खालून गेलेली अगर कानावरून गेलेली प्रत्येक बारिकसारिक गोष्ट भाऊसाहेबांच्या स्मरणपेटिकेत अगदी हाताशी असल्यासारखी असे. न्यायमंदिरात चालवावयाच्या कज्जाखटल्यातून निशाण्याचनिशाण्या क्रमांकासुद्धा भाऊसाहेब जेव्हा उल्लेखित तेव्हा त्यांच्या स्मरणशक्तीची मातब्बरी अनेकांच्या प्रत्ययाला आलेली आहे. पण डोळयांचे एक इंद्रिय कामचलाऊ राहिल्याने त्यांच्या स्मरणशक्तीचे तेज जास्ती वाढले होते, अशी याबाबत एक मीमांसा असून, तिच्यात तथ्यही असेल. तरीपण गरिबीतून कष्टासायासाने वाढलेल्या, सहनशीलतेने समाजाच्या सहकाराचे सौभाग्य संपादन केलेल्या आणि राष्ट्रसेवेसाठी स्वार्थत्यागपूर्वक कर्मयोगी झालेल्या भाऊसाहेब सोमणांचे स्मरण "मागीला" ना होत राहील ते भाऊसाहेबांच्या या सर्व अंगोपांगापेक्षा दुसऱ्याच तीन गुणविशेषामुळे होत राहील, यात शंकाच नाही. " नद्या, ओढे, नाले, मिळति समभावे जलधिला । " अशी कव्युक्ति आहे. भाऊ–साहेबांच्या सागरमाप विशालतेत लहान–मोठे, जवळ–लांबचे, पक्षीय–विपक्षीय, श्रीमंत–गरीब, विद्वान्–अविद्वान् सगळे सामावत; एवढेच नव्हे तर सोमणांच्याकडे जाऊन त्यानी कटु सल्ला दिला तरी तो आपल्या कल्याणाचाच आहे, असा विचारान्ती, सल्ला घेणारांचा ग्रह होई, या त्यांच्या प्रसादतुल्य जिव्हाळ्यामुळे सोमणांचे सादर स्मरण केव्हाही होईल. " लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि । " हा त्यांच्या वडिलांचा आणि करंदीकर–गुरुजींचा आशीर्वाद भाऊसाहेबांच्या जिव्हाळ्याने जसा साकार झाला, तसाच त्यांचा आत्मविश्वास हा त्यांच्या स्वताच्या मूर्तीपेक्षा आणि बरोबरीच्या माणसांच्या कर्तृत्वकीर्तीपेक्षा उंच होता हेही विसरून चालणार नाही. भाऊसाहेब सोमण आपण होऊन अंगावर संकट ओढवून घ्यावयाचे नाहीत; पण संकट चालून आले अगर समाजाला घेरू लागले तर त्याला टक्कर द्यावयास अगर त्याचा गोवर्धन करावयास मागेपुढे पहावयाचे

नाहीत, असा त्यांचा धिमा धीटपणा आणि तकवा होता. शिवाय त्यांच्यापुढे आपला सातारा जिल्हा राष्ट्रीय उत्थापनात आणि राष्ट्रीय बांधणीत कर्तव्य–निष्ठेने प्रगतिपर रहावा असे जीवितकार्य होते आणि त्यासाठी त्यानी अखंड सेवाव्रत घेतले होते. " भला रे भला! बोलती ते करावे। " एवढेच त्यांना ठाऊक नव्हते, तर कोणाचेही भले करावे पण बुरे चुकूनही हातून होऊ नये याबद्दल कायावाचामनाने दक्षता घेण्याचा स्वभाव त्यानी बनवला होता. सामनेवाल्याना आणि विरोधकाना देखील मनुष्यस्वभावातील साहजिकपणाने भाऊसाहेबानी दोन ठेवून दिल्या तरी एकादेवेळी झिणझिण्या व्हावयाच्या पण सामनेवाल्यांचा वा विरोधकांचा तणतणाट अगर थयथयाट धिगाणा घालावयाचा नाही.

स्वताच्या वैयक्तिक दैनंदिन वर्तनातही भाऊसाहेबांचा हाच थाट असे. असेल त्या परिस्थितीत नीटनेटका पोशाख आणि समाजात ज्याला " साधेपणी चारुता " म्हटले जाईल अशी बसण्या–बोलण्या–चालण्याची ठेवण भाऊसाहेबाना मनापासून आवडे. पण " ज्याच्यावाचून अडले त्याला व्यसन म्हणतात; " मग " व्यसन " शब्दाचा अर्थ संकट करा की चटक करा; त्याला आपल्यावर मात करू द्यावयाची नाही, असा भाऊसाहेबांचा कटाक्ष असे. म्हणून वेळेस लांब " पारशी " कोटाखाली धोतराऐवजी पंचा नेसून बाहेर पडण्याची वेळ आली, तर पोशाखाच्या महत्त्वापेक्षा कामाच्या महत्त्वाकडे लक्ष देऊन भाऊसाहेब खुशाल बाहेर पडत. एरवी, एकतऱ्हेचे वेळापत्रक ते पाळित. पहाटे उठून नियमितपणे तीन मैलपर्यंत रपेट करण्याचे जेथवर निभले, तेथवर त्यानी ती रपेट करण्यास सोडले नाही. फिरून येताना, अगाऊच ठरवून अगर काम असेल तर जरूर म्हणून, एकाद्या स्नेह्यासोबत्याच्या येथे, कार्यकर्त्याकडे अगर एकाद्या प्रतिष्ठित–लब्धप्रतिष्ठिताकडे देखील जाऊन, त्यांच्या घरचा समाचार घेऊन येण्यास अगर समोर असलेले कार्य मार्गी करण्यास भाऊसाहेब सैलावले नाहीत. फिरावयास जाताना व फिरून आल्यावर त्याना चहा लागे आणि वेळ रिकामा सापडला अगर गंभीरपणे एकाद्या गोष्टीचा विचार तापवावयाचा असला की त्याना विडी प्याविशी वाटे; पण आपल्या प्रकृतिमानाप्रमाणे या आपल्या 'पाना' ला सुद्धा त्यानी कह्यात ठेवले होते. फिरून आल्यावर ते आपल्या वकिलीच्या व्यवसायासाठी आपल्या पक्षकाराचा परामर्ष घेत आणि मग स्नान करीत. पुढे न्यायमंदिरातील कामकाज आटोपलेवर नगर–वाचन–मंदिर, वृत्तपत्र–कचेरी, सार्वजनिक सभा, युनिअन क्लब, जेथे जेथे म्हणून जगाची तारीखतागायत हालचाल कळेल, अगर पार पाडावयाचे सार्वजनिक कर्तव्य असेल, तेथे तेथे जाऊन भाऊसाहेब आपला वेळ, चतुराई आणि संघटन–क्षमता कामी लावित. ही वेळापत्रकी काटेकोर नव्हती. कारण सर्वसाधारणपणे या वेळापत्रकाप्रमाणे दैनंदिनीची चाल होत असताही, अनेक माणसानी यावे–भेटावे, सल्लामसलती घ्याव्या, सार्वजनिक कामाच्या दिशा विचाराव्यात, नव्या तरुणानी

आपल्या आशा–आकांक्षा–अपेक्षा सांगाव्यात आणि भाऊसाहेबानी त्याना मार्गदर्शन, सहाय्य, जवळीक करावी, हा खाक्या बहुधा गोडपणाने चालत असे. " तू मूर्खपणाने बोलत आहेस ! " असे भाऊसाहेब कोणाला चुकूनही बोलावयाचे नाहीत. पाल्हाळ अगर मूर्खपणा आवरण्याचा त्यांचा इषारा " आल लक्षात ! " या शब्दानी व्यक्त व्हावयाचा. हा इषारा कोणाला समजलाच नाही तर गुणी वा कर्तृत्व–वंताची झाक असलेल्यांचे म्हणणे सारे ऐकून घेऊन, विनायक कोंडदेव ओकांच्या लेखणीचे थाटात " तात्पर्य, असेच तेवढे करावयास हवे " असे सांगून भाऊसाहेब मोकळे व्हावयाचे; अन्यथा, " तुमचे मार्ग तुम्हास मोकळे आहेत " अशी रवानगी करावयाचा त्यांचा थाट असे.

व्यक्ति, संस्था किंवा कार्य, भाऊसाहेबानी एकदा 'आपले' म्हटल्यावर त्याचा यशस्वी पाठपुरावा सातारा जिल्ह्यात आपल्या कुटुंबियाइतक्याच आपुलकीने रात्रंदिवस करावा तर भाऊसाहेबानीच. आपल्या बालपणीच्या वर्गबंधूपासून, कालौघात प्रसंगाने झालेल्या सहवासबंधूपर्यंत, आणि सार्वजनिक कार्यातील सह–काऱ्यापासून आपल्या उपकारी स्वभावामुळे जोडलेल्या बारिकसारिक माणसा–पर्यंत सर्वांचाच तसा अनुभव नाही काय ? " दे दान गुप्त उपकार करी; न बोले " हा भाऊसाहेबासंबंधीचा अनुभव हरएकाना हरएक प्रकारचा आहे. हे सर्व करण्यात मावळत्या, तळपत्या व उगवत्या पिढीचे संबंध साखळीच्या दुव्या–सारखे रहावेत; श्रीमंती–गरिबीचा परिस्थितिजन्य वा कर्तृत्वजन्य फरक काहीही असला, तरी परस्पर सहानुभूतीचा ओलावा त्यात कायम रहावा आणि वृद्धत्व, विद्वत्त्व, विशालत्व, कर्तृत्व व कल्पकत्व यांचा चुकूनही अनादर होऊ नये असा भाऊसाहेबांचा कटाक्ष असे; त्यासाठी सामुदायिक सहसंवेदनेची वृत्ति प्रत्येक बारिकसारिक कार्यापासून जोपासत जाण्याशिवाय राष्ट्रीयत्वाचा बहुरंगी एक–जिनसीपणा समाज–प्रकृतीत मुरणार नाही, असा भाऊसाहेबांचा हिशोबी दण्डक असल्याकारणाने, त्याला बाध येईल असा काही प्रसंग घडल्यास, त्याना चैन पडत नसे. वृद्धापकाळी, आपल्या आक्रमशक्तिच्या पलिकडे सुधाराच्या गोष्टी राहिलेल्या पाहिल्यावर, त्या बेचैनीला थोडेसे चिडखोरपणाचेही स्वरूप आल्याशिवाय राहिले नाही. आणि तो चिडखोरपणा भाऊसाहेबांच्या संयमशीलतेलाही झुगारून केव्हा केव्हा प्रगट होऊ लागल्यावर तो एक चर्चेचा विषय होऊ लागला होता. आणि तरीही भाऊसाहेबाशी जवळलांबचे कसलेही आपुलकीचे संबंध आलेल्या प्रत्येकाला वाटे की आपण जगाच्या पाठीवर विवेकसाक्ष जोपर्यंत निर्मळ इच्छेने व निर्मळ मनाने वागतो आहोत तोपर्यंत भाऊसाहेब सोमण आपल्या पाठीमागे कैवाराचे सुदर्शनचक्र घेऊन खास उभे राहतील. त्यामुळे, प्रत्येकाची विशेषत: कार्यकर्त्यांची चिंताही दुणावे की भाऊसाहेबानी नाक मुरडण्यासारखे आपले हातून काहीसुद्धा होऊ नये; मग त्यानी कान उपटण्याची गोष्टच कशाला ? कारण त्यांचेशी काहीही मतभेद असले तरी प्रत्येकास अंतरीची जाणीव होती की–

कालोचित तेजस्वीपणाने पण शिवाजी–रामदासांच्या परंपरेस साजेशा नेकीने सर्व लहानथोर मंडळीना सांभाळित सांभाळित सातारा जिल्ह्याने भारत–राष्ट्राचा अभिमानास्पद घटक म्हणून नांदावे; व योगी लोकमान्य टिळक व शांतिब्रह्म महात्मा गांधी यांच्या इच्छेप्रमाणे भारताला जागतिक प्रतिष्ठा लाभावी म्हणून सातारा जिल्ह्याने सात्विक प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आपले कर्तव्य बजावित रहावे, ही इच्छा व तिला अनुसरून मार्गदर्शन आपल्या सर्व कळत्या आयुष्यात करीत राहणारा, सातारा जिल्ह्याचा महाभाग म्हणून रामचंद्र गणेश सोमण नेहमीच ओळखले जातात व जातील. अजातशत्रु या एकाच शब्दात ज्यांची यशोलोचना देता येईल असे सातारा–जिल्ह्याचे ब्रिटिश रियासतीतील एकटे एकच पुढारी म्हणजे देशभक्त रामचंद्र गणेश ऊर्फ भाऊसाहेब सोमणच होत. याचा अर्थ सोमणाना कोणी विरोधकच नव्हते, किंवा टीकाकार नव्हते, अगर सोमणाशी कोणाचा मतभेदच झाला नाही, अथवा सोमणाना आलेले मोठेपण सर्वांनाच शंभर टक्के मान्य होते, असा नव्हे. पण या सर्व मंडळीना फार तर सोमणाशी फटकून वागावे असे वाटे, हेवादावा करून सोमणांची कीर्ति आणि प्रतिष्ठा मातीला मिळवावी अगर तिला डाग लागावा, अशी इच्छा त्याना कधी झाली नाही. एवढाच "अजातशत्रु" या विशेषणाचा अर्थ घ्यावयाचा. आणि याचे कारण विविधवृत्ताच्या कुचेष्टेखोर आलमगीराने "डेप्युटी महात्मा" म्हणून जे नामाभिधान सोमणांच्या "अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ !" अशा वृत्तीमुळे त्याना दिले, त्यात सापडणारे आहे.

सातारा जिल्हा म्हणजे सोमण व सोमण म्हणजे सातारा जिल्हा असे राष्ट्रीय समीकरण महाराष्ट्रात चार तपे प्रचलित होते. त्याची गुरुकिल्ली सोमणांच्या लोकसंग्रहात्मक चारित्र्यातच आढळेल. अभिजात लोकसेवकाचा पहिला कस त्याचे चारित्र्य होय. पुढारीपण ज्यांच्या गळ्यातच पडते त्यांची गोष्ट सोडून द्या; पण जे स्वभावतःच पुढारी असतात किंवा अंगच्या गुणसमुच्चयामुळे ज्यांच्याकडे कालौघात पुढारीपण चालून येते, त्याना मातेच्या वत्सलतेने, पित्याच्या तत्परतेने आणि स्वाभिमानी सेवकाच्या शालीनतेने लोकशिक्षण साधावे लागते. भरीला, सेनापतीच्या कुशलतेने लोकांच्या हातून इष्ट कार्ये पार पाडावी लागतात. परतंत्र राष्ट्रात तर या सर्व साधनेला मुत्सद्दीपणाचीही जोड पुढाऱ्याच्या अंगी असावी लागते. परकीय राज्ययंत्राचे संचालक लोकांच्या अज्ञानावर, मूर्ख वा विपरीत कर्मांवर आणि लोकामधील वितुष्टावर मजा मारण्यास सोकावलेले असतात. अशा सोकाजीरावाना प्रजाजनातील परस्पर असहिष्णुता सारखी रसरसत ठेवण्यातच आपल्या आसनाची बळकटी वाटत असते. तेवढ्यासाठी लोकांच्या व लोकपुढाऱ्याच्या बारिकसारिक हालचालीवरच काय, पण संकेत–बोलीवरही गुप्त नजर राखून लोकात परस्पर बेदिली कशी उत्पन्न होईल आणि लोकपुढाऱ्यापेक्षा परकीय

राज्ययंत्रावर व त्या राज्ययंत्राच्या मोलमजूरावर 'आपले खरे हितकर्ते' म्हणून लोकांचा कसा विश्वास बसेल याची काळजी डोळ्यात तेल घालून "पारतंत्र्याचे पाशधारक" घेत असतात. अशा वेळी आपल्या विशुद्ध चारित्र्याच्या जोरावर लोकपुढाऱ्याला आपली जबाबदारी किती नेटाने व दक्षतेने पार पाडावी लागत असेल बरे! भाऊसाहेब सोमण या कसोटीला उतरले असून १९३० सालच्या शांतिसंग्रामाच्यावेळी तर खुद्द जिल्हाधिपतीनी सोमणाना पत्र लिहून बिळाशी वगैरे भागातील तीव्र शांतिसंग्राम सौम्य करण्यास विनवले होते. यावरून लोकच काय, पण स्वतः ब्रिटिश नोकरशाहीदेखील मनात समजून चुकली होती की देखावे कशीही दिशाभूल करोत, सातारा जिल्ह्यात नैतिक अधिराज्य भाऊसाहेब सोमणांचेच नांदले.

हे प्रलोभनीय स्थान सोमणाना सहजासहजी मिळालेले नाही. कवड्या खुळखुळवून पंचवीसचे दोन, अगर "तोडीचे तीन," घेण्याइतके सोपे काम "लोकांच्या मनचा राजा होण्याचे" कधीच नसते. त्यासाठी लोकांची सेवा तनमनधनाने करावी लागते. "राजा प्रजानुरंजनात्।" तसा पुढारीही. सोमणाना त्यांच्या मातापितरानी जे नामाभिधान केले, त्याचे सार्थक सोमणानी आपल्या लोकसेवेने खरोखरच केले आहे. "सर्रास संधि, कुणा न बंदी" हा अगोदर, सोमणाकडील राबत्याचा शिरस्ता. त्यामुळे जनमनात आपुलकी उत्पन्न होते ही गोष्ट खरी; पण कित्येक वेळा, वेळ आणि उत्साह यांचा निरुपयोग व दुरुपयोगही होतो. तथापि तोहि जन्मभर पतकरण्यात आला याचे कारण सोमणांच्या हृदयाची अ–सीम उदारता. "जे जे इतरा व्हावे। ते शक्यनुसार करावे, करवावे॥" हा सोमणांचा जणु काय दण्डकच! मग ते कार्य आपल्याहून भिन्नमताच्या, पक्षाच्या, वयाच्या, जातीच्या, रुबाबाच्या वा गबाळेपणाच्या माणसाकडून होत आहे याची क्षिति सोमण बाळगणारे नव्हते. त्यातून एकादे कार्य समाजाची प्रगति करणारे, नीतिशुद्ध व विशेषतः परकीय नोकरशाहीला थोडा–फार तरी शह देणारे असेल, तर ते केवळ भिन्नपक्षीयाकडून आरंभिलेले म्हणून त्या कार्याला मदत करावयास सोमण बिचकावयाचे नाहीत. उलट, अशा माणसाला आपला सन्माननीय पाहुणा करावयालाही ते सोडावयाचे नाहीत.

सोमण असे करू शकत याचे कारण "गुणाःपूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः।" ही वृत्ति सोमणात पुरेपूर मुरलेली होती. "थोडाही गुण मिळता घ्यावा।" हे अनेक अर्थानी सार्थ असलेले समर्थवचन सोमणांच्या नखा–बोटातून जणु उतरलेले. त्याच्या जोरावर हिंदुस्थानची खरी प्रजा आणि जीवनो–त्पादनशक्तिचा झरा जो शेतकरी, त्या वर्गाचे निवासस्थान जी खेडी, त्यांचे कल्याण सर्वप्रथम साधावे म्हणून सोमणांच्या सर्व खटाटोपांचा कटाक्ष. त्यामुळेच पहिल्या पन्नास वर्षात हिंदी राष्ट्रीयसभेने जसे सर्व मतमतांतराच्या व पक्षोपपक्षांच्या

समन्वयावर लक्ष ठेवून आपले कालपरिपक्व धोरण आखले. त्याचप्रमाणे सोमणानीही आपल्या समन्वयपद्धतीने सर्वांचा मेळ घालून आपले सार्वजनिक जीवन चालविले.


बहुजनसमाजाचा असा भक्तियोग साधण्यात सोमणांच्या मनातल्या मनात त्या बहुजनसमाजाकडून मिळणाऱ्या आपल्या धंद्यातील प्राप्तीबद्दल कृतज्ञतेचा भाव जागृत असे, हे, काटेकोरपणाने बोलावयाचे तर, कोणीच नाकबूल करणार नाही. पण ते कबूल करूनही, असे खास म्हणता येते की, पोटाकरता पत्करलेल्या वकिलीच्या धंद्यातही सोमणानी कोणालासुद्धा बदसल्ला तर दिला नाहीच, पण प्रत्येक पक्षकाराला स्पष्टोक्तिपूर्ण, त्याच्या त्याच्या हिताच्या गोष्टी सांगितल्या. त्याच्या खटल्याच्या व मगदुराच्या मानाने राजीखुषीचा पैसा सोमणानी त्याच्याकडून घेतला, पण त्यासाठी स्वता किंवा पक्षकार "अ–शील" ठरेल असे काही होऊ दिले नाही. अशा सात्विकतेने व सालसतेने मिळविलेला पैसादेखील स्वदेशीच्या उत्तेजनार्थ, खादीसारख्या वस्त्रस्वावलंबनाच्या कार्यार्थ, जोमदार तरुण पिढी निपजावी म्हणून राष्ट्रीय–व्यायाम-शिक्षणार्थ, वैयक्तिक वा सामुदायिक संकट निवारणार्थ, अनेकविध राष्ट्रीय निधिपायी आणि भारतीय स्वातंत्र्याच्या मार्गावरील अनेक चळवळींच्या उत्थापनार्थ, स्वताच्या शक्तिबुद्धिप्रमाणेच सढळ हाताने सोमणानी खर्च केला. तेल्यातांबोळ्यांचे म्हणजेच बहुजनसमाजाचे पुढारी म्हणून सुकीर्त झालेल्या लोकमान्यांचे एकनिष्ठ अनुयायी असल्याचे अशा तऱ्हेने सोमणांच्या चरित्रात पदोपदी प्रत्ययाला आल्यानेच, लोकानी सोमणाना तीन वेळ कायदेमंडळात प्रचंड बहुमताने आपला प्रतिनिधि म्हणून पाठविले. तेथे सोमणानी लोकविश्वासाचे सार्थकच केले. लोकप्रतिनिधि म्हणून जनतेची वकिली करताना कायदेमंडळातील भाऊसाहेब सोमण जिल्ह्याबाहेरील संपादक निरीक्षकाना कसे दिसत, याचे वर्णन एके ठिकाणी मिळते. मुंबईचा हा संपादक लिहितो की "सोमण म्हणजे सातारा जिल्ह्यातर्फे कॉंग्रेस तिकिटावर प्रचंड बहुमतानी निवडून आलेले प्रतिनिधि. गबाळ्यात जमा होण्याइतक्या साध्या पण नीटनेटक्या खादी पोशाखातील ही मूर्ति रुबाबाने शोभत नाही, वक्तृत्वाने गरजत नाही की एकांडे शिलेदारी करून डोळ्यावर येत नाही. मोजकी आणि मुद्देसूद, पण साधी आणि सात्विक भाषा वापरून तत्त्वनिष्ठेने सोमण असे काही मर्मग्राही विवेचन करतात की लोकपक्षीयाना तर त्यांच्याबद्दल आदर वाटतोच, पण सरकारी बाकावरील प्रतिपक्षीयानासुद्धा सोमणांच्या रेशमी रुमालाखालील अस्वली गुदगुदल्या जाणवल्या तरी सोमणांच्याबद्दल अनादर वाटत नाही."

मुंबईकर संपादकाने घेतलेले सोमणदर्शन कोणाला अक्षरशः पटो वा न पटो, सोमणांच्या वाक्प्रणालीचे त्यातील चित्रण पुष्कळसे समर्पक नाही काय ? हीच वाक्प्रणाली सोमणांच्या कौन्सिल–बाहेरील व्याख्यानातही प्रतीत झाल्याशिवाय

रहात नसे. सोमणांचे व्याख्यान अनेकवेळा सरकारी अरेरावाना आव्हान देऊनही झाले. आग झाली तरी बोंब मारण्याची सोय नाही अशी स्थिति झाल्यामुळे, सरकारी अरेरावानी वड्याचे तेल वांग्यावर काढलेही. सोमणांच्या वाणीप्रमाणेच त्यांच्या लेखणीचीही वाक्प्रणाली "अखंड सावधान" असल्या–कारणाने कोणाच्याच रोषाला बळी पडली नाही. साताऱ्यास निघणाऱ्या 'श्रीशाहू' पत्रात ते अगदी आरंभापासून लिहित असत. त्या "संपादकीय गुप्तदानाला" सरकारी सुदर्शन बाधले नाही. पुढे 'प्रकाश' काढल्यावर दुसऱ्या एका स्नेह्याच्या लेखासाठी ते पाठीमागे लागले, पण चाटून गेले, बाधले नाही. पुढे पुढे डोळ्याच्या अधुपणामुळे सोमण स्वता प्रकाशमध्ये अगर इतरत्र कमीच लिहू लागले. कोणी आग्रहच केला अगर प्रसंगानुसार तसे कर्तव्यच वाटले, तर सोमण सांगत व कोणीतरी त्यांची सांगी उतरून घेऊन त्यांचा लेख तयार होई. साह–जिकच त्यांचे लेख कधीच अमर्याद होत नसत, ते ठाशीव असत, पण अतिशयोक्त नसत; आणि नम्रतेचे असले तरी शरणाईचे नसत.

तरीही त्यांच्या 'प्रकाश' वर परकीय सरकारचा रोष झालाच. सार्वजनिक वाचनालयातून प्रकाशला मज्जाव होण्याचे कारण सोमण आपल्या पत्रातून जनतेला राष्ट्रीय वळणाचे राजकीय शिक्षण देत. वृत्तविवेचन, मत–प्रदर्शन वगैरेपेक्षा सरकारी धोरण, त्या धोरणाला तोंड देण्यासाठी लोकमान्य टिळक–प्रभृति राष्ट्रीय पुढाऱ्यानी करावयाचे ठरविलेले हस्तांदोलन आणि पहिल्याच्या अयुक्तपणाचे तर दुसऱ्याच्या अचूकपणाचे आविष्करण या गोष्टीवरच सोमणांचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा सगळा भर होता. जीवेभावे झटून सोमणानी संगोपिलेल्या संपादकीय कारागिरीचा "छोटा छाप" एकाच वाक्यात असा दाखवता येतो की–– एका बाजूने होईल तेवढे स्वाभिमानपूर्वक जनतेचे हित साधित असताच, पारतंत्र्याचे पाश जेणेकरून तुटावयास लागतील अशा खटपटी दुसऱ्या बाजूने करावयास जनतेला स्फूर्ति येत रहावी. राष्ट्रा–तील हरएक आपत्तींचा निरास स्वराज्यानेच होईल असा लोकमान्यांच्या प्रमाणेच, सोमणांचा दृढ विश्वास होता. पारतंत्र्याच्या काळात आपल्या चळवळी व लेखन-भाषण यांचे धोरण वरीलप्रमाणे सोमणानी कटाक्षाने ठेवले. स्वराज्य आल्यावर ते न्यायी, बळकट, तेजस्वी व यशस्वी व्हावे म्हणून सोमणानी स्वता भाग घेतलेल्या सभाना व चळवळीना वळण लावलेच. शिवाय आपल्या जवळच्या लेखकाना, वक्त्याना व कार्यकर्त्यांना तेच पाठ द्यावयास सोमण विसरले नाहीत.

भारताच्या स्वातंत्र्याचे आड येणारे ब्रिटिश नोकरशाहीतील अरेराव आणि राज्ययंत्रापासून अन्यक्षेत्रातील सर्व पारतंत्र्याचे पाश–धारक हे सोमणानी सामनेवाले गणावे आणि हिंदी स्वातंत्र्यासाठी आपापल्या कुवतीप्रमाणे धडपडणारे, स्वताशी कित्येक बाबतीत व्यासभिन्न मते धारण करणारे




**भाऊसाहेब**, यशवंतराव, बाळासाहेब देसाई, करिआप्पा



भाऊसाहेब व राजेंद्रप्रसाद





असले तरी, त्याना जवळ–लांबचे सहकारी मानून, शक्य तितके सलोख्याचे वातावरण सदर स्वातंत्र्योपासकात राखण्याचा सोमणानी अव्याहत प्रयत्न करावा, यात नवल नाही. "आमच्या राष्ट्राला राष्ट्रपण आणण्यासाठी राष्ट्रसभेची स्थापना झाली आहे" आणि "काँग्रेसशी एकनिष्ठपणे वागत जा म्हणजे गरीब शेतकरी व मजूर यांचे दु:खनिवारणार्थ ती उपयोगी पडेल" या सिद्धांताचा उदय आणि सोमणांचा सार्वजनिक कार्यक्षेत्रावरील उदय यात फारच थोडा कालावधि आहे; आणि संधि–प्रकाशाच्या या थोडचा अवधीत सोमण हे वयाने उत्साही तरुण, पेशाने सात्विक विद्यार्थी, शिक्षक आणि कायद्याच्या काटेकोर अभ्यासाकडे झुकलेले चिकित्सक असल्याकारणाने ह्यूमसाहेबांच्या सिद्धांतांचा परिपाक त्यांच्या मनात उतरला. लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रतेजोवर्धनाच्या मंत्रानी आकर्षिले जाऊन सोमण सातारा जिल्ह्याचे तत्कालीन "राष्ट्रीय गणेश," दादासाहेब करंदीकर यांच्या नेतृत्वाखाली प्रत्यक्ष लोकसेवेस लागले. तेव्हापासूनच सोमणांच्या मनाने निश्चित घेतले होते की "स्वराज्यासाठी एकतेची आवश्यकता आहे. तीखेरीज स्वराज्य मिळणार नाही व मिळाले तरी टिकणार नाही." त्यामुळेच बहिष्काराच्या ठरावामुळे अगर फेर–नाफेर–वादामुळे राष्ट्रसभा दुभंगण्याचा प्रसंग आला असता, १९१४ आणि १९२५ साली ऐक्याचा श्रीकार तेथे निर्माण करण्याचा प्रयत्न, सातारा येथे प्रांतिक परिषदा भरवून सोमणानी केला. त्याला यश–अपयश आले तरी आपले व आपल्या जिल्ह्यातर्फेचे कर्तव्य केल्याचे समाधान त्यानी मानले. एवढेच नव्हे, तर दोनही प्रसंगी राष्ट्रीयसभाप्रणित कार्यक्रम कसल्याही परकीय सत्तेच्या दडपशाहीला आणि संधिसाधूंच्या दडपेगिरीला न बिचकता, देवमंदिरातील नंदादीपाप्रमाणे सातत्याने चालू ठेवले. फार काय, राष्ट्रीयसभेने राज्यसूत्रे हाती घेतल्यावर तिच्या एकनिष्ठ अनुयायांच्या हातून लोककल्याणाबरोबर लोकशिक्षण साधावे आणि कारभारात अन्यायाचा चुकूनसुद्धा वास राहू नये, अशी सोमणांची तळमळ होती. या तळतळीमुळेच वृद्धापकाळातही कारभार कुशलतेतून अ–जाणता का होईना, पण अन्याय होत आहे, असे आढळले तर तो अन्याय हस्ते परहस्ते राज्यसूत्रधारांच्या नजरेस आणून देण्याची कर्तव्य–कठोरता सोमण पतकरीत.

ऐक्यावर आणि निदान जनतेतील शक्य तेवढ्या जास्तीत जास्त सहकारावर सोमणांचा भर असे. ही गोष्ट खरी असली तरी हेही सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे की, दिखाऊ ऐक्यासाठी सोमण तत्त्वाचा बळी द्यावयास तयार नसत; जनतेचा आणि त्यातल्या त्यात तरुणांचा तेजोभंग ते कधीच करीत नसत; उमेदीच्या भरात अगर चुकीच्या समजुतीने तरुणमंडळी भडकपणा करू लागलीच तर आपल्या व त्यांच्या संबंधाप्रमाणे अगर पुढारी म्हणून वाटणाऱ्या जबाबदारीच्या मर्यादेप्रमाणे, त्या तरुणाना तेवढ्यापुरत्या कानपिचक्या द्यावयासही सोमण सोडत नसत; आणि इतकी सगळी पथ्ये सांभाळून चळवळीच्या सातत्यावरील लक्ष, शक्य ते करून ते ढळू देत नसत.

दहशतशाहीसारख्या संकटाची क्षिति नाही; पण कालपरिपक्व अशा एका विशिष्ट अंशाखाली मनोवृत्तीचे तेज उतरताच कामा नये; एवढी काळजी प्रत्येक पतित राष्ट्राचे पुढाऱ्यानी घ्यावी लागते. परतंत्र राष्ट्र हे स्वतंत्र झाल्यावर सत्ता-लोलुपता डोके वर करू लागते आणि संधिसाधू अगर संधानसाधू मंडळी जनतेच्या डोक्यावर बसण्याचाच नव्हे तर नाचण्याचाही संभव असतो. अशा संभवातूनही जनमनातील तेज कालोचित अंशाखाली घसरण्याचा धोका निर्माण होतो. त्या धोक्यापासून जनमनाला सुखरूप व निकोप राखणे हे स्वतंत्र राष्ट्राचे, प्रारंभिक बांधणीच्या वेळी आणि राष्ट्रभक्ति हा समाजाचा स्वभाव बनेपर्यंत, पुढाऱ्यांचे अपरिहार्य कर्तव्य ठरते. सोमणानी ती काळजी वाहिली व ते कर्तव्य केले म्हणून त्याना पारतंत्र्यात देहदण्ड द्यावा लागला, तसाच स्वातंत्र्यातही " नजरबंदीचा " त्रास सोसावा लागला. पण " न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः। " या कोटीतले सोमण असल्याकारणाने तसल्या आपत्तीवर चूळ थुंकून वयाची पाऊणशे वर्षे उलटली तरी ते उत्साहाने लोकसेवा करीत राहिले. कारण " कर्मयोग " एवढाच धर्म त्याना ठाऊक होता. " जनकादिकानीही कर्मयोगानेच सिद्धि मिळवली त्याचप्रमाणे तुला मिळवणे जरूर असल्याकारणे लोकसंग्रहावर दृष्टी ठेवून तुला कर्म करणेच उचित आहे. कारण श्रेष्ठ पुरुष जे जे करतो तेच इतर म्हणजे सामान्य लोक करीत असतात. तो जी गोष्ट प्रमाण म्हणून अंगिकारितो तिलाच लोक अनुसरतात. एवढ्यासाठी, हे पार्था, मला त्रिभुवनात काही कर्तव्य नाही तरी मी कर्मच करीत आहे. मला जे काही मिळवण्यासारखे होते ते मी मिळवले आहे आणि न मिळवण्यासारखे होते तेही माझ्या वाटचास आले आहे. असे असताही मी जर आळस सोडून कर्म करणार नाही, तर लोक उत्सन्न म्हणजे 'कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नसलेले असे होतील' यायोगे संकर म्हणजे सबगोलंकार झाल्याने त्या 'मुकी बिचारी कुणी हका', अशा लोकांचा कळप देश होईल; आणि तशा 'असुनि जिवंतहि मेल्या' लोकांच्या जिण्याला मी कारणीभूत होईन. तसा मी होऊ नये म्हणून मी पद्धतशीर कर्म करीत असतो, आणि तूही तसेच केले पाहिजेस," असा कर्मयोग्याचा उपदेश भगवंतानी अर्जुनास केला. तोच लोकमान्य टिळकानी व महात्मा गांधीनी राष्ट्रास आचरणशुद्ध शिकवला. तोच धडा भाऊसाहेब सोमणानी आपल्या चरित्राने व चारित्र्याने तरुण मंडळीना आपल्यापरी घालून दिला. असा प्रत्यय कोणत्याही वेळी सोमणांची यशोलोचना करणाऱ्या कोणाही अभ्यासकाला आल्याशिवाय राहणार नाही. आणि हा प्रत्यय घेत असता अभ्यासकाला एकच संदेश मिळत राहील की—

सर्व तऱ्हांचिया लोका सेवुनी आदरे भले ।
न रागाने, न लोभाने, कोणास अवमानिले ॥

# शुद्धिपत्रक

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ६ | | महादाजी १८३५ ते १८९३ | महादाजी १८०७ ते १८९२ |
| ८ | १८ | १८ सप्टेंबर | ८ सप्टेंबर |
| १४ | २८ | गोता झाला | गोता उत्पन्न झाला |
| १५ | १३ | यासाठी | या साली |
| २१ | २० | नागरिकांची योजना | नागरिकाची अध्यक्षपदी योजना |
| ३२ | १७ | हेतुपुरःस्कर | हेतुपुरस्सर |
| ३२ | २० | नाटच | नाटचं |
| ३२ | २१ व २२ | बहुधाध्येकं | बहुधाप्येकं |
| ४१ | ३३ | १९१० | १९२० |
| ४६ | ९ | जुलै १९२३ | जुलै १९२१ |
| ५२ | ११ | १९४७ | १९०७ |
| ८५ | ९ | मे १९३१ | १ मे १९३१ |
| १२४ | १५ | त्यानी | सोमणानी |
| १२६ | २६ | १९४७ | १९४६ |
| १३१ | ३१ | जात आत आहे | जात आहे |
| १३४ | १३ | सरकाचे | सरकारचे |
| १३६ | ३ | १९१३ | १९१२ |
| १३७ | १४ | वेस्टर्न इंडिया या | वेस्टर्न या |
| १३८ | ११ | कायदेशीर | कायदा |
| १४७ | १५ | 10-2-55 | 15-2-55 |
| १४७ | २४ | occasssions | occasions |
| १४७ | २७ | where | were |
| १६९ | १८ | १९१९ | १९१८ |
| १७५ | २ | १८९१ | १८९३ |
| १७५ | ४ | साली | सालापासून |
| १७८ | १ | रामभाऊ खंडेराव | रावसाहेब खंडेराव |

| | | | |
|---|---|---|---|
| १७८ | २ | नरसिंगपूरचे | नरसिंहपूरचे |
| १७८ | १० | १९५२ सालापासून | १९३२ सालापासून |
| १८६ | १९ | खररिमतपणे | खरमरितपणे |
| १८८ | ५ | श्रौताचोर्यांना | श्रौताचार्यांना |

भाऊसाहेब सोमण कालक्रमणिका

| | |
|---|---|
| १८९४ | १८९५ |
| १८२२ सर्व सोयींनी घर बांधले; दारू–निरोधनाचा खटला; बोरखळचे पादुका प्रकरण; रहिमतपूर येथील जिल्हा–सभेचे अध्यक्षपद | १९२० बोरखळचे पादुका प्रकरण; रहिमतपूर येथील जिल्हा-–सभेचे अध्यक्षपद. १९२२ सर्व सोयींनी घर बांधले; दारू–निरोधनाचे खटले. |

## लोकप्रिय भाऊसाहेब सोमण:—कालक्रमणिका

१८७६ चिमणगाव ता. कोरेगाव येथे ता. २४ नोव्हेंबर रोजी जन्म.
१८८७ मराठी शिक्षण पुरे व दत्तोपंत जोश्यांच्या इंग्रजी शाळेत प्रवेश.
१८८९ माजगावकरांच्या इंग्रजी शाळेत दाखल.
१८९१ सातारा हायस्कूलात प्रवेश.
१८९२ यू. एस्. एफ्. परीक्षा पास.
१८९३ वाळवे आदिकरून कॉंग्रेसच्या यात्रास हजर.
१८९५ चिरमुल्यांच्या लॉ क्लासातर्फे लो. टिळकांचे स्वागत.
१८९६ गणपत्युत्सवाचा प्रौढमेळा काढला.
१८९७ लो. टिळकांच्या कायदेमंडळ निवडणुकीस मते मिळविली.
१९०० विवाह; डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा पास; प्रांतिक परिषदेचे स्वयंसेवक म्हणून लोकमान्यांच्या गव्हर्नर-विरोधी ठरावास मते मिळविली.
१९०६ "प्रकाश" पत्र सुरू.
१९०७ सातारा जिल्हा सभा.
१९१० प्रकाशवरील माझिनी लेखाचा खटला.
१९१४ घरखरेदी; प्रांतिक परिषद–१५०० रुपयांची तूट गणपराव फणसळकरा-समवेत भरली; मद्रास कॉंग्रेसमध्ये भवाळ जहालांच्या समेटाची खटपट.
१९१६ लोकमान्यांच्या षठ्यद्बिपूर्तीची थैली पुरी करण्याची खटपट.
१९१७ लोकमान्यांच्या अध्यक्षतेखाली दादासाहेब करंदीकरांची षष्ठ्यद्बिपूर्ति
१९१८ चिरोलकेससाठी फंडाची उभारणी.
१९२० सर्वसोयींनी घर बांधले; दारुनिरोधनाचा खटला; बोरखळचे पादुका प्रकरण; रहिमतपूर येथील जिल्हासभेचे अध्यक्षपद. → १९२२
१९२३ ते १९२६ स्वराज्यपक्षातर्फे कायदेमंडळात.
१९३० कायदेभंगाचे चळवळीत शिक्षा.
१९३२ स्थानबद्ध.
१९३४ कॉंग्रेसतर्फे कायदेमंडळात.
१९३७ मुंबई वरिष्ठ विधिमंडळात उपाध्यक्ष.
१९३८ सातारा म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष.
१९४१ वैयक्तिक सत्याग्रहात स्थानबद्धता.
१९४२ "चलेजांव" चे चळवळीत स्थानबद्ध.
१९४६ मुंबई वरिष्ठ विधिमंडळात उपाध्यक्ष.
१९४७ मुंबई वरिष्ठ विधिमंडळाचे अध्यक्ष.
१९५२ विश्रांतीस सुरवात.
१९५५ फेब्रुवारी ता. ११ रोजी चिरविश्रांति.

# परिशिष्ट १

[ अ ]

## महाराष्ट्र प्रांतिक परिषद, सातारा १९२५

### स्वागताध्यक्ष रा. ग. सोमण यांचे भाषण

श्रीसमर्थांच्या सान्निध्याने पुनीत झालेल्या श्रीशिवछत्रपतींच्या या प्राचीन महाराष्ट्राच्या राजधानीस आपण सर्व राष्ट्रकार्याकरिता आलात याबद्दल आपणा सर्वांचे मी अत्यंत स्नेहभावाने व अन्तःकरणपूर्वक स्वागत करतो. हे शहर पूर्वी महाराष्ट्राचे केंद्र असून सर्व मराठी साम्राज्याच्या राजकारणाची सूत्रे येथून हालत व महत्वाची राजशासनेहि येथूनच प्रसवत. तथापि बदलेल्या नवीन परिस्थितीत या जिल्ह्याची परिस्थिती आजकाल असावी तशी अनुकूल नाही. मोठमोठ्या कारखान्यांच्या उभारणीस हा जिल्हा निसर्गतःच गैरसोईचा असलेमुळे किर्लोस्करवाडी व सातारारोड या ठिकाणी लोखंडी नांगर व शेतकीची इतर आऊते तयार करण्याचे कारखाने निघाले असून त्यांची भरभराट होत आहे, ही त्यातल्यात्यात समाधानाची गोष्ट होय. कऱ्हाड तालुक्यातील ओगलेवाडीचा काच–सामानाचा कारखानाहि महाराष्ट्रात लवकरच नावारूपास येईल अशी उमेद आहे. अशा परिस्थितीत येथील निसर्गदत्त रमणीय हवापाणी व आम्ही सातारकरानी प्रेमळ अंतःकरणाने केलेल्या आपल्या स्वागताची तयारी आपण गोड मानून घ्यावी अशी मी आपणास विनंति करितो.

सन १९०० साली, व सन १९१४ साली याप्रमाणे गेल्या २५ वर्षात इलाखा परिषदेची दोन अधिवेशनें येथे झालेली आहेत. पहिल्या अधिवेशनात लॉर्ड सँडहर्स्ट यांच्या कारकीर्दीसंबंधाने परिषदेस आलेल्या प्रतिनिधी मंडळीत तीव्र मतभेद झाला असता उभय पक्षास मान्य होण्यासारखा समेट घडून आला. सन १९१४ सालीहि महाराष्ट्रातील कार्यकर्त्या पुढाऱ्यात काँग्रेसच्या घटनेसंबंधाने तीव्र मतभेद झाले असता समेटाचा पाया साताऱ्यासच रचला गेला; या मागील दोन अनुभवामुळेच साताऱ्यास पुनः एकदा एकीचा प्रयत्न करुन पहावा या सदिच्छेनें प्रेरित होऊन सातारा जिल्ह्याचे पुढारी ना. दादासाहेब करंदीकर व जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माझे मित्र आप्पासाहेब आळतेकर या उभयतानी जळगावास या अधिवेशनाचे आमंत्रण दिले. ऐक्याविषयीचा सातारचा मागील लौकिक कायम ठेवणे हे सर्वस्वी आपल्याकडे आहे. मागील दोन परिषदामध्ये या इलाख्यातील कांही पुढारी व आमच्या जिल्हयातील व या नगरचे जे माझे अनेक मित्र आपण प्रामुख्याने वावरत असलेले दिसले, त्यांच्या अभावी आपणास मजप्रमाणेच चुकल्याचुकल्यासारखे

वाटत असेल यात संदेह नाही. लोकमान्य टिळक, सर गोकुळदास परेख, गुरुवर्य रा. ब. पाठक, नगरचे रा. बाळासाहेब देशपांडे व नुकतेच दिवंगत झालेले हरीभाऊ पटवर्धन, वाईचे नानासाहेब वैद्य व भाऊशास्त्री लेले व माझे सहकारी मित्र गणपतराव फणसळकर, नानासासाहेब आगाशे व डॉ. भिडे यांचा प्रामुख्याने उल्लेख केल्यावाचून मला राहवत नाही. गेल्या तीन चार महिन्यात देखील या दृष्टीने या जिल्हयाची मोठीच हानी झालेली आहे. क्षत्रिय कुलावंतस श्रीमंत भाऊसाहेब महाराज यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राची व विशेषतः या जिल्ह्याची मनस्वी हानी झाली असून माझे कऱ्हाडचे मित्र कृष्णाजी गोविंद बहुलेकर हे गेल्याच महिन्यात कालवश झाले असून त्यांच्या मृत्यूने स्थानिक व प्रांतिक अशा राष्ट्रीय चळवळीचा एक पुरस्कर्ता नाहीसा झाला आहे.

सामान्यतः हिंदुमुसलमानात इकडे दिलसफाई नांदत आहे. या जिल्हयात या उभय समाजात आज कैक पिढचा ऐक्य नांदत आहे. या दोन समाजात गैरसमज पसरविण्याचे प्रयत्न अँग्लो-इंडियन पत्रातून होत असल्यामुळे त्यांच्यांतील तेढ विकोपास जाऊन, केव्हा भडका उडेल याची सर्वास धास्ती वाटत आहे. तरी महाराष्ट्रातील उभय जमातीतील सूज्ञ व वजनदार पुढारी योग्य ती उपाययोजना करून उभय समाजातील ऐक्य कायम ठेवतील अशी मला आशा आहे. दोन परध- र्मीय व भिन्न संस्कृतीच्या समाजात प्रसंगविशेषी तेढ व मतभेद उत्पन्न होणे अस्वा- भाविक नाही. परंतु हिंदुधर्मीय समाजात दोन तट पडून, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद उपस्थित व्हावेत व या वादापायी महाराष्ट्रातील राजकारणाची एकप्रकारे पिछेहाट व्हावी ही दुर्दैवाची गोष्ट होय. एक वेळ खुद्द आमच्या जिल्हयात या बाबतीत तीव्र मतभेद उत्पन्न झाले होते व त्यावेळी मारामाऱ्या, जाळपोळ, पिकांची नासधूस वगैरे गोष्टीस ऊत आला होता; परंतु आता ही स्थिति निवळली असून आमचे ब्राह्मणेतरबंधु स्थानिक-संस्थांच्याद्वारे राजकीय चळवळीत मन घालू लागले आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. बहुजन समाजात ब्राह्मणेतरांचाच फार भरणा अस- ल्यामुळे समाजाचे नेतृत्व ब्राह्मणेतर पुढाऱ्याकडे जावे ही गोष्ट क्रमप्राप्तच होय. व त्याबद्दल ब्राह्मणाना विषाद मानण्याचे कारणही नाही. ब्राह्मणेतर पुढाऱ्यात उत्पन्न झालेल्या सार्वजनिक हितबुद्धीचा जातिनिविष्ट आकुंचितपणा कमी होऊन ज्या दिवशी व्यापक राष्ट्रहितबुद्धीस त्यांच्या अंतःकरणात निरंतरचा ठाव मिळेल त्या दिवशी अशा ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे पुढारीपण मान्य करण्यास ब्राह्मण लवमात्रहि अनुमान करणार नाहीत. या आश्वासनाचा दृश्य पुरावा म्हणून मी याच परिषदेचे उदाहरण देईन.

देशाच्या विस्कळित परिस्थितीत कोणतीहि चळवळ जोरात लागत नाही व स्वतः लॉर्ड रीडिंग व त्यांचे बरोबर आज विलायतेस गेलेले बडे बडे अधिकारी व

सनदी नोकर यानी ब्रिटिश जनतेपुढे एकपक्षी हकिकत मांडावी व त्या योगे ब्रिटिश जनतेची मने आपल्या विरुद्ध कलुषित झाल्यास आपल्याजवळ इंग्लंडात खरी खरी वस्तुस्थिति मांडणारी काँग्रेसची एखादी अधिकृत संस्था तिकडे नसावी ही गोष्ट इष्ट आहे काय ? अशा तऱ्हेच्या चळवळीचा समावेश आपल्या प्रस्तुतच्या काँग्रेसच्या कार्यक्रमात नाही त्यामुळे अडचणी उत्पन्न होत आहेत, सबब अशा स्वरुपाच्या एखाद्या योजनेची चर्चा आपण या परिषदेत करून त्याबद्दल एखादा शिफारसवजा ठराव केल्यास ते अस्थानी होणार नाही असे मला वाटते.

हिंदुस्थानास कोणच्या स्वरूपाचे स्वराज्य असावे याबद्दल देशातील पुढाऱ्यानी एखादी योजना ब्रिटिश जनतेपुढे मांडावी, या गोष्टीबद्दल डॉ. ॲनिबेझंट यांचा विशेष कटाक्ष आहे. डॉ. बेझंट यानी अशी एक योजना हिंदी जनतेपुढे चर्चेकरिता नुकतीच मांडली असून ती सर्वमान्य झाल्यावर पार्लमेंटद्वारे ब्रिटिश जनतेपुढे मांडावी असा त्यांचा मानस आहे. एखाद्या योजनेस काँग्रेससासारख्या प्रातिनिधिक संस्थेने मान्यता दिल्यावर तिचा ब्रिटिश जनतेवर काहीतरी परिणाम झाल्याविना राहात नाही. याचे ताजे प्रत्यंतर लखनौची काँग्रेस–मुस्लीमलीग योजना हेच होय. अशा स्थितीत डॉ. बेझंट यांच्या योजनेचा साधकबाधक विचार काँग्रेसने करून सदर योजनेस काँग्रेसची अधिकृत योजना असे स्वरूप त्यांच्या सल्याने देता येणे शक्य झाले तर ती गोष्ट सर्वतोपरी इष्टच होईल. या बाबतीत या परिषदेत काँग्रेसला शिफारसवजा एखादा ठराव करता आल्यास बरे होईल असे मला वाटते.

बेझंट योजनेसंबंधाने वर दर्शविलेली विचारसरणी आपणास पटल्यास काँग्रे–समध्ये सर्व पक्षांची एकी होऊन तिला पूर्वीप्रमाणे सर्व–संग्राहक करण्याचा विचार करणे ओघानेच प्राप्त होते.

बेळगावच्या तडजोडीत बहिष्काराचा कार्यक्रम तहकूब झाला व स्वराज्य पक्षाच्या कौन्सिलमधील कामगिरीस काँग्रेस कार्यक्रमातील एक भाग अशी मान्यता देण्यात आली. कौन्सिलातून स्वराज्य पक्षाचे हुकमी बहुमत आहे त्या मध्यवर्ती व बंगालमधील स्वराज्य पक्षाची कामगिरी आपल्या नजरे पुढे आहे; व त्याबद्दल प्रत्येक काँग्रेसभक्त त्यांचे अभिनंदनच करील. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्येहि स्वतंत्र पक्षाच्या सहाय्याने स्वराज्य पक्षाने सरकारास अनेक वेळ पराभूत केलेले आहे. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादासारखे मतभेदाचे प्रश्न सलोख्याने मिटवून प्रांतातील मतदार संघा–तर्फे पुढील निवडणुकीचे वेळी राष्ट्रीय पक्षाचे जास्त उमेदवार निवडून येतील अशी व्यवस्था होणे अवश्य आहे. या बाबतीत स्वराज्यपक्ष व दुसरे इतर पक्ष यानी सहकार्य करून मतदार संघास आपल्या हक्कांची जाणीव करून दिली तरच बहुजनसमाजात काँग्रेसविषयी अधिक आगत्य वाटू लागेल. विधायक कार्यक्रमा–

पैकी खादीप्रचार, व परदेशी मालावरील बहिष्कार ही बाब अत्यंत महत्वाची होय. राष्ट्रीय शिक्षणाचे बाबतीत महाराष्ट्रापुरता विचार करणे झाल्यास पुण्याचे टिळक-महाराष्ट्र विद्यापीठ व टिळक महाविद्यालय या संस्थांचा निर्देश करावा लागेल. सदर संस्थाना या जिल्ह्यातून आजवर बरीच आर्थिक मदत झालेली आहे, तशीच ती पुढे होईल अशी उमेद आहे. सातारा येथील टिळक राष्ट्रीय विद्यालय ही नमुनेदार संस्था अद्याप पूर्वीच्याच जोमाने चालविली जात आहे, याचे श्रेय आर्थिक मदत देणारापेक्षा, ती संस्था चालविणाऱ्या घाणेकर बंधूंच्या स्वार्थत्यागाला दिले पाहिजे. असहकारितेच्या अगोदरच्या काळात जन्मास आलेली वाईची प्राज्ञ-पाठशाळा ही संस्था भरभराटीने चालली आहे, हे नमूद करण्यास आनंद वाटतो. अस्पृश्यतानिवारणाचे बाबतीत या जिल्ह्यात हळूहळू प्रगति होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

माझी आपणा सर्वास अशी प्रार्थना आहे की, विद्यमान परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करून देशस्थिति सुधारण्यास आपण प्रवृत्त व्हावे व महाराष्ट्रातील बहुजनसमाजास देशसेवा करण्याची संधी मिळेल असा एखादा हल्लीहून अधिक सुकर व सर्वसंग्राहक कार्यक्रम आखून, लोकमान्य टिळक व म. गांधी यांच्या कर्तृत्वास साजेसा असा मार्ग जनतेस दाखवावा.

[ आ ]

## ऐक्याची प्रथा

सातारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यात राजकारणाचे बाबतीत मतभेद नाहीत असे नाही. अगदी नेमस्तपक्षापासून तो नव्या उदय पावलेल्या समाजसत्तावादी पक्षापर्यंत प्रत्येक पक्षास थोडेबहुत अनुयायी या जिल्ह्यात आहेत. तथापि सामान्यपणे बोलावयाचे झाल्यास राष्ट्रीयसभेच्या अनुयायांचा वर्ग हाच या जिल्ह्यात बहुसंख्य आहे. असे असूनही नेमस्त, प्रतिसहकारवादी, निष्ठावंत काँग्रेसवाले व समाजसत्तावादी या सर्व पक्षांची एकीने काम करण्याची सातारा जिल्ह्यातील भूमिका उज्वल आहे असे स्वाभिमानपूर्वक म्हणता येईल, व हीच ऐक्याने काम करण्याची प्रथा यापुढेही चालू राहिल्यास सातारा जिल्हा महाराष्ट्रातील इतर कोणत्याही जिल्ह्याच्या मागे राहू शकणार नाही. सातारा जिल्ह्याचे हल्लीचे आशामय वातावरण निर्माण करण्याचे सर्व श्रेय सातारा जिल्ह्यातील विद्यमान व दिवंगत वृद्ध पिढीकडे आहे हे विसरून चालावयाचे नाही.

ता. १७-१२-३५ "जागृत सातारा" प्रस्तावना

[ इ ]

## लोकसेवा संघासाठीं

सार्वजनिक कार्याचे क्षेत्र, व्याप आणि जबाबदारी अलीकडे सर्वच दृष्टीने वाढत चालली आहे. म्हणून संसार प्रपंच्याच्या यातायाती सांभाळून वाढत्या जबाबदारीचे हे काम लोकानी फावल्या वेळात कितीही केले तरी कमीच पडू लागले आहे, म्हणून या कार्याची पायाशुद्ध उभारणी केल्याशिवाय सार्वजनिक काम परिणामकारी होणार नाही आणि लोकांचा सामाजिक राजकीय आर्थिक उत्कर्ष अतएव स्वराज्य सिद्धी होणार नाही; ही विचारसरणी प्रभावी होऊनच नामदार गोखले यानी " सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी " आणि पंजाब केसरी लाला लजपतराय यानी " सर्व्हंटस् ऑफ दी पीपल सोसायटी " या सारख्या लोकसेवेच्या कायम संस्था स्थापन केल्या; त्याच प्रमाणे पं. जवाहरलाल नेहरूनीही ' यू. पी. नॅशनल सर्व्हिस ' या नावाची एक प्रांतिक संस्था स्थापन केल्याचे स्मरते; वरील पैकी पहिल्या दोन संस्था भारतीय व्यापाच्या आणि तिसरी संस्था प्रांतिक व्यापाची. वरील संस्थांचे कार्यक्षेत्र फारच व्यापक म्हणून त्याना जिल्हा–तालुका–खेडी इतक्या दूरच्या क्षेत्रापर्यंत विशेष रीतीने उतरण्यास सवड मिळणे प्रायः दुःसाध्य, आणि या मोठ्या संस्थांचा बहुतेक वेळ आणि उत्साह मोठ्या राजकारणात मोडणे अपरिहार्य झाले आहे. यासाठी या मोठ्या आदर्श संस्थांच्या सामान्य नमुन्यावर जरूर ते फेरबदल करून एखाद्या मोजक्या क्षेत्रापुरती–आरंभी तरी जिल्ह्यापुरतीच, लहानशी लोक–सेवेची कायमची संस्था करावी, असा विचार या जिल्ह्यातील अनेक लहान मोठ्या कार्यकर्त्यांच्या मनात आज सात आठ वर्षे घोळत आहे, त्या प्रमाणे सन १९३१ साली मसूर परिषदेत तसा एक ठरावही झाला, पण सत्याग्रहसंग्राम व इतर अनेक कारणामुळे सन १९३५ पर्यंत या कल्पनेस जोर लागला नाही.

जिल्ह्यातील सर्व प्रकारचे सार्वजनिक कार्य, मुख्यतः राजकीय, सामाजिक, आर्थिक इ. या संस्थेने करावयाचे आहे. आरंभी, निरनिराळ्या दृष्टीने जिल्ह्याची पहाणी करून माहिती मिळविली जाईल व त्या माहितीच्या, अभ्यासाच्या आणि व्यवहार्यतेच्या इष्टतेप्रमाणे एक अगर अनेक सार्वजनिक अडचणींचा परिहार करण्याचा प्रयत्न केला जाईल. लोकातील अज्ञान, विकल्प आणि कृत्रिम विरोध अगर उदासीनता काढून टाकून, जनता संघटित करणेचा प्रयत्न केला जाईल; अशातऱ्हेची कार्याची आजची कल्पना आहे.

आज कार्य करावयाचे तर एखाद्या लाखाचा फंड अगर जिल्ह्याला पाचचार आजन्म सेवक यानी भागणार नाही. इतकी किमान व्यवस्था दर तालुक्याला लागेल. पण हा केवळ आरंभ आहे व परिस्थितीच्या अनुकुलतेप्रमाणे हे सर्वच कार्य आणि कार्यक्षेत्र सुद्धा अधिक व्यापक करावे अशी महत्त्वकांक्षा आहे.

सातारा श्रीशाहू १ ऑगष्ट १९३६

[ ई ]

## रिपोर्टाबद्दल इशारा

१९४० साली इंदोलीच्या सत्याग्रह–शिबिरात केलेल्या भाषणाबद्दल रावसाहेब पटवर्धनाना ऑगस्टमध्ये शिक्षा झाल्यामुळे, त्या शिक्षेच्या निषेधार्थ पाठक भवनात भरलेल्या सभेचे अध्यक्ष म्हणून सोमण म्हणालेः–

" शिक्षा देताना सरकारने व भाषणे करताना तरुण कार्यकर्त्यानी जबाब–दारीने वागले पाहिजे. वास्तविक ज्या राजकीय भाषणाबद्दल कार्यकर्त्याना न्यायासनासमोर खेचले जाते, त्या भाषणांचे रिपोर्ट हे लघुलेखकानी अक्षरशः सविस्तर घेतलेले असावेत. सरकारचे डोके ठिकाणावर असेल तरच ही अपेक्षा सफल होणारी आहे. एक वाक्य इथले, तर दहा वाक्ये सुटून नंतरचे दुसरे, अशा रिपोर्टावर शिक्षा दिल्या जातात. म्हणून आमच्या तरुण कार्यकर्त्यानी विनाकारण डोकी भडकू देऊ नयेत. आमचे तरुण ऐकतील. पण सरकारला सांगणारा मी कोण ? ".

[ उ ]

## वेस्ट लॉज (मलबार हिल) मुंबई (१९५२ जानेवारी)

" सार्वजनिककार्यात हौसेने पडू इच्छिणाऱ्या तरुणासाठी ट्रेनिंग स्कूल काढण्याची व्यवस्था होईपर्यंत पिसाट वृत्तीचे व समाजातील शिष्टाना अप्रिय असलेले लोक पुढाऱ्याच्या भोवती गोळा झाले तर ते तसेच चालावयाचे. धुतल्या तांदुळासारखे चारित्र्यसंपन्न तरुण निर्माण होईपर्यंत सार्वजनिक कार्य अडवून का ठेवावयाचे ? सभोवती असलेल्या मंडळीत आपल्या कार्यास मदत करण्याची इच्छा व पात्रता असणारे लोक पाहून व त्यांच्या एकाद्या विशिष्ट गुणाकडे दृष्टी ठेवून त्यांचा संग्रह, नेता होऊ पहाणारास करावा लागणे अपरिहार्य आहे. नेत्याच्या शुद्ध चारित्र्याचा, निर्लोभ वृत्तीचा, त्यागबुद्धीचा व सर्वाहून कठीण म्हणजे निरहंकार वृत्तीचा परिणाम अनुयायावर कालांतराने इष्ट असा झालाच पाहिजे. कोणत्याही व्यक्तीत एखादा तरी चांगला गुण प्रकर्षाने वास करीत असतोच. तेवढ्यावर दृष्टी देऊन त्याचा संग्रह कोणास खाजगी व सार्वजनिक कामात तो उपयुक्त ठरलाच पाहिजे. वेळी अवेळी त्यास बोधामृताचे घुटके देत बसल्यास अगर त्याची हेटाळणी केल्यास तो तुमच्या सावलीस उभा राहतो कशाला ? "

**कै. शंभुराव आठल्ये यानी लिहिलेल्या भाऊसाहेबांच्या आठवणीतून**

# परिशिष्ट २

## सोमणांच्या आयुष्यभरीचा सातारा जिल्हा

१८७६ सार्वजनिक सभामार्फत ब्रिटिशानी अन्यायाने घेतलेला 'सातारा' परत मिळावा अशी मागणी. (२) लवाद कोर्टाची स्थापना. (३) तासगाव येथे दवाखाना. (४) मायणीतळ्याचा व नेरचा कालवा सुरू. (५) वारणेवरील कणेगावचा पूल. (६) फिट्झ्जिराल्ड घाट सुरू.

१८७७ सातारा म्युनिसिपालिटीत 'साखरेचा कारखाना काढण्याचा ठराव.' (२) उंब्रज येथे तारळीवर पूल. (३) भिलवडीचे व्यंकटशास्त्री रामदासी शंकराचार्य झाले.

१८७८ टोळधाडीने हिवाळ्यातील पिके बुडाली.

१८८१ न्यायमूर्ति रानड्यांचे घाटे नाटकगृहात 'सामाजिक शिक्षणाची साधने' यावर व्याख्यान. (२) नेरचा तलाव तयार.

१८८२ गंगाधर रामकृष्ण किराणे 'स्थानिक स्वराज्य-' संबंधी दौरा काढतात.

१८८३ दादासाहेब करंदीकर 'नेटिव्ह मॅजिस्ट्रेट ज्युरिस्डिक्शन बिलाबद्दल' सभा करतात.

१८८४ टोळधाडीमुळे १३८० रु. सारासूट.

१८८५ वाई तालुक्यातील १७ गावावर प्युनिटिव्ह पोलीस.

१८८६ मुनशी शेखव॥ शेखचांद यांचा 'दारूपाना' विरुद्ध दौरा.

१८८८ राष्ट्रीयसभेच्या प्रचारार्थ बळवंतराव कोल्हटकरांचा दौरा.

१८८९ वाळवे तालुक्यात लिमयेप्रभृती घरापाठीमागे एक पैसा वर्गणी राष्ट्रीय-सभेसाठी गोळा करतात.

१८९० शिराळ्याची छोटी कॉंग्रेस. (२) सातारा शहरास ज्यूरीचा हक्क व 'रेल्वेचा फाटा' यांची गव्हर्नरसाहेबांचे मानपत्रात मागणी.

१८९१ गोविंद धोंडदेव ऊर्फ रावसाहेब लिमये यांच्या अध्यक्षतेखाली पुण्याची चवथी प्रांतिक परिषद. (२) कऱ्हाड, पाटण वगैरे तालुक्यातून शेतकऱ्यांच्या झुंडी गायरानाच्या जप्तीबद्दल दाद मागण्यासाठी कलेक्टरच्या बंगल्यावर.

१८९२ पाच पाच रुपयांचे शेअर काढून ६०० रुपयांचे भांडवलानिशी वाई येथे देशी कापडाचे दुकान.

१८९३ ह्यूमसाहेब हजर असलेली वाळवे येथील छोटी कॉंग्रेस. (२) वाई तालुका कॉंग्रेस. (दु.)

१८९४ नानासाहेब वैद्यप्रभृती तेरा प्रतिष्ठितावरील वाई येथील 'द्वारांचा' खटला.

१८९५ ना. टिळकांचा दौरा व वाईसातारा येथे मानपत्रे.

१८९६ कऱ्हाड येथे दुष्काळामुळे पेठेची लूट.

१८९७ ' स्वतंत्र होण्याची तयारी ' या लेखाबद्दल प्रतोदकर्त्यास शिक्षा. ( २ ) मोदवृत्तकर्त्यास शिक्षा.

१८९९ डिस्ट्रिक्ट काँग्रेस कमेटीतर्फे नेमलेले नारायण रामचंद्र घमंडे यांचा प्रचार.

१९०० साताराची प्रांतिक परिषद.

१९०१ लँडरेव्हेन्यूबद्दल चळवळ.

१९०४ शिवाजी क्लबातर्फे स्वदेशी प्रदर्शन. (२) टोळधाडीने पिकास धक्का.

१९०५ स्वदेशी चळवळीची हालचाल. (२) टोळधाडीने पिकांचा नाश.

१९०६ ओगले यांची रेल्वेच्या आसपास स्वदेशीवर व्याख्याने. (२) लोकमान्य, आण्णासाहेब परांजपे व केळकर यांचा स्वदेशीचा प्रचार. (३) औद्योगिक परिषदेची स्थापना. (४) टोळधाडीने पिके गेली.

१९०७ सातारा जिल्हा सभेची स्थापना.

१९०८ लोकमान्यांचे अपिलासाठी दादासाहेब करंदीकर विलायतेस रवाना.

१९०९ कऱ्हाड मॅच फॅक्टरी. (२) कोरेगाव तालुक्यात पिकेटिंगचा खटला.

१९१० आठल्येप्रभृतींचा बाँब खटला.

१९१३ सातारा–वाळवा–तालुक्यात पूर येऊन नासधूस झाली व जिल्ह्यामध्ये नदीकाठची शेती साफ धुवून गेली.

१९१४ प्रांतिक सभा. (२) गाव–तालुका–जिल्हा सभामार्फत काँग्रेसचे काम चालावे म्हणून आप्पासाहेब आळतेकर मद्रासेस रवाना. (३) सातारा कऱ्हाड तालुक्यात पुरामुळे नदीकाठी संकटे ओढवून पिके वाहून गेली.

१९१६ सहकारीसंस्थांची ज्युबिली.

१९१७ दादासाहेब करंदीकरांची ज्युबिली. (२) काँग्रेस स्कीमला पाठिंबा. (३) होमरूललीगची चळवळ.

१९१९ उडतरे प्रकरण.

१९२० असहकारितेच्या प्रचारासाठी महात्मा गांधी व मौलाना शौकतअल्ली यांचा दौरा.

१९२१ देऊर प्रकरण. (२) मुळशी सत्याग्रहास स्वयंसेवक रवाना. (३) टिळक–राष्ट्रीय विद्यालयाची स्थापना. (४) असहकारितेचा प्रसार.

१९२२ कोयनाधरणासंबंधी खटला. (२) युवराज बहिष्काराबद्दल काकाराव पंडितांचे इनाम जप्त. (३) पिकेटिंगचे खटले.

१९२३ कऱ्हाड येथे नेमस्तांची प्रांतिक परिषद.

१९२५ राष्ट्रीय पक्षाची प्रांतिक परिषद.

१९२७ महात्मा गांधी व राष्ट्रसभापती श्रीनिवास अय्यंगार यांचे दौरे. (२) परचुरे यांच्या ' खेड्यातील यात्रा ' पुस्तकाचे प्रकाशन (३) कोयनाधरणासंबंधी

लोकसमजावणी (४) वाई येथील राष्ट्रीय शिक्षण परिषद. (५) त्रिशतसांवत्सरिक शिवोत्सव.

१९२८ तुकडेपट्टी बिलाचा सार्वत्रिक निषेध, आमदार देशपांड्यांचा दौरा. (२) सायमन कमिशनवरील बहिष्काराचा रा. ब. काळे यांचा ठराव. (३) कोयनाखोऱ्यातील प्रचार. (४) सातारा जिल्हा ब्राम्हणेतर परिषद. (५) कऱ्हाड तालुक्यात खेडोपाडी काँग्रेस प्रचार.

१९२९ सातारा तालुका खेडकरी परिषद. (२) कोयनाधरणासंबंधी आमदार देशपांड्यांचे कौन्सिलात प्रश्न. (३) सेवादलाच्या शाखा. (४) दे. भ. श्रोत्रींचा गौरव.

१९३० त्रिशतसांवत्सरिक शिवोत्सव. (२) कायदेभंगाच्या चळवळीतील ना. गव्हर्नरसाहेबांचे काळ्या निशाणानी स्वागत. (३) बिळाशीचे बंड. (४) सोमणाना बेड्या आणि कोर्टात गांधी-टोपी. (५) शिबीर व काँग्रेस संस्थांची जप्ती.

१९३१ सेनाफ्ती बापटांचा दौरा व त्यांचे प्राणयज्ञदल. (२) पं. जवाहरलाल यांचा दौरा. (४) एकसळास शेतकरीसंघाची स्थापना.

१९३२ डेटेन्यू व बेकायदेशीर संस्था ठरण्याचा वरवंटा फिरला. (२) हजेरीच्या नोटीसा व त्यांचा भंग. (३) हरिजनास मंदिरप्रवेश. (४) येरवड्यास लक्ष्मण जोशीचा मृत्यू.

१९३३ Karad Electric Co.

१९३४ मुंबईकौन्सिलच्या पोटनिवडणूकीत काँग्रेस उमेदवार भाऊसाहेब सोमण यशस्वी. (२) असेंब्लीच्या निवडणुकीत जेधे-गाडगिळाना पहिल्या नंबरची मते.

१९३५ काँग्रेसचे प्रचारक खेडोपाडी व ठिकठिकाणी ग्रामोन्नतिकार्यालये. (२) काँग्रेसचे अध्यक्ष राजेंद्रबाबू यांचा यशस्वी दौरा. (३) लँड मॉर्गेज बँकेची स्थापना. (४) पेठ येथील सुशिक्षित चर्मकार परिषद. (५) औंध संस्थानांचे मंत्री लक्ष्मणराव किर्लोस्कर. (६) शं. द. जावडेकर मुंबईस 'नवशक्ति' काढतात. (७) तासगावचे थोरबोले अठरा तास लाठी फिरवून रेकॉर्ड मोडतात. (८) सातारा विद्वत्परिषदेचा प्रयत्न फसला. (९) हिंदस्थान सरकारच्या ग्रामोद्धाराचे एक कोटी रुपयापैकी जिल्ह्याला ११२००रु. आले. (१०) वर्धा हरिजनसेवकसंघाकडून सातारा छत्रपती बोर्डिंगला ५०० रु. तनखा. (११) गुच्चा अलिशा पठाणाने इसलामपूरची यमाई फोडली. (१२) दे. नारायणराव पाटणकर वकील इसलामपूर, यांचा मृत्यु. (१३) काँग्रेस महोत्सव, तत्प्रीत्यर्थ समर्थाचा खास अंक नि ब्रिटिश रियासतीतील सातारा जिल्ह्याचा पुरुषोत्तम पांडुरंग गोखले यानी लिहिलेला राजकीय इतिहास "जागृत सातारा" प्रसिद्ध.

१९३६ इसलामपूर शारदामंडळ. (२) दळवी, साखवळकर, हळबे यांचे काँग्रेस-पवाडे पहिल्या प्रतीचे ठरले. (३) रा. ब. काळे यांचा मृत्यू. (४) लोक-सेवासंघाच्या योजनेची दे. सोमणानी मांडणी केली. (५) जाळगेवाडी जळाली. (६) ऐक्यकार वाग्भट देशपांडे वारले. (७) दे. पांडुअण्णा शिराळकर षष्ठ्यब्दि. (८) वाळवे तालुका शेतकरी परिषद. (९) ग्रामसुधारणेची सरकारी ढाल येलूरला. (१०) अर्बन बँक परिषद सातारा. (११) दे. सोमणांची षष्ठ्यब्दि.

१९३७ डॉ. हेडगेवार यांचा दौरा. (२) पुराणसंशोधक विष्णुपंत करंदीकर यांचा मृत्यू. (३) दे. जवाहरलाल यांचा दौरा. (४) काँग्रेस उमेदवार बहु-संख्येत विधिमंडळात. (५) नव्या १९३५ कायदाघटनेचा धिक्कार. (६) शैवलिंगायत परिषद कऱ्हाड. (७) बुधची सातारा जिल्हा राजकीय परिषद. (९) लोकसेवासंघाचे कार्य गोखले सुरू करतात. (१०) काँग्रेसराज्यदिन. (११) लोकमान्य पुण्यतिथीस अधिकारस्वीकारदिन. (१२) गोखले अर्थ संशोधनसंस्थेतर्फे वाई भागातील शेतकऱ्यांची आर्थिक पहाणी सुरू. (१३) दे. नरीमन यांचा दौरा. (१४) स्वदेशी प्रदर्शन वाई नि ना. लक्ष्मणराव पाटील यांचा दौरा. (१५) कऱ्हाड-सातारा हायस्कूलांच्या संमेलनास ना. बाळासाहेब खेर. (१६) शेणोली शेतकरी परिषद. (१७) वारणा खोऱ्यात आण्णासाहेब दास्ताने, दे. शंकरराव देवांचा दौरा.

१९३८ ना. मुरारजी देसाई दौरा. (२) मसूर मातंग परिषद. (३) मुंबई प्रांतीय प्रागतिक परिषद सातारा. (४) कऱ्हाड वैद्य हकीम परिषद. (५) गाता-डवाडी शेतकरी परिषद व मीठ तयार करण्याचे वाफे उघडले. (६) दे. आप्पासाहेब आळतेकर यांचा मृत्यु. (७) दे. नाथ घाणेकर यांची पन्नाशी साजरी. (८) अरळयाची शिराळापेटा राजकीय परिषद. (९) जिल्हा-बोर्ड काँग्रेसचे निवडून आले. (१०) जमिनदार संघाचा शिराळकर-सोमणावर मोर्चा. (११) ना. नूरींचा दौरा व विटे राजकीय परिषद. (१२) ५१००० ची फलटण संस्थानने सारासूट दिली. (१३) इसलामपूर येथे जमीन मालकांचा दे. शि. ल. करंदीकर यांचे अध्यक्षतेखाली टेनन्सीबिलविरोध. (१४) जिल्हा शेतकऱ्यांचा कुळकायद्यास कऱ्हाड येथे पाठिंबा. (१५) दे. जावडेकरांचे ' आधुनिक भारत " प्रसिद्ध. (१६) पंतप्रतिनिधीनी औन्धप्रजेस जबाबदार स्वराज्य दिले. (१७) मसूरचे स्वदेशो प्रदर्शन व ना. नूरी-मावळणकर यांचा दौरा. (१८) कोल्हापूर व हैद्राबाद सत्याग्रहास पाठिंबा. (१९) विणेखोल भस्मसात् व त्यास मदत.

१९३९ सिराळेपेठ्यातील बुडक्यावरील पाणीपट्टी रद्द. (२) दारू दुकाने उठवा व लोकलफंड कमी करा म्हणून मागणी. (३) मिरजेचे पहिले दक्षिण-महाराष्ट्रसाहित्य संमेलन. (४) कऱ्हाड कृष्णाघाटावरील ताबूत मिरवणूक वाद. (५) बुर्ली येथील कृष्णाकॅनाल बागाईतदार सभा. (६) युद्धविरोधी दिन. (७) कूपवाडची कोल्हापूर प्रजापरिषद-कूळकायदादिन. (८) ना. लठ्ठे यांचे अध्यक्षतेखाली लोकसेवासंघाचा वाढदिवस व " राज्य इंग्रजांचे, कारभार काँग्रेसचा व अंमल• गावगुंडांचा " याचा सार्वत्रिक प्रतिध्वनि; औन्ध ग्रामपंचायतीना न्यायाधिकार. (९) अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद सातारा. (१०) खानापूर,. माण, कोरेगाव, शिराळापेटा यात विशेष व इतरत्र सामान्यतः पाण्याचा नि वैरणीचा दुष्काळ. (११) कऱ्हाड येथे कृष्णा नदीवर पात्रापासून ४५ फूट उंच असा १४ कमानींचा ९०० फूट लांब व ४७१ हजार रुपये किमतीचा पूल.

१९४० उंब्रजचे शेतकी प्रदर्शन. (२) " कोल्हापूर ही आजची नरकपुरी " म्हणून से. बापटांचे कऱ्हाडास व्याख्यान. (३) सक्करदिन. (४) मुंबई मजूर-महागाई-भत्ता-संपदिन. (५) " परिचित सातारा " प्रसिद्ध. (६) येराडे येथील शेतकी प्रदर्शन. (७) रहिमतपूर येथे खादी व ग्रामोद्योग प्रदर्शन आणि सातारा जिल्हा खादीसंघाची स्थापना. (८) वॉर्डन इन्शुअरन्स कंपनीची १९३९ ची अखिल भारतीय ट्रॉफी मे. सरडे आणि घाटगे यानी मिळविली. (९) " आर्यसंस्कृतीची उत्कर्षापकर्ष " हे पुस्तक जप्त करण्याबद्दल जिल्हा मुसलमानांची मागणी. (१०) डॉ. हेडगेवार यांच्या मृत्युबद्दल दुःखप्रदर्शन. (११) लोणंदप्रभृति कोरेगाव तालुक्यातील बारा गावे वाई तालुक्यात सामील केली. (१२) रेठरेबु।। येथे एकाच दिवसात सात खून करणारा केसू बंडू पवार वंशवृद्धीसाठी तुरुंगात दत्तक घेतो व फाशी जातो. (१३) आगामी राष्ट्रीय लढ्यात भाग घेता यावा म्हणून गोसावी, गोखले, काशीद यांचा लोकसेवासंघास रामराम. (१४) समाजसत्तावाद्यातर्फे युद्धविरोध नि तुरुंगभरती (१५) इंदोली येथे सत्याग्रही-शिबीर. (१६) कराड येथे जिल्हा हिंदुसभा संमेलन नि आमदार करंदीकर यांचे व्याख्यान. (१७) जिल्हा नोकरशाहीच्या दडपशाहीस उत्तर म्हणून आठवडाभर काँग्रेस धोरणाचा अधिकृत प्रचार आणि जिल्हा अधिकाऱ्यास सभारिपोर्टाबद्दल गोखले यांचे पत्र. (१८) व्हॉइसरॉय घोषणानिषेधदिन. (१९) आत्मारामपंत ओगले यांचा पन्नासावा वाढदिवस. (२०) सातारा येथील महाराष्ट्रमहिला परिषद. (२१) भारतमाताकार आठल्ये यांचा अपमृत्यू. (२२) विधायक कामगिरीसाठी काशिनाथ देशमुख,

कत्तेप्रभृति सत्याग्रही म्हणून कमी होतात. (२३) ग्रामपंचायतीच्या लोकशाहीच्या निवडणुकी. (२४) युद्धसहाय्यासाठीं ना. गव्हर्नर यांची भेट व कुस्त्यांचा फड. (२५) गांधीप्रणीत भाषणस्वातंत्र्याच्या सत्याग्रहार्थ मातबर प्रतिनिधी. (२६) कराड म्यु. पालिटी सरकारजमा. (२७) छत्रपती राजाराम महाराज यांच्या अकाली निधनाबद्दल शोक सभा. (२८) युद्धफंड सक्तीचा नाही व चावडीच्या रुपयामागे एक आणा युद्धाकरिता अधिकाऱ्यानी मागितला तरी ती वाढलेली चावडी नव्हे; म्हणून तो परवडेल तरच द्यावयाचा असे सांगणाऱ्या गट परिषदा व सभा.

१९४१ ओला दुष्काळ (२) सोमणसाठे स्थानबद्ध; अनेकयुद्ध विरोधी घोषणा करणारे काँग्रेसचे मातबर सत्याग्रही याचा तुरुंगवास. (३) चाफळची शेतकरी परिषद. (४) शेणोली-ताकारी येथे कृष्णा कॅनाल-बागाइतदारास एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर भेटतात नि अपुऱ्या पाणीपुरवठ्याची रड सावरतात. (५) सातारा जिल्हा-रॉइस्टांची कऱ्हाड परिषद. (६) लोकसेवा संघाचा त्रैवार्षिक अहवाल प्रसिद्ध. (७) मध्यवर्ती असेंब्लीच्या निवडणुकीत बॅ. जमनादास नि दे. राजमल निवडून आले. (८) कऱ्हाड-वृत्तपत्र संघाची स्थापना. (९) सातारा-जिल्हा काँग्रेस प्रेमी युवक परिषद पुसेगाव. (१०) दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलन कऱ्हाड. (११) भागलपूरच्या नागरीक-स्वातंत्र्य लढ्यासाठी हिंदुमहासभेचे प्रतिकारक रवाना. (१२) पावसाचे अभावाने. दुष्काळ, युद्धजन्य महागाईने बेकारी. वैयक्तिक सत्याग्रह. (१३) जेधे गाडगीळांच्या जागांची पोट निवडणूक. ~~(१४) कऱ्हाडचे दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलन.~~ (१५) यशवंत राजकवि झाले त्यांचा यशोगौरव. (१६) सातारा जिल्हा युवक परिषद. (१७) साताऱ्यास मॅट्रिक केंद्र आले.

१९४२ (१) साताऱ्यांतील वैद्य, मोडक प्रभृतीनी चिरमुले यांचे प्रोत्साहनाने मुंढवा कागद कारखाना आपले व्यवस्थेखाली घेतला. (२) न्या. रानडे शतसांवत्सरिक जन्मोत्सव. (३) विहे येथे सोलापूरचे भाई बेके यांचे अध्यक्षतेखाली जहाल लोकपरिषद. (४) कऱ्हाड कृष्णा घाटावरून ताबूत न नेण्याची निरंतरची ताकीद देणारा कऱ्हाड कोर्टाचा निकाल. (५) मोटार गाड्यांची गॅस प्लॅन्ट वाहतूक. (६) गोटखिंडी येथे चौगुली वतने खालसा करण्याचा नोटिसा. (७) लोणंद भोवतालची २३ गावे लष्करी उपयोगासाठी सरकारने उठविली. (८) खातगुणचे राममंदीर हरिजनासाठी खुले करून नंतर कोल्हापूरच्या राणीसाहेबानी रीजन्सीचे अधिकार स्वीकारले. (९) नाथ घाणेकर यांचे काव्यप्रकाशन. (१०) ~~अष्टे येथे शिरगावकर बापू जाधवाचे शक्तीचे अचाट प्रयोग.~~

(११) काँग्रेसचे पंधरा आधारस्तंभ स्थानबद्ध, नि समर्थ पत्राचा विराम. "सोडा हिंद" चे अंदोलन उसळी घेऊ लागले नि जिकडे तिकडे धरपकड, उत्पात, सत्याग्रह नि गुप्त हालचाली व प्रतिकारी दडपशाही व सामुदायिक दंड. (१२) फलटण संस्थानात लोकसत्ताक राज्यव्यवस्था. (१३) प्राथमिक शिक्षकांची महागाई मागणी व उपवास. (१४) डॉ. वा. वि. आठल्ये यांचे 'चिरंतन जीवन' प्रसिद्ध. (१५) येरवडयातून किसन वीर व पांडु मास्तर या स्थानबद्धांची निसट. (१६) श्रौताचार्य बापटांची षष्ठ्यब्दि. (१७) म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकरांचा कैलासवास. (१८) रॉकेल व साखऱ्याची चणचण.

१९४३ (१) प्राथमिक शिक्षकांची उपासमारीची ओरड, अन्न सत्याग्रह, शिष्ठमंडळ नि शेवटी तुटपुंजा पडणारा पण 'दगडापेक्षा वीट मऊ' म्हणविणारा ६ रु. महागाई भत्ता मंजूर. (२) ग्रामपंचायत परिषद व शेतकी प्रदर्शन. (३) काँग्रेसच्या आंदोलनातील धरपकड, अनेक अदृष्ट कार्यकर्त्यांच्या हुडकणीसाठी हजारोची बक्षीसे, अनेकाना बिनचौकशी स्थलबंदी, शिरवडे स्टेशन जळिताच्या खटल्यात दे. भ. सदाशिवराव पेंढारकर व रंगा पाटील याना सर्व जोडीदार निर्दोषी सुटून व पुरावा अपुरा पडूनही जब्बर शिक्षा. (४) काँग्रेसच्या आंदोलनाचा फायदा घेऊन प्रक्षुब्धानी बांधलेल्या कमरा व त्यामुळे झालेल्या लुटालुटी, सरकारी टपालाची लांबवण, आगगाडयांच्या वाहतुकीस आलेले अडथळे आणि यातूनच उद्भवलेले सामुदायिक दंड, शिराळे पेटयातील नि खेडोपाडीच्या पोष्टांचे उच्चाटन नि सरकारी जुलुम. (५) दंगलीमुळे तालुका व पेटावार पोलिस बंदोबस्तात गटवारीने शेतसारा वसुलीची व्यवस्था. (६) विशिष्ट गटातील व्यापाऱ्याना लाडिकपणाने वागवून सरकारने केलेल्या बाजारभाव नियंत्रणाने गरीबाना मोडसुद्धा मिळण्याची पंचाईत होऊन काळया बाजाराची चलती नि एकंदर सावळागोंधळ. (७) मेजवान्याच काय पण उत्सव, उरुसात पन्नासच माणसाना अन्न घालण्याच्या परवानगीमुळे जनतेत पसरलेली विषण्णता. (८) "संपूर्ण लोकशाही राज्यशासन पद्धति स्थापून दक्षिणी संस्थानात संयुक्त राज्यघटना व्हावी" असा दक्षिणी संस्थान लोकसभेचा प्रयत्न. (९) स्वयंसंरक्षण वर्ग. (१०) धान्यसाठे कळविण्याचा साप्ताहिक कचाटा आणि त्यातून अज्ञान शेतकऱ्यावर उद्भवलेल्या कटकटी. (११) कूपर कारखान्यातील कामगारांची संघटणा आणि त्यामुळे यशस्वी संपानंतर कामगारांच्या लागलेल्या सगळया सोयी. ओगलेवाडीसही कामगार संघटना सुरू झाली. (१२) ठिकठिकाणच्या "कुलुपबंदीखान्यासंबंधी नि जिल्ह्याच्या मुख्य कारागृहासंबंधी राजबंद्यापासून सर्वामध्ये असंतोष, त्यामुळे कऱ्हाडचे

गोखले यांनी इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्सना लिहिलेले तक्रारपत्र व काही झालेल्या किरकोळ सुधारणा. (१३) जुलैपासून राजबंद्यांची भरीव संख्येने मुक्तता. (१४) कृष्णा कॅनाल बागाइतदाराना हळद ऊसाला पाणी द्यावयाचे बंद, पण आटोकाट तक्रारीनंतर पाणी मिळून वाचलेले लाखो रुपयांचे नुकसान. (१५) सावरकर सन्मान निधी. (१६) किर्लोस्कर कारखान्याची " बॉम्ब " प्रकरणातून न्यायमंदीरशुद्ध मुक्तता. (१७) भाई तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखालील जहाल लोकपक्षाचे सातारा अधिवेशन व त्या पत्राने काढलेली " गिऱ्हाइक सहकारी दुकाने. " (१८) मॅट्रिक परीक्षेत सातारा केन्द्राचा उच्चांक. (१९) जिल्ह्यातील भरीव रंगरूट भरतीबद्दल सरकार वीस गावे, ध्येयभूत ग्रामसुधारणेसाठी निवडणार आहे ती लोणंद भागातील साखळीसुत निवडावी व तेथे नीरा राइट बॅन्क कॅनॉलची एक शाखा आणून जिल्ह्याच्या सालोसालच्या अन्न तुटवड्याला थोडा आळा घालावा म्हणून गोखले यानी मुंबई सरकारचे वेधलेले लक्ष. (२०) दुष्काळग्रस्त बंगालला आपलेपणाने भरीव मदत व त्या कृत्रिम दुष्काळाचा संदेश घरोघर पोचविण्यासाठी पाळण्यात आलेले नवरात्र नि दीपावली सप्ताह. (२१) कऱ्हाड अर्बन बँकेचा रौप्य महोत्सव. (२२) सांगलीचा महाराष्ट्रीय व सातारा, कऱ्हाड, कोल्हापूर येथील स्थानिक पण सर्व संग्राहक नाट्यशताब्दि महोत्सव. (२३) अन्नधान्याबाबतच्या सरकारी हुकुमातील सातारा, कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्याच्या कलेक्टरानी केलेल्या हुकुमातील शेकडा सत्तर लोकांच्या जीवनाबद्दलची गोखले यानी उघडकीस आणलेली बेफिकीरी व सुचविलेले उपाय; त्या चालनेने जमीनदार संघापासून सर्वानी घेतलेला उठाव; सातारा येथे सर्व पक्षीय बैठक होऊन रयतेच्या दुःख–निवारणार्थ तयार झालेली " साठे समिति " व भाऊराव पाटील यांच्या बहुजन समाजातील जिव्हाळ्यामुळे सरकारी धोरणात झालेले लोकहितबुद्धीचे थोडे इष्ट फरक. (२४) युद्धोत्तर घटनेच्या योजना सर्वत्र चालु असता व त्यात हिंदुस्थानचे पारतंत्र्य कायम कसे राहील यावरच भर दिसत असता आगामी तह परिषदेत हिंदुस्थानच्या लोकांचेच निवडलेले प्रतिनिधि हिंदुस्थानचे भाग्य ठरविण्यास बसावेत म्हणून खेड्यापाड्यातून या हक्काची मागणी व्हावी तशीच मागणी नाताळातील परिषदानी करावी अशी गोखले व फणसळकर यानी केलेली प्रकट आणि अत्यल्प यशाची विनंति.

१९४४ (१) सरपणाच्या भावनियंत्रणाचा सरकारी गाजावाजा नि ओंफस. (२) पगारवाढीसाठी प्राथमिक शिक्षकांच्या तालुकावार सभा. (३) कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचे मृत्युबद्दल शोकसभा. (४) भडकमकर आयुर्वेद

संशोधनमंदिराची संस्थापना. (५) अन्नपरिस्थितीची कऱ्हाडचे गोखले यानी केलेली विचक्षणा. (६) अखिल म० शारीरिक शिक्षण मंडळाचे सामने. (७) काँग्रेस कार्यकर्त्यावर अत्याचाराबाबत सरकारी खटल्याचे सत्र पण त्यांची निर्दोषी म्हणून सुटका. (८) दुय्यम शिक्षकांच्या महागाई भत्त्यासाठी हायस्कुलातील फीवाढ व त्या अनुरोधाने टिळक हायस्कुलात संचालक मंडळात शिक्षकाना सन्मानस्थान, तर महाराष्ट्र हायस्कुलच्या अधिकाऱ्यानी त्याबाबत भिजत ठेवलेले घोंगडे. (९) श्री. गोविंदराव आठल्ये वकील यांच्या शिष्य–चहात्याकडून गौरव. (१०) सातारा, कऱ्हाड, वाई, पाचगणी, महाबळेश्वर, इस्लामपूर, येथे "रासन" पद्धतीचा अंमल. (११) अलंकारकर्ते पाटील, गोविंदराव आठल्ये, आनंदीरमण हर्षे, पेडकर वकील, डॉ. दाबके, रंगाचार्य रड्डी यांची निधने. (१२) खराब धान्य विक्रीबद्दल रासन दुकानदार गुजर मंडळीवर मुकदमा. (१३) श्री. वासुदेव गणेश चिरमुले यांचा ८१ वा वाढदिवस व श्री. खाडिलकर यानी लिहिलेले चरित्र प्रकाशन. (१४) पंढरपूरच्या यात्राबंदीबद्दल हिंदुमहासभाकडून सरकारचा निषेध. (१५) कागद नियंत्रण कायद्यामुळे वृत्तपत्रांचे वामन अवतार. (१६) सातारा जिल्हा उपहारगृह मालक परिषद. (१७) कस्तुरबा गांधी स्मारकनिधि पस्तीस हजार रुपये जमा. (१८) श्री समर्थ, लो. टिळक, स्वा. वीर सावरकर यांच्या राजकारण समन्वयावरील निबंधाची चढाओढ. (१९) सैन्य भरती सप्ताह. (२०) लेव्ही स्कीमची धास्ती. (२१) सामाजिक अभ्यासाच्या प्रतिकारार्थ खेडोपाडीचा धाकदपटशा. (२२) वि, स. खांडेकर यांचे न्यू इं. स्कूलमध्ये व्याख्यान "मराठी साहित्याचे शत्रू". (२३) युद्धोत्तर पुनर्घटना संचालन. (२४) गीताजयंती. (२५) सत्यार्थ प्रकाशन बंदीबाबत सिंध सरकार निषेध. (२६) गु० दत्तोपंत परांजपे पन्नासावे वर्षी गौरव व शाळेत छायाचित्र अनावरण. (२७) विलिंग्डन कॉलेजचा रौप्य महोत्सव. (२८) सातारारोड, ओगलेवाडी व किर्लोस्करवाडी येथे मजूर संघटना. (२९) जिल्ह्याच्या पूर्वभागात प्लेग व त्याचा सार्वत्रिक प्रसार आणि त्याच्या प्रतिबंधनार्थ धडपड. (३०) 'रासन' व वाटप दुकाने होऊनहि रयतेच्या पोटाचे हाल व कोर्ट कचेऱ्यातून कज्ज्याची संख्या कमी.

१९४५ (१) लेव्ही धान्य वसूलीबद्दल तक्रारी. (२) ग्रामसेवक गोविंदराव सुरलीकर यांचा मृत्यु. (३) सातारा येथे महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेची बैठक. (४) थंडीच्या कडाक्याने कोरेगाव प्रभृति तालुक्यातील पिके गेली. (५) प्लेगने प्रारंभापासून धुमाकूळ घातला. (६) महाराष्ट्र हायस्कूल कराड मधील शिक्षकांचा संप व शिवाजी विद्यालयाची स्थापना.

(७) कापील येथील सातारा जिल्हा विद्यार्थी परिषद. (८) साताऱ्याचे नंदनवन करण्याची सरकारी योजना प्रसिद्ध, पण जिल्हा लोकलबोर्डाची औद्योगिक पुनर्रचनासमिति आणि सूचनासह सहकार. (९) महात्मा गांधीच्या आन्दोलकावर खटले आणि स्थानबद्धता की जणु साताऱ्यात ब्रिटिश सरकारचे राज्यच नाही अशा समजुतीने स्त्रियावरहि अत्याचार करणारे पोलीस राज्य की ज्यायोगे दे. देव–गाडगीळ आणि महाराष्ट्रीय वृत्तपत्रसमितीनी चौकशी केली आणि आंदोलकांची नैतिक मूल्ये जग जाहीर केली. त्या बाबत सरकारी खुलासे. (१०) कै. आगरकरांची ५० वी पुण्यतिथि व गोखले यांच्या " आगरकरांशी ओळख " या ग्रंथाचे प्रकाशन. (११) गजेन्द्रगडकरांच्या " हिंदु कायद्यात स्त्रियांचे स्थान " चा गौरव. (१२) किसनलाल प्रेमराज धार्मिक शैक्षणिक निधी. (१३) दे. देवांचा दौरा, सन्मान व ग्रामोद्योग दुकानाचे उद्‌घाटन. (१४) सेवादले बंद. (१५) आत्मारामपंत ओगले पॅरिसला हिंदी कारखानदारांचे सल्लागार. (१६) मध्यवर्ति असेम्ब्लीत काँग्रेसचे दे. हिरे–गाडगीळ निवडून आले त्यानिमित्त त्यांचे दौरे. (१७) पुसेगाव काँग्रेस युवक परिषद. (१८) इसलामपूर येथील सातारा जिल्हा शेतकरी परिषद. (१९) मुंबई इलाखा शिक्षक परिषदेचे कराड येथील जादा अधिवेशन आणि त्यांच्या सार्वत्रिक संपाच्या निर्णयास सर्व पक्षीय पाठिंबा. (२०) रुपयास दोन पैसे बसणाऱ्या नवीन विक्रीकराचा निषेध. (२१) काँग्रेसच्या हीरकमहोत्सवाचा नांदी समारंभ. (२२) लष्करी वापरासाठी खंडाळा पेटचातील उठवलेल्या गावांची खेड येथील परिषद. (२३) श्री. परचुरेशास्त्री व इस्लामपूरचे डॉ. भाऊराव वैद्य यांचे मृत्यु.

१९४६ (१) क्षत्रिय रामोशी परिषद. (२) साने गुरुजींचा दौरा. (३) विधि–मंडळाच्या नव्या निवडणूकी. (४) लंडन लायब्ररीत 'आगरकरांशी ओळख' सरकारने खरेदी करून ठेवले. (५) सदाशिवराव पेंढारकर या भूमिगताचा १२ एप्रिल रोजी मृत्यू. (६) प्रतिसरकार स्थापणारांची वॉरंटे रद्द. (७) आझादवीरांचा ता. ५ मे रोजी कोणेगावास मेळावा व ठिक–ठिकाणी सत्कार. (८) गृहमंत्री देसाईंचा दौरा. (९) द्रवीड हायस्कूल हीरक महोत्सव. (१०) आण्णा सहस्रबुद्धे यांचा मृत्यु. (११) सोमण ७१ वा वाढदिवस. (१२) आमदार चंद्रोजीराव पाटलांचा खून.

१९४७ (१) हिंदुस्थान सरकारतर्फे मलाया ब्रह्मदेश वगैरे पौर्वात्य देशात पहाणी–साठी जाणाऱ्या कारखानदार शिष्टमंडळात शंकरराव किर्लोस्कर यांचा समावेश. (२) सातारा येथे इलाखा प्राथमिक शिक्षक संघाची बैठक. (३) पंतप्रधान खेर यांचा दौरा. (४) सातारा येथे प्रांतिक सेवादलाचा

वासुदेव शिराळकर

अपूर्व मेळावा. (५) प्रतोदकार मुंडले ७ फेब्रुवारी रोजी कैलासवासी. (६) टिळक हायस्कूलचा रौप्य-महोत्सव. (७) साने गुरुजींचा दौरा. (८) पहिला स्वातंत्र्यदिन अपूर्व उत्साहाने साजरा. (९) सोमण विधानपरिषदेचे अध्यक्ष, (१०) आमदार के. डी. पाटील यांचा खून. (११) साथी जयप्रकाश नारायण यांचा दौरा. (१२) सातारा कन्याशाळेचा रौप्य-महोत्सव. (१३) सातारा जिल्हा विणकर परिषद. (१४) कस्तुरबा स्मारक फंड.

१९४८ (१) मराठी पत्रकार परिषदेची सर्व तयारी फुकट गेली. (२) राष्ट्राध्यक्ष राजेंद्र बाबूंचा दौरा. (३) ना. काकासाहेब गाडगीळांची हेळवाक भेट व सातारा येथे व्याख्यान. (४) डेक्कन रिलीफ फंड. (५) महात्मागांधींचा रक्षा-विसर्जन-दिन. (६) गृहमंत्र्यांचा दौरा. (७) रामखंडा (परळी) शेतकरी परिषद. (८) गांधी स्मारक निधी. (९) नाना पाटील काँग्रेस-मधून बाहेर पडले. (१०) काँग्रेस चिटणीस देव यांचा दौरा. (११) शेतकरी परिषदा. (१२) ना. वर्तक यांचा दौरा. (१३) ऑलिंपिक सामन्यात खाशाबा जाधव. (१४) भाऊसाहेब हिरे दौरा. (१५) कोयना-व्हॅली परिषद. (१६) भाऊराव पाटलांच्या शिक्षण सेवेचा गौरव.

१९४९ (१) दक्षिण व उत्तर साताऱ्याची निर्मिति. (२) डॉ. मो. ना. आगाशे यांच्या लोकसेवेचा गौरव. (३) साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आचार्य जावडेकरांचा सत्कार. (४) महाबळेश्वर येथे महाराष्ट्र कार्यकर्त्यांचे शिबिर. (५) ना. वर्तक दौरा. (६) धान्य व बाजार नियंत्रण व त्याचे परिणाम. (७) हिंदचे सरसेनापति करीआप्पा यांची साताऱ्यास भेट. (८) सातारा न्यू इंग्लीश स्कूलचा सुवर्ण-महोत्सव. (९) सातारा जिल्हा सेंट्रल को. ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना.

१९५० (१) शुभसूचक कर्ते द. रा. चितळे यांचा ८५ वे वर्षी मृत्यु. (२) बंगाल्यांच्या वास्तुहाराला मदत. (३) समर्थ-भक्त देवांची व्याख्याने. (४) तात्यासाहेब जोशी सत्कार. (५) ना. वैकुंठलाल मेहता यांचे अध्यक्षतेखाली चिरमुले सत्कार. (६) मुंबई साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राजकवि यशवंत. (७) शाहू छत्रपतींचा कैलासवास. (८) टिळक पुण्यतिथी-निमित्त गंगाधरराव देशपांडे यांची साताऱ्यास भेट. (९) डॉ. आठल्ये यांच्यासाठी समारंभ. (१०) गणेश हरी खरे यांचे थोरले शाहू स्मारक योजनेबद्दल भाषण. (११) आसाम रिलीफ फंड.

१९५१ (१) ९ एप्रिल पांडुआण्णा शिराळकर मृत्यू. (२) सोमनाथ प्रतिष्ठापनेस (११ मे) नारायणशास्त्री मराठे, केवलानंद, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, श्रौताचार्य बापट वगैरे. (३) ग्रामपंचायत सेक्रेटरी वर्गाचे उद्घाटन सोमण यांचे हस्ते.

(४) विमामहर्षिंचा कैलासवास. (५) पातंजल–योग–दर्शनकार बाबा कोल्हटकर यांचा सत्कार. (६) निवडणुकीचा पडघम वाजू लागला.

१९५२ (१) (जानेवारी १४–१५) निवडणुकींचे निकाल, लोकसभेत अळतेकर, जिल्ह्याच्या अकरा जागापैकी आठ काँग्रेसला. (२) डॉ. आगाशे रुग्णालय सुरू. (३) कोयना परिषद–हिरे अध्यक्ष. (४) अमळनेर साहित्य परिषदचे अध्यक्ष कृ. पां. कुलकर्णी. (५) जलमंदिराची चोरी.

१९५३ (१) सज्जनगड दुरुस्ती; समर्थ सेवा मंडळ. (२) महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेचे ४ थे अधिवेशन. (३) वाईचे कुशाभाऊ अभ्यंकर वारले. (४) डॉ. शामाप्रसाद मुकर्जी दुःखवटा. (५) जलमंदिर खटला २३ जुलैपासून सुरू. (६) जलमंदिर खटल्यातील आरोपींची ता. ११ ऑगस्ट रोजी निर्दोषी म्हणून सुटका. (७) सातारा जिल्ह्यात विकास योजनांची व भारत सेवक समाजाची कामे सुरू. (८) कवि बुधकरांचा सत्कार. (९) वेस्टर्न इंडिया पुणे इमारतीचे २७–१०–५३ ला उद्घाटन. (१०) उत्तर सातारा जिल्हा ग्रामपंचायत सेक्रेटरी परिषद.

१९५४ (१) सातारा–नगरपालिका–शताब्दी महोत्सव. (२) आप्पासाहेब पटवर्धन भूदान दौरा. (३) कोयना धरणाचे भूमिपूजन. (४) गोखले यांचा गौरव. (५) आण्णासाहेब कल्याणी यांचा कैलासवास. (६) श्रमदान यज्ञ. (७) स्वामी केवलानंदांचा कऱ्हाड येथे सत्कार. (८) सहकार सुवर्ण महोत्सव. (९) सातारा न्यू इंग्लीश स्कूलचे माजी विद्यार्थी मंदिर. (१०) संपूर्ण विनियंत्रणाने अन्नमंत्रि चव्हाण 'यशवंत' झाले. (११) दत्तोपंत परांजपे मास्तरांचा गौरव. (१२) तर्कतीर्थांचा गौरव. (१३) कराड येथे पहेलवान परिषद. (१४) भाऊसाहेब हिरे दौरा. (१५) पाचगणी येथे मुंबई राज्य मुख्याध्यापक परिषद.

१९५५ (१) वाई येथे सहकार व बँकींग प्रदर्शन. (२) कराड येथे सराफ परिषद. (३) भाऊसाहेब सोमणांचा मृत्यु.

---

# [ परिशिष्ट ३ ]

## जलमंदिर चोरीप्रकरण

सातारा शहरात छत्रपती भोसले राजे यांच्या मालकीचे जलमंदिर नावाचे एक खाजगी राहण्याचे ठिकाण आहे. त्या ठिकाणाचे आवारात श्रीशिवछत्रपती घराण्याच्या भवानीदेवीचे देवालय १८७४ सालापासून आहे. ता. २३ जुलै १९५२ चे काळोख्या रात्री पाऊस पडत असताना फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे छत्रपतींच्या जलमंदिराचे पश्चिम बाजूचे सुमारे दहा फूट उंचीच्या कुसुवावरून चोरट्यानी देवालयाचे पाठीमागे आत उतरून देवालयाच्या खिडकीचे गज उपसले व तावदानाची दारे फोडून देवालयात प्रवेश केला. देवालयाचे गाभाऱ्यातील ४३५ भाराच्या महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती अशा सोन्याच्या तिन्ही मूर्ती, इतर सोन्याचे टाक, छत्रचामरे वगैरे व चांदीची भांडी आणि उपकरणे रात्री ११ ते १२ चे दरम्यान चोरट्यानी लांबवली ! ! अंदाजे ५७६६९ रुपयांची चोरी झाली. या देवालयात ७५ वर्षे वयाचे दोन म्हातारे पहारेकरी देवालयाचे पूर्व अंगास मंडपात झोपले होते. उजाडल्यावर सदर पहारेकऱ्यानी सदर चोरीचा बोभाटा केला. त्यामुळे बातमी ताबडतोब पसरली व पोलिसानी देवालयात येऊन जागेचा पंचनामा केला आणि चोरीस गेलेल्या मालाची यादी घेतली. त्यानंतर साहजिकच पोलिस–तपासास सुरवात झाली.

छत्रपतींच्या देवांची चोरी ही गोष्ट कोणाही सातारकरास, महाराष्ट्रियास अगर सज्जनास खपणारी नव्हती. म्हणून ती सापडलीच पाहिजे आणि गुन्हेगाराना शासन झाल्याशिवाय राहताच कामा नये, असा सगळ्यांच्या मनाचा रोख होणे साहजिकच होते. ता. २८ जुलै १९५२ रोजी मध्यरात्रीस माची पेठेच्या रंगमहालाजवळील ७।८ महार पोलिसठाण्यावर नेले आणि ता. ३० जुलै रोजी सकाळी शनिवार पेठेतील बापूसाहेब आपटे, नीलकंठराव भावे, पुरुषोत्तम कुलकर्णी, काशिनाथ जोशी याना नेण्यात आले. त्याचदिवशी त्यांच्या घराच्या झडत्याही झाल्या. महार मंडळीपैकी आबा व सोपाना अडसूळ, जगन्नाथ गाडे, काशिनाथ साळवे याना ठेवून घेऊन बाकीच्याना सोडून देण्यात आले.

आरोपींच्या नातेवाईकाना पोलिसठाण्यावरही आरोपीना भेटण्याची बंदी झाली; ता. ३१ जुलै रोजी रात्रौ १० वाजता कागदात प्रत्यक्ष अटक दाखवण्यात आली; ता. ३ ऑगष्टपर्यंत ते आरोपींच्या नातलगाना कळलेही नाही; आरोपी आपटे यांचेतर्फे हायकोर्टात हेबिअस कॉर्पसखाली ता. ४ ऑगष्ट रोजी दाद मागण्यात आली; आपटे, भावे या आरोपींचे वकील मनोहरपंत भागवत व बापूराव सोमण हे आरोपीना पोलिस–तपासाचे मुदतीत न्याय्य व कायदेशीर असे संरक्षण

मिळावे एवढाच प्रयत्न करीत होते. परंतु त्या वेळचे डी. एस्. पी. लुईस व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट पांडुरंगराव पाटील याना तेवढीही खटपट बोचत होती, असे दिसते; कारण ती विफल करण्याचे त्या अधिकाऱ्याचे प्रयत्न असल्याचे कायदेशीर दृष्टीच्या माणसाना दिसत होते; हायकोर्टातील हेबिअस कॉर्पसचे कामी डी. एस्. पी. नी दाखल केलेला स्वताचा प्रतिज्ञालेख हा काही प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टीबाबत मनोहरपंत भागवतांचा प्रतिज्ञालेख खोटा पाडणारा देण्यात आला होता; तेव्हा भागवतांच्या म्हणण्यास दुजोरा देण्यासाठी न. गं. तथा नानासाहेब जोशी याना आपला प्रतिज्ञालेख देण्याचा प्रसंग आला; तरी शेवटी आरोपीना फौजदारी कायद्याखाली अटक केली असल्यामुळे हेबिअस कॉर्पसचा अर्ज हायकोर्टानें नामंजूर केला; परंतु तसे करताना ता. ३० व ३१ जुलै रोजी रात्रीपर्यंत आरोपीना पोलिसानी अन्यायाने अटकेत ठेवल्याबद्दल केलेल्या तक्रारीचा निर्णय योग्य कोर्टात दाद मागून आरोपीनी करून घ्यावा असे सुचविले; पुढे १,७ व १४ ऑगष्ट रोजी सिटी–मॅजिस्ट्रेट चौधरी यांचे पुढे रात्रीअपरात्री आरोपीना हजर करण्यात आले; आठही आरोपीनी सिटी–मॅजिस्ट्रेटपुढे ता. १४ व १६ ऑगष्ट रोजी जामिनाची दाद मागितली; ती ता. २३ ऑगष्ट रोजी नाकारण्यात आली; त्या निकालाविरुद्ध ता. २५ व २६ ऑगष्ट रोजी सातारा सेशन्सजज्ज घासकडबी यांचे कोर्टात तपासणी अर्ज दाखल करण्यात आले; तक्रारी ऐकण्याचा दिवस ता. २९ ऑगष्ट होता; दरम्यान १४ ऑगष्टनंतर सिटी–मॅजिस्ट्रेटसमोर आरोपीना हजर राहण्याची तारीख २८ ऑगष्ट नेमण्यात आली होती, तरी त्या दिवशी आरोपी कोर्टात हजर नसताना पोलिसांच्या रिपोर्टाचा आधार घेऊन सिटी–मॅजिस्ट्रेट यानी आपटे–भावे यांच्याशिवाय सहाजणाना ( त्यांच्यापैकी चौघांचे कबूलीजबाब घेतले गेले होते तरी ) जामिनावर सोडण्याचा हुकूम केला; आपटे व भावे यांचेतर्फे कोणीही तक्रार केली नव्हती तरी 'आरोपींचे म्हणणे ऐकून' असा शेरा मारून त्याना जामीनावर सोडण्याचे नाकारले; तो निकाल ता. २९ रोजी सेशन्स जज्ज घास–कडबी यांचेकडे पाठविण्यात आला; आरोपींचे वकील व सरकारी वकील यांच्या तक्रारी ऐकून घेऊन व सिटी–मॅजिस्ट्रेटकडून ऐत्यावेळी आलेले निकालपत्राची दखलगिरी घेऊन ता. ३० ऑगष्ट रोजी सेशन्स जज्जानी आपटे–भावे यानाही जामिनावर सोडण्याचा हुकूम दिला व तो देताना सिटी–मॅजिस्ट्रेट यांच्यावर सडेतोड शब्दानी टीका केली; तरी सुमारे एक महिन्याने आपटे–भावे याना दिलेले जामीन रद्द करून अटक करावी अशी मागणी सेशन्स कोर्टातच पोलिसानी केली, तिच्या विरुद्धच सेशन्स कोर्टाचा निकाल झाला; अशा प्रकारे जलमंदिर चोरीप्रकरणाचा तपास चालू असता एकाएकी २२ आक्टोबर रोजी लिंबचे खिंडीचे पश्चिम अंगाचे डोंगरावर दोन दगडांचे खाली असलेल्या एका खबदडीत लपवून ठेवलेली सुमारे दोन हजार रुपये किंमतीची चांदीची भांडी व उपकरणी पोलिसाना उपलब्ध झाली.

ता. ३ जानेवारी १९५३ रोजी खटल्यांतील फायनल चार्जशीट पोलिसाकडून गुदरण्यात आला.

मध्यंतरी ता. १६ ऑगष्ट १९५२ रोजी मनोहरपंत भागवत व बापूराव सोमण हे आरोपींचे वकील आणि काही आप्त, आरोपीना भेटावयास गेले असता त्यांच्याजवळ आरोपीना पोलिसानी केलेल्या मारहाणीबद्दलची तक्रार भागवत वकील व भावे यांचे आप्त डॉ. भाऊराव आगाशे यानी सिटी–मॅजिस्ट्रेटकडे केली; डॉ. आगाशे यानी डि. मॅजिस्ट्रेट सातारा यांचेकडे तारेनेही तक्रार केली. त्या–वरून डि. मॅ. नी हायकोर्ट सर्क्युलरचे आधारे आपले पर्सनल असिस्टंट दशरथ याना तपास करणेचा हुकूम केला; आपटे, भावे यांची सिव्हिल हॉस्पिटलमध्ये सब–चार्ज बाबरे यांचेकडून तपासणी करण्यात आली; ता.२० ऑगष्ट रोजी सिव्हिल सर्जन नाडकर्णी यानीही मारहाणीबद्दल तपासणी केली व प्रकृतीच्या स्थितिबद्दल आणि दिसलेल्या खाणाखुणाबद्दल सर्टिफिकिटे दिली; डि. मॅ.चे पर्सनल असिस्टंट यानी २५ ऑगष्ट रोजी आपले चौकशीस आरंभ केला. ता. १६ ऑगष्ट रोजी इन्डोअर पेशंट झालेले आपटे यांचा जबाब सिव्हिल हॉस्पिटलमध्ये घेतला; भावे यांचे पायास झालेल्या दुखापतीबद्दल ता. २२ ऑगष्ट रोजी सिव्हिल सर्जन यानी भाव्याना वाई हॉस्पिटलमध्ये नेऊन 'क्ष' किरणांचा फोटो घेतला होता व ता. २३ रोजी त्यांचा पाय प्लॅस्टरमध्ये घातल्यामुळे भावे सातारा तुरुंगातच होते, त्यांचा जबाब डि. मॅ. च्या पर्सनल असिस्टंटानी ता. २५ ऑगष्ट रोजीच तुरुंगात घेतला; दोनही जबाब आरोपींचे नातलग वा वकील कोणीही हजर नसताना एकतर्फीच घेतले होते; पोलीस अंमलदारांचे, सरकारी डॉक्टरांचे व इतर अधि–काऱ्यांचे जबाब घेऊन डि. मॅ. चे पर्सनल असिस्टंट यानी आपला रिपोर्ट ता. ९ सप्टेंबर १९५२ रोजी केला व पुढील व्यवस्थेसाठी सिटी–मॅजिस्ट्रेटकडे पाठवून दिला; याच रिपोर्टाचे आधारे मुंबई सरकारने ता. २० सप्टेंबर रोजी एक प्रेसनोट काढून आरोपींच्या पोलीस–छळाची तक्रार खोटी असल्याचे जाहीर केले; सदर प्रेसनोट प्रसिद्ध झाल्यावर मुंबई कौन्सिलचे सदस्य रामभाऊ मंडलीक व लोकसभेचे सदस्य गणपतराव अळतेकर यानी आरोपींच्या गाठी घेतल्या; मंडलीक यानी आपले सहीने ५ ऑक्टोबर १९५२ रोजी 'केसरी' पत्रात आपले तपासाची हकिकत प्रसिद्ध केली; अळतेकर यानी जिल्ह्याचे अधिकारी व मुंबई सरकारचे मुख्यमंत्री यांचेकडे आपले तपासाची हकीकत पाठविली.

ता. ३ जानेवारी १९५३ रोजी खटल्याचा फायनल चार्जशीट पोलिसानी गुदरल्यानंतर मुंबई सरकारने रामभाऊ मंडलीक व केसरीकार जयंतराव टिळक यांचेविरुद्ध कोर्टाचा अवमान केल्याबद्दल "कन्टेंप्ट ऑफ दि कोर्ट" या कायद्याखाली त्याना शासन करण्याबद्दल हायकोर्टाकडे अर्ज सादर केला; सेशन्सजज्जानी सिटी–मॅजिस्ट्रेट यांच्या वर्तनाबद्दल ता. ३० ऑगष्ट १९५२ च्या आपल्या निकालपत्रात

जी टीका केली होती ती त्या निकालपत्रातून काढून टाकणेत यावी, असाही एक अर्ज सरकारतर्फे करण्यात आला; फायनल चार्जशीटप्रमाणे सिटी–मॅजिस्ट्रेट–पुढे खटला चालणार तो सातारा येथील ॲडिशनल–स्टॅपेंडरी–मॅजिस्ट्रेट यांचेकडे चालवावा असा अर्ज डि. मॅ.कडे आरोपीनी दिला असता, तो डि. मॅ. नी आपले पर्सनल असिस्टंटकडेच पाठविला व त्याची तारीख नेमण्यात आल्यावर जलमंदिर चोरीचा खटला पुणे, उत्तर व दक्षिण सातारा आणि कोल्हापूर या चार जिल्ह्याचे बाहेर वर्ग करावा अशी मागणी हायकोर्टाकडे मुंबई सरकारने केली; " कंटॅम्प्ट ऑफ दि कोर्ट "च्या केसमध्ये मंडलिक व केसरीकार याना प्रत्येकी दोनशे रुपये दंडाची शिक्षा करण्यात आली, परंतु सरकारने प्रसिद्ध केलेल्या प्रेसनोटनेही कटेम्प्टच्या कायद्याचा भंग केलाच आहे असे सुचवून मंडलिक यांच्या प्रामाणिक–पणाबद्दल व सद्धेतुबद्दल मुक्त कंठाने हायकोर्टाचे मुख्य न्यायाधिश छगला यानी निर्वाळा दिला; दुसऱ्या दोन्ही अर्जांचा निकाल हायकोर्टाने सरकार विरुद्ध दिला.

" It is a matter for regret that the state should have come before us, asking us to interfere with Criminal Procedure. We are sure that the state has not realized the implications. The state which took objection to remarks in the order of the Sessions Judge, does not choose to come in revision against the order of the Sessions Judge. It accepts it as correct. It might be said that the language used was strong. That, however, was no ground for making an application for expunging the remarks "

असा शेरा सेशन्सजज्जांच्या निकालपत्रातील शेऱ्यातील सि. मॅ. चेवरील टीकेतील विधाने काढून टाकण्याबद्दच्या सरकारच्या अर्जाबद्दल हायकोर्टाने म्हणजे न्यायमूर्ती छगला व न्या. दीक्षित यानी मारला; त्याचप्रमाणे, सातारा सेशन्स जज्जानी आपल्या हाताखालील योग्य मॅजिस्ट्रेटकडे मूळ खटल्याची सुनावणी सोपवावी असे हायकोर्टाने फर्माविले. सरकारची प्रेसनोट प्रसिद्ध झाल्यावर खरी परिस्थिति प्रकाशात आणणे हे आपले सार्वजनिक कर्तव्य आहे असे न. गं. तथा नानासाहेब जोशी याना वाटून त्यानी सर्व बेबंदशाही प्रकारावर ३ आक्टोबर १९५२ पासून केसरीतून एक लेखमाला लिहून खरमरित टीका केली. तिचे समर्थनच सरकारी अर्जाबाबत हायकोर्टाने ता. २९ जून १९५३ दिलेल्या निकालाने झाले.

हायकोर्टाने फर्माविल्याप्रमाणे त्यावेळची साताऱ्या सेशन्सजज्ज वझे आणि त्यांचे जागी आलेल्या के. जी. देसायांच्या बदलीमुळे रेसिडेन्ट मॅजिस्ट्रेट आठल्ये यांचेकडे मूळ खटल्याचे काम सोपविले. चोरी झाल्यापासून बरोबर एक वर्षाने म्हणजे ता. २३ जुलै १९५३ रोजी खटल्यास सुरवात झाली. आरोपीतर्फे शंकरराव

साठे, बापुराव सोमण, मनोहरपंत भागवत, गोपाळराव पालकर, बाळासाहेब गोखले, वसंतराव अभ्यंकर आदि वकिलानी काम चालविले. या खटल्यात काशिनाथ मालोजी साळवे हा माफीचा साक्षिदार होता. फिर्यादीतर्फेचे वीस साक्षिदार तपासण्यात आले. मॅजिस्ट्रेटनी निकाल देताना स्पष्टच म्हटले की " फिर्यादी भा. द. कारखानीस कारभारी यानी १९२६ सालच्या ट्रस्टडीडच्या सहीशिक्क्याची नक्कल दाखल केली, पण त्यात मूर्तींच्या वजनाचा उल्लेख नाही. पुजारी दीक्षितशास्त्री यांची साक्षच घेण्यात आली नाही. ज्या खिडकीतून हात घालून आरोपीनी पाच–सहा लोखंडी गज पहारीने वाकविले असे म्हणतात ती खिडकी पुराव्याच्या दृष्टीने महत्वाची होती. ती कोर्टापुढे न आणता आतली काचेची दारे तीन भागात कापून आणली आहेत. गुन्ह्याच्या जागी मिळालेले पायांचे व हातांचे ठसे तज्ञाकडे पाठविले असे साळवी फौजदार म्हणतात पण ते रेकॉर्डवर आणले नाहीत. माफीच्या साक्षीदाराने दिलेली माहिती तपासून पाहिल्याचा उल्लेख कोठेही नाही. फौजदार साळवींच्या साक्षीतील पुरावा संशयातीत नाही. या खटल्यातील मुख्य आधाराच्या गोष्टी सिद्ध करण्यातच फिर्यादी पक्षाला अपयश आले आहे. कुलकर्णी, जोशी व अडसूळ यांचे कबुलीजबाब ते पुरेसा वेळ पोलिसांच्या ताब्यात असल्यानंतर घेण्यात आले हे स्पष्ट आहे. पोलिसांच्या अमानुष छळाचा आरोप करून ते कबुलीजबाब त्यानी मागे घेतले आहेत. कोर्टापुढील पुरावा आरोपींचा गुन्ह्याशी मुळीच संबंध जोडू शकत नाही. म्हणून या खटल्यातील सर्व आरोपीना मुक्त केल्याशिवाय कोर्टाला दुसरा मार्ग नाही. " हा निकाल ता. ११ ऑगष्ट १९५३ रोजी झाला.

# परिशिष्ट ४

## पाटणा हायकोर्टाचे माजी न्या. भाऊसाहेब ढवळे पुणे, यानी मुंबई सरकारला सादर केलेल्या नोटमधील जलमंदिर प्रकरणातील उतारे.

### POLICE EXCESSES

(68) The transfer order of the A. D. M. which will be dealt with in Part II and his Magisterial investigation show that the City Magistrate was not alone in playing into the hands of the police in a case in which 1. the eight accused were illegally detained (or as the D. S. P. put it, "kept under surveillance for the purpose of interrogation"); 2. at least two of them were denied the use of food sent from home (contrary to Government orders, of Rule 660 of the Jail Manual); 3. the police chose their own Magistrate, contrary to the order of distribution of Magisterial work, for the sake of secrecy and for orther reasons also; 4. all the accused were repeatedly denied sleep if only by taking them to a Magistrate out of the normal course, unnecessalriy, at such hours as 9-30 or 10 p. m. and 1-30 a. m.; 5. all access was denied to friends for 8 or 10 days and to lawyers under the conditions of Section 40 of the Prisons Act and Rule 665 of the Jail Manual; 6. all relatives and lawyers were deliberately kept in the dark in spite of repeated inquiries regarding before which Magistrate and when the accused were produced; 7. all the accused were subjected to persistent questioning (until three of them at least made confessions which were afterwards retracted); 8. there was medical neglect at least in the matter of Bhave's fracture and of the injuries caused to Apte while he was in police custody.

### AND GOOD NAME OF GOVERNMENT

(69) The D. S. P. spoke of the R. S. S. and Mahasabha elements having at their disposal the best legal brains and doing their utmost from the outset, in their press propaganda, legal actions such as Habeas Corpus and bail applications and other means, to frustrate the police investigation which was thus severely handicapped and to damn the present Government. One would have thought that the A. D. M. at least would put police investigations in the right perspective. The powers of the police are limited by law-and limited in the interests of Civil Liberty and personal security. Instead

of complaining of the lawyers and the Habeas Corpus and even bail applications, the D. S. P. should have conducted his investigation without driving the parties to these remedies as provided by the law. Third degree methods of treatment of people in custody are not permitted by law even in order to obtain confessions or, as the City Magistrate with unintended euphemism put it at 1-30 a. m. on the 7th August, " to recover the property and to complete the investigation" ( paras. 34 and 35 ). Attempts to keep the police within the bounds of law or to assert the rights given to individuals by law cannot be regarded as attempts to damn the Government, and it is surely the duty of the Magistrates concerned to keep the police in order and by a proper administration of law and justice to help to keep up the good name of Government. It will be shown in Part II how the A. D. M.-besides City Magistrate only helped the other way.

(138) In the Brief Note it was the record of the A. D. M.'s Magisterial investigation that was examined; but it was stated in para. 13 that the case presented so grave a combination of actions proceeding from Magistrates, police officers, doctors and jailors and relating to the application of third degree methods, as to cause real concern to citizens concerned in the maintenance of Civil Liberties and the due administration of Law and Order. In Part I of this Note, the doings of the police and the City Magistrate upto the 14th August have been discussed in detail, and no less than eight items of police excesses, which were largely rendered possible or facilitated by the actions of a Magistrate chosen by the police in violation of the District Magistrate's order of distribution of the magisterial cases, have been listed in para. 68. The injuries found on Apte and Bhave in the Civil Hospital must now be added to this list, not merely because of the faulty approach and the manifestly unsatisfactory conclusion of the A. D. M. but also because the remand of 1.30 a. m. on the 7th August could, as shown in para 34, have had no other meaning than the application of more effective methods of obtaining confessions than the police had yet tried. The Sub-Inspector's further investigation at the Jal-Mandir on the 13th produced from Bhave the chit to Shrimati Apte ( para. 47 ) and on Bhave, who had the fracture from before, either the healed injuries mentioned in his injury certificate of the 23rd ( his earlier case-papers are not available to us ) or the ecchymotic patch on the back sworn to by

Dr. Agashe as seen by him on the 16th. There is no reason to suppose that Apte with his R. S. S.'s position ( "leading member and Treasurer," according to the D. S. P.'s affidavit of the 16th August ) was treated any more tenderly by the Police at the Jal-Mandir investigation.

(139) The way in which the City Magistrate and the A. D. M. co-operated with the police at various stages was remarkable though the A. D. M'.s Magisterial investigation perhaps meant more whitewashing than co-operation. The Jail Doctor, who as M. O. Civil Hospital on duty on the night of the 6th was "convinced that there is no trace of any visible or non-visible injuries" on Apte, happens to give away not himself alone by reporting ( in substance ) that he saw Bhave on his jail visits of the 14th and the 20th and found no injury on him ( despite the fracture and the limb-see para. 131 ). Indications of co-operation of this kind between the police and other departments only come to light rarely and by accident, when the police hold men incommunicado. The D. S. P. who refused to allow professional interviews between Bhave and Apte and their lawyers except in the presence of "responsible Police officers" (see his answer to question 11) took upon himself ( by doing so ) the entire onus of showing that the injuries found on Bhave and Apte were none of them the doing of police; the failure of these men to mention the injuries or the torture to their families can be easily seen to be due to the presence of the police officers and the fear of other consequences including helpless anxiety to the families. The Brief Note concluded with the indication, afforded by the mention of the Jail Doctor's examination of Bhave and Apte on his Jail visit of the 14th August, that the police had access to the Jail in a manner that could not possibly be contemplated by the rules in force in a State like Bombay. This indication does not stand alone. The Jailor and the City-Magistrate-cum-Jail-Superintendent told the A. D. M.-as a matter of course-that no police officer was allowed to see the accused after their remand to magisterial custody. But there is reason to believe, even on the materials available to the parties, that the confessing prisoners-Joshi, Sopana & c.—were present at the Sub-Inspector's Jal-Mandir investigation of the 13th, and that on the 28th two, if not three, police-officers saw Joshi, Kulkarni and Sopana in the Jail in the forenoon ( see para. 124 )—assuming in favour of the City Magisirate that this was done without his knowledge.

(140) The District Magistrate could not have been entirely ignorant of what was happening, for the affidavits of the D. S. P. were sworn before him on the 9th and the 16th. and he also had Shrimati Apte's application of the 14th addressed to him as Collector. He must have had his own reasons for leaving things to his subordinates. But the officiating Deputy Collectors who were working as A. D. M. and City-Magistrate-cum-Jail-superintendent seem to have utterly failed to keep the police in order and see that the accused were treated in the humane manner laid down by the law and also, doubtless, by the rules of an advanced Government like Bombay, as shown by the available papers. The laying down of good rules, however, does not suffice to ensure good administration, for it is clearly necessary also to enforce the rules and see that they are observed, without tolerating the excuses so openly put forward by the D. S. P. in this case. That the D. S. P. should, with the ready co-operation of the City Magistrate, be in a position to drive Shrimati Apte to apply for a Habeas Corpus, was bad enough. We have seen the City Magistrate's progress in the path he adopted on the 6th and 7th, the A. D. M.'s helpless order of transfer to the City Magistrate on the 14th and the City Magistrate's further progress on the 14th, the 23rd and the 28th August, denying in one way or another the right of an accused person to be defended by a pleader and reducing to a nullity on all occasions but one the provision of Section 352 that the Criminal Court shall be an open Court to which the public generally-and it may safely be added, the pleaders of the accused in particular-may have access. The D. S. P. should have known that by driving Shrimati Apte to a Habeas Corpus he was himself "frustrating" or "impeding" the investigation which it was his duty to conduct in accordance with the law ( see Sections 17, 60, 163 &c. ); and when he spoke to the A. D. M. of the Habeas Corpus and bail applications as among the "means" not only "to frustrate the Police investigation" but also "damn the present Government," he ignored the existence of higher authorities who may-and we are sure will-take the view that nothing is more calculated to have this disastrous effect than police proceedings conducted in this spirit with the co-operation of Magistrates, and may accordingly insist on the unreserved observance of the law by the guardians of the public peace and the avoidance of third degree methods in all police investigations on any excuse whatsoever.

# चरित्राची सूचि


अणे (लोकनायक) माधव श्रीहरी (ऊर्फ बापूजी) ७१, ७४, ८५, १०२, १४४, १७०, १७१.

अबदुल मजीदखान ३५.

अबदुल रसीदखान ३४, ३५.

अभ्यंकर धोंडू बापू १३६.

अभ्यंकर विनायकराव १५२.

अभ्यंकर सखाराम बापू १५.

अय्यंगार श्रीनिवास ५५, १८८.

अरविंद (बाबू) योगेश्वर घोष १८, १९, १२५.

अष्टपुत्रे बंडोपंत ४५, ४६.

अष्टेकर नाना १६५, १९१.

अळतेकर आप्पासाहेब (सदाशिव खंडो) ३७, ४५, ५५.

अळतेकर (खासदार) गणेश सदाशिव (गणपतराव) ८६, १२९, १३२, १४३, १७८.

अंत्रोळीकर (डॉ.) १८९.

आगटे कृ. पां. ११.

आगटे ग. पां. १४.

आगटे रामचंद्र नारायण ३६.

आगरकर (गो. ग.) १९, ४१, १७६.

आगाशे नानासाहेब २५, २९, ४५, ४७, ७९, १३५, १३६, १६८, १७१, १७६.

आगाशे (डॉ.) मोरोपंत नारायणराव १७६, १८१.

आगाशे (डॉ.) वि. ल. (भाऊराव) १८१.

आठल्ये माधवराव ६०.

आठल्ये (डॉ.) वा. वि. ४७, ५६, ५७, ६१, ८९, १२५, १४१, १४३.

आठल्ये विष्णुपंत ३०.

आठल्ये (डॉ.) शरच्चंद्र १४०.

आठल्ये शंभुराव १८८, १९१.

आपटे ४७.

आपटे आण्णासाहेब १३५ ते १३७.

आपटे बापूसाहेब १३१ ते १३३.

आंबेडकर (डॉ.) भीमराव १२४.

आंबेडकर हरिभाऊ १५३.

उमाजी–नाईक (खोमणे) ४२.

उस्मान नथू ३४.

उस्मानशा ४६.

एकबोटे (दामुअण्णा) ५३, ६१.

अंगापूरकर बाबूराव ३३.

कडूसकर कृष्णराव ७९, १३५, १३६, १७१, १७२.

कत्ते नेमिनाथ अण्णा ८६.

कदम (बॅ.) एम्. बी. १४६.

करंदीकर तात्यासाहेब (ज. स.) १४१, १८८.

करंदीकर दादासाहेब (र. पां.) ११ ते १४, २१, २४, २५, २७ ते ३१, ३३, ३५ ते ३७, ३९, ४०, ४७, ६०, ६६, ६७, ७५, ८५, १२३, १३५, १३६, १३७, १४९, १५८, १६१, १६५, १६८, १७१, १७२, १७४, १७५, १८२, १८४, १८६, १८८, २०१.

करंदीकर (बॅ.) विठ्ठलराव ७९.
करंदीकर हुजूर १४९.
करिअप्पा (जनरल) १२३, १८१.
कर्वे (महर्षि) धोंडो केशव १३०.
कल्याणी (रा. सा.) अण्णासाहेब १३९.
कशाळकर (रामभाऊ) १५, २३.
कॅम्बेल ३४.
कानडे दिनकरशास्त्री १८२.
कानिटकर बाळूकाका १८८.
कारेकर भाऊराव २८.
काळे चिंतोपंत ८६.
काशीद धोंडीराम नारायण ८५ ते ८८.
काशीकर म. वि. ७६.
काशीकर ( लायब्रेरिअन् ) २५.
काजी ए. एम्. ८८, ८९.
काळे (रा. ब.) रावजी रामचंद्र २९, ४७, ६५, ६८, ९२, १३०, १३५ ते १३७, १३९, १७५, १७७.
किराणे गंगाधर रामकृष्ण ११.
किर्लोस्कर शंकरराव ७४.
किसन वीर १८०.
कुबेर गोविंदराव १९१.
कुलकर्णी गोविंदराव ११३.
कुलकर्णी पिलोबा ४५.
कुलकर्णी पुरुषोत्तम १३१.
कुलकर्णी रामचंद्र विनायक १५.
कुलकर्णी हरी मल्हारी २१, २२.
कूपर (ना.) धनजीशहा ६५, ६८, ७४.
कृपलानी (आचार्य) १८९.
केतकर ग. वि. ७२.
केवलानंद (स्वामी) तथा नारायणशास्त्री मराठे १२६, १८२.
केळकर बन्धु २१.
केळकर तात्यासाहेब (न. चिं.) ३७, ४५, ६५, ६६, ७४, ७८, १७१, १७७, १८७, १८८.
कोकजेशास्त्री १८२.
कोटस्थाने प्र. भा. १४५.
कोठावळे यशवंतराव १९१.
कोठीवाले वि. ना. १४५
कोल्हटकर अच्युतराव बळवंत ३३, १७१.
कोल्हटकर ( गणपतराव ) गणेश नारायण ९, २८.
कोल्हटकर ( डॉ. ) पां. के. ८९.
कोल्हटकर बळवंतराव १२.
कोल्हटकर बाबासाहेब १२६.
कोल्हटकर माधवराव २८.
कोल्हटकर शंकरराव २१.
कोयाजी ( बॅ. ) ७४.
किंकेड सी. ए. २९.
कुंटे ( ना. ) द. का. ( स्पीकर ) १४४.
खटावकर पंडितराव द. १८८.
खटावकर बंधु २८.
खटावकर बा. भा. १८८, १९०.
खरे अनंतराव ७.
खरे काशिनाथ त्र्यंबक ११, ४१.
खरे गणेश हरि ५३, ७२.
खरे त्र्यंबक कृष्ण २१, २२.
खरे (ना.) दाजी आबाजी २९.
खाडीलकर कृ. प्र. ( काकासाहेब ) १६९, १७१, १८८.
खिरे मारुती ४५.
खेडगीकर (ना.) रामभाऊ १२७, १४७.

खेर (ना.) बाळासाहेब ७४, ८२, ८४, ११७, १८९.
गजेंद्रगडकर नरसिंहाचार्य १३६.
गजेंद्रगडकर (न्यायमूर्ती) भय्यासाहेब ७४, १४८.
गाडगीळ (प्राचार्य) धनंजयराव ७४, ८९.
गाडगीळ काकासाहेब (न. वि.) ६६, ११३, १४८, १७१, १८९.
गाडगीळ वामन रामचंद्र ९१.
गाडगीळ महादूकाका ४५.
गायकवाड राजे प्रतापसिंह महाराज १००.
गांधी एकनाथ बाळशेट १४५.
गांधी सौ. कस्तुरबा १८८.
गिरीश (कविवर्य) १४६.
गुजर बाबूराव माधवराव १९१.
गुजर मारुतीराव २७.
गुप्ते सीताराम ८.
गुरुजी कृष्णाजी आबाजी १२, १३, २९, ३३.
गोखले (ना.) गोपाळ कृष्ण १९, २५, ३७, १६८.
गोखले दा. वि. (बाबूराव) पुणे ६६.
गोखले दिगंबरपंत १६५, १९१.
गोखले (पु. पां.) बाबूराव (कऱ्हाड) ८५ ते ८८.
गोखले रघुनाथ काशीनाथ १८४.
गोखले विठ्ठल महादेव ११.
गोडसे गणपतराव ७२, १६५, १६६, १७७.
गोडबोले मास्तर १५२.
गोडबोले रामशास्त्री १४.
गोसावी दत्तात्रय कृष्ण (बुवासाहेब) ५७, ७०, ८४, ८५, १२८, १३२, १४३, १७८.
गोवंडे सदाशिव रावजी ९.
गोळवलकर (मामा) गणपतराव ४५, ४६, १५०, १९१.
गोळे पुं. वि. (नानासाहेब) १३०
गोळे बाळाजी महादेव ११.
गुंजाळ नारायणराव १८८.
घाटे नारो विठ्ठल १३.
घाणेकर नीळकंठ वामन (निळुभाऊ) ४७, ५९, ६०, १७६.
घाणेकर (भाई पंढरी) नाथ (वामन) ४६, ४७, ५६, ६१, ६६, ७२, ७७, १४३, १७५, १७६.
घाणेकर बंधु १७३.
घाणेकर वामनराव ४५, ७९.
घुटे नारायण बाळकृष्ण ९१.
चक्रदेव दिनकर बल्लाळ ४१.
चतुरसिंग (भोसले) ४२.
चरणकर बाबूरावजी १७७.
चव्हाण (ना.) यशवंतराव ११९, १४३, १७८.
चाटफील्ड १७.
चाफळकर (स्वामी) आबासाहेब महाराज ७४.
चांदोरकर १६.
चितळे बळवंतराव ४५.
चितळे (रा. ब.) ३७.
चितळे रामभाऊ २८.
चितळे (भाई) विष्णुपंत ११३.
चिपळोणकर विष्णुशास्त्री १९, ४१, १५५.
चिरमुले अण्णासाहेब १४, २०, ५५, १२६, १३५ ते १३८, १६५.
चिरोल सर व्हॅलंटाईन ३९.
छगला (न्यायमूर्ति) १८१.

छत्रपति (भोसले) अण्णासाहेब १५२.
छत्रपति प्रतापसिंह ( राजे ) ८, ४२.
छत्रपति (शाहू) कोल्हापूर १६४.
छत्रपति शाहू (सातारा) १००, १२५.
छत्रपति राणीसाहेब (सुमित्रादेवी) १४१.
छबी ३०.
छापखाने केशवराव १८८.
जठार ११.
जतींद्र ५६.
जमनादास द्वारकादास १७१.
जयकर (बॅ.) बाबासाहेब ७४, १३८, १८१.
जयप्रकाश नारायण १८९.
जवळकर दिनकरराव ५४, १७७.
जाधव (आ.) तुळसीदास १४५.
जाधव (ना.) भास्करराव ४७, ४९.
जाधव रावसाहेब खंडेराव १७८.
जावडेकर (आचार्य) शंकरराव ६१, ७४, ८८, ८९, ११०.
जिना (बॅ.) ३७.
जेकब बापूजी इस्राईल २९.
जेधे केशवराव ६६, १८८.
जोगळेकर आनंदीबाई १८८.
जोगळेकर काकासाहेब १६५, १९२.
जोगळेकर सौ. पार्वतीबाई १९०.
जोगळेकर बाळासाहेब १९१.
जोशी (आ.) एस्. एम्. १३२, १४७.
जोशी एस्. जी. ८२.
जोशी काकाराव २७, ३५, ३७, १३५.
जोशी काशिनाथ १३१
जोशी काळोपंत २५, १७४, १९१.
जोशी ग. वा. (गोफण) १४६.
जोशी (रा. ब.) गणेश व्यंकटेश २५, २६, ३५, ३७, १६८, १६९.
जोशी गोविंद बाबाजी ४१.
जोशी गोपाळ वासुदेव ८४.
जोशी दत्तोपंत १५, १७, १८.
जोशी धोंडोपंत १५३.
जोशी नरहर भिकाजी १६५.
जोशी नानासाहेब (न. गं.) ४७, ६०.
जोशी नारायणमामा १८६.
जोशी नारायणराव (गोटखिंडीकर) ८६.
जोशी पी. जी. ७४.
जोशी मोरेश्वर विष्णु (नारायण-मामांचे चिरंजीव) १४५.
जोशी रामचंद्र महादेव ८६.
जोशी ( तर्कतीर्थ ) लक्ष्मणशास्त्री ७४, ७७, १२६, १७८, १८२.
जोशी (वीर) वामनराव १६९, १७१.
जोशी श्रीपाद हरी ८६, ९१.
जंगली महाराज ८.
टागोर सत्येंद्रनाथ २०.
टिळक जयंतराव १३२, १३३.
टिळक ( लोकमान्य ) १४, १५, १८ ते २१, २९, ३०, ३२, ३३, ३५, ३७, ३८, ४१, ४३, ४४, ४६, ५१, १४५, १४८, १६३, १६४, १६८, १६९, १७०, १७४, १७६ ते १८०, १८८.
ठाकूर तुकाराम बाळाजी २१.
ठेंगडी ५५.

डावरे (धर्मवीर) विश्वासराव १४४.
डोमिंगो ४६, १६५.
ढवळे (न्या.) एस्. बी. १३३, १३४, १४८.
ढवळे वामनराव २८.
तपासे (ना.) गणपतराव १४३, १७८.
दळवी ७०.
दामले नानासाहेब १८९.
दामले भास्कर १४५.
दाते मामा (दै. काळकर्ते) १३२.
दिवेकर महादेव शास्त्री १८२.
दीक्षित गोविंद हरी २८.
दीक्षित नाना १३६.
दीक्षित वामनराव २८.
देव शंकरराव ५६, ७४,११३, १८९.
देवगिरीकर मामासाहेब ५६.
देवधर (सौ.) इंदिराबाई १८८.
देवधर काशीबाई ५५.
देवधर गोपाळराव ३७.
देवरे (न्या.) राम (भाऊ) ११०.
देवळे चिंतोपंत ३७.
देवी गणपतदास १३६.
देवी सीताराम–दास १९२.
देशपांडे (इंदापूरकर ) ४१.
देशपांडे का. म. ७६.
देशपांडे (डॉ.) कुशाभाऊ २१.
देशपांडे केशवराव १८.
देशपांडे गंगाधरराव ( कर्नाटकसिंह) ८२, १८८.
देशपांडे (डॉ.) नरहर पांडुरंग १७६, १९२.
देशपांडे ना. गो. १६, १७.
देशपांडे नानासाहेब (लक्ष्मण महादेव) ५३, १७८.
देशपांडे बुवा १९०.
देशपांडे वाग्भट ४७, ६०, १३८.
देशपांडे विष्णु (अण्णा) रामचंद्र ७१, ८५, १४५, १७८.
देशमुख का. रा. ८९.
देशमुख बाबासाहेब ३४, १७१.
देशमुख (बॅ.) रामराव ५१.
देसाई (आ.) बाळासाहेब १२३, १४३, १४५.
देसाई (ना.) मुरारजीभाई ११७, १४७.
द्रवीड कृ. नी. ३६.
द्रवीड श्री. त्र्यं. २१.
धन्वंतरी कासेगांवकर १८०.
धुरंधर १३४.
नरसप्पा पेठकर ४२.
नलवडे ६५.
नवले नामदेवराव ५५.
नातू केशव पांडुरंग ११.
नानासाहेब पेशवे ४२.
नाफड विनायकराव १६५.
नित्सुरे तात्या ३३.
निंबाळकर (ना.) राजे मालोजीराव १०१, १४३.
नेहरू (पं.) जवाहरलाल ८१, १८९.
नौरोजी दादाभाई १३, १८.
पक्वासा (ना.) मंगळदास ११८.
पटवर्धन (डॉ.) ८९.
पटवर्धन अच्युतराव ७४, १४६, १८९.
पटवर्धन (राजे) आप्पासाहेब (सांगलीकर) १००.
पटवर्धन काशिनाथपंत १९२.
पटवर्धन दुर्गामामी १९२.

पटवर्धन रावसाहेब १०४, ११७, १७१, १८९.
पटवर्धन शामा ११२.
पटेल डाह्याभाई १०९.
पटेल (ना.) वल्लभभाई ८२, १२५, १८०.
पटेल (ना.) विठ्ठलभाई १६९,१७१.
परचुरे (दत्तात्रय वासुदेव) शास्त्री ५३, ५५, ७२, ८४, ११३, १७७.
परुळकर (रा. सा.) १३९.
परांजपे (काळकर्ते) अण्णासाहेब (शिवराम महादेव) ५६, १७१.
परांजपे दत्तात्रय रामचंद्र १००, १०२, १३९.
परांजपे विष्णुशास्त्री १८२.
पागे (आ.) विठ्ठलराव ११०.
पाटसकर (ना.) दादासाहेब १४८.
पाटील (आ.) आत्माराम ६५.
पाटील (आ.) के. डी. ११८, ११९.
पाटील (आ.) चंद्रोजीराव ११६, ११९.
पाटील धोंडजीकाका ६५.
पाटील (क्रां. सिं.) नाना १८९.
पाटील (कर्मवीर) भाऊराव ५९, ७७, १६४, १७७.
पाटील रंगा १११.
पाटील (आ.) वसंतराव ११२, १८०.
पाठक (रा. ब.) मास्तर १६, १७, २१, ३४, ४७, ७९, १३५, १३६, १५३, १६८, १७५, १७६.
पानसे गणपतराव ३२.
पारसनीस दत्तोपंत ब. १३, २८.
पारसनीस (प्राध्यापक) श्री. रा. १४४.
पालकर राजाभाऊ ६०.
पिऱ्या मांग २९.
पिसाळ ८८.
पिंगळे अण्णासाहेब १५.
पुटाणी १३९.
पेंढारकर सदाशिवराव १११, ११६.
पोतदार (म. म.) दत्तो वामन ७४, १४४.
पंडित (प्रा.) के. जी. १४८.
पंडित गणेश गोपाळ ११.
पंडित विष्णु परशराम ४१.
पंतप्रतिनिधी नानासाहेब २९, ७४.
पंतप्रतिनिधि बाळासाहेब २९, ७४, १००.
प्रभावतीदेवी (सौ) १८९.
प्रभुणे विष्णुपंत १३६.
फडणीस नारायणराव ११.
फणसळकर गणपतराव १४, २१, २५, २८, २९, ३३ ते ३५, ३७, ४५, ७९, १३६, १६८, १७१, १७६, १८७.
फणसळकर गोविंद जयराम १६६.
फणसे (प्रांतसा.) १६५
फर्नांडीस ३४.
फुले (म.) ज्योतिराव ४१.
बन्दोपाध्याय १४६.
बहुलेकर बाबा ५३, ७२.
बक्षी बापूराव १५३.
बागवान इब्राहिम रसूल १२८.
बापट (श्रौताचार्य) धुंडिराज गणेश १०, ७४, १२६, १८७, १८८.
बापट (सेनापति) पां. म. १८९.

बापट सदाशिवराव १८७, १८८.
बावर भाऊराव ३४.
बाबा राघवदास (राघवेंद्र शेषो पाच्छापूरकर) १०९, १८९.
बाबू अंबू महार १०.
बास्कर व्हिले ४६, १६५.
बाळाजी नारायण २१.
बिर्ला शेठ १३८.
बोडस (रा. ब.) १३५.
बोले (रा. सा.) एस्. के. १४८.
बोस (देशगौरव) सुभाषचंद्र १८०, १८९.
ब्रॅन्सन् (बॅ.) २९.
भट गोपाळ अनंत २३.
भट चिंतामण नारायण २०.
भागवत (आचार्य) ११०.
भागवत भाऊसाहेब १७५,१७६.
भागवत विनायकराव १३६.
भागवत शंकरराव ५५.
भाटे नाना १६५, १९१.
भावे नीळकंठराव १३१ ते १३३.
भावे (रामभाऊ) ५६, १३६.
भावे (आचार्य) विनोबा १८२.
भिडे (गुरुजी) दामोदरपंत १०२.
भिडे रामभाऊ १९२.
भिडे वामन अनंत १३६.
भिडे (डॉ.) विष्णुपंत २१, २५, ७९, १३६, १७१, १७६.
भिडे शंकर विष्णु (बाबूराव) ३१, ६०, ९६, १६६, १७६.
भिडे हरिभाऊ १५३.
भुस्कुटे विनायकराव १८८.
भोपटकर ( धर्मवीर ) अण्णासाहेब ५६, ७३, ७४, १०२, १२२, १४४, १७७.
भोसले पांडोबा २७.
मराठे काशीनाथ बाळकृष्ण २०.
मल्हारराव गायकवाड ९.
मसूरकर अम्बू ३४.
महंमद अल्ली (मौ.) १८८.
महंमद गौसखान ९२.
महाजनी कृष्णराव सखाराम ९.
महाजनी (रँ.) ग. स. ८०, १४८.
महाजनी हणमंतशास्त्री ६०.
महाडिक राजे १७७.
महात्माजी ( गांधी) ४६, ५१, ६१ ते ६३, ६९, १०८, १६४, १७४, १७८, १७९, १८८.
मळेकर (वैद्य) लक्ष्मण रामचंद्र १६६.
मंडलीक (न्या.) ४०.
मंडलीक (ना.) रामभाऊ ७४, १२७, १३२, १७७.
माजगावकर काशीनाथपंत १६५.
माजगावकर ब. र. १५, १६, ४६.
माटे (कीर्तनकार) ४१.
माटे दत्तोपंत १५२.
माणिकचंद कस्तुरचंद १९२.
मालकम ४२.
मालवीय पंडित मदनमोहन १२३, १८९.
मालशे गणपतराव १५.
मीरचंदानी १३४.
मुतालिक (सरदार) अण्णासाहेब १७७.
मुतालिक तात्यासाहेब १४.
मुथा शेठ ९२.
मुनशी (ना.) कन्हय्यालाल ७४.
मुनशी सौ. लीलावती १७१.

मुनशी शेख वल्लद चांद १३.
मुंडले वासुदेव (राव) दामोदर ३५, ५६, ७४, ११७.
मेकॉले ४२.
मेहता (ना.) चुनिलाल ४७, ५४.
मेहता जमनादास ७४, ८२.
मेहता (डॉ.) जीवराज १८१,
मोडक रामभाऊ ५६, ५९, ६०.
मोडक वि. आ. (मास्तर) १३०.
मोहिते ६४.
मॅलट ३३.
युसुफ अबदुल महंमद (मौ.) १८८.
येरवडेकर (फौजदार) ११२.
रड्डी रंगाचार्य १३६.
रबडे (आचार्य) ५५.
रवींद्रनाथ टागोर २०.
रामानंद (स्वामी) भारती ११६.
राजगोपालाचारीअर (चक्रवर्ती ना.) १११, १८१.
राजा महाराजासिंग १८१.
राजाज्ञे बापूसाहेब १३९.
राजेन्द्रप्रसाद ( राष्ट्रपति ) ६९, १२४, १८९.
राजोपाध्ये बाळासाहेब १६५.
राधाकृष्णन् (सर डॉ.) १३५, १३८, १३९.
रानडे बंडो गोविंद १५२.
रानडे (न्यायमूर्ती) म. गो. ९, १७, १८, २०, ४०, ४१, १७६.
रंगो बापूजी (गुप्ते) ८, ४२.
लठ्ठे (ना. ) आण्णासाहेब ८९.
लवाटे शंकरराव ४५.
लिमये गोविंदराव १२, १४, १७५.
लिमये शिवरामपंत ७४.
लिमये न. वा. ११८, १६७.
लुणिया बंडू शेठ १९२.
लेले बाबा ५९.
लेले भाऊशास्त्री १५.
लोकहितवादी ४०.
लोगन २९.
लॉडविक ८.
वझे (एस्. जी.) श्री. ग. १३३, १४४.
वागळे (डि. जज्जसाहेब) १४१.
वाटवे भय्याशास्त्री (वासुदेव महादेव) ८५, ८६, १७७.
वासुदेव बळवंत (फडके) ४२.
विजापूरकर (प्रा.) विष्णु गोविंद १५५.
विनायकबुवा (महाराज) मसूरकर ७४.
विवेकानंद १८.
विश्वेश्वर अय्या (सर) १३८.
विष्णुबुवा ब्रह्मचारी ४०.
वेणीमाधव शास्त्री (जोशी) ८९.
वेब ११०.
वेलणकर (धनी) १४५.
वैद्य चिंतामणराव ३७, १७०, १७१, १८८.
वैद्य नानासाहेब (वाई) १४, १५६, १७५, १७६.
वैद्य सौ. प्रमिला वामन १९०.
वैद्य बाबूराव ५६, ६३, ७०, १६५ ते १६८.
वैद्य (डॉ.) भाऊराव ११३.
शिराळकर पांडुअण्णा (पांडुरंग केशव) ५६, ७१, ८५, ८६, ९९, १२६, १३६.

शिंदे (आ.) बी. जे. १३९.
शिंदे शंकर विठोबा १३२.
शेख अब्दुल कादर १४२, १५०, १५३.
शौकतअल्ली १८८.
श्रोत्री गोविंदराव (ब्रह्माश्रम स्वामी) २७, ३१, ३३, ४६, ४७, ६०, ८७, १३६, १६३, १६५, १७६, १८७, १९२.
सप्तर्षि नानासाहेब ७४.
सहस्त्रबुद्धे अण्णासाहेब (सातारकर) ३२, ३३, ११६, १५२, १९२.
सहस्त्रबुद्धे बळवंतराव १२, २६, २७, २८, ३२, १३६, १७२, १७६.
सहस्त्रबुद्धे भाऊसाहेब १९२.
साखवळकर दादासाहेब ५६, ६२, ७०, ९१.
साठे सौ. अन्नपूर्णाबाई १९०.
साठे गणपतराव ४५, ४७, ९९.
साठे (डॉ.) ५५.
साठे बू (आ.) ११०.
साठे माधवराव १९१.
साठे शंकर हरि (तात्यासाहेब) ६०, ७४, १०६, ११२, १५८, १६५, १७४.
सातवळेकर (पं.) ७४.
साने गुरुजी ११७.
साने (मोरगीरीकर) ७.
सार्वजनिक काका ९, ४१.
सावरकर (स्वा.) विनायकराव (बॅ.) ३०, ८२.
सावंत लक्ष्मणराव १७८.
सुभाना निकम ४२.
सुमंत (सोलापूर) १८८.
सोमण अशोक माधव ६, १९०
सोमण सौ. इंदिराबाई १९०.
सोमण गणेश महादेव ६, १०, १७, २०, १४९ ते १५१, १५३, १५६, १८३, १८४, १८७, १८८.
सोमण गंगाधर बापू ६, १९०.
सोमण गंगुबाई ७.
सोमण चंपूताई ६१.
सोमण दुर्गाताई ३९.
सोमण पंताजी शिवदेव ३.
सोमण पार्वतीबाई १८३.
सोमण (कु.) बनुताई १९०.
सोमण भागुबाई ७.
सोमण भास्करराव ६, १८८, १९०.
सोमण महादाजी भास्कर ४, ६ ते ८, १८, १४९, १८३, १८४.
सोमण भाऊसाहेब (रामचंद्र गणेश) २ ते ८, १०, ११, १५, १७ ते ३१, ३३ ते ४१, ४३ ते ८०, ८४ ते ८६, ९२ ते १०३, १०५ ते १०७, १०९ ते १११, ११३ ते १३२, १३४ ते १६८, १७१, १७३ ते २०२.
सोमण विनायकराव भास्कर ६, १९०.
सोमण विकास शंकर ६, १९०.
सोमण विठ्ठलराव ६, ६१, ९९, १८९, १९०, १९१.
सोमण शंकरराव ६, १९०.
सोमण सीताबाई १८३, १८९.
सोमण सुधाकरपंत भास्कर ६, १९०.
सोमण सुरेश विठ्ठल ६, १९०.

सोमण संजीव वि. ६, १९०.
सोहनी महादेवराव १५३.
हकीम इस्माईल नूरमहंमद १२७, १७८.
हकीम नज्मुद्दीन ४६, ४७.
हडप विठ्ठलराव (वा.) ५९, ६०.
हर्डीकर (डॉ.) ५५, १८८.
हर्डीकर सौ. प्रभावती १९०.
हसन मुंजावर १५.
हळबे मारुतराव ७०.
हिरे (ना.) भाऊसाहेब ११३, १४४.
हिंगमिरे (डॉ.) ६५
हुकेरीकर (ना.) रा. श्री. १४५.
होनराव ६०.

## संस्थांची सूचि

ॲडव्होकेट ऑफ इंडिया ३२.
आर्यांग्ल वैद्यक विद्यालय ७४.
ऐक्य ८७, १६७.
केसरी ११, २९, ३२, ३३, ८७, १११, १४६, १६३, १७०.
ग्रामसेवा संघ ८४.
छोटी कांग्रेस १२, २०.
टिळक राष्ट्रीय विद्यालय १७३.
त्रिकाळ ८७.
नवाकाळ ८७.
प्रकाश २७ते३०, ३५, १६२ ते १६६.
प्रतोद १३, १५, २७.
प्राज्ञ पाठशाळा ५७, १८१.
प्रेक्षक २८, २९, १६२.
बार असोसिएशन (मिरज) १४५.
बोधसुधाकर २८.
भारतमाता ३०.
महाराष्ट्र कोकिळ २८.
महाराष्ट्र मित्र २७, २८.
महाराष्ट्र वृत्त २७, २८.
महाराष्ट्रीय वृत्तपत्र–समिती ११३.
माझिनी चरित्र ३०.
मित्रोदय २७.
मोदवृत्त १५, २७.
युनायटेड वेस्टर्न इंडिया बँक १३७, १८१.
राष्ट्रसभा समाचार २८.
रेट पेअर्स असोसिएशन १५.
लँड मॉर्गेज बँक १३९.
वक्तृत्वोत्तेजक सभा १३
विदूषक १३, २७.
वृत्तसार १२, २७.
वृत्तसुधा २८.
वेस्टर्न इं. ला. इं. कं. ७५, १३७.
शुभसूचक ११, २७, २८, १६७.
श्रीशाहू २७, २८, १६७,
समर्थ ७९, ८७.
सर्व्हंटस् ऑफ इंडिया ८८.
सातारकर स्त्री संगीत ३४.
सातारा–नगरपालिका ११.
सातारा स्वदेशी कंपनी १३६, १३७.
साधना १४६.
सार्वजनिक सभा ९.
सोमणांची वंशावळ ६.
स्वजन हितैषी ३३.
ज्ञानप्रकाश ८७.